# महानगरपालिका औरंगाबाद

## स्थायी समिती इतिवृत्तांत

## दिनांक १५-०५-९२ ते दिनांक १७-१०-९२

## रजिष्टर क्र. १३

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद*

**दिनांक १५ मे १९९२ रोजी भरलेल्या विशेष स्थायी इतिवृत्तांत शुक्रवार दिनांक १५ मे. १९९२ रोजी सकाळी ११ वाजता " नगरभुवन " (टाऊन हॉल) येथे मा. आयुक्त औरंगाबाद महानगरपालिका यांनी बोलाविलेल्या विशेष स्थायी समिती सभेस सुरुवात झाली. या सभेस मनपा अधिकाऱ्यासह निम्ननिर्दिष्ट स. सभासद उपस्थित होते.**

१) श्री. नारायण मोहन फत्तेलष्कर
२) श्री. भगुरे तुळशीराम छगन
३) श्री. अलिम बेग मिर्झाकलीम बेग
४) श्री. गिरजाराम नानाराव हाळनोर
५) श्री. विजय गोविंदराव पालीवाल
६) श्री. जावेद हसनखॉन कासीमखान
७) श्री. मोहमंद इस्माईल अब्दुल करीम
८) श्री. गील इकबालसिंग प्रिंतमसींग
९) श्री. अजिजुल्ला बेग वाहेद बेग
१०) श्री. पेरकर विठ्ठल कोडांजी
११) श्री. ओक जयवंत केशवराव
१२) श्री. शिंदे मधुकरराव माणिकरराव

**संवाद :**

**मा. आयुक्त :** नव निर्वाचित स्थायी समिती सभासदाचे प्रथम अभिनंदन आजच्या विशेष स्थायी समिती सभेकरीता स्थायी समितीच्या सर्वसभासदामधुन तात्पुरत्या अधक्षाची निवड करण्यात यावी. त्यासाठी स. सदस्यांमधुन तात्पुरत्या अध्याक्षाचे नाव सुचित करण्यात यावे.

**श्री. म. इस्माईल अ. करीम :** स्थायी समिती सभापती पदाकरीता इच्छुक असलेल्या तीन सभासदांचे नामनिर्देर्शन इच्छुक असलेल्या तीन सभासदांचे नामनिर्देन प्रत स्विकारण्यात आलेले नाहीत. नियमाप्रमाणे निवडणूकीतून दिवस --- घ्यावयास पाहिजे. असे असत नाही. मिंटींग सुरु झाल्यनंतर स. सदस्य श्री तुळशीराम भगुरे याचे सभापती पदाचे नामनिर्देशन पत्र आज स्विकारले आहे. म्हणून स्थायी समिती सभापती पदाची निवडणूकन मिटींग इतिवृत्ताची घेण्यात यावी किंवा या बाबत अधिनियमात काय तरतूद आहे याचा खुलासा व्हावा. तसेच स्थायी समिती सभापती निवडणुकी बाबत न्यायालयाने काय आदेशदिले आहे ते नसभागृहात वाचून दर्शविण्यात यावे कोर्टाने ऐनवेळी फॉर्म स्विकारावेत असे आदेश दिलेले आहेत काय?

**श्री. इकबालसिंग गील :** आजच्या विशेष स्थायी समितीचे अध्यक्ष पदाकरीता स. सदस्य श्री. अजिजुल्ला बेग यांचे नांव मी सुचवितो.

**श्री. जावेद हसन खान :** न्यायालयाने १५ तारखेस सभापती पदाच्या निवडणुकी बाबत मिटींग घेण्याचे आदेश दिलेले आहे.

**श्री. मो. इस्माईल :** निवडणुक प्रक्रिया अवैध ठरवून न्यायालयाने सभापती पदाचा निवडणुक सभेसाठी न्यायालयाने स्थगिती दिली आहे. २० तारखेपुर्वी निवडणुक घेवू

नये असे न्यायालयाने आदेश दिले होते. म्हणजेच सभापती पदाच्या निवडणुकीच्या सभेसाठी जी सुचना काढण्यात आली ती चुकीची आहे. पण वादीने कोर्टातून केस मागे घेतली आहे. म्हणजेच न्यायालयाने २० तारखेस सभापती पदाची मिटींग घेण्याचे आदेश दिला आहे. प्रशासनाने स. सदस्य श्री. तुळशीराम भगुरे यांचे स्थायी समिती सभापती पदाकरीतांचे नामनिर्देषन पत्र आज स्विकारले. म्हणजेच स्थायी समिती सभापती पदाच्या निवडणुकीची मिटींग तीन दिवसांनी घ्यावी आणि न्यायालयाचा आदेश वाचुन दाखववावा. अन्यथा आजची मिटींग शलीलीगल ठरले, तेंव्हा मिटींग बाबतची रुलींग द्यावी. आजची निवडणुक अवैध आहे. एव्हढेच कोर्टात आल्या आदेशात म्हटले होते. प्रशासनाने काढलेल्या नोटीसवर निवडणुकीची तारीख नव्हती. म्हणूनच हे प्रकरण न्यायप्रविष्ठ झाले होते. मा. आयुक्तांनी माझ्या प्रश्नाचे उत्तर दिलेले नाही.

**श्री. जावेद हसन :** स. सदस्य श्री. एकबालसिंग गिल यांनी दिलेल्या तात्पुरत्या अध्यक्ष पदालाही श्री. अजिजुल्ला बेग यांच्या नावांत माझे अनुमोदन आहे.

स. सदस्य श्री. जावेद हसनखान यांचे अनुमोदना नंतर स. सभासद श्री. नारायण फत्तेलष्कर, श्री. गिरजाराम हाळनोर, श्री. विजय पालीवाल, श्री. जावेद हसनखान, श्री. विठ्ठल पेरकर, श्री. मधुकर शिंदे, श्री. जयवंत ओक, व ॲड एकबालसिंग गील यांनी हात वर करुन स. सभासद श्री. अजिजुल्या बेग यांच्या तात्पुरत्या अध्यक्ष पदाच्या निवडीस मंजुरी दिली. यानंतर मा. आयुक्त यांनी स. सभासद श्री. अजिजुल्ला बेग यांची आजच्या विशेष सभेकरीता तात्पुरते अध्यक्ष म्हणून निवड झाल्याचे जाहीर केले.

**मा. आयुक्त** : आजच्या सभेसाठी तात्पुरत्या अध्यक्षांची स. सभासदांनी निवड केलेली आहे. स. सभासदांनी उपस्थित केलेलया मुद्याचे उत्तर मा. अध्यक्ष देतील.

**श्री. अलीम बेग :** मी माझे नामनिर्देषन पत्र स्विकारणे बाबत ते पत्र दिले आहे, त्याचे अद्यापपर्यत मला उत्तर देण्यात आले नाही. त्याबाबत आपल मा. अधक्ष महाराज सचिवांकडे विचारणा करावी.

**मा. अध्यक्ष** : स. सभासदांच्या सुचनेप्रमाणे माझ्याकडे कोणतेही पत्र आलेले नाही. सचिवांनी निवडणुक प्रक्रियेत सुरुवात करावी. ज्या स. सभासदांनी आपले उमेदवारी मागे घ्यावयाची असेल त्यांचे साठी ००.१९ मिनीटाचा वेळ देण्यात येतो.

( वेळ अंदाजे ११.२०) यानंतर नामनिर्देशन पत्र परत घेण्याची प्रक्रिया सुरु झाली.

**श्री. मो. इस्माईल :** आपण चुकीच्या मार्गाने ही निवडणुक घेत आहात. ही निवडणुक इल्लीगली आहेत.

**मा. अध्यक्ष** : उमेदवारी परत घेण्याबाबत दिलेली वेळ संपलेली आह. तेव्हा मा. सचिव यांनी सभापती पदासाठी किती उमेदवार आहे. याचा खुलासा करावा.

**मा. सचिव** : स्थायी समिती सभापती पदाकरीता एकूण आठ नामनिर्देशन पत्र प्राप्त झाले होते. त्यापैकी उमेदवारांनी आपले नामांकन पत्रे परत घेतली आहेत. यानंतर स्थायी समिती सभापती पदाकरीता १) स. श्री. अलीम बेग मिर्झा कली बेग २) ॲड. एकबालसिंग गिल ३) स. श्री. मोहमंद इस्माईल अब्दुल करीम हे तीन उमेदवार निवडणुक रिंगणात आहेत.

**मा. अध्यक्ष** : मा. सचिव यांनी मतदान पध्दती बाबत सभासदांना माहिती द्यावी.

मा. सचिव यांनी सभापती पदाची निवडणुकी बाबतचे नियम सभागृहात वाचुन दाखविले.

**मा. अध्यक्ष** : मतप्रत्रिका तयार करण्यासाठी ००.२० मिनिटाचा अवधी देण्यात येतो व ही सभा १२.०५ वाजे पर्यंत तहकुब करण्यात येते.

तहकुब करण्यात आलेली सभा दुपारी १२.०५ वाजता पुन्हा सुरु झाली.

**श्री. मो. इस्माईल, श्री. अलीम बेग** : सभापती पदाच्या निवडणुक मिटींगला न्यायालयाने मनाई हुकूम दिला आहे. तसे वकिलपत्रही दिले आहे. जर या आयुक्त या निवडणुकीस सहाकर्य करीत असतील तर तो कंटेम्प्ट ऑफ कोर्ट हीदल प्रकरण क्रमांक ४१७/१९/९२ या आदेशान्वये मा. न्यायालयाचे निवडणुकीस मनाई हुकूम दिला आहे. म्हणजेच आजच्या निवडणुकीचे काम करता येणार नाही.

**मा. अध्यक्ष** : आपण मा. न्यायालयाची आर्डर आणली आहे काय? जे पत्र आपण वकीलाचे म्हणून वाचुन दाखविले त्यात कोठेही निवडणुकीस वा आजची सभा घेण्याबाबत मनाई हुकूम दिल्याचा उल्लेख नाही. तसेच निवडणुक प्रक्रिय या अगोदरच सुरु झाली असल्यामुळे ती आता थांबविता येत नाहीत. मा. सचिव यांनी निवडणुक प्रक्रिया पुढे चालु ठेवावी.

**श्री. मो. इस्माईल** : न्यायालयाचा मनाई हुकूम असतांना मा. आयुक्त व मा. अध्यक्ष यांच्या पक्षपाती धोरणामुळे मी १ श्री अलिम बेग सभात्याग करीत आहेत.

स. सभासद श्री. मोहमद इस्माईल व अलीम बेग त्यांनी १२.१० वाजता सभा त्याग केला. त्याचवेळी स. सभासद श्री. तुळशीराम भंगुरे हे ही सभागृहा बाहेर पडले.

**मा. अध्यक्ष** : निवडणुक प्रक्रिया सुरु झाली आहे. मतदानासाठी ००.२० मिनिटाचा अवधी देण्यात येते आहे. मतदानास सुरुवात झाली.

**मा. अध्यक्ष** : जे स. सभासद सभापती पदाच्या निवडणुकीसाठी उभे आहेत. त्यांनी मतमोजणीसाठी आपला प्रतिनिधी नियुक्त करावा. आता मतदानाची वेळ संपलेली आहे. सभापती पदाकरीता झालेल्या मतदानानुसार मतमोजणी करण्यात आली. त्यामध्ये तीन मतदारांनी मतदान केले नाही. उमेदवारांना पडलेली मत खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. अलीम बेग मिर्झा कलीम बेग | ०० मते |
| २. | श्री. मो. इस्माईल अ. करीम | ०० मते |
| ३. | श्री. एकबालसिंग गिल | ०९ मते |

वरील प्रमाणे स. सभासद श्री. एकबालसिंग गिल यांना सर्वाधिक म्हणजेच बारा पैकी ०९ मते पडल्यामुळे सभापती पदाकरीता श्री. एकबालसिंग गिल यांची निवड झाल्याचे मी घोषित करतो.

यानंतर नवनिर्वाचित सभापती श्री. एकबालसिंग गिल हे सभापती पदावर स्थानापन्न झाले, व नवनिर्वाचित सभापतीच्या स्वागतार्थ समयोजित भाषणे झाली. त्यानंतर सभेचे कामकाज संपल्याचे नवनिर्वाचित मा. सभापती यांनी घोषित केले.

स्वाक्षरित/- स्वाक्षरित/-
सचिव, सभापती,
महानगरपालिका, औरंगाबाद. महानगरपालिका, औरंगाबाद.

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद*

**दिनांक २८-०५-९२ रोजी दुपारी ३.०० वाजता समिती सभागृहात मा. सभापती ॲड इकबालसिंग गिल यांच्या अध्यक्षतेखाली विशेष स्थायी समिती सभेस सुरुवात झाली. या सभेस कार्यालयीन अधिकाऱ्यासह निम्ननिर्दिष्ट सन्माननीय सभासद उपस्थित होते.**

१) श्री. नारायण मोहन फत्तेलष्कर
२) श्री. गिरजाराम नानाराव हाळनोर
३) श्री. विजय गोविंदराव पालीवाल
४) श्री. जावेद हसनखॉन कासीमखान
५) श्री. अजिजुल्ला बेग वाहेद बेग
६) श्री. पेरकर विठ्ठल कोडांजी
७) श्री. शिंदे मधुकरराव माणिकरराव
८) श्री. ओक जयवंत केशवराव

**विषय क्र. २/१ :**

औरंगाबाद शहरास होणाऱ्या पाणीपुरवठा बाबत चर्चा करणे.

**संवाद :**

**मा. सभापती** : शहरात होणाऱ्या पाणी पुरवठयाच्या प्रश्नावर चर्चा करण्यासाठी आजची मिटींग बोलाविण्यात आली आहे, तेंव्हा सभासदानी पाणी पुरवठयाच्या प्रश्नावर चर्चा करावी.

**श्री. गिरजाराम हाळनोर :** दुषकाळ असतांनाही शहरातील पाणी पुरवठा व्यवस्थित हाताळण्या बाबत पाणी पुरवठा विभागाच्या अधिकाऱ्याचे अभिनंदन करण्यात येते. गेल्या एक दोन दिवसात काही तांत्रिक अडचणीमुळे पाणी पुरवठा होऊ शकला नाही. तो तांत्रिक अडचण आता दुर झालेली आहे. या शिवाय गत सर्वसाधारण सभेत पाणी पुरवठया बाबत चर्चा झाली असतांना पुन्हा या सभेत पाणी प्रश्नाबाबत काय चर्चा करणात हे कळत नाही. पाणी पुरवठयाचे अधिकारी पाणी पुरवठा संबंधि रात्रदिवस काम करतात हे त्यांच्या बरोबर फिरुन अनुभवले आहे.

**श्री. नारायण फत्तेलष्कर, श्री. विठ्ठल पेरकर :** सर्वसाधारण सभेतील चर्चेनुसार पाणी पुरवठयाबाबत काय कार्यवाही झाली याचा खुलासा व्हावा.

**(जलगृह अभियंता) :** सर्वसाधारण सभेतील चर्चेनुसार शहरात विंधन विहीरी घेणे बाबत अंदाजपत्रक तयार करण्यता आले असून, प्रशासकीय मान्यता मिळाली आहे.

**श्री. जावेद हसन खान, श्री. विठ्ठल पेरकर, श्री. नारायण फत्तेलष्कर :** विंधन विहीरी बाबत तयार करण्यत आलेले अंदाजपत्रक मंजुरीसाठी आजच्या सभेत ठेवण्यात यावे म्हणजे त्यास तातडीने मंजुरी देता येईल.

**श्री. गिरजाराम हाळनोर :** शहरास होणाऱ्या पाणी पुरवठयासंबंधी स्थायी समितीची मिटींग होण्या ऐवजी पाणी पुरवठा वितरण प्रकरणी परीसर अभियांत्रिकी विभाग, महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळ आणि महानगरपालिका या कार्यालयाच्या अधिकाऱ्यांशी मा. सभापती यांनी चर्चा करणे आवश्यक होते.

**श्री. जावेद हसन खान :** एखाद्या प्रभागात पाणी पुरवठा न झाल्या पाणी पुरवठयाची सुचना देण्याकरीता जलकुंभावर दुरध्वनीची व्यवस्था असणे आवश्यक आहे.

**जलगृह अभियंता :** विस्कळीत पाणी पुरवठया संबंधी मा. जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयात चर्चा झाली. या चर्चेच्या वेळी मा. कार्यकारी अभियंता मनपा औरंगाबाद हे उपस्थित होते. या चर्चेच्या वेळी आज दिवसा सिडको भागाला पाणी पुरवठा करण्योच ठरले, त्यानुसार सिडको भागास दिवसा पाणी पुरवठा करण्याच्या दृष्टीने वरीष्ठाचे आदेशानुसार पंपींगची व्यवस्था करण्याचे प्रयत्न केले.

**श्री. जावेद हसन खान :** टँकर द्वारे पाणी पुरवठ्ज्ञ करतांना मंदिर मस्जिद या करीता रात्रीचे वेळी पाणीपुरवठा करण्यात यावा आणि सार्वजनिक उपयोगाकरीता पुर्ण दिवस टँकरद्वारे पाणी पुरवठा करणे आवश्यक असल्यामुळे पाणी पुरवठयाची परिस्थिती लक्षात घेता टँकद्वारे बांधकामासाठी घोषणा पाणी पुरवठा बंद करण्यात यावा.

**श्री. गिरजाराम हाळनोर :** एखादया प्रभागात पाणी पुरवठा झाल्यास नगरसेवक यांनी टँकरद्वारा पाणी पुरवठा करण्याबाबत पत्र दिले असता अधिकाऱ्यांच्या मंजुरीसाठी वेळ न घालविता ताबडतोब टँकरद्वारे पाणी पुरवठा करण्यात येईल अशी व्यवस्था करण्यात यावी.

**मा. सभापती** : मनपाकडे सध्या कार्यरत असलेल्या टँकर व्यतरिक्त पाणी पुरवठयासाठी खाजगी टूंकर भाडयाने घेता येतील काय याबाबत अतिरिक्त शहर अभियंता यांनी खुलासा करावा.

**अतिरिक्त शहर अभियंता :** पाणी पुरवठा व्यवस्थेसाठी खाजगी टँकर भाडयाने घेण्याबाबत या पुर्वीचे प्रयत्न करण्यात आले असता, खाजगी टूंकर भाडयाने मिळत नाही ही बाबत लक्षात घेवून सार्वजनिक पिण्याच्या पाण्याचा पुरवठयात सुधारणा करण्याच्या दृष्टीने महापालिकेकडे असलेल्या टँकरच्या कामाची वेळ बदलून सकाळी ९.०० ऐवजी सकाळी ६.०० वाजेपासून टँकरद्वारे पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यास सुरुवात करण्यात आली आहे. तसेच बांधकामासाठी टँकरद्वारे होणारा पाणी पुरवठा बंद करण्यात आला आहे.

**श्री. मधुकर शिंदे, श्री. गिरजाराम हाळनोर :** सर्वसाधारण सभेत पाणी पुरवठया संबंधी चर्चा झाली असतांनाही आजची विशेष सभा म्हणजे स्थायी समितीचे प्रकरण न्यायालयात असल्यामुळे आजची सभा ही फार्स म्हणून घेतली जात आहे. खरे तर आजच्या मिटींगची आवश्यकता नाही. पाणी पुरवठयासंबंधी सभागृहात चर्चा होत असतांना पाणी पुरवठयाचे कोण कोण अधिकारी सभागृहात उपस्थित आहे. कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा कोठे आहेत ते आपणांस विचारुन गेले आहे काय? पाणी पुरवठयासंबंधी चर्चा होत असतांना पाणी पुरवठयाचे अधिकारी जर सभागृहात हजर नाहीत तर या मिटींगला काय अर्थ आहे. सभागृहाने घेतलेल्या निणर्याबाबत उप अभियंता ऑर्डर मानणार आहेत काय?

**जलगृह अभियंता :** पाण्याचे प्रश्नासंबंधाने मा. कार्यकारी अभियंता बम्हगव्हाण येथे गेले आहे.

**श्री. मधुकर शिंदे :** वरखड माता मंदिरा करीता पाणी पुरवठा करण्यासाठी तीन महिन्यापुर्वीची ऑर्डर दिला आहे. परंतु अद्यापपर्यंत एकही टँकर पाठविण्यात आला नाही. आजच्या सभेत कार्यकारी अभियंता उपस्थित नाही हे मान्य नाही म्हणून मी सभात्याग करीता आहे.

दुपारी ३.४० वाजता स. सभासद श्री. मधुकर शिंदे यांनी सभात्याग केला.

त्याचेवळी सन्माननीय सभासद श्री गिरजाराम हाळनोर व सन्माननीय सभासद श्री. जयवंत ओक यांनी सभागृह सोडले.

**श्री. जावेदहसन खान :** जलगृह अभियंता-१ यांनी वरखड माता मंदिराकरीता आजच टँकर पाठविण्यीच व्यवस्था करावी.

**मा. सभापती** : पाणी पुरवठयाचे सुसूत्रतेसाठी उप अभियंता श्री. ए. आर. शिंदे यांना शहरातील सर्व टाक्यावरील पाण्याचे वितरण, टाकी भरणे आणि लिकेज या कामासाठी एक महिन्याकरीता नियुक्त करण्यात यावे.

**श्री. अजिजुल्ला बेग :** जायकवाडी जलाशय, नहरे अबरी या ठिकाणाहून शहरास किती एम. एल. डी. पाणी मिळते याचा खुलासा व्हावा.

**जलगृह अभियंता :** १९ तारखेपासुन जायकवाडी जलाशय येथुन कमी पाणी मिळते.

**अतिरिक्त शहर अभियंता :** जायकवाडी जलाशय येथुन अंदाजे ५८ ते ६० एम. एल. डी. खाम धरण नेहरी अंबरी व इतर ठिकाणे मिळुन अंदाजे ७ ते ८ एम. एल. डी. पाणी शहरास मिळते.

**श्री. अजिजुल्ला बेग :** जुन्या शहरास म्हणजेच काजीवाडा, भडकलेगेट, जुनाबाजार, शहागंज इत्यादी भागास ३० एम. एल. डी. पाणी दिले जाते काय? याचा खुलासा व्हावा तसेच सन १९८५ पासुन सिडको भागाती पाणी पुरवठा ताब्यात घेतेवळी जी करार झाला त्या करारानंतर सिडको भागत ज्या १३ सेक्टर मध्ये घरे वाढली त्या घरांना पाणी पुरवठा करण्याबाबत पुर्वी झालेल्या करारात काही अर्थ नमूद करण्यात आहेत काय?

**जलगृह अभियंता :** सिडको भागचा पाणी पुरवठझ ताब्यात घेतला म्हण्जेच सर्व घरांना पाणी दयावे लागेल.

**श्री. अजिजुल्ला बेग :** सिडको भागातील पाणी पुरवठा ताब्यात घेतांना सन १९८५ च्या करारानंतर १३ सेक्टरमध्ये जी नविन घरे झाली त्यांना पाणी पुरवठा करण्याची आवश्यकता नाही. सन १९८५ मध्ये सिडको भागाच्या पाणी पुरवठयासंबंधी झालेला करार सभागृहासमोर ठेवण्यात यावा. याशिवाय १ जुन पासुन पाण्याचे दरात परिसर अभियांत्रिकीय विभागातर्फे वाढ करण्यात येणार असल्याबाबतची बातमी वृत्तपत्रात प्रसिध्द झाली आहे. तेव्हा महानगरपालिकाही दर वाढविणार का?

**अति शहर अभियंता :** महापालिका सध्या ज्या दराने पाणी पुरवठा करीत आहे. त्या दराने पाणी पुरवठा करणे महापालिकेस परवडत नाही. दर वाढविले हा भाग वेगळा आहे.

## ऐनवेळचे विषय

**विषय क्र. ३/२ :**

मा. स्थायी समितीच्या आदेशानुसार प्रस्ताव सादर करण्यात येतो की, सध्याची पाणीटंचाई लक्षात घेता शहर व सिडको भागात नविन ७५ विधंन विहीरी (बोअरवेल्स) खोदण्याची आवश्यकता आहे. या कामासाठी अंदाजे खर्च रु. २५,००,०००/- इतका येईल.

करीता एकूण ७५ बोअरवेल्स खोदण्याच्या कामाचे रु. २५,००,०००/- चे अंदाजपत्रकास मंजुरी मिळण्याच्या विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सध्याची पाणी टंचाई लक्षात घेता शहर व सिडको भागात नविन ७५ विंधन विहिरी (बोअरवेल्स) खोदण्यासाठी रक्कम रु. २५,००,०००/- (पंचविस लाख) च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

तसेच वरील काम मागच्या वर्षी ज्या ऐजन्सी मार्फत विधंन विहीरीचे काम करुन घेतले होते. त्यांचेकडून काम करुन घेण्यात यावे. जेणे करुन काम लवकर होईल असे सर्वानुमते ठरले. सर्वसाधारण सभेस शिफारस करण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

यानंतर सभेचे कामकाज संपल्याचे मा. सभापती यांनी जाहीर केले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरित/- | स्वाक्षरित/- |
| सचिव, | सभापती, |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद*

**दिनांक ०१-०६-९२ रोजी दुपारी ३.०० वाजता भरलेल्या स्थायी समितीचा वृत्तांत सोमवार दिनांक ०१-०६-९२ रोजी दुपारी ३.०० वाजता समिती सभागृह येथे मा. सभापती श्री. ॲड इकबालसिंग गिल यांच्या अध्यक्षतेखाली स्थायी समिती सभेस सुरुवात झाली. या सभेस कार्यालयीन अधिकाऱ्यासह खालील स. सभासद सभासद उपस्थित होते.**

१) श्री. नारायण मोहन फत्तेलष्कर
२) श्री. भगुरे तुळशीराम छगन
३) श्री. गिरजाराम नानाराव हाळनोर
४) श्री. विजय गोविंदराव पालीवाल
५) श्री. अजिजुल्ला बेग वाहेद बेग
६) श्री. पेरकर विठ्ठल कोडांजी
७) श्री. शिंदे मधुकरराव माणिकरराव
८) श्री. ओक जयवंत केशवराव

**विषय क्र. ४/१ :**

दिनांक १५-०५-९२ रोजी संपन्न झालेल्या विशेष स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :**

**श्री. तुळशीराम भगुरे, श्री. विठ्ठल पेरकर, श्री. अजिजुल्ला बेग, श्री. गिरजाराम हाळनोर :** दिनांक २९-०४-९२ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समितीचे इतिवृत्त मंजुरीसाठी सभागृहासमोर का ठेवण्यात आले नाही. याचा खुलासा व्हावा.

**मा. सचिव** : दिनांक २९-०४-९२ च्या सभेत ऐनवेळेवर ७१ विषय ठेवण्यात आले होते. या सभेचे इतिवृत्त तयार करणे बाकी आहे. याशिवाय दिनांक २९-०४-९२ रोजी संपन्न झालेल्या सभेत मंजुर करण्यात आलेल्या विषयांना त्याच सभेत स्विकृती देण्यात आली आहे. तरी पण दिनांक २९-०४-९२ च्या सभेच्या इतिवृत्तांत नियमाप्रमाणे स्विकृती घ्यावी लागेल.

**मा. सभापती** : दिनांक ०६-०६-९२ रोजी आयोजीत करण्यात येणाऱ्या स्थायी समिती सभेस दिनांक २९-०४-९२ च्या सभेचे इतिवृत्त मंजुरीसाठी ठेवण्यात यावे.

**श्री. अजिजुल्ला बेग :** सभागृहात खुलासा केल्याप्रमाणे ज्या सभेत ठराव मंजुर केले जातात. त्याच सभेमध्ये त्या ठरावांना स्विकृती देता येत नाही.

**श्री. गिरजाराम हाळनोर :** आज इंदिरानगर भागातील शाळेचे उद्‌घाटन होत आहे तेव्हा या शाळेसाठी नविन स्टॉप घेणार आहात का? किंवा आहे तोच स्टॉप ठेवणार का? तसेच या शाळेसाठी मुख्याध्यापक नियुक्त करणार का?

**शिक्षणाधिकारी :** विद्यार्थी संख्येनुसार मुख्याध्यापकाची नियुक्ती अवलंबुन असते. शाळा नविन असल्यामुळे विद्यार्थ्यांची कमी संख्या असली तर जेल शिक्षक नियुक्त करण्यात येईल. मुख्याध्यापक नियुक्त करता येणार नाही.

**श्री. मधुकर शिंदे :** मुख्याध्यापक नियुक्त कसा येत नसेल तर शाळा कशाला उघडता? मुख्याध्यापक पदावर काम करणाऱ्यांना साधी सही करता येत नाही. असे मुख्याध्यापक असतली तर विद्यार्थी कसे तयार होतील.

**श्री. गिरजाराम हाळनोर :** बन्सीलाल नगर शाळेमध्ये मुख्याध्यापक नियुक्ती बाबत जी गडबड झाली त्याप्रमाणे इंदिरानगर शाळेतील मुख्याध्यापक नेमतांना गडबड होता कामा नये. ज्येष्ठता यादीप्रमाणे मुख्याध्यापक असावा. नेमण्यात येणारा मुख्याध्यापक शिक्षणाधिकारी यांचे मर्जीचा नसावा.

उस्मानपुरा आणि स्टेट बॅक कॉलनी भागातील ड्रेनेज तुडुंब भरलेले आहे. त्यामुळे या भागातील नागरिकांचे घरात पाणी गोदामामध्ये ड्रेनजचे पाणी शिरले आहे, व तेथील नागरिकांचे आरोग्य धोक्यात आलेले आहे तेव्हा या बाबत खुलासा व्हावा.

**जलनिःसारण अभियंता :** या कामासाठी रुपये ५८,०००/- चे अंदाजपत्रक तयार करुन मंजुरीसाठी पाठविले आहे.

**कार्यकारी अभियंता :** ड्रेनेज कामासाठी अर्थसंकल्पात पन्नास लाख रुपयाची तरतुद करण्यात आली आहे. आता पर्यंत मंजुर झालेल्या कामाचे अंदाजपत्रका प्रमाणे अर्थसंकल्पातील तरतुद बुक झाली आहे.

**श्री. मधुकर शिंदे :** अर्थसंकल्पात करण्यात आलेली तरतुद बुक झाली. तर कामाची अंदाजपत्रके सभासदांच्या समाधानालाही तयार करता का?

**जलनिःसारण अभियंता :** उस्मानपुऱ्यातील काम अप्ररुटींगचे आहे, तेव्हा या कामाचा खर्च दुरुस्ती व देखभाल या सदरातुन करता येईल.

**श्री. जयवंत ओक, श्री. गिरजाराम हाळनोर :** मा. आयुक्त यांनी एका पत्रकाद्वारे सर्व सभासदांनी त्यांच्या वार्डात चालु वर्षात काय काय कामे हाती घ्यावयाची आहेत त्याबाबत विचारणा केली आहे आणि आजच्या सभेत ड्रेनेजच्या कामासाठी करण्यात आलेली तरतुद संपली असल्याचा खुलासा अधिकारी करतात, मग सभासदाच्या प्रभागातील कामाचे काय? याचा खुलासा व्हावा.

**मा. उप आयुक्त :** सन १९९२-९३ च्या अर्थसंकल्पातील ड्रेनज विभागातील तरतुद बुक झाली असली तरी या कामापैकी किती कामे प्रगती पथावर आहेत त्या कामावर किती खर्च झाला आहे, किती कामाचे अंदाजपत्रक मंजुर आहेत या शिवाय दुरुस्ती व देखभाल या सदरात किती शिल्लक आहे या बाबींचा विचार करुन मंजुर झालेल्या अंदाजपत्रकापैकी जी कामे महत्वाची आहेत तीच कामे हाती घ्यावीत, आणि बाकीच्या कामाबाबत नंतर विचार करण्यात यावा. तसेच यानंतरही महत्वाची कामे हाती घेतांना तरतुद कमी पडत असेल तर, ज्या लेखा शिषकामध्ये जादा तरतुद असेल त्या लेखा शिर्षकामधुन या कामासाठी रक्कम वर्ग करण्याची तरतुद करण्याचा विचार करता येईल.

**जलनिःसारण अभियंता :** ५८,०००/- रुपये खर्चाची कामे दुरुस्ती व देखभाल या शिषकातुन केल्यास दुरुस्ती व देखभाल शिर्षकाची तरतुद लवकर संपेल.

**श्री. अजिजुल्ला बेग :** औरंगाबाद टाईम्स कॉलनी ड्रेनेज लाईनचे कामाचे अंदाजपत्रक तयार होऊनही काम सुरु झाले नाही. याचा खुलासा व्हावा.

**जलनिःसारण अभियंता : ३ :** शासकीय अनुदानातुर हाती घ्यावयाच्या ४० लाख रुपयाच्या कामाची यादी तयार करण्यात आली होती या यादीत काही कामांचा समावेश करावयाचा असल्यामुळे दुरुस्त यादी मंजुरीसाठी पाठविली आहे. यानंतर काम हाती घेण्यात येईल.

**श्री. मधुकर शिंदे, श्री. गिरजाराम हाळनोर :** बेगमपुरा, जयसिंगपुरा भागात ड्रेनेज लाईन टाकण्याचे काम नुकतेचे झाले आहे. परंतु या कामावरील रिंग वाहून गेल्या आहेत. कामाची क्वालीटी कोण पाहणार? या कामापोटी गुत्तेदारास कामाचे

बील दिले असेल तर, त्या रक्कमेची वसुली संबंधिताच्या पगारातुन करण्यात यावी. महापालिकेचा पैसा विनाकारण खर्च होता कामा नये.

**मा. सभापती** : सभा संपल्यानंतर कामाची पाहणी करता येईल.

**श्री. तुळशीराम भगुरे :** हर्सुल येथील वर्ग-४ चे कर्मचाऱ्यांचे निवासस्थानास विद्युतीकरण केव्हा पुर्ण होणार?

**अतिरिक्त शहर अभियंता :** हर्सुल येथील वर्ग-४ चे कर्मचाऱ्यांचे निवासस्थानास विद्युत कनेक्शन घेण्याकरीता आवश्यक ती रक्कम संबंधित विभागाकडे एक दिड महिन्यापुर्वीच भरली आहे. महाराष्ट्र विद्युत मंडळाने या कामासाठी दरपत्रके मागविली असुन, लवकरच काम होईल.

**श्री. गिरजाराम हाळनोर, श्री. मधुकर शिंदे, श्री. अजिजुल्ला बेग :** सन १९९२-९३ च्या अर्थसंकल्पात विद्युत पोल बाबत करण्यात आली आहे. त्या अनुषंगाने प्रभागातील विद्युत पोल बाबत सभासदांकडून बरीचसे देण्यात आली आहेत. परंतु कोणत्याही भागात विद्युत पाल बसविण्याबाबत कोणतीच कार्यवाही झाली नाही. याचा खुलासा व्हावा.

**अतिरिक्त शहर अभियंता :** अर्थसंकल्पामध्ये विद्युत पोल बाबत तरतुद करण्यात आली असली तरी विद्युत पोल बसविण्या बाबतचे काम महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळा मार्फतच करुन घेणे आवश्यक आहे. असे वाटते म्हणून त्या संदर्भाने संचिका मंजुरीसाठी पाठविण्यात आली आहे, मंजुरी नंतर पंधरा दिवसात कार्यवाही होईल.

**श्री. मधुकर शिंदे :** पद्मपुरा कोकणवाडी भागात नुकतेच डांबरीकरणाचे काम झाले आहे. या कामामध्ये जाडी अतिशय कमी आहे. तेव्हा पाहणी करण्यात यावी.

**श्री. गिरजाराम हाळनोर :** पॉलीटेक्नीक समोरील रोडचे डांबरीकरणाचे काम ४.५० लाखाचे आहे. या कामाचे सरफेस अतिशिय रफ आहे.

**श्री. अजिजुल्ला बेग, श्री. गिरजाराम हाळनोर :** पावसाळा सुरु होत असल्याने प्रिमान्सुन प्रोग्राम हाती घेणे आवश्यक आहे. साफसफाई चे काम योग्य प्रकारे होत नाही. त्यासाठी जादा कामगार देवून काम करुन घ्यावे लागेल. प्रिमान्सुन प्रोग्रामच्या अंमलबजावणीसाठी लायसन ऑपिसरची नेमणुक केली आहे काय याचा खुलासा व्हावा. अद्यापपर्यंत लायसन ऑफिसरची भेट झाली नाही. नाल्यामधील गाळ काढणे साचलेल्या गट्टीसाफ करणे ही कामे हाती घ्यावी लागतात.

**श्री. मधुकर शिंदे :** नाली साफ करण्याबाबत गेल्या एक वर्षापासून विभागीय कार्यालयात चकरा मारण्यात आल्या परंतु अद्याप नाली साफ झाली नाही. याबाबत विचारणा केली असता विभागीय अधिकारी सफाई कामगार नाही असे सांगतात जलनि:सारण विभागाकडे विचारणा केला असता नाली साफ करणे बाबत विभागीय अधिकाऱ्यांना सांगा असे म्हणतात.

**श्री. गिरजाराम हाळनोर :** सर्वसाधारण सभेने २००/- सफाई कामगार नियुक्ती करण्या बाबत मंजुरी दिलेली आहे. या नियुक्ती प्रमाणे कामगारांची नेमणुक झाली काय याचा खुलासा व्हावा.

**आरोग्य वैद्यकिय अधिकारी :** शहरात नाला चानलॉयझिंगचे काम सुरु केले आहे या कामावर ३० कामगार करतात.

**श्री. गिरजाराम हाळनोर, श्री. नारायण फत्तेलष्कर :** कार्यालयात यापुर्वी काम केलेल्या कामगारांच्या लिस्ट व्यतिरिक्त बरेच कामागार कामावर घेतल्याची माहिती

मिळाली आहे. अशा कामगारांची नावे दिली तर प्रशासन त्यावर काय कार्यवाही करणार याचा खुलासा व्हावा. लिस्ट मधील कामगार आले नाहीत किंवा काही नौकरीत लागले आहेत.

**मा. उप आयुक्त :** कार्यालयाकडे यापुर्वी वेळोवेळी कामे केलेल्या ७०० कामगारांची यादी आहे. या यादीतुन क्रमवारीने विभागीय अधिकाऱ्यांनी (सर्व झोन मिळुन) २०० कामगार घेण्याचे आदेश विभगीय अधिकाऱ्यांना दिले आहेत. हा आदेश देतांना विभागीत अधिकाऱ्यांनी लिस्ट व्यतिरिक्त कामगार कामावर घेवू नये. असा स्पष्ट खुलासा दिला आहे.

**श्री. नारायण फत्तेलष्कर :** पाणी पुरवठा होत असतांना काही नागरिका मोटार लावून पाणी घेतात. त्यामुळे त्या भागखालील नागरिकांना पाणी येत नाही. त्याबाबत काय कार्यवाही करणात याचा खुलासा व्हावा. तसेच झोन क्र. ३ मध्ये काम करणारे कनिष्ठ अभियंता श्री हक यीच बदली करण्यात यावी. श्री. बोईनवाड याचे पद काय आहे, त्याचे विभागातील संचिकांना कव्हर कोण लावणार, श्री. बोईनवाल हे संचिकांना कागद लावत बसतात. त्यांची शहर अभियंता याचे पी. ए. म्हणून बदली करावी. त्याचे कपाटात अनेक फाईली धुळ खात पडलेल्या आहेत याची खात्री करण्यासाठी सभागृहाने प्रत्यक्ष पाहणी करावी.

**उप अभियंता** : स. सदस्यांनी संचिका मागितली तर, त्या संगिकेस कव्हर लावून देणे मला योग्य वाटते. माझे विभागातील संचिका हया लिपीकाकडे आहेत.

**श्री. गिरजाराम हाळनोर :** उस्मानपुरा व स्टेट बँक कॉलनीतील ड्रेनेज कामाबाबत काय कार्यवाही करणार याचा खुलासा व्हावा दोनही कामे प्राधान्याने झाली पाहिजे.

**जलनिःसारण अभियंता :** जलनिःसारणाची जी कामे महत्वाची आहेत ती कामे हाती घेतली जातील.

**श्री. मधुकर शिंदे :** उप अभियंता श्री. मतीन कादी यांनी कार्यभार स्विकारल्या नंतर क्रांतीनगर भागात एक ही काम हाती घेण्यात आले नाही. याबाबत संबंधिताकडे चौकशी केली असता क्रांतीनगर हा घोषित स्लम भाग नाही असे सांगण्यात आले जर क्रांतीनगर हा घोषित स्लम भाग नाहीत तर या भागात यापुर्वी कामे कशी झाली. या संदर्भाने अनेकपत्रे देण्यात आली आहे. परंतु एकाही पत्राचे उत्तर देण्यात आले नाही.

**मा. सभापती** : स्लम विभागचे फंडाऐवजी इतर फंडातुन क्रांतीनगर ची कामे हाती घेता येतील.

**श्री. नारायण फत्तेलष्कर, श्री. गिरजाराम हाळनोर :** पावसाळा सुरु होत आहे तेव्हा डांबरीकरणाची कामे त्वरीत हाती घेण्यात यावी. काचीवाडा भागातील डांबरीकरणाचे काय झाले याचा खुलासा व्हावा.

**उप अभियंता बांधकाम -१ :** काचीवाडा येथील रोडचे डांबरीकरण करीता रस्त्याची सफाई करण्यात आली आहे. या एजन्सी मार्फत काम हाती घेण्यात येणार आहे ती एजन्सी शहरात इतरत्र काम करीत असल्यामुळे डांबरीकरणाचे काम सुरु झालेले नाही.

**श्री. नारायण फत्तेलष्कर :** अधिकारी बेजबाबदार इतर देत आहेत. खुलासा केल्याप्रमाणे या भागातील रोडची सफाई झाली किंवा नाही याची सभागृहाने प्रत्यक्ष पाहणी करावी तेव्हा सभासदाने आताच पाहणी करण्यास मोक्यावर चालावे. आजची

मिटींग उदया होईल. अधिकारी मनमानी करीत आहेत. अधिकारीवर दबाव राहिलेला नाही.

**श्री. अजिजुल्ला बेग :** दिनांक १५-०५-९२ च्या विशेष सभेच्या इतिवृत्तात पान क्र. ३/४ वरील मा. अध्यक्षांच्या वक्तव्यात " कायदयाप्रमाणे पुर्तता केली आहे " या सुचनेची नोंद इतिवृत्ता आलेली नाही. तेव्हा तसेच निवडणुक प्रक्रीया या अगोदर सुरु झाली असल्यामुळे ती आता थांबविता येत नाही." या वाक्यानंतर " निवडणूक घेण्यासंबंधी कायदयाप्रमाणे पुर्तता केली आहे. अशी दुरुस्ती करण्यात यावी.

**मा. सभापती** : स. सभासद श्री. अजिजुल्ला बेग यांचे वडील सुचनेप्रमाणे दुरुस्ती करण्यात यावी.

**ठराव :**

दि. १५-०५-९२ च्या विशेष सभेतील पान क्र. ३/४ वरील मा. अध्यक्ष यांचे वक्तव्यात "तसेच निवडणुक प्रक्रिया या अगोदरच सुरु झाली असल्यामुळे ती आता थांबविता येत नाही " " या वाक्यानंतर " निवडणुक घेण्यासंबंधी कायदयाप्रमाण्र पुर्तता केली आहे" अशी दुरुस्तीसह दिनांक १५-०५-९२ रोजी संपन्न झालेल्या विशेष स्थायी समितीचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात आली.

**विषय क्र. ५/२ :**

शहर अभियंता महानगरपालिका यांनी प्रस्ताव सादर केला की, प्रियदर्शनी इंदिरानगर गारखेडा येथे सांडपाणी वाून जाण्यासाठी गटारीची आवश्यकता असल्याचे तेथील प्रत्यक्ष स्थळ पाहणीत आढळून आल्यावरुन ७५० मिटर दगडी गटार बांधण्यासाठी अंदाजपत्रक र. रु. ३,०६,८४२/- चे १९९१-९२ चे दराप्रमाणे तयार करण्यात आले आहे.

करीता प्रियदर्शनी इंदिरानगर स्लम भागात ७५० मिटर दगडी गटार बांधण्यासाठी तयार केलेले अंदाजपत्रक र. रु. ३,०६,८४२/- ला मंजुरी देण्यासाठी विचारार्थ सादर.

**संवाद :**

**श्री. अजिजुल्ला बेग :** विषय पत्रिकेवरील विषय क्र. २ आणि ७ अन्वये एकाच मोहल्यातील एकाच प्रकारचे कामाचे प्रस्ताव ठेवण्यात आले आहे. तेव्हा याबाबत खुलासा व्हावा.

**उप अभियंता स्लम :** विषय क्र. ७ चे अंदाजपत्रक तयार झाल्यानंतर पुन्हा मागणी आल्यामुळे विषय क्र. २ प्रमाणे दुसरे अंदाजपत्रक तयार करावे लागेल. एकाच मोहल्ल्यातील कामे असली तरी दोन्ही भाग वेगवेगळे आहे.

**श्री. अजिजुल्ला बेग :** दोन्ही कामांना मंजुरी मिळाल्यानंतर या कामासाठी एकच दरपत्रक मागविण्यात यावे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रियदर्शनी इंदिरानगर गारखेडा येथे सांडपाणी वाहुन जाण्यासाठी दगडी गटार बांधण्याच्या कामाकरीता रक्कम रुपये ३,०६,८४२/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६/३ :**

शहर अभियंता महानगरपालिका यांनी प्रस्ताव सादर केला की, प्रियदर्शनी इंदिरानगर स्लम भागाची प्रत्यक्ष पाहणी केली असता त्या भागात खांडकी पेव्हींगचे काम करण्यासाठी १९९१-९२ चे दरसुची प्रमाणे अंदाजपत्रक रुपये ३,४०,५५५/- तयार करण्यात आले आहे.

करीता प्रियदर्शनी इंदिरानगर स्लम भागात खांडकी पेव्हींग करण्योच कामासाठी केलेले अंदाजपत्रक रु. ३,४०,५५५/- ला मंजुरीसाठी विचारार्थ.

**संवाद :**

**श्री. अजिजुल्ला बेग, श्री. मधुकर शिंदे, श्री. विठ्ठल पेरकर :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे खांडकी पेव्हींगच्या कामास होणारा खर्च विचारात घेता सिमेंट रोड तयार करावे.

**अतिरिक्त शहर अभियंता :** स्लम भागातील रस्ते अरुंद आहेत. याशिवाय सिमेंट रोड केल्यास अरुंद रस्त्या वस्ती जलवाहिनी जलनिःसारण वाहिनी दुरुस्ती करणे कठीण होईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रियदर्शनी इंदिरानगर स्लम भागात खांडकी पेव्हींगचे काम करण्यासाठी ३,४०,५५५/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७/४ :**

शहर अभियंता महानगरपालिका यांनी प्रस्ताव सादर केला की, चिकलठाणा वार्डाचे मा.नगरसेविका सोबत चिकलठाणा परीसराची पाहणी केली असता या परीसरात काही भागात खडी रस्ता तसेच टयुप पाईप कन्व्हेरचे बांधकाम करणे आवश्यक असल्यामुळे १००० मीटर लांबीचा खडी रस्ता तयार करणे तसेच हयुम पाईप कल्व्हर्टे तयार करण्यासाठी ९१-९२ चे दरसुची प्रमाणे अंदाजपत्रक रुपये ४,०८,०००/- चे तयार करण्यात आले आहे.

करीता चिकलठाणा स्लम परीसरात १००० मीटर लांब खडी रस्ता तयार करणे तसेच हयुमपाईप कल्व्हर्ट तयार करण्यासाठी केलेले अंदाजपत्रक रुपये ४,०८,०००/- ला मंजुरी देण्यासाठी विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, चिकलठाणा परिसरात १,००० मिटर लांबीचा खडी रस्ता तयार करणे आणि हयुम पाईप कन्व्हर्ट तयार करण्याच्या कामासाठी रक्कम रुपये ४,०८,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ८/५ :**

उप आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद हे मा. आयुक्त यांचे मंजुरीनुसार प्रस्ताव सादर करीत आहेत की, कार्यालयाच्या मालकीच्या विविध शॉपींग सेंटर मधील दुकानाचे थोडयात अनेक वर्षापासून वाढ केलेली नाही. शॉपींग सेटंर अंतर्गतच्या दुकानचा सध्याचा भाडे दर कमीत कमी रुपये ०.३८ प्रति चौ. फु. प्रति महा दर जास्ती जास्त रुपये १.९० प्रति चौ. फुट प्रतिमहा असे आहेत जे अत्यंत कुत्री आहेत. दुकान भाडे उत्पन्नात वाढ करण्याच्या दृष्टीने भाडे दरात वाढ करण्याची आवश्यकता आहे.

शहर अभियंता यांनी शॉपींग सटेर वाईज सुधारीत भाडे दर निश्चित करुन दिलेले आहेत, त्यानुसार खालील प्रस्तावित भाउे दरास स्विकृती मिळणेस्तव प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

**संवाद :**

**श्री. नारायण फत्तेलष्कर :** शहागंज भागातील मनपा दुकांनाना आडत दुकाने म्हणजे योग्य होणार नाही. तेव्हा अडत दुकाने ऐवजी शॉपिंग कॉम्पलिक्स अशी दुरुस्ती करण्यात यावी.

**विधी सल्लागार :** प्रस्तावातील वाढीव भाडे दर १ एप्रिल ९२ पासुन लागु करण्याबाबत सुचविण्यात आले आहे. त्याऐवजी प्रस्तावित भाडे दर २ जुलै ९२ पासुन लागु करण्यात स्विकृती मिळावी अशी दुरुस्ती करणे आवश्यक आहे.

**मा. सभापती** : आवश्यक ती दुरुस्ती करण्यात यावी.

| अ. क्र | शॉपिंग सेंटर | | प्रस्तावित भाडे दर | |
|---|---|---|---|---|
| | | | प्रति चौ. फुट प्रतिमहा | प्रति चौ. मी. प्रतिमहा |
| १. | औरंगपुरा | मुख्य रस्त्यावर | ५.०० | ५४.०० |
| | | रस्त्या आतील बाजुस | ४.६० | ५०.०० |
| २. | सब्जीमंडी | मुख्य रस्त्यावर | ५.५० | ५९.०० |
| | | आतील बाजुस | ५.३० | ५७.०० |
| ३. | जाफरगेट | ---- | ४.५५ | ४९.०० |
| ४. | शहागंज | अडत दुकान | ५.०० | ५४.०० |
| | | नविन शटर्स दुकाने | ५.०० | ५४.०० |
| | | मलगी दुकाने | ४.७० | ५१.०० |
| | | फडताल दुकाने | ४.९० | ५२.०० |
| | | फ्रुंट दुकाने | ४.३५ | ४७.०० |
| ५. | रेल्वेस्टेशन | ---- | ३.८० | ४१.०० |
| | | खुलीजागा | ३.०० | ३२.०० |
| ६. | निजामोद्दीन रोड दर्गा | ---- | ३.६० | ३९.०० |
| ७. | पिरबाजार | ---- | ४.५० | ४८.०० |

प्रस्तावित भाडे दर प्रति चौ फुटात दर्शविलेले आहेत, त्याच प्रमाणात प्रति चौ. मिटरमध्ये सुध्दा दर्शविण्यात आलेले आहेत.

प्रस्तावित भाडे दरास स्विकृती मिळणेस्तव व त्याचप्रमाणे सदरचे प्रस्तावित भाडे दर १ एप्रिल ९२ पासुन लागु करण्यास स्विकृती मिळणे बाबत विचार होण्यास्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महापालिका मालकीच्या विविध शॉपिंग सोटर मधील दुकानाचे भाडे उत्पन्नात वाढ होण्याच्या दृष्टीने १ जुलै १९९२ पासुन खालील दर्शविल्या

प्रमाणे शॉपिंग सेंटर वायजी सुधारीत भाडे दर निश्चित करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

| अ. क्र | शॉपिंग सेंटर | | प्रस्तावित भाडे दर | |
|---|---|---|---|---|
| | | | प्रति चौ. फुट प्रतिमहा | प्रति चौ. मी. प्रतिमहा |
| १. | औरंगपुरा | मुख्य रस्त्यावर | ५.०० | ५४.०० |
| | | रस्त्या आतील बाजुस | ४.६० | ५०.०० |
| २. | सब्जीमंडी | मुख्य रस्त्यावर | ५.५० | ५९.०० |
| | | आतील बाजुस | ५.३० | ५७.०० |
| ३. | जाफरगेट | ---- | ४.५५ | ४९.०० |
| ४. | शहागंज | अडत दुकान | ५.०० | ५४.०० |
| | | नविन शटर्स दुकाने | ५.०० | ५४.०० |
| | | मलगी दुकाने | ४.७० | ५१.०० |
| | | फडताल दुकाने | ४.९० | ५२.०० |
| | | फ्रुंट दुकाने | ४.३५ | ४७.०० |
| ५. | रेल्वेस्टेशन | ---- | ३.८० | ४१.०० |
| | | खुलीजागा | ३.०० | ३२.०० |
| ६. | निजामोद्यीन रोड दर्गा | ---- | ३.६० | ३९.०० |
| ७. | पिरबाजार | ---- | ४.५० | ४८.०० |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ९/६ :**

मुल्य निर्धारण अधिकारी -२ यांनी प्रस्ताव सादर केला की, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे प्रकरण ८ कराधीन नियम २ चे पोट कलम (३) मध्ये मालकी हक्कांचे नामांतरासंबंधी असा उल्लेख आहे की, अशी नोटीस ज्या जागेसंबंधी असेल त्या जागेच्या बाबतीत नोटीसच्या तारखेस देय असलेला मालमत्ता कर भरण्यात आला नसेल तर, अशी कोणतीही नोटीस कायदेशीररित्या देण्यात आली आहे. असे मानले जाणार नाही. पैकी नोटीसच्या तारखेपर्यंत देय असलेला मालमत्ता कर भरल्यानंतर व खालील प्रमाणे नामांतर शुल्क वसुल केल्यानंतर नामांतर करण्याची पध्दत आपल्या कार्यालयात आहे.

१) रुपये १५/- शहर भुमापन कार्यालयात नामांतराची नोंद झाल्या तारखेपासुन आपल्या कार्यालयात नामांतरासाठी तिन महिन्याचे आत कार्यवाही दाखल केलेल्या प्रकरणासाठी

२) रुपये ३०/- तीन महिन्याचे नंतर दाखल केलेल्या प्रकरणासाठी वरील दर हे ०१-०८-८७ पासुन अमलात आले आहेत. महानगरपालिकेच्या आर्थिक उत्पन्नात भर पडण्यासाठी खालील प्रमाणे नामांतर शुल्क प्रस्तावित आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | करयोग्य मुल्य | रुपये ५,००/- पर्यंत | रुपये ५०/- |
| २. | -//- | रुपये ५०० ते ५००० पर्यंत | रुपये १००/- |
| ३. | -//- | रुपये ५,००० ते ५०,००० पर्यंत | रुपये २००/- |
| ४. | -//- | रुपये ५०,००० ते १,००,०००/- | रुपये ३००/- |
| ५. | -//- | रुपये १००,०००/- व त्यापुढे रुपये ५००/- | रुपये ५००/- |

तरी वरील नामांतर शुल्काचा प्रस्तावित प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिकेच्या आर्थीक उत्पन्नात भर पडण्याच्या दृष्टीने खालील नामांतर शुल्क आकारण्यात सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | करयोग्य मुल्य | रुपये ५,०००/- पर्यंत | रुपये ५०/- |
| २. | -//- | रुपये ५००१ ते ५०,००० पर्यंत | रुपये १५०/- |
| ३. | -//- | रुपये ५०,००१ व त्यापुढे | रुपये ३००/- |

वरील प्रमाणे नामतंर शुल्क आकारतांना शहर भुमापन कार्यालयात नामांतराची नांद झाल्याच्या तारखेपासुन तीन महिन्याचे नंतर दाखल केलेल्या प्रमारणासाठी अनुक्रमांक १ ते ३ मधील कर मुल्य योग्यासाठी प्रत्येकी दुप्पट या दराने नामांतद शुल्क आकारण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १०/७ :**

शहर अभियंता महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला की, प्रियदर्शनी इंदिरानगर स्लम भागात गटारीचे काम करणे आवश्यक असल्यामुळे दगडी गटार बांधण्याच्या कामासाठी १९९१-९२ चे दरसुची नुसार अंदाजपत्रक रुपये १,१६,३१०/- चे तयार करण्यात आले आहे. करीता प्रियदर्शनी इंदिरानगर स्लम भागात २८० मीटर गटार बांधण्यासाठी तयार केलेले अंदाजपत्रक रुपये १,१६,३१०/- ला मंजुरी देण्यासाठी विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रियदर्शनी इंदिरानगर भागात २८० मीटर लांबीची दगडी गटार बांधण्याचे कामासाठी र. रु. १,१६,३१०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ११/८ :**

शहर अभियंता महानगरपालिका यांनी प्रस्ताव सादर केला की, संजयनगर मुकूंदवाडी परिसराची प्रत्यक्ष पाहणी करतांना आढळुन आले की, या परिसरात काही कच्चे रस्ते असुन तेथे खडी रस्ता करणे आवश्यक असल्यामुळे १९९१-९२ चे दरसुची नुसार अंदाजपत्रक रुपये ३,८०,०००/- तयार करण्यात आलेले आहेत.

करीता संजयनगर मुकूंदवाडी येथे खडी रस्ता तयार करण्यासाठी केलेले अंदाजपत्रक रुपये, ३,८०,०००/- ला मंजुरी देण्यासाठी विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, संजयनगर मुकूंदवाडी भागात खडी रस्ते तयार करण्याच्या कामासाठी र.रु. ३,८०,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १२/९ :**

शहर अभियंता महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला की, चिकलठाणा परिसराची संबंधित मा. नगरसेवका सोबत पाहणी केली असता चौधरी कॉलनी भागात नाली बांधणे आवश्यक असल्यामुळे चिकलठाणा भागात ३५० मी. मी. व्यासाची अर्धगोलाकार व पुर्व रचित अर्धगोलाकार गटार बसविण्याच्या कामासाठी अंदाजपत्रक रुपये ३,४४,०००/- तयार करण्यात आलेले आहे.

करीता चिकलठाणा स्लम भागात ३५० मी. मी. व्यासाची पुर्व रचित अर्ध गोलाकार आर. सी. सी. गटार बसविण्याचे कामासाठी केलेले अंदाजपत्रक रुपये ३,४४,०००/- ला मंजुरी देण्यासाठी विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, चिकलठाणा स्लम भागात ३५० मी. मी. व्यासाची पुर्वरचित अर्धगोलाकार आर. सी. सी. गटार तयार करण्याच्या कामासाठी र.रु. ३,४४,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १३/१० :**

शहर अभियंता महानगरपालिका यांनी प्रस्ताव सादर केला की, मुकूंदवाडी स्लम परिसराची प्रत्यक्ष पाहणी केली असता या परिसरातील शिवाजी कॉलनी, भागात रस्ते, गटार नळ वगैरेची कामे करणे आवश्यक असल्याचे आढळुन आल्या वरुन वरील परिसरात खडी रस्ते तयार करण्यासाठी १९९१-९२ चे दरसुची नुसार अंदाजपत्रक रुपये १,४२,२००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.

करीता मुकूंदवाडी स्लम भागात खडी रस्ते तयार करण्यासाठी केलेले अंदाजपत्रक रु. १,४२,२००/- ला मंजुरी देण्यासाठी प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मुकूंदवाडी स्लम भागात खडी रस्ते तयार करण्याच्या कामासाठी र. रु. १,४२,२००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १४/११ :**

शहर अभियंता महानगरपालिका यांनी प्रस्ताव सादर केला की, प्रियदर्शनी इंदिरानगर स्लम भागातील रहिवाशांना टँकरद्वारा पाणी पुरवठा करण्यात येतो. सदरील वसाहतीमधील काही भागात पाणी पुरवठयाची लाईन टाकलेली आहे व उर्वरीत भागात पाण्याची लाईनटाकणे आहे. त्यासाठी रुख १९९१-९२ चे दरसुचीनुसार १०० मी. मी. व्यासाची ऐ. सी. जलवाहिनी टाकण्यासाठी अंदाजपत्रक रु. २,०५,५४५/- तयार करण्यात आले आहे.

करीत प्रियदर्शनी इंदिरानगर स्लम भागात १०० मी. मी. व्यासाची ए. सी. जलवाहिनी टाकण्यासाठी केलेले अंदाजपत्रक रुपये २,०५,५४५/- ला मंजुरी देण्यासाठी विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रियदर्शनी इंदिरानगर स्लम भागात १०० मी. मी. व्यासाची ए. सी. जलवाहिनी टाकण्याचे कामासाठी र. रु. २,०५,५४५/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १५/१२ :**

शहर अभियंता महानगरपालिका यांनी प्रस्ताव सादर केला की, संजयनगर बायजीपुरा परिसराची संबंधी नगरसेवका सोबत पाहणी केली. असा या परीसराची अस्वच्छता व रस्त्यावरुन वाहणारे घाण पाणी वाहता या भागात ड्रेनेज लाईन टाकणे आवश्यक असल्यामुळे या भागात १५० मी. मी. व्यासाची एस. डब्ल्यु. जी. तसेच २५० व ३०० मी. मी. व्यासाची आर. सी. सी. ड्रेनेज लाईन टाकण्यासाठी १९९१-९२ चे दरसुचीनुसार अंदाजपत्रक रुपये २,६४,६००/- चे तयार करण्यात आले आहे.

करीता संजयनगर बायजीपुरा परीसरात १५० मी. मी. व्यासाची एस. डब्ल्यु जी व २५० व ३०० मी. मी. व्यासाची आर. सी. सी. ड्रेनेज लाईन टाकण्याचे कामासाठी केलेले अंदाजपत्रक रुपये २,६४,६००/- ला मंजुरी देण्यासाठी विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, संजयनगर बायजीपूरा परिसरात १५० मी. मी. व्यासाची एस. डब्ल्यु जी. व २५० आली. ३०० मी. मी. व्यासाची आर. सी. सी. ड्रेनज लाईन टाकण्याच्या कामासाठी स्लम रुपये २,६४,६००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १६/१३ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, वार्ड क बसयैनगर येथे २५० मी. मी. व्यासाची आर. सी. सी. ड्रेनेज लाईन टाकणेबाबत अंदाजपत्रक र. रु. ५०,५७०/- चं सन १९९०-९१ च्या दरसुची प्रमाणे तयार करण्यात आलेले असुन सदर काम सन १९९०-९१ च्या प्रशासकीय अनुदानातुन करण्यात येईल. तसेच सदरील अंदाजपत्रकास मा. आयुक्त यांनी मंजुरी दिलेली आहे.

आदेशानुसार सदर कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र. १०/१४७८/९१ दि. ०३-१२-९२ नुसार दैनिकात जाहिरात देवून बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता सर्वात कमी लोन्हेस दराची निविदा म्हणजे २०,७८६/- दराची निविदा श्री. मी. असरोद्दीन यांची होती. संबंधित गुत्तेदार यांना आदेशानुसार दर पृथ्थकरण कार्यालयात दाखलपत्रक देण्यात आलेले होते तरी संबंधित दरपृथ्थकरण कार्यालयात दाखल केलेले होते. परंतु दर पृथ्थकरण योग्य वाटत नसल्यामुळे मा. आयुक्त यांनी कर निविदाचा आदेश दिला.

आदेशानुसार सदर कामासाठी कार्यालयीन निविदा सुचनाक क्र. १६-३८७/९२ दिनांक १३-०३-९२ ला दुसऱ्यांदा बी-१ नमुन्यात निविदा दैनिक लोकमत व देवगीरी तरुण भारत या स्थानिक वर्तमान पत्रातुन जाहिरात देवून निविदा मागविल्या असता एकूण पाच

निविदा विकण्यात आलेल्या होत्या त्यापैकी केवळ तीन निविदा प्राप्त झालेल्या असुन, त्यांचा तुलनात्मक दर खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | मे. विपुल कन्ट्रक्शन | ४.९५% जास्त |
| २. | श्री. आर बी. मिर्झा | ८.५०% जास्त |
| ३. | श्री. सय्यद सिराजउद्यीन | १०.५०% जास्त |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.९५% जास्त दराची निविदा मे. विपुल कंन्स्ट्रक्शन यांचे दरपत्रक आहे. करीता मा. आयुक्त यांच्या आदेशान्वये संबंधित गुत्तेदार यांना वाटाघाटी करीता प्रत्यक्ष पत्र देवून मा. आयुक्त यांच्या दालनात बोलावण्यात आले होते.

तरी दर वाटाघाटीत ठरल्याप्रमाणे संबंधित गुत्तेदार मे. विपुल कंस्ट्रक्शन यांनी निविदेन ४.९५% जास्त दराऐवजी ३.९५% जास्त दराने काम करण्यास संमती दर्शविलेली आहे. करीता मे. विपुल कंस्ट्रक्शन यांचा ३.९५% जास्त दरपत्रक प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, बैसयैनगर येथे २५० मी. मी. व्यासाची आर. सी. सी. ड्रेनेज लाईन टाकण्याच्या कामासाठी दुसऱ्यांदा मागविण्यात आलेल्या दरपत्रकानुसार मे. विपुल कन्स्ट्रक्शन यांच्याशी झालेल्या वाटाघाटी नुसार उक्त काम संबंधिताकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३.९५% जास्त दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १७/१४ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, वार्ड क्र. ७ सुभेदारी गेस हाऊस दिल्ली गेट येथे १५० मी. मी. व्यासाची चिनी मातीची ड्रेनेज लाईन काढुन टाकुन त्या ठिकाणी ३०० मी. मी. व्यासाची आर. सी. सी. ड्रेनेज लाईन टाकणेबाबत अंदाजपत्रक र. रु. १,११,८००/- चे सन १९९१-९२ च्या दरसुची प्रमाणे तयार करण्यात आलेले असुन सदरचा खर्च ९२-९३ चा वर्षाचा भांडवली तरतुदीतुन करण्यात येईल. तसेच सदरील अंदाजपत्रकास मा. आयुक्त यांनी मंजुरी दिलेली आहे. करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र. ७ सुभेदारी गेस्ट हाऊस दिल्ली गेट येथे १५० मी. मी. व्यासाची चिनी मातीची ड्रेनेज लाईन काढुन त्या ऐवजी ३०० मी. मी. व्यासाची आर. सी. सी. ड्रेनेज लाईन टाकण्याच्या कामासाठी र. रु. १,११,८००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १८/१५ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, सन ९२-९३ वर्षाकरीता पाणी पुरवठा विभाग क्र. १,२,३ व स्लम विभागा अंतर्गत विविध ठिकाणी जलवाहिनी टाकण्याच्या कामाकरीता लागणारे स्लुस व्हॉल्व खरेदी करणे आहे. सदरील साहित्य खरेदी

करण्याची र.रु. १३,३६,०००/- चे अंदाजपत्रकास मा. आयुक्त यांनी दिनांक २९-०४-९२ ला मंजुरी दिली आहे.

तरी र. रु. १३,३६,०००/- च्या स्लुस व व्हॉल्व खरेदी करण्याच्या अंदाजपत्रकास मिळण्यास्तव व प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सन १९९२-९३ वर्षा करीता पाणी पुरवठा विभाग क्र. १,२,३ व स्लम विभागतर्फे विविध ठिकाणी थकव्यात येणाऱ्या जलवाहिनीचे कामासाठी लागणरे स्लुस व्हॉल्व खरेदी करीता र. रु. १३,६६,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देऊन सर्वसाधारण सभेस शिफारस करण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १९/१६ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, सन ९२-९३ वर्षाकरीता पाणीपुरवठा विभाग क्र. १,२,३ व स्लम विभागा अंतर्गत विविध ठिकाणी जलवाहिनी टाकण्याच्या कामाकरीता लागणरे सी. आ. स्पेशल्स खरेदी करणे आहे. सदरील साहित्य खरेदीचे अंदाजपत्रक रुपये ४,९०,५००/- ला दिनांक २२-०४-९२ रोजी मा. आयुक्त यांनी मंजुरी दिली आहे.

तरी र. रु. ४,९०,५००/- च्या सी. आय. स्पेशल्सच्या खरेदी करण्याच्या अंदाजपत्रकास मंजुरी मिळणेस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सन १९९२-९३ वर्षा करीता पाणी पुरवठा विभाग क्र. १,२,३ व स्लम विभागतर्फे विविध ठिकाणी टाकण्यात येणाऱ्या जलवाहिनीचे कामासाठी लागणारे सी. आय. स्पेशल खरेदी करीता र. रु. ४,३०,५००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २०/१७ :**

वार्ड क्र. २७ मो. पानदरीबा व नासगल्ली येथे २५० मी. मी. व्यासाची आर. सी. सी. ड्रेनेज लाईन टाकणे बाबत अंदाजपत्रक र. रु. १,११,५००/- चे सन ९०-९१ च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आले असुन सदर अंदाजपत्रकास मा. आयुक्त यांनी मंजुरी दिलेली आहे. करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र. २७ मो. पानदरीबा व नासगल्ली येथे २५० मी. मी. व्यासाची आर. सी. सी. ड्रेनेज लाईन टाकण्याच्या कामासाठी र. रु. १,११,५००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २१/१८ :**

मो. वार्ड क्र. सहकारनगर येथील १५० मी. मी. व्यासाची चिनी मातीची ड्रेनेज लाईन काढुन २५० मी. मी. व्यासाची आर. सी. सी. ड्रेनेज लाईन टाकणे बाबत अंदाजपत्रक र. रु. १,३४,६६०/- चे सन ९१-९२ परिसर अभियांत्रिकी च्या दरसुची नुसार तयार करण्यात

आले असुन, शहर अंदाजपत्रकास मा. आयुक्त साहेबांनी मंजुरी दिलेली आहे. करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सहकार नगर येथे १५० मी. मी. व्यासाची चिनी मातीची ड्रेनेज लाईन काढुन २५० मी. मी. व्यासाची आर. सी. सी. ड्रेनेज लाईन टाकण्याच्या कामासाठी र. रु. १,३४,६६०/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २२/१९ :**

वार्ड क्र. मोहल्ला रचनाकार कॉलनी येथे १५० मी. मी. व्यासाची चिनी मातीची ड्रेनेज लाईन काढुन २५० मी. मी. व्यासाची आर. सी. सी. ड्रेनेज लाईन टाकणे बाबत अंदाजपत्रक र. रु. १,७७,०००/- चे सन १९९०-९१ च्या दरसुची नुसार तयार करण्यात आले असुन, सदर पत्रकास मा. आयुक्त साहेबांनी मंजुरी दिलेली आहे. करीता, प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, रचनाकार कॉलनी येथे १५० मी. मी. व्यासाची चिनी मातीची ड्रेनेज लाईन काढुन २५० मी. मी. व्यासाची आर. सी. सी. ड्रेनज लाईन टाकण्याचे कामासाठी र.रु. १,७७,०००/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २३/२० :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, वार्ड क्र. ४ आरीफ कॉलनी येथे १५० मी. मी. व्यासाची चिनी मातीची ड्रेनेज लाईन काढुन त्या ठिकाणी ३०० मी. मी. व्यासाची आर. सी. सी. ड्रेनेज लाईन टाकणे बाबत अंदाजपत्रक र. रु. २,६७,०००/- चे सन १९९१-९२ च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आलेले असुन सदरचा खर्च सन १९९२-९३ च्या भांडवली तरतुदीतून करण्यात येईल. तसेच सदरील अंदाजपत्रकास मा. आयुक्त यांनी मंजुरी दिलेली आहे.

करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, आरिफ कॉलनी येथे १५० मी. मी. व्यासाची चिनी मातीची ड्रेनेज लाईन काढुन ३०० मी. मी. व्यासाची आर. सी. सी. ड्रेनेज लाईन टाकण्याच्या कामासाठी र. रु. २,६७,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २४/२१ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, वार्ड क्र. बंजाराकॉलनी येथील नाल्यावर आर. सी. सी. स्लॅप टाकणे बाबत अंदाजपत्रक र. रु. १,४९,८००/- चे सन ९१-९२ च्या दरसुचीप्रमाणे तयार करण्यात आलेले असुन सदरचा खर्च सन ९२-९३ च्या

भांडवली तरतुदीतून करण्यात येईल. तसेच सदरील अंदाजपत्रकास मा. आयुक्त यांनी मंजुरी दिलेली आहे. करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, बंजारा कॉलनी येथील नाल्यावर आर. सी. सी. स्लॅप टाकण्याच्या कामासाठी र. रु. १,४९,८००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २५/२२ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, वैशाली नगर जयवंतपुरा येथे १०० मी. मी. व्यासाची ए. सी. जलवाहिनी टाकावयाची आहे. सदर कामाचे अंदाजपत्रक हे परीसर अभियांत्रिकी यांची सन ९१-९२ च्या दरसुची नुसार र. रु. ४२,३१०/- एवढयाचे बनविण्यात आले असुन त्यास प्रशासकीय मान्यता घेण्यात आलेली आहे. सदरच्या कामासाठी या कार्यालयाची निविदा सुचना क्र. २८/ ९१-९२ जी की दैनिक मुक्कास स्वरगंगा, रहेबार, लोकमत टाईम्स या वर्तमानपत्रात प्रसिध्द देण्यात येवून बी-१ निविदा मागविण्यात आल्या कोऱ्या निविदा विक्रीच्या अंतिम तारखेस व वेळेपर्यंत फक्त दोन निविदा विक्री झाल्यास सिलबंद निविदा स्विकारण्याच्या नियोजीत तारखेस दोनच निविदा प्राप्त झाल्या त्याचा तक्ता खालील प्रमाणे

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. एम. एम. बेग | १५% जास्त |
| २. | श्री. एस. के. एकबाल अहमद | १०% जास्त |

वरील प्रमाणेच्या प्राप्त निविदा मध्ये श्री. एस. के. एकबाल अहमद यांचा दर कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा १०% जास्त असा दर आहे. परंतु त्यांनी दिलेला दर हा कार्यालयास जास्त वाटत असल्यामुळे मा. आयुक्त याच्या दालनात संबंधित ठेकेदारास दराबाबत वाटाघाटीस बोलविण्यात आले असता त्यांनी सदरचे काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३% जास्त या दराने करण्यास तयार असल्याचे लेखी दिले आहे. त्यास मा. आयुक्तांनी मंजुरी दिलेली आहे. करीता श्री. एस. के. एकबाल अहमद यांची वाटाघाटी अंतीचा दर ३% जास्त या दराची निविदा स्विकारण्याचा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वैशाली नगर जसवंतपुरा, येथे १०० मी. मी. व्यासाची ए. सी. जलवाहिनी टाकण्याच्या कामासाठी वाटाघाटी अंती गुत्तेदार श्री. एस. के एकबाल अहमद यांनी दिलेल्या लेखी संमतीनुसार उक्त काम संबंधिताकडून अंदाजपत्राकाचे दरापेक्षा ३% जास्त दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २६/२३ :**

शहर अभियंता महानगरपालिका यांनी प्रस्ताव सादर केला की, मिलिंदनगर येथील खुल्या जागेस कंपाऊंड वॉल बांधणे व तार कुंपन करण्यासाठी अंदाजपत्रक र. रु. १,१५,७००/- चे तयार करण्यात आले आहे. सदरील काम महानगरपालिकाच्या खुल्या जागेचे संरक्षण करण्यासाठी असल्यामुळे २० रु. १,१५,७००/- च्या अंदाजपत्रकास मंजुरीस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद :**

**श्री. गिरजाराम हाळनोर :** मिलिंदनगर येथील खुल्या जागेस यापुर्वीच तार कुंपन करण्यात आलेले आहेत. तेव्हा या बाबत खुलासा व्हावा.

**उप अभियंता स्लम :** मिलिंद नगर येथील खुल्या जागेच्या तार कुंपनाची दुरुस्ती करावयाची आहे.

**मा. सभापती** : प्रस्तावित कामामध्ये जुनी तार कुंपन काढुन नविन तार कुंपन टाकणे अशी दुरुस्ती करण्यात यावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मिलिंदनगर येथील खुल्या जागेस कंपाऊंड वॉल बांधणे आणि क जुने तारकुंपन काढुन नवे तार कुंपन टाकण्याच्या कामासाठी र. रु. १,१५,७००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**" ऐनवेळचे विषय "**

**विषय क्र. २७/२४ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, वार्ड क्र. १५ काचीवाडा येथे २५० मी. मी. व्यासाची व ३०० मी. मी. व्यासाची आर. सी. सी. ड्रेनेज लाईन टाकणे बाबत अंदाजपत्रक र. रु. २,५६,५००/- चे सन १९९१-९२ च्या दरसुची प्रमाणे तयार करण्यात आलेले असुन, सदरील अंदाजपत्रकास मा. आयुक्त यांनी मंजुरी दिलेली असुन, सदरचा खर्च १९९२-९३ या वर्षाच्या भांडवली तरतुदीतुन करण्यात येईल. करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र. १५ काचीवाडा येथे २५० व ३०० मी. मी. व्यासाची आर. सी. सी. ड्रेनेज लाईन टाकण्याचे कामासाठी र. रु. २,५६,५००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २८/२५ :**

मा. शहर अभियंता यांनी प्रस्तावसादर केला की, वार्ड न. १५ मो. काचीवाडा येथे फाईल फॉऊडेशन करुन शौचालय बांधण्याच्या कामासाठीसन १९९१-९२ चे सा. बा. खात्याचे डी. एस. आर. दराने र. रु. १,२७,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. सदरचा खर्च भांडवली इमारती ( सी.ए. बिल्डींग ) या सहारवाली खर्च करण्यात येईल. तरी अंदाजपत्रक र. रु. १,२७,०००/- मंजुरी प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड नं. १५ मोहल्ला काचीवाडा येथे फाईल फाऊडेशन करुन शौचालय बांधण्याच्या कामासाठीर. रु. १,२७,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २९/२६ :**

मा. शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, वार्ड नं. १४ शहाबाजार येथील मनपा प्राथमिक शाळेस पहिला मजला बांधण्याच्या कामासाठी सन १९९१-९२ च्या डी. एस. आर. दराने र. रु. ४,०७,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे.

सदरचा खर्च भांडवली इमारती (सी. ए. बिल्डींग) या शिर्षकामधुन करण्यात येईल. तरी अंदाजपत्रक र. रु. ४,०७,०००/-मंजुरीसाठी प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड नं. ६ शहाबाजार मनपा प्राथमिक शाळेवर पहिल मजला बांधण्याच्या कामासाठी र. रु. ४,७०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३०/२६ :**

मा. शहर अभियंता यांनी प्रसताव सादर केला की, मो. हर्सुल येथे समाजमंदिर बांधण्याचे कामासाठी स. १९९०-९१ चे सार्व. बांधकाम खात्याचे डी. एस. आर. दराने र. रु. १,९९,८००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. सदरचा खर्च सन १९९२-९३ च्या आर्थिक वर्षाच्या भांडवली इमारती या शिर्षकामधुन करण्यात येईल. तरी अंदाजपत्रक र. रु. १,९९,८००/- चा प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, हर्सुल येथे समाजमंदिर बांधण्याच्या कामासाठी र.रु. १,९९,८००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३१/२८ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्रीमती कांचन स्प्रे, क्रिडा अधिकारी यांची कार्यालयीन आदेश क्र. मनपा/अस्था-१/२५६१/९१ दिनांक २५-०६-९१ पासुन एक वर्षाकरीता क्रिडा अधिकारी या पदावर धारणधिकार मंजुर करण्यात आला होतात. परंतु त्यांची दोन वर्षासाठी परीविक्षाधीन कालावधीसाठी गोवा येथे नेमणुक झाली असल्यामुळे एकूण दोन वर्षासाठी धारणाधिकार वाढवून दयावा म्हणून त्यांनी विनंती केलेली आहे. यापुर्वी एक वर्षासाठी धारणाधिकार मंजुर झाला होता. सबब पुन्हा एक वर्षाचा दि. २५-०६-९२ पासुन एकूण दोन वर्षाचा धारणाधिकार वाढवून देणे बाबत श्रीमती कांचन सप्रे क्रिडा अधिकारी यांनी विंनती केली आहे. करीता श्रीमती कांचन सप्रे क्रिडा अधिकारी यांचा दि. २५-०६-९२ पासून एक वर्षा करीता धारणाधिकार कालावधी वाढविण्याबाबत प्रस्ताव विचारार्थ व निर्णयास्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, क्रिडा अधिकारी श्रीमती कांचन सप्रे यांची दोन वर्षाच्या परीविक्षाधीन कालावधीसाठी गोवा येथे नेमणुक झाली असल्यामुळे दि. २५-०६-१२ पासुन एक वर्षाचा धारणाधिकार कालावधी वाढवून देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

यानंतर सभेचे कामकाज संपल्याचे मा. सभापती यांनी जाहीर केले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरित/- | स्वाक्षरित/- |
| सचिव, | सभापती, |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद*

**दिनांक ०८-०६-१९९२ रोजी दुपारी ३.०० वाजता भरलेल्या स्थायी समितीचा वृत्तांत सोमवार दिनांक ०८-०६-१९९२ रोजी दुपारी ३.०० वाजता मा. सभापती ॲड श्री इकबालसिंग गिल यांच्या अध्यक्षतेखाली समिती सभागृहामध्ये स्थायी समिती सभेस सुरुवात झाली. या सभेस कार्यालयीन अधिकाऱ्यांसह खालील सन्माननीय सभासद उपस्थित होते.**

१) श्री. नारायण मोहन फत्तेलष्कर
२) श्री. भगुरे तुळशीराम छगन
३) श्री. अलीम बेग मिर्झा कलीम बेग
४) श्री. गिरजाराम नानाराव हाळनोर
५) श्री. विजय गोविंदराव पालीवाल
६) श्री. जावेदहसन खान कासीमहसन खान
७) श्री. मोहमद इस्माईल अब्दुल करीम
८) श्री. अजिजुल्ला बेग वाहेद बेग
९) श्री. पेरकर विठ्ठल कोडांजी
१०) श्री. शिंदे मधुकरराव माणिकरराव
११) श्री. ओक जयवंत केशवराव

**विषय क्र. ३२/१ :**

दिनांक २४-०४-९२ रोजी संपन्न झालेल्या विशेष स्थायी समिती सभेचे इतिवृत्त व दिनांक २९-०४-९२ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :**

**श्री. मोहमंद इस्माईल :** स्थायी समिती सभापती निवडी बाबतच्या सभेचा वाद न्यायप्रविष्ठ आहे, तेव्हा तोपर्यंत शहर प्रकरणी न्यायालयाचा निकाल होत नाही, तोपर्यंत स्थायी समिती सभा घेण्यात येवु नये सदर प्रकरणी न्यायालयाचा जो निर्णय लागेल तो मान्यत होईलच.

**मा. सभापती** : सभापती पदाच्या निवडणुकी बाबतचे प्रकरण न्यायप्रविष्ठ असले तरी, या प्रकरणात न्यायालयाने काहीही आदेश दिलेला नाही. तेव्हा सभा होण्यास काहीच हरकत नाहीत.

**श्री. मो. इस्माईल, श्री. अलीम बेग :** सभापती पदाच्या निवडणुकी संबंधिचे प्रकरण न्यायप्रविष्ठ असतांनाही स्थायी समितीची सभा घेतली जाते याचा निषेध म्हणून आम्ही सभात्याग करीत आहोत. स. सभासद श्री. मो. इस्माईल व श्री. अलीम बेग यांनी ३.२५ वाजता सभात्याग केला.

**श्री गिरजाराम हाळनोर :** विद्युत विभागामध्ये विद्युत साहित्य उपलब्ध असतांनाही शहरातील बरेच सार्वजनिक दिवे बंद आहेत. याबाबत वारंवार मागणी करण्यात येत आहे. तसेच काही रस्त्यावर सोडियम दिवे दिवसाही चालु असतात हा काम प्रकरण आहे. याचा खुलासा व्हावा आणि विद्युत विभागाचा कारभार सुधारणेचे दृष्टीने विशेष भर देणे आवश्यक आहे. याकरीता विद्युत विभागाचे कामकाजात सुसत्रता आणण्याच्या दृष्टीने एक उपसमिती कायम करण्यात

यावी. शहरातील बोल्ट दिवे बंद आहेत याचा फायदा घेऊन मोठया प्रमाणावर लुटमार व चाऱ्या होत आहेत. शहरातील बंद दिवे म्हणजे चोरांना प्रोत्साहन देण्यात येते असा त्याचा अर्थ होईल.

**श्री. अजिजुल्ला बेग :** स. सभासद श्री. हाळनोर यांनी सुचविल्याप्रमाणे विद्युत विभागातील कामकाजातील सुसत्रतेसाठी समिती कायम करण्यास मी सहमत आहे. वारंवार मागणी करुनही सार्वजनिक दिव्यांची व्यवस्था होत नाही. एखादे सार्वजनिक दिव्याबाबत चौकशी केली असता आताच लाईनमन कामासाठी पाठविला. असे सांगितले जाते, पण प्रत्यक्षात काम झालेले नसते.

**अतिरिक्त शहर अभियंता :** शहरातील बंद दिव्याची पाहणी करण्यात येते. या पाहणीच्या वेळी बरेच लाईट चालु आहे असे दिसुन आले तरी पण जे सार्वजकिन दिवे बंद असतील त्याबाबतची सुचना मिळाल्यास ते दुरुस्त करण्याबाबत कार्यवाही करता येईल.

**श्री. गिरजाराम हाळनोर :** दुरुस्तीसाठी लागणारे विद्युत साहीत्य घेवून मनपा लाईनमन जात असले तरी पोलवर काम करण्यासाठी विद्युत मंडळाचे लाईनमन मिळतातच असे नाही. अशा वेळी विद्युत विभागाचे कामाचे सुसत्रतेसाठी नेमण्यात आलेली उप समिती विद्युत मंडळाशी संपर्क साधुन बंद दिवे चालु केला बाबत काम करु शकले.

**मा. सभापती** : स. सभासदांच्या सुचनेप्रमाणे विद्युत विभागातील कामात सुसुत्रता आणण्यासाठी व तक्रारीचे निवारण करण्याकरीता स. सभासद श्री. विठ्ठल पेरकर, श्री. मधुकर शिंदे, आणि श्री. अजिजुल्ला बेग यांचा समावेश असलेली एक उपसमिती कायम करण्यास मंजुरी देण्यात येते. श्री. अजिजुल्ला बेग हे उपसमितीचे चेअरमन राहतील. या उप समितीने आपले कामाचे अहवाल आठ दिवसाच्या आत स्थायी समिती समोर ठेवावा.

**श्री. अजिजुल्ला बेग :** आजच्या सभेमध्ये दि. ०१-०६-९२ रोजी संपन्न झालेल्या समितीचे इतिवृत्त काम जोडण्यात आले नाही. याचा खुलासा व्हावा.

**मा. सचिव** : मागील आठवडयात स्थायी समितीच्या तीन सभा झाल्या या सभेचे इतिवृत्त तयार करण्योच काम करण्यात येत आहे.

**श्री. विठ्ठल पेरकर :** मा. सचिव यांनी केलेला खुलासा बरोबर वाटत नाही.

**श्री. गिरजाराम हाळनोर :** दि. २४-०४-९२ च्या सभेत ठराव क्र. ५१३ मधील चर्चेत विषय समितीचे इतिवृत्त कोणत्या बैठकीत कायम करण्यात येईल. या सुचनेबाबत विधी सल्लगार यांनी सदर इतिवृत्त आगामी बैठकीत कायम करण्यात येईल असा खुलासा केला होता, तेव्हा आजची ही बैठक म्हणजे २४-०४-९२ नंतरची आगामी बैठक आहे काय?

**श्री. अजिजुल्ला बेग :** मा. सचिव यांच्याकडे जास्त काम आहे काय? याचा खुलासा व्हावा. दि. १३-०४-९२ च्या सभेत स्थगित ठेवण्यात आलेला विषय अद्याप मंजुर झाला नाही. पाणी पुरवठयाशी निगडीत विषय असल्यामुळे हा विषय पुढील सभेत ताबडतोब ठेवणे आवश्यक होते. असे असतांनाही दि. २९-०४-९२, २८-०५-९२ या तारखांना झालेल्या सभेमध्ये सदर विषय मांडण्यात आला नाही. तेव्हा विषय क्र. ५०० स्थगित का ठेवण्यात आला याचा खुलासा व्हावा आणि या संबंधित संचिका आताच सभागृहात मागविण्यात यावी.

**श्री. गिरजाराम हाळनोर :** स्थायी समितीचे इतिवृत्त तयार करण्यास उशीर का होत आहे. याबाबत खुलासा व्हावा.

**मा. सचिव** : दि. २९-०४-९२ च्या सभेत विषय पत्रिकेवरील आणि ऐनवेळचे ७१ विषय अशा प्रस्तावांना मंजुरी देण्यात आली आहे. त्यामुळे सदर इतिवृत्त तयार करण्यास उशीर लावला. दि. २९-०४-९२ नंतर लागोपाठ स्थायी समितीच्या तीन सभा झाल्या. या शिवाय या विभागाकडे असलेली चक्रमुद्रण मशिन नादुरुस्त आहे. या सर्व कारणामुळे इतिवृत्त तयार करण्यास उशीर झाला.

**श्री. गिरजाराम हाळनोर** : मा. सचिवांना या विभागात काम करण्याची इच्छा नसेल तर, त्यांची बदली करण्यात यावी.

**मा. उप आयुक्त** : सभा संपन्न झाल्यानंतर आगामी सभेमध्ये मागील सभेचे इतिवृत्त मंजुरीसाठी ठेवावे असा नियम आहे. चक्रमुद्रण मशिन बंद आहे ही बाब वेगळी इतिवृत्त तयार करण्यास कर्मचारी वर्ग कमी पडत असेल तर, मा. सचिवांनी तशा सुचना देणे आवश्यक आहे.

**श्री. विठ्ठल पेरकर** : आजच्या सभेसाठी वाटप करण्यात आलेली विषय पत्रिका आणि मागील सभेचे इतिवृत्त कार्यालयाचा चक्रमुद्रण मशिनवर चक्रमुद्रण केले किंवा बाहेरुन करुन आणले याचा खुलासा व्हावा. तसेच कार्यालयात चक्रमुद्रणाच्या किती यंत्र आहे. याचा ही खुलासा व्हावा.

**मा. सचिव** : आजच्या सभेसाठी वाटप करण्यात आलेली विषयपत्रिका आणि मागील सभेचे व इतिवृत्त हे खाजगी संस्थेकडून चक्रमुद्रीत करुन आणली आहे. या विभागाच्या कामासाठी प्रकल्प विभागाकडील चक्रमुद्रणाची मशिन उपयोगात आणली परंतु संध्या ती मशिन नादुरुस्त आहे. मशिन दुरुस्त करण्यासाठी आवश्यक असलेला पार्ट खरेदी करीता या विभागाचे कर्मचारी यांना करण्यास वाढविण्यात आले होते. परंतु मशिन दुरुस्तीसाठी आवश्यक असलेला पार्ट मिळत नाही. ही बाब लक्षात घेवून नविन चक्रमुद्रण मशिन खरेदी बाबतचा प्रस्ताव प्रशासनाकडे पाठविला आहे. यापुढे वेळेचा इतिवृत्त कायम करण्याची दक्षत घेतली जाईल.

**श्री. अजिजुल्ला बेग** : पाणी पुरवठयाची निगडीत असलेला ठराव क्र.५०० बाबत काय झाले, हा विषय कशा करीता स्थगित ठेवला होता. दिनांक १३-०४-०२ नंतर झालेल्या सभेत हा विषय का घेण्यात आला नाही. विषय क्र. ५०० स्थगित ठेवण्यात अर्थ काय? दि. ०१-०६-९२ किंवा ०८-०६-९२ च्या सभेत स्थगित ठेवण्यात आलेला विषय क्र. ५०० का घेण्यात आला नाही याचा खुलासा व्हावा.

**मा. सभापती** : स्थगित ठेवण्यात आलेला विषय क्र. ५०० आजच्या सभेत ऐनवेळेवर घेण्यात येईल.

**श्री. नारायण फत्तेलष्कर** : मागील सभेतील चर्चेनुसार मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७ (३) (क) अन्वये माजी आयुक्त यांनी केलेल्या कामांची माहिती शासनास पाठविण्यात आली काय याचा खुलासा व्हावा.

**मा. सचिव** : सभागृहात झालेली चर्चा अली इतिवृत्त बाबतची माहिती सर्व विभागांना देण्यात येते. तेव्हा सभागृहातील चर्चेनुसार प्रशासनाने कार्यवाही करावयाची असते.

**मा. उप आयुक्त** : मुंबई प्रांतीक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७ (३) (क) अन्वये मा. आयुक्त यांना तातडीचे कामे करुन घेण्याचा अधिकार आहे. अशा प्रकारे उक्त नियमान्वये अधिकार असतांना सदर माहिती कशा करता

शासनाकडे पाठवायची आणि पाठवावयाची असेल तर, ती कोणत्या नियमाप्रमाणे पाठवावयाची आहे.

**श्री. नारायण फत्तेलष्कर :** जर एखादया अधिकाऱ्यांन भ्रष्टाचार केला असेल तर, याबाबत समितीने चौकशी बाबतचा ठराव मंजुर केल्यानंतर चौकशी केली जाते. त्याच प्रमाणे या कलमान्वये मा. आयुक्त यांनी जी कामे हाती घेतली त्या कामात कोणती तातडी होती या बाबतची चौकशीसाठी सभागृहातील चर्चेनुसार शासनास माहिती पाठविण्यात यावी.

**श्री. अजिजुल्ला बेग :** शासनाकडे पत्रव्यवहार करतांना ठरावाची आवश्यकता नाही. सभागृहातील मंजुर झालेल्या ठरावाच्या प्रती देवून पत्रव्यवहार करता येतो.

**विधी सल्लागार :** सदर प्रकरणी पुढील सभेत माहिती देण्यात येतील.

**श्री. गिरजाराम हाळनोर :** ठराव क्र. ५११ अन्वये शाखा अभियंता श्री. शिसोदे डी. बी. यांची एक वेतनवाढ रोखण्यास मंजुरी देण्यात आली आहे. श्री. शिसोदे यांचे प्रकरणी झालेल्या दोन्ही चौकशी अहवालामध्ये संबंधितास निर्देश ठरविण्यात आले आहे असे असतांना शाखा अभियंता श्री. शिसोदे यांची एक वेतनवाढ रोखणे योग्य होणार नाही. तेव्हा शाखा अभियंता श्री. शिसोदे यांची रोखण्यात आलेली वेतनवाढ रद्द करण्यात येते अशी दुरुस्ती करण्यात यावी.

**जलनिःसारण अभियंता - २ :** दिनांक २९-०४-९२ च्या सभेतील ठराव क्र. ६०६ मध्ये " उपरोक्त कामासाठी श्री. आर. एल. बारवाल यांची अंदाजपत्रकाच्या दरापेक्षा २१% जास्त दराची सन १९९१-९२ च्या दरसुचीनुसार ६% जास्त दराची निविदा या ऐवजी उपरोक्त कामासाठी श्री. आर. एल. बारवाल यांची अंदाजपत्रकाचे दरापेक्षा २०.७०% जास्त दराची ( सन १९९१-९२ च्या दरसुचीनुसार ६% जास्त दराची) निविदा अशी दुरुस्ती करण्यात यावी.

**जलनिःसारण अभियंता -१ :** दिनांक २९-०४-९२ च्या सभेतील ठराव क्र. ६०७ मध्ये झोन क्र. ५ या ऐवजी झोन क्र. ६ अशी दुरुस्ती करण्यात यावी.

**मा. सभापती** : स. सभासद श्री. गिरजाराम हाळनोर आणि जलनिःसारण अभियंता १ व २ यांनी सुचविल्याप्रमाणे दुरुस्ती करण्यात यावी.

**श्री. तुळशीराम भगुरे :** बसैयेनगर येथील झाला ड्रेडिंगचे काम रुपये ५२,०००/- मध्ये होईल काय याचा खुलासा व्हावा.

**जलनिःसारण अभियंता -३ :** या ठिकाणचे नाल्याची खोली जास्त आहे. तेव्हा सदर कामासाठी दुरुस्ती अंदाजपत्रक तयार करावे लागेल.

**मा. सभापती** : स. सभासद श्री. मो. इस्माईल व श्री. अलीम बेग यांनी दिलेल्या पत्राबाबत विधी सल्लागार यांनी खुलासा व्हावा.

**विधी सल्लागार :** सभापती निवडी बाबतचे प्रकरण न्यायप्रविष्ठ असले तरी सभापती पदाची निवड जोपर्यंत न्यायालय अवैध ठरवत नाही, तोपर्यंत मुंबई प्रांतीक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३५ व ३६ अन्वये मिटींग घेता येते.

**श्री. गिरजाराम हाळनोर :** दि. २९-०४-९२ च्या सभेतील डांबरीकरणाच्या कामास कामाची तातडी लक्षात घेवून त्यांच सभेत स्विकृती देण्यात आली आहे. तेव्हा आतापर्यंत किती कामे झाली याचा खुलासा व्हावा.

**अतिरिक्त शहर अभियंता :** हॉट मिक्सचा प्लॅन्ट असलेल्या चार संस्था डांबरीकरणाचे काम करतात. मंजुर झालेल्या कामापैकी १५-२० कामे अद्याप हाती घेते बाकी

आहे. पाऊस पडेपर्यंत डांबरीकरणाचे काम करता येईल. उरलेली कामे दसऱ्या नंतर हाती घेतली जातील.

**मा. सभापती** : धावणी मोहल्ला येथील डांबरीकरणाचे काम खराब झाले आहे सभा संपल्यानंतर या कामाची पाहणी करण्यात येईल.

**अतिरिक्त शहर अभियंता :** धावणी मोहल्ला भागात अरुंद रस्ते आहेत. त्याठिकाणी मशीन जात नाही म्हणुन हाताने काम केले आहे. तेव्हा मशिन काम आणि हाताने केलेले काम यात फरक राहणारच.

**श्री. नारायण फत्तेलष्कर :** दिनांक २९-०४-९२ च्या सभेतील ठराव क्र. ५२० मधील चर्चेत " चर्मकार समाजासाठी शहागंज येथील टपऱ्या उठवून त्या ठिकाणी मार्केट तयार करण्यात यावे " अशी नोंद करण्यात आली आहे, त्या ऐवजी" चर्मकार समाजासाठी शहागंज येथे टपऱ्या देण्यात याव्यात अशी दुरुस्ती करण्यात यावी.

**मा. सभापती** : स. सभासद श्री.नारायण फत्तेलष्कर याचे सुचनेप्रमाणे दुरुस्ती करण्यात यावी.

**श्री. गिरजाराम हाळनोर :** निवडणुक काळात काम केलेल्या कर्मचाऱ्यांना आगाऊ वेतनवाढ देण्याबाबत काय कार्यवाही झाली. याचा खुलसा व्हावा. अनेकवेळा चर्चा करुनही प्रकरण निकाली काढले जात नाही. तेव्हा या कर्मचाऱ्यांवर किती अन्याय करणार? मिटींगची तारीख मिळाली किंवा नाही. तसेच सभागृहाच्या मंजुरीनुसार उप अभियंताची दोन पटे निर्माण करण्याबाबत प्रशासनाने काय कार्यवाही केली याचा खुलासा व्हावा.

**श्री. तुळशीराम भगुरे :** सेवा भरती नियमाबाबत पुढे काय कार्यवाही झाली याचा खुलासा व्हावा. यामुळे बाकीच्या कर्मचाऱ्यांवर अन्याय होत आहे.

**श्री. अजिजुल्ला बेग :** सेवा भरती नियम मंजुर होत नाही. तोपर्यंत शासकीय नियमाप्रमाणे काम करण्यात यावे असे सर्वसाधारण सभेत ठरले आहे. त्याप्रमाणे कार्यवाही करावी.

**मा. उप आयुक्त :** अति उत्कृष्ठ काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांना आगाऊ वेतनवाढ दिली जाते. निवडणुक काळात काम केलेल्या कर्मचाऱ्यांना जादा कामांचा भत्ता देण्यात आलेला आहेत.

उप अभियंताची पदे निर्माण करण्याच्या दृष्टीने प्रशासनाने कार्यालयाकडील तीनही कार्यकारी अभियंता यांना त्यांचेकडे असलेल्या कामाची माहिती मागविली असता या संबंधिची माहिती प्राप्त झाली आहे. उप अभियंताची पदे निर्माण करण्या बरोबरच इतर संवर्गातील पदांचा विचार करण्याच्या दृष्टीने अन्य विभागाकडूनही अशीच माहिती घेण्यात येत आहे.

याबाबत दिनांक १३-०६-९२ च्या प्रशासकीय बैठकीमध्ये निर्णय होईल असे वाटते. त्यानंतर रितसर प्रस्ताव सभागृहापुढे मांडता येईल.

**मा. सभापती** : मुंबई प्रांतीक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १०५ अन्वये प्रत्येक आठवडयाचा लेखा परीक्षण अहवाल आणि जमा खर्चाचा ताळेबंद देण्यात यावा अशी लेखी मागणी स. सभासद श्री. मिर्झा अजिजुल्ला बेग यांनी केली आहे, तेव्हा या प्रकरणी मुख्य लेखा परीक्षक यांनी खुलासा करावा.

**मुख्य लेखा परीक्षक :** मागील तीन चार वर्षाचे लेखा परीक्षण बाकी आहे. ते काम सध्या हाती घेण्यात आले आहे. लेखा परीक्षण विभागात कर्मचारी वर्ग कमी आहे.

याबाबी लक्षात घेता स. सभासदांच्या मागणीनुसार आठवडी लेखा पीरक्षण व जमाखर्चाचा ताळेबंद देणे शक्य नाही.

**श्री. मिर्झा अजिजुल्ला बेग :** मागील तीन-चार वर्षाचे लेखा परीक्षण बाकी आहे ही बाब वेगळी कलम १०५ प्रमाणे चालु वर्षाचे लेखा परीक्षणा बाबत आठवडी अहवाल दिला पाहिजे.

**मा. सभापती** : मुख्य लेखा परीक्षक यांनी मुंबई प्रांतीक महानगरपालिका अधिनियिम १९४९ चे कलम १०५ प्रमाणे चालु वर्षाचा आठवडी लेखा परीक्षण अहवाल व जमा खर्चाचा ताळेबंद देण्याची व्यवस्था करावी.

**श्री. गिरजाराम हाळनोर :** लवकर शाळा सुरु होत आहेत, तेव्हा मुलांना झाडाखाली बसावे लागु नये. म्हणुन सभागृहातील चर्चेनुसार मनपा मालकीचा किती शाळा खाजगी संस्थेच्या ताब्यात आहेत. याचा खुलासा व्हावा.

**शिक्षणाधिकारी :** मनपा मालकीच्या चार शाळा खाजगी संस्थेकडे होत्या त्यापैकी तीन इतका खाजगी संस्थेकडून रिकाम्या करुन घेतल्या आहेत. एका शाळेबाबतचा वाद न्यायालयात चालु आहे.

**श्री अजिजुल्ला बेग :** मनपा मालकीच्या शाळा खाजगी संस्थाना देण्याबाबतची आणखी काही प्रकरणे चालु आहेत काय याबाबत खुलासा व्हावा.

**मा. उप आयुक्त :** शहर विकास योजने नुसार बुरानी शाळेची इमारत रस्ता रुंदीकरणामध्ये बाधीत होत आहे. म्हणुन या संस्थेने तात्पुरत्या व्यवस्थे करीता नगर परिषद शालेय इमारतीची मागणी केली आहे. याबाबतची संचिका निर्णयालाही मा. आयुक्त यांच्याकडे पाठविण्यात आली आहे.

**श्री. गिरजाराम हाळनोर :** सभागृहातील चर्चेनुसार गणेश कॉलनी भागातील विहीरीवर स्लॅप टाकण्याबाबत काय कार्यवाही झाली याचा खुलासा व्हावा.

**कार्यकारी अभियंता :** आजच कॉलनीमध्ये विहीरीवर स्लॅप टाकुन रस्ता करण्यात आला आहे. स. सभासदांची रोडची मागणी आहे. म्हणुन संचिका संबंधित विभागाकडेन पाठविण्यात आली आहे.

**मा. सभापती** : ठराव क्र. ५१५ दि. २४-०४-९२ अन्वये कनिष्ठ लिपीक श्री. रुपचंद तायडे यांनी न्यायालयात दाखल केस परत घेतली असेल तर, त्यांच्या अपिलावर नियमाप्रमाणे कार्यवाही करावी.

**श्री. नारायण फत्तेलष्कर :** ठराव क्र. ५२३ हद. २९-०४-९९ अन्वये पडेगांव येथे जलवाहिनी टाकण्याच्या कामास मंजुरी दिली आहे. दि. २९-०४-९२ चे इतिवृत्त.

आज स्विकृत होत आहे. यानंतर संबंधित विभागच्या कामाचे दरपत्रके मागविणार. अशा प्रकारे काम मंजुर होऊनही काम हाती घेण्यास वेळ लागतो.

ही बाबत लक्षात घेता सभागृहासमोर मंजुरीसाठी ठेवलेण्यात आलेल्या प्रस्तावावर प्रस्ताव मंजूर करतांना सर्व चर्चा करुन मंजुर झालेल्या ठरावा बाबत सभा झाल्या बरोबर दरपत्रके मागविण्यात यावी.

**श्री. गिरजाराम हाळनोर :** स. सभासदांच्या सुचनेप्रमाणे कार्यवाही करता येणार नाही.

**श्री. अजिजुल्ला बेग :** पावसाळयाला सुरुवात होत आहे. तेव्हा शहरातील धोका दायक घरे, धोकादायक भिंती याबाबत प्रिमान्सुन कार्यक्रमानुसार काय कार्यवाही झाली याचा खुलासा व्हावा.

**मा. उप आयुक्त :** प्रिमान्सुन बाबत प्रशासकीय स्तरावर सभा घेण्यात आली सभेमध्ये मनपाच्या अधिकाऱ्यांना आवश्यक हया सर्व सुचना देण्यात आल्या आहेत.

तसेच नागरिकांच्या सोयीच्या दृष्टीने महापालिकेतर्फे स्थापन करण्यात आलेल्या दक्षता कक्षबाबत वृत्तपत्रात प्रसिध्दी देण्यात आली आहे. या सभेमध्ये शहरातील धोकादायक घरे याचा विभागी अधिकाऱ्यांचा मार्फत सर्व्हे करुन त्याबाबतचा अहवाल मा. शहर अभियंता यांच्याकडे सादर केल्यानंतर शहर अभियंता याबाबत नियमाप्रमाणे कार्यवाही करतील. या शिवाय शहरातील गटारी, कचरा यांचे योग्य ती साफसफाई करण्याबाबत विभागीय अधिकाऱ्यांना सुचना देण्यात आल्या आहेत. पावसाळयात होणारे ड्रेनेज चोकअप बाबत संबंधित विभागाचे उप अभियंता यांना इनचार्ज म्हणुन ड्रेनेज लाईन मधील घाण पाणी व्यवस्थित रित्या वाहून जाण्याबाबत आवश्यक त्या सुचना दिल्या आहेत. तसेच या सर्व कामावर नियंत्रण ठेवण्यासाठी लायसन ऑफिसरची नेमणुक करण्यात आली आहे.

**श्री. अजिजुल्ला बेग :** नियुक्त करण्यात आलेले लायसन ऑफिसर यांनी वार्डात काही देण्यात सुरुवात केली आहे काय? तसेच या अधिकाऱ्यांना संबंधित वार्डाचे नगरसेवक यांची भेट घेण्याबाबत सुचना दिल्या आहेत काय?

**श्री. गिरजाराम हाळनोर :** साचलेला कचरा आणि मोठया गटारी साफ होणे आवश्यक आहे. यासाठी दैनिक वेतनाच कामगार दिले आहेत तेव्हा त्यांच्याकडून काय काम झाले याचा खुलासा व्हावा माझ्या वार्डात पाहणीसाठी या म्हणजे काय काम झाले हे समजेल.

**श्री. मिर्झा अजिजुल्ला बेग :** दि. १२-०५-९२ रोजी मा. आयुक्त यांचे कार्यालयाकडुन रु. २,६७,०००/- चे अंदाजपत्रक असलेली एक संचिका सचिव विभागाकडे आली आहे. तेव्हा दोन महिने होऊन गेले तरी याबाबतचा प्रस्ताव सभागृहामुळे का मांडण्यात आला नाही. संचिका रोखुन धरण्याचे कारण काय याचा खुलासा व्हावा.

**मा. सभापती** : दिनांक ०१-०६-९२ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समितीचे इतिवृत्त या सभेत कायम करण्यात येते.

**ठराव** :

१) शाखा अभियंता श्री. जी. बी. शिशोदे याचे प्रकरणी झालेल्या दोन्ही चौकशी अहवालात संबंधितास निर्देश ठरविण्यात आले असल्यामुळे ठराव क्र. ५११ दि. २४-०४-९२ अन्वये शाखा अभियंता श्री. डी. बी. शिसोदे यांची रोखण्यात आलेली वेतनवाढ रद्द करण्यात सर्वानुमते मंजुरी देण्यात येते, अशी दुरुस्ती करण्यास

२) ठराव क्र. ६०६ दि. २९-०४-९२ च्या सभेतील उपरोक्त कामासाठी श्री. आर. एल. बारवाल यांची अंदाजपत्रकाचे दरापेक्षा २१% जास्त दराची ( सन १९९१-९२ च्या दरसुची नुसार ६% जास्त दराची) निविदा " या ऐवजी उपरोक्त कामासाठी श्री. आर. एल. बारवाल यांची अंदाजपत्रकाचे दरापेक्षा २०.२०% जास्त दराची ( सन १९९१-९२ च्या दरसुचीनुसार ६% जास्त दराची निविदा अशी दुरुस्ती करण्यास

३) ठराव क्र. ६०७ दि. २४-०४-९२ मध्ये झोन क्र. ५ " ऐवजी " झाले. ३.६ अशी दुरुस्ती करण्यास

४) ठराव क्र. ५२० दिनांक २९-०४-९२ मध्ये चर्मकार समाजासाठी शहागंज येथील टपऱ्या उठवून त्या ठिकाणी मार्केट तयार करण्यात यावे. या ऐवजी " चर्मकार समाजासाठी शहागंज येथे टपऱ्या देण्यात याव्या अशी दुरुस्ती करण्यास

५) तसेच दि. ०१-०६-१९९२ रोजी संपन्न झालेले स्थायी समितीचे इतिवृत्त कायम करणे अशी वाढ करण्यास

याप्रमाणे दि. २४-०४-९२ आणि २९-०४-९२ रोजी संपन्न झालेल्या इतिवृत्तास वर दर्शविल्याप्रमाण अनुक्रमांक १ ते ४ प्रमाणे दुरुस्ती करण्यासह दिनांक २४-०४-९२ आणि २९-०४-९२ रोजी संपन्न झालेले इतिवृत्त तसेच या सोबत दि. ०१-०६-९२ रोजी संपन्न झालेले इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात आली.

**विषय क्र. ३३/२ :**

वार्ड क्र. १३ मो. उमराव कॉलनी येथे १५० मी. मी. व्यासाची आर. सी. सी. ड्रेनेज लाईन टाकण्याच्या कामाकरीता र.रु. १,६०,०००/- चे अंदाजपत्रक सन १९९०-९१ च्या दरसुची नुसार तयार करण्यात आले असुन, सदर अंदाजपत्रकास मा. आयुक्तांनी मंजुरी दिलेली आहे. प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**संवाद :**

**श्री. गिरजाराम हाळनोर :** मागील सभेमध्ये जलनिःसारण विभागाकरीता अंदाजपत्रकातील तरतुद संपली असल्याचा खुलासा संबंधिता अधिकाऱ्यांनी केला आहे. तेव्हा प्रस्तावीत काम तातडीचे आहे काय याचा खुलासा व्हावा.

**श्री. नारायण फत्तेलष्कर :** सन १९९२-९३ च्या अर्थसंकल्पास मंजुरी देतांना जलनिऱ्सारणाचे कामासाठी ९०/- लाखाची तरतुद होती, तेव्हा ही ९०/- लाखाची तरतुद ५०/- लाख कशी झाली याचा खुलासा व्हावा.

**श्री. गिरजाराम हाळनोर :** पुढील सभेपर्यंत प्रत्येक विभागाकरीता अर्थसंकल्पात किती तरतुद आहे. यापैकी किती रक्कम खर्च झाली आहे. याबाबतची माहिती लेखी स्वरुपात देण्यात यावी.

**श्री. जावेद हसन खान :** उमराव कॉलनी हा भाग अधिकृत आहे का अनाधिकृत आहे याबाबत खुलासा व्हावा.

**जलनिःसारण अभियंता :** उमराव कॉलनी हा भाग अनाधिकृत आहे.

**श्री. तुळशीराम भगुरे :** वार्ड क्र. ८ येथील भिसुरवाडी भागास पाणीपुरवठा व रस्ते यांची सुविधा करुन देण्याबाबत पत्र दिले असता मिसुरवाडी अनाधिकृत वसाहत असल्यामुळे पाणी व रस्ते याची सुविधा उपलब्ध करुन देता येत नाही, असे उत्तर दिले जाते. मग हा काय प्रकार आहे. याचा खुलासा व्हावा.

**मा. सभापती** : प्रस्तावित कामाची पाहणी करण्यात यावी असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. ३४/३ :**

शहर अभियंता महानगरपालिका यांनी प्रस्ताव सादर केला की, हमालवाडा स्लम भागातील खांडकी पेव्हींगची दुरुस्ती करुन गटार बांधण्याचे काम करणे आवश्यक असलेल्या बाबत त्या परिसराची पाहणी अंती आढळुन आले करीता अस्तित्वात असलेल्या खांडकी पेव्हींगची दुरुस्ती करणे तसेच ५१० मीटर गटार बांधणे्साठी १९९१-९२ चे दरसुची प्रमाणे अंदाजपत्रक रु. २,४१,१०५/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.

करीता हमालवाडा स्लम भागात ५१० मीटर विटाची गटार बांधणे तसेच अस्तित्वात असलेल्या खांडकी पेव्हींगची दुरुस्ती करणे साठी केलेले अंदाजपत्रक र. रु. २,४१,१०५/- ला मंजुरी देणेस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, हमालवाडा स्लम भागात ५१० मीटर लांबीची विटाची गटार बांधणे आणि अस्तित्वात असलेल्या खांडकी पेव्हींगची दुरुस्ती करण्याच्या कामासाठी र. रु. २,४१,१०५/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३५/४ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, सुराणानगर येथे १५० व १०० मी. मी. व्यासाची ए. सी. जलवाहिनी टाकावयाची आहे. सदर कामाचे अंदाजपत्रक परिसर अंभियांत्रिकी सन १९९१-९२ च्या दरसुची नुसार र. रु. १,७३,५००/- एवढयाचे तयार करण्यात आलेले आहे. त्यास मा. आयुक्त यांनी मान्यता दिलेली आहे.

करीता अंदाजपत्रक र. रु. १,७३,५००/- च्या मंजुरीचे प्रस्तावाचे प्रारुप सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सुरणानगर येथे १५० व १०० मी. मी. व्यासाची ए. सी. जलवाहिनी टाकण्याच्या कामासाठी र. रु. १,७३,५००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३६/५ :**

शहर अभियंता, महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला की, मोहल्ला किराडपुरा स्लम भागतील रस्त्याचे डांबरीकरण करण्याकरीता अंदाजपत्रक र. रु. ४,७४,७५०/- चे तयार करण्यात आले असून, सदरचे अंदाजपत्रक सार्वजनिक खात्याचे सन ९१-९२ च्या दरसुची नुसार तयार करण्यात आलेले आहे.

करीता अंदाजपत्रक र. रु. ४,७४,७५०/- चा प्रस्ताव विचारार्थ व मंजुरी करीता सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, किराडपुरा स्लम भागात रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामासाठी र. रु. ४,७४,७५०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३७/६ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, वार्ड क्र. १९ बुढ्ढीलाईन येथे ३०० मी. मी. व्यासाची आर. सी. सी. ड्रेनेज लाईन टाकणे बाबत अंदाजपत्रक र. रु. १,४९,५००/- चे सन १९९१-९२ च्या दरसुचीप्रमाणे तयार करण्यात आलेला असून, या आयुक्त यांनी सदर अंदाजपत्रकास मंजुरी दिलेली असून सदरचा खर्च सन १९९२-९३ या वर्षाच्या भांडवली तरतुदीतून करण्यात येईल.

करीता प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र. १९ बुढ्ढीलाईन येथे ३०० मी. मी. व्यासाची आर. सी. सी. ड्रेनेज लाईन टाकण्याच्या कामासाठी र. रु. १,४९,५००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३८/७ :**

शहर अभियंता मनपा, औ. बाद यांनी प्रस्ताव सादर केला की, हर्सुल स्लम परिसराची प्रतयक्ष पाहणी केली असता तेथील रस्ते, ड्रेनेज लाईन, पाण्याची लाईन व गटारीचे कामामुळे रस्त्यांची स्थिती अतिशय खराब झाल्यामुळे खडी रस्त्याचे काम अत्यंत आवश्यक असल्यामुळे १९९१-९२ चे दरसुचीनुसार अंदाजपत्रक र. रु. १,८७,९००/- चे तयार करण्यात आले आहे.

करीता हर्सुल स्लम परिसरात खडी रस्ता ( रिमेटलिंग ) चे काम करण्यासाठी केलेले अंदाजपत्रक र. रु. १,८७,९००/- ला मंजुरी मिळण्यासाठी विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, हर्सुल स्लम भागात खडी रस्ते तयार करण्याच्या कामासाठी र. रु. १,८७,९००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३९/८ :**

शहर अभियंता महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला की, संजयनगर मुकूंदवाडी स्लम भागात ३५० मी. मी. व्यासाची पुर्वरचित अर्धगोलाकार आर. सी. सी. गटार बसविण्याचे कामासाठी ९१-९२ चे दरसुची नुसार अंदाजपत्रक र. रु. २,३६,७००/- चे तयार करण्यात आले आहे.

करीता संजयनगर मुकूंदवाडी स्लम भागात ३५० मी. मी. व्यासाची पुर्वरचित अर्धगोलाकार आर. सी. सी. गटार बसविण्याचे कामासाठी केलेले अंदाजपत्रक र. रु. २,३६,७००/- ला मंजुरी मिळण्यासाठी विचारार्थ सादर.

**संवाद :**

**श्री. गिरजाराम हाळनोर :** फुलेनगर भागातील अर्धगोलाकार गटारीच्या कामाचे काय झाले याचा खुलासा व्हावा.

**उप अभियंता स्लम :** फुलेनगर भागातील अर्धगोलाकार गटारीचे काम एक दोन दिवसात सुरु होईल.

**श्री. गिरजाराम हाळनोर :** फुलेनगर भागातील अर्धगोलाकार गटारीचे काम पुर्ण करण्यात यावे, हे काम अर्धवट सोडू नये. त्यासाठी येत्या बैठकीत दुरुस्त प्रस्ताव मांडण्यात यावा.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, संजयनगर मुकूंदवाडी स्लम भागात ३५० मी. मी. व्यासाची पुर्वरचित अर्धगोलाकार आर. सी. सी. गटार बसविण्याचे कामासाठी र. रु. २,३६,७००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४०/९ :**

शहर अभियंता महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला की, मो. किराडपुरा रहेमानियॉ कॉलनी येथे दगडी गटार बांधण्याच्या कामाकरीता अंदाजपत्रक र. रु. २,१९,२००/- चे तयार करण्यात आलेले आहे. सदरचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम खात्याचे सन १९९१-९२ चे दरसुची नुसार करण्यात आलेले आहे.

करीता किराडपुरा रहेमानिया कॉलनी येथे दगडी गटार बांधण्याच्या कामांचे अंदाजपत्रक रु. २,१९,२००/- चा प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

**श्री. गिरजाराम हाळनोर :** व्यकंटेश्वर कॉलनी या भागात ड्रेनेज लाईन तुबूंन घरात पाणी शिरले आहे. जवळच बांधकाम चालु आह. तेव्हा फुटलेल्या ड्रेनेज लाईन बाबत काय कार्यवाही झाली याबाबत खुलासा व्हावा.

**जलनि:सारण अभियंता - १:** फुटलेल्या ड्रेनेज बाबत पंचजामा करण्यात आलेला आहे.

**श्री. गिरजाराम हाळनोर :** या भागातील ड्रेनेज लाईन फुटल्यामुळे या लाईनवर असलेली १५० व २०० घरे सफर होत आहे. तेव्हा फुटलेली ड्रेनेज लाईन ताबडतोब दुरुस्त करुन सुरु होणे आवश्यक आहे. या कामासाठी लघु निविदाद्वारे दरपत्रके मागविण्यात यावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, किराडपूरा रहेमानियॉ कॉलनी येथे दगडी गटार बांधण्याचे कामाकरीता र. रु. २,१९,२००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४१/१० :**

मो. व्यकंटेश्वर कॉलनी पासुन पॉलटेक्नीक वस्तीगृह पर्यंत १५० मी. मी. व्यासाची चिनी मातीची ड्रेनेज लाईन काढुन २५० मी. मी. व्यासाची आर. सी. सी. ड्रेनेज लाईन टाकण्याबाबत अंदाजपत्रक र.रु. ३,१०,०००/- चे सन ९१-९२ च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आले असून, सदर अंदाजपत्रकास मा. आयुक्त साहेब यांनी मंजुरी दिलेली आहे. करीता प्रस्ताव मंजुरीस्तव.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, व्यकंटेश्वर कॉलनी ते पॉल्टेक्नीक वस्तीगृहा पर्यंतची १५० मी. मी. व्यासाची चिनी मातीची ड्रेनेज लाईन काढुन २५० मी. मी. व्यासाची आर. सी. सी. ड्रेनेज लाईन टाकण्याच्या कामासाठी र. रु. ३,१०,,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४२/११ :**

शहर अभियंता महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला की, संजयनगर बायजीपूरा येथील गटारीची दुरुस्ती करुन त्यावर आर. सी. सी. स्लॅब टाकण्याचे कामासाठी अंदाजपत्रक र. रु. २,८१,२००/- चे तयार करुन त्याचा खर्च भांडवली खर्चातून करण्याचे प्रस्तावित केले आहे.

करीता संजयनगर बायजीपुरा येथील गटारीची दुरुस्ती करुन त्यावर आर. सी. सी. स्लॅप टाकण्यासाठी केलेले अंदाजपत्रक र. रु. २,८१,२००/- ला मंजुरी तसेच सदरचा खर्च भांडवली सदरातुन करण्याचे प्रस्तावीत केले आहे. मंजुरीसाठी प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, संजयनगर बायजीपुरा येथील गटारीची दुरुस्ती करुन त्यावर स्लॅप टाकण्याच्या कामासाठी र. रु. २,८९,२००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. सदर कामाचा खर्च भांडवली खर्चातून करण्यात यावा.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४३/१२ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी अभिप्राय दिला की, बारापुल्ला कोतवालपुरा भागातील खांडकी पेव्हींगची खास दुरुस्ती करण्याच्या कामाकरीता सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन १९९१-९२ च्या दरसुचीनुसार र. रु. १,४८,४३०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरचा खर्चसन ९२-९३ च्या " भांडवली रस्ते " या शिर्षकाखाली करण्यात येईल. तरी र.रु. १,४८,४३०/- चे अंदाजपत्रक मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, बारापुल्ल कोतवालपुरा भागात खांडकी पेव्हींगची खास दुरुस्ती करण्यासाठी र. रु. १,४८,४३०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. सदर कामाचा खर्च भांडवली रस्ते या शिर्षकातुन करण्यात यावा.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४४/१३ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी अभिप्राय दिला की, मोहल्ला गरम पाणी येथील ४० फुट रुंद रस्त्याचे रुंदीकरणा व खडीकरण करण्याच्या कामा करीता सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन ९१-९२ च्या दरसुचीनुसार र. रु. १,४७,१७०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरचा खर्च सन १९९२-९३ वर्षाच्या " भांडवली रस्ते " या शिर्षकाखाली करण्यात येईल. तरी र. रु. १,४७,१७०/- चे अंदाजपत्रक मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, गरम पाणी, येथील ४० फुट रुंद रस्त्याचे रुंदीकरण व डांबरीकरण करण्याच्या कामासाठी र. रु. १,४७,१७०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४५/१४ :**

मा. शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, ज्यब्ली पार्क येथील पाण्याच्या टाकीजवळ असलेल्या मनपा चतुर्थश्रेणी कर्मचाऱ्यांच्या निवासस्थानामध्ये प्रत्येकी एक संडास व बांधरुम असे आठ क्वार्टर मध्ये बांधलेल्या कामासाठीसन १९९०-९१ चे सार्वजकिन बांधकाम खात्याच्या डी. एस. आर. दराने र. रु. २,६३,३००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे.

सदरचा खर्च सन १९९२-९३ च्या वर्षाच्या भांडवली इमारती या शिर्षकामधुन करण्यात येईल तरी र. रु. २,६३,३००/- चे अंदाजपत्रक प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, ज्युब्ली पार्क येथील मनपा चुतर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांचे निवास्थनामध्ये प्रत्येकी एक संडास व बाथरुम ( आठ क्वार्टर साठी ) बांधण्याचे कामासाठी र. रु. २,६३,३००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी. काम आवश्यक असल्यामुळे या कामास याच सभेत सर्वानुमते स्विकृती देण्यात येते.

**विषय क्र. ४६/१५ :**

मा. शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो. कटक गेट येथील मनपा समाज मंदिरावर ( कम्युनिटी हॉल ) वाचनालयासाठी पहिला मजला बांधण्याचे कामासाठी सन १९९१-९२ चे सा. बा. खात्याचे डी. एस. आर. दराने र. रु. ४,९८,१२५/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे.

सदरचा खर्च भांडवली इमारती ( सी. ए. बिल्डींग ) या शिर्षकामधुन करण्यात येईल. तरी अदाजपत्रक र. रु. ४,९८,१२५/- मंजुरीचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद :**

**श्री. अजिजुल्ला बेग :** कटकट गेट येथील समाज मंदिर कोणत्या आकारमानाचे आहे.

**शहर अभियंता :** कटकट गेट येथे समजामंदिर नसुन शादी खान्याची इमारत आहे. ही इमारत २८० स्के. मीटर आहे. शादी खान्यापासुन मनपास काम कमी प्रमाणात आर्थिक उत्पन्न होते. म्हणुन मा. आयुक्तांच्या आदेशाने ही शादी खान्याची इमारत रद्द करुन याच भागातील शाळेची व्यवस्था या ठिकाणी करण्यता येत आहे.

**श्री. अजिजुल्ला बेग :** महापालिकेने व्यापारी उद्देश ठेवून चालणार नाही. नागरिकांना सुविधा प्राप्त करुन दिल्या पाहिजे. तेव्हा या भागातील नागरिकांसाठी शादी खान्या करीता स्वतंत्र हॉल तयार करण्याबाबतचे अंदाजपत्रक सभेत ठेवण्यात यावे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, कटकट गेट येथील मनपा समाज मंदिरावर वाचनालयासाठी पहिला मजला बांधण्याच्या कामाकरीता रु. ४,१६,१२५/- च्या अंदाजपत्रकीय सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४७/१६ :**

मा. शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, वार्ड क्र. १६ हर्षनगर येथे नाल्यावर पादचाऱ्यासाठी लोखंडी पुल तयार करण्याचे कामासाठी सन १९९१-९२ चे सार्वजनिक बांधकामा खात्याचे डी. एस. आर. दराने र. रु. २,१०,७६०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरचा खर्च सी. ए. बिल्डींग या सदराखाली करण्यात येईल.

तरी अंदाजपत्रक र. रु. २,१०,७६०/- मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र. १६ हर्षनगर येथील नाल्यावर पादचाऱ्यासाठी लोखंडी पुल तयार करण्याच्या कामासाठी र. रु. २,१०,७६०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४८/१७ :**

मा. शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, वार्ड क्र. ६० मो. चिकलठाणा येथे मनपा प्रा. आरोग्य केंद्राकरीता वाचमन क्वार्टर बांधण्याच्या कामासाठी सन १९९१-९२ चे सा. बा. खात्याचे डी. एस. आर. दराने र. रु. १,१७,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.

सदरचा खर्च भांडवली इमारती ( सि. ए. बिल्डींग ) या शिर्षकामधुन करण्यात येईल. तरी अंदाजपत्रक र. रु. १,१७,०००/- मंजुरीचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद :**

**श्री. अजिजुल्ला बेग श्री. गिरजाराम हाळनोर :** वाचमन क्वार्टरसाठी एवढी रक्कम खर्च करणे आवश्यक आहे काय?

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र. ६० चिकलठाणा येथील मनपा प्राथमिक आरोग्य केंद्राकरीता वाचमन क्वार्टर बांधण्याच्या कामासाठी र. रु. १,१७,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ४९/१८ :**

मा. शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, संत एकनाथ रंगमंदिर उस्मानपुरा येथे कबीग व सिमेंट प्लेटिंग करण्याच्या कामासाठी सन १९९१-९२ च्या सार्वजनिक बांधकाम खात्याचे डी. एस. आर. दराने र. रु. १,३८,३००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे.

सदरचा खर्च सन १९९२-९३ या वर्षाच्या भांडवली इमारती या शिर्षकामधुन करण्यात येईल. तरी अंदाजपत्रक र. रु. १,३८,३००/- चा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, संत एकनाथ रंगमंदिर उस्मानपुरा येथे कबीग व सिमेंट प्लोरींग करण्याच्या कामासाठी र.रु. १,३८,३००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५०/१९ :**

मा. शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, वार्ड क्र. १ मो. भावसिंगपुरा येथे प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी वाचमन क्वार्टर बांधण्याच्या कामासाठी सन १९९१-९२ चे सा. बा. खात्याचे डी. एस. आर. दराने र. रु. १,१७,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे.

सदरचा खर्च भांडवली इमारती ( सि. ए. बिल्डींग ) या सदराखाली करण्यात येईल. तरी अंदाजपत्रक र. रु. १,१७,०००/- चे मंजुरीस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र. १ मो. भाविंसगपुरा येथील प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी वाचमन क्वार्टर बांधण्याच्या कामासाठी र. १,१७,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५१/२० :**

मा. शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, वार्ड क्र. ५५ रेल्वेस्टेशन मनपा आरोग्य केंद्र परिसरात वाचमनसाठी निवासस्थान बांधण्याच्या कामासाठी सन १९९१-९२ चे सा. बा. खात्याचे डी. एस. आर. दराने र. रु. १,१७,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे.

सदरचा खर्च भांडवली इमारती ( सी. ए. बिल्डींग ) चा शिर्षकाखाली करण्यात येईल. तरी अंदाजपत्रक

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र. ५५ रेल्वेस्टेशन मनपा आरोग्य केंद्र परिसरात वाचमनसाठी क्वार्टर बांधण्याच्या कामासाठी रु. १,१७,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५२/२१ :**

शहर अभियंता महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला की, मो. किराडपुरा स्लम भागातील रस्त्याचे डांबरीकरण करण्याकरीता अंदाजपत्रक र. रु. २,१३,५००/- चे तयार करण्यात आले असुन, सदरचे अंदाजपत्रक सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन ९१-९२ च्या दरसुचीनुसार करण्यात आले आहे.

करीता किराडपुरा येथील रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामाचे अंदाजपत्रक र. रु. २,१३,५००/- चा प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, किराडपुरा स्लम भागात डांबरी रस्त्याचे कामाकरीता र. रु. २,१३,५००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५३/२२ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, सर्व्हे नं. १३३ जयसिंगपुरा येथील मंजुर रेखांकन मधील मनपाच्या खुल्या जागेस संरक्षित भिंत बांधण्याच्या कामासाठी सा. बा. खात्याच्या सन १९९१-९२ चे डी. एस. आर. दराने र. रु.२,८१,३३०/- चे अंदाजपत्रक तयार केलेले आहे. सदरचा खर्च नविन उद्याने या शिर्षकामधुन करण्यात येईल.

प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सर्वे नं. १३३ जयसिंगपुरा येथील मंजूरा रेखाकंना मधील मनपाच्या खुल्या जागेस संरक्षित भिंत बांधण्याच्या कामाकरीता रु. २,८१,३३०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५४/२३ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, परीमल हाऊसिंग सोसायटी गारखेडा येथील मनपाच्या खुल्या जागेवर संरक्षित भिंत बांधणे कामासाठी सन १९९१-९२ च्या सार्वजनिक बांधकाम खात्याच्या दरसुचीप्रमाणे र. रु. २,००,५००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे.

सदरचा खर्च विकास योजना अंतर्गत भुंखंडाचे संरक्षण या शिर्षकाखाली करण्यात येईल. तरी र. रु. २,००,५००/- चे अंदाजपत्रक मंजुरी प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, परिमल हाऊसिंग सोसायटी गारखेडा येथील मनपाच्या खुल्या जागेस संरक्षित भिंत बांधण्याच्या कामासाठी रु. २,००,५००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५५/२४ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, वार्ड क्र. ३६ रशिदपुरा येथे १५० मी. मी. व्यासाची आर. सी. सी. ड्रेनेज लाईन टाकणेबाबत अंदाजपत्रक र. रु. १,९०,६५०/- चे सन १९९०-९१ च्या दरसुचीप्रमाणे तयार करण्यात आलेले असुन, मा. आयुक्त यांनी

सदरील अंदाजपत्रकास मंजुरी दिलेली असुन, सदरचा खर्च सन १९९२-९३ च्या भांडवली तरतुदीतुन करण्यात येईल. करीता प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र. ३६ रशिदपुरा येथे १५० मी. मी. व्यासाची आर. सी. ड्रेनेज लाईन टाकण्याच्या कामासाठी र. रु. १,९०,६५०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५६/२५ :**

मा. शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, कोटला कॉलनी येथील मनपा निवासस्थानास प्रत्येकी एक. रुमची वाढ करण्याच्या कामासाठी सन १९९१-९२ चे सार्वजनिक बांधकाम खात्याचे डी. एस. आर. दराने र. रु. २,४७,५००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे.

सदरचा खर्च भांडवली इमारती या शिषकामध्युन करण्यात येईल.

तरी अंदाजपत्रक र. रु. २,४७,५००/- मंजुरीसाठी विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, कोटला कॉलनी येथील मनपा स्थानास प्रत्येकी एक रुमची वाढ करण्याच्या कामासाठी र. २,४७,५००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी. या कामास याच सभेत स्विकृतीही देण्यात येते.

**विषय क्र. ५७/२६ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो. अजबनगर अमर सोप फॅक्टरी येथील मनपाच्या खुल्या जागेवर कंपाऊंड वॉल बांधणे बाबतच्या कामासाठी अंदाजपत्रकीय र. रु. ४०,४९१/- ला. मा. आयुक्तांनी मंजुरी दिलेली असुन त्या अंनुषंगाने सदर कामाचे " बी १ " नमुन्यात निविदा सुचना दि. ३०-०३-९२ रोजी दैनिक देवगीरी तरुण भारत लोकधर्म र. वर्तमानपत्रात प्रसिध्द करण्यात आले. त्यानुसार विक्रीच्या तारखेपर्यंत एकूण तीन (३) निविदा पत्रके विकण्यात आले व स्किारण्याच्या तारखेस एकूण तीन (३) दरपत्रके दर भंरुन प्राप्त झाली. दिनांक २०-०४-९२ रोजी उपस्थित गुत्तेदारासमक्ष उघडण्यात आले. दराचे तपशील खालील प्रमाणे.

| अ. क्र. | एजन्सीचे नांव | दर अंदाजपत्रकीय दरात |
|---|---|---|
| १. | श्री. वसंत नरवडे पाटील | ४% अंदाजपत्रकीय दरापेक्षा जास्त |
| २. | श्री. एस. ए. नवाब | ७% अंदाजपत्रकीय दरापेक्षा जास्त |

वरील दर पत्रात तुलनात्मक दृष्टया सर्वात कमी दराचे दर पत्रक श्री. वसंत नरवडे पाटील यांचे अंदाजपत्रकीय दराचे दरपत्रक आहे. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, अजबनगर अमरसोटा फॅक्टरी येथील मनपाच्या खुल्या जागेस कंपाऊंड वॉल बांधण्याच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरातील श्री. वसंत नरवडे पाटील यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात

येते. वैधानिक कार्यवाही व्हावी. कामाची तातडी लक्षात घेता या कामास याच सभेत सर्वानुमते स्विकृतीही देण्यात येते.

**विषय क्र. ५८/२७ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, सन १९९२-९३ हया आर्थिक वर्षासाठी टायर रिट्रेडिंगच्या कामासाठी वार्षीक करार करण्या करीता दै. मराठवाडा व दै. सकाळ यावर्तमानपत्रात निविदा सुचना देण्यात आली. असता दोन निविदांची विक्री झाल्या व निविदापत्रके स्विकारण्याच्या शेवटच्या दिवशी म्हणजे दि. १३-०४-९२ रोजी दुपारी २.०० वाजेपर्यंत दोन्ही निविदा प्राप्त झाल्या.

१) मे. नाथ कोल्ड रिट्रेडर्स औरंगाबाद.
२) मे. मारुती टायर्स औरंगाबाद.

तुलनात्मकदृष्टया सर्व प्रकारच्या टायर्स रिमोल्डींग चे दर मे. मारुती टायर्स औरंगाबाद हयांचे कमी आहेत. फक्त १ कट रिपेअर्सचे दर मारुत टायर्स औरंगाबाद यांचे रुपये १००/- होते. जे त्यांनी क्र. ७५/- प्रमाणे म्हणजे नाथ कोल्ड रिट्रेडस औरंगाबाद हयांनी दिलेल्या कमीच्या दरात करण्यास तयार असल्याबद्दल लेखी पत्र दिले आहे.

तेव्हा मारुती टायर्स औरंगाबाद हयाचे खालील प्रमाणे दर मंजुर करणे योग्य.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | ५.९० x १५ टायर्स | दर रुपये | ४४०.०० |
| २. | ६.०० x १६ | -//- | ५३५.०० |
| ३. | ७.०० x १५ | -//- | ५७५.०० |
| ४. | ७.०० x १६ | -//- | ६८०.०० |
| ५. | ७.०० x २० | -//- | ९००.०० |
| ६. | ८.२५ x २० | -//- | १०००.०० |
| ७. | ९.०० x २० | -//- | ११५०.०० |

१ " ए२ " ए " कर रिपेअर्सचे दर रुपये ७५/- रु. १५०/-, रुपये २५०/-, रुपये ३५०/- असे आलेले आहेत.

वरील प्रमाणे दर मंजुर करण्यासाठी प्रस्ताव सादर.

**संवाद :**

**श्री. तुळशीराम भगुरे, श्री. गिरजाराम हाळनोर :**प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सन १९९२-९३ या आर्थिक वर्षासाठी टायर रिट्रेडींगच्या कामासाठी मे. मारुती टायर्स औरंगाबाद यांचे खाली दर्शविल्याप्रमाणे तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**टायर रिट्रेडींग करीता**

| | | |
|---|---|---|
| १) ५.९० x १५ टायर्स | दररुपये | ४४०.०० |
| २) ६.०० x १६ टायर्स | -//- | ५३५.०० |
| ३) ७.०० x १५ टायर्स | -//- | ५७५.०० |
| ४) ७.०० x १६ टायर्स | -//- | ६००.०० |
| ५) ७.०० x २० टायर्स | -//- | ९००.०० |
| ६) ८.२५ x २० टायर्स | -//- | १०००.०० |
| ५) ९.०० x २० टायर्स | -//- | ११५०.०० |

ब) कर झालेले टायर रिपेअर करीता

१" २" ३" आणि ४" कर झालेल्या टायरचे रिपेअर करीता अनुक्रमे रुपये ७५/- रु. १५०/-, रुपये २५०/-, रुपये ३५०/-

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ५९/२८ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, वार्ड क्र. मो लक्ष्मी कॉलनी प्रज्ञानगर येथे १५० मी. मी. व्यासाची आर. सी. सी. ड्रेनेज लाईन टाकणे बाबत अंदाजपत्रक र. रु. १,१०,८००/- चे सन १९९०-९१ च्या दरसुची प्रमाणे तयार करण्यास आलेले असुन सदर काम सन १९९०-९१ च्या शासकीय अनुदानातुन करण्यात येईल. तसेच अंदाजपत्रकास मा. आयुक्त यांनी मंजुरी दिलेली आहे.

आदेशानुसार सहल कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र. १२-०१-९२ दि. ०१-०१-९२ नुसार जाहिरात देऊन निविदा मागविल्या असता सर्वात कमी दराची म्हणजे १३.९% कमी दराची निविदा बी. ए. काल्डा यांची होती. परंतु स्थायी समितीचा ठराव क्र. ३७८/१ अ. क्र. ५ दि. १०-०३-९२ ला फेर निविदा मानवावी असे ठरले.

करीता आदेशानुसार सदर कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र. १६/३८७/९२ दि. १३-०३-९२ ला दुसऱ्यांदा दैनिक लोकमत व देवगिरी तरुण भारत या स्थानिक वर्तमान पत्रात जाहिरात देऊन बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता एकुण चार निविदा विकण्यात आलेल्या होत्या त्यापैकी केवळ तीन निविदा प्राप्त झाल्या असुन त्यांचा तुलनात्मक दर खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. आर. बी. मिर्झा | अंदाजपत्रकीय दराने |
| २. | श्री. नरेंद्र एस शेट्टी | २% कमी |
| ३. | मे. विपुल कंस्ट्रक्शन | ३% कमी |

तुलनात्मकदृष्टया पाहता सदर गुत्तेदार श्री. नरेंद्र एस. शेट्टी व मे. विपुल कंस्ट्रक्शन याचे दर ३% कमी हे सारखे असल्यामुळे संबंधित दोन्ही गुत्तेदारांना दर वाटाघाटी करीता पत्रक देऊन बोलावण्यात आले होते. मा.आयुक्त यांच्या दालाना वाटाघाटी झाली. मे. विपुल कंस्ट्रक्शन यांनी ३% कमी दरापेक्षा दर कमी केला नाही.

श्री. नरेंद्र शेट्टी यांनी ३.१५% कमी दराने काम करण्यास लेखी दिले होते. परंतु दर वाटाघाटीस ३.१५% कमी ऐवजी ४.००% कमी दराने काम करण्यास संमती दिली आहे. व मा. आयुक्त यांनी नेरंद्र एस. शेट्टी यांच्या ४.००% कमी दरास दिनांक ०७-०५-९२ ला मंजुरी दिलेली आहे.

करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, लक्ष्मी कॉलनी प्रज्ञानगर येथे १५० मी. मी. व्यासाची आर. सी. सी. ड्रेनेज लाईन टाकण्याच्या कामासाठी गुत्तेदारांशी झालेल्या वाटाघाटी नुसार उक्त काम श्री. नरेंद्र एस. शेट्टी यांचेकडून अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ४% कमी दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६०/२९ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी अभिप्राय दिला की, शहागंज मधील निजामोद्यीन दर्गा रोडवर २५० वॅट सोडीयम व्हेपर दिवे बसविण्याच्या कामाकरीता सार्वजनिक बांधकाम खात्याचा सन १९८९-९० च्या दरसुचीनुसार र. रु. ४९३८३/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील खर्च सन १९९०-९१ च्या शासकीय अनुदानातुन करण्यात येईल.

सदर कामाकरीता कार्यलयीन निविदा सुचना क्र. मनपा/अशआ/१२७/९२ दिनांक. २७-०३-९२ अन्वये दै. लोकमत टाईम्स दै. सिटीजन्स व दै. रहेजर ( उर्दु ) या वृत्तपत्रात निविदा सुचना प्रसिध्द करुन निविदा पत्रके मागविली असता निविदाकडे विक्रीच्या तारखेपर्यंत एकूण सात निविदा पत्रके विकल्या गेली व निविदा स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत यापैकी फक्त तीन निविदापत्रके दर भरुन प्राप्त झाली. प्राप्त निविदापत्रके दिनांक १०-०४-९२ रोजी उघडण्यात आली त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | मे. शांती इलेक्ट्रीकल्स | १६.००% जास्त |
| २. | मे. विपुल कंस्ट्रक्शन | १५.५% जास्त |
| ३. | मे. झवर इलेक्ट्रीकल्स | १५.००% जास्त |

उपरोक्त निविदापत्रकापैकी मे. झवर इलेक्ट्रीकल्स यांच्या निविदा पत्रकाचे दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १५.००% जास्त आहेत.

सदर कामाचे अंदाजपत्रक सन १९८९-९० च्या दरसुची नुसार तयार केले असल्यामुळे त्याची तुलना सन १९९१-९२ च्या दरसुची सोबत केली असता सन ९१-९२ च्या दरसुचीनुसार मे. झवर इलेक्ट्रीकल्स यांचे दर ४.६४% जास्त येतात. परंतु सदर दर जास्त वाटत असल्याने त्यांना कार्यालयीन पत्रक क्र. मनपा/अशअ/१८५/९२ दि. ०७-०५-९२ अन्वये सदर कामाच्या ठरावाबाबत वाटाघाटी स्तव बोलावले असता वाटाघाटी अंती ठरल्याप्रमाणे मे. झवर इलेक्ट्रीकल्स यांनी सदर काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा १५.००% जास्त ऐवजी १३.०० जास्त दराने करण्यात बाबतची लेखी संमती दर्शविली आहे. ठेकेदाराने दिलेले १३.००% जास्तीचे दर सन १९८९-९० च्या दरसुचीनुसार आहेत याची तुलना सन १९९१-९२ च्या दरसुची नुसार केली असता हे दर २.८२% जास्त असे येतात.

तरी मे. झवर इलेक्ट्रीकल्स यांनी दिलेले यांचे अंदाजपत्रकीय दरापेक्षा १३.००% जास्त असे दर विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

**श्री. गिरजाराम हाळनोर :** प्रस्तावित कामाप्रमाणेच पॉलीटेक्नीक फुलेनगर या रस्त्यावर ही सोडीयम दिवे लावण्याची व्यवस्था करण्यात यावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शहागंज येथील निजामोद्यीन दर्गा रोडवर २५० वॅट सोडीयम व्हेपर दिवे बसविण्याच्या कामासाठी गुत्तेदाराशी झालेल्या वाटाघाटीनुसार उक्त काम मे. झवर इलेक्ट्रीकल्स यांचेकडून अंदाजपत्रकाचे दरापेक्षा १३% जास्त दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६१/३० :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, ज्युब्लीपार्क येथील पंप हाऊस भोवती संरक्षित भिंत बांधावयाची आहे. सदर कामासाठी र. रु. १,१३,९००/- एवढयाचे अंदाजपत्रक परिसर अभियांत्रिकी सन ९०-९१ च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आले होते. त्यास स्थायी समिती चा ठराव क्र. १५४/८ दि. २५-०९-९१ अन्वये मंजुरी देण्यात आलेली आहे. त्याप्रमाणे सदर कामास या कार्यालयाची निविदा सुचना क्रमांक ९/९१-९२ अन्वये निविदा मागविण्यात आल्या होत्या. प्राप्त निविदामध्ये श्री. जाफर खान ठेकेदार यांचा सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा २६.८६% कमी दराची होती. सदर कामास स्थाीय समितीची बैठक दि. ०४-०२-९२ अन्वये श्री. जफरखान यांच्या निविदा स्विकृतीस मान्यता देण्यात आली. त्याप्रमाणे या विभागातर्फे संबंधित गुत्तेदारास २% अनामत रक्कम भरण्यास पत्र देण्यात आले होते. परंतु त्यांनी त्याची पुर्तता न केल्यामुळे पुढील कार्यालयीन संचिका सादर करण्यात आली असता मा. आयुक्त यांनी अंदाजपत्रक तयार करण्यात येवून निविदा मागविण्यात याव्यात असा अभिप्राय दिनांक ०७-०४-९२ रोजी दिला. त्या आदेशाप्रमाणे सुधारीत अंदाजपत्रक हे परिसर अभियांत्रिकी दरसुची सन १९९१-९२ नुसार र. रु. २,७३,१५०/- एवढयाचे तयार करण्यात आलेले आहे. त्यास मा. आयुक्त यांची मान्यता घेण्यात आलेली आहे.

करीता सदर कामाचे अंदाजपत्रक र. रु. २,७३,१५०/- यास मान्यतेस्तव प्रस्ताव सादर.

**संवाद :**

**श्री. अजिजुल्ला बेग, श्री. गिरजाराम हाळनोर :** बांधकामासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाकडील डी. एस. आर. चा उपयोग केला जातो. तेव्हा प्रस्तावित कामासाठी सार्वजनिक बांधकाम विभागचे डी. एस. आर. दराने अंदाजपत्रक तयार करावे. म्हणजे खर्चात किती फरक पडते ते कळले.

त्यानंतर या प्रस्तावावर विचार करण्यात यावा.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे डी. एस. आर. दराने अंदाजपत्रक तयार केल्यास खर्चाच्या रक्कमेत किती फरक पडतो याची माहिती दिल्यानंतर या प्रस्तावावर विचार करण्यात येईल. असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. ६२/३१ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, किलेआर्क येथील पंचकुआ कब्रस्थानाची संरक्षित भिंतीचे वाढ व दुरुस्ती करण्याच्या कामासाठी सन १९९१-९२ चे सा. बा. खात्याचे डी. एस. आर. दराने र. रु. ६०,२२७/- चे अंदाजपत्रकास दिञ २१-०२-९२ ला मा. आयुक्तांची मंजुरी प्राप्त झालेली आहे.

सदरचे काम हाती घेण्यासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र. मनपा/शअ/३८४/९२ दि. ३०-०३-९२ अन्वये बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता कोऱ्या निविदा फार्म विक्रीच्या तारखे पर्यंत एकूण तीन निविदा विक्री झाल्या पैकी तीनही दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या त्या खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. सय्यद खुर्रम | ३% जास्त |
| २. | श्री. सय्यद फेजल हक | २% जास्त |
| ३. | श्री. एस. ए. बहावुद्दीन | ०.१०% कमी |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.१०% कमी दराची श्री. एस. ए. बहावुद्यीन याची निविदा आहे. प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, किलेअर्क येथील कब्रस्थानाच्या भिंतीत वाढ करणे व दुरुस्ती करण्याच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.१०% कमी दराच्या श्री. एस. ए. बाहोद्यीन यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६३/३२ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर दिला की, पहाडसिंगपुरा येथील संभाजी लेआऊन अंतर्गत खडी रस्त्याचे काम करण्याच्या कामाकरीता सा. बा. खात्याच्या सन ९१-९२ च्या दरसुची नुसार र. रु. ६६,९००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरचा खर्च सन ९१-९२ च्या शासकीय अनुदानातुन करण्यात येईल.

सदर कामाकरीता कार्यलयीन निविदा सुचना क्र. मनपा/१८६/९२ दि. ११-०५-९२ अन्वये स्थानिक वृत्तपत्रात सुचना प्रसिध्द करुन निविदा पत्रके मागविली असता श्री. शेख शरीफ यांचे अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०५% कमी दराचे केवळ एकच दरपत्रक प्रापत झाले प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, पहाडसिंगपूरा संभाजी नगर ले आऊट अंतर्गत खडी रस्त्याचे काम करण्या करीता अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०५% कमी दराच्या श्री. शेख शरीफ यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६४/३३ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, शहानुरवाडी येथील भरत नगर अंतर्गत खडी रस्त्याचे काम करण्या करीता सा. बा. खात्याच्या सन ९१-९२ च्या दरसुचीनुसार र. रु. ९३,१००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरचा खर्च सन ९१-९२ च्या शासकीय अनुदानामधुन करण्यात येईल.

सदर कामाकरीता निविदा सुचना क्र. १८६ दि. ११-०५-९२ अन्वये स्थानिक वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द करुन निविदा मागविल्या असता एकूण तीन दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या त्या खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. रणबिरसिंग | ४.९०% जास्त |
| २. | श्री. सुखबीरसिंग | ०.०५% कमी |
| ३. | मे. पाल कन्स्ट्रक्शन | ५% जास्त |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०५% कमी दराची श्री. सुखबीरसिंग यांची निविदा आहे. प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शहानुरवाडी येथील भरत नगर अंतर्गत खडी रस्ते तयार करण्याच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०५% कमी दराच्या श्री. सुखबिरसिंग यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६५/३४ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी अभिप्राय दिला की, सिल्कमिल कॉलनी येथील नाल्यावर एच. पी. सब मर्सिबल फुलासाठी विंग वॉल व रिटेनिंग वॉलचे बांधकाम करणे करीत सा. बा. खात्याच्या सन ९१-९२ च्या दर सुचीनुसार र. रु. ८६,४००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरचा खर्च सन ९१-९२ च्या शासकीय अनुदानामधुन करण्यात येईल.

सदर कामाकरीता कार्यालयीन निविदा सुचना क्र. मनपा/अशअ/१८६/९२ दि. ११-०५-९२ अन्वये स्थानिक वृत्तपत्रात जाहीरात प्रसिध्द करुन निविदा मागविल्या असता एकूण तीन दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या त्या खालील प्रमाणे

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. अब्दुल करीम | १.५०% जास्त |
| २. | श्री. अशोक के साबळे | २.८५% जास्त |
| ३. | श्री. अब्दुल सलाम | अंदाजपत्रकीय दराने |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दराचे श्री. अब्दुल सलाम यांचे दरपत्रक आहे. प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सिल्कमिल येथील नाल्यावर एस. पी. सबमर्सिबल पुलासाठी विंग वॉल व रिटेनिंग वॉलचे बांधकाम करण्यासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दराच्या श्री. अब्दुल सलाम यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६६/३५ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, डक्कन प्लोअर मिल मागील ज्वालानगर मधील मनपाच्या खुल्या जागेस तार कुंपण करणे व गेट बसविण्याच्या कामासाठी अंदाजपत्रक र. रु. ४६,६५०/- च्या अंदाजपत्रकास मा. आयुक्तांनी मंजुरी दिली असुन सदर कामासाठी बी-१ नमुन्यात स्थानिक दै. तरुण भारत व लोकधर्म या वर्तमानपत्रात जाहीरात देवून निविदा मागविल्या असता एकूण तीन दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या त्या खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. अरुण विनोद अग्रवाल | ०.१५% कमी |
| २. | श्री. एस अे. वाहोद्दीन | १% जास्त |
| ३. | श्री. अब्दुल सलाम | २.१०% जास्त |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.१५% कमी दराची श्री. अरुण विनोद अग्रवाल यांची निविदा आहे. प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, डेक्कन प्लोअर मिलच्या मागील जालान नगरच्या मनपा खुल्या जागेस तार कुंपण व गेट बसविण्याच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १५% कमी दराच्या श्री. अरुण विनोद अग्रवाल यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६७/३६ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, आमखास मैदान येथील नियोजीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर रिर्सच केंद्राभोवती रिटेंनिग वॉल बांधण्याच्या कामासाठी अंदाजपत्रक र. रु. ४१,१४१/- ला मा. आयुक्तांनी मंजुरी दिलेली दिली असुन त्या कामासाठी निविदा सुचना बी-१ नमुन्यात सुचना क्र. २ द्वारे दै. मुकददस उर्दू स्वरगंगा, रहेबर इ. वर्तमानपत्रात देवून निविदा मागविल्या असता एकूण दोन दर निर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या. सदर खर्च शासकीय अनूदान २५ लाख डॉ. बाबासाहेब आंबेडकर या फांडातुन करण्यात येठल. निविदा खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | काझी असोदोद्दीन | ०.०१% कमी |
| २. | अब्दुल रशिद | ३% जास्त |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०१% कमी दराची श्री. काझी असोदीद्दीन यांची निविदा आहे. प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, आमखास मैदान येथील नियोजीत डॉ. बाबासाहेब आंबेडकर रिसर्च केंद्र भोवती रिटेनिंग वॉल बांधण्याच्या कामा करीता तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०१% कमी दराच्या श्री. काझी असोदोद्दीन यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६८/३७ :**

शहर अभियंता महानगरपालिका यांनी प्रस्ताव सादर केला की, मांडकी येथील ट्रेचिंग ग्राऊंड ची प्रत्यक्ष पाहणी केली असता ट्रेचिंग ग्राऊंड अंतर्गत खडी रस्ते् बऱ्याच ठिकाणी उखडलेले असुन रस्त्यात कचरा व माती साचलेली असते त्यामुळे अंतर्गत खडी रस्त्याचे नुतनीकरण करणे आवश्यक असल्यामुळे त्यासाठी १९९१-९२ चे दर सुचीप्रमाणे अंदाजपत्रक रु. ३,८४,०००/- तयार केलेले आहे.

करीता मांडकी येथील ट्रेचिंग ग्राऊंड अंतर्गत खडी रस्त्याचे नुतनीकरण करण्यासाठी केलेले अंदाजपत्रक रु. ३,८४,०००/- ला मंजुरीसाठी प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मांडकी ट्रेचिंग ग्राऊंड अंतर्गत खडी रस्त्याचे नुतनीकरण करणे कामासाठी र. रु. ३,८४,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ६९/३८ :**

शहर अभियंता महानगरपालिका, औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला की, मो. मसनतपुर येथील सार्वजनिक संडास दुरुस्त करण्याच्या कामा करीता अंदाजपत्रक र. रु. ४९,११६/- ला. मा. आयुक्त यांची मंजुरी दि. २०-०३-९२ रोजी मिळाल्या नंतर सदर कामाकरीता कार्यालयाची प्रकट निविदा सुचना दि. ३०-०३-९२ अन्वये निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत ( ०७-०४-९२) सकूण तीन कोऱ्या निविदा विकल्या गेल्या व निविदा स्विकारण्याच्या नियोजीत तारीख (०९-०४-९२) रोजी एकूण दोन निविदा पुढील प्रमाणे प्राप्त झाल्या.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. वसंत नरवडे | २.५७% अ. प. दरापेक्षा जास्त |
| २. | श्री. सी. एस शहा | ०.१०% अ. प. दरापेक्षा कमी |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.१०% कमी दराची निविदा श्री. सी. एस. शहा यांची निविदा आहे.

करीता श्री. सी. एल. शहा यांनी अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.१०% कमी दराची असलेली निविदा स्विकारण्याचा प्रस्ताव मंजुरी करीता सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मसनतपुर येथील सार्वजनिक संडास दुरुस्ती करण्याच्या कामाकरीता तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.१०% कमी दराच्या श्री. सी. एस. शहा यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७०/३९ :**

मा. शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, रेल्वे स्टेशन येथील गेस्ट हाऊस जवळील अस्तित्वात असलेल्या मनपा कर्मचारी निवास स्थानाचा विस्तार करण्याच्या कामासाठी स्थायी समिती १६-०९-९१ ठराव क्र. (११) अन्वये २,९८,०००/- चे अंदाजपत्रकास मान्यता प्राप्त झालेला आहे.

सदरचे काम हाती घेण्यासाठी स्थायी समिती ठराव क्र. ११६ व ११८ दुरुस्तीसह दि. ३०-०८-९१ ला मान्यता प्राप्त झालेली आहे.

परंतु सदरच्या कामामध्ये मोझक टाईल्स, प्लोरींग व अे. सी. शिट ऐवजी स्लॅब टाकण्याच्या कामासाठी मा. आयुक्तांनी वाढीव अंदाजपत्रक र. रु. ५६,१५८/- ( एक्स्ट्रा आयटम) मंजुरी दिलेली आहे.

सबब सदर कामाचे सुधारीत अंदाजपत्रक र. रु. २७८३११+५६१५८=३,३४,४६९ ( तिन लाख चौतिस हजार चारशे एकूण सत्तर) चा प्रस्ताव मंजुरीस्तव व सदरचे काम करुन घेण्यासाठी सध्या काम करीत असलेले गुत्तेदार श्री. अब्दुल सलाम यांचे कडून स्थायी मंजुर दर अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ०.१५% कमी दराने करुन घेण्याचा प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, रेल्वे स्टेशन येथील मनप विश्राम गृहातील कर्मचारी निवांसाचा विस्तार करण्याच्या कामामध्ये मोझेक टाईल्स, प्लोअरींग व ए. सी. सिट ऐवजी स्लॅप टाकण्याच्या कामाची वाढ झाल्यामुळे तयार करण्यात आलेल्या (२७८३११ अधिक ५६,१५८ ) र. रु. ३,३४,४६९/- च्या सुधारीत अंदाजपत्रकास आणि सदरचे काम वाढील काम सध्या काम करीत असलेले गुत्तेदार श्री. अब्दुल सलाम यांचे कडून स्थायी समितीचे मंजुर दराप्रमाणे म्हणजेच अंदाजपत्रकाच्या दरापेक्षा ०.६५% कमी दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७१/४० :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, वार्ड क्र. दलालवाडी, फकीरवाडी येथे नाला ट्रेनिंग करणे बाबत अंदाजपत्रक र. रु. ९,३७,२००/- चे सन १९९०-९१ च्या दरसुचीप्रमाणे तयार करण्यात आलेले असुन, सदरचा खर्च सन १९९०-९१ शासकीय अनुदानातील नाला ट्रेनिंग अंतर्गत झालेल्या बचतीतुन करण्यात येईल. तसेच मा. आयुक्त यांनी सदरील अंदाजपत्रकास मंजुरी दिलेली आहे.

आदेशानुसार सदर कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र. १/५३०/९२ दि. ०१-०४-९२ ला दैनिक नवा मराठा व औरंगाबाद टाईम्स या स्थानिक वर्तमान पत्रात जाहीरात देवून बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता एकूण चार निविदा विकण्यात आलेल्या होत्या सदर फक्त तीन निविदा प्राप्त झालेल्या असून, त्यांचा तुलनात्मक दर खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | मे. रामेश्वर कंस्ट्रक्शन | ०.१०% कमी |
| २. | मे. विशाल कंस्ट्रक्शन | १०% जास्त |
| ३. | मे. पॉल कंस्ट्रक्शन | ६% जास्त |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.१०% कमी दराचे मे. रामेश्वर कंस्ट्रक्शन यांचे दरपत्रक आहे. करीता, प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, दलालवाडी, फकीरवाडी येथे नाला ट्रेडिंगचे काम करण्याकरीता तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.१०% कमी दराच्या मे. रामेश्वर कंन्स्ट्रक्शन यांचे दरापत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७२/४१ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी अभिप्राय दिला की, शहरातील विविध चौकात चार नग फिटींग २५० वॅट सोडीयम व्हेपरचे दिवे बसविण्याच्या कामाकरीता सन ९१-९२ च्या सार्वजनिक बांधकाम खात्याच्या दरसुची नुसार र. रु. ६,७२,११६/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.

सदरचा खर्च सन १९९१-९२ च्या शासकीय अनूदानातून करण्यात येईल.

सदर कामाकरीता निविदा सूचना मनपा १२७/९२ दि. २७-०३-९२ अन्वये दै. लोकमत टाईम्स, दैनिक सिटीजन्स व रहेबर (उर्दु) या वृत्तपत्रात निविदा प्रसिध्दीची जाहीरात प्रसिध्द करुन निविदा पत्रके मागविली असता निविदा पत्रके विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण पांच निविदा पत्रके विकली गेली व निविदा पत्रके स्विकृतीच्या अंतिम तारखे पर्यंत सदर पाचही निविदापत्रके दर भरुन प्राप्त झाली. प्राप्त निविदा पत्रके दि. १०-०४-९२ रोजी उघडण्यात आली त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | मे. हिंद इलेक्ट्रीकल्स | ४.८०% जास्त |
| २. | मे. आदित्य इलेक्ट्रीकल्स | ५.००% जास्त |
| ३. | मे. लुना इलेक्ट्रीकल्स | ५.००% जास्त |
| ४. | मे. शांती इलेक्ट्रीकल्स | ५.६% जास्त |
| ५. | मे. कॅवको इलेक्ट्रीकल्स | ४.९५% जास्त |

मे. हिदं इलेक्ट्रीक यांच्या निवदा पत्रकाचे दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.८०% जास्त आहेत. सदर दर जास्त वाटत असल्याने मे. हिंद इलेक्ट्रीक यांना पत्रक क्र. मनपा/अशअ/१८४/९२ अन्वये सदर कामाचे दरा बाबत वाटाघाटी करण्यासाठी बोलावले असता वाटाघाटी अंती ठरल्याप्रमाणे मे. हिंद इलेक्ट्रीक कं. यांना लेखी पत्रक देवून सदर काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.८०% जास्त ऐवजी ४.५०% जास्त दराने करण्याची तयारी दर्शविली आहे.

तरी मे. हिंद इलेक्ट्रीक कं. यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.५०% जास्त दराचे निविदा पत्रक स्विकारण्याचा प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

**श्री. गिरजाराम हाळनोर, श्री. अजिजुल्ला बेग, श्री. जयवंत ओक, श्री. मधुकर शिंदे :** प्रस्तावात निर्देश केल्याप्रमाणे, बुऱ्हाणी कॉलनी खडकेश्वर, भिमपुरा - चौराहा आणि शास्त्री चौक या चौकातील सोडीयम व्हेपरचे दिवे बसविण्यात यावे.

**मा. सभापती** : स. सभासदांच्या सुचने प्रमाणे सोडीयम व्हेपरचे दिवे बसविण्याची व्यवस्था करावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शहरातील विविध चौकात ४ नग फिटॉग सोडीयम व्हेपरचे दिवे बसविण्याच्या कामा करीता गुत्तेदाराशी झालेल्या वाटाघाटी नुसार उक्त काम मे. हिंद इलेक्ट्रीकल्स कंपनी यांचे कडून अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ४.५०% जास्त दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७३/४२ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, सन १९९२-९३ हया आर्थिक वर्षासाठी इंडिया मार्क हॅन्ड पंप स्पेअफट पार्टस च्या खरेदीसाठी वार्षीक करार करण्यासाठी दैनिक मराठवाडा व सकाह या वर्तमानपत्रात निविदा सुचना देण्यात आली व अधिकृत विक्रेत्याकडून निविदा मागविण्यात आली व एकच निविदा विकल्या गेली व निविदा पत्रक स्विकारण्याच्या शेवटच्या दिवशी म्हणजे दि. १३-०४-९२ रोजी दुपारी २.०० वाजे पर्यंत एक निविदा वसुल झाली व आलेले दर खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | मे. नित्यानंद इंजिनियरींग कार्पोरेशन औरंगाबाद | प्राईज लिस्ट २५% जास्त |

मे. नित्यानंद इंजिनिअरींग कार्पोरेश औरंगाबाद हे अधिकृत दिलेले आहे. तरी त्यांनी दिलेले दर प्राईज लिस्ट २५% हे दर मंजुरीस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सन १९९२-९३ या आर्थिक वर्षात लागणरे इंडिया मार्कचे हॅन्ड पंप स्पेअर पार्ट मे. नित्यानंद इजिनिअरींग कार्पोरेशन औरंगाबाद ( अधिकृत विक्रेते ) यांचे कडून त्यांनी दिलेले दर प्राईज लिस्ट अधिक २५% या दराने खरेदी करण्यास वार्षिक करार करण्याकरीता सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७४/४३ :**

मा. अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, सन ९२-९३ या आर्थिक वर्षासाठी " डयुटॉन / दुल्लॉन कंपनीचे लेज पाईप " खरेदी करण्यासाठी वार्षिक करार करण्याकरीता दैनिक मराठवाडा व सकाळ या वर्तमानपत्रात निविदा सुचना देण्यात आली व निविदा मागविण्यात आल्या. निविदा विक्रीच्या शेवटचा तारखेपर्यंत एकूण एक

निविदा विकण्यात आली व निविदा स्विकारण्याच्या शेवटच्या दिवशी म्हणजे दि. १३-०४-९२ रोजी दुपारी २.०० वाजे पर्यंत एकच निविदा प्राप्त झाली. आलेले दर खालील प्रमाणे आहेत.

मे. नित्यानंद इंजिनिअरींग कॉर्पोरेशन प्राईज लिस्ट २५% मे. नित्यानंद इंजिनिअरींग कार्पोरेशन औरंगाबाद यांनी दिलेले दर प्राईज लिस्ट २५% हे दर मंजुरीस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सन १९९२-९३ या आर्थिक वर्षत मे. नित्यानंद कार्पोरेशन औ. बाद यांचे कडून प्राईज लिस्ट अधिक २५% या दराने डयुटॉन / डुप्लान कंपनीचे होज पाईप वार्षिक करारांवर खरेदी करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७५/४४ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, किलेअर्क येथे खडी रस्ता तयार करणे बाबतच्या कामासाठी सन ९१-९२ च्या सार्वनिक बांधकाम खात्याच्या डी. एस. आर. दराप्रमाणे अंदाजपत्रक र. रु. २८,३६०/- ला मा. आयुक्त यांनी दि. २७-०२-९२ रोजी मान्यता दिली आहे.

सदरील कामासाठी नोटीस क्र. ७/जा. क्र./मनपा/जावि १/८११/९२ दि. २१-०३-९२ नुसार निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या वेळे पर्यंत एकूण तीन निविदा विक्री झाल्या त्यापैकी तीन निविदा दर भरुन प्राप्त झाल्या त्या दि. ३०-०३-९२ रोजी उपस्थित असलेल्या ठेकेदारा समक्ष उघडण्यात आल्या त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. मोहमद अझरोद्यीन | ४% जास्त |
| २. | श्री. सय्यद सिराजउद्यीन | ५% जास्त |
| ३. | श्री. सय्यद रफिकोउद्यीन | अंदाजपत्रकीय दराप्रमाणे |

तुलात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजे अंदाजपत्रकाच्या दरापेक्षा अंदाजपत्रकाच्या दराप्रमाणे सय्यद रफिकोउद्यीन यांचे दरपत्रक आहे. विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, किलेअर्क येथे खडी रस्ता तयार करण्याच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजेच अंदाजपत्रकीय दराच्या श्री. सय्यद रफियोद्यीन यांचे दर पत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७६/४५ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, सन ९२-९३ हया आर्थिक वर्षासाठी मायक्रो कंपनीचे वॉशपंप इत्यादी स्पेअर पार्टसह रिपेअर करण्याच्या कामासाठी वार्षीक करार करण्यासाठी दैनिक मराठवाडा व सकाळ या वर्तमान पत्रात निविदा सुचना देण्यात आली व कंपनीच्या अधिकृत विक्रेत्याकडून निविदा मागविण्यात आल्या एकूण १ निविदा पत्रक विकल्या गेली व निविदा स्विकारण्याच्या शेवटच्या दिवशी म्हणजे दि. १३-०४-९२ रोजी दुपारी २.०० वाजेपर्यंत तिच १ निविदा प्राप्त झाली त्याचे दर खालील प्रमाणे आहेत.

१. मे. पॅरामांऊट एजन्सीज प्रा. के. औरंगाबाद प्राईजलिस्ट ४%

मे. पॅरामाऊंट एजन्सीज प्रा. लि. औरंगाबाद हे मायक्रो कंपनीचे अधिकृत विक्रेते आहेत. तरी प्राईज लिस्ट १५% प्रमाणे त्यांनी दिलेले दर मंजुरीस्तव प्रस्ताव सादर.०

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सन १९९२-९३ या आर्थिक वर्षात मे. पॅरामाऊंट एजन्सी प्रा. लिमिटेड औरंगाबाद ( अधिकृत विक्रेते ) यांचे कडून प्राईज लिस्ट अधिक १५% या दराने मायको कंपनीचे बॉश पंप इत्यादी स्पेअर पार्टसह रिपेअर करण्याच्या कामासाठी वार्षीक करार करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७७/४६ :**

अतिरिक्त शहर अभियंत यांनी प्रस्ताव सादर केला की, सन ९२-९३ हया आर्थिक वर्षासाठी इलेक्ट्रीक मोटार रिवाडयंडींगच्या कामासाठी तसेच वाठडींग झाल्यानंतर साईटवर मोटार बसवून टेस्ट, ट्रायल देण्याच्या कामासाठी वार्षीक करार करण्याकरीता दैनिक मराठवाडा व दै. सकाळ या वर्तमानपत्रात निविदा सुचना देण्यात आली व निविदा मागविण्यात आल्या एकूण २ निविदा विक्री झाल्या व निविदा पत्रके स्विकारण्याच्या शेवटच्या दिवशी म्हणजे दि. १३-०४-९२ रोजी दुपारी २.०० वाजेपर्यंत दोन्ही निविदा प्राप्त झाल्या दोन्ही एजन्सीच्या दरांची तुलना केली असता दोन्ही एजंसीचे कमी दर खालील प्रमाणे आहेत.

| **मे. काकडे इलेक्ट्रीकल्स मोटरीची अश्वशक्ती** | | **मे. लुना इलेक्ट्रीकल्स औरंगाबाद मोटारीची अश्वशक्ती** | |
|---|---|---|---|
| **अश्वशक्ती** | **दर** | **अश्वशक्ती** | **दर** |
| १. | ५८०.०० | ७.५ | १५४०.०० |
| २ | ८४५.०० | १० | १७००.०० |
| ३ | ९७५.०० | २५ | ३०७५.०० |
| ४ | १२००.०० | ४० | ५६२५.०० |
| १५ | २३५०.०० | ४५ | ६३५५.०० |
| ३० | ३५५०.०० | ७५ | १०८००.०० |
| ३५ | ४१५०.०० | १२० | १६३००.०० |
| ५० | ७०००.०० | १३५ | २२०००.०० |
| ६० | ८५००.०० | २५० | २३५००.०० |
| ( स्पिरींग ) | | | |
| ६० | ९०५०.०० | | |
| व्हि टी पुप | | | |
| १०० | १५०५०.०० | | |
| **सबमर्सिबल पंपच्या मोटारी** | | | |
| ३ | ४३५०.०० | १४ | ६८५०.०० |
| ५ | ४६१०.०० | | |
| ६ | ४८६०.०० | | |
| ८ | ५४६०.०० | | |

तरी वरील प्रमाणे ज्या ज्या एजंसीचे ज्या ज्या अश्वशक्तीच्या मोटारीसाठी आलेले दर मंजुरीस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सन १९९२-९३ या आर्थिक वर्षात खालील दर्शविलेल्या एजन्सीकडून विविध आकारमानाच्या मोटारी समोर दर्शविलेल्या दराने इलेक्ट्रीक मोटार रिवांइडींग तसेच वॉडींग झाल्यानंतर साईटवर मोटार बसवून टेस्ट आणि ट्रायल देण्याच्या कामासाठी वार्षीक करार करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

| **मे. काकडे इलेक्ट्रीकल्स मोटरीची अश्वशक्ती** | | **मे. लुना इलेक्ट्रीकल्स औरंगाबाद मोटारीची अश्वशक्ती** | |
|---|---|---|---|
| **अश्वशक्ती** | **दर** | **अश्वशक्ती** | **दर** |
| १. | ५८०.०० | ७.५ | १५४०.०० |
| २ | ८४५.०० | १० | १७००.०० |
| ३ | ९७५.०० | २५ | ३०७५.०० |
| ४ | १२००.०० | ४० | ५६२५.०० |
| १५ | २३५०.०० | ४५ | ६३५५.०० |
| ३० | ३५५०.०० | ७५ | १०८००.०० |
| ३५ | ४१५०.०० | १२० | १६३००.०० |
| ५० | ७०००.०० | १३५ | २२०००.०० |
| ६० | ८५००.०० | २५० | २३५००.०० |
| ( स्पिरींग ) | | | |
| ६० | ९०५०.०० | | |
| व्हि टी पुप | | | |
| १०० | १५०५०.०० | | |
| **सबमर्सिबल पंपच्या मोटारी** | | | |
| ३ | ४३५०.०० | १४ | ६८५०.०० |
| ५ | ४६१०.०० | | |
| ६ | ४८६०.०० | | |
| ८ | ५४६०.०० | | |

**विषय क्र. ७८/४७ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, सन ९२-९३ या आर्थिक वर्षासाठी महिन्द्रा कंपनीच्या जिप साठी लागणाऱ्या स्पेअर पार्टस च्या खरेदीसाठी वार्षीक करार करण्यासाठी दैनिक मराठवाडा व सकाळ या वर्तमानपत्रात निविदा सुचना देण्यात आली व महिन्द्रा कंपनीच्या अधिकृत विक्रेत्याकडुन निविदा मागविण्यात आल्या. एकूण १८ निविदा विकल्या गेली व निविदा स्विकारण्याच्या शेवटच्या दिवशी म्हणजे दि. १३-०४-९२ रोजी दुपारी २.०० वाजेपर्यंत एक निविदा पत्रक प्राप्त झाले व आलेले दर खालील प्रमाणे आहे.

१. मे. रत्नप्रभा मोटार्स, औ. बाद. प्राईजलिस्ट २०%

मे. रत्नप्रभा मोटर्स औरंगाबाद हे महेंद्रा कंपनीचे अधिकृत विक्रेते आहेत. तरी प्राईज लिस्ट २०% हे त्यांनी दिलेले दर मंजुरीस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सन १९९२-९३ च्या आर्थिक वर्षात महेंद्रा कंपनीचे अधिकृत विक्रेते मे. रत्नप्रभा मोटार्स औरंगाबाद यांचेकडून प्राईज लिस्ट २०% या दराने महेंद्रा कंपनीच्या जिपसाठी लागणारे स्पेअर स्पार्टच्या खरेदीसाठी वार्षीक करार करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ७९/४८ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, सन ९२-९३ हया आर्थिक वर्षासाठी टाटा कंपनीच्या सर्व प्रकारच्या वाहनांचे स्पेअर स्वार्टस खरेदी करण्यासाठी दैनिक मराठवाडा व सकाळ या वर्तमानपत्रात निविदा सुचना देण्यात आली व कंपनीच्या अधिकृत विक्रेत्या कडून निविदा मागविण्यात आल्या एकूण १ निविदा विकल्या गेली व निविदा स्विकारण्याच्या शेवटच्या दिवशी म्हणजे दि. १३-०४-९२ रोजी दुपारी २.०० वाजेपर्यंत एक निविदा प्राप्त झाली व आलेले दर खालील प्रमाणे आहेत.

१. सतिश मोटार्स प्रा. लि. औरंगाबाद प्राईजलिस्ट २१%

मे. सतिश मोटार्स प्रा. लि. औरंगाबाद हे कंपनीचे अधिकृत विक्रेते आहेत. तरी प्राईजलिस्ट २१% हे त्यांनी दिलेले दर मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सन १९९२-८३ या आर्थिक वर्षात मे. सतिश मोटर्स प्रा. लि. औरंगाबाद अधिकृत विक्रेते यांचे कडून प्राईज लिस्ट २१% या दराने टाटा कंपीनच्या सर्व प्रकारच्या वाहनांचे स्पेअर पार्ट खरेदी करण्यासाठी सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ८०/४९ :**

मा. अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, सन १९९२-९३ या आर्थिक वर्षासाठी ॲटो इलेक्ट्रीक जॉबवर्क स्पेअर पार्टससह करण्याच्या कामासाठी वार्षीक करार करण्यासाठी दैनिक मराठवाडा व सकाळ या वर्तमान पत्रात निविदा सुचना देण्यात आली व लुकास कंपनीच्या अधिकृत विक्रेत्याकडून व सर्व्हिर्स डिलर कडून निविदा मागविण्यात आल्या एकूण एक निविदा पत्रक विकल्या गेलो व निविदा स्विकारण्याच्या शेवटच्या दिवशी दुपारी २.०० वाजता पर्यंत एक निविदा वसुल झाली व आलेले दर खालील प्रमाणे आहे.

मे चाणक्य ॲटो इलेक्ट्रीकल्स ॲन्ड डिजेल सर्व्हिसेस औरंगाबाद

अ) जॉब वर्क्स अंदाजपत्रकीय दराप्रमाणे

ब) लुकास टी व्ही एस कंपनीचे पार्टस मॅक्झीमम रिटेल प्राईज लिस्ट प्रमाणे

क) लुकास व्यतिरिक्त येणारे पार्टस जसे बल्ब, लॅम्प, डॅश बोर्डे इन्स्ट्रमेंटस फिस पार्ट प्राईज लिस्ट २०% प्रमाणे

मे. चाणक्य ॲटो इलेक्ट्रीकल्स ॲड डिझेल सर्व्हिसेस, औरंगाबाद हे टी. व्ही. एस. लुकास कंपनीचे अधिकृत विक्रेते आहेत. तरी अ, ब, ड, प्रमाणे त्यांनी दिलेले दर मंजुरीस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सन १९९२-९३ चा आर्थिक वर्षात टी. व्ही. एस. लुकास कंपनीचे अधिकृत विक्रेते मे. चाणक्य ॲटो इलेक्ट्रीकल्स ॲड डिझेल सर्व्हिससे औरंगाबाद

यांचे कडून प्रस्तावातील अ, ब, क, मध्ये दर्शविलेल्या दराने ॲटो इलेक्ट्रीकल्स स्पेअर पार्टसह जॉब वर्क करण्याच्या सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ८१/५० :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, सन ९२-९३ हया आर्थिक वर्षासाठी ॲम्बेसॅडर कारचे जॉब वर्क करुन घेण्यासाठी वार्षीक करार करण्यासाठी दै. मराठवाडा व सकाळ या वर्तमानपत्रातुन निविदा सुचना देण्यात आली व कार रिपेअर करणाऱ्या अनुभवी गॅरेज वाल्यांकडून निविदा मागविण्यात आल्या असता एकूण तीन दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या. त्या खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १. | मे. फेमस गॅरेज औ.बाद | जॉबवर्क लिस्ट रेट २०% |
| २. | मे. लेटेस्ट गॅरेज औ. बाद | जॉबवर्क लिस्ट रेट २५% |
| ३. | मे. कैलास एजन्सीज प्रा. लि. औ. बाद | जॉबवर्क लिस्ट रेट १२% |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २८% कमी हे दर मंजुरीस्तव प्रस्ताव सादर.

**संवाद :**

**श्री. अजिजुल्ला बेग :** ॲम्बोसिडर कारच जॉबवर्कवर होणारा खर्च आणि लागणार वेळ या बाबींचा विचार करता पेट्रोल मेकॅनिकची नेमणुक केल्यास हा खर्च कमी होईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सन १९९२-९३ या आर्थिक वर्षात मे. फेमस गॅरेज औरंगाबाद यांचेकडून जॉबर्क लिस्ट रेट २८% या दराने ॲम्बोसिडर कारचे जॉबवर्क करुन घेण्यासाठी वार्षीक करार करण्यात सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ८२/५१ :**

मा. अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, सन ९२-९३ या आर्थिक वर्षासाठी बॅटरी खरेदीसाठी वार्षीक करार करण्यासाठी हे मराठवाडा व सकाळ या वर्तमानपत्रात निविदा सुचना देवून व एक्साईड व ॲमको या कंपनीच्या अधिकृत विक्रेत्याकडुन निविदा मागविण्यात आल्या असता एकुण फक्त एकच निविदा मे. ओमेगा इंजिनियरींग सर्व्हीसेस औरंगाबाद यांची प्राप्त झाली ती खालील प्रमाणे.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १ | १२ व्ही | ९ प्लेट | रु २,४३९/- | १८०/- |
| २ | १२ व्ही | ११ प्लेट | रु. २,७८८/- | २१०/- |
| ३ | १२ व्ही | १३ प्लेट | रु. ३,२०५/- | २६०/- |
| ४ | १२ व्ही | १५ प्लेट | रु. ३,२४८/- | २६०/- |
| ५ | १२ व्ही | १७ प्लेट | रु. ४,२१८/- | ३६९/- |
| ६ | १२ व्ही | १९ प्लेट | रु. ४,६३०/- | ३६९/- |
| ७ | १२ व्ही | २१ प्लेट | रु. ५,१७४/- | ४३७/- |
| ८ | १२ व्ही | २५ प्लेट | रु. ५,७०९/- | ५५१/- |

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सन १९९२-९३ या आर्थिक वर्षात मे. ओमेशा कंपनीचे अधिकृत विक्रेते मे. ओमेगा कंपनीचे अधिकृत विक्रेते मे. ओमेगा इंजिनिअरींग सर्व्हिसेस औरंगाबाद यांचेकडुन प्रस्तावातील अनु. क्र. १ ते ८ करीता त्या समोर दर्शविलेल्या दराने बॅटरी खरेदीचा वार्षीक करार करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ८३/५२ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, सन ९२-९३ या आर्थिक वर्षासाठी ॲम्बॅसिडर कारचे स्पेअर पार्टस खरेदी करण्याच्या कामासाठी वार्षीक करार करण्यासाठी दै. मराठवाडा व सकाळ या वर्तमानपत्रात निविदा सुचना प्रसिध्द करुन कंपनीच्या अधिकृत विक्रेत्याकडून निविदा मागविल्या असता एकूण दोन दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या त्या खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १. | कैलास एजन्सीज प्रा. लि. औबाद | कमडयुटी प्राईज लिस्ट १३% |
| २. | वर्धमान मोटर्स औ. बाद | मॅक्झीमम रिटेल प्राईज लिस्ट १७% |

तुलनात्मकदृष्टया वर्धमान मोटर्स, औरंगाबाद यांचे दर कमी दराचे आहे. प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सन १९९२-९३ या आर्थिक वर्षाने मे. वर्धमान मोटर्स औरंगाबाद यांचेकडून मॅग्झीमम रिटेल प्राईज व लिस्ट वजा १७% दराने ॲम्बेसिडर कारचे स्पेअर पार्टस खरेदी करण्याबाबत वार्षीक करार करण्याकरीता सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ८४/५३ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, महानगरपालिकेच्या नविन इमारतीमध्ये २ पानबुडे पंप पॅनॉल बोर्ड व ॲक्सेसरीज पाईप इ. सह बसवून मुख्य इमारतीमधील ओव्हरहेड टॅंकमध्ये पाणी चढविण्याच्या कामासाठी वर्तमानपत्रात निविदा सुचना दिली असता एकूण दोन दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाला त्या खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १. | मे. झंवर इलेक्ट्रीकल्स | अंदाजपत्रकीय दर ५% |
| २. | मे. इगल इलेक्ट्रीकल्स | अंदाजपत्रकीय दर ०.५% |

हयांचे दर कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.५% कमी दराचे आहेत. प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महनगरपालिकेच्या नविन इमारतीमध्ये पॅनाल बोर्ड ॲक्सेसरीज पाईप इत्यादीसह दोन पानबुडे पंप बसवून ओव्हरहेड टॅंकमध्ये पाणी चढविण्याच्या कामासाठी अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.५% कमी दराच्या मे इगल इलेक्ट्रीकल्स औरंगाबाद यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ८५/५४ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी अभिप्राय दिला की, महानगरपालिका प्रशासकीय इमारतीचे विद्युतीकरण करण्याच्या कामासाठी सा. बा. खात्याच्या सन ९१-९२ च्या

दरसुचीनुसार र. रु. ३,५३,७००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरचा खर्च भांडवली इमारती या सदरातुन करण्यात येईल.

सदर कामाकरीता निविदा सुचना क्र. मनपा/अशअ/१०५/९२ दि. ११-०३-९२ अन्वये दै. लोकमत टाईम्स व सिटीजन्स या वृत्तपत्रात जाहीरात प्रसिध्द करुन निविदा मागविल्या असता एकूण चार दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या त्या खालील प्रमाणे

| | | |
|---|---|---|
| १. | मे. लुना इलेक्ट्रीकल्स | ६.७०% कमी |
| २. | मे. प्रगन इलेक्ट्रीकल्स | ५.१०% कमी |
| ३. | मे. शांती इलेक्ट्रीकल्स | ८.८९% कमी |
| ४. | मे. आदित्य इलेक्ट्रीकल्स | ९.१०% कमी |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ९.१०% कमी दराचे मे. आदित्य इलेक्ट्रीकल्स यांच्या निविदेचे दर आहे. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिका प्रशासकीय इमारतीचे विद्युतीकरण्याच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ९.१०% कमी दराच्या मे. आदित्य इलेक्ट्रीकल्स यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ८६/५५ :**

वार्ड क्र. ५१ मो. पद्मपुरा येथे २५० मी. मी. व्यासाची आर. सी. सी. ड्रेनेज लाईन टाकणे बाबत अंदाजपत्रक र. रु. ७२,५००/- चे सन १९९०-९१ च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आले असुन, सदर काम प्राप्त सरकारी अनुदान सन ९०-९१ च्या अनुदानातून करणेस्तव मा. आयुक्तांनी मंजुरी दिली आहे.

आदेशावरील सदर कामाकरीता कार्यालयीन निविदा बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २१.२% कमी दराची श्री. सुरेश बी. सदवानी हयांची निविदा होती. दरपत्रक खुपच कमी असल्याने दि. १०-०३-९२ रोजीच्या स्थायी समितीमध्ये कामाचे पुननिविदा मागविण्यात मान्यता देण्यात आली.

त्यानुसार सदर कामाकरीता निविदा सुचना क्र. १६ दि. १३-०३-९२ अन्वये दै. लोकधर्म व तरुण भारत मध्ये जाहीरात देवून बी-१ नमुन्यात दुसरी वेळ निविदा मागविल्या असता एकूण तीन दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या. त्या खालील प्रमाणे

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. एस. आर. भारीया | ३.६९% जास्त |
| २. | मे. रामेश्वरी कन्स्ट्रक्शन | २% जास्त |
| ३. | श्री. नरेंद्र एस शेट्टी | ०.१% कमी |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.१% कमी दराचे श्री. नेरंद्र एस. शेट्टी याचे दरपत्रक आहे. प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र. ५१ पद्मपुरा येथे २५० मी. मी. व्यासाची आर. सी. सी. ड्रेनेज लाईन टाकण्याच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.१% कमी दराच्या श्री. नरेंद्र एस. शेट्टी यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ८७/५६ :**

वार्ड क्र. ४३ मोतीमहल हॉटेल ते विष्णुनगर पर्यंत ३०० मी. मी. व्यासाची आर. सी. सी. ड्रेनज लाईन टाकणेबाबत अंदाजपत्रक र. रु. २,५५,७१०/- चे सन ९१-९२ च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आले असुन, सदर अंदाजपत्रकास मा. आयुक्तांनी मंजुरी दिलेली आहे. प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र. ४९ मोतीमहल हॉटेल ते विष्णुनगर पर्यंत ३०० मी. मी. व्यासाची आर. सी. सी. ड्रेनेज लाईन टाकण्याच्या कामाकरीता र. रु. २,५५,७१४/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ८८/५७ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, वार्ड क्र. १५ काचीवाडा येथे २५० मी. मी. ३०० मी. मी. व्यासाची आर. सी. सी. ड्रेनेज लाईन टाकणेबाबत अंदाजपत्रक र. रु. २,५६,५००/- चे सन ९१-९२ च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आले असुन, सदर अंदाजपत्रकास मा. आयुक्तांनी मंजुरी दिलेली आहे. सदरचा खर्च सन ९२-९३ या वर्षाच्या भांडवली तरतुदीतून करण्यात येईल. प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र. १५ काचीवाडा येथे २५० व ३०० मी. मी. व्यासाची आर. सी. सी. ड्रेनेज लाईन टाकण्याच्या कामासाठी र. रु. २,५६,५००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ८९/५८ :**

विषय क्र. १८ स्थायी समिती बैठक दि. २९-०४-९२ च्या अनुषंगाने बैठकीत ठरल्याप्रमाणे फर्निचर साहित्य तुर्त खालील प्रमाणे खरेदी करणे योग्य होईल.

| अ. क्र. | साहित्याचे नांव | दर | संख्या | र.रु. | पुरवठा धारकाचे नाव |
|---|---|---|---|---|---|
| १ | " एस " टाईप चेअर | ६००.०० | १०० नग | ६०,०००/- | मे. बजाज फर्निचर |
| २ | ऑफीस टेबल | २५००.०० | १० नग | २५,०००/- | मे. एस. एन. प्रोडक्टस |
| ३ | रिव्हॉलविंग चेअर | १०५०.०० | ५ नग | ५,२५०/- | मे. एस. एन. प्रोडक्टस |
| ४ | फायबर चेअर २ सिटा | ८६४.०० | १० नग | ८,६४०/- | मे. मेघदुत एजन्सीज |
| ५ | फायबर चेअर ३ सिटा | ११५९.०० | ६ नग | ६,९५४/- | मे. मेघदुत एजन्सीज |

वरील प्रमाणे साहित्य खरेदीस एकूण खर्च रुपये १,०५,८४४/- एवढा खर्च येईल व बाकीचे निविदा धारकांनी भरलेली अनामत रक्कम परत करणे योग्य होईल. करीता प्रस्ताव पुन्हा विचाराधीन सादर.

**विषय क्र. ९०/५९ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो. हर्षनगर स्लम येथे प्राथमिक आरोग्य केंद्र बांधण्याच्या कामासाठी र. रु. १,७६,७५१/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समिती ठराव क्र. ९ दि. २७-०३-९२ अन्वये मंजुरी प्राप्त झाल्यानुसार सदरचे काम हाती घेण्याकरीता कार्यालयाने निविदा सुचना क्र. २ (९२-९३) अन्वये बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता एकूण चार दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या. त्या खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १. | सय्यद सत्तार ॲंड कंपनी | २.६९% कमी दराने |
| २. | एस. ए. नवाब | ११% जास्त दराने |
| ३. | कुलवंतसिंग | १०% जास्त दराने |
| ४. | आर. एस. भाटीया | २% कमी दराने |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २.६९% कमी दराची श्री. सय्यद सत्तार ॲन्ड कंपनी यांची निविदा आहे. प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, हर्षनगर स्लम येथे प्राथमिक आरोग्य केंद्र बांधण्याच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २.६९% कमी दराच्या श्री. सत्तार ॲन्ड कं. याचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**ऐनवेळचे विषय**

**विषय क्र. ९१/६० :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो. काचीवाडा येथील धोबी घाटा करीता हौद व खोली बांधण्याच्या कामासाठी सन १९९१-९२ चे सा. बा. खात्याच्या डी. एस. आर. दराने र. रु. १,२१,२५०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरचा खर्च सन १९९२-९३ या सालातील भांडवली इमारती या शिर्षकामधुन करण्यात येईल. प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, काचीवाडा येथील धोबी घाटी करीता हौद व खोली बांधण्याच्या कामाकरीता र. रु. १,२१,२५०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ९२/६१ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मांडकी ट्रेचिंग ग्राऊंडपासुन नारेगावांकडे १ की. मी. लांबी करीता खडी रस्ता व डांबरीकरण करण्यासाठी स्थायी समिती ठराव क्र. ३६२ दि. १५-०२-९२ द्वारे अंदाजपत्रक रु. १,९९,०००/- खडी रस्त्याचे कामासाठी व त्याच रस्त्याचे डांबरीकरणासाठी र. रु. ३,१५,८००/- च्या अंदाजपत्रकास मंजुरी दिल्यानंतर दै. स्वरगंगा मध्ये प्रगट निविदा मागविल्या असता एकूण तीन दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या. त्या खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. राजासिंग | अंदाजपत्रकीय दराने |
| २. | श्री. एस. डी. चंडाळे | ५% जास्त |
| ३. | मे. एस. एच. असोशिएटस | २% जास्त |

तुलनात्मकदृष्टया श्री. राजासिंग याची निविदा सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दराची आहे. प्रस्ताव मंजुरीसाठी विचारार्थ सादर.

**संवाद :**

**श्री. गिरजाराम हाळनोर :** स्थायी समितीचा सभा किमान दहा दिवसांची होत असल्यामुळे ऐनवेळेचे विषय मांडणे योग्य होत नाही. याबाबत मागील सभेनही चर्चा झाली होती.

**मा. उप आयुक्त :** ऐनवेळचे विषय मांडताना प्रशासकीय चर्चा करुन संमती घेतल्यानंतरच स्थायी समितीमध्ये ऐनवेळचे विषय मांडण्यात यावे असे रुलींग मागील सभेत देण्यात आले आहे. असे असतांनाही आजच्या सभेत मांडण्यात येणाऱ्या विजयाबाबत माझ्याशी चर्चा करण्यात आली नाही. तेव्हा यापुढे स्थायी समितीमध्ये मांडण्यात येणाऱ्या ऐनवेळच्या विषयाबाबत सभा सुरु होण्यापुर्वी किमान एक तास अगोदर संबंधित अधिकाऱ्यांनी चर्चा करुन मंजूरी मिळाल्यानंतरच आवश्यक ते विषय सभेमध्ये ऐनवेळ वर मांडावे. अन्यथा संबंधित अधिकाऱ्यावर नियमाप्रमाणे कार्यवाही केली जाईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मांडकी ट्रेंचिग ग्राऊंड ते नारेगांव पर्यंतच्या १ कि. मी. लांबीचा खडी रस्ता तयार करण्याच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दराच्या श्री. राजासिंग यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ९३/६२ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, सिध्दार्थ उद्यानाच्या पुढली आवाराच्या फुटपाथ बांधण्याच्या कामासाठी स्थायी समिती बैठक दि. २७-०३-९२ ठराव क्र. ४ अन्वये र. रु. २,०६,०००/- चे अंदाजपत्रकास मंजुरी मिळाल्यानंतर सदर काम हाती घेण्याकरीता कार्यालयीन निविदा सुचना क्र. २/९२-९३ अन्वये दि. ३०-०४-९२ ला वृत्तपत्रात जाहीरात देवून बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता एकूण तीन दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या. त्या खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. बी. एम. काथार | १०% जास्त |
| २. | श्री. शेख ताहेर पटेल | ०.५% कमी |
| ३. | श्री. मौला अलीयार खान | ३% जास्त |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०५% कमी दराची श्री. शेख ताहेर पटेल यांची निविदा दर मंजुरीस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद :**

**श्री. अजिजुल्ला बेग :** सिध्दार्थ गार्डन येथील कंपाऊंड वॉल जवळ गेल्या २० वर्षापासून टॅक्सी स्टँड आहे. यापुर्वी त्या ठिकाणी फुटपाथ तयार करण्यात आला होता. त्यानंतर तो तोडण्यात आला.

**मा. सभापती** : प्रस्तावित कामाची प्रत्यक्ष पाहणी करण्यात येईल.

**ठराव :**

प्रस्तावित कामाची पाहणी करण्यास सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. ९४/६३ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो. मिलिंदनगर येथे समाजमंदिर बांधण्याच्या कामासाठी सन ९१-९२ च्या सां. बा. खात्याचे डी. एस. आर. दराने २० रु. ३,९३,७६९/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरचा खर्च ५% कमकुवत घटकासाठी कल्याणकारी योजना या शिर्षकामधुन करण्यात येईल. प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

**श्री. अजिजुल्ला बेग :** प्रस्तावित काम हे स्लम विभागासाठी अर्थसंकल्पात केलेल्या तरतुदीतुन करण्यात यावे. अर्थसंकल्पात कमकुवत घटकासाठी राखुन ठेवण्यात आलेल्या रक्कमेतुन वेगळे काम हाती घेण्यात यावे.

**शहर अभियंता :** प्रकल्प अधिकारी यांच्या सुचनेप्रमाणे प्रस्तावित काम कमकुवत घटकासाठी कल्याणकारी योजना या शिर्षकातुन घ्यावे लागेल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मिलिंदनगर येथे समाजमंदिर बांधण्याच्या कामासाठी र. रु. ३,९३,७६९/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ९५/६४ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो. निजाओद्दीन दर्गा रोड शहागंज येथे मनपा शॉपींग सेंटरवर वाचनाल्याकरीता पहिला मजला बांधण्याच्या कामाकरीता सन ९१-९२ चे सा. बा. खात्याचे डी. एस. आर. दराने र. रु. २,४७,९५१/- चे अंदाजपत्रकास तयार करण्यात आलेले आहे. सदरचा खर्च भांडवली इमारती ( उर्दु वाचनालय ) साठी ठेवलेल्या तरतुदीतुन करण्यात येईल. प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, निजामोद्दीन दर्गा रोडवरील मनपा शॉपींग सेंटर वर वाचनालयाकरीता पहिला मजला बांधण्याच्या कामासाठी र. रु. २,४७,९५१/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी. सदर कामाचा खर्च भांडवली ( उर्दुवाचनालय ) इमारती या तरतुदीतून करण्यात यावा.

**विषय क्र. ९६/६५ :**

शिक्षणाधिकारी महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला की, काही सन्माननीय नगरसेवकांनी खडु फळा योजने अंतर्गत असलेले खेळणी साहित्य आपल्या स्वेच्छा निधीतुन खरेदी करुन शाळांना पुरवठा करण्यासंबंधी सुचविले आहे. त्यासाठी लघु निविदा मागविण्यात आल्या असता एकूण चार निविदा प्राप्त झाल्या. त्यांचा तुलनात्मक तक्ता पुढील प्रमाणे आहे.

| अ. क्र. | वस्तुचे नाव | मुरली स्टेशनर्स | मनोज एटरप्राय झेस | महाराष्ट्र राज्य खादी ग्रामी भांडार | आर. बी. एटरप्राय झेस |
|---|---|---|---|---|---|
| १. | वि.स.डं. म. ब्लॉक मराठी मुळाक्षरे १ अकं ( प्लास्टीक ) | ५८.१० | ५७.६० | ८९.५० | ५५.१५ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| २. | पुर्व ॲड लर्न ( प्लास्टीक ) | ५९.१० | ५५.६० | ८१.३० | ५५.१० |
| ३. | पक्षी व प्रणी याविषयी कोडीयुक्त खेळणी १) फिक्स ओ-फिक्चर | ५४.१० | ५३.६० | ९७.०० | ५३.३५ |
| ३. | खेळणी प्राणी पक्षी बाहुल्यांचा संच | | | | |
| | १) प्राणी प्लास्टीक | | | | |
| | २) लुडो खेळण्या ३) साफशिडी ४) बाहुल्ली | ३८७.०० | ३९०.०० | ५३५.०० | ३८१.०० |

खालील स. नगरसेवकांनी या साहित्याची मागणी केलेली आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. जयवंत ओक | २५,०००/- |
| २. | श्री. सुभाष परदेशी | २४,९५०/- |
| ३ | श्री. राधाकृष्ण मोटे | २५,००० |
| ४ | श्री. प्रभाकर विधाते | २५,००० |
| ५ | श्री. शिवाजी कवडे | २५,००० |
| ६ | श्री. सुग्रीम रिडलान | २५,००० |
| ७ | श्री. आनंद गोडसे | २५,००० |
| ८ | श्री. मधुकर शिंदे | २५,००० |
| | | १,१९,९५०/- |

वरील सर्व सन्माननीय नगरसेवकांच्या मागणी प्रमाणे या खरेदीस र. रु. १,१९,९५०/- खर्च येतो. तरी सर्वात कमी, दराची निविदा विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, स. सभासद श्री. जयवंत ओक श्री. राधाकृष्ण मोरे, श्री. प्रभाकर विधाते, श्री. शिवाजी कवडे, श्री. आनंद जोडखे, श्री. मधुकर शिंदे, श्री. सुग्रीम रिडलान यांचे स्वेच्छा निधीतुन रु प्रत्येकी २५,०००/- आणि स. सभासद सुभाष परदेशी योच स्वेच्छा निधीतून रु. २४,९५०/- असे एकूण र. रु. १,९९,९५०/- च्या खर्चास खडु फळा योजने अंतर्गत असलेले खेळणी साहित्य खरेदी करुन मनपा शाळेतील विद्यार्थ्यांना वाटप करण्यात आणि उक्त साहित्य खरेदीसाठी प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे अ. क्र. १ ते ३ चे साहित्य खरेदीसाठी मे. आर. बी. एन्टरप्रायझेस याचे प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

तसेच वरील मान्य दरानुसार स. सभासद श्री. शांताराम काळे, यांचे स्वेच्छा निधीतून रु. ७५,०००/-स. सभासद श्री. विठ्ठल पेरकर याचे स्वेच्छा निधीतून रु. ६०,०००/- आणि स. सभासद श्री. विजय पालीवाल याचे स्वेच्छा निधीतून रु. ४५,०००/- खर्चास खडुफळा साहीत्य खरेदी करुन मनप शाळेतील विद्यार्थयांना वाटप करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ९७/६६ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, वॉटर लेटल इंडिकेटर इलेक्ट्रॉनिक्स खरेदी करण्याच्या र. रु. २,२३,४००/- च्या अंदाजपत्रकास मा. आयुक्तांनी दि. ०३-०१-९२ रोजी मंजूरी दिली आहे. सदरील काम शासकीय अनूदानातून होणार आहे. मा.

आयुक्तांनी मंजूरी दिल्याप्रमाणे सदरील कामासाठी बी १ नमुन्यात निविदा मागविण्यात आल्या सदर निविदा सुचना दै. देवगीरी तरुण भारत, लोकधर्म, लोकमत टाईम्स व रहेबर या दैनिकातून प्रसिध्दी देण्यात आली. त्यानुसार एकूण तीन निविदापत्रके विक्री झाली होती. काही अपरिहार्य कारणास्तव निविदा स्विकारण्याची तारीख २९-०२-९२ ऐवजी ०३-०३-९२ ठेवण्यात आली होती. त्यानुसार एकूण तीन दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या त्या खालील प्रमाणे

| | | |
|---|---|---|
| १ | फ्रानी इलेक्ट्रीकल्स ॲन्ड इलेक्ट्रॉनिक्स लॅब्रोटरी | ७.०२% कमी दराची |
| २ | रेस इलेक्ट्रॉनिक्स पुणे | २.००% जास्त दराची |
| ३ | ॲगे कंट्रोल, अहमदनगर | १०% कमी दराची |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १०% कमी दराची ऑटो कंट्रोल अहमदनगर यांची निविदा आहे. परंतु त्यांनी निविदा सोबत अटीप्रमाणे डिझाईन सादर केलेले नाही. त्यासाठी दुसऱ्या कमी दराच्या निविदाधारकास मे. फ्रानी इलेक्ट्रीकल्स ॲन्ड इलेक्ट्रॉनिक्स लॅब्रोटरी यांना पत्रक क्र, मनपा/पापु-१/६७०-९२ दि. १८-०३-९२ अन्वये पत्रक देऊन फस्ट लोवेसच्या दराने म्हणजे अंदाजपत्रकीय दरापेक्षा १०% कमी दराने काम करण्यास तयार महान काय? याबाबतविचारणा केली असता त्यांनी दि. २०-०३-९२ रोजी सदरील काम १०% कमी दराने करण्यास तयार असल्याबाबत कळविले आहे. तसे अंदाजपत्रक र. रु. २,२३,४००/- ला व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १०% कमी दराच्या मे. फ्रानी ठरले. ॲड इलेक्ट्रॉ लॅब्रोटरी याच्या निविदेस मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, कॉटर लेव्हला इंडिकेटर इलेक्ट्रॉनिक्स खरेदी करण्याच्या कामासाठी र. रु. २,२३,४००/- च्या अंदाजपत्रकास आणि दि. २०-०३-९२ च्या पत्रानुसार काम अंदाजपत्रकाचे दरापेक्षा १०% कमी दराने मे. फ्रानी इलेक्ट्रीकल्स ॲन्ड इलेक्ट्रॉनिक्स लॅबोरेटरी यांचेकडून करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

स्वाक्षरित/-
सचिव,
महानगरपालिका, औरंगाबाद.

स्वाक्षरित/-
सभापती, स्थायी समिती
महानगरपालिका, औरंगाबाद.

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद*

**दिनांक ०२-०६-१९९२ रोजी दुपारी ३.०० वाजता भरलेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त मंगळवार दि. २३-०६-९२ रोजी दुपारी ३.०० वाजता समिती सभागृहात मा. सभापती ॲड श्री. इकबालसिंग गिल यांच्या अध्यक्षतेखाली स्थायी समिती सभेत सुरुवात झाली. या सभेस कार्यालयीन अधिकाऱ्यांसह खालील सन्माननीय सभासद उपस्थित होते.**

१) श्री. गिल इकबालसिंग प्रितमसिंग
२) श्री. नारायण मोहन फत्तेलष्कर
३) श्री. भगुरे तुळशीराम छगन
४) श्री. अलीम बेग मिर्झा कलीम बेग
५) श्री. गिरजाराम नानाराव हाळनोर
६) श्री. विजय गोविंदराव पालीवाल
७) श्री. मोहमद इस्माईल अब्दुल करीम
८) श्री. अजिजुल्ला बेग वाहेद बेग
९) श्री. पेरकर विठ्ठल कोडांजी
१०) श्री. शिंदे मधुकरराव माणिकरराव
११) श्री. ओक जयवंत केशवराव

**विषय क्र. ९८/१ :**

दिनांक २८-०५-९२ रोजी संपन्न झालेल्या विशेष स्थायी समिती सभेचे इतिवृत्त व दि. ०१-०६-९२ व ०८-०६-९२ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :**

**श्री. मोहमद इस्माईल :** स्थायी समिती समोर विचारार्थ मांडण्यात येणाऱ्या प्रस्तावाच्या संचिका आवक रजिस्टर मध्ये नोंद घेवून मा. सभापती यांचे लिपीकाकडे देण्यात येत असत ही प्रथा गेल्या चार वर्षापासून चालु होती. परंतु वरील पध्दतीप्रमाणे स्थायी समिती समोर ठेवण्यात येणाऱ्या विषयांच्या संचिका आवक नोंद घेवून मा. सभापती यांच्या लिपीकाकडे देण्यात येत नाही. हे खरे आहे काय? जर अशी पध्दत सुरु झाली असेल तर ती चुक आहे. याबाबत सचिवांनी खुलासा करावा.

**मा. सचिव** : प्रशासनातर्फे स्थायी समिती मध्ये मांडण्यात येणाऱ्या विषयाची संचिका सचिव विभागाम आल्यानंतर दोन वेळा आवक वही मध्ये नोंद होत असे. सचिव विभाग हा लहान विभाग असल्यामुळे या विभागातच एक संचिका दोन वेळा आवक रजिस्टर मध्ये नोंद घेणे योग्य नाही. स्थायी समिती मध्ये विचारार्थ ठेवलेल्या एखाद्या प्रस्तावा बाबत आवश्यक माहिती जाणुन घेणे जरुरीचे आहे. असे मा. सभापती यांना वाटल्यास अशा संचिका वेळोवेळी मा. सभापती यांना दाखविता येतील.

**श्री. अजिजुल्ला बेग :** सभागृहासमोर ठेवण्यात आलेल्या विषयांची संचिका मा. सभापती यांच्याकडे हस्तांतर न केल्यामुळे ऐनवेळी एखादया संचिकेची आवश्यकता

भासली आणि ती संचिका उपलब्ध होऊ शकली नाही तर सभागृहासमोर मांडण्यात आलेला प्रस्ताव विलंबीत ठेवावा का?

**श्री. मोहमंद इस्माईल :** प्रशासनातर्फे सभागृहासमोर मांडण्यात येणाऱ्या प्रस्तावांच्या संचिका मा. सभापती यांच्याकडे पाठविणे ही गेल्या चार वर्षापासून चालत आलेली पध्दतच योग्य आहे. सभागृहासमोर ठेवण्यात आलेल्या प्रस्तावा बाबतची संचिका पाहून आवश्यकतेनुसार संबंधिता बरोबर वेळोवेळी चर्चा करणे हया निमित्त संबंधितास खोलविणे हे कर्ता येईल.

**मा. सभापती** : मा. सचिव यांनी पुर्वीप्रमाणेच संचिका पाठविण्याची पटवून कायम ठेवावी.

**श्री. मधुकर शिंदे :** गेल्या दोन दिवसापासून शहराच्या काटी भागात गढुळ पाण्याचा पुरवठा होत आहे याचे कारण काय?

**श्री. गिरजाराम हाळनोर :** याचा खुलासा व्हावा. शहरात पावसाच्या पाण्याचा सरळ पुरवठा करण्यात झाला आहे.

**कार्यकारी अभियंता :** गढुळ पाण्यामध्ये तुरटी टाकण्यात आली पण गढुळ पाणी निवडले गेले नाही. याबाबत लाईनमननी लक्ष दिले नाही. फिल्टर बेड येथील एक मोटार बंद होती.

**उप अभियंता ( यांत्रिकी ) :** फिल्टर येथे एकूण ३ ( तीन ) मोटारी आहेत. त्यापैकी दोन मोटारी चालु स्थितीत आहे.

**श्री. मधुकर शिंदे :** मा. महापौर यांनी प्रत्यक्ष पाहणी केली असता त्या ठिकाणी फक्त एक मोटर दिसली किल्लेधारुर येथे सहया गॅस्ट्रोची साथ चालु आहे. त्याप्रमाणे औरंगाबाद शहरातही त्याची पुनरावृत्ती होवू नये. आजही शहरात गढुळ पाण्याचा पुरवठा झाला आहे. कार्यालयाचा शिपाई पाठवा म्हणजे माझ्या घरात गढुळ पाणी दाखवितो.

**श्री. गिरजाराम हाळनोर, श्री. मधुकर शिंदे, श्री. अजिजुल्ला बेग :** महाव लिफेकडे तुरटीचा साठा आहे काय? तुरटी नव्हती तर साठा संपेपर्यंत काय केले. पावसाळा सुरु होणार आहे. ही बाब अधिकाऱ्यांना माहित नव्हती काय? तेव्हा दोषी अधिकाऱ्यांवर कार्यवाही करावी आणि त्याबाबतची माहिती पुढील सभेत देण्यात यावी.

**कार्यकारी अभियंता :** मेसर्स धरमसी मोरारजी कंपनीकडून मागविण्यात आलेली १३ (तेरा) टन तुरटी आली नाही. म्हणून परिसर अभियांत्रिकी कार्यालय यांच्याकडून पाच (५) टन तुरटी आणली आहे. ब्लिचिंग पावडरचा पुरेसा साठा उपलब्ध आहे.

**श्री. मधुकर शिंदे, श्री. गिरजाराम हाळनोर :** संबंधित कंपनीने तुरटी पाठविली नाही.

**कार्यकारी अभियंता :** मेसर्स धरमसी मोरारची कंपनी एकच अधिकृत विक्रेते आहे. आपण कंपनीकडून तुरटी खरेदी करतो.

**श्री. मधुकर शिद, श्री. गिरजाराम हाळनोर, श्री. अजिजुल्ला बेग :** मोटार नादुरुस्त केव्हा झाली एकूण किती मोटारी आहेत. याचा खुलासा देण्यात यावा. नादुरुस्त झालेल्या मोटारी बाबत रिपोर्ट दिला होता काय?

**उपअभियंता ( यांत्रिकी ) :** ना दुरुस्त मोटार बाबत संबंधिता विभागाकडून रिपोर्ट आला नाही. दि. ०५-०६-९२ ला ना दुरुस्त असलेली मोटार काढुन आणुन दुरुस्तीसाठी टाकण्यात आली आहे. फिल्टरबेड येथे एकूण ३ (तीन) मोटारी आहेत.

**कार्यकारी अभियंता :** नादुरुस्त मोटारी बाबत संबंधित कनिष्ठ अभियंता यांत्रिकी विभागकडे रिपोर्ट देतात.

**श्री. तुळशीराम भगुरे :** पाणीपुरवठा विभागाशी संबंधित असलेली यंत्र सामुग्री यांत्रिक विभागकडून दुरुस्ती केली जाते अशा परिस्थिती मुळे पाणी पुरवठयाच्या कामात व्यत्यय येतो. उदा. ज्युब्लीपार्क येथील मोटार बंद झाली तर यांत्रिकी विभागकडे रिपोर्ट करावा लागतो. त्यानंतर यांत्रिकी विभाग प्रशासकीय कार्यवाही पुर्ण करुन मोटार दुरुस्तीची काम करते. या सर्व बाबामुळे मोटार दुरुस्तीसाठी वेळ लागतो ही बाब लक्षात घेता पाणी पुरवठा विभागातील यंत्र सामुग्री दुरुस्ती बाबतचे काम यांत्रिकी विभागाकडुन काढुन घेवून पाणी पुरवठा विभागाकडे देण्यात यावे. याच बरोबर पाणी पुरवठयासाठी वापरण्यात येणारे टँकरच्या दुरुसती व देखभालचे कामही पाणी पुरवठा विभागाकडे देण्यात यावे. जेणे करुन पाणी पुरवठयाच्या कामात व्यत्यय येणार नाही.

**श्री. गिरजाराम हाळनोर, श्री. मधुकर शिंदे :** फिल्टर बेड येथील ५० ( पन्नास ) लाईट पैकी ४८ (आठ्ठेचाळीस) लाईट बंद होते ही बाब खरी आहे काय? असल्यास याठिकाणी काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांनी रात्रीच्या वेळी काम कसे करावे याचा खुलासा व्हावा.

**कार्यकारी अभियंता :** लाईट बंद होते ही बाबत खरी आहे. त्याबाबत संबंधित विभागाकडे रिपोर्ट दिला आहे.

**उप अभियंता ( विद्युत ) :** फिल्टरबडे येथे ५० लाईट नलून २५/३० लाईट आहेत या ठिकाणी विद्युत कनेक्शनमध्ये प्लॉट होता. तो प्लॉट काढण्यात आला आहे. २५/३० पैकी ३ लाईट चालु होते.

**श्री. गिरजाराम हाळनोर, श्री. मधुकर शिंदे :** शहरास झालेल्या गढुळ पाणी पुरवठा प्रकरणी पाणी पुरवठा विभागाचे संबंधित अधिकाऱ्यांना त्यांचे विभागाकडे परत पाठविण्यात यावे किंवा निलंबित करण्यात यावे. तेव्हा या प्रकरणी आज काय कार्यवाही करणार याचा खुलासा व्हावा.

**मा. सभापती :** या प्रकरणी चौकशी करुन पुढील सभेत माहीती देण्यात येईल.

**श्री. मधुकर शिंदे, श्री. तुळशीराम भगुरे :** दि. ०८-०६-९२ च्या सभेत विद्युत विभागाचे कामात सुसुत्रता आणण्यासाठी स्थापन करण्यात आलेल्या उप समितीने समितीचा कामाचा अहवाल आठ दिवसाच्या आत स्थायी समिती समोर ठेवावा. या निर्णयाप्रमाणे लाईट विभागाचे उप समिती तर्फे काय काम झाले? स्थापन करण्यात आलेल्या उप समितीने आठ दिवसाच्या आत आपल्या कामाचा अहवाल दिला नाही म्हणून ही उप समिती बरखास्त करण्यात यावी.

**श्री. अजिजुल्ला बेग :** दि. ०८-०६-९२ च्या सभेत ठरल्याप्रमाणे विद्युत विभागचे कामाबाबत स्थापन करण्यात आलेल्या उप समिती बाबतचे पत्र कालच मिळाले आहे. हे पत्र विद्युत विभागाकडे पाठविण्यात आले आहे.

**श्री. अलिम बेग :** शहराचा वाढता विस्तार लक्षात घेता पाणी पुरवठा विभागात दोन उप अभियंता कार्यरत होते. त्यापैकी एक उप अभियंता यांना कार्यरत ठेऊन दुसरे उप अभियंता त्यांचे अन्यत्र बदली करण्यात आली आहे. पाणी पुरवठा विभागासाठी एक अभियंता कार्यरत ठेवल्यामुळे पाण्याचा प्रश्न सुटणार नाही तेव्हा पाणी पुरवठा विभागात दोन उप अभियंता कार्यरत असतांना त्यापैकी एक उप अभियंता यांना तेथुन का बदलण्यात आले याचा खुलासा व्हावा.

**श्री. मोहमंद इस्माईल :** गेल्या सात दिवसापासून माझे प्रभागात पाणी मिळाले नाही. विभाग मु. ३ हा सर्वात मोठा विभाग आहे या विभागात असलेले हॉल नेहमी उघड बंद करावे लागतात या दृष्टीने पाणी पुरवठयाच्या कामाकरीता कर्मचारी वाढवून देण्याची वेळोवेळी मागणी केली आहे. पाणी पुरवठा विभागात कार्यरत असलेल्या उप अभियंता पैकी एक उप अभियंता यांना त्या ठिकाणाहून काढल्यामुळे विभाग क्र. ३ चे पाणी पुरवठयावर फार मोठा परिणाम झाला आहे तेव्हा याबाबींचा विचार करुन पाणी पुरवठा विभागाकरीता पुर्वीप्रमाणेच दोन उप अभियंता असणे जरुरीचे असल्यामुळे आणखी एक उप अभियंताचे पद भरण्या बाबत त्वरीत आदेश देण्यात यावे.

**मा. उप आयुक्त :** पाणी पुरवठा विभागाचे काम एक उप अभियंता पाहु शकती असा खुलासा कार्यकारी अभियंता यांनी दिला आहे.

**श्री. मधुकर शिंदे :** विभाग क्र. ६ मध्ये जलनिःसारणाच्या कामाची पाहणी करण्यासाठी कनिष्ठ अभियंता व दुय्यम आवेक्षक नाहीत त्यामुळे जलनिःसारणाची कामे होत नाहीत. विभाग क्र. ६ मध्ये जलनिःसारणाच्या कामाकरीता दुसऱ्या विभागातून कनिष्ठ अभियंता व दुय्यम आवेक्षक देण्याचे आदेश निघाले आहेत. परंतू संबंधित कर्मचारी विभाग क्र. ६ मध्ये रुजू होत नाहीत.

**श्री. अजिजुल्ला बेग :** दोन उन्हाळयाच्या दिवसात पाणी पुरवठा विभागामध्ये कार्यरत असलेल्या दोन उप अभियंता पैकी एक उप अभियंता कमी करणे योग्य नाहही. तसेच शहरातील सर्व जलकुंभाकरीता एक स्वतंत्र उप अभियंता देणे आवश्यक आहे. तेव्हा अशा प्रकारचा प्रस्ताव प्रशासनाकडे आहे काय? तसेच दि. ०८-०६-९२ च्या सभेतील चर्चेनुसार प्रत्येक आठवडयाचा लेखा परीक्षक अहवाल आणि जमा खर्चाचा ताळेबंद सभागृहात देण्याबाबत काय कार्यवाही झाली याचा खुलासा व्हावा.

**मुख्य लेखा परीक्षक :** मागील चार वर्षाचे बाकी असलेले लेखा परीक्षणाचे काम आणि अपूरा कर्मचारी वर्ग यांचा विचार करता मागील लेखा परीक्षना बाबतचा अहवाल दरमहा दिला जाईल.

**मा. सभापती** : विविध विभागातर्फे होत असलेली कुटकळ ( रेटलिस्ट ) -१ ची कामे परस्पर मंजूर होतात तेव्हा अशा कामांना सभागृहाच्या मंजूरीची आवश्यकता नाही काम अशा प्रकारे परस्पर मंजुर होत असलेल्या ए-१/रेटलिस्टच्या कामामुळे किती खर्च झाल आणि किती रक्कम शिल्लक आहे याचा बोध होत नाही.

**श्री. अजिजुल्ला बेग :** फुटकळ कामाच्या संचिका मंजूर करण्याबाबत संबंधित विभागाचे कार्यकारी अभियंता यांना अधिकार दिले आहे. त्यामुळे अशा संचिका या कामाचे देयक अदाईचे वेळी लेखा अधिकांरी यांच्याकडे पाठविल्या जातात आणि याच वेळी याबाबतची माहिती लेखा अधिकारी यांना मिळते तेव्हा रेटलिस्ट आणि ए-१ संचिका मंजुरी बाबतची पध्दत बदलुन एखादया कामाची रेटलिस्ट किंवा ए-१ बाबतची संचिका लेखा अधिकारी यांचेकडे पाठविल्या नंतरच सदर कामास मंजूरी देण्यात यावी. म्हणजेच लेखाधिकारी यांना नियमाप्रमाणे आठवडी अहवाला देता येईल.

**मा. सभापती** : स. सभासद यांचे सुचनेप्रमाणे कार्यवाही केल्यास तातडीचे कामे मंजुर होण्यास विलंब लागेल ही बाब लक्षात घेता प्रत्येक विभागातर्फे मंजुर होणाऱ्या ए-१ आणि रेटलिस्टच्या कामा बाबतची माहिती वेळोवळी लेखा

अधिकारी यांच्याकडे पाठविण्यात यावी आणि लेखा अधिकारी यांनी प्रत्येक महिन्याचे पहिल्या सभेत मागील महिन्याच्या जमा खर्चाचा ताळेबंद मुख्य लेखा परीक्षक यांचे मार्फत दयावा.

**श्री. मोहमंद इस्माईल, श्री अलिम बेग :** पाणी पुरवठा विभागातून काढुन घेण्यात आलेल्या उप अभियंता बाबत खुलासा करण्यात यावा. पाणी पुरवठा विभागातून काढुन घेण्यात आलेले उप अभियंता हे झोन क्र. ३ चे कामासाठी देण्यात आले होते. पाणी पुरवठा विभागातून काढुन घेतलेल्या उप अभियंताना झोन क्र. ३ च्या कामाची चांगली माहिती आहे. या विभागाचे पाणी पुरवठा बाबतची कामे त्यांनी वेळोवळी करुन दिली आहे. म्हणुन पाणी पुरवठा विभागात त्यांचे व्यतिरिक्त दुसरा उप-अभियंता देणे योग्य होणार नाही.

**श्री. मधुकर शिंदे :** वरकड माता मंदिर येथील गल्लीत पाईप लाईन टाकण्याबाबत गेल्या दोन वर्षापासुन मागणी करण्यात येत आहे. अदयाप काम झालेले नाही. याबाबत माहिती घेतली असता या भागात पाईप लाईन टाकण्याचे काम परिसर अभियांत्रिकी विभागाकडे आहे. असे सांगण्यात आले आहे. वरकड माता मंदिर गल्लीला मिळणाऱ्या दोन्ही गल्यामध्ये पाईप लाईन टाकण्याचे काम पूर्ण झाले आहे. फक्त याच भागात ( मधल्या गल्लीत ) पाईप लाईन टाकण्याचे काम बाकी आहे. तेव्हा हे काम केव्हा होणार याबाबत खुलासा व्हावा.

**श्री. जयवंत ओक :** स. सभासद यांनी सुचविल्याप्रमाणे अशा प्रकारची किती कामे आणि कोणत्या वार्डातील कामे परिसर अभियांत्रिकी विभागाकडे दिली आहेत. याची माहिती देण्यात यावी.

**श्री. अजिजुल्ला बेग :** औरंगाबाद टाईम्स कॉलनी येथे ड्रेनेज लाईन टाकण्याच्या कामाचे अंदाजपत्रक तयार आहेत. याबाबत गत सभेत झालेल्या चर्चेनुसार वरील काम अंदाजपत्रकाचे रिअप्रापेशन नंतर करता येईल. असा खुलासा केला असतांना या कामाचा समावेश शासकीय अनूदानाच्या यादीत का करण्यात आला. सदर सोसायटी कडून विकास खर्च वसूल करण्यात आला आहे. तेव्हा वरील काम मनपा बजेट मधुनच करुन घेण्यात यावे.

**मा. मुख्य लेखा परीक्षक :** अर्थ संकल्पाचे रिअप्रोप्रेशन सहया करणे योग्य होणार नाही. तेव्हा मंजूर झालेली कामे जानेवारी पर्यंत थांबवून त्यानंतर या कामाबाबत विचार करता येईल.

**श्री. अजिजुल्ला बेग :** अर्थसंकल्पाचे रिअप्रोप्रेशन साठी काम थांबविणे ही गोष्ट वेगळी औरंगाबाद टाईम्स कॉलनी येथील ड्रेनेज कामाची मागणी फार दिवसापासून आहे तेव्हा सदर काम रेगुलर बजेट मधुन करुन दयावे.

**मा. सभापती** : एक महिन्याचे आत शासकीय अनूदान मंजूर झाले नाही तर, औरंगाबाद टाईम्स कॉलनी येथील ड्रेनेजचे काम अर्थसंकल्पाच्या तरतुदीतुन करुन घेण्यात यावे.

**श्री. विठ्ठल पेरकर, श्री. मधुकर शिंदे, श्री. मोहमंद इस्माईल :** मनपा यांत्रिकी विभागातून वाहनांची दुरुस्ती व देखभाल वेळोवर व व्यवस्थित होत नाही अनेक वाहने बंद आहेत जी वाहने चालु आहेत. त्या वाहनांना चालु करण्यासाठी धक्का दयावा लागतो. पाणी पुरवठयाचे टँकर बंद आहेत. तसेच या टँकरवर असलेले किलोपूस्कर ऑईल इंजिनही बंद आहे. या सर्व बाबींचा विचार

करता यांत्रिकी विभागाचा कारभार सुधारण्याच्या दृष्टीने एक उप समिती नेमण्यात यावी.

**मा. सभापती** : यांत्रिकी विभागाचे कामकाजात सुसुत्रता आणाऱ्याच्या दृष्टीने स. सभासद श्री. गिरजाराम हाळनोर, श्री. तुळशीराम भगुरे, श्री. नारायण फत्तेलष्कर, श्री. विठ्ठल पेरकर, श्री. मधुकर शिंदे यांचा समावेश असलेली एक उप समिती नेमण्यात येते श्री. गिरजाराम हाळनोर या समितीचे चेअरमन म्हणुन काम पाहतील.

**श्री. गिरजाराम हाळनोर** : वार्ड क्र. ५७ मधील विमा परवानगी बांधकामा बाबतची माहिती आजच्या सभेत देण्यात येणार होती तेव्हा सदर माहिती बाबत खुलासा करण्यात यावा.

**मा. सभापती** : मा. सहाय्यक संचालक नगर रचना यांनी वार्ड क्र. ५७ मधील विना परवाना बांधकाम बाबतची माहिती पुढील सभेमध्ये देण्याची व्यवस्था करावी.

**मा. सभापती** : १) ठराव क्र. ६१ दि. ०८-०६-९२ च्या प्रस्तावित कामाची प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली सदर काम तातडीचे व महत्वाचे असल्यामुळे प्रशासनातर्फे दाखल करण्यात आलेल्या प्रस्तावास या सभेत मंजुरी व स्विकृतीही देण्यात येते.

२) ठराव क्र. ६२ दि. ०८-०६-९२ अन्वये मंजूर झालेल्या कामाबाबत संबंधित गुत्तेदारास बांधकामाचा अनुभव आहे काय हे पाहून कामाचा आदेश देण्यात यावा. तसेच प्रस्ताविक काम सुरु करतांना सभागृहास कळविण्यात यावे आणि प्रस्तावित काम चांगल्याप्रकारे करुन घेण्याबाबत मा. शहर अभियंता यांनी दक्षत घ्यावी.

३) ठराव क्र. ७२ दि. ०८-०६-९२ च्या चर्चेनुसार स. सभासदांनी सुचविलेल्या ठिकाणी सोडीयम व्हेपरचे दिवे लावण्याबाबत काम तरतुद करण्यता आली याचा खुलासा व्हावा.

**अतिरिक्त शहर अभियंता** : ठराव क्र. ७२ दि. ०८-०६-९२ अन्वये स. सभासदांनी सुचविलेल्या ठिकाणी सोडीयम व्हेपरचे दिवे बसविण्याचे काम शासकीय अनूदानाच्या कामातील बचतीतून हाती घेण्यात येईल.

**मा. सभापती** : ठराव क्र. ८९ दि. ०८-०६-९२ अन्वे फर्निचर खरेदीच्या प्रस्तावातील स्थगित ठेवण्यात आलेल्या एस टाईप चेअर बाबत मेसर्स एस. एन प्रोडक्स आणि मेसर्स मेघदूत एजन्सी यांनी अनुक्रमे दि. १५-०६-९२ व दि. १९-०६-९२ च्या पत्रकान्वये प्रति नग रुपये ५००/- या दराने एस. टाईप खुर्च्या पुरविण्याची तयारी दर्शविणे आहे. तेव्हा प्रस्तावित दर्शविल्याप्रमाणे खरेदी करावयाचे १०० नग एस. टाईप खुर्च्या पैकी ५०/५० खुर्च्या दोन्ही एजन्सीकडून प्रति नग रुपये ५००/- ( दोन्ही एजन्सीचे दर सारखेच असल्यामुळे ) खरेदी करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**श्री. मोहमंद इस्माईल, श्री. अलिम बेग** : मा. सभापती यांनी खुलासा केल्याप्रमाणे एकाच वस्तुच्या खरेदीसाठी दोन एजन्सीचे सारखेच दर असतील तर नियमाप्रमाणे अशी मंजुरी देता येते काय याचा खुलासा व्हावा. गतवर्षी ढापे खरेदीप्रकरणात दोन एजन्सीचे दर सारखेच होते. म्हणुन स्थायी समितीने सदर प्रकरणी फेर विचार करावा असा निर्णय घेतला याचा अर्थ प्रस्तावीस कामास मंजूरी दिला असा होत नाही. तरी प्रशासनाने माल खरेदी केला

आहे. तेव्हा स्थायी समितीचे अधिकार काय आहे. समितीची मंजूरी नसतांना केणत्या अधिकाराने ढापे खरेदी करण्यात आले याचा खुलासा व्हावा.

**विधी सल्लागार :** ढापे खरेदीची आवश्यकता आहे म्हणुन कलम ६७ (३) (क) प्रमाणे ढापे मागविण्यात आले असतील त्याबाबतची माहिती सभागृहास दिली किंवा नाही हे माहित नाही. कलम ६५ (३) (क) प्रमाणे ढापे मागविले नाहीत.

**श्री. मोहमंद इस्माईल :** ढापे खरेदीचा प्रस्ताव सभागृहासमोर ठेवण्यापुर्वी महिने अगोदर पासुन कार्यालयात ढापे नव्हते. तेव्हा ढापे खरेदी प्रकरणी कलम ६७ (३) (क) लागु होतो काय?

**मा. सभापती** : संबंधिता प्रकरणाची संचिका पाहिली असता कलम ६७ (३) (क) चा वापर करण्यीच गरज नाही. पावसाळयापुर्वी योग्य करार करुन ढापे मागविण्यात यावे. असा मा. आयुक्त यांनी दि. ०७-०५-९२ ला अभिप्राय दिला आहे. त्यावर मा. सभापती यांची सही आहे.

**श्री. मोहमंद इस्माईल :** स्थायी समितीचे सभापती यांना संचिकावर सही करण्योच अधिकार नाहीत. सभागृहातील निर्णयाबाबत मा. सचिव यांनी त्याबाबतची लेखी माहिती दयावी. सभागृहातील निर्णयाबाबतची इतिवृत्त मनपाच्या सर्व विभागांना पाठविले जाते, त्याप्रमाणे कार्यवाही करावयास पाहिजे.

**श्री. मधुकर शिंदे :** ठराव क्र. ९६ मध्ये प्रशासनातर्फे दाखल करण्यात आलेल्या प्रस्तावा व्यतिरिक्त आणखी ३ स. सभासदांच्या स्वेच्छा निधीचे रक्कमेस मंजुरी दिल्यामुळे मा. आयुक्त यांनी ठरावाप्रमाणे साहित्य खरेदी बाबत मंजुरी दिली नाही. याबाबत माहिती घेतली असता प्रशासकीय ठरावा व्यतिरिक्त वाढविण्यात आलेल्या स्वेच्छा निधीची रक्कम वगळुन प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे १,१९,०००/- च्या खर्चाचे साहित्य खरेदी कण्यास म. आयुक्त सहमत आहेत अे कळले तेव्हा ठराव क्र. ९६ मध्ये प्रशासकीय ठरावा व्यतिरिक्त वाढविण्यात आलेल्या ३ नगरसेवकांच्या स्वेच्छा निधीची रक्कमे बाबतची नोंद वघळून टाकण्यात यावी.

**मा. सभापती** : ठराव क्र. ९६ बाबत मा. आयुक्त यांच्याशी चर्चा करण्यात येईल.

**श्री. गिरजाराम हाळनोर :** ठराव क्र. ४१ दि. ०८-०६-९२ मध्ये प्रस्तावीत कामासाठी लघु निविदा मागवून काम त्वरीत सुरु करावे अशी नोंद आली नाही. तेव्हा योग्य ती दुरुस्ती करण्यात यावी.

**जलनि:सारण अधिकारी -१ :** ठराव क्र. ४१ च्या कामास आज सभागृहाने स्विकृती दिली आहे तेव्हा त्यानुसार या कामासाठी दरपत्रके मागविता येतील.

**श्री. गिरजाराम हाळनोर :** दि. ०१-०६-९२ च्या सभेत उस्मानपुरा व स्टेट बँक कॉलनी येथील ड्रेनेज कामाबाबत सुचना करण्यात आली होती. त्यापैकी एक काम पूर्ण झाले असुन, उस्मानपुरा येथील ड्रेनेजलाईनचे अप्रुटींग न करता या ठिकाणी नविन पाईप लाईन टाकावी त्याबाबत आवश्यक ते पत्रही देण्यात आले आहे.

याशिवाय पिरबाजार भाजी मार्केट येथील ओटे बांधण्याच्या कामाबाबत काय कार्यवाही झाली याचा खुलासा व्हावा.

**उप अभियंता इमारती :** पिर बाजार भाजी मार्केटर येथील ओटे बांधण्याचे काम संबंधित गुत्तेदाराने सुरु केले नाही म्हणून, संबंधित गुत्तेदाराच्या कामाचा करार रद्द करण्याबाबतची संचिका मंजूरीसाठी पाठविली आहे.

**श्री. अजिजुल्ला बेग :** दि. ०८-०६-९२ ठराव क्र. ३२ मधील चर्चेत " सभापती निवडी बाबतचे प्रकरण न्याय प्रविष्ठ असले तरी सभापती पदाची निवड जो पर्यंत न्यायालय अवैध ठरवत नाही. तो पर्यंत मुंबई प्रांतिक मनपा अधिनियम १९४९ चे कलम ३५ व ३६ अन्वये मिटींग घेता येते " या ऐवजी " अधिनियम १९४९ चे कलम ३४ व ३५ अन्वये मिटींग घेता येते " अशी दुरुस्ती करण्यात यावी.

**मा. सभापती** : स. सभासद यांचे सुचनेप्रमाणे दुरुस्ती करण्यात यावी.

**विधी सल्लागार :** कलम ६७ (३) चे अधिकारा बाबत दि. ०८-०६-९२ च्या सभेत झालेल्या चर्चेनुसार उक्त अधिनियमाचे कलम ४८ (अ) अन्वये नगरपालिका सचिवांचे अधिकार व कर्तव्य याबाबत खुलासा दिला आहे ( अधिनियमाचे कलम वाचुन दाखविण्यात आहे. )

**मा. सभापती** : कलम ४८ (अ) अन्वये मा. सचिव यांनी कलम ६७ (३) (क) बाबत दि. ०४-०१९१ रोजी झालेल्या ठरावाची अंमलबजावणी करण्यात कार्यवाही करावी.

**श्री. नारायण फत्तेलष्कर :** ठराव क्र. २९ दि. ०१-०६-९२ मध्ये वार्ड क्र. १४ " ऐवजी " वार्ड क्र. १५ " अशी दुरुस्ती करण्यात यावी.

**मा. सभापती** : स. सभासदांच्या सुचनेप्रमाणे दुरुस्ती करण्यात यावी.

**श्री. मोहमंद इस्माईल :** ढापे खरेदी प्रकरणी स्थायी समितीची मंजुरी झालेली नाही. तेव्हा संबंधित एजन्सीकडून होणारा ढापेचा पुरवठा थांबविण्यात यावा. ढापे खरेदी प्रकरणी सभागृहास माहिती दिली नाही. या कंपनीकडून ५०० ढापे पुरविण्यात आले आहे. तेव्हा यापुढे करण्यात यावी आणि सभागृहाची मंजुरी होईपर्यंत ढापे खरेदी करण्यात येवू नये.

**श्री. अजिजुल्ला बेग :** ठराव क्र. ९३ दि. ०८-०६-९२ बाबत मा. आयुक्त यांच्याशी चर्चा केली. त्यावेळी सिध्दार्थ उद्यान येथे उदयानाच्या मुख्य दरवाजाच्या इतर बाजूस ५० फुट पर्यंत आणि दक्षिण बाजूस नाल्यापर्यंत फुटपाथ तयार करण्यात यावा आणि उर्वरित जागा टॅक्सी स्टँड करीता मोकळी ठेवण्यात यावी. अशी चर्चा झाली आहे तेव्हा वरील प्रमाणे दुरुस्ती करुन ठराव क्र. ९३ मंजूर करण्यात यावा.

**मा. सभापती** : स. सभासदांच्या सुचनेप्रमाणे ठराव क्र. ९३ मध्ये आवश्यक दुरुस्ती करण्यात येते. अतिरिक्त शहर अभियंता यांनी दुरुस्ती प्रमाणे कार्यवाही करावी.

**ठराव :**

दि. ०१-०६-९२ व ०८-०६-९२ च्या सभेच्या इतिवृत्तास ----------

१) ठराव क्र. ६१ बाबत पाहणी करण्यात आले असून, सदर काम तातडीचे असल्यामुळे प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे ज्युब्लीपार्क पंप हाऊस भोवती संरक्षित भिंत बांधण्याच्या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या र. रु. २,७३,१५०/- च्या सुधारीत अंदाजपत्रकास स्विकृतीसह सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.
वैधानिक कार्यवाही व्हावी.

२) ठराव क्र. ८९ अन्वये फर्निचर खरेदीच्या प्रस्तावातील स्थगित ठेवण्यात आलेलया एस. टाईप चेअर बाबत मेर्सस एस. एन. प्रोडक्स आणि मेसर्स मेघदुत एजन्सीज यांनी प्रति नग रुपये ५००/- या दराने एस टाईप खुर्च्या पुरविण्याची तयारी दर्शविल्याप्रमाणे खरेदी करावयाच्या १०० एस टाईप खुर्च्या पैकी ५०/५० खुर्च्या दोन्ही एजन्सीकडून प्रति नग रुपये ५००/- या प्रमाणे खरेदी करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. अशी वाढ करण्यास

३) ठराव क्र. ३२ मधील चर्चेत सभापती निवडी बाबतचे प्रकरण न्यायप्रविष्ठ असले तरी सभापती पदाची निवड जोपर्यंत न्यायालय अवैध ठरवत नाही. तोपर्यंत मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३५ व ३६ " अन्वये मिटींग घेता येते अशी दुरुस्ती करण्यास -------

४) ठराव क्र. २९ मध्ये वार्ड क्र. १४ " शहाबाजार ऐवजी वार्ड क्र. १५ " शहाबाजार अशी दुरुस्ती करण्यास --------------

५) ठराव क्र. ९३ बाबत पाहणी करण्यात आली असुन, सिध्दार्थ उद्यानाचे मुख्य दरवाजाच्या उत्तर बाजूस ५० फुट पर्यंत आणि दक्षिण बाजूला नाल्यापर्यंत फुटपाथ तयार करुन उर्वरित जागा टॅक्सी स्टँड करीतामोकळी ठेवण्यात यावी असे सर्वानुमते ठरले. वरील दुरुस्ती नुसार सिध्दार्थ उद्यानाचे आवारा लगत फुटपाथ बांधण्याच्या कामाकरीता तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०५% कमी दराच्या श्री. शेख ताहेर पटेल याचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वरील प्रमाणे अनुक्रमांक १ ते ५ मध्ये सुचविलेल्या दुरुस्ती व वाढ यावर दि. २८-०५-९२ रोजी संपन्न झालेल्या विशेष स्थायी समिती आणि ०१-०६-९२ व दि. ०८-०६-९२ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समितीचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात आली.

**विषय क्र. ९९/२ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, प्राणी संग्राहालय येथे जनावराचा चारा ठेवण्यासाठी शेड बांधणे कामासाठी अंदाजपत्रकीय रक्कम रुपये ९०,२२५/- ला मा. आयुक्तांनी मंजुरी दिलेली असुन, त्या अनुषंगाने सदर कामाची बी-१ " नमुन्यात निविदा सुचना दि. ३०-०४-९२ रोजी दैनिक मुक्कदस, दैनिक स्वरगंगा, दैनिक रहेबर इत्यादी वृत्तमानपत्रात प्रसिध्द करण्यात आले व स्विकारण्याच्या तारखेस एकूण २ (दोन) दरपत्रके दर भरुन प्राप्त झाले. सदरील निविदा पत्रके दि. १२-०५-९२ रोजी उपस्थित गुत्तेदारासमक्ष उघडण्यात आले दराचे तपशील खालील प्रमाणे आहे.

| **अ. क्र.** | **एजन्सींचे नांव** | **दर** |
|---|---|---|
| १. | श्री. एस. जी. भालेराव | ०.१% अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी |
| २. | श्री. बी. एम. काथार | १% अंदाजपत्रकीय दरापेक्षा जास्त |

सदरील दरपत्रकास तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराचे निविदा श्री. एस. जी. भालेराव यांचे अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.१% कमी दराच्या श्री. एस. जी. आहे. मंजुरीस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्राणी संग्रहालय येथे जनावरांचा वारा ठेवण्यासाठी रोड बांधण्याच्या कामाकरीता तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.१% कमी दराच्या श्री. एस. जी. भालेराव यांच्या दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १००/३ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, आरीफ कॉलनी जवळील हौसींग सो. रेखांकनात मोकळया जागेस वायर फेन्सींग करणे बाबत कामासाठी अंदाजपत्रकीय रक्कम रुपये ८९,२७०/- ला. मा. आयुक्तांनी मंजुरी दिलेली असून, त्या अनुषंगाने सदर कामाचे " बी-१ " नमुन्यात निविदा सुचना दि. १४-०५-९२ रोजी शहरातील दैनिक लोकमत, दै.

अंजिठा, आलमगीर टाईम्स, इडियंन एक्सप्रेस इत्यादी वर्तमानपत्रात जाहीरात, देण्यात आली. त्यानुसार विक्रीच्या तारखेपर्यंत कोरे निविदा १० फार्म विकण्यात आले व स्विकारण्याच्या तारखेस एकूण ७ निविदा दर भरून प्राप्त झाले सदरील निविदा दि. ०२-०६-९२ रोजी उपस्थित गुत्तेदारासमक्ष उघडण्यात आले. दराचे तपशील खालील प्रमाणे.

| अ. क्र. | एजन्सींचे नांव | दर |
|---|---|---|
| १. | एस. जे. बाहोद्दीन | १४% अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी |
| २. | सय्यद सिराजोद्दीन | १३% अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी |
| ३. | विशाल कंस्ट्रक्शन | १३% अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी |
| ४. | अजय मांगुळकर | १०% अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी |
| ५. | अला उद्दीन | ८% अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी |
| ६. | सय्यद गसासोद्दीन | ८% अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी |
| ७. | एस. एच. असोशिएटस | ७% अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी |

सदरील दर पत्रकास सर्वात कमी तुलनात्मकदृष्टया श्री. एस. अे. बाहोद्दीन गुत्तेदार यांचे १४% अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमीचे आहे. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावीत कामाबाबत पुढील सभेत विचार करण्यात येईल असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. १०१/४ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, शहरातील विविध उदयानामध्ये लहान मुलांची खेळणी बसविणे बाबत कामासाठी अंदाजपत्रकीय र. रु. ९७,७००/- ला मा. आयुक्तांनी मंजूरी दिलेली असून, त्या अनुषंगाने सदर कामाचे बी-१ " नमुन्यात निविदा सुचना दि. ३०-०४-९२ रोजी दैनिक मुक्कदस, दै. स्वरगंगा, दै. रहेबर इत्यादी वर्तमानपत्रात जाहीरात देण्यात आली. त्याद्वारे विक्रीच्या तारखेस एकूण कोरे निविदा पत्रके चार (४) विकण्यात आले व स्विकारण्याच्या तारखेस एकूण तीन (३) दरपत्रके भरुन प्राप्त झाले. सदरील निविदा फार्म शहर अभियंता यांनी दि. १२-०५-९२ रोजी उपस्थित गुत्तेदारासमक्ष उघडण्यात आले. दराचे तपशील खालील प्रमाणे.

| अ. क्र. | एजन्सींचे नांव | दर |
|---|---|---|
| १. | अलीयोद्दीन वजीर | ०.२०% अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी |
| २. | वेलवर्थ कंन्स्ट्रक्शन | ०.५% अंदाजपत्रकीय दरापेक्षा जास्त |
| ३. | आर. ए. शेख | ४% अंदाजपत्रकीय दरापेक्षा जास्त |

वरील दर्शविल्या दरपत्रकास सर्वात कमी दर तुलनात्मकदृष्टया श्री. अली योद्दीन वजीर यांचे ०.२०% अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमीचे आहे. सदर खर्च नविन उदयाने या शिर्षकातून करण्यात येणार आहे. प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

**श्री. नारायण फत्तेलष्कर :** प्रस्तावित ठिकाणच्या उदयानामध्ये कर्मचारी नेमणूक झाडे लावण्याची व्यवस्था करण्यात यावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शहरातील विविध उद्यानामध्ये लहान मुलांची ठिकाणी बसविण्याकरीता तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २०% कमी दराच्या श्री. अलियोद्दीन वजीर यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १०२/५ :**

शहर अभियंता महानगरपालिका यांनी प्रस्ताव सादर केला की, झोन क्र. ६ मधील रस्त्याचे डांबरीकरण करण्यासाठी सर्वसाधारण सभेच्या ठराव क्र. ५४/९ दि. १६-१२-८८ द्वारे झोन क्र. ६ मधील रस्त्याचे डांबरीकरण करण्यासाठी रु. ३,६१,८८०/- ची मंजुरी दिली, त्यानुसार सदरील कामासाठी कार्यालयाची निविदा सुचना क्र. ८ (९२-९३) द्वारे स्थानिक वृत्तपत्र दै. अंजिठा व आलमगीर टाईम्स तसेच राज्य पातळीवरील वृत्तपत्र दै. लोकमत व इंडियन एक्सप्रेस मध्ये प्रसिध्दी देवून प्रगट निविदा मागविल्या असता कोऱ्या निविदा विक्रीचे अंतिम तारखेपर्यंत एकूण दोन निविदा विकण्यात आल्या व मोहरबंद निविदा स्विकारण्याचे नियोजीत तारखेस फक्त (२) निविदा प्राप्त झाल्या व प्राप्त झालेल्या निविदा उघडल्या असता ठेकेदारांनी दिलेले दर खालील प्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. पी. एम. चोरडीया | अंदाजपत्रकाचे दराने |
| २. | मे. गुरुनानक इंडस्ट्रीज | १०% जास्त |

तुलनात्मकदृष्टया श्री. पी. एम. चोरडीया यांची निविदा तुलनात्मकदृष्टया कमी व अंदाजपत्रकाचे दराप्रमाणे आहे. करीता श्री. पी. एम. चोरडीया यांचे अंदाजपत्रकाचे दराप्रमाणे असलेली निविदा मंजुरीसाठी विचारार्थ सादर.

**ठराव :**

सध्या पावसाठयाचे दिवस असल्यामुळे प्रस्तावित कामाबाबत पुढील सभेत विचार करण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. १०३/६**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मांडकी ट्रेचिंग ग्राऊंड पासून नारेगांवकडे १ की. मी. लांबी करीता खडी रस्त्याचे डांबरीकरण करण्यासाठी स्थायी समितीचा ठराव क्र. ३६२/२१ दि. १५-०२-९२ द्वारे अंदाजपत्रक रुपये ३,१९,८००/- ला मंजुरी दिल्यानुसार सदरील कामासाठी निविदा सुचना क्र. ४ (९२-९३) द्वारे स्थानिक वृत्तपत्र दै. अजिंठा व आलमगीर टाईम्स तसेच राज्य पातळीवरील वृत्तपत्र दै. लोकमत व इंडियन एक्स प्रेसमध्ये प्रसिध्दी देवून प्रगट निविदा मागविल्या असता कोऱ्या निविदा विकण्याच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण दोन निविदा विकण्यात आल्या व मोहरबंद निविदा स्विकारण्याचे नियोजीत तारखेस फक्त दोन निविदा प्राप्त झाल्या व प्राप्त झालेल्या निविदा उघडल्या असता ठेकेदारांनी दिलेले दर खालील प्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. मेसर्स गुरुनानक इंडस्ट्रीज | ५% कमी |
| २. | श्री. पी. एम. चोरडीया | अंदाजपत्रकीय दराने |

तुलनात्मकदृष्टया मे. गुरुनानक इंडस्ट्रीज यांची निविदा कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ५% कमी आहे.

करीता मे. गुरुनानक इंडस्ट्रीज यांचे अंदाजपत्रकास दरापेक्षा ५% कमी दराची निविदा मंजुरीसाठी विचारार्थ सादर.

**ठराव :**

सध्या पावसाळयाचे दिवस असल्यामुळे प्रस्तावित कामाबाबत पुढील सभेत विचार करण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. १०४/७ :**

मा. शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, अग्निशामक दल रेल्वेस्टेशन येथे अग्नीशामक दलासाठी पी. टी. व ड्रील करीता कॉक्रीट ग्राऊंड तयार करण्याच्या कामासाठी स्थायी समिती ठराव क्र. ४२३/२ दि. २७-०३-९२ अन्वये र. रु. २,०५,४००/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी मिळालेली आहे. सदरचे काम हाती घेण्यासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र. २/९८-९३ जा. क्र. मनपा/श. अ./३४९/९२ दि. ३०-०४-९२ अन्वये निविदा मागविण्यात आल्या कोऱ्या निविदा विक्रीच्या तारखेपर्यंत एकूण (४) चार कोऱ्या निविदा फार्म विक्री झाल्या निविदा स्विकारण्याच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण (३) निविदा दर भरलेल्या प्राप्त झाल्या. त्या दि. १२-०५-९२ ला उपस्थित गुत्तेदारासमक्ष उघडण्यात आल्या त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. अतावुल्लखान | ०.०७८६% कमी दराने |
| २. | श्री. मन्नान खान | अंदाजपत्रकीय दराने |
| ३. | श्री. एल. आर. गोरे | २.५% जास्त दराने |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०७८६% कमी दराची श्री. अतावुल्लाखान यांची निविदा दर मंजुरीचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, अग्निशामक दलासाठी पी. टी. व ड्रील करीता कॉक्रेट ग्राऊंड तयार करण्याच्या कामासाठी तुलनात्मक दृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ०.०७८६% कमी दराच्या श्री. अतावूल्लाखान यांच्या दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १०५/८ :**

मा. शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, नुतन कॉलनी येथील मनपा प्रा. शाळेला संडास व बाथरुम व संरक्षित भिंत बांधण्याच्या कामासाठी स्थायी समिती बैठक दि. २७-०३-९२ ठराव क्र. ४२४/३ अन्वये रक्कम रुपये १,१०,०००/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी मिळालेली आहे.

सदर काम हाती घेण्यासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र. २/९२-९३ जा. क्र. मनपा/श. अ./३४९/९२ दि. ३०-०४-९२ अन्वये निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या तारखेपर्यंत एकूण (५) कोऱ्या निविदा फार्म विक्री झाल्यापैकी निविदा स्विकारण्याच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण (३) निविदा फॉर्म दर भरलेल्या प्राप्त झाल्या त्या दि. १२-०५-९२ ला गुत्तेदारासमक्ष उघडण्यात आल्या त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. संजय भालेराव | ५% जास्त दराने |
| २. | श्री. बी. एम. काथार | अंदाजपत्रकीय दराने |
| ३. | श्री. मौला अली यारखान | ६% जास्त दराने |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दराची श्री. बी. एम. काथार यांची निविदा मंजुरीसाठी प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, नुतन कॉलनी येथील प्राथमिक शाळेकरीता संउास व बांथरुम आणि संरक्षित भिंत बांधण्याच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दराच्या श्री. बी. एम. काथार यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १०६/९ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी अभिप्राय दिला की, परीमल सोसायटी अंतर्गत खडी रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामाकरीता सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन १९९१-९२ च्या दरसुची नुसार र. रु. ७४,५००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरचा खर्च सन १९९१-९२ च्या शासकीय अनुदानातुन करण्यात येईल.

सदर कामाकरीता कार्यालयीन निविदा सुचना क्र. मनपा/मशअ/१८६/९२ दि. ११-०५-९२ अन्वये सदर कामाकरीता स्थनिक वृत्तपत्रात सुचना प्रसिध्द करुन निविदा पत्रके मागविली असता निविदापत्रके विक्रीच्या अंतिम तारखे पर्यंत फक्त एक निविदा विकल्या गेले व निविदापत्रक स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत सदर एक निविदापत्रक दर भरुन प्राप्त झाले. प्राप्त झाले निविदा पत्रक दि. २५-०५-९२ रोजी उघडण्यात आले त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. खाजा मोईनोद्यीन | ४.९७% जास्त |

श्री. खाजा मोईनोद्यीन यांचे निविदापत्रकाचे दर अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.९७ जास्त होते. परंतु सदर दर जास्त वाटत असल्याने त्यांना पत्र क्र. मनपा/अशअ/२हा/९२ दि. ०२-०६-९२ अन्वये सदर काम आपण अंदाजपत्रकीय दराने करण्यास तयार आहात काय? याबाबत विचारणा केली असता त्यांनी दि. ०५-०२-९२ रोजी लेखी पत्र देवून कळविले आहे की, सदर काम लहान असल्याने व या रस्त्यावरील खडी दर आल्याने सदर काम मला अंदाजपत्रकीय दराने करण्यास परवडत नाही. तरी हे काम मो. ४.९७% जास्त ऐवजी ३% जास्त या दराने करण्यास तयार आहे.

तरी श्री. खाजा मोईनोद्यीन यांचे अंदाजपत्रकीय ३% जास्तीचे दर मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, परिमल सोसायटी अंतर्गत खडी रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामाकरीता दि. ०५-०२-९२ च्या लेखी पत्रकानुसार उक्त काम गुत्तेदार श्री. खाजा मोईनोद्यीन यांचेकडून अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ३% जास्त दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १०७/१० :**

महानगरपालिकेच्या बांधकामासाठी खुल्या बाजारातुन सिमेंट विकत घेणे विषयी निविदा दरपत्रक सुचना क्र. मनपा/शह/भांडार/३४८/९२ दिनांक ३०-०४-९२ द्वारे निविदापत्रक मागविले असता दि. १५-०५-९२ रोजी एकूण पाच (५) दरपत्रक वसुल झाले असुन, खालील प्रमाणे दर व अटी दर्शविले आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | सिमेंट कार्पोरेशन ऑफ इंडिया | **अटी**<br>१) महानगरपालिकेच्या गोडाऊनमध्ये थप्पी लावणे सर्व करासह दर दर्शविल्या आहे.<br>२) १०० अग्रीम धन द्यावे लागेल.<br>३) १५ दिवसाव्या आत माल पुरवठा करण्यात येईल.<br>४) सदरील दर हा ३० दिवसा करीता बंधनकारक राहील.<br>५) सदरील दरपत्रकास ५०० मे. टनाचा पुरवठा असा उल्लेख केलेला आहे.<br>६) जर शासनाच्या कुठल्याही करात वाढ झाल्यास ती वेगळी दयावी लागेल. |
| २. | देवगीरी इंटर प्रायझेस | ११०.०० प्रति गोणी<br>१) १००% अग्रीम धन दयावे लागेल.<br>२) अनामत रक्कम जमा केलेली नाही. |
| ३. | आरेएन्ट सिमेंट | १०२.०० प्रति गोणी<br>१) सदरील दरात जकात कर वगळता इतर सर्व कर समाविष्ट आहे.<br>२) शासनामार्फत करात वाढ झाल्यास ती वेगळी सोसावी लागेल.<br>३) सदरील दरपत्रक उघडल्यापासुन ३ महिन्यापर्यंत बंधनकारक<br>४) मालाचा पुरवठा त्वरीत ३० दिवसात करण्यात येईल.<br>५) १००% अग्रीम धन द्यावे लागेल. |
| ४. | में. पांडे सन्स | १०० प्रति गोणी<br>१) सदर दर जकात कर व सिमेंटची उतराई वगळून आहे.<br>२) जर कार्यालयामार्फत प्रति टन रु. १०.०० (दहा रुपये) प्रमाणे दिल्यास सिमेंटची उतराई करण्यात येईल.<br>३) जकात कर ३% आमच्याकडून भरण्यात येऊन त्याची रक्कम बिलात वेगळी दाखविण्यात येईल.<br>४) जर केंद्रीय दरात व इतर करात वाढ झाल्यास सदरील रक्कम वेगळी घ्यावी लागेल.<br>५) सिमेंट पुरवठयाच्या दरात मुदत ३१-०५-९२ पर्यंत आहे. मालाचा पुवठा ८ ते १० दिवसात करण्यात येईल.<br>६) सिमेंटची चाचणी अहवाल एकदाच देण्यात येईल. |
| ५. | व्हि. ए. ट्रेडींग कंपनी | १०१.५० प्रति गोणी<br>१) महानगरपालिकेच्या गोडाऊन मध्ये सर्व करासह थप्पी लावणे.<br>२) प्रति टन २०० मे. टन सिमेंटच्या बिलाची रक्कम अदा करणे.<br>३) चाचणी अहवाल सी. सी. आय. एल. टी. डी. अदिलाबाद फॅक्टरीने प्रमाणित केलेला सादर करण्यात येईल.<br>४) सदरील दर हा ३० दिवसासाठी बंधनकारक राहील. |

वरील दर पाहता तुलनात्मकदृष्टया कमी व्ही. एस. ट्रेडींग कंपनी सी. सी. आय. सिमेंट यांचे प्रति टन रुपये २०३०.०० दोन हजार तीस आहे.

तसेच आतापर्यंतची मागणी पाहता पुढील तीन महिन्यासाठी एकूण ५०,००० गोणी २५०० मे टन सिमेंटची आवश्यकता असुन, वरील दराने म्हणजे प्रति मे. टन रक्कम रु. २०३०.०० (दोन हजार तीस) प्रमाणे एकूण खर्च र. रु. ५०,७५,०००/- (पन्नास लाख पंचाहत्तर हजार) एकूण खर्च येऊन अटीसह मान्यतेसह सादर.

**ठराव :**

प्रस्तावीत कामाबाबत पुढील सभेत विचार करण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. १०८/११ :**

सहाय्यक आयुक्त-२ यांनी प्रस्ताव सादर केला की, महानगरपालिकेतील सर्व चतुर्थ श्रेणी कर्मचारी स्त्रि व पुरुष व सर्व निरिक्षक व सुरक्षा रक्षक विभागातील कर्मचाऱ्यांना गणवेष सोबतचे साहित्य देण्याकरीता निविदा मागविण्यात आल्या असता फक्त दोनच निविदा दरपत्रके प्राप्त झाले आहेत. तुलनात्मक कमी दरांचा तपशील पुढील प्रमाणे आहे.

**अ) मे. न्यु भारत स्टोअर्स औरंगाबाद**

| | | |
|---|---|---|
| १) | लाठी | रुपये २५.०० प्र. नग |
| २) | डी. अेम. बुट | रुपये २५० ते ३०० प्र. जोड |

**ब) मे. विजय जनरल स्टोअर्स औरंगाबाद**

| | | |
|---|---|---|
| १) | ऑफीसर पि कॅप | रुपये १२५.०० प्र. नग |
| २) | कॅप बॅच | रुपये ८.०० प्र. जोड |
| ३) | ऑफिसर स्टार | रुपये ८.०० प्र. जोड |
| ४) | सॉक्स नायलॉन खाकी | रुपये १७.५० प्र. जोड |
| ५) | ब्ल्यु बॅरेट कॅप | रुपये २२.०० प्र. नग |
| ६) | लाईन यार्ड | रुपये ०८.५० प्र. नग |
| ७) | व्हिजन (शिटी) | रुपये ८.०० प्र. नग |
| ८) | लेदर बोल्ट | रुपये ४८.०० प्र. नग |
| ९) | नेम प्लेट | रुपये २६.०० प्र. नग |
| १०) | ऑफीसर्स रेड शु | रुपये २३५.०० प्र. जोड |
| ११) | मनपा शोल्डर बॅच | रुपये १५.०० प्र. जोड |
| १२) | लेडीज चेस्ट बॅच | रुपये ४५.०० प्र. नग |

वरील प्रमाणे दर्शविण्यात आलेले तुलनात्मकदृष्टया कमी आहेत. करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिकेतील चतुर्थ श्रेणी कर्मचारी (स्त्री/पुरुष निरिक्षक आणि सुरक्षा विभागातील कर्मचारी यांना गणवेष सोबत दयावयाचे खालील साहित्याकरीता त्यासमोर दर्शविलेले दर आणि दरपत्रक धारकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**अ मे. न्यु भारत स्टेअर्स औरंगाबाद** १) लाठी - रुपये २५.०० प्रती नग

२) डी. अेम बुट - २५० ते ३०० प्रती जोड

**ब मे. विजय जनरल स्टोअर्स औरंगाबाद**

| | | |
|---|---|---|
| १) | ऑफिसर पिकॅप | रुपये १२५.०० प्र. नग |
| २) | कॅप बॅच | रुपये ८.०० प्र. नग |
| ३) | ऑफिसर्स स्टार | रुपये ८.०० प्र. नग |
| ४) | सॉक्स नायलॉन खाकी | रुपये १७.५० प्र. जोड |
| ५) | ब्ल्यु बॅरेट कॅप | रुपये २२.०० प्र. नग |
| ६) | लाईन यार्ड | रुपये ०८.५० प्र. नग |
| ७) | व्हिजन (शिटी) | रुपये ०८.०० प्र. नग |
| ८) | लेदर बोल्ट | रुपये ४८.०० प्र. नग |
| ९) | नेम प्लेट | रुपये २६.०० प्र. नग |
| १०) | ऑफीसर्स रेड शु | रुपये २३५.०० प्र. जोड |
| ११) | मनपा शोल्डर बॅच | रुपये १५.०० प्र. जोड |
| १२) | लेडीज चेस्ट बॅच | रुपये ४५.०० प्र. नग |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १०९/१२ :**

साहाय्यक आयुक्त-२ यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, सन ९२-९३ सालात ड्रेनेज बांबु सुतळी, करण्याकरीता निविदा मागविण्यात आल्या असता एकूण पाच निविदा दरपत्रके प्राप्त झाले त्यांच्या दराचा तुलनात्मक तक्ता पुढील प्रमाणे आहे.

| अ. क्र. | नांव | ड्रेनेज बांबु दर प्र. र. फु | सुतळी प्र. किलो |
|---|---|---|---|
| १ | मे. न्यु भारत स्टोअर्स | ७.९० | २३.०० |
| २ | मे. मनोज इंटरप्रायझेस | ५.५० | १२.०० |
| ३ | मे. तय्यबा टिंबर मार्ट | ५.०० | ३०.०० |
| ४ | मे. राजसिल्स कार्पोरेशन | - | १४.०० |
| ५ | मे. अशफाक अहेमद | ४.४५ | २८.०० |

वरील प्रमाणे तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दर ड्रेनेज बांबुचे मे. अशफाक अहेमद बांबू मर्चंट यांचे रुपये ४.४५ प्र. र. फुट प्रमाणे व सुतळी चे दर मे. मनोज इंटरप्रायझेस यांचे रुपये १२.०० प्रति किलो प्रमाणे आहेत. तरी यांचे दरास मान्यतेबाबत प्रस्ताव विचाराधीन .

**विषय क्र. ११०/१३ :**

अ) आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी प्रस्तावित केले आहे की, महापालिकेने सिडको एन-८ मध्ये सिडको प्रशासनाने रुग्णालयाची वास्तु बांधुन महानगरपालिकेला भाडे तत्वावर चालविण्यासाठी दिली आहे. सर्वसाधारण सभेने चा रुग्णालयाच्या अधिकारी व कर्मचारी वृदांची पदे ठराव क्र. २/२ दि. ११-०७-९२ रोजी मंजुर करुन दिली आहे. परंतु यामध्ये होणारा खर्च महानगरपालिका करील असा ठराव न केल्यामुळे या दवाखान्यावर करण्यात आलेल्या ४,५१,५८६ रुपये च्या खर्चास आता कार्योत्तर मान्यता द्यावी.

ब) वैद्यकीय अधिकाऱ्यांची पदे शासनाकेड मंजुरीसाठी दि. १५-१०-९२ रोजी पत्र क्र. आस्था-१/४४४३/९१ अन्वये सादर केली आहे. परंतु अदयाप पवितो या पदास शासनाने मंजुरी दिलेली नाही. मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९ अन्वये शासनाच्या मंजुरी शिवाय सहा महिन्यापेक्षा जास्त काल सर्वसाधारण सभेने मंजुर केलेल्या पदावर नेमणुक करता येत नाही. परंतु सिडको विभागात सुरु केलेल्या दवाखान्यातील कर्मचाऱ्यांच्या नेमणुका सहा महिन्यापेक्षा अधिक काळासाठी म्हणजे अकरा महिन्यासाठी केल्या गेल्या आहेत ही बाब स्थायी समितीच्या नजरसे आणुन देवून या नेमणुकीला ६ महिन्यापेक्षा जास्त काळ म्हणजे ५ महिने जास्त झाले आहेत. यास कार्योत्तर मंजुरी देण्यासाठी प्रस्ताव सादर.

क) शासनाने वैद्यकीय अधिकारी यांच्या पदास मंजुरी न दिल्याने वैद्यकीय अधिकाराच्या पदाशिवाय हे रुग्णालय चालविणे शक्य नसल्याने हे रुग्णालय पुढे चालु ठेवावे की नाही, व हयाचा खर्च महापालिकेने करावा अथवा सिडको प्रशासनाने करावा या बाबत सिडको सिडको प्रशासनाशी चर्चा करुन निणर्य घेणे जरुरी आहे.

याबाबत निर्णय घेण्यासाठी व वैधानिक कार्यवाहीसाठी प्रस्ताव सादर.

**ठराव :**

अ) प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, एन-८ येथील वास्तु मध्ये भाडे तत्वावर चालु असलेल्या, रुग्णालयात, मनपा ठराव क्र. २/२ दि. ११-०७-९० अन्वये कार्यरत असलेल्या वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांचेवर झालेल्या र. रु. ४,५१,५८६/- च्या खर्चास सर्वानुमते कार्योत्तर मंजुरी देण्यात येते.

ब) तसेच उक्त ठरवान्वये नेमणुक करण्यात आलेल्या पदास शासनाकडुन अदयाप मंजुरी मिळालेली नसल्यामुळे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ अन्वये शासनाच्या मंजुरी शिवाय नेमणुक केलेल्या आणि ६ महिन्यापेक्षा जास्त झालेल्या ५ महिन्याच्या कालावधीस सर्वानुमते कार्योत्तर मंजुरी देण्यात येते.

वर नमूद केल्याप्रमाणे कार्योत्तर मंजुरीचा ११ महिन्याचा कालावधीही संपलेला असल्यामुळे एन-८ येथील रुग्णालय पुढे चालु ठेवण्याच्या दृष्टीने दि. १५-१०-९२ अन्वये शासनाकडे मंजुरीसाठी पाठविलेल्या पदांना मंजुरी मिळेपर्यंत दिनांक ११-०७-९० चे ठरावाप्रमाणे नियुक्त करण्यात आलेल्या पदांना ११ महिन्याचा कालावधी संपल्याचे तारखेपासुन पुढील ३ महिन्याचे कालावधी करीता मुदत वाढ देण्यात सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

क) एन-८ येथे भाडे तत्वावर चालु असलेल्या रुग्णालयातील अधिकारी व कर्मचारी वृंद यांचा पगार व इतर खर्च मनपाने करावा अथवा सिडको प्रशासनाने करावा याबाबत मा. आयुक्त यांनी सिडको प्रशासनाशी चर्चा करुन त्याबाबतचा अहवाल सभागृहा दाखल केल्यानंतर त्यावर विचार करण्यात येईल असे सर्वानुमते ठरले.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १११/१४ :**

पुस्तकपेढी योजनेखाली इयत्ता १ ली, २ री, ३ री, ४ थी च्या विद्यार्थ्यांना नविन क्रमीक पुस्ताकांचे संच उपलब्ध करुन देण्यासाठी शासनाकडून अनूदान मंजुर केले जाते. शिक्षण संचानालय, महाराष्ट्र राज्य पुणे-१ यांचे पत्र क्र. प्राशिरा ३९९२/९२-९३ पु. पे. यो/मागणी/न.प.) १९-ड (६) दि. २२-०४-९२ प्रमाणे शासनाकडून औरंगाबाद महानगरपालिका शिक्षण विभागा करीता पुस्तक पेठी योजने अंतर्गत सन ९२-८३ करीता

एकूण १,२१,०००/- एक लाख एकवीस हजार रुपये अनुदान तरतुदी उपलब्ध करुन दिले आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | सर्वसाधारण घटक योजना तरतुद | ४८,०००/- |
| २. | विशेष घटक योजना तरतुद | ७३,०००/- |
| | **रुपये** | **१,२१,०००/-** |

तसेच उपलब्ध तरतुदीच्या मर्यादीत पाठय पुस्तकांचे संच नेहमीच्या पध्दतीनुसार पाठयपुस्तक मंडळाकडून रोख स्वरुपात खरेदी करण्यात द्यावयाचे आहे. झालेल्या खरेदीच्या प्रमाणात नगरपालिका वर्गानुसार (अ.ब.क.) जो खर्च होईल. तो नंतर अनुदान रुपये (५०%) आपणास देण्यात येईल.

करीता पुस्तकपेठी साठी पुस्तक खरेदी करीता रुपये १,२१,०००/- (एक लाख एकवीस हजार रुपये) मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

**श्री. तुळशीराम भगुरे, श्री. अलीम बेग, श्री. गिरजाराम हाळनोर, श्री. जयवंत ओक :** मनपा शाळेतील प्रत्येक विद्यार्थ्यांकडून रुपये एक याप्रमाणे रक्कम जमा केली जाते. मनपा प्रशासनातर्फे सर्व प्रकारचा शालेय व इतर खर्च वेळोवेळी केला जातो तेव्हा अशा प्रकारे दरमहा रक्कम का वसुल केली जाते. याचा खुलासा व्हावा आणि दरमहा वसुल केलेली, रक्कम बंद करण्यात यावी. याशिवाय विद्यार्थ्यांकडून जमा करण्यात आलेली रक्कम मुख्यध्यापकांच्या नावावर ठेवता येती का? तेव्हा आतापर्यंत अशा प्रकारे किती रक्कम वसुली झाली. त्यापैकी किती रक्कम खर्च झाली. याबाबतची सविस्तर माहिती पुढील सभेत देण्यात यावी.

**शिक्षणाधिकारी :** सर्वसाधारण सभेच्या ठरावानुसार मनपा शाळेतील प्रत्येक विद्यार्थ्यांकडून दरमहा रुपये एक या प्रमाणे रक्कम जमा केली जाते. जमा झालेल्या रक्कमेचा खर्च शाळेच्या उपयोगाकरीता केला जातो.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, पुस्तक पेठी योजनेखाली मनपा शाळेतील इयत्ता पहिली ते चौथी पर्यातच्या विद्यार्थ्यांना नविन क्रमिक पुस्तकांचे संच सन १९९२-९३ या वर्षाकरीता पुस्तकपेठी योजनेअंतर्गत शासनाकडून मिळणाऱ्या अनुदानातील तरतुदीतुन उपलब्ध करुन देण्याकरीता नेहमीच्या पध्दतीनुसार र. रु. १,२१,०००/- खर्चाचे मर्यादीत पुस्तकांचे संच पाठयपुस्तक मंडळाकडून खरेदी कराव्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ११२/१५ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महानगरपालिकेचा अग्नीशमन विभागातील कर्मचाऱ्यांची वेतनश्रेणी इतर महानगरपालिकेतील अग्निशमन विभागातील कर्मचाऱ्यांपेक्षा तफावत आहे व अग्निशमन सेवा अत्यावश्यक सेवा आहे. त्यामुळे अग्निशमन विभागातील कर्मचाऱ्यांच्या कामाच्या स्वरुपानुसार खालील प्रमाणे वेतन श्रेणी वाढ करण्याकरीता प्रस्ताव सादर करण्यात येत आहे.

| अ. क्र. | पदाचे नाव | सध्याची वेतन श्रेणी | प्रस्तावित वेतन श्रेणी |
|---|---|---|---|
| १ | उप अग्निशमन अधिकारी | १२०३०-१४४० दरो | १४००-४०-१८०० दरो |

| | | | |
|---|---|---|---|
| | | ३०-१८०० | ५०-३३०० |
| २ | प्रमुख अग्निशाम | ९५०-२०-११५० दरो २५-१४०० | १२००-३०-१५६०-४०-२०४० |
| ३ | ड्रायव्हर ऑपरेटर | ९५०-२०-११५०- दरो २५-१५०० | १२००-३०-१५६०- दरो ४०-२०४० |
| ४ | मोटर फिटर | ९५०-२०-११५०- दरो २५-१५०० | १२००-३०१५६०-४०-२०४० |
| ५ | टेलीफोर ऑपरेटर | ९७५-२५-११५०-३०-१६६० | १२००-३०-१५६० दरो ४०-२०४० |
| ६ | फायरमन | ८२५-१५-९०० दरो २०-१२०० | ९५०-२०-११५० दरो २५-१५०० |

वरील प्रमाणे प्रस्तावित केलेली वेतनश्रेणी दि. ०१-०१-९१ पासुन अग्निशमन सेवेतील कर्मचाऱ्यांना लागू करण्याबाबत तसेच अधिकारी वर्गास दरमहा रुपये ७५/- व इतर कर्मचाऱ्यास दरमहा रुपये ४८/- धुलाई भत्ता तसेच ओव्हर टाईम बंद करुन २४ तास डयुटी भत्ता म्हणुन अधिकारी वर्गास दरमहा रुपये १६९/- व इतर कर्मचाऱ्यांना दरमहा रुपये १३५/- प्रमाणे भत्ता देण्यात प्रस्ताव स्थायी समितीच्या विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

**श्री. तुळशीराम भगुरे :** प्रस्तावातील ड्रायव्हर ऑर्पेटर व मोटार फिटर या पदाचे कामाबाबत खुलासा व्हावा.

**अतिरिक्त शहर अभियंता :** वाहन चालवणे १ आगीच्या ठिकाणी मशिन ऑपरेटर करणे अशी दोन कामे एकाच व्यक्ती करीत असल्यामुळे या पदास ड्रायव्हर ऑपरेटर असे नांव देण्यात आले आहे.

**श्री. तुळशीराम भगुरे, श्री. मोहम्मद इस्माईल :** अग्निशमन विभागातील प्रत्येक पदाच्या क्रमाची माहिती पुढील सभेत देण्यात यावी तसेच नाशिक, अमरावती, व इतर नगरपालिकांमध्ये अग्नीशमन विभागातील विविध पदाकरीता कोणती वेतन श्रेणी आहेत. याबाबतची माहिती देण्यात यावी.

**मा. सभापती** : स. सभासदांच्या सुचनेप्रमाणे नाशिक व इतर नगरपालिकांकडून अतिरिक्त शहर अभियंता यांनी माहिती मागवावी.

**ठराव :**

नाशिक, अमरावती, व इतर महानगरपालिकांमध्ये अग्नीशमन दलाच्या वेतनश्रेणी बाबतची माहिती उपलब्ध झाल्यानंतर सदर प्रस्तावाबाबत विचार करण्यात येईल असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. ११३/१६ :**

कार्यकारी अभियंता महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला की, विशेष कार्यक्रम अंतर्गत जलनिःसारण वाहिनी टाकणेचे काम प्रगती पथावर आहे. त्या अंतर्गत मेनहोल चेंबर बांधुन तयार आहेत त्यावर एस एफ आर सी फ्रेन्स व कव्हर बसविणे बाकी आहे. त्यानुसार आवश्यक ८०० एस. एफ. आर. सी. फ्रेम व कव्हरची अंदाजे रुपये ६५०/- प्रति रिम व कव्हर जोडी प्रमाणे रुपये ५,२०,०००.०० चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले. वरील खर्चापैकी ६०० नगाचा खर्च रुपये ३,९०,०००/- सन १९८९-९० च्या विशेष विकास अनुदानातून व २०० नगाचा खर्च रुपये १,३०,०००/- सन ९१-९२ च्या विशेष विकास

अनुदानातून मागविला जाणार आहे. त्यानुसार वरील प्रमाणेच्या अंदाजपत्रकास मा. आयुक्त दिनांक. ०८-०२-९२ रोजी मंजूरी मिळाल्यानुसार त्या कामासाठी निविदा सुचना क्र. १३/९१-९२ ही जा. क्र. मनपा/विका/७०/९२ दिनांक १८-०२-९२ नुसार प्रसिध्दीसाठी जनसंपर्क अधिकारी यांचेकडे प्रसिध्दीस पाठविण्यात आली असता त्यांचेकडून दै. मुक्काद्यस, दै. स्वरगंगा, दै. देवगीरी, तरुण भारत व औरंगाबाद टाईम्स मध्ये प्रसिध्दीस देण्यात आली.

त्यानंतर निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत दोन कोऱ्या निविदा विक्री झाल्या व निविदा स्विकारण्याच्या अंतिम तारखेस दिनांक १२-०३-९२ रोजी दोन मोहरबंद निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त मोहोरबंद निविदा दिनांक १७-०३-९२ रोजी उघडण्यात आल्या असता निविदा धारकांनी दिलेले दर खालील प्रमाणे होते.

१) प्रतिभा इंडस्ट्रीज, मुंबई- रुपये ७०० प्रति रिम व कव्हर जोडी

२) के. के मेनहोल ॲन्ड ग्रेटींग - रुपये ७००/- प्रति रिम व कव्हर जोडी

दोन्ही निविदा धारकांनी समान दर दिलेले असल्यामुळे मा. आयुक्त याचे दिनांक २४-०५-९२ च्या आदेशाप्रमाणे दोन्ही निविदा धारकांना दिनांक ०८-०६-९२ रोजी दराबाबत वाटाघाटी करण्यासाठी मा. आयुक्त यांच्या दालनात उपस्थित राहण्यासाठी पत्र क्र. मनपा/विका/२०६/९२ दि. ०३-०६-९२ नुसार कळविण्यात आले.

त्यानुसार दिनांक ०८-०६-९२ रोजी के. के. मेनहोल व ग्रेटींग कंपनीचे प्रतिनिधी हजर झाले. मात्र प्रतिभा इंडस्ट्रीज मुंबई यांचे तर्फे कुणीही हजर राहीले नाही.

के. के. मेनहोल व ग्रेटींग व कंपनीचे प्रतिनिधी यांनी बंद लिफाफ्यात सुधा ारीत दर दिले व लिफाफा फोडल्यानंतर त्यांचे दर रुपये ६०९.०० प्रति रिम कव्हर जोडी असा आहे. हा दर अंदाजपत्रकापेक्षा ६.३०% कमी आहे.

तेव्हा के. के. मेनहोल ॲन्ड ग्रेटींग कंपनी नाशिक यांचा प्रति रिम व कव्हर जोडी रुपये ६०९ चा दर ( अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ६.३०% कमी ) मंजुरीचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, विशेष कार्यक्रमा अंतर्गत प्रगती पथावर असलेल्या जलनिःसारण वाहिनीचे मेनहोल चेंबर वर टाकण्यासाठी आवश्यक असलेल्या ८०० एस. एफ. आर. सी. फ्रेम व कव्हर च्या पुरवठया करीता मे. के. के. मेनहोल ॲन्ड ग्रेटींग कंपनी नाशिक रोड यांचेकडील दिनांक ०८-०६-९२ च्या पत्रकानुसार प्रति रिम कव्हर जोडी रुपये ६०९.०० (सहाशे नऊ) या दराने ८०० नग खरेदी करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ११४/१७ :**

उप आयुक्त यांनी अभिप्राय दिला की, सभाकक्ष विभागासाठी चक्रमुद्रण यंत्राची आवश्यकता असल्याकारणामुळे चक्रमुद्रण यंत्र खरेदी करण्यास्तव स्थानिक अधिकृत विक्रेत्यातर्फे दरपत्रक मागविण्यात आले असता एकूण दोन दरपत्रके प्राप्त झाली. त्यापैकी अंकुर इंटरप्रायझेस यांचे दर सर्वात कमी म्हणजे ल्का यंत्रास रुपये १४,५००/- असे आहे. परंतु त्यांच्याकडे चक्रमुद्रण यंत्र सध्या उपलब्ध नाही. करीता, दुसऱ्या कमी दराचे, म्हणजे १४,६६२/- किमंतीचे मे. नरीमन ॲन्ड सन्स औरंगाबाद यांचेकडून चक्रमुद्रण यंत्र खरेदी करण्यास व त्यांच्या खर्चास मान्यता देण्यात यावी. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सभाकक्ष विभागा करीता आवश्यक असलेले चक्रमुद्रण यंत्र मे. नीरमन ॲड सन्स यांचेकडून रु. १४,६६२/- रुपयामध्ये खरेदी करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ११५/१८ :**

शहर अभियंता महानगरपालिका यांनी प्रस्ताव सादर केला की, घाटी स्लम परीसरात (४) मीटर रुंदीचे रस्त्यात बाधीत होणाऱ्या घरांच्या भिंती पाडून त्या पुन्हा बांधण्याच्या कामासाठी ९१-९२ चे दरसुचीनुसार अंदाजपत्रक रु. १,८४,१००/- चे तयार करण्यात आले आहे. प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, घाटी स्लम भागातील ४ मीटर रुंदीचे रस्त्यात बाधीत होणाऱ्या घराच्या भिंती पाडून पुन्हा बांधण्याच्या कामासाठी र. रु. १,८४,१००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ११६/१९ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो. स्लिलीखाना येथील मनपा शाळा दोन खोल्या बांधण्याच्या कामासाठी सन १९९१-९२ च्या सा. बा. खात्याचे डी. एस. आर. दराने रक्कम रुपये १,६५,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. प्रस्ताव विचारार्थ मंजुरीस्तव सादर. सदरचा खर्च ९२-९३ या वर्षातील भांडवली इमारती या शिषकामधुन करण्यात येईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सिल्लेखाना येथील मनपा शाळेला दोन कोऱ्या बांधण्याच्या कामासाठी र. रु. १,६५,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ११७/२० :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, शिवाजी मैदान आमखास येथील कुत्रा घराचे (डॉग हाऊस) उर्वरीत कामासाठी सां. बा. खात्याचे सन १९९१-९२ चे दरसुचीनुसार र. रु. १,६७,९०२/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. सदरचा खर्च मरण बीफ मार्केट पाच लाखाच्या शिर्षकामधुन करण्यात येईल. प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शिवाजी मैदान ( आमखास ) येथील कुत्र्यांच्या घराचे उर्वरीत कामासाठी र. रु. १,६७,९०२/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ११८/२१ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो. कैलासनगर, येथील मनपा प्रा. शाळेला एक रुम वाढविण्यासाठी इमारतीस संरक्षित भिंत बांधण्याच्या कामासाठी सन १९९१-९२ च्या सा. बा. खात्याचे डी. एस. आर. दराने र. रु. २,३९,६७०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. सदरचा खर्च भांडवली इमारती या शिर्षकाखाली करण्यात येईल. प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, कैलास नगर येथील म. न. पा. शाळेला एक रुम वाठविण्यासाठी इमारतीस संरक्षित भिंत बांधण्याच्या कामाकरीता र. रु. २,३९,६७०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**प्रस्ताव क्र. ११९/२२ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो. संजयनगर, मुकूंदवाडी येथे आंबेडकर चौकास संरक्षित भिंत बांधण्याच्या कामासाठी सन १९९१-९२ च्या सा. बा. खात्याचे डी. एस. आर. दराने र. रु. १,१०,५६५/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. सदरचा खर्च भांडवली १ इमारती या शिर्षकामधुन करण्यात येईल. प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मो. संजयनगर मुकूंदवाडी येथे आंबेडकर चौकास संरक्षित भिंत बांधण्याच्या कामासाठी र. रु. १,१०,५६५/- च्या प्रस्तावास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १२०/९३ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, इंदिरानगर बायजीपुरा स्लम भागाची संबंधित वार्ड क्र. ३७ चे नगरसेवका सोबत पाहणी केली असता तेथील खडी रस्ते व डांबरी रस्ते अतिशय खराब झालेले असल्यामुळे रस्त्यांची दुरुस्ती करुन डांबरी करण करणे आवश्यक असल्यामुळे इंदिरानगर बायजीपूरा भागातील रस्ते दुरुस्त करुन डांबरीकरण करण्यासाठी अंदाजपत्रक १९९१-९२ चे दरसुचीनुसार र. रु. ४,९४,०००/- चे तयार करण्यात आले आहे. प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र. ३७ इंदिरानगर बायजीपूरा स्लम भागातील रस्ते दुरुस्ती करुन डांबरीकरणाच्या कामासाठी र. रु. ४,९४,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १२१/२४ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, स. न. ३२ मधील इंदिरानगर (बायजीपूरा) स्लम भागाची संबंधित नगरसेवका सोबत प्रत्यक्षा पाहणी केली असता तेथील रस्ते अतिशय खराब झाल्यामुळे रस्त्याचे डांबरीकरण करण्यासाठी प्रत्यक्ष पाहणीचे वेळी सुचना दिल्यानुसार रस्त्याचे डांबरीकरण करण्यासाठी सन १९९१-९२ चे दरसुची नुसार अंदाजपत्रक रु. १,२४,०००/- चे तयार करण्यात आले आहे. प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मो. इंदिरानगर ( बायजीपुरा ) येथे रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामासाठी र. रु. १,२४,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १२२/२५ :**

कार्यकारी अभियंता ( पा. पु. व ज. नि.) यांनी प्रस्ताव सादर केला की, चितांमणी कॉलनी येथील १५० मी. मी. व्यासाची चिनीमातीची पाईपलाईन काढून २५० मी. मी. व्यासाची आर. सी. सी. पाईप लाईन टाकण्याच्या कामासाठी परीसर अभियांत्रिकी विभागाचे

सन १९९१-९२ च्या दरसुचीनुसार र. रु. १,४४,६३५/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.

या ठिकाणी विद्यमान १५० मी. मी. व्यासाची चीनी पाईप लाईन माती व गाळाने भरलेली आहे. जमिनीचा नैसर्गिक उत्तर दक्षिण उतार असून, या कॉलनीच्या उत्तेरेकडे विवेकानंद कॉलेजची जागा असल्याने पुर्वीची ड्रेनेज लाईन उत्तर दक्षिण टाकूण प्लॉट क्र. १० पासून समर्थनगर ते हायकोर्ट या रस्त्यावर आणलेली आहे. त्यामुळे विद्यमान ड्रेनेज लाईनला कमी उतार दिलेला आहे. त्यामुळे ही लाईन नेहमी चोकअप होत असते व मैला रस्त्यावर वाहतो.

विवेकानंद कॉलेजच्या आवारात कठीण दगड असल्याने व ती जागा कॉलजेची असल्याने विद्यमान ड्रेनेज लाईनची दिशा न बदलविता ही लाईन अपस्टिंग करुन २५० मी. मी. व्यासाची आर. सी. सी. पाईप लाईन टाकणे आवश्यक आहे. करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, चितांमणी कॉलनी येथील १५० मी. मी. व्यासाची विद्यमान चिनी मातीच्या ड्रेनेज लाईनला कमी उतार असल्यामुळे सदर लाईन नेहमी चोकअप होऊन मला रस्त्यावर वाहात असला तरी या जमिनीचा नैसर्गिक उतार दक्षिण उत्तर असल्यामुळे प्लॉट क्र. १० पासून समर्थनगर ते हायकोर्ट या रस्त्यावर आणलेल्या पुर्वीच्या लाईनच्या कामात विवेकानंद कॉलेजच्या आवारात कठीण दगड लागला असला तरी या ड्रेनेज लाईनची दिशा न बदलता सदरील लाईन अप्रुटींग करुन २५० मी. मी. व्यासाची आर. सी. सी. ड्रेनेज लाईन टाकण्याच्या कामासाठी र. रु. १,४४,६३५/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १२३/२६ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो. हर्सुल येथील देवी मंदिरासमोर स्मशानभुमीसाठी बर्नींग शेड बांधण्याच्या कामासाठी सन ९१-९२ चे सा. बा. खात्याचे डी. एस. आर. दराने र. रु. १,६६,७२०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. सदरच्या खर्च इतर इमारती व उर्वरीत कामे या शिर्षकामधुन सन ९२-९३ मध्ये करण्यात येईल. प्रस्ताव मंजुरीसाठी सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मो. हर्सुल येथील देवली मंदिरासमोर स्मशानभुमीसाठी बर्नींग शेड बांधण्याच्या कामाकरीता र. रु. १,६६,७२०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १२४/२७ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, नागसेन कॉलनी येथे समाज मंदिर बांधण्याच्या कामासाठी स्थायी समिती बैठक २७-०३-९२ सभेतील ठराव क्र. ४३१ (१) दिनांक १३-०४-९२ अन्वये काम करणारी एजन्सी श्री. आय. जे. सिद्यीकी यांची अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ०.१०% कमी दराचे निविदा सर्वानुमते मंजुरी मिळालेली होती. तसेच गुत्तेदारास २% अनामत रक्कम भरणा बाबत कार्यालयीन पत्र क्र. मनपा/एम. ई. डब्ल्यु. बी./२१६/९२ दि. ०८-०५-९२ अन्वये पत्र दिले असता गुत्तेदाराने सदरचे काम करण्यास दि. २२-०५-९२ अन्वये असमर्थता दर्शविली आहे. काम तातडीचे करुन घेण्यासाठी दुसऱ्या

नंबरचे कमी दराचे अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ४% जास्त दराचे गुत्तेदार श्री. सय्यद गयासोद्यीन यांना कार्यालयीन पत्र क्रमांक मनपा/उ/अ/ई/२४०/९२ दिनांक ३०-०५-९२ अन्वये दर कमी करण्याबाबत पत्र दिले असता त्यांनी दि. ०१-०६-९२ अन्वये ४% जास्त दराऐवजी ३% जास्त दराने काम करण्यास तयार आहेत. असे लेखी कळविले आहे. तरी अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३% जास्त दराची दुसरे नंबरचे गुत्तेदार श्री. सय्यद गयासोद्यीन यांची निविदा मंजुरीचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, नागसेन कॉलनी येथे समाजमंदिर बांधण्याचे काम मंजूरी दराने करुन देण्याबाबत श्री. आय. जे. सिद्दीकी यांनी असमर्थता दर्शविल्यामुळे उक्त काम दुसऱ्या नंबरचे गुत्तेदार श्री. सय्यद गयासोद्यीन यांनी दि. ०१-०६-९२ अन्वये लेखी संमती दिल्यानुसार संबंधिताकडून अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ३% जास्त दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १२५/२८ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी अभिप्राय दिला की, भडकल गेट येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुर्णकृती पूतळा उभरण्यापुर्वी तेथे डॉ. बाबासाहेब आंबेडकरचा अर्धाकृती पुतळा होता सदर शाळा काढुन सध्या कार्यालयात ठेवला गेला आहे. सनमाननीय सदस्य श्री. इकबालसींग गील यांनी पत्र देवून सदर अर्धाकृती पुतळा घाटी येथील महापालिकोच्या शाळेच्या प्रांगणात उभारण्याबाबत सुचित केले आहे. तरी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा अर्धाकृती पुतळा घाटी येथील मनपा शाळेच्या प्रांगणात उभारण्याबाबतचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा अर्धाकृती पूतळा घाटाी येथील महानगरपालिका शाळेच्या प्रांगणात उभरण्याच्या कामासाठी र. रु. २४,९१२/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १२६/२९ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, रेल्वेस्टेशन येथे मनपा गेस्ट हाऊसच्या आवारात मनपा कर्मचारी (मा. महापौर उपमहापौर यांचे वाहनचालक) यांच्या अस्तित्वात असलेल्या क्वार्टरला संरक्षित भिंत बांधणे मा. स्थायी समिती अध्यक्ष यांच्या वाहनचालकासाठी क्वार्टर बांधण्याच्या कामासाठी सन १९९१-९२ चे डी. एस. आर. दराने श्र. रु. २,२५,६००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. सदरचा खर्च भांडवली इमारती शिर्षकामधून सन ९२-९३ मध्ये करण्यात येईल. प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, रेल्वे स्टेशन येथील मनपा गेस्ट हाऊसच्या आवारातील कर्मचाऱ्यांच्या ( मा.महापौर, मा. उपमहापौर हयांचे वाहनचालक ) निवासस्थानास संरक्षित भिंत बांधणे आणि मा. स्थायी समिती सभेती यांचे वाहतनचालकासाठी क्वार्टर बांधण्याच्या कामाकरीता रु. रु.२,२५,६००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

# *ऐनवेळेचे विषय*

**विषय क्र. १२७/३० :**

कार्यकारी अभियंता पा. पू. यांनी प्रस्ताव सादर केला की, सन ९२-९३ या वित्तीय वर्षासाठी पाणीपुरवठा जलशुध्दीकरणासाठी एकदर ७० मे. टन तुरळी खरेदी करावयाची आहे. सदरील कामाचे अंदाजपत्रक र. रु. १,९३,०००/- चे तयार करण्यात आले असून, स्थायी समितीचे दि. २९-०४-९२ चे बैठकीत ठराव क्र. ६०४/८५ अन्वये सदरील अंदाजपत्रकास मंजुरी मिळाली आहे. मे. धरमसी मोरारजी कंपनीचेच तुरटी खरेदी करण्याबाबत मंजुरी मिळाली आहे.

कार्यालयीन निविदा सुचना क्र. जा. क्र. मनपा/पा. पु.-१/१.३३/९२ दि. २९-०५-९२ अन्वये " डी " नमुन्यावर जाहीर निविदा मागविण्यात आल्या. सदरील निविदा सुचना दै. लोकमत टाईम्स व दै. सिटीजन्स या वृत्तपत्रात प्रसिध्द झाली.

कोरी निविदा विक्रीच्या नियोजीत दिनांकास (१०-०६-९२) रोजी दुपारी १.०० वाजेपर्यंत एकूण दोन कोऱ्या निविदा विक्री झाल्या. तसचे निविदा स्विकारण्याच्या नियोजीत दिनांकास म्हणजे १६-०६-९२ रोजी एकूण दोन निविदा दर भरुन प्राप्त झाल्या असता पुढील तपशीलाप्रमाणे दर प्राप्त झाले.

| | | |
|---|---|---|
| १. | महाराष्ट्र केमिकल्स | रु. २,६७५/- प्रति मे. टन |
| २. | श्री. लक्ष्मी सेल्स कॉर्पोरेशन | रु. २,७५०/- प्रति मे. टन |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराची निविदा महाराष्ट्र केमिकल्स यांची रु. २,६७५/- प्रति मे. टन या दराची आहे. संबंधित कमी दराचे निविदा धारकाने धरमशी मोरारजी कं. चे अधिकृत विक्रेते असल्याबाबतचे प्रमाणपत्र दाखल केले आहे. मे. महाराष्ट्र केमीकल्स यांनी निविदेत दिलेला दर हा सर्व करासहीत आहे. करीता मे. महाराष्ट्र केमिकल्स यांची रु. २,६७५/- प्रति मे. टनाची निविदा स्विकारण्याच्या मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सन १९९१-९३ या वित्तीय वर्षात पाहणी पुरवठा जलशुध्दीकरणाच्या कामासाठी आवश्यक असलेली ७० मेट्रीक टन तुरटी खरेदी करीता प्रति मे. टन रुपये २,६७५/- (सर्व करासहीत) या तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराच्या मे. महाराष्ट्र केमीकल्स ( मे. धरमसि मोराजी कंपनीचे अधिकृत विक्रेते) यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

यानंतर सभेचे कामकाज संपल्याचे मा. सभापती यांनी जाहीर केले.

स्वाक्षरित/- स्वाक्षरित/-
सचिव, सभापती, स्थायी समिती
महानगरपालिका, औरंगाबाद. महानगरपालिका, औरंगाबाद.

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद*

**दिनांक ०४-०७-९२ रोजी दुपारी ३.०० वाजता भरलेल्या स्थायी समिती सभेचा वृत्तात शनिवार दि. ०४-०७-९२ रोजी दुपारी ३.०० वाजता समिती सभागृहात मा. सभापती ॲड श्री. इगबालसिंग गिल यांच्या अध्यक्षतेखाली स्थायी समिती सभेस सुरुवात झाली. या सभेस कार्यालयीन अधिकाऱ्यांसह निम्ननिर्दिष्ट सन्माननीय सभासद उपस्थित होते.**

१) श्री. नारायण मोहन फत्तेलष्कर
२) श्री. भगुरे तुळशीराम छगन
३) श्री. अलीम बेग मिर्झा कलीम बेग
४) श्री. गिरजाराम नानाराव हाळनोर
५) श्री. विजय गोविंदराव पालीवाल
६) श्री. जावेद हसनखॉन कासीमहसन खॉन
७) श्री. मोहमद इस्माईल अब्दुल करीम
८) श्री. अजिजुल्ला बेग वाहेद बेग
९) श्री. पेरकर विठ्ठल कोडांजी
१०) श्री. शिंदे मधुकरराव माणिकरराव
११) श्री. ओक जयवंत केशवराव

**विषय क्र. १२८/१ :**

दिनांक २३-०६-९२ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :**

**श्री. अजिम बेग, श्री. मधुकर शिंदे** : दिनांक २३-०६-९२ च्या सभेती चर्चेनुसार रेटलिस्ट कामाच्या यादी बरोबर ए-१ अन्वये हाती घेतलेल्या कामाची महिती देण्यात आली नाही. तेव्हा सभागृहाच्या निर्णयाप्रमाणे पूर्ण माहिती देण्यात यावी.

**श्री. अजिजुल्ला बेग :** दि. २३-०६-९२ ठराव क्र. १०७ बाबत पुढील सभेत विचार करण्यात येईल. असा निर्णय झालेला असतांना सदर प्रस्ताव आजच्या विषय पत्रिकेवर का ठेवण्यत आला नाही. याचा खुलासा व्हावा.

**मा. सभापती** : सभागृहाने एखाद्या प्रस्तावाबाबत स्थगित ठेवण्याच्या निणर्य घेतल्यानंतर सदर ठरावावर केव्हांही चर्चा करता येते. तसेच एखादया प्रस्तावाबाबत पुढील सभेत विचार करण्यात येईल. असा निर्णय घेतला असेल आणि सदर सभेचे इतिवृत्त कायम करतांना त्यावर कुठल्याही प्रकारचा निर्णय झाला नाही तर अशा प्रस्तावा बाबत मा. सचिव यांनी कार्यवाही करावी.

**श्री. विठ्ठल पेरकर :** दि. २३-०६-९२ च्या सभेतील चर्चेनुसार झाले अ.६ मध्ये कनिष्ठ अभियंता रूजू झाले आहेत. याच सभेने पाणी पुरवठा विभागाकरीता पुर्वी प्रमाणेच आणखी एक उप अभियंता देण्याबाबत चर्चा झाली असतांना पाणी पुरवठा विभागात उप अभियंता अद्याप का रुजू झाले नाहीत याचा खुलासा व्हावा. शहराचा विस्तार झाला नाही काय?

**श्री. मोहमद इस्माईल, श्री. मधुकर शिंदे, श्री. अजिजुल्ला बेग :** उप अभियंता श्री. ए. आर. शिंदे यांची बदली वाद झाला म्हणुन झाली काय? याचा खुलासा व्हावा. पाणी पुरवठा विभागात जे उप अभियंता म्हणुन काय करतात. ते कनिष्ठ अभियंता असून, त्यांचेकडे अतिरिक्त भार असतांना मग आणखी अतिरिक्त भार त्यांचेकडे का टाकला. ऐन . उन्हाळयाचे दिवसात पाणी पुरवठा विभागात काम करणाऱ्या उप अभियंताची बदली करणे योग्य होईल का? तसेच एका अधिकाऱ्यांना दोन अतिरिक्त चार्ज देता येतात का? उप अभियंता श्री. ए. आर. शिंदे ज्या भागात पाणी पुरवठयाचे काम करीत होते. त्या भागाचे नगर सेवकांची त्याचे कामाबाबत काहीही तक्रार नाही.

**मा. उप आयुक्त :** प्रशासकीय अधिकारी अथवा कर्मचाऱ्यांची बदली दोन प्रकारे होत असते एक कारण संबंधित कर्मचाऱ्यांविषयी काही तक्रार असेल तर, व दुसरे कारण संबंधित कर्मचारी वरीष्ठ अधिकाऱ्याने घालुन दिलेल्या नियमाप्रमाणे काम करीत नसेल तर अशा दोन प्रकारे बदली होत असते.

**श्री. जावेद हसन खान :** सर्वसाधारण नियमाप्रमाणे तीन (३) वर्षे पर्यंत एकाच जागी काम केल्यानंतर कर्मचाऱ्यांची बदली करता येते. श्री. ए. आर. शिंदे यांनी पाणी पुरवठा विभागात फक्त सहा महिने काय केले आहे.

**श्री. मधुकर शिंदे :** पाणी पुरवठा विभागाचे लाईनमन पैसे घेऊन कमी जास्त प्रमाणात वॉल उघडतात त्यांचे काय याचा खुलासा व्हावा.

**कार्यकारी अभियंता :** उप अभियंता श्री. ए. आर. शिंदे यांनी सहकार्याने काम केले नाही. त्यामुळे श्री. रामटेके यांना त्रास झाला. श्री. शिंदे यांनी न विचारता सिडकोला पाणी दिले म्हणून बदली बाबत अहवाल दिला.

**श्री. गिरजाराम हाळनोर, श्री. अजीम बेग, श्री. जावेद हसनखान श्री. मधुकर शिंदे :** सिडको विभागाला बऱ्याच वेळा पाणी मिळाले नाही. म्हणुन उप अभियंता श्री. कलीम अख्तर याची बदली करणार का? याचा खुलासा व्हावा.

**श्री. महमद इस्माईल :** उप अभियंता श्री. ए. आर. शिंदे यांचे कडून त्यांचे कार्यकाळात आमच्या भागात व्यवस्थित काम करण्यात आले आहेत. त्यांचे बदली नंतर माझे वार्डात मागील सात दिवसात पाणी आले नाही म्हणून कार्यकारी अभियंता व मा. आयुक्त यांचेशी दुरध्वनीवरुन संपर्क साधला व पाण्या बाबतची तक्रारी केली. तेव्हा त्यावर काय कार्यवाही झाली. याचा खुलासा व्हावा.

**श्री. अजिजुल्ला बेग :** प्रशासनाकडे उप अभियंता कमी आहेत का? कर आकारणी विभागामध्ये बी. ई. उपयंता काम करतात त्यांना पाणी पुरवठा विभागात देण्यात यावे.

**मा. उप आयुक्त :** पाणी पुरवठा विभागासाठी एक उप अभियंता देण्यात येईल.

**श्री. जावेद हसन, श्री. महमद इस्माईल :** एखाद्या कर्मचाऱ्यांबद्दल तक्रारी असेल तर, जरुर बदली करा. जो उप अभियंता आमच्या प्रभागात चांगले काम करतो आणि ज्यांना कामाची माहिती आहे. अशा कर्मचाऱ्याला बदलने योग्य नाही, म्हणुन आमच्या विभागाचे पाणी पुरवठयाच्या कामासाठी श्री. शिंदे यांना तेथे देण्यात यावे.

**श्री. नारायण फत्तेलष्कर :** जनरल बदल्या होणार असे मार्च पुर्वी जाहीर केले होते. त्यांचे काय झाले याचा खुलसा व्हावा.

**मा. उप आयुक्त :** कार्यकारी अभियंता यांनी मा. आयुक्त यांच्याकडे दिलेल्या अहवालावर शिंदे यांची बदली झाली आहे. त्यास मा. आयुक्तांची मंजुरीही दिलेली आहे.

**श्री. नारायण फत्तेलष्कर, श्री. जावेद हसनखान :** श्री. शिंदे यांच्या विरुध्द असलेल्या तक्रारी बाबत त्यांना नोटीस देण्यात आली होती काय?

**श्री. महमद इस्माईल :** उप अभियंता श्री. शिंदे यांच्या बदली बाबत सभागृहात झालेला खुलासा समाधान कारक नसल्यामुळे आम्ही ००.०५ मिनिटांकरीता सभात्याग करीत आहोत. पुढील मिटींग पर्यंत याबाबत निर्णय झाला नाही तर आम्हाला वेगळा विचार करावा लागेल.

यानंतर सन्माननीय सभासद श्री. मोहमद इस्माईल, श्री. नारायण फत्तेलष्कर, श्री. तुळशीराम भगुरे, श्री. अलीम बेग मिर्झा कलीम बेग, श्री. गिरजाराम हाळनोर, श्री. विजय पालीवाल, श्री. जावेद हसनखान, श्री. अजिजुल्ला बेग, श्री. विठ्ठल पेरकर, श्री. मधुकर शिदं आणि जयवंत ओक यांनी अंदाजे ४.०० वाजता सभात्याग केला.

अंदाजे ४.०५ वाजता सभात्याग केलेल्या सर्व स. सदस्यांनी सभागृहात प्रवेश केला.

**श्री. गिरजाराम हाळनोर :** कार्यालयात बी-१ टेंडर कार्य संपलेले आहेत. भांडार विभागात याबाबत छपाईचे आदेश मिळालेले नाहीत. अशी माहिती चर्चेअंती मिळालेली आहे. तेव्हा बी-१ फार्मचा साठा संपल्यापुर्वी छपाईची कार्यवाही करावयास हवी होती.

खडकेश्वर येथील वाचनालयात इमारतीचे बांधकाम चालु आहेत. या ठिकाणी असलेली जुनी इमारत ४०/५० वर्षापुर्वीची आहे. हा जुना भाग पाडण्याच्या स्थितीत झाला आहे. चालु असलेले बांधकाम किती हॉलचे आहेत.

**उप अभियंता :** खडकेश्वर वाचनालय येथे पुठच्या बाजुस इमारती दोन हॉलचे बांधकाम चालु आहे.

**श्री. नारायण फत्तेलष्कर, श्री. अजिजुल्ला बेग :** जकात विभागात काम करणारे काही अधिकारी आणि त्याचबरोबर महापालिकेच्या इतर विभागतही गेल्या ८/१० वर्षापासुन एकाच ठिकाणी काम करत आहे. सर्वसाधारण नियमाप्रमाणे एका ठिकाणी ३ वर्षे सतत काम केल्यानंतर त्या ठिकाणाहून संबंधितांची बदली झाली पाहिजे, परंतु तसे न होता जेथे अधिकाऱ्यांशी परत नाही. तेथे ताबडतोब बदली होते.

**मा. उप आयुक्त :** एकाच ठिकाणी २ वर्षापेक्षा जास्त काळ काम करत असलेल्या अधिकारी / कर्मचारी यांची यादी करण्यात आली आहे. या यादीस मंजूरी मिळताच नियमाप्रमाणे बदली करण्यात येईल. यासाठी किमान एक महिना कालावधी लागेल.

**श्री. नारायण फत्तेलष्कर :** सभागृहात खुलासा केल्याप्रमाणे अधिकारी / कर्मचारी बदली बाबत एक महिन्यानंतर माहिती देण्यात यावी. तसेच मागील सभेतील चर्चेनुसार मनपा शाळेतील विद्यार्थ्यांकडून वसुल करण्यात येणाऱ्या एक रुपया फी बाबत पावीती देण्यात येते काय? याचा खुलासा व्हावा.

**श्री. अलीम बेग :** मनपा शाळेतील विद्यार्थ्यांकडून वसुल करण्यात येणाऱ्या फी पैकी बरेच विद्यार्थी पैसे देत नाही.

**श्री. जावेद हसनखान :** मनपा शालेय इमारतीच्या छतावर झालेल्या बलात्कार प्रकरणा बाबतचे वृत स्थनिक वृत्तपत्रात प्रसिध्द झाले आहे. तेव्हा या शाळेकरीता वॉचमन नाही काय? याचा खुलासा व्हावा. मनपाच्या सर्व शाळेकरीता वॉचमन असणे जरुरीचे आहे.

**शिक्षणाधिकारी :** वृत्तपत्रात प्रसिध्द झालेली बातमी वाचली त्याबाबतची तक्रार आलेली नाही. इतर प्रकरणात तक्रार आलेली आहे. वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या बातमीच्या शाळेकरीता वॉचमन देण्यात आले आहे. मनपाच्या काही ठाराविक शाळे करीताच वॉचमनची व्यवस्था आहे.

मनपा शाळेतील विद्यार्थ्यांकडून वसुल करण्यात येणाऱ्या शाळा सुधार निधी मधुन त्या त्या शाळेकरीता किरकोळ कामे करुन घेतली जातात.

**मा. सभापती** : मनपाच्या एका वाहन चालकाने शाळेजवळ असलेल्या वॉचमन क्वार्टरमध्ये निवासासाठी जागा दिल्यास विना मोबदला शाळेसाठी वाचमनने काम करण्याची तयारी दर्शविलेली आहे. यापुढे मनपाचा आर्थिक फायदा होणार आहे.

**श्री. अजिजुल्ला बेग :** मा. सभापती यांचे सुचनेस मी सहमत आहे.

**श्री. मधुकर शिंदे :** प्रशासकीय इमारतीच्या संरक्षित भिंतीचे अंदाजपत्रक किती रुपयाचे आहे.

**शहर अभियंता :** प्रशासकीय इमारतीचे उद्घाटन करावयाचे आहे. दर्शनी भाग असल्यामुळे रुपये २५,०००/- चे अंदाजपत्रक तयार करुन सोयासाठी संरक्षित भिंत तयार करुन घेतली आहे.

**श्री. मधुकर शिंदे, श्री. गिरजाराम हाळनोर :** प्रशासकीय इमारतीचे उद्घाटनाची तारीख ठरली आहे काय? अशा प्रकारे तुकडे/तुकडे करुन काम करण्यापेक्षा सर्व कामाचे एकाच अंदाजपत्रक तयार करुन टेंडर मागविणे योग्य राहील.

**श्री. अलीम बेग, श्री. मधुकर शिंदे, श्री. जावेद हसनखॉन :** रुपये २५,०००/- च्या आतील जी कामे झाली आहेत अशा कामाची यादी पुढील सभेत देण्यात यावी.

**मा. सभापती** : रुपये २५,०००/- च्या आतील जी कामे झाले आहेत. त्याची यादी संबंधित विभागाने पुढील सभेत देण्याची व्यवस्था करावी.

**श्री. गिरजाराम हाळनोर :** महापालिका कार्यालयात कनिष्ट अभियंताची किती पदे आहेत याचा खुलासा व्हावा.

**सहाय्यक आयुक्त :** महापालिका कार्यालयात कनिष्ठ अभियंताची एकूण ५५ पदे आहेत. त्यापैकी एकूण ४९ पदे भरली आहे.

**श्री. गिरजाराम हाळनोर :** महापालिका कार्यालयात कनिष्ठ अभियंताची एकूण पदे कीती. त्यापैकी किती पदे भरण्यात आली, किती पदे रिक्त आहेत. पद भरतांना पदोन्नतीचे प्रमाण काय? याबाबतची सविस्तर माहिती पुढील सभेत देण्यात यावी.

**मा. सभापती** : स. सभासदांच्या सुचनेप्रमाणे कनीष्ठ अभियंता च्या पदाबाबतची माहिती पुढील सभेत देण्याची व्यवस्था करावी.

**श्री. गिरजाराम हाळनोर :** मान्सुन पुर्व कामा अंतर्गत दशमिरा नगर पर्यंतच्या नाला साफ करण्यात आला आहे. त्यानंतर त्या पुढील भागाच्या नाल्याच्या सफाईचे काम गेल्या पंधरा दिवसापासुन बंद आहे.

**आरोग्य वैद्यकीय अधिकारी :** दशमेशनगर भागाचे पुढे असलेल्या नाला साफ करण्यात येणार आहे. तत्पुर्वी शहरातील उर्वरीत नाल्याच्या सफाईचे काम हाती घेण्यात आले आहे.

**श्री. मधुकर शिंदे :** पहाडसिंगपुरा भागातील चोकअप झालेल्या जलनि:सारण वाहिनीच्या कामाचे काय झाले. याचा खुलासा व्हावा.

**उप अभियंता (स्लम) :** पहाडसिंगपुरा भागात उलटी जलवाहिनी टाकण्यात आली आहे. ही बाब लक्षात घेऊन या कामासाठी म्हाडाकडून रक्कम घेऊन काम सुरु करण्यात आले आहे.

**मा. सभापती** : स. सभासद मधुकर शिंदे आणि श्री. जयवंत ओक यांनी पहाडसिंगपूरा भागातील जलनि:सारण वाहिनीच्या कामाची पाहणी करुन अहवाल दयावा.

**श्री. गिरजाराम हाळनोर :** यांत्रिकी विभागचे कामाकाजासाठी नियुक्त करण्यात आलेल्या उप समितीची बैठक घेण्यात आली. या बैठकीच्या वेळी संबंधित अधिकाऱ्यांशी यांत्रिकी विभागाचे कामकाजा बाबत चर्चा केली. परंतु या चर्चेतुन समाधान झाले नाही, तेव्हा ज्या दृष्टीने उप समिती कायम करण्यात आली आहे. त्या करीता मा उप समितीस अहवाल सादर करण्यासाठी किमान एक महिन्याचा वेळ वाढवून देण्यात यावा.

**मा. सभापती** : यांत्रिकी विभागाचे उप समितीस अहवाल सादर करण्याकरीता एक महिन्याची मुदतवाढ देण्यात येते.

**श्री. मधुकर शिंदे :** जयसिंगपुरा भागातील एक जुना वाडा पडण्याच्या स्थितीत आहे. याबाबत संबंधित वार्डाचे नगरसेवक यांना पत्रकी दिले आहेत. तेव्हा या धोकादायक गाडयाबाबत काय कार्यवाही झाली याचा खुलासा व्हावा.

**शहर अभियंता यांचे स्विय सहाय्यक :** जयसिंगपुरा भागातील पडावयास आलेल्या जुन्या वाडयाची पाहणी करण्यात आली. या वाडयाचे मालक हैद्रबाद येथे राहतात सदर इमारतीच्या मालकी हक्काबाबतचा अहवाल मालमत्ता अधिकारी यांच्याकडे पाठविण्यात आलेला आहे.

**श्री. अजिजुल्ला बेग :** शहरातील धोकादायक इमारतीचा सर्व्हे करण्याकरीता समिती कायम करण्यात आली आहे काय

**श्री. नारायण फत्तेलष्कर, श्री. मधुकर शिंदे :** वार्ड क्र. ५७ शहानुरवाडी, प्रतापनगर येथील विनापरवाना बांधकामबाबत खुलासा व्हावा.

**श्री. गिरजाराम हाळनोर :** या संबंधी संबंधित अधिकाऱ्यांनी चर्चा केली सदर इमारत विना परवानगी असली तरी नियमाप्रमाणे दंड आकारुन नियमित होऊ शकते.

**श्री. अजिजुल्ला बेग :** दिनांक. २३-०६-९२ च्या सभेतील प्रत्येक विभागातर्फे मंजुर होणाऱ्या ए-१ आणि रेटलिस्टच्या कामाबाबतची माहिती वेळोवळी " लेखाधिकारी यांच्याकडे " पाठविण्यत यावी आणि लेखाधिकारी यांनी प्रत्येक महिन्याच्या सभेत मागील महिन्याचा जमाखर्चाचा ताळेबंद मुख्यलेखा परीक्षक यांच्या मार्फत दयावा. या ऐवजी प्रत्येक विभागातर्फे मंजुर होणाऱ्या ए-१ आणि रेटलिस्टच्या कामाबाबतची माहिती वेळोवेळी " प्रत्येक विभागातर्फे " पाठविण्यात यावी.

**मा. सभापती** : स. सभासद श्री. अजिजुल्ला बेग यांची सुचनेप्रमाणे दुरुस्ती करण्यात यावी. तसेच दि. २३-०६-९२ च्या सभेतील ठराव क्र. १००,१०२,१०३,११२ च्या प्रस्तावांना या सभेत मंजुरी देण्यात येते. आणि ठराव क्र. १०८ अन्वये मागविण्यात येणाऱ्या साहित्यापैकी मेसर्स विजय जनरल स्टोअर्स औरंगाबाद

हे मेसर्स न्यु भारत स्टोअर्स औरंगाबाद यांचे मंजूर दरात अ मध्ये दर्शविलेले १ व २ चे साहित्य पुरविण्यात तयार असतील तर, सदर साहित्य मेसर्स विजय जनरल स्टोअर्स यांचेकडून खरेदी कण्यास मंजरी देण्तया येते. याशिवाय ठराव क्र. १०७ च्या प्रस्तावाप्रमाणे सिमेंट खरेदीस मंजुरी देण्यात येते.

**श्री. अलीम बेग, श्री. विठ्ठल पेरकर, श्री. अजिजुल्ला बेग :** ठराव क्र. १०७ अन्वये २५०० मेट्रीक टन सिमेंट ऐवजी तुर्त ५०० मेट्रीक टन सिमेंट खरेदी बाबत आदेश देण्यात यावा.

**श्री. जावेद हसन खान :** सिमेंट अभावी फार मोठया प्रमाणवर आज कामे बंद आहेत.

**शहर अभियंता :** कमी सिमेंट मागविले तर सदर साठा दोन महिनेही पुरणार नाही आणि अशा प्रकारे २/२ महिन्यांनी कोटेशन कॉल केले तर फार वेळ लागेल.

**मा. सभापती** : जलनिःसारण वाहिनीचे चोकअप काढण्यासाठी आवश्यक असलेल्या बाबु व सुतळीची गरम लक्षात घेता या साहितयांचा ३ महिन्याचा साठा करण्यात मंजुरी देण्यात येते.

**श्री. जावेद हसन खान :** महापालिकेच्या ट्रक करीता स्टेपनीची व्यवस्था आहे काय? माझ्या प्रभागात पंक्चर झालेला ट्रक स्टेपनी नाही म्हणून बराच वेळ पडून होता.

**श्री. गिरजाराम हाळनोर :** दिनांक २३-०६-९२ ठराव क्र. ९ मध्ये उस्मानपुरा व स्टेट बँक कॉलनी येथील ड्रेनेज कामाच्या चर्चेमध्ये उस्मानपुरा येथील ड्रेनेज लाईनचे अप्रुटींग न करता या ठिकाणी नविन पाईप लाईन टाकावी यातील उस्मानपुरा ऐवजी " स्टेट बँक " कॉलनी अशी दुरुस्ती करण्यात यावी.

**मा. सभापती** : स. सभासदांच्या सुचनेप्रमाणे दुरुस्ती करण्यात यावी.

**ठराव :**

१) दिनांक २३-०६-९२ च्या इतिवृत्तातील----------- ठराव क्र. ९८ च्या चर्चेतील प्रत्येक विभागातर्फे मंजुर होणाऱ्या ए-१ आणि रेटलिस्टच्या कामाबाबतची माहिती वेळोवळी " लेखाधिकारी " यांचेकडे पाठविण्यात यावी. या वाक्यात " लेखाधिकारी ऐवजी प्रत्येक विभागातर्फे " अशी दुरुस्ती करण्यास तसेच याच ठरावातील उस्मानपुरा व स्टेट बँक कॉलनी येथील ड्रेनेज लाईन बाबत सुचना करण्यात आली होती. त्यापैकी एक काम पुर्ण झाले अून, " उस्मानपुरा " येथील ड्रेनेज लाईनचे अप्रुटींग न करता या ठिकाणी नविन पाईप लाईन टाकावी या वाक्यामधील " उस्मानपुरा " या ऐवजी स्टेट बँक कॉलनी अशी दुरुस्ती करण्यास -----------

२) ठराव क्र. १०० बाबत दिनांक २३-०६-९२ रोजी झालेल्या निर्णयाऐवजी प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे आरीफ कॉलनी जवळील दिलरस हाऊसिंग सोसायटीच्या मोकळया जागेस वायर फेंसिंगच्या कामाकरीता तुलनात्मक दृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा १४% कमी दराच्या श्री. एस. ए. बाहोद्यीन यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

३) ठराव क्र. १०२ बाबत दिनांक २३-०६-९२ रोजी झालेल्या निर्णयाऐवजी प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे झोन क्र. ६ मधील रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामाकरीता तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दराच्या श्री. पी. एम. चोरडीया यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

४) ठराव क्र. १०३ बाबत दिनांक २३-०६-९२ रोजी झालेल्या निर्णया ऐवजी प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मांडकी ट्रेचिंग ग्राऊंड ते नारेगांव कडे जाणाऱ्या एक किलोमीटर

लांबीच्या खडी रस्त्याचे डांबरीकरण्याच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५% कमी दराच्या मेसर्स गुरुनानक इंडस्ट्रीज यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

५) ठराव क्र. १०७ बाबत दिनांक २३-०६-९२ रोजी झालेल्या निर्णया ऐवजी प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे महापालिकातर्फे हाती घेण्यात येणाऱ्या बांधकामासाठी आवश्यक असलेली २५०० मेट्रीक टन सिमेंट खरेदी करीता व्ही. ए. ट्रेडींग कंपनी यांचे प्रति टन रुपये २,०३०/- या दराचे अटीसह च्या दरपत्रकास आणि प्रति टन रु. २,०३०/- या दराने २,५००/- मेट्रीक टन सिमेंट खरेदी करीता र. रु. ५०,७५०००/- च्या खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. कामाची तातडी लक्षात घेता सादर प्रस्तावास यास सभेत सर्वानुमते स्विकृत्ती देण्यात येते.

६) ठराव क्र. १०८ अन्वये मागविण्यात येणाऱ्या साहित्या पैकी मे. विजय जनरल स्टोअर्स औरंगाबाद हे मे. न्यु भारत स्टोअर्स औरंगाबाद मंजूरा दरात अ. मध्ये दर्शविलेले १ व २ चे साहित्य पुरविण्यात तयार असतील तर सदर साहित्य मे. विजय जनरल स्टोअर्स यांचेकडून खरेदी करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. अशी वाढ करण्यास -----------

७) ठराव क्र. ११२ बाबत दिनांक २३-०६-९२ रोजी झालेल्या निर्णया ऐवजी प्रस्तावात दर्शविल्या प्रमाणे महानगरपालिकाच्या अग्निशमन विभागातील कर्मचारी यांची वेतनश्रेणी आणि इतर महानगरपालिकेतील अग्निशमन विभागातील कर्मचारी यांचे वेतनात तफावत असल्यामुळे या विभागातील कर्मचाऱ्यांच्या कामाचे स्वरुपानुसार प्रस्तावात दशविलेली अ. क्र. १ ते ६ ची वेतन श्रेणी दिनांक११.९२ पासून लागू करण्यास तसेच या शिवाय अधिकारी दरमहा रुपये ७५/- व कर्मचाऱ्यास दरमहा रुपये ४८/- धुलाई भत्ता आणि ओव्हर टाईम बंद करुन २४ तास डयुटी म्हणून अधिकारी वर्गास रुपये १६९/- व इतर कर्मचाऱ्यांस रुपये १३५ दरमहा याप्रमाणे भत्ता देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

वरील अनुक्रमांक १ ते ७ मध्ये दर्शविलेल्या दुरुस्ती व वाढ यासह दिनांक २३-०६-९२ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समितीचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. १२९/२ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, वार्ड क्र. ४ दिलरस हौसिंग सोसायटी येथे दगडी गटार बांधणे बाबत अंदाजपत्रक र. रु. ७२,४००/- चेसन १९९०-९१ च्या दरसुचीप्रमाणे तयार करण्यात आलेले असुन, मा. आयुक्त यांनी सदरील अंदाजपत्रकास मंजुरी दिलेली आहे व सदरचा खर्च सन १९९२-९३ च्या भांडवली तरतुदीत करण्यात येईल.

आदेशानुसार सदर कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र. ५/७६१/९२ दिनांक २०-०५-९२ ला लोकमत टाईम्स व सिटीजन या स्थानिक वर्तमानपत्रात जाहिरात देवून बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता एकूण पंधरा निविदा विकण्यात आलेल्या होत्या त्यापैकी केवळ चार निविदा प्राप्त झालेल्या असून, त्यांचा तुलनात्मक दर खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. एस. एच. मोयनोद्यीन | ३% जास्त |
| २. | श्री. स. सिराजउद्यीन | ५% जास्त |
| ३. | श्री. सय्यद रफिकउद्यीन | ०.२५% कमी |
| ४. | श्री. एस. ए. बाहोद्यीन | ४.१०% जास्त |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.२५% कमी दराने श्री. सय्यद रफिकउद्दीन याचे दरपत्रक आहे. करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र. ४ दिलरस हाऊसिंग सोसायटी येथे दगडी गटार बांधण्याच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकाच्या दरापेक्षा ०.२५% कमी दराच्या श्री. सय्यद रफिकउद्दीन यांच्या दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १३०/३ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, वार्ड क्र. विद्या निकेतन कॉलनी येथे १५० मी. मी. व्यासाची आर. सी. सी. ड्रेनेज लाईन टाकाणे बाबत अंदाजपत्रक र. रु. ५०,७००/- चे तयार करण्यात आलेले असुन, सदरील अंदाजपत्रक हे सन १९९०-९१ च्या दरसुची प्रमाणे तयार करण्यात आलेले असून मा. आयुक्त यांनी मंजूरी दिलेली आहे व सदरचा खर्च सन १९९२-९३ च्या भांडवली तरतुदी करण्यात येईल.

आदेशाप्रमाणे सदरील कामासाठी कार्यालयनी निविदा सुचना क्र. ७६१/०२ दिनांक २०-०५-९२ ला दै. लोकमत टाईम्स, सिटीजन्स या स्थानिक वर्तमानपत्रात जाहिरात देवून बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता एकूण आठ निविदा विकण्यात आलेल्या होत्या. त्यापैकी केवळ सात निविदा प्राप्त झालेल्या असून, त्यांचा तुलनातम्क दर खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. मिर्झा आर. बी. | १०% कमी |
| २. | श्री. डी. अजितसिंग | ५% कमी |
| ३. | श्री. शे. सय्यद शे. निजामोद्यीन | १% कमी |
| ४. | श्री. वसंत नरवडे पाटील | १९% कमी |
| ५. | श्री. मोहमंद रौफ | २२% कमी |
| ६. | श्री. स. रफिक उद्दीन | १२% कमी |
| ७. | श्री. के. बी. काल्डा | २१.९% कमी |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २२% कमी दराचे मोहमद रौफ यांचे दरपत्रक आहे. करीता, प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावित कामासाठी पुन्हा दरपत्रके मागविण्यात यावी असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. १३१/४ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, वार्ड क्र. ३५ न्यु कॉलनी डॉ. रझवी यांच्या घराच्या बाजूस नाल्याच्या बाजूस संरक्षित भिंत बांधणेबाबत अंदाजपत्रक रक्कम रुपये ५७,९००/- चे सन १९९०-९१ च्या दरसुची प्रमाणे तयार करण्यात आलेले असून, सदरील अंदाजपत्रकास मा. आयुक्त यांनी मंजुरी दिलेली असून, सदरील खर्च सन १९९२-९३ च्या भांडवली तरतुदीतून करण्यात येईल.

आदेशाप्रमाणे सदर कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र. ५/७६१/९२ दि. २०-०५-९२ ला दैनिक लोकमत टाईम्स व सिटीझन या स्थानिक वर्तमानपत्रात जाहिरात देवून बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता एकूण अकरा निविदा विकण्यात आलेल्या होत्या.

त्यापैकी केवळ चार निविदा प्राप्त झालेल्या असून, त्यांचा तुलनात्मक दर खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. सलीम अहम | ०.१०% कमी |
| २. | श्री. रु. सिराजउद्दीन | १०% जास्त |
| ३. | श्री. रफिक उद्दीन | ८% जास्त |
| ४. | श्री. मिर्झा आर. बी. | १५% जास्त |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.१०% कमी दराचे श्री. सलीम अहेमद यांचे दरपत्रक आहे. करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

**श्री. विठ्ठल पेरकर :** प्रस्तावित काम अंदाजपत्रकाच्या दरापेक्षा २२% कमी दराने संबंधित गुत्तेदार करील काय याचा विचार करणे आवश्यक आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र. ३५ न्यु कॉलनी येथे डॉ. रझवी यांच्या वयाच्या बाजुच्या नाल्यास संरक्षित भिंत बांधण्याच्या कामाकरीता तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकाच दरापेक्षा ०.१०% कमी दराच्या श्री. सालीम अहेमद यांच्या दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १३२/५ :**

झोन क्र. २ मधील विविध ठिकाणी ड्रेनेज दुरुस्ती व देखभाल करीता अंदाजपत्रक र. रु. ४,००००० चे सन १९९१-९२ च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आले असून सदर अंदाजपत्रकास मा. आयुक्त साहेबांनी मंजूरी दिलेली आहे. तसेच स्थायी समितीच्या ठराव क्र. ४९/१५ दिनांक २७-०३-९२ नुसार मंजुरी मिळालेली आहे. कार्यालयीन निविदा सुचना क्र. ५/७६७/९२ दिनांक २०-०५-९२ नुसार दैनिक लोकमत टाईम्स, सिटीजन्स, व रहेबर, दैनिकात जाहीरात देवून बी-१ निविदेस निविदा मागविले असता एकूण चार निविदा विकण्यात आल्या होत्या त्यापैकी केवळ दोनच निविदा प्राप्त झाल्या त्याचा तुलनात्मक तक्ता दर खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. संजय पी. सरवदे | ०.५% कमी |
| २. | श्री. रमेश बिटके | ३% जास्त |

तुलनात्म्कदृष्टया कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०५% कमी दराचे श्री. संजय पी. सरवदे यांचे दरपत्रक आहे. करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, झोन क्र. २ मधील विविध ठिकाणी ड्रेनेज लाईनची दुरुस्ती व देखाभाल करण्याच्या कामाकरीता तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०५% कमी दराच्या श्री. संजय सरवदे यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी. सदर कामाची तातडी लक्षात घेता याच सभेत स्विकृती देण्यात येते.

**विषय क्र. १३३/६ :**

वार्ड क्र. २६ मो. नगरखानागली व कुंभारवाडा येथे ३०० मी. मी. व्यासाची आर. सी. सी. लाईन टाकणे बाबत अंदाजपत्रक र. रु. ८५,०००.०० चे सन १९९०-९१ च्या दरसुची नुसार तयार करण्यात आले असून, सदर अंदाजपत्रकास मा. आयुक्त साहेबांनी मंजुरी दिलेली आहे.

आदेशावरुन सदर कामाकरीता कार्यालयीन निविदा सुचना क्र. ५/७६१/९२ दिनांक २०-०५-९२ नुसार दैनिक लोकमत टाईम्स सिटीजन्स व रहेबर दैनिकात जाहिरात देवून बी-१ नमुन्यात निविदा मागविले असता एकूण सहा निविदा विकण्यात आल्या होत्या. त्यापैकी फक्त दोनच दर निर्दिष्ट निविदा प्राप्त झाले असून, त्याचा तुलनात्मक तक्ता दर खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. रमेश बिटके | १% कमी |
| २. | श्री. स. सिराजोद्दीन | १०% जास्त |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १% कमी दराचे श्री. रमेश बिटके यांचे दरपत्रक आहे. करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र. २६ मो. नगारखान गल्ली व कुंभारवाडा येथे ३०० मी. मी. व्यासाची आर. सी. सी. ड्रेनेज लाईन टाकण्याच्या कामाकरीता तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा १% कमी दराच्या श्री. रमेश बिटके यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १३४/७ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी अभिप्राय दिला की, १५० वॅट सोडीयम व्हेपर फिटींग व इतर साहित्य खरेदी करण्यासाठी सार्वजनिक बांधकाम (विद्युत) खात्याच्या सन १९९१-९२ च्या दरसुची नुसार र. रु. १६,६१,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरचा खर्च सन १९९१-९२ च्या शासकीय अनूदानामधून करण्यात येईल.

सदर साहित्य खरेदी करीता कार्यलयीन निविदा सुचना क्र. मनपा/अशअ/१६२/९२ दि. १६-०४-९२ अन्वये दै. लोकमत दै. औबाद टाईम्स व दै. इंडियम एक्सप्रेस या वृत्तपत्रात निविदा सूचना प्रसिध्द करुन निविदा पत्रके मागविली असता निविदापत्रके विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण सहा निविदापत्रके विकल्या गेली व निविदा पत्रके स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत यापैकी फक्त चार निविदा पत्रके दर भरुन प्राप्त झाली. प्राप्त निविदापत्रके दिनांक. २७-०४-९२ रोजी उघडण्यात आली त्याचा तपशील खालील प्रमाणे.

| अ. क्र. | साहित्यांचे नांव | मे. पगारीया एटरप्रायझेस | मे. फिलिप्स इंडीया | मे. सल इलेक्ट्रीकल्स | मे. मेहता इलेक्ट्रीकल्स |
|---|---|---|---|---|---|
| १. | १५० वॅट सोडीयम व्हेपर फिटींग (५००) नग | १७२१.०० प्रति नग | २३५४.०० प्रति नग | १९९१.०० प्रति नग | २३४०.०० प्रति नग बल्ब सहित |
| २. | १५० वॅट सोडीयम व्हेपर बल्ब (५००) नग | ५९९.०० | ५८३.८५ | ५९९.०० | -- |
| ३. | ब्रॅकेट (५००) नग | १६९.०० प्रति नग | २५१.०० प्रति नग | २१०.०० प्रति नग | १९५.०० प्रति नग |
| ४. | पोल क्लॅम्प (१०० नग) | ७०.०० प्रति नग | ५०.०० प्रति नग | ९०.०० प्रति नग | ३२.०० प्रति नग |

वरील प्रमाणे प्राप्त निविदांची छानणी केली असता मे. पगारीया एंटरप्रायझेस यांचे ॲटम क्र. १ व ३ साठी मे. फिप्लींस इंडिया यांचे ॲटम क्र. २ साठी व मे. मेहता यांचे ॲटम क्र. ४ साठीचे दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी आहेत.

खालील एजन्सीचे त्यांच्या नावांसमोर दर्शविल्या ॲटम करीता दिलेले दर तुलनात्मकदृष्टया ॲटम करीता दिलेले दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी आहेत.

ॲटम क्र. १ - १५० वॅट सोडीयम व्हेपर फिटींग रुपये १७२१.०० प्रति नग
ॲटम क्र. ३ - ब्रॅकेट रुपये १६९.०० प्रति नग

ब) मे. फिलीप्स इंडिया :
ॲटम क्र. २ - १५० वॅट सोडीयम व्हेपर रुपये ५८६.८५ बल्ब

क) मे. मेहता ट्रेडर्स :
ॲटम क्र. ४ पोल क्लॅम्प रुपये ३२.०० प्रति नग

तरी वरील दरामध्ये वरील एजन्सीच्या नांवासमोर दर्शविलेले विद्युत साहित्य खरेदी करणे बाबतचा प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

**श्री. मोहमद इस्माईल :** नगरसेवकांच्या मागणी नुसार त्यांच्या प्रभागातील मुख्य रस्त्यावर सोडीयम व्हेपर फिटींग बसविण्यात यावे.

**अतिरिक्त शहर अभियंता :** एम. आय. डी. सी. भागात २०० आणि प्रत्येक वार्डाकरीता किमान पाच सहा या प्रमाणे शहरात सोडीयम व्हेपरचे दिवे लावण्याकरीता ५०० ऐवजी ६५० नग सोडीयम व्हेपरचे दिवे खरेदी करण्यास मंजुरी देण्यात यावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, १५० वॅट सोडीयम व्हेपर फिटींग व इतर साहित्य खरेदी करीता (तक्त्यातील अनुक्रमांक १ ते ४ पर्यंतची) खालील दर्शविलेल्या तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराचे आणि त्या समोर दर्शविलेल्या एजन्सीच्या दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

| अ. क्र. | साहित्यांचे नांव | दर प्रति नग | एजन्सीचे नांव |
|---|---|---|---|
| १. | १५० वॅट सोडीयम व्हेपर फिटींग (५००) नग | १७२१.०० | मेसर्स पगारीया एन्टरप्रायझेस |
| २. | १५० वॅट सोडीयम व्हेपर बल्ब (५००) नग | ५९९.०० | मेसर्स फिलीप्स इंडिया |
| ३. | ब्रॅकेट (५००) नग | १६९.०० | मेसर्स पगारीया एन्टरप्रायझेस |
| ४. | पोल क्लॅम्प (१०० नग) | ३२.०० | मे. मेहता ट्रडेज |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १३५/८ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी अभिप्राय दिला की, गारखेडा परिसरातील श्रीनगर, शिवनेरी सोसायटी, शास्त्रीनगर व उल्कानगरी ते जनकपुरी या ६० फुट डी. पी. रस्त्यांच्या डांबरीकरणाचे काम करण्याच्या कामा करीता सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन १९९१-९२ च्या दरसुची नुसार र. रु. ५,९२,२३०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरचा खर्च सन १९९१-९२ च्या शासकीय अनूदानामधुन करण्यात येईल.

सदर कामाकरीता निविदा सुचना क्र. मनपा/अशअ/२०६/९२ दिनांक १४-०५-९२ अन्वये दै. लोकमत व दैनिक औरंगाबाद टाईम्स या वृत्तपत्रात निविदा सुचना प्रसिध्द करुन निविदा पत्रके मागविली असता एकूण तीन निविदा पत्रके विकल्या गेली व निविदा पत्रके स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत सदर.

तिनही निविदा पत्रके दर भरुन प्राप्त झाली. प्राप्त निविदा पत्रके दिनांक २७-०५-९२ रोजी उघडण्यात आली त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. पी. एम. चोरडीया | ११.८७% कमी |
| २. | श्री. डी. एस. जग्गी | ७.२५% कमी |
| ३. | श्री. मे. गुरुनानक इंडस्ट्रीज | ९.२०% कमी |

श्री. पी. एम. चोरडीया यांच्या निविदा पत्रकाचे दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ११.८७% कमी आहेत. तरी श्री. पी. एम. चोरडीया यांची ११.८७% कमी दराची निविदा विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, गारखेडा परिसरातील श्रीनगर, शिवनेरी सोसायाटी, शास्त्रीनगर, उल्का नगरी ते जनकपुरी या ६० फुट डी. पी. रोडचे डांबरीकरण करण्याच्या कामाकरीता तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ११.८७% कमी दराच्या श्री. पी. एम. चोरडीया याचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १३६/९ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, सिंधी कॉलनी ते बालाजी नगर येथील रोडचे डांबरीकरण करण्याच्या कामाकरीता सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन १९९१-९२ चे डी. एस. आर. दराने र. रु. ६,१३,१७०.०० चे तयार करण्यात आले असून, त्यास दि. ११-०४-९२ रोजी प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे. सदरचा खर्च सन १९९१-९२ च्या शासकीय अनूदानातून करण्यात येईल.

सदरच्या कामाकरीता कार्यालयीन निविदा सुचना क्र. मनपा/अशअ/२०६/०२ दिनांक १२-०५-९२ चे निविदा सुचनेद्वार दै. नवा मराठा व दैनिक डॉन (उर्दु) या स्थानिक वृत्तपत्रात जाहीरात देवून निविदा पत्रके मागविली असता निविदा विक्रीच्या नियोजीत तारखेपर्यंत एकूण तीन निविदा पत्रके विकल्या गेली असून, निविदा स्विकारण्याच्या नियोजीत तारखे पर्यंत एकूण तिनही निविदा दर भरलेल्या प्राप्त झाल्या असून, त्यांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. पी. एम. चोरडीया | ११.८७% कमी दराने |
| २. | श्री. डी. एस | ०५.००% कमी दराने |
| ३. | श्री. गुरुनानक इंडस्ट्रीज | ०२.३०% कमी दराने |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ११.८७% कमी दराचे श्री. पी. एम. चोरडीया यांची निविदा असून, प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सिंधी कॉलनी हे बालाजी नगर या रस्त्याच्या डांबरीकरण करण्याच्या कामाकरीता तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ११.८७% कमी दराच्या श्री. पी. एम. चोरडीया यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १३७/१० :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी अभिप्राय दिला की, हर्सुल ते कृष्णापुरवाडी या खडी रस्त्याची दुरुस्ती करण्याच्या कामाकरीता सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन १९९१-९२ च्या दरसुची नुसार र. रु. १६८९२५.०० चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरचा खर्च सन १९९२-९३ च्या भांडवली रस्ते या सदराखाली करण्यात येईल.

तरी र. रु. १६८९२५.०० चे अंदाजपत्रक मंजुरीचा प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, हर्सूल ते कृष्णापूरवाडी या खडी रस्त्याच्या दुरुस्तीचे कामाकरीता र. रु. १,६८,९२५/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १३८/११ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी अभिप्राय दिला की, गणेश कॉलनी भागातील रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामाकरीता सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन १९९१-९२ च्या दरसुची नुसार र. रु. १,११,६२०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरचा खर्च सन १९९२९३ च्या " भांडवली रस्ते " या शिर्षकाखाली करण्यात येईल.

तरी र. रु. १,११,६२०/- च्या अंदाजपत्रकाचा प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, गणेश कॉलनी भागातील रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामासाठी र. रु. १,११,६२०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरीस्तव सादर.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १३९/१२ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी अभिप्राय दिला की, रशिद मामु कॉलनी येथे तसेच स्विमिंग पुलाचे रस्त्याचे रुंदीकरण करुन खडी करण करण्याच्या कामाकरीता सार्वनिक बांधकाम खात्याच्या सन ९१-९२ च्या दरसुचीनुसार र. रु. १०६२००.०० चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरचा खर्च सन ९२-९३ च्या भांडवली खर्चातुन करण्यात येईल. तरी र. रु. १०६२००.०० च्या अंदाजपत्रकाचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मो. रशिद मामु कॉलनी येथे तसेच स्विमिंग पुलाचे रस्त्याचे रुंदीकरण करुन खडीकरण करण्याच्या कामाकरीता र. रु. १,०६,२००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १४०/१३ :**

कार्यकारी अभियंता पाणी पुरवठा व जलनिःसारण यांनी प्रस्ताव सादर केला की, कार्यकारी अभियंता परिसर, अभियांत्रिकी बांधकाम विभाग क्र. २ औरंगाबाद यांचे पत्रक क्र ई ई डब्ल्यु डी/एबी/डब्ल्युसी/२१०१/८/१९९२ दिनांक २२-०५-९२ अन्वये जायकवाडी

जलाशयातून घेण्यात येणाऱ्या पाण्याच्या दरामध्ये वाढ करण्यात आले असून, दिनांक ०१-०६-९२ पासून पाण्याच्या वाढीव दर लागू करण्यात आले आहे.

यापूर्वी दिनांक ०१-०६-९१ ते ३०-०५-९२ पर्यंत रुपये १.६५ पैसे प्रति १००४० लिटर या प्रमाणे दर होते ते आता नविन दर खालील प्रमाणे मान्यतेस्तव सादर.

१) प्रति १०० लिटर्सला रुपये २.०० प्रमाणे प

पाणी पुरवठा व जलनि:सारण मंडळा सोबत शाळेच्या करारनाम्या नुसार मंडळ ज्या वेळे दर वाढविले ते महानगरपालिकेस मान्य राहील.

करीता महाराष्ट्र पाणी पुरवठा व जलनि:सारण मंडळाने वाढविलेले पाण्याच्या दरास मंजूरी मिळण्याऱ्या विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, जायकवाडी जलशयातून औरंगाबाद शहरासाठी घेण्यात येणाऱ्या पाण्याबाबत पाणी पुरवठा व जलनि:सारण मंडळ आणि मनपा यांच्यात झालेल्या करारानुसार कार्यकारी अभियंता, परिसर अभियांत्रिकी बांधकाम विभाग क्र. २ औरंगाबाद यांचे कडील पत्र क्रमांक ईई डब्ल्यु डी/ एबी / डब्ल्युसी / २१० / ८ / १९९२ दिनांक २२-०५-९२ अन्वये जायकवाडी जलाशयातून घेण्यात येणाऱ्या पाण्याच्या दरामध्ये दिनांक ०१-०६-९२ पासून प्रति हजार लिटरला रुपये २/- या वाढीव दराने पाणी घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी. सर्वसाधारण सभेस शिफारस करण्यात येते.

**विषय क्र. १४१/१४ :**

मा. शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो. बन्सीलाल नगर येथील मनपा शाळे भोवती संरक्षित भिंत बांधण्याच्या कामासाठी स्थायी समिती ठराव क्र. ५०३/२३/ दिनांक १३/०४/९२ अन्वये र. रु. २,९५,०००/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी मिळालेली आहे. सदरचे काम हाती घेण्यासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र. ४/९२-९३ जा. क्र. मनपा/शअ/३६२/९२ दिनांक १४-०५-९२ अन्वये वृत्तपत्रात जाहिरात ठराव निविदा मागविल्या असता कोऱ्या निविदा विक्रीच्या तारखेपर्यंत एकूण (१५) कोऱ्या निविदा विक्री झाल्या निविदा स्विकारण्याच्या अंतिम तारखे पर्यंत एकूण (०९) निविदा दर भरलेल्या प्राप्त झाल्या त्या दिनांक ०२-०६-९४ ला उपस्थित गुत्तेदारासमक्ष उघडण्यात आल्या त्यांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. बी. जी. मानुसमोर | ९.८०% कमी दराने |
| २. | श्री. सय्यद रफिकाद्यीन | १६% कमी दराने |
| ३. | श्री. मौला अलियारखान | १००५% कमी दराने |
| ४. | श्री. कुलवंतसिंग | १७.९०% कमी दराने |
| ५. | श्री. अलिवुद्यनि | १७.५% कमी दराने |
| ६. | श्री. सय्यद तौफिक अहमद | २१% कमी दराने |
| ७. | श्री. एस. एच. असोसिएटस | १८१५% कमी दराने |
| ८. | श्री. पी. जे. तमखाने | ९.९% कमी दराने |
| ९. | श्री. कैसरखान | ५% कमी दराने |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २१% कमी दराची श्री. तौफिक अहेमद यांचे निविदा दर मंजूरीचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावित कामास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

**विषय क्र. १४२/१५ :**

झोन क्र. ६ मधील विविध ठिकाणी दुरुस्ती देखभाल ड्रेनेज कामाकरीता वार्षीक अंदाजपत्रक र. रु. ३,५०,०००/- चे सन १९९१-९२ सालाच्या दरसुची नुसार तयार करण्यात आले असून, स अंदाजपत्रकास मा. आयुक्त साहेबांनी मंजूरी दिलेली आहे. स्थायी समितीचा ठराव क्र. ६०७/८८/ दिनांक २९/०४-९२ नुसार मंजुरी मिळालेली आहे.

आदेशावरुन सदरील कामाकरीता कार्यालयीन निविदा सुचना क्र. ५/७६१/९२ दि. २०-०५-९२ नुसार दैनिक लोकमत टाईम्स व सिटीजन्स दैनिकात जाहिरात देवून बी-१ नमुन्यात निविदा मागविले. असता एकूण प्राप्त निविदा विकण्यात आल्या होत्या. त्यापैकी केवळ तिनच निविदा पत्रके प्राप्त झाली असून, त्यांचा तुलनात्मक तक्ता दर खालील प्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| १. | मे. आनंद बिल्डर्स | १५% जास्त |
| २. | श्री. एस. अे. बहोद्दीन | १०% जास्त |
| ३. | श्री. एम. अे. लतिफ | ४.९९% जास्त |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.९९% जास्त दराचे श्री. एम. अे. लतीफ यांचे दरपत्रक आहे.

संबंधितास दर कमी करण्याच्या अनुषंगाने वाटाघाटीसाठी पाचारण केले असता मा. आयुक्त महादेय, मा. कार्यकारी अभियंता, व मा. लेखा परीक्षक यांच्या समवेत झालेल्या वाटाघाटीत श्री. एम. अे. लतीफ यांनी ४.९९ जास्त अंदाजपत्रकीय दरापेक्षा जास्त दराऐवजी ४% जास्त दराने काम करण्यास मान्य केलेले आहे.

करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, झोन क्र. ६ मधील ड्रेनेज कामाच्या विविध ठिकाणचे दुरुस्ती व देखभाल करीता गुत्तेदार श्री. एम. ए. लतीफ यांच्याशी झालेल्या वाटाघाटी नुसार उक्त काम संबंधितांकडून अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ४% जास्त दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. कामाची तातडी लक्षात घेता सदर कामास याच सभेत स्विकृती देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १४३/१६ :**

झोन क्र. ४ मधील विविध ठिकाणी ड्रेनेज दुरुस्ती व देखभाल वार्षीक कामाकरीता अंदाजपत्रक र. रु. ४,००,०००/- चे १९९१-९२ च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आले असून, सदर अंदाजपत्रकास मा. आयुक्त साहेबांनी मंजुरी दिलेली आहे. स्थायी समितीचा ठराव क्र. ६०७/८८ दि. २९-०४-९२ नुसार मंजुरी मिळालेली आहे.

आदेशावरुन सदरील कामाकरीता कार्यलयीन निविदा सुचना क्र. ५१/७६१/९२ दिनांक २०-०५-९२ नुसार दैनिक लोकमत टाईम्स, सिटीजन्स, दैनिकात जाहिरात देवून बी-१ नमुन्यात निविदा मागविले असता एकूण सात निविदा विकण्यात आल्या होत्या त्यापैकी केवळ चार निविदा पत्रके प्राप्त झाली असून, त्याचा तुलनात्मक दर खालील प्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| १. | मे. आनंद बिल्डर्स | ४.८९% जास्त |
| २. | श्री. डी. अजितसिंग | ६.३% जास्त |
| ३. | मे. विशाल कंस्ट्रक्शन | ९.५% जास्त |
| ४. | मे. पॉल कंस्ट्रक्शन | ११% जास्त |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.८९ जास्त दराची श्री. आनंद बिल्डर्स यांचे दरपत्रक आहे.

संबंधितास दर कमी करण्याच्या अनुषंगाने वाटाघाटासाठी पाचारण केले असता मा. आयुक्त महोदय, मा. कार्यकारी अभियंता, व मा. लेखा परीक्षक यांच्या समवेत वाटाघाटी अंती मे. आनंद बिल्डर्स यांनी ४.८९% जास्त दराऐवजी अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४% जास्त काम करण्यास मान्य केलेला आहे. करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, झोन क्र. ४ मधील विविध ठीकणच्या ड्रेनेज दुरुस्ती व देखभालच्या कामाकरीता गुत्तेदार, मेसर्स आनंद बिल्डर्स यांचेशी झालेल्या वाटाघाटीनुसार उक्त काम संबंधितांकडून अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ४% जास्त सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. कामाची तातडी लक्षात घेता सदर कामास याच सभेत स्विकृती देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १४४/१७ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, वार्ड क्र. मुलमची बाजार मोहन टॉकीज जवळ ३०० मी. मी. व्यासाची आर. सी. सी. ड्रेनेज लाईन टाकणे बाबत अंदाजपत्रक र. रु. ९८,६००/- चे सन १९९०-९१ च्या दरसुची प्रमाणे तयार करण्यात आलेले असून, मा. आयुक्त यांनी सदरील अंदाजपत्रकास मंजुरी दिलेली आहे.

आदेशानुसार सदर कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र. ५/७६१/९२ दिनांक २०-०५-९२ ला दैनिक लोकमत टाईम्स, सिटीजन्स, या स्थानिक वर्तमानपत्रात जाहिरात देवून बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता एकुण तीन निविदा विकण्यात आलेल्या होत्या त्यापैकी केवळ दोन निविदा प्राप्त झालेल्या असून, त्यांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. शेख समद शे. निजामोद्दीन | अंदाजपत्रकी दराने |
| २. | श्री. कैसरखान | ५% जास्त |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा म्हणजे अंदाजपत्रकीय दराचे श्री. शे. समद शे. निजामोद्दीन यांचे दरपत्रके आहे. करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मुलूमची बाजार येथील मोहन टॉकीज जवळ ३०० मी. मी. व्यासाची आर. सी. सी. ड्रेनेज लाईन टाकण्याच्या कामाकरीता तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दराच्या श्री. शेख समद शेख निजामोद्दीन यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. १४५/१८ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, झोन क्र. १ मधील विविध ठिकाणच्या दुरुस्तीची कामे करणे बाबत अंदाजपत्रक र. रु. ३,५०,०००/- ला स्थायी समितीचा ठराव क्र. ६०७/८८ दिनांक २९-०४-९२ नुसार मंजुरी मिळालेली आहे.

आदेशानुसार सदर कामासाठी कार्यलयीन निविदा सुचना क्र. ५/७६१/९२ दिनांक २०-०५-९२ ला दै. लोकमत टाईम्स, व सिटीजन्स या स्थानिक वर्तमान पत्रात जाहिरात देवून बी-१ नमुन्यात निविदा मागविण्यात आल्या असता एकूण सहा निविदा विकण्यात

आलेल्या होत्या. त्यापैकी केवळ तिनच निविदा प्राप्त झालेल्या असून, त्यांचा तुलनात्मक दर खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. एस. ए. बाहोद्यीन | ०.१% कमी |
| २. | श्री. डी. अजितसिंग | ८.५% जास्त |
| ३. | श्री. मे. विशाल कंस्ट्रक्शन | ७% जास्त |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.१% कमी दराचे श्री. एस. ए. बाहोद्यीन यांचे दरपत्रक आहे. करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, झोन क्र. १ मधील विविध ठिकाणची दुरुस्तीचे कामे करण्याकरीता तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.२% कमी दराच्या श्री. एस. ए. बाहोद्यीन याचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १४६/१९ :**

शहर अभियंता महानगरपालिका यांनी प्रस्ताव सादर केला की, गांधीनगर स्लम भागातील सार्वजनिक संडासाची दुरुस्ती करण्यासाठी अंदाजपत्रक र. रु. ५६,०२०/- ला मा. आयुक्त महानगरपालिका यांनी मंजुरी दिल्यानुसार सदरील कामासाठी कार्यलयीन निविदा क्र. ४ (९२-९३) स्थानिक वृत्तपत्र दै. अंजिठा व आलमगीर टाईम्स व राज्यपातळी वरील वृत्तपत्र दै. लोकमत व इंडियन एक्सप्रेस मध्ये विस्तृत प्रसिध्दी देवून प्रगट निविदा माविल्या असता कोऱ्या निविदा विकण्याच्या अंतिम तारखेपर्यंत पांच निविदा विकण्यात आल्या व मोहबंद निविदा स्विकारण्याच्या नियोजीत तारखेस फक्त चार निविदा प्राप्त झाल्या व प्राप्त झालेल्या निविदा उघडल्या असता ठेकेदारांनी दिलेले दर खालील प्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. अशोक के. साबळे | अंदाजपत्रक दरापेक्षा ११.२% कमी |
| २. | मे. आनंद बिल्डर्स | अंदाजपत्रक दरापेक्षा १७.३% कमी |
| ३. | श्री. अे. अेम फारुकी | अंदाजपत्रक दरापेक्षा १२% कमी |
| ४. | श्री. एच. एस. मिनाजउद्यीन | अंदाजपत्रक दरापेक्षा ५.१% कमी |

तुलनात्मकदृष्टया मेसर्स आनंद बिल्डर्स यांची निविदा कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा १७.६% कमी आहे करीता मे. आनंद बिल्डर्स यांचे अंदाजपत्रकाचे दरापेक्षा १७.६% कमी दराची निविदा मंजुरीसाठी विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, गांधी नगर स्लम भागातील सार्वजनिक संडासाची दुरुस्ती करण्याकरीता तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकाच्या दरापेक्षा १७.६% कमी दराच्या मेसर्स आनंद बिल्डर्स यांच्या दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १४७/२० :**

अतिरिक्त शहर अभियंता मनपा औरंगाबाद यांनी अभिप्राय दिला की, अग्निशामक दर मनपा औरंगाबादसाठी लागणाऱ्या साहित्य खरेदीसाठी दै. लोकमत दि. २३-०३-९२ च्या वर्तमान पत्रात निविदा सुचना प्रसिध्द करण्यात आली होती. एकूण ७ पुरवठाधारकांनी कोऱ्या निविदा सुचना घेतल्या व निविदा घेतल्या व निविदा स्विकारण्याच्या अंतिम तारखे पर्यंत म्हणजे दिनांक ०६-०४-९२ पर्यंत एकूण सहा निविदा पत्रके वसुल झाली.

फायर साहित्य खरेदी करण्यासाठी त्याची गुणवत्ता तपासणी करणे तांत्रिकदृष्टया जरुरीचे असल्यामुळे सर्व पुरवठाधारकांना सॅपल टेस्टींग साठी देण्या बाबत पत्र दिले असता खालील प्रमाणे पुरवठा धारकांनी फायर होज पाईपचे सॅम्पलस मेल फामेल कंपलींग करुन तपासणेसाठी दिले.

१) विजय जनरल स्टोअर्स औरंगाबाद १ नग
२) नित्यानंद इंजिनिअरींग कॉर्पोरेशन औ. बाद १ नग
३) श्री. सर्व्हिसेस औरंगाबाद ३ नग

दिनांक २७-०५-९२ रोजी अतिरिक्त शहर अभियंत, उप अभियंता, (यांत्रिकी) फायर स्टेशन अधिकारी तसेच हजर असलेल्या सर्व फायर ब्रिगेड मधील कर्मचाऱ्यांसमोर आलेल्या पाच सॅम्पलची पाहणी व तपासणी लेखी व खालील प्रमाणे निष्कर्ष काढले.

अ) विजय जनरल स्टोअर्स यांनी दिलेले सॅम्पल टेस्ट केले असता ते कपलिंग जागी लिकेज होत होते. तसेच मेल व फिमेल कंपलींग बरोबर नसल्याने फायर स्टाफने तसेच फायर स्टेशन अधिकारी यांनी निदर्शनास आणले. त्यांनी दिलेले दर पंधरा मिटरसाठी रुपये २०००/- व तीस मीटरसाठी रु. ३५७५/- असे होते.

ब) नित्यानंद इंजिनियरींग कार्पोरेशन औरंगाबाद यांनी दिलेले सॅम्पल टेस्ट केल्यास त्याची पूर्ण किंमत दयावी लागेल अशी अट घातली होती. तसेच त्यांनी दिलेले सॅम्पल चांगले नसल्याचे फायर स्टाफ जे सांगितले त्यामुळे ते टेस्ट केले नाही. त्यांनी १५ मीटरसाठी ३४५०/- व ३० मीटरसाठी ५४४०/- असे दर दिले होते.

क) श्री. सव्हिर्सेस औरंगाबाद यांनी एकूण ३ सॅम्पल्स ट्रेसिंगसाठी दिले होते. त्यापैकी खालील प्रकारचे टेस्टींग मध्ये चांगल्या गुणवत्तेचे व २१ किलो/सेमी २ टेस्टींग प्रेशरवर चांगल्या प्रकारे उतरले.

ते सॅम्पल फायर चीक या कंपनीचे असून, ते एम. एम. डी. अप्रव्हड व आय. एस. आय ६३६ व टाईप अे फायर फायटींग होत रबराईज्ड फॅब्रीक १.१ एन. ई. डी. ओवन बॅकेटडे (आर. आर. सी.)ह्या टेक्नीकल स्पेसिफीकेशनचे होते त्यांनी दिलेले दर १५ मिटरसाठी रुपये ३,३४५/- व ३० मिटरसाठी रुपये ७,३३५/- असे आहेत.

फायरब्रिगेडसाठी लागणारे पाईप अत्यंत चांगल्या गुणवत्तेचे खरेदी करणे जरुरी आहे. हे खरी करतांना आलेल्या कमी दराकडे न पाहता जरी जास्ती दर असले तरी चांगल्या गुणवत्तेच्या असल्यास ते खरेदी करणे हे फायर ब्रिगेडच्या दृष्टीने महत्वाचे आहे. त्यामुळे तांत्रिक बाबी व फायर होज पाईपची गुणवत्त लक्षात घेता अतिरिक्त शहर अभियंता यांनी मे. श्री. सर्व्हिसेस औरंगाबाद यांचे वर नमूद केलेले स्पेसिफिकेशन्स प्रमाणे फायर होज पाईप खरेदी करण्यासाठी शिफारस केली आहे.

१) १५ मिटर फायर होज पाईप मेल फिमेल कप्लींग व वायडींग सह ३० नग खरेदी करण्यासाठी रुपये ३,३४५/- प्रति नग प्रमाणे एकूण रुपये १,००,३५०/- खर्च येईल.

२) १५ मिटरचे ३० नग व ३० मिटरचे १५ नग खरेदी करण्यासाठी एकुण रुपये २,१०,३७५/- खर्च येईल व सदरील खरेदी मे. श्री. सर्व्हिसेस औरंगाबाद यांचेकडून खरेदी करण्यासाठी प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

**श्री. अजिजुल्ला बेग, श्री. गिरजाराम हाळनोर :** अग्निशमन दलासाठी खरेदी करावयाच्या साहित्या करीता ज्या एजन्सीच्या दरपत्रकाची शिफारस केली आहे. त्या एजन्सीचे दर आणि विजय जनरल स्टोशस यांचे दरपत्रकाचे दर यात दुप्पट फरक आहे. तेव्हा दरपत्रकाचे दरबाबत वाटाघाटी का करण्यात आल्या नाही.

**अति. शहर अभियंता :** दरपत्रका सोबत प्राप्त झालेल्या अग्निशमन दलाच्या साहित्याच्या चाचणीचे वेळी स्वत: प्रत्यक्ष हजर होतो. त्यानंतर चाचणी नुसार अभिप्राय दिला आहे.

**श्री. गिरजाराम हाळनोर :** अग्निशमन अधिकारी यांना अग्निशमन दलासाठी लागणाऱ्या साहित्याचे तांत्रिक ज्ञान नाही काय?

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, फायर ब्रिगेडसाठी लागणारे फायर होज पाईपची खरेदी करतांना चांगल्या गुणवत्तेचे पाईप खरेदी करणे आवश्यक असल्यामुळे मे. जी. सर्व्हिसेस औरंगाबाद यांचे कडुन १५ मीटर करीता प्रती नग रु. ३३४५/- प्रमाणे ३० नग आणि ३० मिटर करीता प्रती नग रुपये ७३३५/- प्रमाणे १५ नग फायर होज पाईप (मेल फिमेल कप्लींग व वाईंडींगसह) खरेदी करण्यात आणि त्यासाठीच्या एकूण रु. २,१०,३७५/- च्या खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १४८/२१ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, वार्ड क्र. ४ बिसमिल्ला कॉलनी येथील १५० मी. मी. व्यासाची चिनी मातीची ड्रेनेज लाईन काढुन त्या ठिकाणी २५० मी. मी. व्यासाची आर. सी. सी. ड्रेनेज लाईन टाकणे बाबत अंदाजपत्रक र. रु. १,९२,०००/- चे सन १९९१-९२ च्या दरसुची प्रमाणे तयार करण्यात आलेले असून, मा. आयुक्त यांनी सदरील अंदाजपत्रकास मंजुरी दिलेली आहे. व सदरचा खर्च सन १९९२-९३ या भांडवली तरतुदीतून करण्यात येईल. करीता प्रस्तावम मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र. ४ बिसमिल्ला कॉलनी येथे १५० मी. मी. व्यासाची चिनी मातीची ड्रेनेज लाईन काढुन २५० मी. मी. व्यासाची आर. सी. सी. ड्रेनेज लाईन टाकण्याच्या कामाकरीता र. रु. १,९२,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

## ऐन वेळचे विषय

**विषय क्र. १४९/२२ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, झोन क्र. ३ मधील विविध ठिकाणाची दुरुस्ती व देखभाल करणे बाबत अंदाजपत्रक र. रु. ५,६०,०००.०० ला स्थायी समितीचा ठराव क्र. ६०७/८८ दि. २९-०४-९२ ला मंजुरी मिळालेली आहे.

आदेश नुसार सदर कामासाठी कार्यलयीन निविदा सुचना क्र. ५/७६१/९२ दिनांक २०-०५-९२ ला दैनिक लोकमत टाईम्स व सिटीजन्स या स्थानिक वर्तमानपत्रात जाहिरात देवून बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता एकूण सहा निविदा विकण्यात आलेल्या होत्या. त्यापैकी केवळ चार निविदा प्राप्त झालेल्या असून, त्यांचा तुलनात्मक दर खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. कैसरखान | ९% जास्त |
| २. | श्री. वॉल कन्स्ट्रक्शन | ४.९०% जास्त |
| ३. | श्री. कुलवंतसिंग | १२.३०% जास्त |
| ४. | श्री. डी. अजितसिंग | १४% जास्त |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.९०% जास्त दराची श्री. पोल कन्स्ट्रक्शन यांचे दरपत्रक आहे. परंतू दर योग्य वाटत नसल्यामुळे मा. आयुक्त यांनी संबंधित गुत्तेदार यांना दर वाटाघाटी करीता दि. ३०-०६-९२ ला बोलाविले असता व मा. आयुक्त मा. कार्यकारी अभियंता लेखा परीक्षक यांच्या प्रत्यक्ष वाटाघाटी झाली संबंधित गुत्तेदार पॉल कन्स्ट्रक्शन यांनी अंदाजपत्रकास दरापेक्षा ४% जास्त दराने काम करण्यास संमती दिलेली आहे व मा. आयुक्त यांनी सदर कामास मंजुरी दिलेली आहे. करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

झोन क्र. मधील विविध ठीकाणची दुरुस्ती व देखाभल करण्याच्या कामाकरीता गुत्तेदार मेर्सस पॉल कन्स्ट्रक्शन यांच्याशी झालेल्या प्रत्यक्ष वाटाघाटी नुसार उक्त काम संबंधिताकडून अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ४% जास्त दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १५०/२३ :**

मा. आयुक्तांच्या दि. ३०-०६-९२ च्या तजवीजीनुसार सदरील प्रस्ताव स्थायी समितीच्या बैठकीत प्रस्तावित करण्यात श्री. गोगाबाबत मंदिर बेगमपुरा औरंगाबाद या संस्थेस खालील दर्शविलेल्या मा. नगर सेवकांच्या स्वेच्छा निधीतून आर्थिक मदत देण्यास्तव सुचविले आहे. सदर प्रस्ताव स्थायी समितीच्या मंजुरीसाठी बैठकीत मांडण्यात यावा.

| अ. क्र. | मा. नगर सेवक | रक्कम |
|---|---|---|
| १. | श्री. एकबालसिंग गील | १५,०००/- |
| २. | श्री. मा. महापौर अशोक सायन्ना | ५,०००/- |
| ३. | श्री. शंकर मग | ३,०००/- |
| ४. | श्री. नामदेव मानकापे | २,०००/- |
| ५. | श्री. प्रभाकर विधाते | ३,०००/- |
| ६. | श्री. प्रदिप जैस्वाल | १,०००/- |
| ७. | श्री. कचरु नवपूते | २,०००/- |
| ८. | श्री. अजित शेळके | ५,०००/- |
| ९. | श्री. मो. इस्माईल | ५,०००/- |
| १०. | श्री. चंद्रकांत खैरे | ५,०००/- |
| ११. | श्री. हाजी मोहमद हाध्दीजोद्दीन | ३,०००/- |
| १२. | श्री. विजय पालीवाल | ५,०००/- |
| १३. | श्री. केशव सोनवणे | ५,०००/- |
| १४. | श्री. मोतीराम घडामोडे | ५००/- |
| १५. | श्री. जयवंत ओक | २,०००/- |
| १६. | श्री. अजिज जहागीरदार | ५,०००/- |
| १७. | श्री. एस. एच. रफत | २,५००/- |
| १८. | श्री. तुळशीराम भगुरे | २,०००/- |
| | | ६१,०००/- |

वरील प्रमाणे दर्शविलेली रक्कम मंजुर करण्यास्तव प्रस्तावित.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, बेगमपूरा येथील गोगाबाबा मंदिर या संस्थेस प्रस्तावातील अनुक्रमांक १ ते १८ मध्ये दर्शविलेल्या स. सभासदांच्या स्वेच्दा निधीस रक्कम रुपये ६१,०००/- मदत म्हणून हस्तांतर करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी. या ठरावास याच सभेत सर्वानुमते स्विकृती देण्यात येते.

**विषय क्र. १५१/२४ :**

मोहल्ला एकनाथ नगर येथील गृह निर्माण व क्षेत्र विकास मंडळ (Housing Board) च्या वसाहतीसाठीच्या रेखांकनात प्राथमिक शाळेसाठी भूखंड ठेवला आहे. या भुखंडाचे क्षेत्र सुमारे ११७.१५ चौ. मी. एवढे आहे. या भागात प्राथमिक शाळेची गरज लक्षात घेता औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्र विकास मंडळ (म्हाडा) कडूनही जागा घेण्यासाठी किंमत अदा करावी लागेल. ( म्हाडाने सदर भुखंडाची मुळ कीमंत रुपये १,९८,४१३/- एवढी आकारली आहे. तरी वरील प्रमाणे रक्कम म्हडास अदा करुन प्राथमिक शाळेसाठी भखूंड उपलब्ध होण्यासाठी प्रस्ताव स्थायी समितीच्या मंजुरीसाठी सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मो. एकनाथ नगर या भागातील प्राथमिक शाळेची गरज लक्षात घेता एकनाथ नगर येथील गृह निर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या वसाहती साठीच्या रेखांकनात प्राथमिक शाळेसाठी राखून ठेवलेल्या सुमारे १,११७,१५ चौ. मीटरचा भुखंड र. रु. १,९८,४९३ चा किमतीमध्ये प्राथमिक शाळेसाठी औरंगाबाद गृह निर्माण व क्षेत्र विकास मंडळ (म्हाडा) यांचेकडून खरेदी करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

यानंतर सभेचे कामकाज संपल्याचे मा. सभापती यांनी जाहीर केले.

स्वाक्षरित/-
सचिव,
महानगरपालिका, औरंगाबाद.

स्वाक्षरित/-
सभापती, स्थायी समिती
महानगरपालिका, औरंगाबाद.

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद*

**दिनांक २४-०७-९२ रोजी दुपारी वाजता भरलेल्या स्थायी समिती सभेचा इतिवृत्तांत दिनांक २१-०७-९२ रोजी गणपुर्ती अभावी तहकूब करण्यात आलेली स्थायी समितीची सभा शुक्रवार दिनांक २४-०७-९२ रोजी दुपारी ३.०० वाजता समिती सभागृहात मा. सभापती ॲड. श्री. इगबालसिंग गिल यांच्या अध्यक्षतेखाली सभेत सुरुवात झाली. या सभेस कार्यलयीन अधिकाऱ्यासह निम्ननिर्दिष्ट सन्माननीय सभासद उपस्थित होते.**

१) श्री. नारायण मोहन फत्तेलष्कर
२) श्री. भगुरे तुळशीराम छगन
३) श्री. गिरजाराम नानाराव हाळनोर
४) श्री. विजय गोविंदराव पालीवाल
५) श्री. जावेद हसनखान कासीम हसनखान
६) श्री. अजिजुल्ला बेग वाहेद बेग
७) श्री. पेरकर विठ्ठल कोडांजी
८) श्री. शिंदे मधुकरराव माणिकरराव
९) श्री. ओक जयवंत केशवराव

**विषय क्र. १५२/१ :**

दिनांक ०४-०७-९२ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :**

**श्री. गिरजाराम हाळनोर :** दिनांक २३-०६-९२ च्या सभेत सभेपुर्वी दोन दिवस अगोदर शहरात पाणी पुरवठा झालेल्या गढुळ पाण्याबाबत चर्चा झाली होती. यावेळी सदर प्रकरणी पुढील सभेत माहिती देण्याबाबत आश्वासन दिले होते. परंतू प्रत्यक्षात काहीही कार्यवाही झालेली नाही. मागील प्रमाणेच पुन्हा शहरास गढुळ पाण्याचा पुरवठा झालेला आहे. तेव्हा याबाबत खुलासा व्हावा.

**कार्यकारी अभियंता :** शहराच्या काही भागात गढुळ पाण्याचा पुरवठा झाल्याची माहिती मिळताच काल प्रत्यक्ष पाहणी केली त्यानंतर पुन्हा आज सकाळी पाणी पुरवठयाच्या वेळी पाहणी केली असता, या भागास गढुळ पाण्याच्या पुरवठा होत नसून, पाण्यात मिसळण्यात आलेल्या क्लोरीनचा वास येत आहे असे निश्पन्न झाले.

**श्री. नारायण फत्तेलष्कर :** वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या बातमी बाबत स. सभासदांनी शहानिशा करुन मगच त्याबाबत सभागृहात चर्चा करावी.

**श्री. जावेद हसनखान :** सार्वजनिक दिवाबत्तीच्या कामासाठी वापरण्यात आलेले विद्युत सामान पुन्हा लावण्यात येते काय याबाबत खुलासा व्हावा. ( सोबत आणलेले बल्ब सभागृहात दाखवले. ) त्यासाठी विद्युत भांडाराचे रजिस्टर मागविण्यात यावे. प्रभागातील सार्वजनिक दिवाबत्ती च्या व्यवस्थेसाठी विद्युत भांडारातून काळाने बल्ब देण्यात आलेले आहेत. ते जूने बल्ब कसे देण्यात आले. मी स्वतः (सभासद) ते बल्ब घेतले म्हणून हा सर्व प्रकार निर्दशनास आला.

मनपा कर्मचारी परस्पर जे बल्ब किंवा टयुब लावतात. तेव्हा काय होते हे वेगळेच काल विद्युत भांडारातून जे बल्ब देण्यात आले त्या बल्बवर असलेले कव्हर नवे असून, आत मात्र जुना बल्ब आहे. कव्हर वरील कंपनी व आता मध्ये असलेला जूना बल्ब यांची कंपनी या वेगवेगळया आहेत. तेव्हा आतापर्यंत असे किती बल्ब किंवा टयुब लावण्यात आले आहेते ते तपासून पाहणे आवश्यक आहे. त्यासाठी विद्युत भांडाराच्या साठयाची तपासणी करण्यात यावी व सील करण्यात यावे.

**श्री. जयवंत ओक :** विद्युत भांडारातील साठयाची तपासणी करण्यात यावी व त्यासाठी विद्युत भांडाराला सिल लावण्यात यावे.

यानंतर ३.२५ ते ४.०० या वेळात मा. सभापती यांचेसह सर्व सभासदांनी विद्युत भांडारास भेट दिली या वेळात स. सभासद विठ्ठल पेरकर व मी तुळशीराम भगुरे हे सभागृहातच होते.

**श्री. जावेद हसनखान :** जुने बल्ब वापरण्या बाबत वरील अधिकाऱ्यांनी या विभागास काही पत्र दिले काय? असल्यास सदर पत्र दाखविण्यात यावे. तसेच विद्युत भांडाराचे लेखा परीक्षण किती काळापासुन झाले नाही या बाबतचा खुलासा व्हावा.

**उप अभियंता विद्युत :** सन १९८७ पर्यंत विद्युत विभागाचे लेखा परीक्षण पुर्ण झालेले आहे.

**श्री. अजिजुल्ला बेग :** मागील सभेत लेखा परीक्षण बाबत चर्चा झाली आहे. त्यावेळी लेखा परीक्षणासाठी कर्मचारी कमी आहे. त्यावेळी लेखा परीक्षणासाठी कर्मचारी कमी आहे. असा खुलासा करण्यात आला. मनपा अधिनियमाच्या नियमाप्रमाणे जमा खर्चाचा ताळेबंद प्रत्येक सभेस दयावयास पाहिजे.

**श्री. गिरजाराम हाळनोर :** शहराचा विस्तार वाढला असला तरी काम करणारे लाईन मन हे पुर्वी इतकेच आहेत. तेव्हा वाढीव शहराचा विस्तार लक्षात घेता विद्युत उप अभियंता व लाईनमन यांच्यात वाढ करण्यात यावी. म्हणजे कामा सुसुत्रता येईल.

**श्री. अजिजुल्ला बेग :** विद्युत विभागात दैनिक वेतनावर किती जादा लाईनमन काम करतात. ही बाब स. सभासदांना माहित नसावी. विद्युत विभागाती पर्यवेक्षकांना कनिष्ट अभियंताची पदोन्नती दिल्यामुळे पर्यवेक्षकांच्या जागा बऱ्याच दिवसापासून रिक्त आहे. या बाबींचा विचार होणे आवश्यक आहे.

**श्री. जावेद हसनखान :** जूने विद्युत साहित्य पुन्हा वापरण्याबाबत वरीष्ठ अधिकाऱ्यांनी विद्युत विभागाला काही पत्र दिले आहे काय? दिले असल्यास तसे पत्र सभागृहात दाखविण्यात यावे.

**उप अभियंता विद्युत :** शहरातील सार्वजनिक दिवाबत्तीच्या व्यवस्थेसाठी महाराष्ट्र राज्य विद्युत कार्यरत आहेत. भांडारात कमी बल्ब उपलब्ध असतील तर, जूने बल्ब वापरा असे वरीष्ठांचे रुलींग आहे. स. सभासद यांच्याकडे दिलेले बल्ब चालु स्थितीत आहेत. असे बल्ब टाकून देता येत नाहीत. या बल्ब साठी वापरण्यात आलेल्या खोक्यावर टि/टेस्टेड असे लिहलेले आहे. (सभागृहात टी लिहलेले खोके दाखविण्यात आले.)

**श्री. जावेद हसनखान :** रजिष्टवर लिहलेले टी/टेस्टेड हे नंतर लिहलेले आहेत.

**मा. सभापती :** स. सभासदांच्या समक्ष विद्युत भांडाराची पाहणी केली या प्रकरणी मालमत्ता अधिकारी यांनी स. सदस्य श्री. जावेद हसनखान यांचेसह चौकशी करुन आपला अहवाल पंधरा दिवसाचे आत दयावा.

**श्री. गिरजाराम हाळनोर :** गणेश कॉलनी भागातील पाण्याचा नमुना माझ्याजवळ आहे. शहरात गेस्ट्रोची साथ सुरु झालेली आहे. शहरात जागोजागी जलनि:सारण वाहिन्या तुटलेल्या आहेत. अनेक भागात स्वच्छता नाही या सर्व प्रकरणी मागील सभेत चर्चा केलेली आहेत. त्यावेळी चौकशी करु असे आश्वासन दिले आहे. तरीही तीच परिस्थिती आहे. हे योग्य नाही.

**आरोग्य वैद्यकीय अधिकारी :** पाण्यामुळे गॅस्ट्रो होतो असे नाही. सध्या आषाढ महिना चालु असल्याने सकाळी तयार केलेले अन्न दुपारी सेवन केले तर हागवन लागते. असे रुग्ण सध्या आहेत. अशा प्रकारच्या सुध्दा फक्त तीन/चार केसेस आहेत ग्रामीण भागातील काही रुग्ण अपयाशासाठी शहरात येतात. खबरदारीची उपाय योजना म्हणून शहरात हॅलोजन गोळया वाटप सुरु केल्या आहे. याशिवाय वृत्तपत्रामधुन पाणी उकळून पिण्या बाबतच्या सुचना नागरिकांना दिल्या आहेत. आणखी खबरदारीचा उपाय म्हणून ॲन्टी कॉलरा व्हॅक्सीन नागपूरकडून मागविता येईल. स्वच्छतेसाठी शहरात नाहॉनचा वापर सुरु केला आहे. कार्यालयाकडे दहा लिटर नोव्हॉनचा साठा उपलब्ध आहेत. नोव्हॉन खरेदी बाबतचे टेंडर मंजूर झालेले नाही.

**श्री. तुळशीराम भगुरे :** आरोग्य विभागात काम करणारे एम. पी. डब्ल्यु कर्मचारी कमी असून, ते प्रशिक्षितही नाहीत.

**श्री. गिरजाराम हाळनोर :** गढुळ पाणी पुरवठा प्रकरणी आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांच्याकडून माहिती घेण्यात आली हे योग्य पाणी तुंबलेल्या जलनि:सारण वाहिन्या, साचलेल्या कचरा, अशूध्द पाणी पुरवठा याबाबत काय कार्यवाही केली याचा खुलासा व्हावा.

**मा. सभापती** : सभागृहाचे कामकाजानंतर गणेश कॉलनी भागात पाहणी करण्यात येईल.

**श्री. मधुकर शिंदे :** क्रांतीनगर येथील ड्रेनेज लाईनचे चोकअप बाबत एक महिन्यापासून चर्चा होत आहे. तेव्हा या प्रकरणी काय कार्यवाही करणार याचा खुलासा व्हावा.

**मा. सभापती** : शहरातील जलवाहिन्या व जलनि:सारण वाहिन्या यांचे दुरुस्ती व देखभाल बाबत विभागीय अधिकारी यांना सुचना दिल्या आहेत.

**श्री. नारायण फत्तेलष्कर :** दि. १५-०७-९२ रोजी वृत्तपत्रात प्रसिध्द झालेल्या जाहिर निविदा बाबत खुलासा करण्यात यावा. यात नमुद केल्याप्रमाणे विभागीय अधिकाऱ्यांना खर्चाचे अधिकार आहेत काय? तातडीच्या प्रसंगी विभागीय अधिकाऱ्यांनी या कामासाठी खर्च कसा करावा.

**कार्यकारी अभियंता :** जलवाहिन्या व जलनि:सारण वाहिन्या यांच्या दुरुस्ती व देखभाल साठी लागणारे साहित्य विभागीय अधिकाऱ्यांनी पुरविले जाईल. तसेच या कामासाठी प्रत्येक विभगीय अधिकाऱ्यांकडे एक दुय्यम आवेक्षक देण्यात आला आहे.

**मालमत्ता अधिकरी, सहाय्यक आयुक्त :** दुय्यम आवेक्षक हे फक्त जलनि:सारण वाहिनीचे चोकअप काढु शकतील याशिवाय झोमनमध्ये काम करणारे विभागीय अधिकारी हे तांत्रिक नाही तेव्हा अशा प्रकारची व्यवस्था करणे योग्य होणार नाही.

**श्री. नारायण फत्तेलष्कर, श्री. अजिजुल्ला बेग :** नळ जोडणी बाबतची संचिका तयार करतांना प्लंबर, संबंधित नागरीकांकडून पैसे घेतात. परंतू त्याबाबतची पावती देत नाहीत. नळ जोडणी करणाऱ्या प्लंबरने नळ जोडणीसाठी नागरिकांकडून किती रक्कम द्यावी याबाबत काही नियम केले आहेत काय?

याशिवाय शहरात विना परवाना नळ जोडणी केली जाते. अशा प्रकरणी किती प्लंबरचे लायसन्स रद्द केले. तसेच इतर महानगरपालिकेमध्ये नळ जोडणीच्या संचिकेवर प्लंबरच्या सही शिक्क्याने संचिका तयार करण्याची पध्दत आहे काय? महापालिका स्थापन झाल्यानंतर नळ जोडणी बाबतचे उप विधी तयार केले आहेत काय? या सर्व बाबींचा खुलासा व्हावा.

**मा. सभापती** : नळ जोडणी प्रकरणी इतर महापालिका कडून माहिती मागविली जाईल.

**श्री. गिरजाराम हाळनोर** : सिध्दार्थ उद्यान येथील पोहण्याचा तलाव नागरिकांसाठी केव्हा खुला होईल या पोहण्याच्या तलावावर आता नागरिकांसाठी केव्हा खुला होईल या पोहण्याच्या तलावावर आता पर्यंत झालेला खर्च लक्षात घेता सदर पोहण्याचा तलाव नागरिकांसाठी खुलासा होत नसेल तर, हा तलाव खाजगी संस्थेकडे देण्यात यावा.

**मा. सभापती** : पोहण्याचा तलावा बाबत सर्वसाधारण सभेत चर्चा चालु असल्यामुळे सभागृहात चर्चा करणे योग्य होणार नाही.

**श्री. गिरजाराम हाळनोर** : शहराच्या सिल्लीखाना भागात जनावरांची कत्तल होत आहे ती बंद झाली पाहिजे. अन्यथा शहराचे वातावरण बिघडण्याची शक्यता आहे.

ज्योतीनगर येथील ले आऊट मधील ओपन स्पेसच्या जागेचे पी.आर. कार्ड बदलण्याचा प्रयत्न चालु आहे.

**मा. सभापती** : सर्व सभासदांनी याबाबत लेखी पत्र दयावे.

**श्री. जयवंत ओक, श्री. जावेदहसन खान** : एकनाथ रंगमंदिर येथे कार्यक्रम चालु असतांना विद्युत पुरवठा खांडीने झाल्यास पर्यायी व्यवस्था म्हणून जनरेटर असणे आवश्यक आहे. परंतू या ठिकाणी जनरेटरची व्यवस्था नाही.

**मा. सभापती** : एकनाथ रंग मंदिर करीता जनरेटर खरेदी बाबतचे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. एकनाथ रंगमंदिर इमारती बरोबरच मुख्य कार्यालयासाठी सुध्दा एक जनरेटर घेण्यात यावे.

**श्री. अजिजुल्ला बेग** : कार्यालयात बी-१ टेंडरचे काम शिल्लक नाही. म्हणून औरंगाबाद टाईम्स कंपनीचे रोडचे कामासाठी मागविण्यात आलेल्या टेंडरची तारीख बदलण्यात आली पण प्रत्यक्षात नियोजीत तारखेपुर्वी टेंडर घेण्यात आले हे कसे याबाबत खुलासा व्हावा.

**मा. सभापती** : संबंधित अधिकाऱ्यांची याबाबतची संचिका मागवावी.

**श्री. मधुकर शिंदे** : औरंगाबादचे मनपाचे अग्नीशमन अधिकारी हे बी फायर पदवीधारक असतांना शहर अभियंता यांच्या अधिपत्याखाली कसे काम करतात इतर महापालिकेमध्ये अग्नीशमन अधिकारी हे उप आयुक्त यांच्या अधिकारात काय करतात तेव्हा आपल्या महापालिकेतच अशी वेगळी पध्दत का? याचा खुलासा व्हावा.

**मा. सभापती** : इतर महानगरपालिकाप्रमाणेच औरंगाबाद मनपा अग्नीशमन अधिकारी यांनी उप आयुक्त यांच्या अधिपत्याखाली काम करावे.

**श्री. अजिजुल्ला बेग** : मनपा कर्मचाऱ्यांनी दाखल केलेल्या अपील प्रकरणी स्थायी समिती मध्ये निर्णय झाला आहे. तेव्हा स्थायी समितीच्या निर्णयाप्रमाणे या प्रकरणी काय कार्यवाही झाली याचा खुलासा व्हावा.

**सहाय्यक आयुक्त - १** : कर्मचाऱ्यांनी अपील प्रकरणी स्थायी समिती मध्ये झालेल्या निर्णयाबाबत संबंधित अधिकाऱ्यांकडून वैधानिक मत मागविण्यात आले आहेत.

**श्री. मधुकर शिंदे, श्री. गिरजाराम हाळनोर :** मागील सभेत अग्निशमन दलाकरीता आवश्यक असलेले साहित्य खरेदीपैकी फक्त दोन पाईप खरेदीबाबतचे टेंडर सभागृहापुढे ठेवण्यात आले आणि बाकी साहित्याचे टेंडर सभागृहापुढे ठेवण्यात आले नाही. शहरात लागलेल्या आगीच्या ठिकाणी अग्नीशमन अधिकारी काम करीत असतो त्याठिकाणी उप अभियंता यांत्रिकी हा काम करीत नसतो तेव्हा अग्नीशमन विभागा करीता लागणारे साहित्य खरेदी बाबतचे टेंडर उप अभियंता यांत्रिकी यांच्या शिफारसी प्रमाणे मागविले जाते तेव्हा ही कार्यपध्दती कशी आहे. याचा खुलासा व्हावा.

**श्री. जावेद हसन खान :** उप अभियंता श्री. शिंदे यांचे बदली प्रकरणी काय कार्यवाही झाली याचा खुलासा व्हावा. आम्हाला पाण्याचा त्रास होत आहे.

**मा. सभापती** : अधिकारी किंवा अधिकाऱ्यांची बदली करणे ही प्रशासकीय बाब आहे. याशिवाय नियमाप्रमाणे एखादया अधिकाऱ्यांचा किंवा कर्मचाऱ्यांच्या नावनिशी सभागृहात चर्चा करता येत नाही.

**श्री. जावेद हसनखान :** उस्मानपुरा शाळेच्या ठिकाणी झालेल्या बलात्कार प्रकरणी काय कार्यवाही झाली. या शाळेला वाचमन दिलेली आहे काय?

**शिक्षणाधिकारी :** उस्मानपुरा शाळेकरीता वाचमन नेमलेला आहे. घडलेल्या प्रकरणी पोलीसांनी वाचमनला धरुन नेले होते. दुसऱ्या दिवशी सकाळी रिपोर्ट करण्यात आला सदर प्रकरणी वॉचमनला ताकीद दिली आहे.

**श्री. अजिजुल्ला बेग :** ठराव क्र. १२८ दि. ०४-०७-९२ मधील अनुक्रमांक १ मध्ये ए-१ आणि रेट लिस्टच्या कामाबाबतची माहिती प्रत्येक विभागातर्फे प्रत्येक महिन्याच्या पहिल्या बैठकीत देण्यात यावी अशी वाढ करण्यात यावी.

**मा. सभापती** : स. सभासदांच्या सुचनेप्रमाणे वाढ करण्यात यावी.

**श्री. गिरजाराम हाळनोर :** दिनांक ०४-०७-९२ च्या सभेतील चर्चेनुसार कनिष्ठ अभियंताची पदे भरतांना पदोन्नतीचे प्रमाण काय आहे याबाबतचा खुलासा व्हावा, व नियमाप्रमाणे हे प्रमाण काय आहे.

**सहाय्यक आयुक्त-१ :** कनिष्ठ अभियंताची पदे भरतांना पदोन्नतीचे प्रमाण ७०.२० असे प्रमाणे आहे. नियमाप्रमाणे हे प्रमाणे ७५.२५ आहे.

**श्री. गिरजाराम हाळनोर :** कनिष्ठ अभियंताची पदे भरतांना पदोन्नतीचे प्रमाणे ७०.३० ऐवजी ५०.५० असे असावे.

**श्री. विठ्ठल पेरकर, श्री. अजिजुल्ला बेग :** स. सभासदांच्या सुचनेस आमचा विरोध आहे. तांत्रिकदृष्टया हुशार कर्मचारी कार्यालयात असणे आवश्यक आहे. या दृष्टीचा विचार करता पदोन्नतीचे प्रमाण ७०:३० असावे.

**मा. सभापती** : स. सभासदांच्या सुचनेचा सेवा भरती नियम मंजूर करतांना विचार केला जाईल.

**श्री. मधुकर शिंदे :** दिनांक ०४-०७-९२ च्या सभेत प्रतापनगर येथील बांधकाम बाबत झालेल्या चर्चेनुसार खुलासा करण्यात यावा.

**श्री. गिरजाराम हाळनोर :** प्रतापनगर बांधकाम प्रकरणी पुढील सभेत माहिती दयावी. या प्रकरणाशी संबंधित अधिकारी या सभागृहात उपस्थित नाही.

**मा. सभापती** : सदर प्रकरणी कार्यवाही चालु आहे. संबंधित अधिकाऱ्यांनी पुढील सभेत माहिती दयावी.

**श्री. अजिजुल्ला बेग :** ठराव क्र. १३४ दि. ०४-०१-९२ अन्वये सभागृहाने ५०० ऐवजी ६५० नग सोडीयम व्हेपरचे दिवे खरेदी करण्यास मंजूरी दिली आहे. त्याबाबतचा उल्लेख ठरावात नोंदविण्यात यावा.

**मा. सभापती** : स. सभासदांच्या सुचनेप्रमाणे नोंद करण्यात यावी.

**ठराव :**

दिनांक ०४-०७-९२ च्या सभेतील --------

१) ठराव क्र. १२८ मधील अनुक्रमांक १ मध्ये ए-१ आणि रेटलिस्टच्या कामाबाबतची माहिती प्रत्येक विभागातर्फे प्रत्येक महिन्याच्या पहिल्या बैठकीत घेण्यात यावी " अशी वाढ करण्यास --------

२) ठराव क्र. १३४ मधील अनुक्रमांक १ ते ३ मधील साहित्य ५०० नग ऐवजी ६५० नग (प्रत्येकी) आणि अनुक्रमांक ४ चे साहित्य १०००/- ऐवजी १३०० नग या प्रमाणे खरेदी करण्यात यावी. अशी दुरुस्ती करण्यास --------

वरील अनुक्रमांक १ व २ मधील दुरुस्ती व वाढयासह दिनांक ०४-०७-९२ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समितीचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. १५३/२ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, वार्ड क्र. ४४ मोहल्ला शांतीनिकेतन येथील मनपा च्या खुल्या जागेवर कंपाऊंडवाल बांधणे कामासाठी सन १९९१-९२ च्या सार्वजनिक बांधकाम खात्याच्या दरसुची प्रमाणे र. रु. १,२९,५२५/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे.

सदरचा खर्च विकास योजना अंतर्गत भुखंडाचे संरक्षण या शिर्षकाखाली करण्यात येईल. तरी र. रु. १,२९,५२५/- चे अंदाजपत्रक मंजुरी प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र. ४४ मोहल्ला शांतीनिकेतन कॉलनी येथील मनपाच्या खुल्या जागेवर कंपाऊड वॉल बांधण्याच्या कामाकरीता १,२९,५२५/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी. कामाची तातडी लक्षात घेता या कामाकरीता लघु निविदा मागविण्यात याव्यात असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. १५४/३ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, राजनगर गृहनिर्माण संस्था शहानुरवाडी सन १८ व साईट क्र. १२३ येथील मनपाच्या खुल्या जागेवर कपाऊंड वॉल बांधणे तयार फेन्सींग करणे ३० कामासाठी सा. बा. खात्याचे सन ९१-९२ च्या डी. एस. आर. दराने र. रु. २,५४,०००/- चे अंदाजपत्रक तयार केलेले आहे. सदरचा खर्च विकास योजना अंतर्गत भुखंडाचे सरंक्षण या शिर्षकामधुन करण्यात येईल. प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, राजनगर गृहनिर्माण संस्था शहानुरवाडी सर्वे नं. १८ व साईट रु. १२३ येथील मनपाच्या खुल्या जागेस कंपाऊंड वॉल बांधणे व तारफेसिंग

करण्याच्या कामासाठी र. रु. २,५४,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १५५/४ :**

सहाय्यक आयुक्त-२ यांनी प्रस्ताव सादर केला की, सन ९२-९३ सालास हातगाडी खरेदी करण्याकरीता निविदा मागविण्यात आल्या होत्या एकूण दोन निविदापत्रके प्राप्त झाली होती व दोघांनी पण हातगाडयाचे नमुने दाखल केले होते. सदरील नमुन मा. शहर अभियंता यांनी तपासणी करुन मे. जैन ट्रेर्डस औरंगाबाद यांचे नमुने चांगाला असल्याबद्दलचा अभिप्राय दिला आहे.

तपशील खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | मे. जैन ट्रेडर्स औरंगाबाद | रुपये १२९५.०० प्रति नग |
| २) | एम. एस. एस. आय. डी. सी. औबाद | रुपये ११८८.०० प्रति नग |

मा. शहर अभियंता यांनी शिफारस केल्याप्रमाणे मे. जैन ट्रेडर्स यांचे प्रति हातगाडी र. रु. १२९५.०० दर मंजुरी बाबत विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सन १९९२-९३ सालात खरेदी करावयाच्या हातगाडया करीता प्रति नग रुपये १२९५/- या दराच्या मसेर्स जैन ट्रेडर्स औरंगाबाद यांच्या दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १५६/५ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, वार्ड क्र. ३२ नवाबपूरा येथे ४५० मी. मी. व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणे करीता र. रु. १,५१,०००/- ला स्थायी समितीचा ठराव क्र. ५०९ दि. १३-०४-९२ नुसार मंजुरी मिळालेली आहे.

सदर कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र. ५ दि. २०-०५-९२ दैनिक लोकमत टाईम्स व सिटीजन्स मध्ये जाहिरात देवून बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता एकूण चार (४) दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या. त्या खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १. | मे. विशाल कंस्ट्रक्शन | १२.५% जास्त |
| २. | श्री. कुलवंतसिंग | १२% जास्त |
| ३. | श्री. मिर्झा आर. बी. | ४.९०% जास्त |
| ४. | श्री. र. रफिकउद्दीन | १२% जास्त |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.९०% जास्त दराचे श्री. मिर्झा आर. बी. यांचे दरपत्रक आहे. संबंधित गुत्तेदार यांचा निविदेतील दर योग्य वाटत नसल्यामुळे मा. आयुक्त यांनी वाटाघाटी करीता संबंधित गुत्तेदारास बोलावून मा. आयुक्त कार्यकारी अभियंता, मुख्य लेखा परीक्षक यांच्या समोर प्रत्यक्ष दर वाटाघाटी करीता संबंधित गुत्तेदार श्री. मिर्झा आर. बी. यांनी ४.९०% जास्त दराऐवजी ४% जास्त दराने काम करण्यास संमती दिलेली आहे. करीता प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र. ३२ नवाबपूरा येथे ४५० मी. मी. व्यासाची ड्रेनेज लाईन टाकण्याच्या कामाकरीता गुत्तेदार श्री. मिर्झा आर. बी. यांच्याशी झालेल्या वाटाघाटीनुसार जकात काम संबंधिताकडून अंदाजपत्रकाच्या दरानुसार ४% जास्त दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १५७/६ :**

चिकलठाणा येथील बांधलेल्या दोन जलकुंभास संरक्षित भिंत बांधणे व वॉचमन क्वार्टर बांधण्याच्या कामासाठी सन १९९१-९२ च्या सा. बा. खात्याच्या डी. एस. आर. नुसार र. रु. १,५५,१०६/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, चिकलठाणा येथे बांधलेल्या दोन जलकुंभास सरक्षिंत भिंत बांधणी व वॉचमन क्वार्टर बांधण्याच्या कामासाठी र. रु. १,५५,१०६/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १५८/७ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी अभिप्राय दिला की, मुलमची बाजार ते घासमंडी पर्यंतच्या रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामाकरीता सन १९९१-९२ च्या सा. बा. खात्याच्या दरसुचीनुसार र. रु. २,२२,०२८/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरचा खर्च सन १९९२-९३ च्या " भांडवली रस्ते " या सदराखाली करण्यात येईल. प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मुलमची बाजार ते घासमंडी पर्यंतच्या रस्त्याचे डांबरीकरणाच्या कामासाठी र. रु. २,२२,०२८ च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १५९/८ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी अभिप्राय दिला की, आरेफ कॉलनी येथील रस्त्यावर रिमेटलिंग करणे व खडी रस्ते तयार करण्याच्या सां. बा. खात्याच्या सन १९९१-९२ च्या दरसुचीनुसार र. रु. ५,९०,४७६/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरचा खर्च सन १९९२-९३ च्या " भांडवली रस्ते " मा सदरातुन करण्यात येईल. प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, आरीफ कॉलनी येथील रस्त्यावर रिमेटलिंग करणे व खडी रस्ते तयार करण्याच्या कामासाठी र. रु. ५,९०,४७६/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १६०/९ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, नाथ मार्केट (सुपर मार्केट) औरंगपुरा इमारतीमध्ये लिप्ट बसविण्याच्या कामासाठी स्थायी समिती ठराव क्र. ४१७ दि. १२-१०-८८ अन्वये रु. ७ लक्ष ऐवजी रु. ६ लक्ष मंजूर करण्यात आलेले आहेत. इमारतींचे बांधकाम आता पूर्ण झालेले असून, वरचा शेवटचा मजला (तिसरा) फॅमिली कोर्ट कार्यालयास भाडयाने देण्याचे निश्चित झाल्याचे मालमत्ता अधिकारी यांनी सुचविले आहे. दुसऱ्या मजल्यावर अन्न व औषधी कार्यालय कार्यान्वीत आहे.

या कामाचे दरसुची तक्ते नाहीत. (डी. एस. आर.) म्हणुन ओ. टी. इलेव्हेटर यांना कार्यालयाचे पत्र क्र. बांध-१/३३/९० अन्वये विचारण केल्यानुसार त्यांनी त्यांचे पत्र क्र. ५२/७२७२/अे. आर. टी. एस. आर. जे दि. २३-०४-९० अन्वये एका लिप्ट करीता ४,३६,६४९/- रुपये दर कळविले आहेत व दोन लिप्ट करीता रुपये ८,७३,२९८/- रुपये दर कळविले आहेत. अंदाजपत्रकाचे तरतुदीचे दृष्टीने व निविदा मागविण्याच्या दृष्टीने रुपये ८,७३,२९८/- गृहीत धरुन या कामाची फेर निविदा दिनांक ०६-०५-९१ (वर्तमान पत्राद्वारे) मागविण्यात आली होती. परंतू एकही निविदा प्राप्त झाली नाही. तसेच औरंगाबादला सदर कामाची एकही एजन्सी उपलब्ध नसल्यामुळे व मा. आयुक्तांचे मंजूरीनुसार ओ. टी. इलेव्हेटर कंपनी यांचे पत्राद्वारे दर्शविलेली किंमत रुपये ८,७३,२९८/- दोन लिप्ट करीता मान्य करण्याच्या मंजूरीस्तव व सध्या किंमतीमध्ये जो काही फरक होईल ती वाढीव रक्कम मंजुरीस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर व सध्या एक लिप्ट बसविणे अगत्याचे आहे. कारण तिसऱ्या मजल्यावर फॅमीली कोर्ट हे कार्यालय असणार आहेत. तुर्तास एक लिप्ट बसविण्याबाबतचा विचार होऊन वरील प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, लिप्ट बसविण्याच्या कामासाठीचे दरसुची तक्ते उपलब्ध नसल्यामुळे आणि औरंगाबादला सदर कामाची एकही एजन्सी उपलब्ध नसल्यामुळे मे. ओ. टी. इलेव्हेटर यांनी दि. २३-०४-९० च्या पत्रान्वये एका लिप्ट करीता कळविलेली किंमत रु. ४,३६,६४९/- ही ग्राहय धरुन नाथ सुपर मार्केट औरंगपूरा या इमारतीमध्ये बसविण्याच्या दोन लिप्ट करीता एकूण र. रु. ८,७३,२९८/- आणि सध्याच्या किंमतीमध्ये जो काही फरक येईल ती वाढीव रक्कम यासह दोन लिप्ट करीता येणाऱ्या खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. नजिकच्या कालावधी मध्ये सदर इमारतीच्या तिसऱ्या मजल्यावर फॅमिली कोर्ट हे कार्यालय सुरु होणार असल्यामुळे तुर्तास वरील प्रमाणे एक लिप्ट बसविण्यात सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १६१/१ :**

वार्ड क्र. २९ मो. कसुपारख येथे ३०० मी. मी. व्यासाची आर. सी. सी. ड्रेनेज लाईन टाकणे बाबत अंदाजपत्रक र. रु. ४०,५००/- चे सन ९१-९२ च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आले असून, सदर अंदाजपत्रकास मा. आयुक्तांनी मंजुरी दिलेली आहे.

आदेशावरुन सदरील कामाकरीता कार्यलयीन निविदा क्र. ५/७६१/९२ दि. २०-०५-९२ नुसार दै. लोकमत टाईम्स व सिटीजीन्स दैनिकात जाहिरात देवून बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता एकूण दोन दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या त्या खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. आर. बी. चव्हाण | ०.०५% कमी |
| ३. | श्री. अब्दुल खालीफ | ५% जास्त |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०५% कमी दराचे श्री. आर. बी. चव्हाण यांचे दरपत्रक आहे. प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र. २९ मो. कसुवारडा येथे ३०० मी. मी. व्यासाची आर. सी. सी. ड्रेनेज लाईन टाकण्याच्या कामाकरीता तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०५% कमी दराच्या श्री. आर. बी. चव्हाण यांच्या दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १६२/११ :**

वार्ड क्र. ३० झोन क्र. २ मधील विविध ठिकाणी २५० मी. मी. व्यासाची आर. सी. सी. ड्रेनेज ड्रेनेज लाईन टाकणे बाबत अंदाजपत्रक र. रु. ५०,२००/- चे सन ९०-९१ च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आले असून, त्यास मा. आयुक्त यांनी मंजुरी दिलेली आहे.

सदरील कामाकरीता कार्यलयीन निविदा सुचना क्र. ५ दि. २०-०५-९२ नुसार दै. लोकमत टाईम्स व सिटीजन्स दैनिकात जाहिरात देवून बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता एकूण दोन दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या त्या खालील प्रमाणे

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. सय्यद रफीकोद्यीन | ३% जास्त |
| २. | श्री. राजेंद्र शिंदे | ०.२०% कमी |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.२०% कमी दराचे श्री. राजेंद्र शिंदे यांचे दरपत्रक आहे. प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र. ३० झोन क्र. २ मधील विविध ठिकाणी २५० मी. मी. व्यासाची आर. सी. सी. ड्रेनेज लाईन टाकण्याच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.२०% कमी दराच्या श्री. राजेंद्र शिंदे यांच्या दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १६३/१२ :**

वार्ड क्र. ३० मो. दिवानदेवडी येथील भगवान बुक पासून अतुल बेकरी पर्यंत २५० मी. मी. व्यासाची आर. सी. सी. लाईन टाकणे बाबत अंदाजपत्रक र. रु. ५९,०००/- चे सन ९१-९२ च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आले असून, त्यास मा. आयुक्तांनी मंजुरी दिलेली आहे. आदेशावरुन सदरील कामाकरीता कार्यलयीन निविदा सुचना क्र. ५ दि. २०-०५-९२ अन्वये दै. लोकमत टाईम्स व सिटीजन्स दैनिकात जाहीरात देवून बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता एकूण दोन दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या त्या खालील प्रमाणे

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. मन्नान खान | १% कमी |
| २. | श्री. मे. शैफ | ५% जास्त |

तुलनात्मकदृष्ट्या कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १% कमी दराचे श्री. मन्नान खान यांचे दरपत्रक आहे. प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र. ३० मो. दिवानदेवडी येथील भगवान बुक पासून अतुल बेकरी पर्यंत २५० मी. मी. व्यासाची आर. सी. सी. लाईन टाकणेच्या कामासाठी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १ कमी दराच्या श्री. मन्नान खान यांच्या दरपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १६४/१३ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, पाणी पुरवठा विभागासाठी रोड बॉक्सेस खरेदी करण्यासाठीच्या र. रु. १,२६,८००/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समितीची मंजुरी मिळालेली आहे. सदरील कामासाठी कार्यलयीन निविदा क्र. मनपा/पापु/३५०/९२ दि. २२-०५-९२ अन्वये जाहीर निविदा मागविण्यात आल्या. निविदा विक्रीच्या दिनांकास दोन निविदा विक्री झाल्या व त्या दोन्ही निविदा दर भरुन प्राप्त झाल्या त्या खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. बालाजी इंडस्ट्रीज | १६.४० प्रति किलो |
| २. | गोयल मेंटल वर्क्स | १३.९० प्रति किलो |

तुलनात्मकदृष्टया कमी व १३.९० रु. प्रति किलो या दराची गोयल मेटल वर्क्स जालना यांची निविदा आहे. प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, पाणी पुरवठा विभागासाठी रोड बॉक्सेस खरेदी करण्याकरीता तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजेच प्रति कि. रु. १३.९० या दराच्या मे. गोयल मेटल वर्क्स जालना यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १६५/१४ :**

मा. शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, नागसेननगर येथे समाजमंदिर बांधण्याच्या कामासाठी स्थायी समिती ठराव क्र. ४२६ दि. २७-०३-९२ अन्वये र. रु. २,००,११५/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी प्राप्त झालेली आहे. सदरचे काम हाती घेण्यासाठी कार्यलयीन निविदा सुचना क्र. ०२-९२-९३ अन्वये निविदा मागविल्या असता एकूण तीन निविदा विक्री झाल्या व पैकी दोन निविदा दर भरुन प्राप्त झाल्या त्या खालील प्रमाणे

| | | |
|---|---|---|
| १. | मे. विशाल कंस्ट्रक्शन | ४% जास्त |
| २. | मे. पाल कंस्ट्रक्शन | ६.२०% जास्त |

तुलनात्मकदृष्टया कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४% जास्त दराची मे. विशाल कंस्ट्रक्शन यांची निविदा आहे. दर कमी करण्यासाठी मा. आयुक्तांचे आदेशान्वये सदर गुत्तेदारास कार्यालयीन प. क्र. मनपा/उअ(ई) २६९/९२ दिनांक ११-०६-९२ नुसार कळविले असता दिनांक २५-०६-९२ च्या पत्रान्वये लेखी कळविले आहे की, ते दर कमी करण्यास तयार नाही. प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, नागसेननगर येथे समाज मंदिर बांधण्याच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४% जास्त दराच्या मे. विशाल कंस्ट्रक्शन यांच्या दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १६६/१५ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मनपाच्या विविध उद्यानामध्ये सिमेंटचे बेंचेस पुरवठा करण्याच्या कामासाठी अंदाजपत्रकीय र. रु. २,५१,०००/- ला मा. आयुक्तांची मंजुरी मिळालेली असून, त्या अनुषंगाने सदर कामाचे " बी-१ " नमुन्यात निविदा सुचना दिनांक १४-०५-९२ रोजी दै. लोकमत, इंडियम एक्सप्रेस आलमगीर टाईम्स, अंजिठां ई वर्तमानपत्रात जाहीरात देऊन प्रसिध्द करण्यात आली.

त्यानुसार एकूण दोन दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. अलीउद्यीन | १३% कमी दराने |
| २. | स्टार इंजिनियरींग | ८% कमी दराने |

सदरील कामाचा खर्च शासकीय अनुदान शिर्षकास करण्यात येणार आहे. वरील दर्शविलेल्या दरानुसार तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १३% कमी दराची श्री. अलीउद्यीन यांची निविदा आहे. प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मनपाच्या विविध उद्यानामध्ये सिमेंटचे बेंचेस पुरविण्याच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १३% कमी दराचे श्री. अलिउद्यीन यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १६७/१६ :**

शहर अभियंता मनपा यांनी प्रस्ताव सादर केला की, गारखेडा स्लम भागातील सार्वजनिक संडाससाठी अप्रोच रोड (खडी रस्ता) तयार करण्यासाठी अंदाजपत्रक र. रु. ७०,४१०/- ला मा. आयुक्तांनी मंजुरी दिल्या नुसार सदरील कामासाठी कार्यलयीन निविदा सुचना दिनांक १४-०५-९२ दै. लोकमत, अंजिठा, आलमगीर टाईम्स व दै. इंडियन एक्सप्रेस मध्ये विस्तृत प्रसिध्द देवून निविदा मागविल्या असता एकूण सात दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या. त्या खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. राजासिंग | ३१.५% कमी |
| २. | श्री. एम. ए. सिद्यीक | २४% कमी |
| ३. | श्री. सय्यद गयासुद्यीन | २५.०७% कमी |
| ४. | श्री. सलीम पटेल | २७.९२% कमी |
| ५. | श्री. सुखबीरसिंग | २५.५% कमी |
| ६. | मे. पाल कन्स्ट्रक्शन | २७.५% कमी |
| ७. | सै. सिराजुद्यीन | २५% कमी |

तुलनात्मकदृष्ट्या श्री सलीम पटेल यांची निविदा कमी दराची व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २७.९२% कमी दराची आहे. ठेकेदारांनी दिलेले दर अत्यंत कमी असल्यामुळे त्या दराचे पृथ:करण मागविले. तरी पण त्यांनी दिलेल्या दरात काम करण्यास तयार असल्याचे कळविले. त्यांचेकडून पाच रुपयाचे मुद्रांकावर कामाची प्रत चांगली देण्याबाबत हमीपत्र लिहुन घेतले असून, कामाचा दर्जा कमी प्रतिचा आढळल्यास ठेकेदाराचे नांव काळया यादीत समाविष्ट करण्यात येईल. या अटीवर श्री. सलीम पटेल यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा २७.९२% कमी दराची निवदिा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, गारखेडा स्लम भागातील सार्वजनिक संडासाच्यासाठी अप्रोच खडी रस्ता तयार करण्याच्या कामाकरीता कामाचा दर्जा कमी प्रतिचा आढळल्यास ठेकेदाराचे नांव काळया यादीत समाविष्ठ करण्यात येईल. या अटीसह तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २७.९२% कमी दराच्या श्री. सलीम पटेल यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १६८/१७ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, स्थायी समिती ठराव क्र. ३६ दिनांक ०६-०६-९१ द्वारे ३५० मी. मी. व्यासाची पुर्वरचित अर्धगोलाकार गटार खरेदी करण्यासाठी र. रु. ५,००,०००/- ची मंजुरी देऊन मे. रेणुका इंडस्ट्रीजकडून रु. ११४/- प्रति मिटर दराने

एकूण ४३८६ मीटर गटार खरेदी करण्यासाठी मंजुरी देण्यात आली होती. त्यानुसार कार्यादेश दिल्यानंतर ठेकेदारांनी १५०० मीटार गटारचा पुरवठा केला. परंतू मे रेणुका इंडस्ट्रीज यांची गटार पुरवठा करण्याची गती अतिशय मंद असल्यामुळे व ३५० मी. मी. व्यासाची अर्धगोलाकार गटार मजुरांना साफ करण्यास अरुंद असल्यामुळे ३५० मी. मी. अर्धगोलाकार गटाराचा पुवठा आहे. त्या स्थितीत रद्द करुन ४५० मी. मी. व्यासाची अर्धगोलाकार गटार खरेदी करण्यासाठी मा. आयुक्त यांनी दिनांक २०-०३-९२ ला मंजुरी दिल्यानुसार ४५० मी. मी. व्यासाची अर्धगोलाकार गटारासाठी निविदा मागविल्यानुसार स्थायी समिती ठराव क्र. ५९९ दिनांक २९-०४-९२ द्वारे ४५० मी. मी. व्यासाची अर्धगोलाकार गटाराचा पुरवठा करण्यासाठी मे. पंकज प्रोकॅब याचे प्रतिमीटर रु. १४१/- दराप्रमाणे निविदा मंजुरी झाल्यानुसार त्यांनी २९०० मिटर गटारचा पुरवठा केला.

१) त्यानुसार ३५० मी. मी. व्यासाची : रु. १,७१,०००/- १५०० मिटर प्र. मिटर रु. ११४/- प्रमाणे

२) ४५० मी. मी. व्यासाची २९०० मिटर
गटार प्र. मिटर रु. १४१/- प्रमाणे : रु. ४,०८,९००/-
रु. ५,७९,९००/-

वरील प्रमाणे एकुण गटार खरेदीसाठी दर अधिक स्विकारल्यामुळे व गटार मोठया व्यासाची खरेदी केल्यामुळे गटार खरेदीसाठी मंजूर रुपये ५,००,०००/- पेक्षा रुपये ८०,०००/- ची वाढ झालेली आहे. त्यासाठी सुधारीत अंदाजपत्रक रुपये ५,८०,०००/- चे तयार करण्यात आले आहे. करीता ठराव क्र. ३६ दि. ०६-०७-९१ द्वारा मंजुरी दिलेल्या रक्कमेपेक्षा वाढीव रक्कम रुपये ८०,०००/- ला मंजुरी मिळणेसाठी प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रति मिटर रुपये ११४/- या प्रमाणे ३५० मी. मी. व्यासाची १५००/- मीटर पुर्वरचित अर्धगोलाकार गटार मे. रेणुका इंडस्ट्रीज यांचेकडुन आणि प्रति मिटर रुपये १४१/- या दराने ४५०/- मी. मी. व्यासाची २९००/- मीटर पुर्वरचित अर्धगोलाकार गटार मे. पंकज फॅब यांचे कडुन स्थायी समितीच्या मंजुर दराप्रमाणे खरेदी करण्यात आल्यामुळे या कामासाठी मुळ अंदाजपत्रक र. रु. ५,००,०००/- पेक्षा वाढलेल्या र. रु. ८०,०००/- च्या वाढीव रक्कमेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १६९/१८ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, वार्ड क्र. ४ मो. बेगमपुरा (तारकेश्वर गल्ली) येथे अर्धगोलाकार गटार बांधणे बाबत अंदाजपत्रक र. रु. ६४,७००/- ला मा. आयुक्तांनी मंजुरी दिलेली असून, सदरचे अंदाजपत्रक सन ९०-९१ च्या दरसुचीप्रमाणे तयार करण्यात आले असून, सदरचा खर्च ९२-९३ च्या भांडवली तरतुदीतून करण्यात येईल.

आदेशानुसार सदर कामासाठी कार्यलयीन निविदा सुचना क्र. ५ दिनांक २०-०४-९२ ला दैनिक लोकमत टाईम्स व सिटीझन्स या वर्तमानपत्रात जाहिरात देवून बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता एकुण दोन दर निर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या त्या खालील प्रमाणे

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. सय्यद रफिकउद्दीन | ५% जास्त |
| २. | श्री. सय्यद सिराजउद्दीन | अंदाजपत्रक दराने |

तुलनात्मकदृष्टया कमी व अंदाजपत्रकीय दराची श्री. सय्यद सिराजउद्यीन यांची निविदा आहे. प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र. ४ मो. बेगमपुरा (तारकेश्वर गल्ली) येथे अर्धगोलाकार गटार बांधण्याच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दराच्या श्री. सय्यद सिराजउद्यीन यांच्या दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १७०/१९ :**

मालमत्ता अधिकारी मा. आयुक्त यांचे मंजुरीनुसार प्रस्ताव सादर करीत आहे की, कार्यलयाचा शिपाई श्री. दशरथ चोखाजी आदमाने यांनी हमालवाडा रेल्वेस्टेशन स्लम मधील सहन जागा निवासी उपभोगासाठी ३० वर्षाच्या भाडेपट्टयाने मागणी केलेली आहे.

हमालवाडा रेल्वेस्टेशन स्लम मधील नाल्यालगतची व महानगरपालिका संडास जवळील ४६.४६ चौ. मीटर जागा सहाय्यक संचालक नगर रचना यांनी सहाय्यक संचालक नगर रचना यांनी ठरवून दिल्यानुसार वार्षीक भाडे रक्कम रुपये ४३३.०० प्रमाणे ३० वर्षाचे भाडेपट्टयाने महानगरपालिका आयुक्त ठरवतील त्या अटी शर्तीवर श्री. दशरथ चोखाजी आदमाने यांना देणेबाबत विचार होणेस्तव प्रस्ताव सादर.

**संवाद :**

**श्री. अजिजुल्ला बेग, श्री. गिरजाराम हाळनोर :** प्रस्तावीत कर्मचाऱ्याप्रमाणेच अन्य कर्मचाऱ्यांनी मागणी केल्यास त्यावेळीही सहानभुतीपुर्वक विचार करण्यात यावा.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, हमालवाडा रेल्वेस्टेशन स्लम मधील नाल्यालगतची व महानगरपालिका संडास जवळील ४६.४६ चौ. मीटर जागा ठरवून दिल्यानुसार वार्षीक भाडे र. रु. ४३३.०० प्रमाणे ३० वर्षाचे भाडे पट्टयाने महानगरपालिका आयुक्त ठरवतील त्या अटी शर्तीवर श्री. दशरथ चोखाजी आदमाने यांना देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १७१/२० :**

मा. आयुक्त यांचे मंजुरीनुसार मालमत्ता अधिकारी प्रस्ताव सादर करीता आहेत की, नाथ मार्केटमधील राखीव दुकाने भाडयाने देण्याची निविदा कार्यवाही सर्वसाधारण सभेच्या ठराव क्र. ८७/८ दि. २२-०४-९० अन्वये ठरलेल्या धोरणानुसार करण्यात आलेली आहे. या कार्यवाही अंतर्गत तळ मजल्यावरील राखीव दुकान न. २ साठी एकूण ११ निविदा प्राप्त झाल्या होत्या त्यात सर्वात जास्त भाडे दराची म्हणजे रु. १९५/- प्रति चौ. मी. प्रति मतहाराची निविदा श्री. गोविंद भागाजी थोरात यांची आहे. वर उल्लेखीत ठरावानुसार तळमजल्या वरील दुकानासाठीच्या कार्यालयाच्या भाडे दर प्रति चौ. मी. प्रतिमहा रु. ९०/- पेक्षा अधिक दराची व प्राप्त निविदेतील सर्वात जास्त दराची श्री. गोविंद भागाजी थोरात यांची वर उल्लेखीत दराची निविदा कार्यालयाने मंजूर केलेली आहे.

मधल्या काळात सर्वसाधारण सभेने ठराव क्र. १३५/१६ दि. २०-०३-९१ द्वारे नाथ मार्केट मधील राखीव दुकानांना भाडयात ५०% (टक्के) सवलत देण्याचा निर्णय घेतलेला आहे. सदरचा ठराव प्रशासनाने मांडलेला नव्हता. वर उल्लेखीत दि. २२-०४-९१ च्या

ठरावानुसार राखीव दुकाने भाडयाने देण्याची कार्यवाही झाल्यानंतर ५० टक्के सवलत देण्याचा दि. २०-०३-९२ चा ठराव पारीत झालेला असल्यामुळे या ठरावाची अंमलबजावणी करणे प्रशासकीय दृष्टया योग्य वाटले नव्हते. या संबंधात सचिव, नगर रचना विकास विभाग मंत्रालय, मुंबई यांचे मार्गदर्शन मागविण्यात आले होते, परंतु अद्याप त्यांचेकडून मार्गदर्शन प्राप्त झालेले नाही.

आतावर उल्लेखीत दि. २२-०४-९० चा प्रथम ठराव क्र. २०-०३-९१ चा दुसरा ठराव यात मेळ घालण्याचे दृष्टीकोणातून प्रशासन पुढील प्रमाणे प्रस्ताव सादर करीत आहेत की, तळमजल्यावरील १ ते १२ दुकानासाठी ज्या भाडेदराच्या निविदा प्राप्त झालेल्या आहेत. त्यातील सर्वात कमी दराची म्हणजे ९१.५० प्रति चौ. मी. प्रतिमहा दरची जी निविदा प्राप्त झालेली आहे, त्या दराने श्री. गोविंद भागाजी थोरात यांना तळमजल्यावरील मागासवर्गीयासाठी राखीव असलेले दुकान क्र. २ भाडयाने दिल्यास दोन बाबी साध्य होतील. एक म्हणजे मागासवर्गीय उमेदवाराला गाळा दिला जाईल व त्याचबरोबर महानगरपालिकेचेही वार्षीक नुकसान होणार नाही. तसेच त्यांच्याकडून एक वर्षा ऐवजी (३) महिन्याचे आगाऊ भाडे घेणे योग्य होईल. करीता प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद :**

**मालमत्ता अधिकारी :** प्रस्तावित प्रकरणी श्री. सरपे आणि सौ. शिंदु खरे यांनी कायदेशीर नोटीस दिली आहे. या बाबत मा. आयुक्त यांच्याशी चर्चा केली असता सदर प्रकरण तुर्त स्थगित ठेवण्याची सुचना करण्यास सुचित केले आहे.

**मा. सभापती** : सदर प्रकरणी कायदेशीर नोटीस दिली असली तरी न्यायप्रविष्ठ नाही.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, नाथ मार्केट मधील मागासवर्गीय उमेदवारासाठी राखीव ठेवण्यात आलेल्या तळमजल्यावरील १ ते १२ दुकानासाठी ज्या भाडे दराच्या निविदा प्राप्त झाल्या आहेत. त्यातील सर्वात कमी दराची म्हणजे रुपये ९१.५० प्रती चौ. मी. प्रतिमहा या दराची जी निविदा प्राप्त झाली आहे. त्या दराने श्री. गोविंद भागाजी थोरात यांना मागासवर्गीयांसाठी राखीव ठेवलेल्या तळमजल्यावरील दुकान क्र. २ एक वर्षा ऐवजी ३ महिन्याचे आगाऊ भाडे घेऊन भाडयाने देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १७२/२१ :**

शहर अभियंता महानगरपालिका, यांनी प्रस्ताव सादर केला की, गारखेडा येथील प्रियदर्शनी इंदिरानगर स्लम अंतर्गत खडी रस्त्याचे काम करण्यासाठी मा. आयुक्त महानगरपालिका यांनी दि. २९-०४-९२ रोजी प्रशासकीय मंजूरी दिल्यानुसार सदरील कामासाठी व कार्यालयाची निविदा सुचना दिनांक १४-०५-९२ द्वारे स्थानिक वृत्तपत्रे दै. अजिठा, दै. आलमगीर टाईम्स, व राज्य स्तरावरील वृत्तपत्र दै. लोकमत, दै. इंडियन एक्सप्रेस मध्ये विस्तृत प्रसिध्दी देवून प्रगट निविदा मागविल्या असता कोऱ्या निवदा विकल्याचे अंतिम तारखे पर्यंत एकूण (११) निविदा विकण्यात आल्या व मोहरबंद निविदा स्विकारण्याचे नियोजीत तारखेस एकूण (१०) निविदा प्राप्त झाल्या त्या खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. अब्दुल गनी कुरेशी | २२.८७% कमी |
| २. | मे. आनंद बिल्डर्स | २६.३% कमी |
| ३. | श्री. सै. तोफिक अहमद | २१% कमी |

| | | |
|---|---|---|
| ४. | मे. पाल कंस्ट्रक्शन | २७.५% कमी |
| ५. | श्री. सै. गयासुद्दीन | २५.०७% कमी |
| ६. | श्री. राज सिंग | १९.७६% कमी |
| ७. | श्री. सुखबीरसिंग | २५.५% कमी |
| ८. | श्री. एम. ए. सिद्दीक | २४% कमी |
| ९. | श्री. सलीम पटेल | २५.९२% कमी |
| १०. | मे. एस. एच. असोसिएटस | २७.९९% कमी |

तुलनात्मकदृष्ट्या मे. एस. एच. असोसिएटस यांची अंदाजपत्रक दरापेक्षा २७.९९% कमी दराची निविदा आहे. ठेकेदाराने दिलेले दर अत्यंत कमी असल्यामुळे त्यांना दिलेल्या दराचे पृथ:करण मागविले असता या दरात देखील त्यांना ८ ते १०% फायदा असल्याचे कळवून कामाची प्रत चांगली देण्याबाबत रु. ५/- चे स्टॅम्प पेपर हमीपत्र देखील लिहून दिले आहे. करीता कामाचे प्रतिबाबत तक्रार आल्यास ठेकेदारास काळया यादीत समाविष्ट करण्यात येईल. या अटीवर मे. एस. एच. असासिएटस याचे अंदाजपत्रकीय दरापेक्षा २७.९९% कमी दराची निविदा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, गारखेडा येथील प्रियदर्शनी इंदिरानगर स्लम अंतर्गत खडी रस्त्या तयार करण्यासाठी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २७.९९% कमी दराच्या मे. एस. एच. असोसिएटस यांचे दरपत्रकास कामाचे प्रतिबाबत तक्रार आल्यास ठेकेदाराचे नाव काळया यादीत समाविष्ट करण्यात येईल, या अटीवर सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १७३/२२ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, संजयनगर बायजीपुरा स्लम परिसराची पाहणी केली असता आढळून आले की, सदरील परिसरातील प्रमुख रस्त्यांचे डांबरीकरण करणे अत्यावश्यक आहे. वाढलेल्या वाहतुकीमुळे खडी रस्ते फार काळ टिकत नाहीत. करीता या भागातील प्रमुख रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामासाठी र. रु. ४,९९,९००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. प्रस्ताव मंजुरीस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, संजयनगर बायजीपुरा स्लम भागात प्रमुख रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामासाठी र. रु. ४,९९,९००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १७४/२३ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, रमानगर स्लम भागात खडी रस्त्याचे काम करणे अत्यंत जरुरी असल्यामुळे रु. ७४,७९३/- ला मा. आयुक्तांनी मान्यता दिल्यानुसार सदरील कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र. ४ द्वारे दै. अंजिठा, आलमगीर टाईम्स तसेच दै. लोकमत व दै. इंडियन एक्सप्रेस मध्ये विस्तृत प्रसिध्दी देवून प्रगट निविदा मागविल्या असता एकूण तीन दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या त्या खालील प्रमाणे

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. पी. एन. चिचोळे | २७.२७% कमी |
| २. | श्री. सुखबीरसिंग | २७.५% कमी |
| २. | मे. एस. एच. असोसिएटस | २७.९९% कमी |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २७.९९% कमी दराची मे. एस. एच असोसिएटस यांची निविदा आहे. ठेकेदाराने दिलेले दर अतिशय कमी असल्यामुळे ठेकेदारास दराचे पृथःकरण मागविले असता त्याच पृथःकरण देवून या कामासाठी त्यांनी दिलेले दर इतके कमी असले तरी त्यांना ८ ते १० टक्के फायदा राहील असे कळविले असून, कामाची प्रत चांगील देण्याबाबत रु. ५/- चे मुद्रकांवर हमीपत्र दिले असून, कामाचा दर्जा निकृष्ट आढळल्यास त्यांना काळया यादीत समाविष्ट करावे असे हमीपत्र स्वहस्ते लेखी दिली आहे. करीता अंदाजपत्रक र. रु. ७४,७९३/- ला मंजुरी देवून या कामासाठी मे. एस. एच. असोसिएटस यांची निविदा कामाची तांत्रिक पाहणी करुन नंतर फायनल पेमेंट देण्याचे व कामाचा दर्जा कमी प्रतिचा आढळून आल्यास ठेकेदाराचे नांव काळया यादीत समाविष्ट करण्याचे अटीवर अंदाजपत्रकीय दरापेक्षा २७.९९% कमी दराची निविदा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, रमानगर स्लम भागात खडी रस्ते तयार करण्याच्या कामासाठी र. रु. ७४,७९३/- च्या अंदाजपत्रकास तसेच या कामासाठी कामाची तांत्रिक पाहणी करुन, नंतर फायनल पेमेंट देणे व कामाचा दर्जा कमी प्रतीचा आढळल्यास ठेकेदाराचे नाव काढल्या

**विषय क्र. १७५/२४ :**

कार्यकारी अभियंता (पा. पु. व जलनिःसारण) यांनी प्रस्ताव सादर केला की, मो. खोकडपूरा येथे १०० मी. मी. व्यासाची सी. आय. जलवाहिनी टाकण्याच्या कामासाठी परिसर अभियांत्रिकी विभागाच्या सन ९१-९२ च्या दरसुचीनुसार र. रु. ६९,६२०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील खर्च सन १९९१-९२ च्या प्रशासकीय अनुदानातून करण्यात येईल. तसेच सदर अंदाजपत्रकास मा. आयुक्तांनी मंजूरी दिलेली आहे.

आदेशानुसार सदरील कामासाठी कार्यलयीन निविदा क्र. मनपा/पापू/६७७/९२ दिनांक २०-०३-९२ अन्वये जाहीर निवदा बी-१ नमुन्यात मागविण्यात आल्या. दै. अंजिठा दै. आलमगीर टाईम्स, दै. देवगीरी तरुण भारत व दै. रहेबर या वर्तमानपत्रात प्रसिध्दीसाठी निविदा देण्यात आली होती.

त्यानुसार फक्त एकच निविदा विक्री होऊन श्री. पी. एच. पंजनानी यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ७.७७% जास्त दराची केवळ एकच दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाली.

कार्यालयीन पत्र क्र. मनपा/पापू/१०६५/९२ दि. ०३-०६-९२ अन्वये गुत्तेदार श्री. पंजनानी यांना दर कमी करण्याबाबत मा. आयुक्तांच्या दालनात ०९-०६-९२ रोजी बोलाविले असता त्यांनी सदरील काम ५.७७% जास्त दराने करण्याबाबत मान्य केले. त्यास मा. आयुक्तांनी दि. ०९-०६-९२ रोजी मान्यता दिली आहे. प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मो. खोकडपूरा येथे १०० मी. मी. व्यासाची सी. आय. जलवाहिनी टाकण्याच्या कामासाठी गुत्तेदार श्री. पी. एच. पंजनानी यांचेशी दि. ०९-०६-९२ रोजी झालेल्या वाटाघाटीनुसार उक्त काम अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ५.७७% जास्त दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १७६/२५ :**

कार्यकारी अभियंता (पा. पू. व ज. नि.) यांनी प्रस्ताव सादर केला की, पाणी पुरवठा विभागा अंतर्गत जलवाहिनी या टाकणे तसेच दुरुस्ती करण्याच्या कामासाठी अे. सी. प्रेशर पाईप्स व सी. आय. डी. जॉईटन खरेदी करण्यासाठी परिसर अभियांत्रिकी विभागाच्या १९९१-९२, च्या दरसुचीप्रमाणे र. रु. ४,९९,९५०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील खर्च हा भांडवली खर्चातून करावयाचा आहे. सदरील अंदाजपत्रकास मा. आयुक्तांनी मंजूरी दिलेली आहे.

तरी र. रु. ४,९९,९५०/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समितीची मंजूरी मिळणेस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, पाणी पुरवठा विभागांतर्गत जलवाहिनी टाकणे तसेच दुरुस्तीच्या कामासाठी लागणारे ए. सी. प्रेशर पाईप व सी. आय. डी. जॉईन्टस खरेदी करण्यासाठी र. रु. ४,९९,९५०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १७७/२६ :**

मा. शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो. नागेश्वरवाडी प्राथमिक शाळेच्या इमारतीच्या पहिल्या मजल्याचे बांधकाम करण्याच्या कामासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याचे सन ९१-९२ च्या डी. एस. आर. दराने र. रु. ४,६१,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरचा खर्च विकास इमारती (डी. पी. बिल्डींग) या शिर्षकामधुन करण्यात येईल.

तरी अंदाजपत्रक र. रु. ४,६१,०००/- मंजूरीसाठी प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, नागेश्वरवाडी प्राथमिक शाळेच्या इमारतीवर पहिला मजला बांधण्याच्या कामासाठी र. रु. ४,६१,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १७८/२७ :**

मा. शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, वार्ड क्र. न. ३८ मो. भवानीनगर येथे सार्वजनिक शौचालय बांधण्याच्या कामासाठी सन १९९१-९२ चे सा. बा. खात्याचे डी. एस. आर. दराने र. रु.. १,२३,५००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. सदरचा खर्च इतर इमारती व उर्वरीत कामे या शिर्षकामधुन करण्यात येईल.

ती अंदाजपत्रक र. रु. १,२३,५००/- मंजूरीसाठी प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र. ३८ मो. भवानीनगर येथे सार्वजनिक शौचालय बांधण्याच्या कामासाठी र. रु. १,२३,५००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १७९/२८ :**

मा. शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, महानगरपालिकेचे संत एकनाथ रंगमंदिर (नाट्यगृह) उस्मानपुरा येथील इमारतीत आर्ट गॅलरीचे काम करण्यासाठी मा.

आयुक्तांचे सुचने अन्वये औरंगाबाद शहरातील नामवंत वास्तुशस्त्रज्ञ श्री. आर. बी. नागपाल यांचेकडून र. रु. २,७१,५७१/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. सदरच्या नाट्यगृहाच्या वरच्या मजल्यावर आर्ट गॅलरी केली म्हणजे शहरात नाट्य रसिकांना एक आकर्षणाची बाब होईल व शहराच्या शोभेने ही वाढ होईल सदरचा खर्च इतर इमारती व उर्वरीत कामे या शिर्षकाखाली करण्यात येईल. प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिकेच्या संत एकनाथ रंगमंदिर इमारतीत आर्ट गॅलरीचे काम करण्यासाठी र. रु. २,७१,५७१/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १८०/२९ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी अभिप्राय दिला की, दिलरस व बुऱ्हाणी कॉलनी येथील रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामाकरीता सन ९१-९२ च्या सा. बा. खात्याच्या दरसुची नुसार र. रु. ३,१२,४२५/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरचा खर्च सन ९२-९३ च्या भांडवली रस्ते या सदराखाली करण्यात येईल. प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, दिलरस व बुऱ्हाणी कॉलनी येथील रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामाकरीता र. रु. ३,१२,४२५/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १८१/३० :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी अभिप्राय दिला की, बिसमिल्ला कॉलनी येथे खडी रस्ता तयार करण्याच्या कामाकरीता सा. बा. खात्याच्या सन ९१-९२ च्या दरसुची नुसार र. रु. २,१२,०८९/- सदरचा खर्च सन ९२-९३ च्या भांडवली व रस्ते या शिर्षकाखाली करण्यात येईल. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, बिसमिल्ला कॉलनी येथे खडी रस्ता तयार करण्याच्या कामाकरीता र. रु. २,१२,०८९/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १८२/३१ :**

वार्ड क्र. २० मो. खडकेश्वर येथील निलम हॉटेलच्या मागे १५० मी. मी. व्यासाची आर. सी. सी. लाईन टाकणे करीता र. रु. ५६,८००/- चे सन ९१-९२ च्या दरसुचीनुसार अंदाजपत्रक तयार करण्यात येवून त्यास मा. आयुक्तांनी मंजूरी दिल्यानंतर काम हाती घेण्याकरीता निविदा सुचना क्र. ५ अन्वये दै. लोकमत टाईम्स व सिटीजन्स मध्ये जाहीरात देवून बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता एकूण दोन दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या त्या खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. के. बी. काल्डा | ०.१% कमी |
| २. | श्री. सुरेश बी. सदवानी | ५% जास्त |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.१% कमी दराची श्री. के. बी. काल्डा यांनी निविदा आहे. प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र. २० मो. खडकेश्वर येथील निलम हॉटेलच्या मागे १५० मी. मी. व्यासाची आर. सी. सी. लाईन टाकण्याच्या कामाकरीता तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०१% कमी दराच्या श्री. के. बी. कालडा यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १८३/३२ :**

उप आयुक्त यांनी प्रस्ताव सादर केला की, महाराष्ट्र शासनातर्फे शहरी गरीबांसाठी नागरी मुलभूत सेवा योजनेच्या अंमलबजावणीसाठी रु. १५ लाखाचे अनूदान प्राप्त झाले असून कल्याणकारी योजनेचा एक भाग म्हणुन वरील अनुदानातून मनपा हद्दीतील गरीब अस्थीव्यंग अंपगांसाठी कृत्रिम अवयव नाममात्र १०% किमंत घेवून देण्यात यावेत. लाभार्थीची निवड व कृत्रिम अवयव पुवविण्याची जबाबदारी परमानंद ऑथेपेडीक अप्लायन्सेस सेन्टर गोंदिया या संस्थेस देण्यात यावी. प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

**श्री. मधुकर शिंदे, श्री. गिरजाराम हाळनोर, श्री. जावेद हसन खान :** कृत्रिम अवयव तयार करणारी गोंदीया येथील एकाच संस्था आहे असे नाही. तेव्हा प्राप्त अनुदानातून शहरी गरीब अस्थिव्यंग अपंगासाठी कृत्रिम अवयव पुवविण्याकरीता वृत्तपत्रात जाहीरात देवून माहिती मागविण्यात यावी व त्यानंतर हे काम हाती घेण्यात यावे.

**मा. सभापती** : कृत्रिम अवयव पुरविण्या करीता जाहीरात देवून माहिती मागविण्यात आल्यानंतर यावर विचार करण्यात येईल.

**ठराव :**

सर्वानुमते असे ठरले की, प्राप्त अनुदानातून शहरी गरीब अस्थीव्यंग अपगांसाठी लागणारे अवयव पुरविण्यासाठी वृत्तपत्रात जाहीरात देवून माहिती मागविण्यात यावी.

## *ऐनवेळचे विषय*

**विषय क्र. १८४/३३ :**

आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी प्रस्तावीत केलेले आहे की, शहराबाहेर साथीच्या रोगाचा प्रार्दुभाव दिसून येत आहे व तसेच शहरातून साथीच्या रोगाचा प्रार्दुभाव होवू नये म्हणून प्रतिबंधक उपाय योजनेसाठी पाणी शुध्दीकरणाच्या गेल्या (क्लोरीन गोळया) व कॉलरा प्रतिबंधक लस खरेदी करणे जरुरी आहे. त्यासाठी गतवर्षी मागविण्यात आलेल्या निविदा मधुन गतवर्षीच्या मंजूर केलेल्या दरानुसार मे. प्रिमियर असोसिएट नागपूर यांचे कमी दर होते. त्यांचे कडून गतवर्षीचे ७२.७५% पैसे प्रति हजार गोळीसाठी प्रमाणे २० लाख गोळया खरेदी करण्यास मान्यता दयावी.

तसेच नागपूर येथील शासकीय लस संशोधन केंद्र यांचेकडून ५० हजार डासेस कॉलरा प्रतिबंधक लसही शासकीय दरानुसार खरेदी करण्यासाठी मान्यता दयावी. मान्यतेनुसार येणार खर्च रोग प्रतिबंधक उपाय या लेखा शिर्षकामधुन करण्यास मान्यता दयावी. मान्यतेसाठी प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शहरात साथीच्या रोगाच्या प्रादुर्भाव होऊ नये म्हणून प्रतिबंधक उपाय योजनेसाठी रुपये ७२.७५ पैसे प्रति हजार या गतवर्षीच्या मंजूर दराने मेसर्स प्रिमियर असोसिएट नागपूर यांचेकडून २० लाख पाणी शुध्दीकरण गोळया आणि शासकीय लस संशोधन केंद्र नागपूर यांचेकडून ५०,००० डोसेस कॉलरा प्रतिबंधक लस शासकीय दरानुसार खरेदी करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. कामाची तातडी लक्षात घेता सदर ठरावास याच सभेत स्विकृती देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १८५/३४ :**

कार्यकारी अभियंता (पा. पु. व ड्रेनेज) यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, शहरातील जलनिःसारण वाहिन्यांचा देखभाल व दुरुस्ती करणे व शासकीय अनुदानांतर्गत चालु असलेली जलनिःसारणाची कामे वेळेवर पूर्ण करणेस्तव एस. एफ. आर. सी. (स्टील फायबर रेनफोर्सड कॉक्रिट) चे रिंग व ढापे मेन होल वर टाकण्यासाठी अंदाजपत्रकीय र. रु. १०,७०,०००.०० दहा लक्ष सत्तर हजार) च्या अंदाजपत्रकास सर्वसाधारण सभेने दि. २०-११-९१ रोजी विषय क्र. ५५/२ अन्वये ठराव करुन मंजुरी दिलेली आहे.

सदरील प्रकरणी स्थायी समिती सभा दि. २७-०३-९२ समोर विषय क्र. ४६०/३९ अन्वये निविदा मंजुरीस्तव ठेवण्यात आली होती. या प्रकरणी के. के. मेनहोलस, नगारीक व प्रतिभा इंडस्ट्रीज मुंबई यांचे दर समसमान म्हणजे रु. ६२१.०० प्रति जोडी असे होते. त्यामुळे मा. आयुक्त महोदयांनी दर पृथःकरण करुन व इतर तांत्रिक बाबींचा विचार करुन एस. एफ. आर. सी. रींग व ढापे पुरविण्याचे हे काम प्रतिभा इंडस्ट्रीज मुंबई यांना दयावे अशी शिफारस केली होती. तत्पुर्वी पाचारण करण्यात आले होते. मात्र बंद लिफाफ्यात दोघांनीही पुन्हा दर सारखेच भरुन दिले. त्यामुळे इतर तुलनात्मक बाबींचा अभ्यास करुन दोघांपैकी कोणीतरी एकास पुरवठयाचे काम देणे आवश्यक होते. कारण या प्रकरणी अगोदरच फार विलंब झालेला होता.

दरम्यान या प्रस्तावावर मा. स्थायी समिती ने असा ठराव केला की, के. के. मेन होल्स नाशिक यांचे रिंग व ढापे चांगले असल्यामुळे (दर्जा व क्षमतेने) त्यांच्या दरपत्रका बाबत मा. आयुक्त यांनी फेर विचार करावा. त्यानंतर या प्रकरणी मा. आयुक्त यांनी विधी सल्लागारांचे मत घेतले असता त्यांनी कलम ७३ चे खंड " क " नुसार प्राप्त झालेल्या निविदापैकी जी निविदा फायदेशीर आहे. ती निविदा मा. आयुक्तांना स्विकारता येईल. तसेच कोणत्याही कामाच्या निविदा मागविण्याचा मा. आयुक्तांना अधिकार असून, त्यापैकी कोणत्याही निविदा स्विकारणे त्यांचेवर बंधनकारक असणार नाही. मात्र जी निविदा सर्व परिस्थितीत म.न.पाच्या फायदयाची आहे. अशी मा. आयुक्तांची धारणा असेल तर, ती त्यांना स्विकारता येईल. म्हणजे कोणत्याही प्रकारच्या निविदा मागविणे अथवा त्या रद्द करण्याचे अधिकार मा. आयुक्तांना आहेत. तसेच स्थायी समिती अशा निविदा व मा. आयुक्तांनी शिफारास केलेल्या निविदाला मंजुरी देणे बाबत अथवा न देणे बाबत सक्षम आहे. त्याचप्रमाणे मा. आयुक्तांनी शिफारस केलेल्या निविदा विचारात न घेता स्थायी समितीने दुसरीच इतर निविदा स्विकारल्यास तो निणर्य मा. आयुक्तांवर बंधनकारक नाही व तो स्विकारणेबाबत नियमामध्ये तरतूद देखील नाही.

सदरील प्रकरणीही मा. आयुक्त यांनी शिफारस केलेली प्रतिभा इंडस्ट्रीज, मुंबई यांची निविदा न स्विकारता के. के. मेनहोल्स नाशिक यांच्या बाबत मा. आयुक्त यांनी फेरविचार करावा असा निर्णय स्थायी समितीने घेतला होता. अशा प्रकारे मा. आयुक्तांनी

महानगरपालिकेच्या सर्वकष फायदयाची जी निविदा मंजूरीसाठी स्थायी समितीकडे शिफारस केली होती. ती मंजूर न झाल्यामुळे व जोपर्यंत त्यास स्थायी समिती मंजूरी देत नाही. तोपर्यंत मा. आयुक्त कामाचा आदेश देवू शकत नाहीत. अशा वादग्रस्त परिस्थितीत मा. आयुक्तांनी सदरील निविदा रद्द करुन पुन्हा नव्याने निविदा मागविणे किंवा स्थायी समितीने शिफारस केलेली निविदा स्विकारणे मा. आयुक्तांवर बंधनकारक नसल्यामुळे व मा. आयुक्त यांचे व स्थायी समिती यांचे अधिकारामध्ये वाद निर्माण झाल्यामुळे हे प्रकरण कलम ४५१ अन्वये शासनाकडे पाठविणे हय दोन पर्यायापैकी एक पर्याय निवडावा असे मत विधी सल्लागारांनी दिले. मात्र या प्रकरणी शासनाला प्रस्ताव पाठविला असता तर कालापव्यय होण्याची दाट शक्यता होती. तसेच या कालावधीत स्थायी समितीही कार्यरत नव्हती. तसेच ड्रेनेजच्या रिंग ढाप्यांची अत्यंत निकड होती. कारण शासनाच्या अनुदानांतर्गत जलनिःसारणाची जी कामे चालु होती, त्यात एस. एफ. आर. सी. रिंग ढापे बसविण्याची तरतूद होती. मेनहोल्स तयार होऊन रिंग ढापे नसल्यामुळे उघडे होते. त्यात कचरा व माती जावून पावसाळयामुळे नविन ड्रेनेज लाईन पुन्हा निकामी होऊ शकल्या असल्या तसेच विभागीय कार्यालयाकडूनही वारंवार ढापे लवकर मिळविणे म्हणुन विचारणा होत होती. त्यामुळे व स्थायी समितीने तत्वतः एस. एफ. आर. सी. रिंग व ढाप्यांच्या दरांना मान्यता दिली होती. फक्त एजन्सीच्या बाबत वाद होता, त्यामुळे तातडीने प्रतिभा इंडस्ट्रीज मुंबई यांचेकडून एस. एफ.आर. सी. रिंग व ढापे पुरवठा करण्यासाठी त्यांना आदेश दयावा असे मा. आयुक्त यांनी सुचविल्यामुळे प्रतिभा इंडस्ट्रीज मुंबई यांच्यातर्फे रु. ६२१.०० प्रति जोडी या दराने रिंग व ढापे यांची खरेदी करण्यात आली आहे. आतापर्यंत एकूण ५०० (पाचशे) रिंग व ढापे यांचा पुरवठा संबंधितांनी केला असून, त्याचा दर्गा न क्षमता चांगली आहे.

तरी सदरील कार्यवाहीस मा. स्थायी समितीने कृपया कार्योत्तर मंजूरी दयावी व इतर उर्वरित ढापे प्रतिभा इंडस्ट्रीज मुंबई यांचेतर्फे खरेदी करण्याच्या प्रस्तावात रु. ६२१.०० प्रति जोडी याप्रमाणे मंजूरी दयावी ही विनंती. प्रस्ताव कार्योत्तर मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, जलनिःसारण कामासाठी आवश्यक असलेले एस. एफ. आर. सी. रिंग आणि ढापे पुरविण्याच्या प्रकरणी दिनांक २७-०३-९२ च्या स्थायी समिती निर्णयावर विधी सल्लागाराने दिलेली मते विचारात घेता शासकीय अनूदानांतर्गत जलनिःसारणाची जी कामे चालु होती. त्यातील मेन होल मध्ये कचरा व माती जावुन नविन ड्रेनेज लाईन पुन्हा निकामी होवू नये आणि रिंग व ढापेच्या दरांना स्थायी समितीने तत्वतः मान्यता दिली असल्यामुळे रुपये ६२१/- प्रति जोडी या दराने मे. प्रतिभा इंडस्ट्रीज मुंबई यांचे कडून आतापर्यंत मागविण्यात आलेल्या ५०० नग एस. एफ. आर. सी. रिंग व ढापे खरेदीस सर्वानुमते कार्योत्तर मंजूरी देण्यात येते. तसेच याच दराने म्हणजे प्रति जोडी ६२१/- रुपये या दराने मे. प्रतिभा इंडस्ट्रीज यांचेकडून एस. एफ. आर. सी. रिंग व ढापे खरेदी करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १८६/३५ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महानगरपालिकेच्या आस्थापनेवरील अग्निशमन अधिकारी व पदाची वेतनश्रेणी स्थायी समिती विषय क्र. २९४/१९ दि. २४-०१-९२ नुसार २००० ते ३२०० यास मंजूरी दिलेली आहे. परंतू श्री. झनझन अग्नीशमन अधिकारी यांनी बी. एस्सी बी. ई. (फायर) ची पदवी घेतलेली आहे. अग्नीशमन अधिकारी यांची जबाबदारी

शैक्षणिक अर्हता, कार्यक्षेत्र तसेच कामाचे स्वरुप पाहता त्यांना (रु. ६०० ते ११५०) सुधारीत वेतनश्रेणी रु. २०००-६०-२३०० दक्षता रोध ७५-३२००-१००-३५०० ही वेतन श्रेणी त्यांच्या नेमणुकी पासून म्हणजे ०१-०९-८७ पासून देण्याची शिफारस करण्यात येते.

करीता अग्नीशमन अधिकारी या पदाची वेतनश्रेणी रु. २००० ते ३२०० ऐवजी रु. २०००-६०-२३०० दक्षता रोध ७५-३२००-१००-३५०० या प्रमाणे वेतन श्रेणीत वाढ करण्यास्तव व ही वेतनश्रेणी ०१-०९-८७ पासून देण्यास्तव प्रस्ताव विचारार्थ व निर्णयास्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, ०१-०९-८७ पासून अग्नीशमन अधिकारी या पदाची वेतनश्रेणी रुपये २०००/- ते ३२००/- ऐवजी रुपये २०००/- ते ३५००/- या प्रमाणे वेतनश्रेणी देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

यानंतर सभेचे कामकाज संपल्याचे मा. सभापती यांनी जाहीर केले.

स्वाक्षरित/-
सचिव,
महानगरपालिका, औरंगाबाद.

स्वाक्षरित/-
सभापती, स्थायी समिती
महानगरपालिका, औरंगाबाद.

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद*

**दिनांक १२-०८-९२ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती इतिवृत्तांत. दिनांक १२-०८-९२ रोजी दुपारी ३.४५ वाजता मा. सभापती ॲड श्री. इगबालसिंग गिल यांचे अध्यक्षतेखाली समिती सभागृहात स्थायी समिती सभेस सुरुवात झाली. या सभेस कार्यलयीन अधिकाऱ्यासह खालील स. सभासद उपस्थित होते.**

१) श्री. नारायण मोहन फत्तेलष्कर
२) श्री. भगुरे तुळशीराम छगन
३) श्री. अलीम बेग मिर्झा कलीम बेग
४) श्री. गिरजाराम नानाराव हाळनोर
५) श्री. विजय गोविंदराव पालीवाल
६) श्री. मोहंमद इस्माईल अ. करीम
७) श्री. अजिजुल्ला बेग वाहेद बेग
८) श्री. पेरकर विठ्ठल कोडांजी
९) श्री. शिंदे मधुकरराव माणिकरराव
१०) श्री. ओक जयवंत केशवराव

**विषय क्र. १८७/१ :**

दिनांक २१-०७-९२ रोजी तहकुब झालेल्या व २४-०७-९२ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद:**

**श्री. गिरजाराम हाळनोर :** दैनिक तरुण भारत मध्ये झोपडपट्टी भागात गॅस्ट्रोची लागण या संदर्भाने प्रसिध्द झालेल्या बातमी प्रकरणी संबंधित अधिकाऱ्याने या विषयी चौकशी केली आहे काय? याचा खुलासा व्हावा.

**आरोग्य वैद्यकीय अधिकारी :** दैनिक देवगीरी तरुण भारत मध्ये प्रसिध्द झालेल्या बातमीनुसार स्थळ पाहणी करण्यात आली. या ठिकाणी होत असलेला पाणी पुरवठा व्यवस्थीत आहे. फक्त या भागात अस्वच्छता मोठया प्रमाणात आहे या दृष्टीने विभागीय अधिकारी यांना पाबंद करण्यात आले आहे. शहरातील स्लम भागाच्या स्वच्छतेकरीता विभागीय अधिकाऱ्यांची बैठक दिनांक १३-०८-९२ ला आयोजीत करण्यात आलेली आहे. स्वच्छेतेच्या कामाकरीता आवश्यक असलेले जादा कामगारांची नेमणुक करण्याकरीता विभागीय अधिकारी यांच्याकडे मंजुराच्या प्रतिक्षा यादया देण्यात आल्या आहेत. परंतु विभागीय अधिकाऱ्यांकडुन स्वच्छेते बाबत योग्य प्रकारे सहाकार्य होत नाही.

**श्री. मोहमंद इस्माईल :** सध्या पावसाळा सुरु आहे. अशा परिस्थितीत शहरात साचलेल्या कचऱ्यामुळे साथीचे रोग वाढतात. ही बाब लक्षात घेता आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी विभागीय अधिकाऱ्याबाबत सभागृहात केलेल्या अरोपी विषयी प्रशासनाचे काय मत आहे. याचा खुलासा व्हावा.

**मा. उप आयुक्त :** शहरातील स्वच्छतेच्या कामाकरीता विभागीय अधिकाऱ्यांना आवश्यक असलेले जादा कामगार किटक नाशक औषधी, जलनि:सारण वाहिन्या साफ

करण्यासाठी लागणारे बांबु इ. आवश्यक असलेल्या वस्तुंचा पुरवठा केलेला आहे. तसेच कचरा उचलण्याच्या कामी उपयोगात येणाऱ्या गाडया नियमित सज्ज राहतील या बाबत उप अभियंता यांत्रिकी यांना ताकीद देण्यात आली आहे. यानंतरही आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी विभागीय अधिकाऱ्याबाबत केलेला खुलासा बरोबर असेल तर, दि. १३-०८-९२ च्या सभेस या विषयी चर्चा करण्यात येईल.

**श्री. मोहमद इस्माईल :** शहरातील स्वच्छेतेसाठी विभागीय अधिकाऱ्यांना सुविधा उपलब्ध करुन दिल्या हे योग्य आहे. परंतु विभागीय कार्यालया अंतर्गत काम करणारे काम न करता इकडे तिकडे फिरतांना दिसतात. झोन कार्यालयाचे स्वच्छता निरिक्षक आणि जवान स्वच्छतेच्या कामाकडे लक्ष न देता विमा परवानगी बांधकामावर विशेष लक्ष देतात.

**उप अभियंता मॅकेनिक :** जे. सी. बी. मशीनद्वारे शहरातील अनेक मोहल्यामधील वर्षी गणित न उचलेला कचरा व मातीचे ढिगार मनपाच्या टिप्यर्स द्वारे दुपारच्या पालीस अधिकचे काम करुन मंजुरांची मदत न घेता ४०० ते ५०० ट्रक्स उचलण्यात आल्या आहेत.

**सहा. आयुक्त - २ :** शहरातील कचरा उचलण्यासाठी विभागीय अधिकाऱ्यांना कामगार लावण्याची परवानगी देण्यात आली होती. यानंतरही विभागीय अधिकाऱ्यांनी १००% कामगार लावण्याची परवानगी मागितली त्यानुसार त्यांना परवानगी देण्यात आली आहे.

**श्री. अजिजुल्ला बेग, श्री. मोहमंद इस्माईल :** पावसाळयाचे दिवसात कचरा कुंडीजवळी गॅमो झीन पावडरचा वापर करणे आवश्यक आहे. परंतु अशा प्रकारचा वापर करतांना दिसून येत नाही. याचा अर्थ कार्यालयाकडे गॅमेझिन पावडर उपलब्ध नाही काय याचा खुलासा व्हावा. तसेच कार्यालयातर्फे शहराच्या काही भागात रस्त्याच्या कडेला कचरा कुंडचा बांधणेचे काम हाती घेण्यात आले आहे. रस्त्याच्या कडेला बांधण्यात येणाऱ्या या कचरा कुंडयामध्ये पावसाचे व इतर प्रकारचे पाणी साचु नये आणि कचरा उचलण्यास सुलभता व्हावी. या दृष्टीने रस्त्याच्या कडेला बांधण्यात येणाऱ्या कचराकुंडया रस्त्याच्या पातळीपासून दिड फुट उंचीवर बांधण्यात याव्या.

**श्री. गिरजाराम हाळनोर :** चोकअप झालेली ड्रेनेज लाईन दुरुस्ती करण्याबाबत सुचना केली असता बजेट शिल्लक नाही. असा खुलासा केला जातो. तेव्हा याबाबत खुलासा करण्यात यावा.

**मुख्य लेखा परीक्षक :** नोव्हेबंर मधील सुधारीत अंदाजपत्रकाच्या वेळी जलनिःसारणाचे बजेट बाबत विचार करता येईल.

**श्री. गिरजाराम हाळनोर, श्री. अजिजुल्ला बेग, श्री. मोहमद इस्माईल :** जलनिःसारणाचे कामाबाबत आवश्यक असलेले बजेट मा. सभापती यांनी उपलब्ध करुन दयावेत. सुधारीत अंदाजपत्रक केव्हाही करता येते.

**श्री. मोहम्मद इस्माईल, श्री. अजिजुल्ला बेग :** फाजलपुरा येथील मनपा शाळा कस्टेडीयम इमारतीमध्ये भरत आहे. ही इमारत ताब्यात देणे बाबत मा. जिल्हाधिकारी यांचा आदेश झालेला आहे. तेव्हा याबाबत खुलासा व्हावा.

**शिक्षणाधिकारी :** फाजलपुरा येथील शाळेची इमारत ताब्यात घेण्याबाबत मा. जिल्हाधिकारी यांच्याकडुन कोणताही आदेश मिळालेला नाही. सदर इमारत चांगल्या स्थितीत आहे.

**मा. सभापती :** दि. १७-०८-९२ रोजी दुपारी ३.०० वाजता संबंधित वार्डांचे नगरसेवक यांच्यासह या शाळेची पाहणी करण्यात येईल.

**श्री. मोहमंद इस्माईल :** महापालिकेची परवानगी न घेता मनपा शिक्षक संघटनेने महापालिका शिक्षकास मारहाण या प्रकरणी मा. जिल्हाधिकारी यांच्याकडे जे निवेदन दिले आहे ते योग्य आहे काय याचा खुलासा व्हावा. घडलेली घटना ही निश्चितच घृणास्पद आहे तरी पण सदर प्रकरणी मा. जिल्हाधिकारी यांना निवेदन देण्यापुर्वी संघटनेने कार्यालयाची परवानगी घेणे आवश्यक होते किंवा मनपा मार्फत निवेदन दयावयास हवे होते.

**मा. उप आयुक्त :** मतदार यादया तयार करण्याचे काम तहसिल कार्यालयामार्फत चालु आहे. मनपा शिक्षकास झालेल्या मारहाण प्रकरणी संघटनेमार्फत सर्व संबंधित वरीष्ठांना निवेदन देण्यात येणार असल्याची माहिती संघटनेने दिली होती. निवेदन संघटने मार्फत देण्यात आलेले आहे.

**श्री. अजिजुल्ला बेग, श्री. मोहमद इस्माईल :** कार्यालयामार्फत विविध पदाकरीता मुलाखती घेण्यात येत आहेत. या पदाकरीता स्थायी समिती मार्फत मंजुरी घेण्यात आलेली नाही. नियमाप्रमाणे स्थायी समितीच्या मंजुरी नंतर मुलाखती घ्यावयास हव्यात मनपा अस्थापनेवर किती खर्च करता येतो या बाबत खुलासा व्हावा.

**मा. उप आयुक्त :** एकूण उत्पन्नाच्या ४२% इतका खर्च मनपा अस्थापनेवर करता येतो. सध्या ज्या पदाबाबत मुलाखती घेण्यात येत आहे ही पदे पुर्वीच मंजुर झालेली असून, रिक्त असलेल्या या जागा भरण्यात येत आहेत.

**श्री. मोहमद इस्माईल, श्री. अजिजुल्ला बेग :** महापालिकेच्या आर्थिक परिस्थितीचा विचार करुन जागा भरावयास पाहिजे. ज्या ज्या वेळी कर्मचाऱ्यांच्या जागा भरावयाच्या असतील त्या वेळी स्थायी समितीची मंजुरी घेणे आवश्यक आहे. ज्या पदाची जागा भरावयाची आहे. त्या पदाकरीता कोणती वेतनश्रेणी राहील या वेतनश्रेणीवर दरमहा किती खर्च आहेत. याबाबतचा विचार होणे आवश्यक आहे. (अधिनियम १९४९ चे कलम ५१ सभागृहात वाचुन दाखविले.)

**विधी सल्लागार :** मनपा अधिनियम १९४९ चे कलम ५१ अन्वये नविन पदा निर्माण करावयाचे असेल ०८ स्थायी समितीच्या मंजुरीची आवश्यकता भासते. सध्या मुलाखतद्वारे जी रिक्त पदे भरण्यात येत आहे हे त्या पदांची मंजुरी यापुर्वीच घेण्यात आलेली आहे.

**श्री. अजिजुल्ला बेग :** विधी सल्लागारांचा खुलासा योग्य वाटत नाही.

**मा. सभापती :** सदर प्रकरणी १४-०८-९२ रोजी (शुक्रवारी) चर्चा करण्यात येईल.

**श्री. गिरजाराम हाळनोर :** २० लाख रुपयाच्या सोन्या बाबतची बातमी वृत्तपत्रात वाचण्यात आली तेव्हा याबाबत खुलासा व्हावा.

**मा. उप आयुक्त :** राज्य परिवहन मंडळाच्या गाडीने प्रवास करुन येथे आलेल्या एका प्रवाशास त्याचे कडील सामानाबाबत जकात कर्मचाऱ्यांनी हटकले असता संबंधित प्रवाशाने नांदेडला जाणार असल्याची माहिती दिली त्यानुसार सदर प्रवाशाकडे रहदारी फीच्या रक्कमेची मागणी केली असता. जकात भरण्या इतके पैसे संबंधिताजवळ नसल्यामुळे या बदल्यात रहदारी फीची जकात वसूल होईल इतके सोने सिल करुन ठेवण्यात आले आहे.

**श्री. मधुकर शिंदे, श्री. गिरजाराम हाळनोर :** सदरील व्यापाऱ्याने त्यांच्याकडे सोने आहे. हे प्रथम दर्शनी सांगितले नाही. म्हणजेच त्याने जकात चुकविली म्हणुन

संबंधित व्यापाऱ्याकडून दहा पट जकात वसूल करणे आवश्यक आहे. या शिवाय सदर व्यापाऱ्याजवळ नांदेडचे बील होते काय? याचा खुलासा व्हावा.

**मा. सभापती** : नियमाप्रमाणे जकात वसुल करण्यात यावी.

**शहर अभियंता :** सदर कामासाठी पुन्हा दरपत्रक मागविण्यास मंजुरी मिळाली आहे. त्यानुसार २० दिवसात काम सुरु करता येईल.

**श्री. अजिजुल्ला बेग :** औरंगाबाद टाईम्स कॉलनी येथील ड्रेनेज लाईनचे काम सुरु करण्योच आश्वासन गत सभेत देण्यात आले आहे. परंतु ड्रेनेजच्या कामासाठी बजेट शिल्लक नसल्याबाबतचा खुलासा सभागृहात करण्यात येत आहे. तेव्हा औरंगाबाद टाईम्स कॉलनी येथील ड्रेनेज लाईनचे काम सुरु करण्याबाबत काय कार्यवाही झाली याचा खुलासा व्हावा.

**कार्यकारी अभियंता :** शासकीय अनुदानाच्या यादीतून हाती घेण्यात येणाऱ्या कामाच्या यादीमध्ये सदर कामाचा समावेश करण्यात आला आहे. परंतू त्यास अदयाप मंजूरी मिळाली नाही तरी पण या कामाचे दरपत्रका मागविण्यात येतील.

**श्री. अजिजुल्ला बेग :** रेट लिस्ट आणि ए-१ च्या कामाची माहिती प्रत्येक महिन्याच्या पहिल्या मिटींग मध्ये देण्याचा निर्णय झालेल्या असतांनाही स्थायी समितीच्या निर्णयाप्रमाणे रेटलिस्ट आणि ए-१ बाबतची माहिती देण्यात आली नाही.

**मा. सभापती** : रेटलीस्ट व ए-१ बाबत सर्व विभागाकडून प्रत्येक एक प्रश्न माहिती प्राप्त झाली आहे. ही माहिती १७-०८-९२ (सोमवार) पर्यंत सर्व सभासदांना देण्यात येईल.

**श्री. तुळशीराम भगुरे :** रेटलिस्ट व ए-१ च्या कामा बाबतची माहिती घेत असतांना कोणत्याही सभासदाने अधिकाऱ्यांकडे रेट लिस्टवर काम करुन देण्याची मागणी करुन नये असे बंधन घालण्यात यावे.

**श्री. मधुकर शिंदे, श्री. अजिजुल्ला बेग, श्री. गिरजाराम हाळनोर :** स. सभासदाच्या सुचनेशी आम्ही सहमत नाही.

**मा. सभापती** : ठराव क्र. १८३ दिनांक २४-०७-९२ अन्वये च्या निर्णयाप्रमाणे अस्थिव्यंग अंपगासाठी लागणारे अवयव पुरविल्या करीता वृत्तपत्रात दिलेल्या जाहिरातीनुसार प्राप्त झालेल्या दरपत्रकास मंजुरी देण्यात येते. अशी दुरुस्ती करण्यात यावी.

**ठराव :**

ठराव क्र. १८३ दि. २४-०७-९२ अन्वये प्रस्तावित कामाबाबत झालेल्या निर्णयानुसार महाराष्ट्र शासनातर्फे शहरी गरीबांसाठी नागरी मुलभूत सेवा योजनेच्या अनूदानातून महापालिका हद्दीतील गरीब अस्थीव्यंग अपंगासाठी नाममात्र दहा टक्के किंमत घेवून कृत्रिम अवयव पुरविण्या करीता मे. परमानंद अर्थोपेडीक अप्लाएनसेस सेंटर गोंदिया याचे अटीसहच्या खालील दराच्या दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

| अ. क्र | कृत्रिम अवयव | दर |
|---|---|---|
| १ | बायलॅटरल कॅलीपर पेस्वीक बॅंडसह | रुपये १,७९०/- |
| २ | युनिलॅटरल कॅलीपर पेस्वीक बॅंडसह | रुपये १,५८०/- |
| ३ | बायलॅटरल अबाऊनी कॅलीपर | रुपये १,६७०/- |
| ४ | युनिलॅटरल अबाऊनी कॅलीपर | रुपये १,१७०/- |
| ५ | बायलॅटरल बिलो नी कॅलीपर | रुपये १,०९०/- |
| ६ | युनिलॅटरल बिलो नीकॅलीवर | रुपये ९८० |
| ७ | ऑर्थोपेडीक शुज | रुपये ६८०/- |

| | | |
|---|---|---|
| ८ | स्पॉज किंवा एम. सी. आर. चप्पल | रुपये ३५०/- |
| ९ | स्पीन्ट | रुपये ४५०/- |
| १० | स्पायनल ब्रेस | रुपये ८५०/- |
| ११ | मिलवालकी ब्रेस | रुपये १,५००/- |
| १२ | ॲडजेस्टेबल कर्व्हीकल कॉलर | रपय ३५०/- |
| १३ | क्रचेस जोडी (लाकडी) | रुपये २६०/- |
| १४ | एल्बो स्टीक बायलॅटरल | रुपये ३८०/- |
| १५ | एल्बोस्टीक युनिलॅटरल | रुपये २००/- |
| १६ | जयपुर फुट अबाऊनी | रुपये २,८००/- |
| १७ | जयपुर फुट बिलो नी | रुपये १,८००/- |
| १८ | नी फ्रेंज बेस | रुपये १,४७०/- |

**अटी :**

१) ७०% आगाऊ रक्कम प्रत्येकी कृत्रिम अवधवाचे आदेश देते वेळी देणे.
२) शिल्लक ३०% कृत्रिम अवयव वाटपाच्या वेळी.
३) रुग्णाच्या आवश्यकतेप्रमाणे व वर नमूद दराप्रमाणे कृत्रिम अवयव तयार करण्यात येतील.
४) प्रति कृत्रिम अवयव रुपये ४०/- अवयव बसविण्यासाठी जादा खर्च येईल.
५) निदान व रुग्ण तपासणी साठी प्रति भेट रुपये ५०००/-
६) देयक गोंदिया येथे ड्राप्टने देय राहील.

वैधानिक कार्यवाही व्हावी. या दुरुस्तीसह दिनांक २४-०७-९२ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समितीचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात आली.

**विषय क्र. १८८/२ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, गारखेडा येथील स. नु. १९/१ व ५२/१ मधील महेशनगर येथील (मनपाच्या मंजूर रेखांकनातील खुल्या जागेवर संरक्षित भिंत बांधण्याच्या कामासाठी सा. बा. खात्याचे सन १९९१-९२ च्या दरसुचीनुसार र. रु. २,६०,८००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरचा खर्च भु विकास योजना अंतर्गत भुखंडाचे संरक्षण या शिर्षकामधुन करण्यात येईल. प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, गारखेडा येथील सर्वे नं. १९/१ व ५२/१ मधील महेशनगर येथील खुल्या जागेवर संरक्षित भिंत बांधण्याच्या कामासाठी र.रु. २,६०,८००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १८९/३ :**

सिडकोमधील पाणी पुरवठयाच्या वसुलीची देयके खातेदारांना संगणकाद्वारे दिली जातात. तर तीन महिन्याला बील दिल्यास वाटप करण्यास सुलभ जातात व सिडको मधील मध्यम वर्गीय व कामगार असल्यामुळे त्यांना पाणी पट्टी कर भरणे सोयीचे जावे कारण बहुतेवर नागरिकांकडे थकबाकी जास्त असते ते भरणे त्यांना जड जाते. या दृष्टीने व वसुली जास्त प्रमाणात व्हावी या हेतुने दर तीन महिन्याला देयके तयार करुन देण्यासाठी

२२,५००/- देयकांतर होणारा खर्च रु. ४५,०००/- इतका येईल. त्यानुसार १९९२-९३ च्या देयकावर खर्च रु. १,३५,००/- इतका येईल. तरी वरील प्रमाणे अंदाजपत्रक र. रु. १,३५,०००/- च्या खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**संवाद :**

**श्री. अजिजुल्ला बेग :** कॉम्प्युटर मशिन खरेदीसाठी अंदाजपत्रकात तरतुद करण्यात आली आहे. या तरतुदीनुसार कॉंप्युटर मशिन खरेदी केल्यास सर्व शहराची बिले कॉंप्युटर द्वारे देता येतील.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सिडको भागातील मध्यम वर्गीय व कामगार नागरिकांकडे असलेली पाणी पुरवठयाची थकबाकी भरणे त्यांना सोयींचे व्हावे व वसुली जास्त प्रमाणात व्हावी. या हेतूने सिडको भागातील खातेदारांना सन १९९२-९३ या वर्षात दर ३ (तीन) महिन्यांनी संगणकाद्वारे बिले देण्याकरीता र. रु. १,३५,०००/- च्या खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १९०/४ :**

शहरात सिडको भागात पाणी पुरवठा विभागातील जलवाहिनांची दुरुस्ती करण्याच्या कामासाठी नेहमी जॉंईटस बदलावे लागतात. ते बदलतांना लाईनमधील मागील व पुढील पाईप काढुन हे जॉंईट टाकावे लागतात. त्यामुळे कामास उशीर होतो. व जॉंईट बरोबर होत नाही. तरी त्यासाठी जीफी जॉंईटस वापरल्यास पाईप न काढता जागेवरच पाईप लाईनची गळती बंद करता येते व काम लवकर होते म्हणून हे जॉईंट वापरल्यामुळे वेळेची व खर्चाची बचत होते. म्हणून हे जॉईंटस घेणे अतिशय फायदेशीर व गरजेचे आहे. तरी त्याचे खरेदीसाठी अंदाजपत्रक र. रु. ४,९९,६००/- चे तयार केलेले आहे. प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शहर व सिडको भागातील जलवाहिन्यांची गळती बंद करण्याचे काम लवकर पुर्ण करता यावे व खर्चाची बचत व्हावी. यासाठी जीफी जॉंईट खरेदीसाठी र. रु. ४,९९,६००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १९१/५ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी अभिप्राय दिला की, निजामगंज व भवानीनगर भागातील रस्त्यांचे डांबरीकरण करण्याच्या कामाकरीता सा. बा. खात्याच्या सन ९१-९२ च्या दरसुचीनुसार र. रु. ४,६७,४००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरचा खर्च सन ९२-९३ च्या भांडवली रस्ते या शिर्षकामधुन करण्यात येईल. प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, निजामगंज व भवानीनगर येथील रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामाकरीता रुपये ४,६७,४००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १९२/६ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, कोत्तवालपुरा येथील सी. टी. एस. क्र. २९३० येथील मंजुर रेखाकंन अंतर्गत मनपाच्या खुल्या जागेला संरक्षित भिंत बांधण्याकरीता स्थायी समिती ठराव ७५२/२७ दिनांक २४/०४/९० (दि. २९.०४.९० ऐवजी) अन्वये अंदाजपत्रक र. रु. १,३५,४३०/- मंजुर झालेले होते व त्यानुसार निविदा मागवून (स्थायी समिती दि. २४-०९-९० ठराव क्र. १३३/८) काम हाती घेण्यात आले होते. परंतु जागेचा वाद निर्माण झाल्यामुळे निधी सल्लागार यांचे पत्रकाप्रमाणे काम बंद ठेवण्यात आले होते. आता जागेचा वाद मिटला असून, पुर्वीचे गुत्तेदार श्री. एस. सोनवणे यांनी मंजुरा निविदेच्या दराप्रमाणे (०.१०% कमी) काम करण्यास असमर्थता दर्शविली आहे. करीता सन ९१-९२ च्या दरसुचीप्रमाणे रिवाईज्ड अंदाजपत्रक र. रु. १,७५,५०५/- चे तयार करण्यात आले असून, कामाचा खर्च नविन बगीच्या सदरातुन करण्यात येईल. प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, कोतवालपुरा येथील सी. टी. एस. नं. २९३० येथील मंजुरा रेखाकंन अंतर्गत मनपाच्या खुल्या जागेस संरक्षिंत भिंत बांधण्याच्या कामाकरीता सन ९१-९२ च्या दरसुचीप्रमाणे तयार करण्यात आलेल्या र. रु. १,७५,५०५/- च्या सुधारीत अंदाजपत्रकास मंजुरी देण्यात येते. या कामासाठी पुन्हा दरपत्रके मागविण्यात यावी.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १९३/७ :**

औरंगाबाद शहरातील कचऱ्याची विल्हेवाट मांडकी येथे करण्यात येते संपुर्ण शहराचा कचरा मांडकी येथे टाकणे फार खर्चीक होत आहे. म्हणुन मौजे मिटमिटा येथील गट नं. ३०७ च्या सरकारी जमिनी पैकी १२ हेक्टर जमिनीची कचरा डेपोसाठी जिल्हाधिकारी औरंगाबाद यांना मागणी केली आहे. याबाबत दिनांक १९-०८-९१ रोजी झालेल्या सर्वसाधारण सभेचा ठराव

**संवाद :**

**श्री. अजिजुल्ला बेग :** प्रस्तावित जमीन शासकीय असल्यामुळे सदर जमिन लिजवर देण्याबाबत मा. जिल्हाधिकारी यांच्याकडे विनंती करण्यात यावी.

**नगररचनाकार :** प्रस्तावित प्रकरणी पत्र व्यवहार करतांना सदर जमिन विना मोबदला देण्याची मागणी करण्यात आली होती. परंतु मनपाची ही मागणी मंजूर झालेली नाही.

**मा. उप आयुक्त :** मिटमिटा येथील जागा महत्वाची असल्यामुळे या जागेसाठी आवश्यक त्या रक्कमेचा भरणा करुन जागा ताब्यात घेतल्यानंतर सदर जागेसाठी जमा केलेली रक्कम शासनाने माफ केली. तर ती परत घेता येईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, र. रु. २,४०,०००/- शासकीय कोषागारात जमा करुन मौजे मिटमिटा येथील गट न. ३०७ या सरकारी जमिनीपैकी १२ हेक्टर जमिन कचरा डेपोसाठी ताब्यात घेण्यासाठी सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १९४/८ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो. उस्मानपुरा येथील संत एकनाथ रंगमंदिर येथे रंगरंगोटीचे काम व सुधारणी करण्याच्या कामासाठी श्री. आर. बी. नागपाल आर्कीटेक्ट औरंगाबाद यांचेकडून र. रु. ३,५६,५७७/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदर अंदाजपत्रकास मा. आयुक्तांनी मंजुरी दिलेली आहे. सदरचा खर्च इतर इमारती व उर्वरीत कामे या शिर्षकामधुन करण्यात येईल. प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

**मालमत्ता अधिकारी** : रंगमंदिराच्या रंगरंगोटी व सुधारणा या कामाची मागणी या विभागातर्फे करण्यात आलेली नाही. याउलट रंगमंदिर येथील ध्वनी व्यवस्था व कुलींग व्यवस्था बरोबर नाही. कार्यक्रमांचे वेळी विद्युत पुरवठा खंडीत झाल्यास संभाव्य नुकसान टाळण्याच्या दृष्टीने जनरेटरची व्यवस्था असणे आवश्यक आहे. तसेच स्टेज / बुकींग हाऊस आणि यासारख्या ठिकाणी हुन स्लॅब मधुन गळत असलेले पाणी असलेले पाणी बंद करणे आवश्यक आहे.

**मा. उप आयुक्त** : संत एकनाथ रंगमंदिर येथे कार्यक्रमाचे वेळी विद्युत पुरवठा खंडीत झाल्यास जनरेटरची व्यवस्था असणे महत्वाचे आहे.

**श्री. जयवंत ओक** : रंगमंदिराच्या छतातून पाणी गळत असल्यामुळे कार्यक्रमात आलेल्या नागरिकांना त्रास होतो तेव्हा याबाबत काय कार्यवाही करणार याचा खुलासा व्हावा.

**मा. सभापती** : प्रस्तावित कामाप्रमाणेच रंगमंदिर येथील स्लॅबच्या लिकप्रुपचे काम आठ दिवसात पूर्ण करण्याची व्यवस्था शहर अभियंता यांनी करावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, संत एकनाथ रंगमंदिर येथील रंगरंगोटी व सुधारणा करण्याच्या कामासाठी र. रु. ३,५६,५७७/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १९५/९ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, वार्ड क्र. १९ बुढीलैन येथे जामा मस्जिद जवळ ३०० मी. मी. व्यासाची आर. सी. सी. ड्रेनेज लाईन टाकणे बाबत अंदाजपत्रक र. रु. १,०३,६३०/- चे सन ९०-९१ च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आले असून, सदर काम शासकीय अनुदान सन ९१-९२ मधील ४० लाखाच्या तरतुदीतून करण्यास मा. आयुक्तांनी मंजूरी दिलेली आहे.

आदेशानुसार सदर कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र. ६/७८३/९२ दि. २२-०४-९२ ला दै. मुफस्सीर, लोकविजय, औरंगाबाद टाईम्स या वर्तमानपत्रात जाहीरात देवून बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता एकूण आठ निविदा विक्री झाल्या पैकी चार दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या. त्याखालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. कैसरखान | २% कमी |
| २. | श्री. एस. ए. बाहोद्दीन | ८% कमी |
| ३. | मे. विशाल कंस्ट्रक्शन | १०% कमी |
| ४. | स. रफिकोद्दीन | १०.२५ |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १०.२५% कमी दराची श्री. सय्यद रफिकोद्दीन याची निविदा आहे. प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र. १९ बुढ्ढीलैन येथील जामा मस्जिद जवळ ३०० मी. मी. व्यासाची आर. सी. सी. ड्रेनेज लाईन टाकण्याच्या कामाकरीता तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १०.२५% कमी श्री. सय्यद रफिकोद्दीन याचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १९६/१० :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, वार्ड क्र. () एस. टी. कॉलनी पासून ते शहाबाजार पर्यंत मुख्य जलनिःसारण वाहिनी दुरुस्त करणे, बदलणे बाबत अंदाजपत्रक र.रु. ५,६०,०००/- चे सन ९०-९१ च्या दरसुची प्रमाणे तयार करण्यात आलेले असून, सदरचे काम शासकीय अनुदान ९१-९२ तरतुदी अंतर्गत करण्यात येईल. सदरील अंदाजपत्रकास मा. आयुक्तांनी मंजुरी दिलेली आहे.

आदेशाप्रमाणे सदर कामासाठी कार्यलयीन निविदा सुचना क्र. ६/७८६/९२ दि. २२-०५-९२ ला दै. औ. टाईम्स, नवा मराठा, रहेबर व लोक विजय या स्थानिक वर्तमानपत्रात जाहीरात देवून बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता एकूण तीन निविदा विक्री झाल्या पैकी दोन दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या. त्या खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. कैसरखान | ५.१०% |
| २. | मे. पाल कंस्ट्रक्शन | १५.५०% जास्त |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५.१०% जास्त दराची श्री. कैसरखान यांची निविदा होती. परंतु दर योग्य वाटत नसल्यामुळे मा. आयुक्तांना स

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, एस. टी. कॉलनी पुल ते शहाबाजार पर्यंत मुख्य जलवाहिनीची दुरुस्ती करणे व बदलणे या कामाकरीता गुत्तेदार श्री. कैसरखान यांचेशी झालेल्या वाटाघाटीनुसार उक्त काम संबंधिताकडून अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ४% जास्त दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १९७/११ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, कोकणवाडीपासून पदमपुऱ्यापर्यंत १५० मी. मी. व्यासाची ए. सी. जलवाहिनी टाकण्याच्या कामाच्या र.रु. ५९,२२५/- च्या अंदाजपत्रकास मा. आयुक्तांनी दि. २९-०२-९२ रोजी मंजुरी दिली आहे. सदीरल अंदाजपत्रक सन ९१-९२ च्या दरसुचीप्रमाणे तयार करण्यात आले आहे. सदरील कामासाठी निविदा सुचना क्र. मनपा/पापु/६७७/९२ दि. २२-०३-९२ अन्वये काढण्यात आली ही निविदा दै. अंजिठा आलमगीर टाईम्स, दै. देवगीरी तरुण भारत, रहेबर या दैनिकात प्रसिध्दीस दिली असता एकूण तीन दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या त्या खालील प्रमाणे

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. उधलसिंग राजपुत | १६% कमी |
| २. | श्री. कुलवंतसिंग | ५% जास्त |
| ३. | श्री. पी. एच. पंजनानी | १४.३२% कमी |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १६% कमी दराची श्री. उधलसिंग राजपूत यांची निविदा आहे. प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**संवाद :**

**श्री. गिरजाराम हाळनोर, श्री. मधुकर शिंदे :** प्रस्तावित कामासाठी लागणारे जे साहित्य कार्यालयाकडे उपलब्ध नसेल ते साहित्य खुल्या बाजारातून खरेदी करण्याची परवानगी गुत्तेदारास देण्यात यावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, कोकणवाडी पासून पदमपुऱ्यापर्यंत १५० मी. मी. व्यासाची ए. सी. जलवाहिनी टाकण्याच्या कामाकरीता तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १६% कमी दराच्या श्री. उधलसिंग राजपूत यांच्या निविदेस सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १९८/१२ :**

कार्यकारी अभियंता (पा. पु. व ज. नि.) यांनी प्रस्ताव सादर केला की, मॅगनेटीक कोकेटर मॉडेल जी. ए. ५२ सी, स्टॅंडर्ड, सुपर सोडस खरेदी करण्याच्या र. रु. ३,४१,८६३/- च्या अंदाजपत्रकास मा. आयुक्तांनी दि. ०९-०३-९२ ला मंजुरी दिली आहे. सदरील काय हे स्पेशल फंडचे आहे. कार्यालयीन निविदा क्र. पा. पू. १/९९१/९२ दि. २९-०५-९२ अन्वये जाहीर निविदा (दुसरी वेळ) दै. इंडियन एक्सप्रेस या वर्तमानपत्रात प्रसिध्द करुन निविदा मागविल्या असता फक्त एकच निविदा विक्री झाली व ती मे. सब सरफस इन्स्ट्रमेंटस सप्लायर लि. कलकत्ता यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा १७% जास्त दराची दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाली. प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मॅगनेटीक कोकेटर मॉडेल जी. ए. ५२ स्टॅंडर्ड सोडंल सुपर सोंडस, खरेदी करण्यासाठी मे. सब सरफेस इस्ट्रमेंटस सप्लाय प्रा. ली. कलकत्ता याचे अंदाजपत्रकीय दरापेक्षा १७% जास्त दराच्या दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. १९९/१३ :**

कार्यकारी अभिंयता यांनी प्रस्ताव सादर केला की, पाणी पुरवठा विभागासाठी इलेक्ट्रॉनिक्स हौसिंग पंप खरेदी करण्यासाठी तयार करण्यात आलेल्या र. रु. २,६०,२६०/- च्या अंदाजपत्रकास मा. आयुक्तांनी दिनांक १९-०२-९२ रोजी मंजूरी दिलेली आहे. सदरील काम ९१-९२ मधील स्पेशन फंडसचे आहे.

कार्यालयीन निविदा क्र. मनपा/पा. पू./९९१/९२ दि. २०-०५-९२ अन्वये (दुसरी वेगळी जाहिरात निविदा दै. इंडियन एक्सप्रेस मध्ये प्रसिध्द करुन निविदा मागविल्या असता दोन निविदा विक्री झाल्या व दोन दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या त्या खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १. | आदित्य सेल्स कॉर्पोरेशन | अंदाजपत्रकीय दराने |
| २. | कमांडर एजन्सीज, पुणे | ८% जास्त दराने |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दराची मे. आदित्य सेल्स कॉर्पोरेशन यांची निविदा आहे. प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, पाणी पुरवठा विभागासाठी आवश्यक असलेले इलेक्ट्रॉनिक हौसिंग पंप खरेदी करण्याच्या कामासाठी तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दराच्या मे. आदित्य सेल्स कॉर्पोरेशन यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २००/१४ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, अग्नीशमन इमारतीच्या प्रांगणास बांधण्यात आलेल्या हौदास पाण्याची लाईन जोडण्यासाठी १०० मी. मी. व्यासाची ए. सी. जलवाहिनी टाकावयाची आहे. सदर कामाचे अंदाजपत्रक परिसर अभियांत्रिकी सन ९१-९२ च्या दरसुची नुसार र.रु. ४३,८१० चे तयार करण्यात आले असून, त्यास प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे. सदरील कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्रमांक १०५८/८२ दि. ०२-०६-९२ जी की, दै. रहेबर, मुकद्दस, स्वरगंगा या वर्तमानपत्रात प्रसिध्दीस देवून बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता एकूण तीन निविदा विक्री झाल्या व तीन दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या त्या खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. एस. एस. मिनाउद्दी | १४.५२% कमी |
| २. | श्री. पी. एच पंजनानी | ८.१८% जास्त |
| ३. | श्री. जी. एम. बालचंदानी | ९.४४% जास्त |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १४.५२% कमी दराची श्री. एच. एस. मिनाउद्दीन यांची निविदा आहे. प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

सदरील कामासाठी पुन्हा दरपत्रके मागविण्यात असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. २०१/१५ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, गणेश कॉलनी येथील मंदिराजवळील विहिरीस लोखंडीजाळी बसविणे करीता परीसर अभियांत्रिकी दरसुची सन ९१-९२ नुसार र. रु. ३९१२०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदर कामासाठी कार्यलयीन निविदा सुचना क्र ५/९२-९३ जी की दै. देवगिरी तरुण भारत, लोकधर्म, लोकमत, इंडियन एक्सप्रेस या वर्तमानपत्रात प्रसिध्दीस देऊन बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता एकूण सात निविदा विक्री झाल्या पैकी दोन दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या त्या खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. सय्यद सिराजउद्दीन | ५% कमी |
| २. | श्री. कैसरखान | ३% कमी |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५% कमी दराची श्री. सय्यद सिराजउद्दीन यांची निविदा आहे. प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, गणेश कॉलनी येथील विहीरीस लोखंडी जाळी बसविण्याच्या कामाकरीता तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५% कमी दराच्या श्री सय्यद सिराजउद्दीन यांच्या दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २०२/१६ :**

कार्यकारी अभिंयता यांनी प्रस्ताव सादर केला की, वार्ड क्र. ४ कृष्णागल्ली बेगमपुरा येथे २५० मी. मी. व्यासाची आर. आर. सी. ड्रेनेज लाईन टाकणे बाबत अंदाजपत्रक र. रु. ३१,०००/- चे सन ९१-९२ च्या दरसुचीप्रमाणे तयार करण्यात आले असून, सदरचा खर्च ९२-९३ च्या भांडवली तरतुदीतून करण्यात येईल. सदरील अंदाजपत्रकास मा. आयुक्तांनी मंजुरी दिलेली आहे.

आदेशाप्रमाणे सदरील कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र. ८/८९०/९२ दि. २०-०६-९२ अन्वये दै. अंजिठा आलमगीर टाईम्स, देवगीरी तरुण भारत व औरंगाबाद टाईम्स या दैनिकात प्रसिध्दीस देवून बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता एकूण अकरा निविदा विक्री झाल्या पैकी तीन दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या त्या खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. सय्यद सिराजउद्दीन | ५% जास्त |
| २. | श्री. फारुकी ए. एम | अंदाजपत्रकीय दराने |
| ३. | श्री. एस. ए. बाहोद्दीन | २% जास्त |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दराची श्री. ए. एम. फारुकी यांची निविदा आहे. प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र. कृष्णागल्ली बेगमपुरा येथे २५० मी. मी. व्यासाची आर. सी. सी. ड्रेनेज लाईन टाकण्याच्या कामाकरीता तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दराच्या श्री. ए. एम. फारुकी यांच्या दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २०३/१७ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, वार्ड क्र. १८ रोहीला गल्ली मुबारक यांच्या घरापासुन कामाक्षी लॉजपर्यंत ३०० मी. मी. व्यासाची आर. सी. सी. ड्रेनेज लाईन टाकणे बाबत अंदाजपत्रक र. रु. ४९,२२०/- चे सन ९०-९१ च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आले असून, सदरचा खर्च सन ९२-९३ च्या भांडवली तरतुदीतून करण्यात येईल. सदरील अंदाजपत्रकास मा. आयुक्तांनी मंजुरी दिलेली आहे.

आदेशाप्रमाणे सदर कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र. ८ दि. २०-०६-९२ अन्वये दै. अंजिठा, आलमगीर टाईम्स, देवगीरी तरुण भारत १ औरंगाबाद टाईम्स या वर्तमानपत्रात जाहीरात देवून बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता एकूण बारा निविदा विक्री झाल्या पैकी दोन दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या त्या खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. जलीलखान | अंदाजपत्रकीय दराने |
| २. | श्री. सय्यद सिराजउद्दीन | २% जास्त |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दराची श्री. जलीलखान यांची निविदा आहे. प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र. १८ रोहीला गल्ली मुबारक यांच्या घरापासुन ते कामाक्षी लॉजपर्यंत ३०० मी. मी. व्यासाची आर. सी. सी. ड्रेनेज लाईन टाकण्याच्या कामाकरीता तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दराची श्री. जलील खान यांच्या दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २०४/१८ :**

वार्ड क्र. ( ) मी. सम्राटनगर येथे १५० मी. मी. व्यासाची आर. सी. सी. ड्रेनेज लाईन टाकणे बाबत अंदाजपत्रक र. रु. ५६,०४०/- चे सन ९१-९२ च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आले असून, त्यास मा. आयुक्तांनी मंजुरी दिलेली आहे.

आदेशानुसार सदरील कामासाठी कार्यलयीन निविदा सुचना क्र. ५/७६१/९२ दि. २०-०४-९२ नुसार दै. लोकमत टाईम्स, सिटीजन्स, या वर्तमानपत्रात जाहीरात देवून बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता एकूण पाच निविदा विक्री झाल्या पैकी चार दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या. त्या खालील प्रमाणे

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. के. बी. काल्डा | २१.९% कमी |
| २. | श्री. स. रफिकोद्दीन | १८% कमी |
| ३. | मे. वन. वे. कंस्ट्रक्शन | ९.२१% कमी |
| ४. | श्री. मिर्झा आर. बी | १२% कमी |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २१.९% कमी दराची श्री. के. बी. काल्डा यांची दरपत्र आहे. मा. आयुक्तांची टिपण्णी दि. २३-०६-९२ च्या अनुषगांने २१.९% कमी दराने निविदा स्विकारल्यास कामाचा दर्जा काय राहील असे संबंधितास लेखी खुलासा करण्यास्तव पत्रक दिले असता संबंधिताने सदर काम परवडत असून, काम मिळणेस्तव विनंती केली आहे. तसेच सदर काम संबंधिताच्या घराजवळ पाईपची खरेदी पुर्वीच केली असल्यामुळे काम परवडत असून, काम मिळणेस्तव विनंती केली आहे. संबंधिताचा अर्ज विचारात घेऊन काम देणेस्तव मा. आयुक्तांनी मंजुरी दिली आहे. प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावित कामाची पाहणी करण्यात यावी असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. २०५/१९ :**

वार्ड क्र. ४९ मो. विष्णुनगर येथे १५० मी. मी. व्यासाची आर. सी. सी. ड्रेनेज टाकणे बाबत अंदाजपत्रक र. रु. ४,२४,०००/- चे सन ९१-९२ च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आले असून, सदर काम प्राप्त सरकारी अनुदानातून न करण्यास्तव मा. आयुक्तांनी मंजुरी दिलेली आहे.

आदेशावरुन सदरील कामाकरीता कार्यालयीन निविदा सुचना क्र. ६ दिनांक २२-०५-९२ नुसार दै. औरंगाबाद टाईम्स, लोकविजय या वर्तमानपत्रात जाहिरात देवून बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता एकूण आठ निविदा विक्री झाल्या पैकी चार दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या त्या खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. बी. आर. आनंद | ११% जास्त |
| २. | मे. पॉल कंस्ट्रक्शन | १२% जास्त |
| ३. | मे. आनंद बिल्डर्स | ९% जास्त |
| ४. | श्री. मझरुल हक्क | ०.०१% कमी |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०१% कमी दराची श्री. मझरुल हक यांची निविदा आहे. प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र. ४९ मो. विष्णुनगर येथे १५० मी. मी. व्यासाची आर. सी. सी. ड्रेनेज लाईन टाकण्याच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०१% कमी दराच्या श्री. मझरुल हक यांच्या दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २०६/२० :**

वार्ड क्र. ५० मो. उस्मानपुरा येथील ललीत कला भवनापासुन विमोचन हनुमान मंदिरापर्यंत ३५० मी. मी. व्यासाची अर्धगोलाकार गटार बांधणे बाबत अंदाजपत्रक र. रु. २,५८,३३४/- चे सन ९०-९१ च्या दरसुचनी नुसार तयार करण्यात आली असून, शासकीय अनुदान ९१-९२ मधुन सदर काम करण्यात मा. आयुक्तांनी मंजुरी दिलेली आहे.

आदेशावरुन सदरील कामाकरीता कार्यालयीन निविदा सुचना क्र. ६ दिनांक २०-०५-९२ नुसार दै. लोकमत टाईम्स, लोकविजय या वर्तमानपत्रात जाहिरात देवून बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता एकूण पाच निविदा विक्री झाल्यापैकी तीन दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या. त्या खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १. | मे. विशाल कंस्ट्रक्शन | ०.०५% कमी |
| २. | मे. आनंद बिल्डर्स | ४.८३% जास्त |
| ३. | श्री. स. रफिकोउद्दीन | ५% जास्त |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०५% कमी दराची मे. विशाल कंस्ट्रक्शन यांची निविदा आहे. प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र. ५० मो. उस्मानपुरा येथील ललीत कला भवन ते संकट विमोचन हनुमान मंदिरापर्यंत ३५० मी. मी. व्यासाची अर्धगोलाकार गटार बांधण्याच्या कामाकरीता तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०१% कमी दराच्या मे. विशाल कंस्ट्रक्शन यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २०७/२१ :**

वार्ड क्र. २५ मो. औरंगपूरा येथील औरंगपुरा पोलीस चौकी ते नाल्यापर्यंत ३०० मी. मी. व्यासाची आर. सी. सी. ड्रेनेज लाईन टाकणे बाबत अंदाजपत्रक र. रु. ३९,०००/- चे तयार करण्यात आले असून, सन ९१-९२ च्या दरसुचीनुसार बनविण्यात आले आहे. सदर काम प्राप्त सरकारी अनुदान ९१-९२ मधुन करण्यास्तव मा. आयुक्तांनी मंजुरी दिलेली आहे.

आदेशावरुन सदरील कामाकरीता कार्यालयीन निविदा क्र. ६ दि. २२-०५-९२ नुसार दै. औरंगाबाद टाईम्स व लोकविजय दैनिकात जाहिरात देऊन बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या एकूण आठ निविदा विक्री झाल्या पैकी तीन दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या. त्या खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. के. बी. काल्डा | ५.१% कमी |
| २. | श्री. स. सिराजउद्दीन | १२.१०% कमी |
| ३. | श्री. राजेंद्र शिंदे | १५.०१% कमी |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १५.०१% कमी दराची श्री. राजेंद्र शिंदे यांची निविदा आहे. प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र. २५ मो. औरंगपुरा येथील औरंगपुरा चौकी ते नाल्यापर्यंत ३०० मी. मी. व्यासाची आर. सी. सी. ड्रेनेज लाईन टाकण्याच्या कामाकरीता तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १५.०१% कमी दराच्या श्री. राजेंद्र शिंदे यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २०८/२२ :**

मो. रमानगर ते दशमेशनगर पर्यंत ३०० मी. मी. व्यासाची आर. सी. सी. ड्रेनेज लाईन टाकणे बाबत अंदाजपत्रक र. रु. ३,५९,५३०/- चे सन ९०-९१ च्या दरसुचनी तयार करण्यात आले असून, प्राप्त शासकीय अनुदानातून सदर काय करण्यास्तव मा. आयुक्तांनी मंजुरी दिलेली आहे.

आदेशावरुन सदरील कामाकरीता कार्यालयीन निविदा सुचना क्र. ६ दि. नुसार दै. औरंगाबाद टाईम्स व लोकविजय या वर्तमानपत्रात जाहिरात देवून बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता एकूण सात निविदा विक्री झाल्या पैकी एकूण चार दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या त्या खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. डी. अजितसिंग | २% कमी |
| २. | श्री. कैसरखान | १५% जास्त |
| ३. | श्री. स. रफिकोउद्यीन | ५% जास्त |
| ४. | श्री. पी. जे. तमखाने | ५.५% जास्त |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २% कमी दराची श्री. अजितसिंग यांची निविदा आहे. प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मो. रमानगर ते दशमेशनगर पर्यंत ३०० मी. मी. व्यासाची आर. सी. सी. ड्रेनेज लाईन टाकण्याच्या कामाकरीता तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २% कमी दराच्या श्री. डी. अजितसिंग यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २०९/२३ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, झो. क्र. २ मधील विविध ठिकाणाच्या मुताऱ्या दुरुस्त करण्यासाठी सा. बा. खात्याचे डी. एस. आर. दराने र. रु. ३७,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून, त्यास मा. आयुक्तांनी मंजुरी दिली आहे. सदर काम हाती घेण्यासाठी कार्यालयीन निविदा सुचना दि. २०-०५-९२ अन्वये बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता एकूण नऊ कोऱ्या निविदा विक्री झाल्या पैकी दोन दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या. त्या खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. सय्यद सिराजोद्यीन | ५% जास्त |
| २. | मे. संधु कंस्ट्रक्शन | ०.१०% कमी |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.१०% कमी दराची मे. संधु कंस्ट्रक्शन यांची निविदा आहे. प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.,

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, झोन क्र. २ मधील विविध ठिकाणच्या मुताऱ्या दुरुस्त करण्याच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.१०% कमी दराच्या मे. संधु कंस्ट्रक्शन यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २१०/२४ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो. शहागंज येथे मासळीबाजार (मच्छी मार्केट) बांधण्याच्या कामासाठी स्थायी समिती ठराव क्र. ४२८ दि. २७-०३-९२ अन्वये र. रु. ३,६१,६५०/- च्या अंदाजपत्रकास मंजुरी प्राप्त झालेली आहे. सदरचे काम हाती घेण्यासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र. ४ दिनांक १४-०५-९२ अन्वये बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता एकूण सहा कोऱ्या निविदा विक्री झाल्या पैकी चार दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या त्या खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १. | मे. जाधव कंस्ट्रक्शन | १०% जास्त |
| २. | श्री. सय्यद रफीकोद्दीन | ७.१०% कमी |
| ३. | श्री. एस. एम. मंडोरे | २०% जास्त |
| ४. | श्री. कैसरखान | १६.७८६% जास्त |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ७.३०% कमी दराची श्री. सय्यद रफीकोउद्दीन यांची निविदा आहे. प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

**मा. उप आयुक्त :** प्रस्तावित काम पशुवैद्यकीय अधिकारी यांच्या सल्यानुसार भारतीय मानद बिरो (आय. एस. आय) यांच्याकडील नियमाप्रमाणे करण्यात यावे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मो. शहागंज येथे मासळीबाजार (मच्छी मार्केट) बांधण्याच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ७.१०% कमी दराच्या श्री. सय्यद रफीकोद्दीन यांच्या दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २११/२५ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो. कैलासनगर (स्मशान मारुती) येथील स्मशानभुमीच्या विद्युत वाहिनी बसविण्याच्या कामासाठी अंदाजपत्रक र. रु. ९,९५,८००/- ला मा. आयुक्तांनी मंजुरी दिल्यानुसार सदर कामाचे बी-१ नमुन्यात निविदा सुचना दि. १४-०५-९२ रोजी दै. अंजिठा, आमलगीर टाईम्स, दै. लोकमत, इंडियन एक्सप्रेस इ. वर्तमानपत्रात प्रसिध्द करुन निविदा मागविल्या असता एकूण पाच कोऱ्या निविदा विक्री झाल्या पैकी चार दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या त्या खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. प्रितमसिंग सोपी | ०.२०% कमी |
| २. | श्री. एस. ए. नवाब | १०% जास्त |
| ३. | श्री. पी. जे. तमखाने | ९.११% जास्त |
| ४. | श्री. कुलवंतसिंग | ६% जास्त |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.२०% कमी दराची श्री. प्रितमसिंग सोधी यांची निविदा आहे. प्रस्ताव मुंजरीस्तव सादर सदरील खर्च शासकीय अनुदान ९१-९२ मधुन करण्यात येईल.

**संवाद :**

**श्री. अजिजुल्ला बेग :** बेगमपूरा स्मशानभुमी येथे बेवारस मृतांवर करण्यात येणाऱ्या प्रेतांची विल्हेवाट आणि वैद्यकीय महाविद्यालय रुग्णालय येथे होणारे मृत्यू लक्षात घेता प्रस्तावित विद्युत वाहिनी ही बेगमपूरा स्मशानभुमी किंवा वैदयकीय महाविद्यालय रुग्णालय या ठिकाणी बसविण्याची व्यवस्था करावी.

**मा. सभापती :** बेगमपूरा स्मशानभुमी मधे विद्युत वाहिनी बसविण्याबाबतचे नविन अंदाजपत्रक शहर अभियंता यांनी करावे तसेच उदयान अधिक्षक यांनी बेगमपुरा स्मशान भुमी येथे उदयान बाबतची व्यवस्था करावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मो. कैलासनगर (स्मशान मारुती) येथील स्मशान भुमीमधे विदयुत वाहिनी बसविण्याच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.२०% कमी दराच्या श्री. प्रितमसिंग सोधी यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २१२/२६ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, खाम तलाव येथे उदयानासाठी कंपाऊड वॉल बांधण्याच्या कामासाठी अंदाजपत्रक र. रु. ४,४७,३५०/- ला (शासकीय अनुदान) मा. आयुक्तांनी मंजुरी दिलेली आहे. सदरील कामाचे फेर निविदा (दुसरी वेळ) बी-१ नमुन्यात दि. १४-०५-९२ रोजी दै. अंजिठा, आलमगीर टाईम्स, लोकमत, इंडियन एक्सप्रेस इ. वर्तमानपत्रात जाहिरात देवून निविदा मागविल्या असता एकूण पंधरा कोऱ्या निविदा विक्री झाल्या पैकी आठ दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या त्या खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. अब्दुल वकील कुरेशी | २३.१९% कमी |
| २. | श्री. एस. ए. नवाब | २०.५३% कमी |
| ३. | श्री. एस. एच. असोसिएटस | १५.१५% कमी |
| ४. | श्री. कैसरखान | १५% कमी |
| ५. | श्री. कुलवंतसिंग | १४% कमी |
| ६. | श्री. मौला अलियार खान | १२.०५% कमी |
| ७. | श्री. सय्यद रफियाद्दीन | १०.७०% कमी |
| ८. | श्री. पी. जे. तमखाने | ९.९०% जास्त |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २३.१९% कमी दराची श्री. अब्दुल वकीश कुरेशी यांची निविदा आहे. प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, खाम तलाव येथे उदयानासाठी कंपाऊड वॉल बांधण्याच्या कामा करीता तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा२३.९९% कमी दराच्या श्री. अब्दुल वकीश कुरेशी यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २१३/२७ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, वाहने व यंत्रसामुग्री खरेदी करण्याकरीता महानगरपालिका, औरंगाबादला सन ९१-९२ या आर्थिक वर्षाचे रु. ६० लाख सरकारी अनुदान गव्हर्नमेंट अेटेड प्रोग्राममध्ये मिळालेले आहे. हया अनुदानातून खालील प्रमाणे वाहने व यंत्रसामुग्री खरेदी करावयाची आहे.

१) टाटा १२१० चासीस खरेदी करुन त्यांना फायर टेंडर बसविणे १ नग
२) मोठे रोड रोलर ८ ते १० टनी खरेदी करणे १ नग
३) छोटे रोड रोलर ४ (चार) टनी खरेदी करणे १ नग
४) टाटा १२१० चासीस खरेदी करुन त्यावन १० हजार लिटर्स क्षमतेचे वाटर टँकर बसविणे १ नग
५) टाटा ६०८ चासीस खरेदी करुन त्यावर ५ हजार लिटर क्षमतेचे वॉटर टँकर बसविणे १ नग
६) ड्रेनेज लाईन व मेन होल्सच्या प्रिव्हेंटीव्ह मेंटनस करीता तसेच देखभाल व दुरुस्ती करीता हायर बेसीटी सेव्हेर जेटींग मशिन टाटा १२१० चासीस खरेदी करुन त्यावर अॅक्सेसरीजसह बसविणे १ नग
८ हया प्रकारचे यंत्रसामुग्री खरेदी करण्यासाठी दिनांक १८-०४-९२ च्या सर्वसाधारण सभा ठराव क्र. १३६/४ अन्वये मंजुरी मिळालेली आहे.
७) पोलीस आयुक्त औरंगाबाद यांनी सुचविल्याप्रमाणे औरंगाबाद शहरातील ट्राफीक कंट्रोल करण्याकरीता टाटा ४०७ चासीस खरेदी करुन त्यावर नॉन पार्कींगमधील वाहने जसे दुचाकी, तिचाकी व इतर लाईट मोटार व्हेईकल्स ओढुन नेण्याकरीता योग्य ते त्या प्रकारेच टुइंग हुकची यंत्रसामुग्री बसविणे.
८) शहर स्वच्छते करीता टाटा ६०८ वाहने टिप्पर्ससह खरेदी करणे.
असे एकूण वर दर्शविल्याप्रमाणे १० वाहने/यंत्रसामुग्री सरकारी अनुदानातून खरेदी करण्यासाठी उत्पादक कंपन्याकडून दरपत्रके प्राप्त झाली असून, त्यांचे आलेले दर खालील प्रमाणे आहे.

१) टाटा एसई १२१०/४० चासीस जी. बी. एस ४० गेअर बॉक्स सह करीता टाटा इंजिनियरिंग अॅन्ड लोकोमोटीव्ह कंपनी मुंबई तसेच या कंपनीचे औरंगाबाद येथील विक्रेते (अधिकृत) मे. सतिश मोटर्स प्रा. लि. औरंगाबाद यांनी रुपये ३,९९,५१०.१९ चे दर जे जकात सोडुन आहेत असे दिलेले आहेत. तरी फायर टेंडरसाठी हे चासीस टाटा कंपनीचे औरंगाबाद येथील अधिकृत विक्रेते मे. सतिश मोटार्स प्रा. लि. औरंगाबाद यांचेकडुन खरेदी करण्यासाठी परवानगी मिळावी.
२) ४ टनी थ्री व्हिलर डिझेड रोड रोल टायगर ब्रॅन्डचे मुंबई येथील हॅ. को. इंजिनिअरींग कं. मुंबई जी हया प्रकारचे रोड रोलरची उत्पादक कंपनी आहे. हयांचे असून, त्यांचेकडून रु. ३,४६,०००/- चे दरपत्रक आलेले आहे. हया रोलरवर पी-३ परकीन कंपनीचे ३ सिलेंडरचे (पी-३) वॉटर कुल्ड इंजिन सेल्फ स्टार्टरसह बसविलेले आहे. सदरील कंपनीचे मुंबई महानगरपालिका, वेस्टर्न रेल्वे, राजकोट, महानगरपालिका अमरावती, तसेच निरज, कटक, जालना मोलेगांव या नगरपालिकांना हया प्रकारचे रोलर पुरवठा केले असून, रोलरचे परफार्मन्स चांगले असल्या बाबतचे प्रमाणपत्र सोबत जोडले आहे. तर हया उत्पदक कंपनीकडून ४ टनी रोलर खरेदी करण्यासाठी मंजुरी मिळाली. मोठे रोड रोलर ८ ते १० टनी रोड रोलर खरेदी करण्यासाठी फक्त ग्रीव्हज कॉटन अॅन्ट कंपनी मुंबई यांचे दरपत्रक आलेले आहेत. जे ब्रीटानिया कंपनी रोडरोलर पुरवठा करतील. महानगरपालिका

औरंगाबादकडे सहया जोसेफ कंपनीचे २ रोलर आहेत व ते चांगल्या प्रकारे कार्यरत आहेत. त्यामुळे जोसेफ कंपनीकडुन दरपत्रक आल्यानंतर हया रोलर खरेदीसाठी विचार करणे योग्य राहील.

४) टाटा एसई १२१०/४२ जीबीएक्स ३० गेअर बॉक्स सह करीता टाटा इंजिनिअरींग ॲन्ड लोकोमोटीव्ह कंपनी मुंबई तसेच या कंपनीचे औरंगाबाद येथील विक्रेते मे. सतिश मोटार्स प्रा. लि. औरंगाबाद यांनी र. ३,९०,२५०.३५ चे दर जे जकात सोडुन आहेत. असे दिलेले आहेत. हे दिलेले दर स्पेशल गव्हर्नमेंट प्राईजलिस्ट प्रमाणे आहेत. तरी हे चासीस टाटा कंपनीचे औरंगाबाद येथील अधिकृत विक्रेते मे सतिश मोटार्स प्रा. के. औरंगाबाद यांचेकडुन खरेदी करण्याची परवानगी मिळावी तसेच या चासीस दर वॉटरकॅट बसविण्यासाठी वेगळे टेंडर बोलाविण्यात येत आहेत.

६) सेव्हर जेरिंग मशिन करीता लागणारे टाटा १२१० एसई/४२ चासीस जीबीएस ४० गेअर बॉक्स, पीटीओसह खरेदी करण्यासाठी टाटा इंजिनियरिंग ॲन्ड लोकोमोटीव्ह कंपनी मुंबई तसेच या कंपनीचे औरंगाबाद येथील अधिकृत विक्रेते मे. सतिश मोटार्स प्रा. लि. औरंगाबाद यांनी रु. ४,०३,६८७/- चे दर जे जकात सोडून आहेत असे दिलेले आहेत. हे दिलेले दर स्पेशल व गर्व्हनमेंट प्राईज लिस्ट प्रमाणे आहेत तरी हे चासासी टाटा कंपनीचे औरंगाबाद येथील अधिकृत विक्रेते मे सतिश मोटार्स, प्रा. लि. औरंगाबाद यांचेकडून खरेदी करण्याची परवानगी मिळावी.

७) टाटा ४०७ चासीस कीलसह व पीटीओसह चे मॉडेल ज्यावर आपणास ट्राफीक पोलीसच्या मदतीकरीता टोइ्रग हुकची यंत्रसामुग्री बसवून घ्यावयाची आहे. त्या करीता यांचे औरंगाबाद येथील अधिकृत विक्रेते मे. सतिश मोटार्स प्रा. लि. औरंगाबाद यांनी रुपये २,७२,९५७/- चे दर जे जकात सोडून आहेत. असे दिलेले आहेत हे दिलेले दर स्पेशल गव्हर्नमेंट प्राईज लिस्टप्रमाणे आहेत तरी हे चासीस टाटा कंपनीचे औरंगाबाद येथील अधिकृत विक्रेते मे. सतिश मोटार्स, प्रा. लि. औरंगाबाद यांचेकडून खरेदी करण्याची परवानगी मिळावी.

८) टाटा ६०८ चासीस हॅड्रोलीक टिप्परसह ३ नग शहर स्वच्छेतेच्या कामासाठी घ्यावयाचे आहेत त्याकरीता टाटा इंजिनियरींग ॲन्ड लोकोमोटीव्ह कंपनी मुंबई तसेच या कंपनीचे औरंगाबाद येथील अधिकृत विक्रेते मे सतिश मोटार्स प्रा. लि. औरंगाबाद यांनी रु. ४,१४,०२२.४५ चे दर जे जकात सोडुन आहे असे दिलेले आहेत हे दिलेले दर स्पेशल गव्हर्नमेंट प्राईज लिस्ट प्रमाणे आहेत तरी हे ३ नग चासीस औरंगाबाद टाटा कंपनीचे अधिकृत विक्रेते मे. सतिश मोटार्स प्रा. लि. औरंगाबाद यांचेकडुन खरेदी करण्यासाठीची परवानगी मिळावी. तसेच ३ चासीस करीता एकूण १२,४२,०६७.३५ खर्च येईल त्यास मंजुरीस्तव सादर.

असे वरील प्रमाणे ९ वाहने खरेदी करण्यासाठी रु. ३३,८४,१०१.८५ खर्च येणार आहे. त्यावर यंत्रसामुग्री बसावयाची आहे. त्यासाठी वेगळे टेंडर्स बोलाविण्यात येत आहेत हा होणार खर्च सरकारी अनूदानातून करावयाचा आहे त्यास मंजूरी दयावी.

वरील सर्व किंमती जकात कर सोडून आहेत जकात विभागात तशा नोंदी घेण्यासाठी कळविण्यात येईल. वरील दर्शविलेल्या किंमती कंपनीने दिलेल्या दरपत्रकाप्रमाणे असून, त्यात टॅक्सीस कमी जास्त झाल्यास त्याप्रमाणे बिलाची अदाई करावी लागेल.

९) जेटींग मशिन आपण सरकारी अनूदानातून घेत आहोत परंतू हया मशिन बरोबरच ड्रेनेज पाईप लाईन मेन होलचा देखभाली व दुरुस्ती करीता तसेच प्रिव्हेंटीव्ह मेन्टेन्स करण्याकरीता गली एम टी आर ज्यामध्ये व्हॅक्युम काय घाणपाणी ओढण्याची क्षमता आहे. अशी यंत्र सामुग्री महानगरपालिकेच्या ड्रेनेज विभागातील

जलनिःसारण बजेटमधुन खरेदी करण्यासाठी मा. आयुक्तांनी मंजूरी दिली आहे. त्याप्रमाणे हया करीता लागणाऱ्या टाटा चासीस टाटा १२१० एसई/४२ जीबीएस/४०/ॲन्ड पीटीओसह खरेदी करण्याकरीता अ. क्र. ६ मध्ये दर्शविल्याप्रमाणे १ चासीस मे सतिश मोटार्स प्रा. लि. औ.बाद हया टाटा कंपनीच्या अधिकृ विक्रेत्याकडून गव्हर्नमेंट प्राईज लिस्ट प्रमाणे खरेदी करण्यासाठी रुपये ४,०३,६८७.०० खर्च येणार आहे. तरी त्यास मंजुरी मिळावी. यंत्रसामुग्रीसाठी वेगळी निविदापत्रके मागविण्यात येत आहेत.

अशा प्रकारे रुपये ३३,८४,१०१.८५ ची खरेदी सरकारी अनूदानातून व रुपये ४,०३,६८७.०० ची खरेदी जलनिःसारण बजेटमधुन करण्यासाठी मंजुरी मिळावी.

**संवाद :**

**श्री. गिरजाराम हाळनोर :** प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे अ. मु. १ नुसार फायर टेंडरची आवश्यकता आहे काय? याबाबत खुलासा व्हावा.

**मा. उप आयुक्त :** शहराचा विस्तार लक्षात घेता अग्नीशमन दलाकरीता फायर टेंडर आवश्यक आहे.

**श्री. अजिजुल्ला बेग, श्री. गिरजाराम हाळनोर, श्री. तुळशीराम भगूरे :** जलनिःसारण कामासाठी बजेट शिल्लक नाही असा खुलासा सभागृहात केला जातो, तेव्हा जलनिःसारणाच्या कामाकरीता खरेदी करण्यात येणारी अ. क्र. ६ मधील मशीनरी अंदाजपत्रकाच्या इतर शिर्षकातून खरेदी करण्यात यावी.

**अतिरिक्त शहर अभियंता :** जलनिःसारणा कामाकरीता अ. मु. ६ मधे दर्शविलेली मशिनरी खरेदी करणे आवश्यक आहे. या खरेदी बाबतची कार्यवाही पूर्ण होण्यास किमान २/४ महिन्याच्या कालावधी लागेल, तेव्हा सुधारीत अंदाजपत्रकाचे वेळी या बाबींचा विचार करता येईल.

**मा. सभापती** : मोठे रोड रोलर खरेदी करीता दुसऱ्या कंपनीकडुन दरपत्रे मागविण्यात यावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सन १९९१-९२ आर्थिक वर्षातील शासकीय अनुदानाच्या रक्कमेतून कार्यालयासाठी आवश्यक असलेली खालील वाहने व यंत्रसामुग्री खरेदी करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

१) फायर टेंडर करीता टाटा एस. ई. १२१०/४२ ची एक नग चासीस जी. बी. एस. ४० गेअर बॉक्सेसह स्पेशल गर्व्हमेंट प्राईजलिस्ट प्रमाणे जकात कर सोडुन र. रु. ३,९९,५१०.१५ या दरात टाटा इंजिनिअरींग अँड लोकोमोटीव्ह कंपनी यांचे औरंगाबाद येथील अधिकृत विक्रेते मे. सतिश मोटार्स प्रा. लि. औरंगाबाद यांचेकडून खरेदी करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

२) मे. हॅको इंजिनिअरींग कंपनी यांचेकडून टायगर ब्रँडचे चार टनी थ्री व्हीलर डिझेड एक नग रोड रोलर करीता रु. ३,४६,०००/- च्या दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

३) ८ ते १० टनी मोठे रोलर खरेदी करीता दरपत्रके मागविण्यात यावी असे सर्वानुमते ठरले.

४) दहा हजार लिटर क्षमतेच्या वॉटर टँकर करीता टाटा एसई १२१०/४२ ची एक नग चेसीस जी. बी. एस. ३० गेअर बॉक्सेसह स्पेशल गव्हर्नमेंट फ्राईज लिस्ट प्रमाणे जकात कर तोडून रु. ३,९०,२५०.३५ या दरात टाटा इंजिनियरींग अँड लोकोमोटीव्ह

कंपनी यांचे औरंगाबाद येथील अधिकृत विक्रेते मे. सतिश मोटार्स प्रा. लि. औरंगाबाद यांचेकडून खरेदी करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

५) पाच हजार लिटर क्षमतेचा वाटर टँकर बसविण्याकरीता टाटा ६०८ एक नग चासरो कॅबीनसह स्पेशल गव्हर्नमेंट प्राईज लिस्ट प्रमाणे जकात कर सोडुन रुपये ३,२९,६३० या दरात टाटा इंजिनियरींग अँड लोकोमोटीव्ह कंपनी यांचे औरंगाबाद येथील अधिकृत विक्रेते मे. सतिश मोटार्स प्रा. लि. औरंगाबाद यांचे कडून खरेदी करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

६) सेवर जेटींग मशिन करीता लागणारे टाटा १२१० एसई/४२ एक नग चासीस जी. बी. एस ४० गेअर बॉक्स पी. टी. ओ. सह जकात कर सोडून स्पेशन गव्हर्नमेंट प्राईज लिस्ट प्रमाणे रु. ४,०३,६८७/- च्या दरात टाटा इंजिनिअरींग ॲन्ड लोकोमोटीव्ह कंपनी याचे औ. बाद येथील अधिकृत विक्रेते मे. सतिश मोटार्स प्रा. लि. औरंगाबाद यांचे कडून खरेदी करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

७) शहरातील ट्राफीक कंट्रोलच्या कामाकरीता टाटा ४०७ एक नग चासीस पोल व पी. टी. ओ. सध्याचे मॉडेल जकात कर सोडून स्पेशल गव्हर्नमेंट प्राईज लिस्ट प्रमाणे रुपये २,७२,९५७/- या दरात टाटा इंजिनिअरींग अँड लोकोमोटीव्ह कंपनी याचे औरंगाबाद येथील अधिकृत विक्रेते मे. सतिश मोटार्स प्रा. लि. औरंगाबाद यांचेकडुन खरेदी करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

८) शहर स्वच्छेतेच्या कामासाठी हॅड्रोलीक टिप्परसह टाटा ६०८ चे ३ नग चासीसी खरेदी करीता जकात कर सोडुन स्पेशल गव्हर्नमेंट प्राईज लिस्टप्रमाणे रु. ४,१४,०२२.४५ प्रति नग या दराचे टाटा इंजिनियरिंग ॲन्ड लोकोमोटीव्ह कंपनी यांचे औरंगाबाद येथील अधिकृत विक्रेता मे. सतिश मोटार्स प्रा. लि. औरंगाबाद यांचेकडुन खरेदी करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. ३ नग चासीस करीता एकूण र. रु. १२,४२,०३७.३५ च्या खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

९) ड्रेनेज पाईप लाईन मेन होलच्या देखभाल व दुरुस्ती करीता तसेच प्रिव्हेंन्टीव्ह मेंटनस करण्याकरीता गली एम. टी. आर. च्या व्हॅकुम काटा, घाणपाणी आठेण्याची क्षमता आहे. अशा यंत्रसामुग्राी करीता लागणाऱ्या टाटा १२१० एसई/४२ जी बी एस/४० ॲन्ड पी टी ओ सह अ. क्र. ६ मध्ये दर्शविल्याप्रमाणे एक नग चासीसी गव्हर्नमेंट प्राईज लिस्ट प्रमाणे रु. ४,०३,६८७/- या दरात टाटा कंपनीचे अधिकृत दिलेले मे सतिश मोटार्स प्रा. लि. औरंगाबाद यांचेकडून खरेदी करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वरील प्रमाणे १ ते ८ मधील यंत्रसामुग्री खरेदी करीता रुपये ३३,८४,१०१.८५ चा खर्च सरकारी अनूदानातून व अनुक्रमांक ९ प्रमाणे रु. ४,०३,६८७ च्या जलनि:सारणच्या बजेट मधुन करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २१४/२८ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, सन ९२-९३ या आर्थीक वर्षात नविन वाहने खरेदी करण्यासाठी वाहन खरेदी व जूनी हराशी केलेल्या वाहनांच्या जागी डिप्रेससेन बजेटसाठी एकूण रु. ३० लाखांची तरतुद केलेली आहे हया रु. ३० लाखांच्या तरतुदीतून खालील प्रमाणे वाअन खरेदी करावयाची आहेत.

| | | |
|---|---|---|
| १) | स्वच्छतेच्या कामासाठी टाटा १२१० चे टिप्पर्स | २ नग |
| २) | स्टीट लाईट दुरुस्तीच्या कामासाठी टाटा ४०७ चासीस व हया चासीसवर हॅड्रॉलीक ॲक्सेस प्लॅटफार्म ९.८ | १ नग |

मीटर उंची करीता

| | | |
|---|---|---|
| ३) | नुकतेच हरार्स केलेल्या प्रेतवाहीनी ह्या वाहनांच्या जागी नविन प्रेत वाहीनी | १ नग |
| ४) | नुकतेच हर्रास केलेल्या मांस वाहूक करणाऱ्या वाहनाच्या जागी नविन वाहन | १ नग. |
| ५) | महिंद्रा कंपनीच्या जीप्स कर वसुलींच्या कामात सुधारणा करण्यासाठी २ विभागीय अधिकाऱ्यात १ या प्रमाणे ६ झोन करीता | ३ नग |

असे एकूण ८ वाहने खरेदी करावयाचे असून, त्यासाठी रु. ३० लाखांचे अंदाजपत्रकास प्रशासकीय मजूरी घेऊन वाहने उत्पादन कंपन्या व त्या कंपन्याचे अधिकृत विक्रेत्या कडून दरपत्रके सरकारी दरात (स्पेशल गव्हर्नमेंट रेटस) प्रमाणे बोलाविण्यात आले जे खालील प्रमाणे आहेत.

१) टाटा एस. के. १२१०:३६ जीबीएस-४० गेअरबॉक्स पीटीओ व टिप्पर बॉडीसह करीता टाटा इंजिनियरिंग ॲन्ड लोकोमोटीव्ह कंपनी मुंबई तसेच या कंपनीचे औरंगाबाद येथील अधिकृत विक्रेते मे. सतिश मोटार्स प्रा. लि. औरंगाबाद यांनी रु. ५,४२,३९१.०० चे दरपत्रक जे जकात सोडून आहेत असे दिलेले आहेत.

तरी ते २ टिप्पर्स खरेदी करण्याकरीता एकूण रु. १०,८४,७८२.०० खर्च येणार आहे. कंपनीचे अधिकृत विक्रेते मे. सतिश मोटार्स प्रा.लि. औरंगाबाद यांचेकडून २ टिप्पर्स स्पेशल गव्हर्नमेंट प्राईज प्रमाणे खरेदी करण्यासाठी मंजुरी मिळावी.

२) अ) हॅड्रलिक ॲक्सेस प्लॅटफार्मसाठी लागणारी चासीस टाटा ४०७ कॅबीनसह खरेदी करण्यासाठी पण रु. २,८१,८७२.०० असे दर दिलेले आहेत. ही चासीस टाटा कंपनीचे अधिकृत विक्रेते मे. सतिश मोटार्स प्रा. लि. औरंगाबाद हयांचे कडुन खरेदी करण्यास सर्वानुमते मंजुरी मिळावी.

२ ब) २ अ मध्ये खरेदी केलेल्या चेसीसवर हॅड्रोलीक ॲक्सेस प्लॅटमार्चचे इन्स्टॉलेशन करण्यासाठी भारतातील हया प्रकारचे काम करणारी कंपनी मे. उष टेलीव्हाईस्ट लि. मुंबई हया उत्पादक कंपनीकडून एकूण रुपये ३,७०,०००.०० ३ लाख ७० हजार चे दरपत्रक आलेले आहे. हयाच कंपनीचे महानगरपालिका औरंगाबादने १२१० चासीवर हॅड्रोलिक प्लॅटफार्म खरेदी केलेले असुन ते चांगल्या प्रकारे कार्यरत आहे. तरी रु. ३ लाख ७० हजाराच्या दरपत्रकास मंजुरी मिळावी.

३) प्रेतवाहीनी खरेदी करण्यासाठी मॅटेडोर कंपनीचे अधिकृत विक्रेते मे. धुत मोटार्स औरंगाबाद यांनी डी. जी. एस. ॲन्ड डी. दरप्रमाणे वेगवेगळया २ मॉडेल करीता खालील प्रमाणे दर दिलेले आहेत.

अ) व्हील बेस ३३८० मीमी चे मॉडेल रु. २,४३,४१८.००

ब) व्हील बेस २४०० मीमी चे मॉडेल रु. २,२९,१३९.००

हयापैकी ३३८० मॉडेल हे जास्ती लांबीचे असल्यामुळे ते धुत मोटार्स औरंगाबाद यांचेकडुन रु. २,४३,४१८.०० या दरात खरेदी करण्याची मंजुरी मिळावी.

४) मांस वाहतुक करण्याकरीता मॅटेडोर कंपनीचे डुअेल कॅबीन पिकअप व्हॅन खरेदी करावे अशी मागणी पशुधन विकास अधिकारी यांनी केल्याप्रमाणे मे धुत मोटार्स औरंगाबाद हया कंपनीच्या अधिकृत विक्रेत्याकडून डी. जी. एस ॲन्ड डी दराप्रमाणे रु. २,२८,८९४.०० असे दर दिलेले आहेत तरी त्यास मंजूरी मिळावी आलेल्या हया वाहनांवर बंद बॉडी तयार करण्यासाठी वेगळी दरपत्रके बोलाविण्यात येत आहे.

५) महिंद्रा जीप्स पुरवठा करण्याकरीता मे. महिंद्रा ॲन्ड महिंद्रा लि. मुंबई हयांचेकडून महिन्द्रा सी. जी. ५०० डी. आय./२ डब्ल्यु डी. हया जीप मॉडेल करीता प्रत्येकी रु. २,२०,१०८.८५ असे दर आहेत. हे दर स्पेशल गर्व्हनमेंट प्राईज लिस्टचे आहेत.

एकूण ३ जीप्स खरेदी करण्याकरीता ६,६०,३२६.५५ एवढा खर्च येणार आहे. हया जीप्स कंपनीचे अधिकृत विक्रेते मे. रत्नप्रभा मोटार्स यांच्या मार्फत मे. महिंद्रा ॲन्ड महिंद्रा मुंबई यांचेकडुन खरेदी करण्यास मंजुरी मिळावी.

अ. क्र. १ ते ५ मध्ये दर्शविलेले सर्व दर हे जकात सोडुन असून जकात विभागाला जकात करासंबंधी व वाहनांच्या नोंदी घेण्याविषयी कळविण्यात येईल. कंपनीने दिलेले दर सध्याचे असून, त्यामध्ये सरकारने टॅक्सेस मध्ये कमी जास्त केल्यास कमी जास्त होतील अशी प्रत्येक कंपनीचे अट आहे. जी नेहमीप्रमाणे मान्य करावी लागेल.

दर दर्शविलेली सर्व वाहने खरेदी करण्याकरीता रु. २८,६९,२९२.५५ खर्च येणार असून, अ. क्र. १ ते ५ मध्ये दर्शविल्याप्रमाणे वाहने खरेदी करण्याच्या मंजुरीस्तव प्रस्ताव सादर.

**संवाद :**

**मा. सभापती** : जीप खरेदीसाठी खुळे टेंडर मागविण्यात यावे.

**श्री. अजिजुल्ला बेग :** अनुक्रमांक ३ व ४ प्रमाणे मॅटंडोर ऐवजी टेम्पोटॅक्स खरेदी करण्यात यावे.

**उप अभियंता यांत्रिकी :** अनुक्रमांक ३ व ४ करीता मॅटॅडोर ऐवजी टेम्पो ट्रॅक्स खरेदी केल्यास वाहनांच्या किमंतीत फरक पडले.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सन १९९२-९३ या आर्थिक वर्षात वाहन खरेदी व जुन्या हरार्स केलेल्या वाहनांच्या जागी डिप्रेसिएशन बजेटसाठी नविन वाहने खरेदी करण्याकरीता केलेल्या ३० लाखाच्या तरतुदीतून खालील प्रमाणे वाहने खरेदी करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

१) स्वच्छतेच्या कामासाठी लागणारे टाटा एस के १२१०/३६ मॉडलचे जी. बी. एस/४० गेअर बॉक्स पी. टी. ओ. व टिप्पर बॉडीसह चे दोन नग टिप्परस खरेदी करीता जकात कर सोडून स्पेशल गव्हर्नमेंट प्राईजप्रमाणे प्रति नग रुपये ५,४२,३९१/- दराचे मेसर्स सतिश मोटार्स प्रा. लि. (कंपनीचे अधिकृत विक्रेते) यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. दोन टिप्पर खरेदी करीता रुपये १०,८४,७८२/- च्या खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

२) अः- हॅड्रलिक ॲक्सेस प्लॅटफार्मसाठी लागणारी टाटा ४०७ कॅबीनसह ची चासीस रुपये २,८१,७८२/- या दरात टाटा कंपनीचे अधिकृत विक्रेते मे. सतिश मोटार्स प्रा. लि. औरंगाबाद यांचेकडून खरेदी करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.
बः- अ. क्र. २ अ प्रमाणे खरेदी केलेल्या चॉसीस वर हॅड्रॉलिक ॲक्सेस प्लॉटफार्मचे इन्स्टॉलेशन करण्यासाठी मसेर्स उषा टेलीव्हॉइस लि. मुंबई यांचे रु. ३,७०,०००/- च्या दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

३) प्रेत वाहिनीसाठी लागणारे व्हील बेस ३३८० हे जास्त लांबीचे मॉडेल रुपये २,४३,४१८/- या दरात मॅटॅडोर कंपनीचे अधिकृत विक्रेते मेसर्स धुत मोटार्स औरंगाबाद यांचेकडून खरेदी करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

४) मास वाहतून करण्याकरीता डी. जी. एस ॲन्ड डी दराप्रमाणे रुपये २,२८,८९४ या दरास मॅटॅडोर कंपनीचे डुवेल कॅबीन पीकप व्हॅन कंपनीचे अधिकृत विक्रेते मेसर्स धुत मोटार्स औरंगाबाद यांचेकडुन खरेदी करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

५) बजाज कंपनीची जी चालेंजर जीप आहे त्यामध्ये मर्सडीस इंजिन असून, या जीपमध्ये दहा अधिक एक इतकी आसन व्यवस्था आहे. जी महेंद्रा जीप पेक्षा जास्त आहे. याशिवाय बजाज कंपनीच्या चॅलेजंर जीपची किमंत महेंद्रा जीप पेक्षा कमी आहे. तेव्हा मेसर्स महेंद्र ॲन्ड महेंद्रा लि. मुंबई यांचेकडून प्रति नग रु. २,२०,१०८.८५ पैसे या दराने महेंद्र सी जे ५०० डी. आय/२डब्ल्यु. डी या मॉडेलच्या दोन जीप आणि बजाज कंपनीची चॅलेजंरची एक जीप खरेदी करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

अ. क्र. १ ते ५ मध्ये दर्शविलेल्या कंपनी दरात शासनाने टॅक्सेस कमी जास्त केल्यास दर कमी जास्त होती आणि अनुक्रमांक १ ते ५ मधील सर्व दर जकात कर सोडून आहेत त्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २१५/२९ :**

उप आयुक्त मनपा यांनी प्रस्ताव सादर केला की, सन्माननीय नगरसेवकांच्या निधीतून त्यांनी वेळोवेळी मागणी केलेल्या क्रिडा साहित्य खरेदीसाठी दै. लोकाविजय दै. मुफस्सीर या वर्तमानपत्रात जाहिरात देवून निविदा मागविण्यात आल्या असता एकूण पाच निविदा विक्री झाल्या व सदरील पाचही निविदा विक्री झाल्या व सदरील पाचही निविदा कार्यालयास प्राप्त झाल्या. सदरील निविदांचे तुलनात्मक तक्ता तयार केला असता मे. इटरनॅशनल स्पोर्टस, निराला बाजार यांचे दर आयटम क्र. १ ते ६ ११ व १२ चे दर सर्वात कमी आहेत तर मे. इंटरनॅशनल स्पोटर्स व मे. जे. के. इंटरप्रायझेस याचे दर आयटम क्र. ९ व १३ चे समान आहेत तसेच मे. सचिन स्पोटर्स यांची निविदा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावित कामासाठी संबंधित अधिकाऱ्यांनी चर्चा करावी.

**विषय क्र. २१६/३० :**

उप आयुक्त यांनी प्रस्ताव सादर केला की, महाराष्ट्र व केंद्र पुरस्कत शहरी गरीबासाठी नागरी मुलभूत सेवा योजनेच्या अमलबजावणीसाठी शासनाकडून रु. १५ लक्षचे अनूदान प्राप्त झाले असून, या अनुदानाच्या विनियोगस्तव प्रस्ताव आहे की, सार्थक महिला मंडळ परभणीच्या वतीने खालील १) स्टेशन, हमालवाडी, २) आंबेडकर नगर, ३) नुर कॉलनी, ४) शहानुरवाडी, ५) रोजेबाग, ६) सिध्दार्थनगर, ७) फुलेनगर, ८) किराडपुरा, ९) चौरसनगर, १०) नारेगांव, ११) मसनतपूर, १२) फुलेनगर (हर्सुल), १३) हर्षनगर, १४) संजयनगर (मुकूंदवाडी), १५) मोची मोहल्ला, १६) राहुलनगर, १७) सादतनगर, १८) नागसेननगर, १९) प्रियदर्शनी इंदिरानगर (गारखेडा) या विषय समितीने निवडलेल्या वसाहतीतील सह झोपडपट्टयातील महिलांना प्रशिक्षण देण्यात यावे सदर प्रशिक्षण एक महिन्याचे असून, प्रति प्रशिक्षण रु. १०,०००/- खर्च येतो. खालील व्यवसायात प्रशिक्षण दिले जावू शकते प्रशिक्षणासाठी निवडलेल्या व रस्त्यात एकाच वेळी प्रशिक्षण सुरु करावे असे संस्थेचे म्हणणे आहे. व्यवसाय निवडीचे स्वातंत्र्य तेथील महिलांना देण्यात येते. व्यवसाय प्रशिक्षण १) पापड तयार करणे, २) मसाले तयार करणे, ३) उदबत्ती तयार करणे, ४) कपडे धुण्याचे पावडर तयार करणे, ५) बटाटा वेफर तयार करणे, ६) भांडी घासण्याचे पावडर तयार करणे इ. प्रशिक्षण काळातही संस्था औद्योगिक सहकारी संस्था किंवा महिला मंडळ

स्थापन करुन नोंदणीकृत कसे करावे या बद्दलही मार्गदर्शन करणे, यापुर्वी या संस्थेने परभणी न. पा ने आठ वस्त्यातील ५५० महिलांना लातूर नगरपिालकातर्फे १२ वस्त्याची ६०० महिलांना अकोला नगरपालिकेतर्फे १७ वस्त्यातील ८५० महिलांना, मालेगांव नगरपालिकेतर्फे ५ वस्त्यात २०० महिलांना प्रशिक्षण देण्यात आले आहे. तरी प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे ६०,०००/- खर्चास व संस्थेस मान्यता मिळावी प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महाराष्ट्र व केंद्र पुरस्कृत शहरी गरीबांसाठी नागरी मुलभूंत योजना अमलबजावणीसाठी प्राप्त झालेल्या अनूदानातून सार्थक महिला मंडळ परभणी यांच्या वतीने औरंगाबाद महानगरपालिकेच्या हद्दीतील १) स्टेशन हमालवाडी, २) आंबेडकर नगर, ३) नुर कॉलनी, ४) शहानुरवाडी, ५) रोजेबाग, ६) सिध्दार्थनगर, ७) फुलेनगर, ८) किराडपुरा, ९) चौरसनगर, १०) नारेगांव, ११) मसनतपूर, १२) फुलेनगर (हर्सुल), १३) हर्षनगर, १४) संजयनगर (मुकूंदवाडी), १५) मोची मोहल्ला, १६) राहुलनगर, १७) सादतनगर, १८) नागसेननगर, १९) प्रियदर्शनी इंदिरानगर (गारखेडा) आणि घाटी या वसाहतीतील महिलांना १) पापड तयार करणे, २) मसाले तयार करणे, ३) भांडी घासण्याचे पावडर तयार करणे, ४) कपडे धुण्याचे पावडर तयार करणे, ५) बटाटा वेफर तयार करणे, ६) उदबत्ती तयार करणे इ. पैकी व्यवसाय निवडीचे स्वातंत्र्य तेथील महिलांना देण्यात येते. एका व्यवसायाचे एक महिना कालावधीचे प्रशिक्षण देण्यात सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. या प्रशिक्षणासाठी प्रति प्रशिक्षण रु. १०,०००/- या प्रमाणे २० वसाहतील प्रशिक्षणासाठी येणाऱ्या एकूण र. रु. २,००,०००/- च्या खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २१७/३१ :**

उप आयुक्त यांनी प्रस्ताव सादर केला की, महानगरपालिका अंतर्गत पडेगांव कत्तलखाना (मोठे जनावरे) अत्याधुनिक करण्याकरीता एक प्रोजेक्ट फिजिबीलीटी रिपोर्ट तयार करुन महाराष्ट्र शासन व भारत सरकार यांचेकडे पाठवावयाचे आहे. सदर अत्याधुनिक कत्तलखाना २०० मोठे जनावराकरीता उपयुक्त राहील.

सदरील प्राजेक्ट फिजीबीलीटी रिपोर्ट तयार करण्याकरीता मे. पी. एच. ई. कन्स्ट्रटन्सी स्वर्हिसेस मुंबई ज्यांनी पूणे महानगरपालिकेचे रिपोर्ट तयार केलेले आहे. यांचेशी मा. आयुक्त तसेच या कार्यालयातील तांत्रिक अधिकारी यांचेशी चर्चा होऊन सोबत जोडलेल्या अटीवर प्रोजेक्ट फिजीबीलीटी रिपोर्ट तयार करण्याकरीता रु. २,७५,०००/- चे मे. पी. एच. ई. कन्सलटन्सी सर्व्हीसेस यांना कन्सल्टन्सी फीस देण्याबाबत प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे.

तरी सदरील रिपोर्ट मे. पीएचई कन्सल्टन्सी सर्व्हीसेस यांना वरील दर्शविलेल्या फिस अनुसार तसेच सोबत जोडलेल्या नियम व शर्तीनुसार अत्याधुनिक कत्तलखान्याचे पडेगांव याचे प्रोजेक्ट फिजिबिलीटी रिपोर्ट तयार करण्यास मान्यता व्हावी. प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**संवाद :**

**श्री. नारायण फत्तेलष्कर :** सिल्लेखाना येथे होत असलेल्या विना परवाना जनावरांच्या कत्तलीबद्दल एक मोर्चा महापालिकेवर आला होता सिल्लेखाना येथे अजूनही विना परवाना जनावराची कत्तल होते, तर पडेगांव येथील कत्तलखान्यावर एवढा मोठा खर्च करुन काय उपयोग.

**पशुधन विकास अधिकारी :** सिल्लेखाना येथे विना परवाना जनावरांची कत्तल होऊ नये म्हणुन या भागात पोलीस दलाच्या पहारा बसविण्यात आला आहे.

**श्री. नारायण फत्तेलष्कर, श्री. गिरजाराम हाळनोर :** सिल्लेखाना येथे विनापरवानागीने होत असलेली जनावरांची कत्तल थांबविण्याकरीता पशु वैद्यकीय अधिकारी यांची सिल्लेखाना भागात पहाटे चार पासून डयुटी लावण्यात यावी.

**पशु वैद्यकीय अधिकारी :** सिल्लेखाना भागात होणाऱ्या विना परवाना होत असलेल्या जनावरांची कत्तल बाबत शासकीय पशु वैद्यकीय अधिकारी व पोलीस विभाग यांचे मार्फत सिल्लेखाना येथील विना परवाना जनावरांची कत्तल थांबविली पाहिजे.

**मा. उप आयुक्त :** सिल्लेखाना भागात होत असलेल्या विना परवाना जनावरांच्या कत्तली बाबत दोन्ही बाजूच्या सुचना एकूण घेण्यात आल्या आहेत. सिल्लेखाना येथील विना परवाना जनावरांच्या कत्तली बाबत प्रत्येक महिन्याच्या दुसऱ्या मंगळवारी, बुधवार व गुरुवार आणि चौथ्या गुरुवार, शुक्रवार, व शनिवार या दिवशी मनपाचे स्वच्छता, निरिक्षण यांचे मार्फत छापे टाकण्यात येणार आहे.

**श्री. नारायण फत्तेलष्कर :** नियम आज का आठवला यापुर्वी पशुवैद्यकीय अधिकारी यांनी पंचनामा करुन मांस जप्त केले नाही का? त्यावेळी नियम नव्हता का? पोलीसावर जबाबदारी टाकणे योग्य होणार नाही. सध्या श्रावण मास चालु आहे १ लवकर गणपती बसणार आहेत या बाबीची जाणीव ठेवून योग्य ती कार्यवाही करावी. अन्यथा यातून अनर्थ घडू शकेल याची नोंद घ्यावी

**श्री. गिरजाराम हाळनोर :** पशुवैद्यकीय अधिकारी यांचा खुलासा यांना वाटत नाही.

**मा. सभापती** : मा. उप आयुक्त यांचे सुचनेप्रमाणे त्वरीत आदेश काढावेत.

**श्री. अजिजुल्ला बेग :** शहरातील मोकाट जनावरे आणि शेणाचे ढिगार याबाबत काय कार्यवाही करण्यात आली अशी माहिती पशु वैद्यकीय अधिकारी यांना विचारली असता पंचनामा केला आहे. पोलीस केस केली आहे अशी उत्तरे देण्यात येतात.

**पशु वैद्यकीय अधिकारी :** शहरातील मोकाट जनावरे पकडण्यासाठी १६ मजूर नेमण्यात आले आहे. या कामगाराकडून १५/१६ मोकाट जनावरे पकडले जातात.

**मा. सभापती** : प्रत्येक कामगाराने दररोज किमान २ जनावरे पकडली पाहिजे अन्यथा या मोहीमेवरील कामगार कमी करावे.

**मा. उप आयुक्त :** सभागृहात खुलासा केल्याप्रमाणे आठवडयाच्या तीन दिवसापैकी एक दिवस पशुवैद्यकीय अधिकारी आणि उर्वरीत दोन दिवस मनपाचे स्वच्छता निरिक्षक हे पोलीसामार्फत अशी मोहीम हाती घेतील शहरात उघडयावर टाकण्यात आलेल्या शेणाचे ढिगाराबाबत पशु वैद्यकीय अधिकारी यांना पून्हा नविन नोटीसा संबंधितांना देण्याची व्यवस्था करावी. नोटीसा देऊनही संबंधित मालकाने त्याची पुर्तता केली नाही तर त्याचं विरुध्द नियमाप्रमाणे कार्यवाही करावी. तसेच सिल्लेखाना येथील जनावरांचे विना परवाना कत्तलबाबत पोलीस दलाचा कायम बंदोबस्त ठेवण्याकरीता मा. पोलीस आयुक्त औरंगाबाद यांना विनंती करण्यात यावी म्हणजे सिल्लेखाना भागात जनावरांची कत्तल होणार नाही.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, पडेगांव कत्तलखाना अत्याधुनिक करण्यासाठी मेसर्स पी. एच. ई. कन्सल्टन्सी सर्व्हीसेस मुंबई यांचे मार्फत खालील दर्शविलेल्या नियम व शर्तीनुसार

पडेगांव कत्तलखान्याचा प्रोजेक्ट फिजीबिलिटी रिपोर्ट तयार करुन महाराष्ट्र शासन व भारत सरकार यांचेकडे पाठविण्यासाठी आणि प्रोजेक्ट रिपोर्ट तयार करणे करीता र. रु. २,७५,००० ची कन्सल्टन्सी फी मेर्सस करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

(नियम व शर्ती सोबत जोडले आहे.)

**विषय क्र. २१८/३२ :**

आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी प्रस्तावित केले आहे की, बहुउद्देशीय कर्मचारी (एम. पी. डब्ल्यु) हे पद शासनाचे १०० टक्के अनूदानीत आहे. हे पद भरणेबाबत सन १९८६ पासून बंद करण्याचे शासनाचे आदेश आहेत.

Municipal Corporation Aurangabd

**TERMS AND CONDITION :-**

**1) SCOPE OF WORK :-**

a) Finalising the site orientation review data

b) Review date and prepare design criteria

c) Rerparing block cost estimates for civil Mechanicat and electrical work and complete Project report.

d) Prepares Financial statements Phase out Fund require for the project based on Aurangabad Municipal Corporation budget requirement.

**2) COMENSATION :-**

Compensation for preparation of project feasibility Report will be Rs 2.75 lacs (Rupees two Lacs Seventy Five thous and one) with Following made of payment

a) 30% against work order

b) 30% at the end of 2nd month from the date of agreement (subject to condition satisfaction of progress of report)

c) 30% on submission of Report of Project Feasibility Report.

d) 10% on submission of Final 20 part.

**3) DURATION :-**

The duration For preparing Project report should not exceed more than 3 months. consultancy should co corporation concerned authority for obtainis date required for preparing project Feasibility Report.

The required date will be made available for preparing PFR by Corporation concerned officer as early as possibile to consultancy. However under special circumstances Municipal Commissioner may extend the period by not more than 3 months.

**4) VISITS :-**

The PHE Consultancy should visit Aurangabade Fre uency for preparing and finalising of PFR and there will not be any payment for visits to Auruangabad by Corporation ( N0 limited visits as mentioned by PHE)

It is also decided that cunsultant will visit delhi at his own (2 visits) For discussion if required in Delhi for finalisation and approval of PFR at Central Govt level for Govt. grants for the project as and when required.

**5) MISCELLEANOUS :-**

The consultacy will submit six sets of documents to corporation of projects feasibility Report

| sd/- | sd/- | sd/- | sd/- |
|---|---|---|---|
| L. D. O. | Legal Adviser | Cy. Commissioner | Hon'ble |

MUNICIPAL COROPORATION, AURANGABAD.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महानगरपालिकेतील २५ बहुउद्देशीय कर्मचाऱ्यांना खालील अटीवर आरोग्य व कुटूंबकल्याण प्रशिक्षणास पाठविण्यासाठी आणि प्रशिक्षण परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतर शासनाचे मंजूरी नुसार सुधारीत वेतन श्रेणी देण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

१) प्रशिक्षणास ज्येष्ठता यादीनुसार एम. पी. डब्ल्यु ना ५ जनांच्या गटांनी प्रशिक्षणास पाठवावे.
२) प्रशिक्षणाच्या कालावधीत लाभार्थींना फक्त फार मिळेल इतर भत्ते देयक नाहीत.
३) प्रशिक्षणाचा कालावधी (स्टडी लिव्ह) शिक्षणासाठी रजा म्हणून समजला जाईल.
४) प्रशिक्षण पूर्णवेळ असून, आरोग्य कुटूंबकल्याण प्रशिक्षण केंद्राच्या प्रार्चायांनी हजेरीपट प्रमाणित केल्यानंतरच त्यांना मासिक वेतन देण्यात यावे.
५) शासनाच्या आदेशाप्रमाणे सुधारीत वेतन श्रेणी देण्यता यावी.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

पुर्वी ज्यांना नियुक्त केलेले आहे, त्यांनी १२ महिन्याचे प्रशिक्षण आरोग्य व कुटूंबकल्याण केंद्र औरंगाबाद येथे प्रशिक्षण जरुरी आहे. त्यानुसार महानगरपालिकेतील २५ बहुउद्दीशीय कर्मचारी यांना हे प्रशिक्षण घेणे जरुरी असल्याने त्यांना या प्रशिक्षण घेणे जरुरी असल्याने त्यांना या प्रशिक्षणास खालील अटीवर पाठविणे योग्य राहील.

१) प्रशिक्षणास ज्येष्ठता यादी अनुसार एम. बी. डब्ल्युना ५ जनांच्या गटांनी प्रशिक्षणास पाठवावे.

२) प्रशिक्षणाच्या कालावधीत लाभार्थींना फक्त पगार मिळेल इतर भत्ते देयक नाहीत.
३) प्रशिक्षणाचा कालावधी (स्टडी लिव्ह) शिक्षणासाठी रजा म्हणून समजला जाईल.
४) प्रशिक्षण पूर्णवेळ असुन आरोग्य कुटूंब कल्याण प्रशिक्षण केंद्राच्या प्राचार्यांनी हजेरीपट प्रमाणीत केल्यानंतर त्यांना मासिक वेतन देण्यात यावे.
५) प्रशिक्षण परीक्षा उत्तीर्ण झाल्यानंतरच शासनाचे मान्यतेनुसार वेतनश्रेणी शासनाची मंजूरी घेवून देण्यात येईल.

# *ऐनवेळचे विषय*

**विषय क्र. २१९/३३ :**

प्रस्ताव सादर करण्यात येतो की, श्री संजय कचरु पवार लिपीक, यांची पोलीस उप निरिक्षक पदाच्या प्रशिक्षणासाठी निवड झाल्यामुळे त्यांना प्रथम एक वर्षाकरीता लिपीक पदावरील धारणाधिकार कायम ठेवण्यात यावा याबाबत विनंती अर्ज केलेला आहे. करीता श्री. संजय कचरुजी पवार यांना दिनांक १७-०८-९२ पासून एक वर्षाकरीता लिपीक पदावरील धारणाधिकार मंजुर करण्याबाबत शिफारस करण्यात येते. एक वर्षाचा धारणाधिकार कालावधी मंजूर करण्याबाबत प्रस्ताव विचारार्थ व निर्णयास्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, लिपीक संजय कचरुजी पवार यांची पोलीस उपनिरिक्षिक पदाच्या प्रशिक्षणासाठी निवड झाल्यामुळे दिनांक १७-०८-९२ पासून एक वर्षाकरीता संबंधितास लिपीक या पदावरील धारणाधिकार कालावधी मंजूर करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २२०/३४ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, शरीफ कॉलनी रोषणगेट येथे १०० मी. मी. व्यासाची ए. सी. जलवाहिनी टाकावयाची आहे. त्यासाठी परिसर अभियांत्रिकी विभागाची दरसुची सन १९९०-९१ नुसार र. रु. २९,९२०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. त्यास प्रशासकीय मान्यता घेण्यात आलेला आहे. त्यास प्रशासकीय मान्यता घेण्यात आलेला आहे. सदर कामासाठी बी-१ निविदा मागविण्यासाठी निविदा सुचना क्रमांक ०५/९२-९३ जी की, दैनिक लोकधर्म, लोकमत, दैनिक देवगीरी तरुण भारत, इंडियन एक्सप्रेस या वर्तमान पत्रात प्रसिध्दीस देण्यात आलेली आहे. कोऱ्या निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण पाच निविदा विक्री झाल्या त्या खालील प्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. सय्यद तौफिख अहेमद | अंदाजपत्रकीय दराने |
| २. | श्री. सय्यद अथर अली | ३% जास्त |
| ३. | श्री. मोती अहेमद कादी | २% जास्त |

वरील प्रमाणे तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दर हा श्री. सय्यद तौफिख अहेमद यांचा आहे. म्हणजेच अंदाजपत्रकीय दरानुसार असा दर आहे.

करीता श्री. सय्यद तौफिख अहेमद यांची अंदाजपत्रकीय दरानुसारची निविदा मंजूरी बाबत प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शरीफ कॉलनी रोषणगेट येथे १०० मी. मी. व्यासाची ए. सी. जलवाहिनी टाकण्याच्या कामाकरीता तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दराच्या श्री. सय्यद तौफिख अहमद यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २२१/३५ :**

वार्ड क्र. ५८ मोहल्ला शिवशंकर कॉलनी येथे १५० मी. मी. व्यासाची आर. सी. सी. ड्रेनेज लाईन टाकणे बाबत अंदाजपत्रक र. रु. ६,४५,०१३.०० चे सन १९९०-९१ च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आले असून, शासकीय प्राप्त अनूदानातून सदर काम करण्यास्तव मा. आयुक्त महोदयांनी मंजूरी दिलेली आहे.

आदेशावरुन सदरील कामाकरीता कार्यालयीन निविदा सुचना क्र. ६/७८२/९२ दि. २२-०५-९२ नुसार दैनिक औरंगाबाद टाईम्स, लोकविजय, दैनिकात जाहिरात देवून बी-१ नमुन्यात निविदा पत्रके मागविले असता एकूण सहा निविदा पत्रके विकण्यात आल्या होत्या. त्यापैकी फक्त दोनच निविदापत्रके प्राप्त झाली असून, त्यांचा तुलनात्मक तक्ता दर खालील प्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. पी. जे. तमखाने | ३% जास्त |
| २. | श्री. कैसरखान | ७% जास्त |

तुलनात्मकदृष्टया कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३% जास्त दराचे श्री. पी. जे. तमखाने यांचे दरपत्रक आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शिवशंकर कॉलनी येथे १५० मी. मी. व्यासाची आर. सी. सी. ड्रेनेज लाईन टाकण्याच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ३% जास्त दराच्या श्री. पी. जे. तमखाने यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २२२/३६ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, वार्ड क्र. ६ मो. म्युनिसिपल कॉलनी किलेअर्क येथे २५० मी. मी. व्यासाची आर. सी. सी. ड्रेनेज लाईन टाकणे बाबत अंदाजपत्रक र. रु. ४८,०००.०० चे सन १९९१-९२ च्या दरसुचीप्रमाणे तयार करण्यात आलेले असून, मा. आयुक्त यांनी सदरील अंदाजपत्रकास मंजुरी दिलेली आहे.

आदेशानुसार सदर कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र. १०/९३२/९२ दि. ३०-०६-९२ ला दैनिक मुक्कदस, स्वरगंगा या स्थानिक वर्तमानपत्रात जाहिरात देवून बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता एकूण आठ निविदा विकण्यात आलेल्या होत्या यापैकी केवळ दोन निविदा प्राप्त झालेल्या असून, त्यांचा तुलनात्मक दर खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. कैसरखान | ४% जास्त |
| २. | श्री. सलीम अहेमद | अंदाजपत्रकीय दराने |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजे अंदाजपत्रकीय दराचे श्री. सलीम अहेमद यांचे दरपत्रक आहे. करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र. ६, म्युनिसिपल कॉलनी किलेअर्क येथे २५० मी. मी. व्यासाची आर. सी. सी. ड्रेनेज लाईन टाकण्याच्या कामाकरीता तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दराच्या श्री. सलीम अहमेद यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २२३/३६ :**

वार्ड क्र. ४७ मो. केसरसिंगपूरा येथे मुख्य जलनि:सारण वाहीनी बदलणे बाबत अंदाजपत्रक र. रु. २,८७,०००/- चे सन १९९०-९१ च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आले असून, प्राप्त शासकीय अनूदानातून सदर काम करण्यास्तव मा. आयुक्त महोदयाची मंजूरी दिलेली आहे.

आदेशावरुन सदरील कामाकरीता कार्यालयीन निविदा सुचना क्र. ६/७८३/९२ दिनांक २२-०५-९२ नुसार दैनिक औरंगाबाद टाईम्स, लोकविजय, नवा मराठा व मुक्कदल दैनिका जाहिरात देवून बी-१ नमुन्यात निविदा मागविले असता एकूण तीन निविदा पत्रक विकण्यात आल्या होत्या त्या तिनही निविदा पत्रके प्राप्त झाल्या असून, त्यांचा तुलनात्मक तक्ता दर खालील प्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. मझरुल हक्क | १८% जास्त |
| २. | मे. जाधव कंस्ट्रक्शन | १५% जास्त |
| ३. | श्री. र. रफिकोद्यीन | २०% जास्त |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १५% जास्त दराच्या म्हणजेच १९९१-९२ च्या दरसुचीनुसार अंदाजपत्रकीय दरापेक्षा ९.७२% कमी दराच्या मेसर्स जाधव कंस्ट्रक्शन यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, केसरसिंगपूरा येथे मुख्य जलवाहिनी बदलण्याच्या कामाकरीता तुलनात्मक सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १५% जास्त दराच्या म्हणजे १९९१-९२ च्या दरसुचीनुसार अंदाजपत्रकीय दरापेक्षा ९.७२% कमी दराच्या मेसर्स जाधव कंस्ट्रक्शन यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २२४/३८ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, वार्ड क्र. १५ काचीवाडा येथे २५० मी. मी. व्यासाची व ३०० मी. मी. व्यासाची आर. सी. सी. ड्रेनेज लाईन टाकणे बाबत अंदाजपत्रक र. रु. २,५६,५००/- चे सन ९१-९२ च्या दरसुची प्रमाणे तयार करण्यात आलेले असून, स्थायी समितीचा ठराव क्र. ८८/५७ दि. ०८-०६-९२ नुसार मंजूरी मिळालेली असून, सदरचा खर्च सन ९१-९२ च्या प्रशासकीय अनूदानातून करण्यात येईल.

आदेशानुसार सदर कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र. ८/८९४/९२ दि. २०-०६-९२ ला दैनिक अजिठा, आलमगीर टाईम्स, औरंगाबाद टाईम्स, देवगीरी तरुण भारत या दैनिका जाहिरात देवून बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता एकूण पाच निविदा विकण्यात आलेल्या होत्या त्यापैकी केवळ दोन निविदा प्राप्त झालेल्या असून, त्यांचा तुलनात्मक दर खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. सय्यद रफिकउद्दीन | ०.२५% कमी |
| २. | श्री. कैसरखान | ४% जास्त |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.२५% कमी श्री. सय्यद रफिकउद्दीन यांचे दरपत्रक आहे. करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र. १५ काचीवाडा येथे २५० मी. मी. व ३०० मी. मी. व्यासाची आर. सी. सी. ड्रेनेज लाईन टाकण्याच्या कामा करीता तुलनात्मकदृष्टया

सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.२५% कमी दराच्या श्री. सय्यद रफिकोद्दीन यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २२५/३९ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, शासकीय अनूदान १९९१-९२ अंतर्गत उल्कानगरी गारखेडा येथील प्लॉट क्र. ६४ ते ७२ येथे रिटेनिंग वाल व खडी रस्त्याचे काम करण्यासाठी अंदाजपत्रक रु. ८,१८,०००/- चे अंदाजपत्रकास मा. आयुक्त मनपा याचे दि. ०१-०२-९२ चे मंजूरीनुसार सदरील कामासाठी प्रगट निविदा मागविल्यानंतर स्थायी समितीचा ठराव क्र. ५०६/२६ दि. १३-०४-९२ द्वारे मे. पाल कंस्ट्रक्शन याचे अंदाजपत्रकाचे दरापेक्षा २५.०५% कमी दराची निविदा मंजूर केल्या नंतर मे पाल कंस्ट्रक्शन यांचेकडून वरील काम करुन घेण्यात येत आहे. काम प्रगती पथावर असतांना रस्त्याचे कामामुळे फारच कमी लोकांनी त्याचा फायदा मिळणार आहे तसेच दक्षिणेकडील जवळ जवळ १०० ते १२५ घरांना अप्रोच रोड नसल्यामुळे हयुम पाईप कलर्व्हट बांधून ४ मिटर रुंदीचा पुर्व पश्चिम अप्रोच रोड व रिटेनिंग पावसाळयाच्या अगोदर बांधणे अत्यावश्यक आहे. ज्यामुळे तेथील लोकांची गैरसोय दूर होईल करीता मुळ अंदाजपत्रकातील तरतुदीपेक्षा आणखी अधिक अप्रोच रोड तसेच रिटेनींग वॉलचे काम अत्यावश्यक असल्यामुळे शासकीय अनूदानाअंतर्गत काम लवकरात लवकर पूर्ण करण्याचे आवश्यक ते वाढीव काम करुन घेण्यात येत आहे. त्याच सुधारीत अंदाजपत्रक र. १५,७३,१७५/- करण्यात आले असून, मुळ अंदाजपत्रकापेक्षा रु. ७,७५,१७५ बाद झालेल्या सुधारीत अंदाजपत्रकास मा. आयुक्त मनपा यांनी दि. २४-०७-९२ ला मंजुरीही दिली असुन १ मुळ अंदाजपत्रकापेक्षा वाढ झालेली र. रु. ७,५५,१७५/- चा खर्च शासकीय अनूदानामधील विविध रस्त्याचे कामात होणाऱ्या बचत मधुन करण्यास मंजुरी दिली आहे.

सदरील कामाचे ठेकेदार मे. पाल कंस्ट्रक्शन यांनी दि. १३-०७-९२ चे पत्राद्वारे सदरील कामातील म्हणजे निविदे सोबतचे शेडयुल " बी " चे परीमानापेक्षा २५ टक्के फीस अधिक होणाऱ्या परीमानासाठी अंदाजपत्रकाचे दराप्रमाणे देयक देण्यासाठी विनंती केली आहे. करीता नियमानुसार व ठेकेदाराचे विनंतीप्रमाणे निविदेच्या २५% अधिक होणाऱ्या परिमानाचे देयक अंदाजपत्रकीय दराप्रमाणे देण्याचे मंजुरीसाठी विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, उल्कानगरी गारखेडा येथील प्लॉट क्र. ६४ ते ७२ च्या दक्षिणेकडील १०० ते १२५ घरांना अप्रोच रोडची व्यवस्था नसल्यामुळे उल्कानगरी प्लॉट क्र. ६४ ते ७२ येथे रिटेनिंग वॉल बांधणे व खडी रस्ता तयार करण्याच्या मुळ कामात दक्षिणेकडील या घरांकरीता हयुम पाईप कल्व्हेट बांधून चार मीटर रुंदीचा पुर्व पश्चिम अपोच रोड व रिटेनिंग वॉल तयार करण्याच्या कामासाठी वाढ झाल्यामुळे या वाढीव कामासाठी तयार करण्यात आलेल्या र. रु. ७,७५,१७५/- च्या सुधारीत अंदाजपत्रकाचे कामात मुळ कामाच्या सेंडुल " बी " चे परीमाना पेक्षा २५% अधिक होणाऱ्या परीमानाचे देयक ठेकेदार मे पाल कंस्ट्रक्शन यांना अंदाजपत्रकीय दराने अदा करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

| | |
|---|---|
| स्वाक्षरित/- | स्वाक्षरित/- |
| सचिव, | सभापती, स्थायी समिती |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद*

**शनिवार दिनांक २९-०८-९२ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती इतिवृत्तांत. शनिवार दिनांक २९-०८-९२ रोजी दुपारी ३.३० वाजता समिती सभागृहात मा. सभापती श्री. अॅड इगबालसिंग गिल यांच्या अध्यक्षतेखाली स्थायी समिती सभेस सुरुवात झाली. या सभेस कार्यलयीन अधिकाऱ्यासह खालील स. सभासद उपस्थित होते.**

१) श्री. नारायण मोहन फत्तेलष्कर
२) श्री. अलीम बेग मिर्झा कलीम बेग
३) श्री. गिरजाराम नानाराव हाळनोर
४) श्री. जावेद हसनखान कासिमहसन खान
५) श्री. पेरकर विठ्ठल कोडांजी
६) श्री. शिंदे मधुकरराव माणिकरराव

**विषय क्र. २२६/१ :**

दिनांक १२-०८-९२ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :**

**श्री. गिरजाराम हाळनोर :** संत एकनाथ रंग मंदिर येथील सायकल स्टँडवरुन कार्यक्रमाचे वेळी एखादे वाहन चोरी गेल्यास पोलीस स्टेशनवर रिपोर्ट करण्याबाबत सायकल स्टँडचे गुत्तेदार सांगतात. सायकल स्टँडच्या गुत्ता घेतल्यानंतर वाहनांच्या सुरक्षितेची जबाबदारी संबंधित गुत्तेदाराची नसते काय? तसेच संत एकनाथ रंगमंदिर येथील सायकल स्टँडवर सायकल ठेवण्याचा दर काय आहे याचा खुलासा व्हावा.

**मालमत्ता अधिकारी :** संत एकनाथ रंगमंदिर येथे सायकल स्टँड करीता रु. ०.५० पै. मोटार सायकल व इतर दुचाकी वाहने रु. १.०० आणि मोटारकार व समान चार चाकी वाहने रु. २.०० याप्रमाणे दर आकारणे बाबत गुत्तेदारास मंजूरी दिली आहे.

**श्री. गिरजाराम हाळनोर :** सभागृहात खुलासा केल्याप्रमाणे मंजूरा दरापेक्षा ज्यादा दराने संबंधित गुत्तेदार नागरिकांकडून पैसा घेतात. सायकल स्टँडचा गुत्ता घेतल्यानंतर त्या ठिकाणाहून सायकल अथवा अन्य वाहन चोरी गेल्यास त्याबाबतची जबाबदारी संबंधित गुत्तेदारावर राहील संत एकनाथ रंगमंदिर येथे असलेल्या वाहन स्टँडवर वाहन लावल्यानंतर गुत्तेदाराने संबंधित नागरिकास बिले दयावे आणि मंजूरा दराप्रमाणेच पैसे घ्यावे याबाबत संबंधित गुत्तेदारांना पाबंद करण्यात यावे.

**मालमत्ता अधिकारी :** दिनांक १२-०८-९२ च्या सभेत ठराव क्र. ११४ वरील चर्चेच्या वेळी संत एकनाथ रंगमंदिरासाठी जनरेटरची व्यवस्था करण्याकरीता रु. दोन लाख पंचवीस हजार च्या खर्चास मंजूरी देण्याबाबतचे रुलींग मा. सभापती यांनी दिले आहे. त्याबाबतचा उल्लेख इतिवृत्ता आलेला नाही. याची नोंद घेण्यात यावी.

**मा. सभापती** : संत एकनाथ रंगमंदिरासाठी जनरेटरची व्यवस्था करण्याकरीता २,२५०००/- च्या खर्चास मंजूरी देण्यात येते. अशी दुरुस्ती करण्यात यावी.

**श्री. गिरजाराम हाळनोर, श्री. विठ्ठल पेरकर :** सहाय्यक संचालक नगररचना या काम करणारे अधिकारी सध्या कार्यरत नाही काय? या अधिकाऱ्यांची बदली झाले आहे किंवा ते रजेवर आहे याचा खुलासा व्हावा. सहाय्यक संचालक नगर रचना या पदावर काम करणारे अधिकारी कार्यरत नसल्यामुळे नागरीकांची अनेक कामे थांबली आहेत. जे अधिकारी या पदावर कार्यरत ते पुर्णवेळ काम कीत नाहीत तेव्हा पुर्वीप्रमाणे सहाय्यक संचालक नगररचना या पदाचा अतिरिक्त कार्यभार मनपाच्या अधिकाऱ्यांना देण्यात यावा.

**मा. उप आयुक्त :** स. सभासदांच्या सुचनेप्रमाणे मा. आयुक्त यांच्याशी चर्चा करुन सदर प्रकरणी पुढील कार्यवाही केली जाईल.

**श्री. गिरजाराम हाळनोर :** येत्या दोन दिवसात गणेश उत्सवास सुरुवात होत आहे. तेव्हा या वर्षी शहरातील सार्वजनिक दिवे आणि नगरसेवकांच्या मागणी नुसार वार्डात बसविण्यात येणारे दिवे याबाबत काय व्यवस्था करण्यात येणार आहेत. याचा खुलासा व्हावा.

**अतिरिक्त शहर अभियंता :** ज्या ज्या ठिकाणी लाईट बसविण्याची आवश्यकता आहे त्या त्या ठिकाणी लाईट बसविले जातील तसेच सर्व सार्वजनिक लाईटची कामेही हाती घेतली जाईल. यासाठी स्पेशल गॅगची नियुक्ती करण्यात आली आहेत.

**श्री. गिरजाराम हाळनोर :** दुपारी ३.०० नंतर सर्व अधिकारी व कर्मचारी यांनी कार्यालयात हजर असावे असा कार्यलयीन आदेश असतानांही बरेच अधिकारी/कर्मचारी कार्यालयात हजर नसतात. त्यामुळे दुपारी ३.०० नंतर कामा निमित्त आलेल्या नागरिकांना त्रास होतो.

**मा. उप आयुक्त :** दुपारी ३.०० नंतर सर्व अधिकारी / कर्मचारी यांनी कार्यालयात हजर रहावे असा आदेश देण्यात आलेला आहे. तरीपण काही महत्वाचे काम असेल तर, मुहमेंट रजिस्टरवर नोंद करुन कार्यालय सोडण्याची परवानगी संबंधित अधिकाऱ्यांना देण्यात आलेला आहे. तेव्हा स. सभासदांनी विशिष्ट अधिकाऱ्यांबाबत खुलासा केल्यास त्यावर कार्यवाही करता येईल. या शिवाय वर्ग-१ च्या अधिकाऱ्यांवर अविश्वास दाखविणे योग्य होणार नाही.

**श्री. गिरजाराम हाळनोर :** प्रशासनाने प्रत्येक विभागाला एक / दोन दिवस होईल. अचानकपणे भेट दिल्यास योग्य होईल. कामानिमित्त पशुधन विकास अधिकाऱ्यांची भेट घेण्याचा प्रयत्न केला तर ते भेटत नाही.

**श्री. नारायण फत्तेलष्कर :** मा. उप आयुक्त किंवा मा. आयुक्त यांनी दुपारी ३.०० नंतर महिन्यातून एक / दोन वेळा प्रत्येक विभागाला भेट दयावी म्हणजे दुपारी ३.०० नंतर कार्यालयात उपस्थित नसलेल्या अधिकारी व कर्मचारी यांचे बाबत माहिती मिळाली. याशिवाय विद्युत विभागात काम करणाऱ्या लाईनमनची त्यांच्या विविध मागण्याबाबत माझेकडे निवेदन दिले आहे. त्यावर विचार व्हावा. (विद्युत लाईनमनच्या विविध मागण्या बाबतचे निवेदन सभागृहात वाचुन दाखविण्यात आले.)

**मा. सभापती** : विद्युत लाईनमनच्या विविध मागण्याबाबत अतिरिक्त शहर अभियंता यांनी दि. ०२-०९-९२ रोजी चर्चा करावी. विद्युत लाईनमन प्रमाणेच वरीष्ठ लिपीक श्री. सि. यु. वैदय यांचे अतिरिक्त भत्ता मिळणे बाबतचे अर्जावर विचार व्हावा. (श्री. सि. यु. वैदय यांचा अर्ज सभागृहात वाचून दाखविला.)

**श्री. नारायण फत्तेलष्कर, श्री. विठ्ठल पेरकर :** वरीष्ठ लिपीक श्री. सि. यु. वैदय यांना नियमाप्रमाणे अतिरिक्त भत्ता देण्यात यावा तसेच ठराव क्र. २१८ मधील अनुक्रमांक ५ मध्ये शासनाच्या आदेशाप्रमाणे दि. ०१-०४-८५ पासून सुधारीत वेतनश्रेणी देण्यात यावी अशी दुरुस्ती करावी.

**मा. सभापती** : सर्व सभासदांनी सुचविल्याप्रमाणे श्री. सि. यु. वैदय यांना दि. ०१-०८-९० पासून कार्यलयीन अधिक्षक या पदाचा भत्ता देण्याबाबतची योग्य ती कार्यवाही व दुरुस्ती करण्यास मंजूरी देण्यात येते.

**श्री. नारायण फत्तेलष्कर :** औरंगाबाद शहराचा विकास आराखडा केव्हा मंजूर झाला त्यानुसार शहांगज मार्केटच्या जागे बाबत खुलासा व्हावा.

**नगर रचनाकार :** औरंगाबाद शहराचा आराखडा सन १९६९ आणि सन १९७५ अशा दोन भागामध्ये मंजूर झाला असून, सन १९६९ च्या विकास आराखडयाप्रमाणे साईट क्र. ४६ प्रमाणे शहागंज मार्केटच्या विस्तारास मंजूरी मिळाली आहे.

**श्री. नारायण फत्तेलष्कर :** शहागंज मार्केट येथे असलेले टिन शेडचे अतिक्रमण हटविण्यात येत नाहीत. यासाठी पुढील सभेत शहागंज मार्केटचे काम केव्हा सुरु झाले आणि ते काम केव्हा पूर्ण झाले याबाबतची माहिती देण्यात यावी.

**मा. सभापती** : पडेगांव कत्तलखाना येथे स. सभासदा समवेत करण्यात आलेल्या पाहणीच्या वेळी मास वाहतूकीसाठी आणखी एक मॅटेडोर खरेदी करण्याचे ठरले. त्यानुसार दि. १२-०८-९२ च्या सभेतील ठराव क्र. २१४ अनुक्रमांक ४ मध्ये मास वाहतूकीसाठी डी. जी. एस. ॲन्ड डी. दराप्रमाणे रु. २,२८,८९४/- या दरात मॅटेडोर कंपनीचे टुवेल कॅबीन पीकप व्हॅन कंपनीचे अधिकृत विक्रेते मे. धुत मोटर्स औरंगाबाद यांचेकडून मॅटॅडोर खरेदी करण्याबाबत आवश्यक ती दुरुस्ती करण्यात यावी.

**ठराव :**

दिनांक १२-०८-९२ च्या सभेतील -------

१) ठराव क्र. १९४ मध्ये संत एकनाथ रंगमंदिरासाठी जनरेटर ची व्यवस्था करण्याकरीता रस्टन (ग्रीव्हज) कंपनीचे २० के. व्ही. ए. शक्तीचे जनरेटर सेट पुरवठा करणे व उभारणेसाठी रुपये २,२५,०००/- च्या खर्चास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. अशी वाढ करण्यास------

२) ठराव क्र. २१४ मध्ये मांस वाहतुकीसाठी अनुक्रमांक ३ मध्ये मांस वाहतुकीसाठी डी. जी. एस. ॲन्ड डी. दराप्रमाणे रु. २,२८,८९४/- या दरात १-४-८५ मॅटॅडोर कंपनीचे टुवेल कॅबीन पीकअप हॅन कंपनीचे अधिकृत विक्रेते मे. धुत मोटार्स औरंगाबाद यांचेकडून मॅटॅडोर खरेदी करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. अशी वाढ करण्यास ------

३) ठराव क्र. २१८ मधील अनुक्रमांक ५ मध्ये शासनाच्या आदेशाप्रमाणे दिनांक ०१-०४-८५ पासून सुधारीत वेतन श्रेणी देण्यात यावी अशी दुरुस्ती करण्यास ------

वरील अनुक्रमांक १ ते ३ मध्ये दर्शविलेली दुरुस्ती व वाढ यासह दि. १२-०८-९२ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समितीचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. २२७/२ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, सिध्दार्थ उदयांनाच्या बसस्टॅड कडील बाजूस कंपांऊंडवॉल बांधणे बाबत कामासाठी सा. बा. खात्याचे सन १९९१ च्या

दरसुचीनुसार र. रु. १,६६,२१०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असता सदरचा खर्च नविन उदयाने या शिर्षकामधून करण्यात येईल. प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे सिध्दार्थ उद्यानाच्या बसस्टँड कडील बाजूस कंपाऊंड वॉल बांधणे बाबत कामासाठी सा. बा. खात्याचे सन १९९१ च्या दरसुचीनुसार र. रु. १,६६,२१०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २२८/३ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, गारखेडा येथील स. नं. १७७, १७८, २८१, २८२ येथील जागेवर कंपाऊंडवॉल बांधणे मनपाच्या मंजूर रेखांकनातील खुल्या जागेवर बांधण्याच्या कामासाठी सा. बा. खात्याचे १९९१-९२ च्या दरसुची नुसार र. रु. २,०७,७००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले. सदरचा खर्च विकास योजना अंतर्गत भुखंडाचे संरक्षण या शिर्षकामधुन करण्यात येईल. प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, गारखेडा येथील सन १७७, १७८, २८१ व २८२ येथील जागेवर कंपाऊंड वॉल बांधण्याच्या कामाकरीता र. रु. २,०७,७००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २२९/४ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, प्रभाग क्र. ५७ येथील मंजूरा रेखांकनातील मनपाच्या खालील दर्शविलेल्या ठिकाणी तार फेन्सींग करणे बाबत अनुक्रमे १) मोहल्ला एकनाथ नगर २) स. नं. शहानुरवाडी ३) भरतनगर शहानुरवाडी ४) न्यु स्टेट बँक कॉलनी स. न. ६/ए ५) संजय को. ऑ. हौ. सी. टी. एस. नं. १६,३२५ उस्मानपुरा ६) महाविरनगर कॉलनी सी. एस. नं. ०५-०४-६७ उस्मानपुरा ७) जयनगर इत्यादी ठिकाणचे कामासाठी, सा. बा. खात्याचे १९९१-९२ च्या दरसुचीनुसार र. रु. चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले.

सदरचा खर्च विकास योजना अंतर्गत संरक्षण या शिर्षकामधुन करण्यात येईल. प्रस्ताव मंजूरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्र. ५७ येथील १) एकनाथ नगर २) स. नं. शहानुरवाडी ३) भरतनगर शहानुरवाडी ४) न्यु स्टेट बँक कॉलनी स. न. ६/१ ५) संजय को. ऑपरेटीव्ह हाऊसिंग सोसायटी सिटीएस नं. १६,३२५ उस्मानपुरा ६) महाविरनगर कॉलनी सी. एस. नं. ०५-०४-६७ उस्मानपुरा ७) जयनगर येथील मंजूर रेखांकनातील मनपाच्या ठिकाणी तार फेन्सींग करण्याच्या कामाकरीता रुपये ३,४०,२७५/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २३०/५ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, गारखेडा येथील स. नं. १८/२ व १८/३ येथील मनपाच्या खुल्या जागेवर संरक्षित भिंत बांधणे बाबत सा. बां. खात्याच्या सन

१९९१-९२ च्या दरसुचीनुसार र. रु. १,३५,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले. सदरचा खर्च विकास योजना अंतर्गत भुखंडाचे संरक्षण या शिर्षकामधुन करण्यात येईल. प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे गारखेडा येथील सर्वे नं. १८/३ येथील मनपाच्या खुल्या जागेस संरक्षित भिंत बांधण्याच्या कामाकरीता र. रु. १,३५,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २३१/६ :**

मा. शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो. बेगमपुरा येथे प्राथमिक शाळेसाठी पहिल्या मजल्याचे काम करण्यासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याचे सन १९९१-९२ चे दरसुचीनुसार र. रु. ३,७५,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. सदरचा खर्च "विकास इमारती " या शिर्षकाखाली असलेल्या तरतुदीमधुन करण्यात येईल.

तरी र. रु. ३,७५,०००/- चे अंदाजपत्रक मंजूरीसाठी प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे बेगमपुरा येथील प्रा. शाळेसाठी पहिल्या मजल्याचे काम करण्या करीता र. रु. ३,७५,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २३२/७ :**

मा. शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो. मिलींदनगर येथे प्राथमिक आरोग्य केंद्र बांधण्याच्या कामासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याचे सन १९९१-९२ चे डी. एस. आर. दराने र. रु. ३,१८,००० चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे.

सदरच्या कामाचा खर्च इतर इमारती व उर्वरीत कामे या शिर्षकामधुन करण्यात येईल तरी अंदाजपत्रक र. रु. ३,१८,४००/- चे मंजुरीसाठी प्रस्ताव विचारार्थ सादर.

**संवाद :**

**श्री. मधुकर शिंदे, श्री. विठ्ठल पेरकर :** मिलिंदनगर येथील प्रा. आरोग्य केंद्राकरीता आवश्यक त्या कर्मचाऱ्यांची नेमणुक करण्याबाबत मंजुरी घेतली आहे काय? अन्यत: जवाहर कॉलनी प्राथमिक आरोग्य केंद्राप्रमाणे आरोग्य केंद्राची इमारत तयार पण स्टॉपची मंजूरी नाही. अशी परिस्थिती निर्माण होईल तेव्हा मिलिंदनगर प्राथमिक आरोग्य केंद्राकरीता आवश्यक तो स्टॉपची नेमणुक करण्यास मंजुरी मिळाल्यानंतरच सदर कामास मंजुरी देण्यात यावी. जवाहर कॉलनी प्राथमिक आरोग्य केंद्र इमारती बाबत पोलीस विभागाकडून भाडेही प्राप्त होत नाही. अशी माहिती प्राप्त झाली आहे.

**आरोग्य वैद्यकीय अधिकारी :** मिलिंदनगर प्राथमिक आरोग्य केंद्रासाठी आवश्यक असलेल्या स्टॉपची नेमणुक करण्याबाबतचा प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यात येत आहे. सदर इमारतीचे बांधकाम पूर्ण होईपर्यात नियुक्त करावयाच्या स्टॉपची मंजूरी मिळेल. तेव्हा बांधकामाच्या प्रस्ताव मंजूरी देण्यास हरकत नाही.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे मिलिंदनगर येथे प्राथमिक आरोग्य केंद्राची इमारती बांधण्याच्या कामासाठी र. रु. ३,१८,४००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २३३/८ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, वार्ड क्र. ३७ मो. इंदिरानगर बायजीपुरा येथे २५० मी. मी. व्यासाची व ३०० मी. मी. व्यासाची आर. सी. सी. ड्रेनेज लाईन टाकणे बाबत अंदाजपत्रक र. रु. ३,८३,९००/- चे सन १९९१-९२ च्या दरसुचीप्रमाणे तयार करण्यात आलेले असून सदरचा खर्च सन १९९२-९३ सालच्या स्लम विभागाच्या भांडवली तरतुदीतून करण्यात येईल. तसेच सदरील अंदाजपत्रकास मा. आयुक्त यांनी मंजूरी दिलेली आहे. करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र. ३७ मो. इंदिरानगर बायजीपुरा येथे २५० व ३०० मी. मी. व्यासाची ड्रेनेज लाईन टाकण्याच्या कामाकरीता र. रु. ३,८३,९०० च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २३४/९ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला की, बायजीपूरा ट्रेचिंग ग्राऊंड येथील मेकॅनिक वर्कशॉप परिसरात डांबरीकरण करण्याच्या कामासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन ९१-९२ च्या डी. एस. आर. दराप्रमाणे अंदाजपत्रक र. रु. २,४०,०००/- चे वाढविण्यात आले असून, मा. आयुक्त यांनी मान्यता दिलेली आहे. सदरील कामाचा खर्च शासकीय अनूदानातून (९१-९२) करण्यात येईल.

सदरील कामासाठी कार्यालयीन निविदा नोटीस क्र. मनपा/अशअ/३०७/९२ दि. १५-०६-९२ अन्वये निविदा मागविल्या असता शेवटचा तारखेच्या वेळेपर्यंत एकूण चार निविदा विकल्या गेल्या व तीन निविदा दर भरुन प्राप्त झाल्या त्या दिनांक १७-०७-९२ रोजी उपस्थित असलेल्या गुत्तेदारासमक्ष उघडण्यात आल्या त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. डी. एस. जग्गी | ५% कमी |
| २. | श्री. पी. एम. चोरडीया | ११.४७% कमी |
| ३. | श्री. गुरुनानक इंडस्ट्रीज | ७.२०% कमी |

वरीलपैकी श्री. पी. एम. चोरडीया यांच्या निविदेचे दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजे अंदाजपत्रकाच्या दरापेक्षा ११.४७% कमी दराची निविदा आहे. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, बायजीपूरा ट्रेचिंग ग्राऊंड येथील मॅकेनिक वर्कशॉपच्या परिसरात डांबरीकरण करण्याच्या कामाकरीता तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ११.४७% कमी दराच्या श्री. पी. एम. चोरडीया याचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २३५/१० :**

मा. अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला आहे की, कटकट गेट जवळील औरंगाबाद टाईम्स गृहनिर्माण संस्थे अंतर्गत खडी रस्ता तयार करण्याच्या कामासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याच्या (९१-९२) च्या डी. एस. आर. दराने अंदाजपत्रक र. रु.

३,०८,०५०/- चे बनविण्यात आले असून, मा. आयुक्त यांनी दिनांक ०५-०४-९२ अन्वये मान्यता दिलेली आहे. सदरील खर्च शासकीय अनूदानातून करण्यात येईल.

सदरील कामासाठी कार्यलयीन निविदा नोटीस म.६/जा.क्र./मनपा/अशअ/३०७/९२ दिनांक १५-०६-९२ अन्वये निविदा मागविल्या असता शेवटच्या तारखेच्या वेळेपर्यंत एकूण सहा निविदा विकल्या गेल्या त्यापैकी पाच निविदा दर भरुन प्राप्त झाल्या त्या दिनांक १७-०७-९२ रोजी उपस्थित असलेल्या गुत्तेदारासमक्ष उघडण्यात आल्या त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. सलीम अहेमद | १% कमी दराने |
| २. | श्री. कैसरखान | ७% जास्त |
| ३. | श्री. कुलवंतसिंग | ४% जास्त |
| ४. | मे. एस. एच. असोसिएटस | ५% जास्त |
| ५. | मे. रे. कंस्ट्रक्शन | १०% जास्त |

वरील पैकी श्री. सलीम अहेमद यांच्या निविदेचे दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजे अंदाजपत्रकाच्या दरापेक्षा १% कमी दराची निविदा आहे. विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, कटकट गेट जवळील औरंगाबाद टाईम्स गृहनिर्माण संस्थे अंतर्गत खडी रस्ते तयार करण्याच्या कामाकरीता तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा १% कमी दराच्या श्री. सलीम अहेमद यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**संवाद :**

**श्री. गिरजाराम हाळनोर :** औरंगाबाद टाईम्स गृहनिर्माण संस्थेने विकास खर्चाची रक्कम केव्हा भरली आहे माझ्या माहिती प्रमाणे सदर गृहनिर्माण संस्थेने गुरुकृपा गृहनिर्माण संस्थेने विकास खर्चाची रक्कम भरल्या नंतरच त्या संस्थेच्या विकास खर्चाची रक्कम भरली असावी. तेव्हा गुरुकृपा गृहनिर्माण संस्थेतील विकास कामे अदयाप का होत नाही आणि प्रस्तावित गृहनिर्माण संस्थेतील विकासाची कामे सभागृहापुढे ठेवण्यात येत आहे. याबद्दल खुलासा व्हावा.

**अतिरिक्त शहर अभियंता :** औरंगाबाद टाईम्स गृहनिर्माण संस्थेने फार वर्षापुर्वी विकास खर्चाची रक्कम भरली आहे. तरी पण पाहणी करुन माहिती देता येईल.

**विषय क्र. २३६ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला आहे की, दादा कॉलनी भागात श्री. जाधव यांच्या घराजवळ खांडकी बसविण्याच्या कामासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याच्या ९१-९२ डी. एस. आर. दराने अंदाजपत्रक र. रु. ६७,९००/- चे बनविण्यात आले असून, मा. आयुक्त यांनी दिनांक ०९-०६-९२ अन्वये मान्यता दिलेली आहे. सदरील खर्च भांडवली खर्च या सदराखाली करण्यात येईल.

सदर कामासाठी कार्यलयीन निविदा नोटीस ३.६/मनपा/अशअ/३०७/९२ दिनांक १५-०६-९२ अन्वये निविदा मागविल्या असता शेवटच्या तारखेच्या वेळेपर्यंत एकूण चौदा निविदा विकल्या गेल्या. त्यापैकी एकूण चार निविदा दर भरुन प्राप्त झाल्या त्या दि. १७-०७-९२

अन्वये उपस्थित असलेल्या गुत्तेदारासमक्ष उघडण्यात आल्या त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. सय्यद सिराजुद्दीन | ४% जास्त |
| २. | श्री. कुलवंतसिंग | ७% जास्त |
| ३. | श्री. मोहमंद रऊफ | ०.१% कमी |
| ४. | श्री. एस. ए. बहाबुद्दीन | २% जास्त |

वरील पैकी अनुक्रमांक (३) चे श्री. मोहमंद रऊफ यांच्या निविदाचे दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजे अंदाजपत्रकाच्या दरापेक्षा ०.१% कमी दराची निविदा आहे. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, दादा कॉलनी भागात श्री. जाधव यांच्या घराजवळ खांडकी बसविण्याच्या कामाकरीता तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.१% कमी दराच्या श्री. मोहमंद रऊफ यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २३७/१२ :**

मा. अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला आहे की, मो. समर्थनगर येथील खुल्या जागेच्या बाजूने रिटेनिंग वॉल बांधण्याच्या कामासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याच्या ९१-९२ च्या डी. एस. आर. दराने अंदाजपत्रक र. रु. ९६०७०/- चे बनविण्यात आले असून, मा. आयुक्त यांनी दि. ०९-०६-९२ अन्वये मान्यता मिळालेली आहे. सदरील खर्च भांडवली रस्ते या सदराखाली करण्यात येईल.

सदरील कामाकरीता कार्यालयीन निविदा नोटीस क्र. ६/मनपा/अशअ/३०७/९२ दिनांक १५-०६-९२ अन्वये निविदा मागविल्या असता शेवटच्या तारखेच्या वेळेपर्यंत एकूण तीन निविदा विकल्या गेल्या व त्यापैकी तिनही निविदा दर भरुन प्राप्त झाल्या त्या दिनांक १७-०७-९२ रोजी उपस्थित असलेल्या गुत्तेदारासमक्ष उघडण्यात आल्या. त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. संदीप कुलकर्णी | ५% जास्त |
| २. | श्री. विलास जैस्वाल | ०.०५% कमी |
| ३. | सोहनी इंजिनिअरिंग ॲन्ड कॉन्ट्रक्टर | ७% जास्त |

वरील पैकी अ (२) चे श्री. विलास जैस्वाल यांच्या निविदाचे दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजे अंदाजपत्रकाच्या दरापेक्षा ०.०५% कमी दराची निविदा आहे. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, समर्थनगर येथील खुल्या जागेच्या बाजूने रिटेनिंग वॉल बांधण्याच्या कामाकरीता तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ०.०५% कमी दराच्या श्री. विलास जैस्वाल यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २३८/१३ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, औरंगाबाद प्रभाग क्र. ५४ येथील शांता नर्सिंग होत ते कांचनवाडीचे पुर्वेकडील टेकडी पर्यंत माती भराव काम व खडी

रस्ता तयार करण्याच्या कामाकरीता सन १९९१-९२ चे सार्वजनिक बांधकाम खात्याचे डी. एस. आर. दराने रक्कम रु. ७,७५,०००.०० चे तयार करण्यात आले असून, सदरचा खर्च सन १९९१-९२ च्या शासकीय अनुदानातून करण्यात येईल.

सदरील कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र. मनपा/अशअ/२०६/९२ दिनांक १४-०५-९२ अन्वये दै. लोकमत व दै. औरंगाबाद टाईम्स या स्थानिक वर्तमानपत्रात प्रसिध्द करुन निविदा पत्रके मागविली असता निविदा विक्रीच्या नियोजीत तारखेपर्यंत एकूण (१५) पंधरा निविदा पत्रके विकल्या गेली असून, त्यापैकी निविदा स्विकारणेच्या नियोजीत तारखेपर्यंत एकूण दहा (१०) निविदा पत्रके दर भरलेली प्राप्त झाली असून, त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. मौला अलीयारखान | १८.०५% कमी दराने |
| २. | मे. एस. एस. कंस्ट्रक्शन | २४.७८६% कमी दराने |
| ३. | श्री. कैसरखान | ०४.७८६% कमी दराने |
| ४. | श्री. के. बी. पाथ्रीकर | २७.६१% कमी दराने |
| ५. | मे. एस. एच. असोसिएटस | २२.२३% कमी दराने |
| ६. | श्री. पी. जे. तमखाने | २५.५१% कमी दराने |
| ७. | श्री. कुलवंतसिंग | १७.७७% कमी दराने |
| ८. | मे. पॉल कंन्स्ट्रक्शन | २६.०५% कमी दराने |
| ९. | श्री. डी. अजितसिंग | १४.००% कमी दराने |
| १०. | मे. विशाल कंन्स्ट्रक्शन | १६.५०% कमी दराने |

तुलनात्मकदृष्टया कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा २७.६१% कमी दराची श्री. के. बी. पाथ्रीकर यांची निविदा असून, प्रस्ताव मंजूरीस्तव विचारार्थ सादर.

**संवाद :**

**श्री. विठ्ठल पेरकर, श्री. गिरजाराम हाळनोर :** प्रस्तावित रस्त्याच्या कामासाठी गुत्तेदाराने दिलेल्या दरात खडी रस्त्याचे काम योग्य प्रकारे होणार नाही ही बाब लक्षात घेता खडी रस्त्याच्या कामाकरीता कोणत्याही गुत्तेदाराने १५% पेक्षा जास्त कमी दराचे दरपत्रक भरुन नये असा ठराव सभागृहाने मंजूर करावा आणि आजच्या विषय पत्रिकेवरील खडी रस्त्याच्या कामासाठीचे दरपत्रक १५% पेक्षा जास्त कमी दराचे आहे. त्या कामाकरीता पून्हा दरपत्रके मागविण्यात यावी.

**मा. सभापती** : प्रस्ताव क्रमांक १३ ते १६ करीता पुन्हा दरपत्रके मागविण्यात यावी.

**ठराव :**

प्रस्तावित कामासाठी पून्हा दरपत्रके मागविण्यात यावी असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. २३९/१४ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मजनुहील ते दिल्ली गेट पर्यंत खडी रस्त्याचे काम करण्यासाठी सन १९९१-९२ च्या सार्वजनिक बांधकाम खात्याचे डी. एस. आर. दराने र. रु. ६,८८,०००/- चे अंदाजपत्रकास दिनांक ०१-०२-९२ रोजी प्रशासकीय मान्यता मिळालेली असून, सदरचा खर्च सन १९९०-९१ च्या शासकीय अनूदानातून करण्यात येईल.

सदर कामाकरीता कार्यालयीन निविदा सुचना क्र. मनपा/अशअ/२०६/९२ दिनांक १४-०५-९२ द्वारे फेर निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या नियोजीत तारखेस एकूण (१०) दहा निविदा दर भरलेली प्राप्त झाली असून, त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | मे. एस. एच. असोसिएटस | १३.३१% कमी दराने |
| २. | मे. पॉल कंन्स्ट्रक्शन | २०.०५% कमी दराने |
| ३. | श्री. पी. एम. चोरडीया | १०.४७% कमी दराने |
| ४. | श्री. कुलवंतसिंग | १७.५०% कमी दराने |
| ५. | श्री. अजितसिंग | ११.००% कमी दराने |
| ६. | श्री. पी. जे. तमखाने | २१.३१% कमी दराने |
| ७. | श्री. एम. अे. सिद्यीकी | २५.००% कमी दराने |
| ८. | श्री. कैसरखान | ०२.००% जास्त दराने |
| ९. | श्री. मौला अलीयारखान | १९.०५% कमी दराने |
| १०. | श्री. के. बी. पाथ्रीकर | २४.००% कमी दराने |

तुलनात्मकदृष्टया कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा २८.५% कमी दराने श्री. वकील कुरेशी यांची निविदा असून प्रस्ताव मंजुरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावित कामासाठी पुन्हा दरपत्रके मागविण्यात यावी असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. २४०/१५ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, विष्णुनगर अंतर्गत रस्त्याचे खडीकरणे करण्याचे कामासाठी १९९१-९२ चे सार्वजनिक बांधकाम खात्याचे डी. एस. आर. दराने रक्कम. रु. ५,२४,४००.०० चे अंदाजपत्रकास दिनांक ०९-०५-९२ रोजी प्रशासकीय मान्यता मिळालेली असून, सदरचा खर्च सन १९९१-९२ च्या शासकीय अनूदानातून करण्यात येईल.

सदरील कामाकरीता कार्यलयीन निविदा सुचना क्र. मनपा/अशअ/२०६/९२ दिनांक १४-०५-९२ अन्वये दैनिक लोकमत व दैनिक औरंगाबाद टाईम्स या स्थानिक वृत्तमानपत्रात प्रसिध्दत करुन फेर निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या नियोजीत तारखेपर्यंत एकूण (१३) तेरा निविदा पत्रके विक्री झाल्या असून, निविदा स्विकारण्याच्या नियोजीत तारखेपर्यंत एकूण (११) अकरा निविदा पत्रके दर भरलेली प्राप्त णाली असून, त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. अब्दुल वकली कुरेशी | २८.५% कमी दराने |
| २. | श्री. पी. जे. तमखाने | १९.९१% कमी दराने |
| ३. | श्री. कैसरखान | ०८.००% कमी दराने |
| ४. | श्री. कुलवंतसिंग | १५.१०% कमी दराने |
| ५. | श्री. मौला अली यारखान | १८.०२% कमी दराने |
| ६. | मे पॉल कंन्स्ट्रक्शन | २५.०५% कमी दराने |
| ७. | श्री. के. बी. पाथ्रीकर | २६.००% कमी दराने |
| ८. | मे. आनंद बिल्डर्स | २४.३% कमी दराने |
| ९. | श्री. हरेश अजित पालेजा | १९.००% कमी दराने |
| १०. | मे. एस. एच. असोसिएटस | ३७.९९% कमी दराने |
| ११. | श्री. पी. एम. चोरडीया | १०.४७% कमी दराने |

तुलनात्मकदृष्टया कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा २८.५% कमी दराने श्री. वकील कुरेशी यांची निविदा असून, प्रस्ताव मंजूरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावित कामासाठी पुन्हा दरपत्रके मागविण्यात यावी असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. २४१/१६ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, गारखेडा स्पिनींग मिल ते सिडको मा. ८० डी. पी. रोडचे खडी रस्त्याचे काम करण्याच्या कामासाठी सन १९९१-९२ चे सार्वजनिक बांधकाम खात्याचे डी. एस. आर. दराने रक्कम रुपये ५,२३,५००/- चे अंदाजपत्रकास दिनांक २२-०४-९२ रोजी प्रशासकीय मान्यता मिळालेली असून, सदरचा खर्च सन १९९१-९२ च्या शासकीय अनूदानातून करण्यात येईल.

सदर कामाकरीता कार्यलयीन निविदा सूचना क्र. मनपा/अशअ/२०६/९२ दिनांक १४-०५-९२ द्वारे स्थानिक वृत्तपत्र दैनिक लोकमत व दै. औरंगाबाद टाईम्स या वृत्तपत्रात निविदा सुचना प्रसिध्द करुन निविदापत्रके मागविली असता निविदा विक्रीच्या नियोजीत तारखेपर्यंत एकूण दहा (१०) निविदा पत्रके विकल्या गेली व निविदा स्विकृतीच्या अतिंम तारखेपर्यंत एकूण (९) नऊ निविदा दर भरलेली प्राप्त झाली असून, त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | मे. एस. एच. असोसिएटस | २७.९९% कमी दराने |
| २. | श्री. पी. एम. चोरडीया | १०.४७% कमी दराने |
| ३. | श्री. कैसरखान | १२.५०% कमी दराने |
| ४. | मे. विशाल कंन्स्ट्रक्शन | १४.५०% कमी दराने |
| ५. | श्री. के. बी. पाथ्रीकर | २६.००% कमी दराने |
| ६. | श्री. मौला अली यारखान | १८.०६% कमी दराने |
| ७. | श्री. कुलवंतसिंग | १७.१०% कमी दराने |
| ८. | मे. पाल कंन्स्ट्रक्शन | २५.०५% कमी दराने |
| ९. | श्री. पी. जे. तमखाने | २१.२१% कमी दराने |

तुलनात्मकदृष्टया कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा २७.९९% कमी दराची मे. एस. एच. असोसिएटस यांची निविदा असून, मंजूरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावित कामासाठी पुन्हा दरपत्रके मागविण्यात यावी असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. २४२/१७ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी अभिप्राय दिला आहे की, शहरातील खडी रस्त्याची दुरुस्ती करण्याच्या कामासाठी मुरुम व खडी पुरवठयाच्या कामाकरीता र. रु. २,९३,२००/- चे अंदाजपत्रकास स्थायी समिती विषय क्र. ४८९/९ दि. १३-०४-९२ अन्वये मंजूरी मिळाली आहे.

सदर कामाकरीता कार्यलयीन निविदा सुचना क्रमांक ६ जा. क्र./मनपा/अशअ/३०७/९२ दि. १५-०६-९२ अन्वये स्थानिक वृत्तमानपत्रात निविदा सुचना प्रसिध्द करुन निविदा पत्रके मागविली असता निविदा पत्रके विक्रीच्या अंतिम तारखेपर्यात एकूण नऊ निविदा पत्रके विक्री झाली व निविदापत्रके स्विकृतीच्या अंतिम तारखेपर्यंत यापैकी

फक्त तिन निविदापत्रके वसूल झाली. वसूल झालेली निविदा पत्रके दिनांक १७-०७-९२ रोजी उघडण्यात आली त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. कुलवंतसिंग | ०.१०% कमी दराने |
| २. | मे. एस. एच. असोसिएटस | ३.५०% जास्त |
| ३. | श्री. सुखबीरसिंग | ७.००% जास्त |

वरील निविदा पैकी श्री. कुलवंतसिंग यांच्या निविदा पत्रकाचे दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.१०% कमी आहेत.

तरी श्री. कुलवंतसिंग यांच्या अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.१०% कमी दराची निविदा स्विकारणे बाबतचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शहरातील खडी रस्त्याची दुरुस्ती करण्याच्या कामासाठी मुरुम व खडी पुरविण्याच्या कामाकरीता तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ०.१०% कमी दराच्या श्री. कुलवंतसिंग यंचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २४३/१८ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मिलींदनगर येथील खुल्या जागेस तार कंपाऊंउ वॉल बांधण्याच्यासाठी स्थायी समितीचा प्रस्ताव क्र. २६/२३ दिनांक ०१-०६-९२ द्वारे अंदाजपत्रक र. रु. १,१५,७००/- ला मंजूरी दिल्या प्रमाणे सदरील कामासाठी स्थानिक वृत्तपत्र दै. लोकविजय, दै. मुफस्सीर, दै. लोकमत टाईम्स व दै. रहेबर मध्ये विस्तृत प्रसिध्दी देवून प्रगट निविदा मागविल्या असता कोऱ्या निविदा विकण्याचे अंतिम तारखेपर्यंत एकूण (११) निविदा विकण्यात आल्या व मोहरबंद निविदा स्विकारण्याचे नियोजीत तारखेस फक्त (३) निविदा प्राप्त झाल्या व प्राप्त झालेल्या निविदा उघडल्या असता ठेकेदारांनी दिलेले दर खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. बी. आर. आनंद | अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ०१% जास्त |
| २. | श्री. कुलवंतसिंग | अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ०६% जास्त |
| ३. | श्री. एल. एम. पडघन | अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ०७% जास्त |
| ४. | श्री. देशमुख एस. ए. | अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ००.०१% कमी |

तुलनात्मकदृष्टया श्री. देशमुख एस. ए. यांची निविदा कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ००.०१% कमी आहे. करीता श्री. देशमुख एस. ए. यांची अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ००.०१% कमी दराची निविदा मंजूरीसाठी विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मिलींदनगर येथील खुल्या जागेस तार कंपाऊंड करण्याच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ०.०१% कमी दराच्या श्री. एस. ए. देशमुख यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २४४/१९ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, गांधीनगरातीन खुल्या गटारावरील आर. सी. सी. स्लॅब टाकण्याचे कामाचे अंदाजपत्रक रु. ९२२८०/- ला मा. आयुक्त

महानगरपालिका यांनी प्रशासकीय मंजूरी दि. २९-०४-९२ ला दिल्यानंतर सदरील कामासाठी कार्यालयाची निविदा सुचना क्र. ४ (९२-९३) द्वारे स्थानिक वृत्तपत्र दै. अजिंठा, दै. आलमगीर टाईम्स, तसेच राज्य स्तरावरील वृत्तपत्र दै. लोकमत व दै. इडियंन एक्सप्रेस मध्ये विस्तृत प्रसिध्दी देवून प्रगट निविदा मागविल्या असता कोऱ्या निविदा विकण्याचे अंतीम तारखेपर्यंत एकूण (६) निविदा विकण्यात आल्या व मोहरबंद निविदा स्विकारण्याचे नियोजीत तारखेस फक्त दोन निविदा प्राप्त झाल्या व प्राप्त झालेल्या निविदा उघडल्या असता ठेकेदारांनी दिलेले दर खालील प्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. अशोक के. साबळे | १३.९९% कमी |
| २. | श्री. शारीफ आसलम | १४.६९% कमी |

तुलनात्मकदृष्टया श्री. शाहीद आसलम यांची निविदा कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा १४.६९% कमी ठेकेदारांनी दिलेले दर कमी आहेत तरी पण कामाचा दर्जा चांगल्या प्रतीचा देण्यात येईल व कामाचा दर्जा कमी प्रतिचा आढळल्यास त्याचे नांव काळया यादीत समाविष्ट करण्यात यावे असे हमीपत्र देखील ठेकेदारांनी दिलेले आहे.

करीता श्री. शाहीद आसलम यांची अंदाजपत्रकाचे दरापेक्षा १४.६९% कमी दराची निविदा ठेकेदारांनी हमीपत्र दिल्यानुसार कामाचा दर्जा कमी प्रतीचा आढळल्यास ठेकेदारांचे नांव काळया यादीत समविष्ट करण्याचे अटीवर मंजूरीसाठी विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, गांधीनगर स्लम भागातील खुल्या गटारावर आर. सी. सी. स्लॅब टाकण्याच्या कामाकरीता कामाचा दर्जा कमी प्रतिचा आढळल्यास गुत्तेदाराचे नांव काळया यांदीत समाविष्ट करण्यात येईल या अटीवर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा १४.६९% कमी दराच्या श्री. शाहीद असलम यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २४५/२० :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, जलनिःसारण विशेष कार्यक्रमा योजने अंतर्गत सन १९९१-९२ साठी धन आईस फॅक्टरी ते सिध्दार्थ गार्डन पर्यंत मुख्य जलनिःसारण वाहीनी सी सिवर टाकण्याच्या कामासाठी शासनाची प्रशासकीय मान्यता शासन निर्णय क्र. एमसी/१८९२/७५७/सी आस-४१/९/नवि४ दिनांक २३-०३-९२ नुसार मिळालेली आहे.

वरील योजने अंतर्गत मा. आयुक्त यांचे दिनांक १४-०५-९२ च्या मान्यतेनुसार वरद गणे मंदिर ते सिध्दार्थ गार्डन पर्यंत १.०० मी. मी. व्यासाची आर. सी. सी. एन पी २ क्लास बी मुख्य जलनिःसारण वाहिनी सी-३ टाकण्याच्या रुपये २२,७७,८२९.०० च्या कामासाठी निविदा सुचना ९२-९३ (दूसरी वेळी) ही दै. अजिंठा, दै. आलमगीर टाईम्स, दै. लोकमत, दै. इंडियंन एक्सप्रेस मध्ये प्रसिध्दीस देवून जाहिर निविदा मागविण्यात आल्या असता निविदा विक्री झाल्या व निविदा स्विकृतीच्या नियोजीत तारीख दि. २४-०७-९२ रोजी ५ मोहरबंद निविदा प्राप्त झाल्या असल्याचे दिनांक २७-०७-९२ रोजी निविदा पेटी उघडली असता दिसून आले. प्राप्त निविदा उघडण्यात आल्या असता ठेकेदारांनी दिलेले दर खालील प्रमाणे होते.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. बी. एल. जाहिर (पाटील | १२.६५% जास्त |
| २. | श्री. आर. एल. बारवाल | २०% जास्त |
| ३. | एम. एस. एस. आय. डी. सी. | ११.९८% कमी फक्त कॉलर व पाईप पुरवठयासाठी (रु. १४७५.२६ प्रति मिटर) |

४. गॉडविन कंन्स्ट्रक्शन २०% जास्त
५. योग सिमेंट प्रॉडक्टस १७.३०% जास्त

तुलनात्मकदृष्टया श्री. बी. एल. जाहिर (पाटील) यांची निविदा सर्वात कमी दराची म्हणजेच अंदाजपत्रकापेक्षा १२.६५% जास्त दराची होती कारण एम. एल. एस. आय. डी. सी. यांनी संपूर्ण कामा ऐवजी फक्त पाईप पुरवठया साठीच दर दिलेले होते.

मात्र बी. एल. जाहिर (पाटील) यांनी दिलेले दर सुध्दा जास्त असल्याने मा. आयुक्त यांचे दि. ०९-०८-९२ च्या आदेशाप्रमाणे कार्यालयाचे पत्र क्र. मनपा/विका/काअ/६५८/९२ दि. १४-०८-९२ नुसार त्यांना दि. १७-०८-९२ रोजी दर वाटाघाटीस उपस्थित राहण्यासाठी कळविण्यात आले.

त्यानुसार दि. १७-०८-९२ रोजी ठेकेदार श्री. बी. एल. जाहिर (पाटील) हे मा. आयुक्त यांच्या दालानात उपस्थित झाले. त्या वाटाघाटीच्या वेळी मा. आयुक्त मा. मुख्यलेखा परीक्षक सुध्दा उपस्थित होते. वाटाघाटी नंतर श्री. बी. एल. जाहिरत (पाटील) यांनी पुर्वीच्या १२.६% जास्त दराऐवजी १२% अधिक या दराने काम करण्यास तयार असल्याबद्दल दि. १७-०८-९२ रोजी लेखी पत्र दिले आहे.

त्यानुसार वरद गणेश मंदिर ते सिध्दार्थ गार्डन पर्यंत १२०० मी. मी. व्यासाची मुख्य जलनिःसारण वाहिनी सी ३ टाकण्याच्या कामासाठी श्री. बी. एल. जाहीर (पाटील) यांनी त्यांच्या दि. १७-०८-९२ च्या पत्रात मान्य केल्याप्रमाणे अंदाजपत्रकापेक्षा १२% अधिक दराची निविदा स्विकारण्याचा प्रस्ताव विचारार्थ व मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सन १९९१-९२ च्या जलनिःसारण विशेष कार्यक्रमा योजने अंतर्गत धन आईस फॅक्टरी ते सिध्दार्थ गार्डन पर्यंत सी. सी. वर मुख्य जलनिःसारण वाहीनी टाकण्याच्या कामापैकी वरद गणेश मंदिर ते सिध्दार्थ गार्डन पर्यंत १२०० मी. मी. व्यासाची सी.३/आर. सी. सी. एन पी-२ क्लासची मुख्य जलवाहिनी टाकण्याच्या कामाकरीता गुत्तेदार श्री. बी. एल. जाहिर (पाटील) यांचेकडील दि. १७-०८-९२ च्या लेखी पत्रकानुसार उक्त काम संबंधित गुत्तेदार श्री. बी. एल. जाहिर (पाटील) यांचे कडुन अंदाजपत्रकाचे दरापेक्षा १२% जास्त दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २४६/२१ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, बौध्दवाडा पैठणगेट येथे १०० मी. मी. व्यासाची सी. आय. जलवाहिनी टाकावयाची आहे या कामाचे अंदाजपत्रक परिसर अभियांत्रिकी विभागाची सन १९९०-९१ च्या दरसुचीनुसार र. रु. ८८,२५०/- एवढयाचे तयार करण्यात आले असून, त्यास प्रशासकीय मान्यता घेण्यात आलेली आहे. सदर कामाचा खर्च हा सन १९९२-९३ च्या भांडवली खर्चातून करण्यात येणार आहे.

सदरील कामासाठी या कार्यालयाची निविदा सुचना क्र. ६७७/९२ दिनांक २०-०३-९२ अन्वये बी-१ निविदा मागविण्यात आल्या सदरील निविदा सुचना ही दैनिक अजिंठा, आलमगीर टाईम्स, देवगीरी तरुण भारत, रहेबर या वर्तमानपत्रात प्रसिध्दीस देण्यात आली होती कोऱ्या निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एक निविदा विक्री झाली व सिलबंद निविदा स्विकारण्याच्या नियोजीत तारखेस एक निविदा प्राप्त झाली ती खालील प्रमाणेची आहे.

१. श्री. पी. एच. पंजनानी २०.७७% जास्त

ठेकेदार श्री. पी. एच. पंजनानी यंनी दिलेला दर हा जास्त असल्या कारणाने या कार्यालयाचे पत्र क्र. १०६५/९२ दि. ०३-०६-९२ अन्वये ठेकेदारास दराबाबत वाटाघाटी करण्यास मा. आयुक्त यांच्या दालनात दि. ०९-०६-९२ रोजी बोलाविण्यात आले असता ठेकेदार श्री.पी. एच. पंजनानी यांनी सदर कामाच्या दराबाबत वाटाघाटी अंती १९.७७% जास्त या दरानुसार काम करण्यास समंती दिली. त्यास मा. आयुक्त यांनी मान्यता दिली आहे.

तरी ठेकेदार श्री. पी. एच. पंजनानी यांच्याशी झालेल्या वाटाघाटी अंतीचा दर १९.७७% कमी जास्तची निविदा स्विकारण्याचा प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, बौध्द विहार पैठणगेट येथे १०० मी. मी. व्यासाची सी. आय. जलवाहिनी टाकण्याच्या कामाकरीता गुत्तेदार श्री. पी. एच. पंजनानी यांचेशी दि. ०९-०६-९२ रोजी झालेल्या वाटाघाटी नुसार उक्त काम संबंधित गुत्तेदारा कडून अंदाजपत्रकाचे दरापेक्षा १९.७७% जास्त दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २४७/२२ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, वार्ड क्र. ३८ मोंढा रोड येथे गटारेवर एक एफ आर. सी. ढापे टाकणे बाबत अंदाजपत्रक र. रु. ३,०७,०००.०० च्या स्थायी समितीचा ठराव क्र. ५२७/८ दि. २९-०४-९२ नुसार मंजूरी मिळालेली आहे.

आदेशानुसार सदर कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र. ८/९९४/९२ दि. २०-०६-९२ ला दैनिक अंजिठा, आलमगीर टाईम्स या दैनिकात जाहिरात देवून बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता एकूण नाव निविदा विकण्यात आलेल्या होत्या त्यापैकी केवळ तीन निविदा प्राप्त झालेल्या असून, त्यांचा तुलनात्मक दर खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. एस. पी. सरोदे | अंदाजपत्रकीय दराने |
| २. | श्री. कैसरखान | ५% कमी |
| ३. | श्री. बी. आर. आनंद | ५% जास्त |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५% कमी दराचे श्री. कैसरखान यांचे दरपत्रक आहे. करीता प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र. ३८ मोंढा रोड येथे गटारीवर एस. एफ. आर. सी. ढापे टाकण्याच्या कामाकरीता तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ५% कमी दराच्या श्री. कैसरखान यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २४८/२३ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, वार्ड क्र. १९ बुढीलाईन येथे २५० मी. मी. व्यासाची आर. सी. सी. ड्रेनेज लाईन टाकणे बाबत अंदाजपत्रक र. रु. ९७,२००.०० चे सन १९९१-९२ च्या दरसुची प्रमाणे तयार करण्यात आलेले असून, सदरचा

खर्च सन १९९२-९३ च्या भांउवली तरतूदीतून करण्यात येईल. तसे. मा. आयुक्त यांनी सदर अंदाजपत्रकास मंजूरी दिलेली आहे.

आदेशानुसार सदर कामासाठी कार्यलयीन निविदा सुचना क्र. ८/८९४/९२ दि. २०-०६-९२ ला दैनिक अजिंठा, आलमगीर टाईम्स, देवगीरी तरुण भारत, औरंगाबाद टाईम्स या दैनिकात जाहिरात देवून बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता एकूण दहा निविदा विकण्यात आलेल्या होत्या त्यापैकी केवळ तीन निविदा प्राप्त झालेल्या असून, त्यांचा तुलनात्मक दर खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. सय्यद सिराजउद्दीन | अंदाजपत्रकीय दराने |
| २. | श्री. सय्यद रफिकउद्दीन | ५% जास्त |
| ३. | श्री. एस. ए. बहोद्दीन | ७% जास्त |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजे अंदाजपत्रकीय दराचे श्री. सय्यद सिराजउद्दीन यांचे दरपत्रक आहे.

करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र. १९ बुढीलाईन येथे २५० मी. मी. व्यासाची आर. सी. सी. ड्रेनेज लाईन टाकण्याच्या कामाकरीता तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दराच्या श्री. सय्यद सिराजउद्दीन यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २४९/२४ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, वार्ड क्र. ६ दिल्ली गेट सुभेदारी गेस्ट हाऊस येथे ३०० मी. मी. व्यासाची आर. सी. सी. ड्रेनेज लाईन टाकणे बाबत अंदाजपत्रक र. रु. १,११,८००/- ला स्थायी समितीचा ठराव क्र. १७/१४ दि. ०१-०६-९२ नुसार मंजुरी मिळालेली आहे.

आदेशानुसार सदर कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र. ८/८९४/९२ दि. २०-०७-९२ ला दैनिक अंजिठा, आलमगीर टाईम्स, देवगीरी तरुण भारत, औरंगाबाद टाईम्स या दैनिका जाहिरात देवून बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता एकूण पंधरा निविदा विकण्यात आलेल्या होत्या त्यापैकी केवळ तीन निविदा प्राप्त झालेल्या असून, त्यांचा तुलनात्मक दर खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. एम. एम. बाहोद्दीन | ५% जास्त |
| २. | श्री. सय्यद सिराजउद्दीन | १०% जास्त |
| ३. | श्री. सलीम अहेमद | अंदाजपत्रकीय दराने |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजे अंदाजपत्रकीय दराचे श्री. सलीम अहेमद याचे दरपत्रक आहे. करीता प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र. ६ दिल्लीगेट सुभेदारी गेस्ट हाऊस येथे ३०० मी. मी. व्यासाची आर. सी. सी. ड्रेनेज लाईन टाकण्याच्या कामाकरीता तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजे अंदाजपत्रकीय दराच्या श्री. सलीम अहमद यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २५०/२५ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, वार्ड क्र. १३ मो. रशिदपूरा येथे १५० मी. मी. व्यासाची आर. सी. सी. ड्रेनेज लाईन टाकणे बाबत अंदाजपत्रक रक्कम रुपये १,९०,६५० ला स्थायी समितीचा ठराव क्र. ५५/२४ दिनांक ०६-०९-१९९२ नुसार मंजुरी मिळालेली आहे.

आदेशानुसार सदर कामासाठी कार्यलयीन निविदा सुचना क्र. ८/८९४/९२ दिनांक २०-०६-९२ ला देवगीरी तरुण भारत, आलमगीर टाईम्स, अंजिठा व औरंगाबाद टाईम्स या दैनिकात जाहिरात देवून बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता एकूण बारा निविदा विकण्यात आलेल्या होत्या त्यापैकी केवळ चार निविदा प्राप्त झालेल्या असून, त्यांचा तुलनात्मक दर खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. एस. ए. हक्क | ५% जास्त |
| २. | श्री. एस. ए. देशमुख | ०.०१% कमी |
| ३. | श्री. एस. ए. बाहोद्दीन | ५% जास्त |
| ४. | श्री. सय्यद सिराजउद्दीन | ६% जास्त |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०१% कमी दराची श्री. एस. ए. देशमुख यांचे दरपत्रक आहे. करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र. १३ मो. रशिदपूरा येथे १५० मी. मी. व्यासाची आर. सी. सी. ड्रेनेज लाईन टाकण्याच्या कामाकरीता तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०१% कमी दराच्या श्री. एस. ए. देशमुख यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २५१/२६ :**

कार्यकारी अभियंता पा. पु. व जलनि:सारण यांना प्रस्ताव सादर केला आहे की, मे. प्रभारी अधिकारी प्रादेशिक आरोग्य प्रयोग झाला औरंगाबाद यांचे पत्रक क्र. प्र अ. प्र. शा/पाणी/४४/६६/९२ दि. १८-०७-९२ च्या पत्रका अन्वये शासन निर्णय क्र. १०८९/सी. आर./४३३/पी.एच-८/सार्वजनिक आरोग्य विभाग मंत्रालय मुंबई दि. २८-११-९० च्या शासन निर्णया अन्वये अनुजिस पाणी नमुने तपासणी दरामध्ये डिसेंबर १९९० पासून वाए केलेली आहे. पुर्वीच्या पाणी नमुने तपासणी दर ५००० लिटरला रुपये २.०० असा होता.

वाढीव दर ५००० लिटरला रुपये ५.०० प्रमाणे आलेला आहे.

तर वाढीव दर ५००० लिटरला रुपये ५.०० प्रमाणे मंजूरी मिळणेस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मे. प्रभारी अधिकारी प्रादेशिक आरोग्य प्रयोग शाळा औरंगाबाद यांचेकडील पत्रक जा. क्र. प्रअ प्रशा/पाणी/४४६६/९२ दिनांक १८-०७-९२ अन्वये शासन निणर्य क्रमांक १०८९/सीआर/४३३/पीएच-८/सार्वजनिक आरोग्य विभाग मंत्रालय मुंबई यांचे दिनांक २९-११-९० च्या शासन निर्णयानुसार माहे डिसेबंर १९९० पासून प्रति ५००० लिटरला रुपये ५/- या प्रमाणे पाणी नमुने तपासणी दरात वाढ झालेल्या वाढीव दरास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २५२/२७ :**

पाणी पुरवठा विभाग-२ मधील सिडको येथील एन-७, एन-९, के एन-९, एल च्या विहिरी व नारेगांव, ब्रिजवाडी व हर्सूल येथील पाणी पुरवठा विहीरी व बोअरवेल द्वारे करण्यात येतो. सदरील पाणी शूध्द करुन जनतेस देता यावे या दृष्टीने सदर विहिरीवर व

बोअरवेल पंपावर स्टोरफील वॉअर स्टेबीलायझर बसून नागरिकांचे कावीळ, गॅस्ट्रो इत्यादी साथीच्या रोगापासून बचाव करण्याच्या दृष्टीने स्टोरफील वाटर स्टेबीलायझर बसविणे योग्य वाटते. ही यंत्रे अल्ट्राक्युप कंपनी मोठया आकाराची तयार करते व सदर कंपनीचे यंत्रे महाराष्ट्राच्या जिल्हा परीषद व परीसर अभियांत्रिकी यांनाही बसविलेले आहे.

तरी मनपा औरंगाबाद येथे वरील दर्शविलेल्या ठिकाणी हे यंत्र बसविण्याचे अंदाजपत्रक र. रु. २,७८,२००/- चे तयार केले आहे तरी अंदाजपत्रकास मंजूरी देवून सदरील कंपनीकडून ही यंत्रके खरेदी करुन बसवून घेण्याची परवानगी देणे मान्य.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, एन-७, एन-९, के एन-९, सिडको आणि नारेगांव, ब्रिजवाडी व हर्सुल येथील नागरिकांना विहिरी व बोअरवेल द्वारे पाणी पुरवठा करण्यात येत असल्यामुळे उक्त भागातील नागरिकांना कावीळ, गॅस्ट्रो इत्यादी साथीच्या रोगापासून बचाव करण्याकरीता वरील भागा करीता पाणी पूरवठा करणाऱ्या विहरी व बोअरवेल अल्ट्रटयुप कंपनीचे स्टोअर फिल वॉटर स्टेबीलायझर बसवून शूध्द पाण्याचा पूरवठा करण्याकरीता तयार करण्यात आलेल्या र. रुपये २,७८,२००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २५३/२८ :**

मा. शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, सिल्लेखाना येथे शाळा बांधण्याच्या कामासाठी स्थायी समिती बैठक दिनांक २२-०७-९१ ठराव क्र. ६२/१२ अन्वये र.रुपये ९८,५००/- ला १ सदर काम करणारी एजन्सी श्री. अब्दुल कलीम यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा १% जास्त दराचे निविदेस मान्यता मिळालेली आहे. परंतू मुळ अंदाजपत्रकास तरतूदी अभावी बरेचशी कामे हाती घेता आली नाही उदा. खिडक्यांची पटे, रंगकाम आतून बाहेरुन प्लास्टर इ. कामासाठी अधिक रक्कम. रुपये ३४,१००/- चे वाढीव अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून, त्यास मा. आयुक्तांनी मंजूरी दिलेली आहे.

सबब सदर कामासाठी सुधारीत अंदाजपत्रक र.रु. ९८,५०० + ३४,१०० = १,३२,६०० = ०० चे अंदाजपत्रकास

**संवाद :**

**श्री. नारायण फत्तेलष्कर :** पडेगांव कत्तलखानासाठी अंदाजपत्रकामधे किती रक्कमेची तरतूद करण्यात आली आहे आणि आतापर्यंत त्यातून किती खर्च झाला याचा खुलासा व्हावा.

**मुख्यलेखापरीक्षक :** पडेगांव कत्तलखान्यासाठी अंदाजपत्रकामध्ये दहा लाख रुपयाची तरतूद करण्यात आली आहे.

**श्री. जावेद हसनखान :** रात्रीच्या वेळी वाहनावरुन जातांना शहरातील मोकाट कुत्रे वाहनांच्या मागे धावतात. त्यांना नागरिकांना त्रास होतो. रात्रीची वेळ असल्यामुळे ही कुंत्रे कुणाच्या मालकीची आहेत हे समजू शकत नाही. तेव्हा अशावेळी पशुधन अधिकाऱ्यांनी कुत्रे पकडण्यात मोहीम हाती घ्यावी.

**उप अभियंता इमारती :** पडेगांव कत्तलखान्यावर आतापर्यंत काहीही खर्च झालेला नाही.

**श्री. नारायण फत्तेलष्कर, श्री. गिरजाराम हाळनोर :** अंदाजपत्रकातील दहा लाखाच्या तरतूदीतून कत्तलखान्यासाठी किती प्रकारची व कोणकोणती कामे करण्यात येणार आहेत? यासाठी प्रशासनाने आवश्यक तो आराखडा तयार केला आहे

काय? याचा खुलासा व्हावा. तसेच पडेगाव कत्तलखाना येथे चामडयासाठी गोडावूनची आवश्यकता आहे. तेव्हा पडेगांव कत्तलखाना येथे लाईट व इतर सर्व बांबीची व्यवस्था करुन शक्य तितक्या लवकर सिल्लेखाना येथील कत्तलखाना करुन शक्य तितक्या लवकर सिल्लेखाना येथील कत्तलखाना पडेगांव येथे जाईल, अशी प्रशासनाने व्यवस्था करावी.

**श्री. नारायण फत्तेलष्कर :** सिल्लेखाना येथील दुर्गंधीची साफ सफाई कोणत्या विभागातर्फे केली जाते. येत्या दोन दिवसात गणपती उत्सवास सुरुवात होत आहे. त्यादृष्टीने सिल्लेखाना येथे सतत दुर्गंधी येते असून घाण पाणी उघडयावर वाहत आहे. त्यामुळे नागरिकांना त्रास होतो तेव्हा सिल्लेखाना येथील उघडयावरुन वाहणाऱ्या घाण पाण्याची व्यवस्था आणि दुर्गंधी नष्ट करण्याच्या दृष्टीने औषध फवारणीची व्यवस्था करण्यात यावी.

**पशुधन विकास अधिकारी :** सिल्लेखाना येथील घाण पाणी व दुर्गंधीयुक्त वास याबाबतची साफसफाई आणि औषध फवारणीची व्यवस्था विभागीय कार्यालयामार्फत केली जाते.

**मा. उप आयुक्त :** येत्या दोन दिवसात सुरु होणाऱ्या गणेशोत्सवाच्या निमित्ताने सर्व विभागीय अधिकारी आणि संबंधित अधिकारी यांची बैठक घेवून शहरातील मोकाट जनावरे/पथ दिवे साफसफाई इ. बाबतची योग्य ती व्यवस्था करण्याबाबत संबंधित अधिकाऱ्यांनी सुचना दिल्या आहेत. तसेच या कामासाठी लागणारे जादा कामगार लावण्याची परवानगी संबंधित अधिकाऱ्यांनी दिली आहेत.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सिल्लेखाना येथे शाळा बांधण्याच्या मुळ कामामध्ये खिडक्याची पटे, रंगकाम आतून बाहेरुन प्लास्टर इत्यादी कामाचा समावेश नसल्यामुळे उक्त कामासाठी तयार करण्यात आलेल्या (मुळ अंदाजपत्रक रुपये ५८,५००/- वाढीव अंदाजपत्रक रुपये ३४१००/- रक्कम रुपये १,३२,६००/- च्या सुधारीत अंदाजपत्रकास आणि उक्त काम श्री. अब्दुल कलिम यांचेकडून अंदाजपत्रकाचे दरापेक्षा १% जास्त दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २५४/२९ :**

आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी प्रस्तावित केले आहे की, मनपा आरोग्य विभागासाठी औषधी व साहित्य खरेदी करण्यासाठी (सन ९२-९३) जाहिर प्रगटन लोकमत, लोकसत्ता व औरंगाबाद टाईम्स या वृत्तपत्रातून दिनांक १८-०७-९२ रोजी निविदा मागविण्यात आल्या त्यानुसार खालील औषधी विक्रेत्यांना निविदा घेतलेल्या आहेत व दरपत्रक अनामत रक्कम सह भरली आहेत.

१) क्राऊन मेडीकल २) किंकरे ब्रदर्स ३) सर्जीको मेडीकल इंटरप्रायजेस वरील विक्रेत्यांची निविदा ३१-०७-९२ रोजी उघडण्यात आल्या ४) त्यानुसार खालील दोन औषधी विक्रेत्यांची औषध व साहित्य त्यांच्या नांवासमोर अनुक्रमांक अनुसार कमी दर आहेत.

१) काऊन मेडीकल अ. क्र. ४६, १३६ एकूण दोन आयटम
२) मे. किंकरे ब्रदर्स अ. क्र. १ ते ४२, ४४, ४५, ४७ ते १२९, १३२, ते १३५, १३८ ते १४४ ते २०७ एकूण २०० आयटम
३) अ. क्र. ४३, १३०, १३६,१३१ व १४३ अ. क्र. दर प्राप्त झाले नाही.

तुलनात्मकदृष्टया मे. क्राऊन मेडीकल यांचे एकूण दोन मे. किंकरे ब्रदर्स यांचे एकूण २०० ॲटम कमी दराचे ॲटमवरील दर्शविलेल्या क्रमांकाचे मंजूर करुन त्यांचे बरोबर करार करण्यासाठी व सर्वसाधारण सभेने मंजूर केलेली अंदाजपत्रकातील रक्कम पर्यंत खर्चास मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सन १८९२-९३ या वर्षात आरोग्य विभागासाठी लागणारे औषध व साहित्य खरेदी करीता खालील दर्शविलेल्या औषध विक्रेत्याचे त्यांच्या नावासमोरील ॲटम करीता कमी दराचे दरपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

१) क्राऊट मेडीकल अ. क्र. ४६, १३७ एकूण दोन (२) ॲटम २) मे. किंकरे ब्रदर्स अ. क्र. १ ते ४२, ४४, ४५, ४७ ते १२९, १३२, ते १३५, १३८ ते १४४ ते २०७ एकूण २०० आयटम. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २५५/३० :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, हर्सूल येथील जलशुध्दीकरण केंद्राचे नुतनीकरण करावयाचे आहे. त्यासाठी र. रु. ५,०४,०००/- चे अंदाजपत्रक हे परीसर अभियांत्रिकी विभागाची दरसुची सन ९०-९१ नुसार तयार करण्यात आले आहे. हयास प्रशासकीय मान्यता घेण्यात आलेली आहे. सदरील कामाचा खर्च हा विशेष शासकीय अनूदान सन १९९०-९१ मधून करण्यात येणार आहे.

सदर कामाची या कार्यालयाची निविदा सुचना क्र. १७/९२-९३ जी की, दैनिक लोकमत टाईम्स, सिटीजन्स, रहेबर या वर्तमान पत्रात प्रसिध्दीस देण्यात येऊन बी-१ निविदा मागविण्यात आल्या असता एकूण चार कोऱ्या निविदा विक्री झाल्या. पैकी मे. एस. एन. धारपूरे यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा १.८% जास्त दराची केवळ एकच निविदा दर भरुन प्राप्त झाली. प्रस्ताव मंजूरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, हर्सूल येथील जलशुध्दीकरण केंद्राचे नुतनीकरण करण्याच्या कामाकरीता अंदाजपत्रकाचे दरापेक्षा १.८% कमी जास्त दराच्या मे. एस. एम. घारपूरे यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २५६/३१ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, स्वप्ननगरी गारखेडा खडी रस्त्याचे काम करण्यासाठी सन ९१-९२ चे सा. बा. खात्याचे डी. एस. आर. दराने रक्कम रुपये २,२४,२००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून, त्यास दिनांक ११-०४-९२ रोजी प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे. सदरचा खर्च सन ९१-९२ च्या शासकीय अनूदानातून करण्यात येईल.

सदरील कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र. मनपा/अशअ/३०७/९२ दिनांक १५-०६-९२ चे निविदा सुचनेद्वारे दै. औरंगाबाद टाईम्स, या वर्तमानपत्राद्वारे प्रगट निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या दिवशी एकूण बारा कोऱ्या निविदा विक्री झाल्या. पैकी तीन दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या त्या खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. सुखबीरसिंग | ०.०१% कमी दराने |
| २. | मे. एस. एच. असोसिएटस | ५% जास्त दराने |
| ३. | श्री. कुलवंतसिंग | ५% जास्त दराने |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०१% कमी दराची श्री. सुखबीर सिंग यांची निविदा आहे. प्रस्ताव मंजूरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, गारखेडा स्वप्ननगरी अंतर्गत खडी रस्ते तयार करण्याच्या कामाकरीता तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ०.०१% कमी दराच्या श्री. सुखबीरसिंग याचे दरपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २५७/३२ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, पद्मपुरा येथे खांडकी पेव्हींग चे काम करण्याच्या कामासाठी सन ९१-९२ च्या सां. बा. खात्याचे डी. एस. आर. दराने र. रु. ३,१९,२०५/- चे तयार करण्यात आले असून, त्यास दिनांक ०६-०४-९२ रोजी प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे. सदरचा खर्च सन १९९१-९२ च्या शासकीय अनूदानातून करण्यात येईल.

सदरील कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र. मनपा/अशअ/३०७/९२ दि. १५-०६-९२ चे निविदा सुचनेद्वारे दैनिक औरंगाबाद टाईम्स या स्थानिक वर्तमानपत्रात प्रसिध्द करुन प्रगट निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या नियोजीत दि. ०२-०७-९२ पर्यंत एकूण सात निविदा विक्री झाल्या असून, निविदा स्विकारण्याच्या दि. १३-०७-९२ ला एकूण तीन दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या. त्या खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. सुखबीरसिंग | ०.०१% कमी दराने |
| २. | मे. आनंद बिल्डर्स | ७% जास्त दराने |
| ३. | श्री. कुलवंतसिंग | ९% जास्त दराने |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.०१% कमी दराची श्री. सुखबीर सिंग यांची निविदा आहे. प्रस्ताव मंजूरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, पद्मपुरा येथे खांडकी पेव्हींगचे काम करण्याकरीता तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराची श्री. सुखबीरसिंग यांची निविदा आहे. प्रस्ताव मंजूरीस्तव विचारार्थ सादर.

## *ऐनवेळचे विषय*

**विषय क्र. २५८/३३ :**

दिनांक १२-०८-९२ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती मध्ये सिडको पाणी पुरवठाच्या वसूलीची देयके संगणकाद्वारे तयार करण्याच्या अंदाजपत्रक रु. १,३५,०००/- ला मंजूरी मिळालेली होती. त्यानुसार दिनांक १३-०८-९२ रोजी निविदा सुचना दैनिक वर्तमानपत्रात प्रसिध्दीसाठी दै. नवा मराठा डॉन (उर्दु) मध्ये देण्यात आली होती त्याला प्रतिसाद म्हणून एकूण तीन दरपत्रिका प्राप्त झालेल्या आहेत. त्याचा तपशील खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १. | राजा सेल्स कार्पोरेशन औबाद | रुपये २.८५ प्रति देयक |
| २. | युनिक सिस्टीम्स श्रीरामनगर औबाद | रुपये २.०८ प्रति देयक |
| ३. | काम्प्युटर क्राप्ट दशमेशनगर औबाद | रुपये २.५० प्रति देयक |

वरील तीन निविदा पैकी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराची निविदा युनिक सिस्टीम्स, श्रीरामनगर औरंगाबाद यांची म्हणजे रुपये २.०८ प्रति देयक (कागदासह) असा आहे तरी सदरील निविदा मंजूर करण्यास विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सिडको भागातील पाणी पुरवठयाच्या वसुलीची देयके संगणकाद्वारे तयार करण्याच्या कामाकरीता प्रती देयक रुपये २.०८ पैसे या तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराच्या मेसर्स युनिक सिस्टीजन्स श्रीरामनगर औ. बाद यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजूरीस्तव देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २५९/३४ :**

कासारीबाजार, फिलीप्स सर्व्हिस सेंटर जवळ छोटया बोळीमध्ये ३ मी. मी. व्यासाची अर्धगोलाकार गटारीसह दगडी गटार बांधणे व त्यावर फरशी टाकून ती झाकणेचे अंदाजपत्रक र. रु. ६८,७५०/- चे परीसर अभियांत्रिकी खाते डी. एस. आर. ९०-९१ चा आधार घेऊन तयार केले आहे.

या ठिकाणी समक्ष पाहणी केली असता असे आढळून आले की, येथील छोटया गल्लीतील ड्रेनेज लाईन पूर्णपणे विस्कळीत झालेली असून, मैला व सांडपाणी उघडयावर वाहन आहे. त्यामुळे नागरिकांच्या आरोग्यास धोका आहे.

त्यामुळे मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७ (३) सी. च्या अंतर्गत मला प्राप्त असलेल्या अधिकारात मी खालील प्रमाणे आदेश देत आहे. कासारी बाजार येथे ३५० मी. मी. व्यासाची आर. सी. सी. पुर्वरचित अर्ध वर्तूळकार दगडी गटार बांधणे व त्यावर झाकण टाकण्याच्या कामाचे अंदाजपत्रक र. रु. ६८,७५०/- ला प्रशासकीय मान्यता देण्यात येते व उपलब्ध कंत्राटदार श्री. आर. बी. चव्हाण यांना अंदाजपत्रकीय दराने काम सुरु करणेस्तव परवानगी देण्यात येते.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ६७ (३) (सी) अन्वये कासारी बाजार येथे ३५० मी. मी. व्यासाची आर. सी. सी. पुर्वरचित अर्धगोलाकार दगडी गटार बांधणे व त्यावर झाकण टाकणेच्या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रक्कम रुपये ६८,७५०/- च्या अंदाजपत्रकास आणि उक्त काम गुत्तेदार री. आर. बी. चव्हाण यांचे मार्फत अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्यात आलेल्या कामास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

**विषय क्र. २६०/३५ :**

सहाय्यक आयुक्त-२ यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, सन ९२-९३ सालात लिखाण साहित्य खरेदी करण्याकरीता फेरनिविदा मागविण्यात आले असता एकूण चार निविदा दरपत्रके प्राप्त झाली व प्राप्त निविदा दर पत्रके व नमुने खरेदी समिती महानगरपालिका यांचेकडे पाठविण्यात आले होते. अध्यक्ष खरेदी समिती ने ॲटम क्र. २४, ५६, ५७, ५८, ५९, ८७, १०३, ११०, १११, ११३, ११४, १४०, १४२ व १४८ वगळून बाकीचे लिखान साहित्य खालील प्रमाणे दर्शविण्यात आलेल्या पूरवठा धारकाकडून खरेदी करण्याबाबत खरेदी समितीने शिफारस केलेली आहे व त्यास मा. आयुक्तांनी मान्यता दिलेली आहे.

१) मे. विजय जनरल स्टोअर्स ॲटम क्र. ४, ८, १२, १४, १७, २१, २९, ३२, ३७, ४०, ४५, ४९, ५३, ६१, ६४, ६८, ७३, ७५, ७७, ८०, ८५, ८८, ८९, ९२, ९३, ९४, ९६, १०१, १०९, ११२, ११५, ११७, १२०, १२४, १२५, १२६, १२८, १३०, १३१, १३६, १३९, १४१, १४४, १४६, १४९, १५२, १५५, १५७, १६०, १६३, १६४

२) २) मे. न्यु भारत स्टोअर्स - ॲटम क्र. १, ९, १८, २६, ३४, ३५, ४२, ५०, ६६, ८२, ८३, ९०, ९८, १००, १०७, १००, १२२, १२३, १३८, १४७, १५४, १५८, १५९, १६१, १६२.

३) मे. न्यु. जे. के. इंटरप्रायझेस : ॲटम क्र. २, ५, ६, १०, १३, १६, १९, २२, २५, २७, ३०, ३३, ३८, ४१, ४६, ४८, ५१, ५४, ६२, ६५, ७०, ७२, ७४, ७८, ८१, ८६, ८९, ९४, ९७, ९९, १०२, १०५, १०६, ११८, १२१, १२६,१२९, १३३, १३४, १३७, १३९, १४५, १५०, १५३, १५६

४) मे. मुरली स्टोअर्स : ॲटम क्र. ३, ७, ११, १५, २०, २३, २८, ३१, ३६, ३९, ४३, ४४, ४७, ५२, ५५, ६०, ६३, ६७, ६९, ७१, ७६, ७९, ८४, ९१, ९२, ९५, १०८, ११६, ११९, १२७, १३२, १३५, १४३, १५१.

वरील प्रमाणे दर्शविण्यात आलेले ॲटमचे दर तुलनात्मकदृष्टया कमी आहेत.

तरी वरील प्रमाणे ॲटम क्रमांकाच्या दरास मान्यता देणे बाबत प्रस्ताव विचाराधीन सादर.

**संवाद :**

**श्री. विठ्ठल पेरकर :** लिखान साहित्याकरीता प्राप्त झालेल्या दरपत्रका पैकी मेसर्स न्यु भारत स्टोअर्स यांचा लिखान साहित्य पुरवठा करण्याचा व्यवसाय नसून त्यांनी यापुर्वी पुरवठा केलेले साहित्य निकृष्ट दर्जाचे होत ही बाब लक्षात घेता मेसर्स न्यु भारत स्टोअर्स यांचे ऐवजी दुसरे दरपत्रक धारकांकडून त्या आयटमचे साहित्य खरेदी करण्यात यावे.

**मा. सभापती** : स. सभासदांनी सुचविल्याप्रमाणे मे. न्यु. भारत स्टोअर्स हे लिखाण साहित्य पुरवठा करणारे नसल्यामुळे आणि त्यांनी यापुर्वी पुरवठा केलेले साहित्य निकृष्ट दर्जाचे असल्यामुळे मेसर्स न्यु भारत स्टोअर्स यांचे ज्या ॲटम करीता कमी दराचे दरपत्रक आहेत. त्या आयटम करीता दुसऱ्या क्रमांकाचे कमी दराचे ज्या दरपत्रकास धारकाचे दर असतील अशा दरपत्रक धारकाकडून त्या त्या ॲटमचे साहित्य खरेदी करण्यात यावे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सन १९९२-९३ या वर्षात खरेदी करावयाच्या लिखाण साहित्यापैकी आयटम क्र. २४, ५६, ५७, ५८, ५९, ८७, १०३, ११०, १११, ११३, ११४, १४०, १४२ व १४८ ॲटम वगळता

१) मेसर्स विजय जनरल स्टोअर्स : ४, ८, १२, १४, १७, २१, २९, ३२, ३७, ४०, ४५, ५३, ६१, ६४, ६८, ७३, ७५, ७७, ८०, ८५, ८८, ८९, ९२, ९३, ९४, ९६, १०१, १०९, ११२, ११५, ११७, १२०, १२४, १२५, १२६, १२८, १३०, १३१, १३६, १३९, १४१, १४४, १४६, १४९, १९२, १५५, १५७, १६०, १६३ व १६४

२) मे. न्यु. जे. के. इंटरप्रायझेस : ॲटम क्र. १, ५, ६, १०, १३, १६, १९, २२, २५, २७, ३०, ३३, ३८, ४१, ४६, ४८, ५१, ५४, ६२, ६५, ७०, ७२, ७४, ७८, ८१, ८६,

८९, ९४, ९७, ९९, १०२, १०५, १०६, ११८, १२१, १२६, १२९, १३३, १३४, १३७, १३९, १४५, १५०, १५३ व १५६

३) मे. मुरली स्टोअर्स : ॲटम क्र. ३, ७, ११, १५, २०, २३, २८, ३१, ३६, ३९, ४३, ४४, ४७, ५२, ५५, ६०, ६३, ६७, ६९, ७१, ७६, ८९, ८४, ९१, ९२, ९५, १०८, ११६, ११९, १२७, १३२, १३५, १४३ व १५१.

वरील अनुक्रमांक १ ते ३ च्या दरपत्रधारकाचे नावांसमोर दर्शविलेल्या ॲटम करीता संबंधिताचे दर तुलनात्मकदृष्टया कमी असल्याने त्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.`

तसेच न्यु भारत स्टोअर्स यांचे ज्या ॲटम करीता कमी दराचे दरपत्रक आहेत त्या ॲटम करीता ज्या दरपत्रक धारकाचे दर दुसऱ्या क्रमांकाचे कमी आहे. अशा दरपत्रक धारकांकडून त्या त्या ॲटमचे लिखान साहित्य खरेदी करण्यात यावे असे सर्वानुमते ठरले.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

यांनतर सभेचे कामकाज संपल्याचे मा. सभापती यांनी जाहिर केले.

स्वाक्षरित/-
सचिव,
महानगरपालिका, औरंगाबाद.

स्वाक्षरित/-
सभापती, स्थायी समिती
महानगरपालिका, औरंगाबाद.

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद*

**दिनांक ३०-०९-९२ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती इतिवृत्तांत. अपरिहार्य कारणास्तव पुढे ढकलण्यात आलेली ०२-०९-९२ ची स्थायी समिती सभा बुधवार दिनांक ३०-०९-९२ रोजी दुपारी ३.०० वाजता मा. स्थायी समिती सभापती श्री. ॲड इगबालसिंग गिल यांच्या अध्यक्षतेखाली सुरु झाली. या सभेस कार्यलयीन अधिकाऱ्यासह खालील स. सभासद उपस्थित होते.**

१) श्री. नारायण मोहन फत्तेलष्कर
२) श्री. भगुरे तुळशीराम छगन
३) श्री. अलीम बेग मिर्झा कलीम बेग
४) श्री. गिरजाराम नानाराव हाळनोर
५) श्री. विजय गोविंदलाल पालीवाल
६) श्री. जावेद हसनखान कासिमहसन खान
७) श्री. मोहमंद इस्माईल अ. करीम
८) श्री. अजिजुल्ला बेग वाहेद बेग
९) श्री. पेरकर विठ्ठल कोडांजी
१०) श्री. शिंदे मधुकरराव माणिकरराव
११) ओक जयवंत केशवराव

**विषय क्र. २६१/१ :**

दिनांक २९-०८-९२ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्त कायम करणे.

**संवाद :**

**श्री. अलीम बेग :** शहरात विना परवानगीने अस्तित्वात येणाऱ्या घरांना मालमत्ता कराची आकारणी करण्याबाबत स्थायी समितीची सभा झालेली आहे. या सभेच्या निर्णयाप्रमाणे विना परवाना घरांना मालमत्ता कराची आकारणी करण्याबाबतची अंमलबजावणी होते काय याचा खुलासा व्हावा. खात्रीनगर भागात उभारण्यात आलेल्या घरांना मालमत्ता कराची आकारणी करण्याबाबतची अमलबजावणी होते काय याचा खुलासा व्हावा. खात्रीनगर भागात उभारण्यात आलेल्या घरांना मालमत्ता कराची आकारणी करुन कर वसूल करण्यात आला परंतु दुसऱ्या वेळेस या भागाचा मालमत्ता कर भरण्यासाठी संबंधित विभगाकडे गेले असता मालमत्ता कर परत करण्यात आला.

**श्री. नारायण फत्तेलष्कर :** एम. आय. टी. कॉलेजच्या इमारतीस मालमत्ता कराची आकारणी केली जाते काय? तसेच ही इमारत बांधण्यापुर्वी विकास निधी वसुल करण्यात आला आहे काय?

**मा. उप आयुक्त :** शहर विकास आराखडयात आरक्षित करण्यात आलेल्या जागेवर उभारण्यात आलेल्या विना परवानगी घरांनी मालमत्ता कराची आकारणी करायची नाही असे कर आकारणी बाबत स्थायी समितीचे ठरले आहे.

**श्री. अलीम बेग :** शहर विकास आराखडयात आरक्षित असलेल्या जागेवर विना परवानगीने घरे उभारण्यात आली तरी अशी घरे महापालिकेतर्फे तोडली जात नाही. तेव्हा अशा घरांना मालमत्ता कर लागू न करणे योग्य होणार नाही. तेव्हा इतर महापालिकांप्रमाणे शहर विकास आराखडयाच्या आरक्षित जागेवर उभारण्यात आलेल्या विना परवाना घरांना ती घरे विना परवानगीने बांधलेली आहेत असा शिक्का मारुन मालमत्ता कराची आकारणी करणे आवश्यक आहे अशा प्रकारे मालमत्ता कर वसूल केल्याने महापालिकेचे आर्थिक नुकसान टळेल.

**श्री. मधुकर शिंदे :** स्थायी समितीने वेळोवेळी मंजूर केलेल्या ठरावाची अंमलबजावणी होते काय याचा खुलासा व्हावा. दि. ०४-०३-९२ च्या स्थायी समिती ठराव क्र. ३७५ अन्वये श्री. भिकन फकीरा पटेल यांचे अपील मंजूर करुन श्री. बोराडे यांना त्यांचे विभागाकडे परत करण्याबाबतचा ठराव मंजूर केला आहे. या ठरावाची अंमलबजावणी अदयाप का झाली नाही याचा खुलासा व्हावा.

**मा. उप आयुक्त :** स्थायी समितीने मंजूर केलेला ठराव नियमाप्रमाणे असेल तर अशा ठरावाची प्रशासनातर्फे अमंलबजावणी करण्यात येते.

**श्री. म. इस्माईल अ. करीम :** मलेरीया विभागाचे कर्मचारी महापालिकेमध्ये घेऊन शकतो काय याचा खुलासा व्हावा.

**मा. उप आयुक्त :** सदर प्रकरणी सर्व बांबीची शहानिशा करुन कार्यवाही करावी लागेल.

**श्री. म. इस्माईल अ. करीम :** मा. उप आयुक्त यांनी केलेला खुलासा योग्य वाटत नसल्यामुळे त्याबाबत निषेध नोंदवून सभात्याग करण्यात येतो.

( स. सभासद श्री. म. इस्माईल अ. करीम यांनी वरील खुलासा केल्यानंतर ३.३५ वा सभात्याग केला. )

**श्री. अलीम बेग :** खत्रीनगर मालमत्ता कराबाबत खुलासा व्हावा.

**करमुल्यनिर्धारण अधिकारी :** मा. आयुक्त यांची परवानगी घेऊन खत्रीनगर भागास मालमत्ता कर आकारणी करावी लागेल.

**श्री. मधुकर शिंदे :** मलेरीया विभागाचे प्रशिक्षणासाठी मनपाने किती कर्मचाऱ्यांना प्रशिक्षणासाठी पाठविले. तसेच भिकन पटेल यांचे प्रकरणात काय कार्यवाही झाली याचा खुलासा व्हावा. स्थायी समितीने मंजूरी देवून साह-सात महिन्याचा कालावधी झाला असतानाही त्या प्रकरणी कार्यवाही का झाली नाही?

**सहा. आयुक्त - १ :** भिगन पटैल यांच्या अपील प्रकरणी ज्येष्ठता यादी पडताळून शहानिशा करावी लागेल.

**मा. सभापती :** सहाय्यक आयुक्त-१ यांनी भिकन पटेल यांच्या अपील बाबतची संचिका मा. उप आयुक्त यांचेकडे सादर करावी.

**श्री. मधुकर शिंदे :** बन्सीलालनगर येथील कोंडवाडयातून चोरी गेलेल्या गायी प्रकरणी कोंडवाडा वॉचमन श्री. विठ्ठल गोरे यांना निलंबित केले आहे. गायी चोरी जाण्याच्या अगोदर वॉचमन विठ्ठल मोरे यांनी त्यांचा रिलीवर न आल्यामुळे सलग ३/४ डयुटया केल्या आहेत. यानंतर कोंडवाडयावर वॉचमन म्हणून काम करणारे दैनिक वेतनावरील कर्मचारी कामावर आल्यानंतर त्यांना कोंडवाडयाचा चार्ज दिला आणि दुसऱ्या दिवशी नियमित कामावर आल्यानंतर विठ्ठल मोरे यांना निलंबित केल्याची माहिती मिळाली. वॉचमन विठ्ठल मोरे कोंडवाडयाचा चार्ज देवून गेल्यानंतर गायी चोरी गेलेल्या

असतांना विठ्ठल मोरे यांना निलंबित का करण्यात आले याचा खुलासा व्हावा. याबाबतचा रिपोर्ट कोणत्या अधिकाऱ्यांनी दिला.

**मा. उप आयुक्त :** बन्सीलालनगर येथील कोंडयावाडयातून गायी गेल्याबाबतच्या विभागीय अधिकारी यांचे अहवालावरुन वॉचमन विठ्ठल मोरे यांना निलंबित करण्यात आले आहे. या प्रकरणाचे चौकशी जो अहवाल निष्पन्न होईल त्याप्रमाणे कार्यवाही केली जाईल.

**श्री. मधुकर शिंदे, श्री. विठ्ठल पेरकर, श्री. तुळशीराम भगुरे :** दैनिक वेतनावर काम करणारा कर्मचारी कोंडयावाडयावर वॉचमन म्हणुन कसा ठेवण्यात आला याबाबतचा खुलासा व्हावा आणि याबाबत वॉचमन ऐवजी विभागीय अधिकाऱ्यांना जबाबदार धरुन निलंबित करावे.

**सहा-आयुक्त - २ :** बन्सीलालनगर कोंडवाडयातून गायी चोरी गेल्याबाबतचा अहवाल स्वच्छता निरिक्षक श्री. राठोड यांनी दिला. या अहवालाप्रमाणे कार्यवाही करण्यात आली आहे. सदर प्रकरणाची चौकशी करण्याचे काम माझ्याकडे आहे. त्यात या सर्व बाबीचा खुलासा आहे.

**श्री. मधुकर शिंदे, श्री. जावेद हसनखॉ, श्री. नारायण फत्तेलष्कर, श्री. अलीम बेग :** कोंडवाडा वॉचमन श्री. विठ्ठल मोरे यांना त्वरीत कामावर घेण्यात यावे. एम. आय. टी. कॉलेज व कमलनयन बजाज हॉस्पीटल यांचेकडून मालमत्ता कर वसूल केला जातो काय, याचा खुलासा व्हावा.

**करमुल्य निर्धारण अधिकारी -२ :** एम. आय. टी. कॉलेज यांचेकडून मालमत्ता कर वसूल केला जातो. कमलनयन बजाज हॉस्पीटल सार्वजनिक न्यास नोंदणीकृत आहेत.

**श्री. विठ्ठल पेरकर, श्री. जावेद हसन खॉन, श्री. अलीम बेग :** कमलनयन बजाज हॉस्पीटल सार्वजनिक नोंदणीकृत असले तरी त्याचा हेतू व्यापारी आहे. या हॉस्पीटलमधुन रुग्णांकडून फी वसुली केली जाते. तेव्हा स्थायी समितीच्या निर्णयाप्रमाणे कमलमनयन बजाज हॉस्पीटलकडून मालमत्ता कर वसूल करण्यात यावा.

**श्री. जयवंत ओक :** स्थायी समितीच्या निर्णयाप्रमाणे संत एकनाथ रंग मंदिर येथे जनरेटरची व्यवस्थ का करण्यात आली नाही? संत एकनाथ रंगमंदिर येथे काल जवाहरलाल नेहरू महाविदयालयाच्या विदयार्थीतर्फे सांस्कृतिक कार्यक्रमांत आलेल्या बाधेमुळे विद्यार्थ्यांनी खुर्च्याची मोडतोड केली असती तर किती आर्थिक नुकसान झाले असते याचा विचार करावा. नागरिक सांस्कृतिक कार्यक्रमासाठी आवश्यक ती रक्कम भरुन रंगमंदिर आरक्षित करतात. तेव्हा मनपाचे संभाव्य आर्थिक नुकसान टाळण्याच्या दृष्टीने एकनाथ रंगमंदिर येथे ताबडतोब जनरेटर बसविण्याची व्यवस्थ होत नाही तोपर्यंत संत एकनाथ रंगमंदिर आरक्षीत ठेवण्याची कार्यवाही बंद ठेवावी आणि रंगमंदिरात जनरेटरची व्यवस्था करणे. स्लॅबची गळती इलाही आवश्यक कामे करुन घेण्यात यावीत.

**मा. सभापती** : मा. शहर अभियंता यांनी रंग मंदिराच्या दुरुस्ती व देखभालीचे काम व्यवस्थीतरीत्या ताबडतोब करुन घेण्याची व्यवस्था करावी तसेच अतिरिक्त शहर अभियंता यांनी रंगमंदिर येथे जनरेटर बसविण्याची व्यवस्था करावी. रंग मंदिराचे नुकसान होऊ नये यासाठी परीस्थिती बघून रंग मंदिरांचे आरक्षण करण्याची कार्यवाही संबंधित विभागाने करावी.

**अति. शहर अभियंता :** संत एकनाथ रंगमंदिर येथे जनरेटरची व्यवस्था करण्यासाठी किमान १५ ते २० दिवस लागतील.

**श्री. जयवंत ओक :** औरंगाबाद शहरास नुकत्याच झालेल्या मुसळधार पावसामुळे बारुदगर नाला, कटकट दरवाजा, नागेश्वरवाडी येथील नाल्या जवळील वाहून गेली आहेत. नाल्याजवळील घरे वाहून जाण्यास मनपा दोषी आहे असे दिसते. तेव्हा मनपातर्फे हाती घेतलेल्या नाला ट्रेडींग चे कामास सिमेंट पुरवून काम त्वरीत पूर्ण करुन घ्यावे. तसेच नाला ट्रेडींगचे काम अर्धवट का ठेवले याचा खुलासा व्हावा.

**उप अभियंता (स्लम) :** शहर विकास आराखडयाप्रमाणे रंगारगल्लीतील रस्ता रुंदी करण्यामध्ये बाधीत होणाऱ्या नागरिकांना दुकाने बांधुन देण्याकरीता १०० मीटर लांबीचे नाला ट्रेडींगचे काम केले आहे.

**श्री. नारायण फत्तेलष्कर :** नाल्याची जागा शासनाच्या मालकीची आहे. परंतू काही प्लॉट विक्रेत्यांनी या जागा विकून गरीबांचे आर्थीक नुकसान केले आहे.

**श्री. गिरजाराम हाळनोर :** दशमेशनगर भागातील नाला अरुंद करण्याचे काम चालू आहे. या ठिकाणी काही प्लॉट विक्रेते प्लॉट पाडून त्याची विक्री करीत आहेत. तेव्हा नाल्याच्या जागेवर घरे बांधली जाणार नाहीत. याबाबत इमारत निरिक्षकांना दक्ष राहण्याबाबत सूचना देण्यात यावी.

**सहा. संचालक नगररचना :** नाल्याच्या सर्व जागा शासनाच्या मालकीच्या म्हणजेच जिल्हाधिकारी यांचे अधिपत्याखाली असतात याबाबतचे जाहीर प्रगटन वृत्तपत्रात प्रसिध्दीस देवून नागरिकांना अशा जागा खरेदी करु नयेत. असे कळविले आहे.

**श्री. जयवंत ओक :** नारळीबाग येथील नाला ट्रेडींगच्या कामाबाबत खुलासा व्हावा.

**उप अभियंता (ड्रेनेज) :** नारळीबाग ट्रेडींग ट्रेडींगची एजन्सी निश्चित झालेली असल्यामुळे सदर काम संबंधित विभागाने करुन घ्यावे.

**श्री. गिरजाराम हाळनोर :** दै. तरुण भारत कार्यालयासमोरील रस्त्यावर घाण पाणी वाहते. या ठिकाणी घाण पाणी वाहत असल्यामुळे नागरिकांच्या अंगावर घाण पाणी उडते. तेव्हा देवगीरी तरुण भारत कार्यालयासमोरील पाईप साफ करुन घेण्याची व्यवस्था करावी.

**अति शहर अभियंता :** देवगीरी तरुण भारत कार्यालयासमोरील नाल्याचा पाईप आवश्यक त्या पातळीपेक्षा खालच्या लेवलला आहे. या भागात रस्त्यावरुन पाणी वाहत असल्याची माहिती मिळाल्यानंतर पाईप दुरुस्तीचे काम चालु केले आहे. काम पूर्ण झाल्यानंतर रस्त्यावर पाणी येणार नाही.

**श्री. नारायण फत्तेलष्कर :** लेखाधिकारी श्री. देवरे आणि उप-आयुक्त यांचा महानगरपालिकेतील कार्यकाल संपला आहे काय? याचा खुलासा व्हावा. संबंधित अधिकाऱ्यांचा कार्यकाल संपला असेल तर, सर्वसाधारण सभेने प्रस्ताव ठेवून मुदतवाढ का घेतली नाही?

**मा. उप. आयुक्त :** मा. आयुक्त यांचे मंजूरीनुसार आवश्यकता असेल तर, तसा प्रस्ताव ठेवता येतो.

**श्री. नारायण फत्तेलष्कर :** दिनांक २९-०८-९२ च्या सभेत ठराव क्र. २२६ मधील चर्चेनुसार विद्युत लाईनमन यांचे निवेदन आणि श्री. वैद्य यांचे भत्याबाबत काय कार्यवाही झाली याचा खुलासा व्हावा.

**अति. शहर अभियंता :** विदयुत विभागत काम करणाऱ्या लाईनमन यांना आवश्यक असलेले किटस पुरविण्यात आले आहेत. तसेच रेनकोट भांडार विभागाकडून पुरविले जातील रात्रीच्या कामाच्या भत्याबाबतची संचिका मंजूरीसाठी वरीष्ठ अधिकाऱ्यांकडे पाठविली आहे.

**मा. सभापती** : सहाय्यक आयुक्त यांनी संचिकेची तपासणी करुन कार्यवाही करावी.

**श्री. नारायण फत्तेलष्कर :** दि. २९-०८-९२ च्या सभेतील ठराव क्र. २२६ मधील चर्चेनुसार शहागंज टिन रोड बाबत खूलासा व्हावा.

**श्री. जावेद हसन खॉ, श्री. तुळशीराम भगुरे :** ठराव क्र. २६० दि. २९-०८-९२ अन्वये न्यु भारत स्टोअर्स यांचे या ॲटमकरीता कमी दराचे दरपत्रक आहे. त्या ॲटम करीता ज्या दरपत्रक धारकाचे दर दुसऱ्या क्रमांकांचे कमी आहे. अशा दरपत्रकधारकांकडून त्या त्या ॲटमचे लिखान साहित्य खरेदी करण्यास मंजूरी दिली आहे. या मंजूरीमुळे महापालिकेचे आर्थिक नुकसान होणार आहे तेव्हा न्यू भारत स्टोअर्स यांचे ज्या ॲटम करीता दर कमी आहेत त्या दराने संबंधिताकडून लिखान साहित्य खरेदी करावे अशी दुरुस्ती करावी.

**मा. सभापती** : स. सभासदांच्या सुचनेप्रमाणे लिखान साहित्य खरेदी करीता मे. न्यु भारत स्टोअर्स यांचे ज्या ॲटम करीता दर कमी आहेत. त्या ॲटमचे साहित्य मे. न्यु भारत स्टोअर्स यांचेकडून खरेदी करणे बाबत ठरावात आवश्यक ती दुरुस्ती करावी.

**ठराव :**

दिनांक २९-०८-९२ च्या सभेतील ठराव क्र. २६० मधील " तसेच न्यु भारत स्टोअर्स यांचे ज्या ॲटमकरीता कमी दराचे दरपत्रक आहेत. त्या ॲटमकरीता ज्या दरपत्रक धारकाचे दर दुसऱ्या क्रमांकाचे कमी आहेत. अशा दरपत्रकधारकांकडून त्या त्या ॲटमचे लिखाण साहित्य खरेदी करण्यात यावे असे सर्वानुमते ठरले " हा परिच्छेद वगळून त्या ऐवजी " सन १९९२-९३ या वर्षात खरेदी करावयाच्या लिखाण साहित्यपैकी ॲटम क्र. १, ९, १८, २६, ३४, ३५, ४२, ५०, ६६, ८२, ८३, ९०, ९८, १००, १०४, १०७, १२२, १२३, १३८, १४७, १५४, १५८, १५९, १६१ व १६२ या ॲटम करीता मे. न्यु भारत स्टोअर्स यांच्या दरपत्रकाचे दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी असल्यामुळे या ॲटमचे साहित्य मे न्यु भारत स्टोअर्स यांचेकडून खरेदी करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. " अशी दुरुस्ती करण्यासह दिनांक २९-०८-९२ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समितीचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. २६२/२ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, किराडपूरा येथे जिनिंग फॅक्टरी ते मनपा मंगल कार्यालयापर्यंत २०० मी. मी. व्यासाची ए. सी. जलवाहिनी टाकावयाची आहे सदरील कामाचे अंदाजपत्रक हे परीसर अभियांत्रिकी विभागाची दरसुची रु. १९९१-९२ नुसार रक्कम रुपये १,१९,५९५/- एवढयाचे तयार करण्यात आले आहे. त्यास प्रशासकीय मान्यता घेण्यात आलेली आहे.

करीता सदर कामाचे अंदाजपत्रक रक्कम रुपये १,१९,५९५/- एवढयाचे मंजूरी करीता प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, किराडपूरा येथे जिनिंग फॅक्टरी ते मनपा मंगल कार्यालयापर्यंत २०० मी. मी. व्यासाची ए. सी. जलवाहिनी टाकणेच्या कामाकरीता रक्कम रुपये १,१९,५९५/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २६३/३ :**

कार्यकारी अभियंता पा. पु. व जलनिःसारण यांनी प्रस्ताव सादर केला की, वित्तीय वर्षे १९९२-९२ साठी पाणी पुरवठा विभागासाठी र. रु. ४,९६,६००/- चे जे. की., जॉइन्ट खरेदी करण्यासाठी अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील अंदाजपत्रकास मा. आयुक्त यांनी दिनांक १८-०८-९२ रोजी मंजूरी दिलेली आहे.

तरी जेफी जॉईन्टस खरेदी करण्याच्या र. रु. ४,९६,६००/- च्या अंदाजपत्रकास मंजूरी मिळणेस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सन १९९२-९३ वर्षासाठी जेफी जॉईन्टस खरेदी करण्याच्या कामाकरीता रक्कम रुपये ४,९६,६००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २६४/४ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, औ. बाद महापालिकेच्या प्रत्येक पाण्याच्या टाकीसाठी बसविण्यात येणाऱ्या वायरलेस करीता ऑपरेट करण्यासाठी व वॉचमनसाठी प्रत्येक टाकीवर (डयुटी) रुम बांधण्याच्या आहेत. त्यासाठी परिसर अभियांत्रिकी विभागाची दरसुची सन १९९१-९२ च्या आहेत. त्यासाठी परिसर अभियांत्रिकी विभागाची दरसुची सन १९९१-९२ च्या दरसुची नुसार रक्कम रुपये, ४,९९,४००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.

तरी सदर कामासाठीचे अंदाजपत्रक रक्कम रुपये ४,९९,०००/- चे मंजूरीस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महापालिकेच्या प्रत्येक पाण्याच्या टाकीसाठी बसविण्यात येणाऱ्या वायरलेस ऑपरेट करण्यासाठी व वॉचमनसाठी प्रत्येक टाकीवर रुम बांधण्याच्या कामाकरीता रक्कम रुपये ४,९९,४००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

सदर कामास याच सभेत स्विकृती देण्यात येते.

**विषय क्र. २६५/५ :**

वार्ड क्र. १३ मो. उमराव कॉलनी येथे १५० मी. मी. व्यासाची आर. सी. सी. ड्रेनेज लाईन टाकणे बाबत अंदाजपत्रक रक्कम रुपये १,६०,४००/- चे सन १९९०-९१ चे दरसुची नुसार तयार करण्यात आले असून, सदर अंदाजपत्रकास मा. आयुक्त साहेबांनी मंजूरी दिलेली आहे.

करीता प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र. १३ मो. उमराव कॉलनी येथे १५० मी. मी. व्यासाची आर. सी. सी. ड्रेनेज लाईन टाकण्याच्या कामासाठी रक्कम रुपये १,६०,४००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

सदर कामास सभेत सर्वानुमते स्विकृती देण्यात येते.

**विषय क्र. २६६/६ :**

पहाडसिंगपूरा स्लम भागात १५० मी. मी. व्यासाची ड्रेनेज लाईन टाकणेसाठी यापुर्वी रुपये ७७,५००/- ला मा. आयुक्त यांनी दिनांक १५-०३-९२ ला प्रशासकीय मंजूरी दिलेली आहे. त्यानुसार सदरील कामासाठी निविदा मागवून प्रत्यक्ष काय सुरु केले असता अंदाजपत्रकास तरतूद असल्याप्रमाणे यापुर्वीचे अस्तित्वात असलेली ९० मीटर ड्रेनेज लाईन अप्रुटींग करण्याचे काम केले तरी पण अवस्थेनुसार लेवल मिळत नसल्यामुळे अस्तित्वात असलेली संपूर्ण ४९० मीटर ड्रेनेज लाईन अप्रूटींग असलेली संपूर्ण ४९० मीटर ड्रेनेज अप्रूटींग करुन आवश्यक त्या लेवल व उतारामध्ये ड्रेनेज लाईन टाकावी लागेल त्यासाठी सुधारीत अंदाजपत्रक रुपये २,२८,६००/- चे तयार करण्यात आले. त्यापैकी रुपये ७२,१९०/- म्हाडाकडून मिळेल व उर्वरीत रुपये १,५६,४७०/- चा खर्च महानगरपालिकेच्या फंडातून करावा लागेल करीता पहाडसिंगपूरा स्लम भागात १५० मी. मी. व्यासाची ड्रेनेज लाईन टाकण्याचे कामासाठी तयार केलेले सुधारीत अंदाजपत्रक रुपये २,२८,६००/- ला मंजूरी देण्याचे विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, पहाडसिंगपूरा स्लम भागात ९० मीटर लांबीची १५० मी. मी. व्यासाची ड्रेनेज लाईन अप्रुटींग करण्याचे काम केले तरी आवस्थेनुसार लेवल मिळत नसल्यामुळे अस्तित्वात असलेली संपूर्ण ४९० मीटर लांबीची ड्रेनेज लाईन अप्रुटींग करुन आवश्यक त्या लेवल व उतारामध्ये टाकणे आवश्यक असल्यामुळे या कामासाठी तयार करण्यात आलेल्या रुपये २,२८,६००/- च्या सुधारीत अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी

सदर कामास सभेत सर्वानुमते स्विकृती देण्यात येते.

**विषय क्र. २६७/७ :**

मा. शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, प्रभाग क्र. ५३ येथे मंगल कार्यालय सार्वजनिक वाचनालय व प्रा. आरोग्य केंद्र बांधण्याच्या कामासाठी रक्कम रुपये १० लाखाचे लाईन इस्टीमेंट पिलीन्थ एरिया बेसिसवर ढोबळ मानाने तयार करण्यात आलेले आहे.

सदरचा अंदाजपत्रकास मा. आयुक्तांनी दि. ०८-०७-९२ रोजी तत्वशः मान्यता दिलेली आहे.

सदरचा प्रस्तावास मंजूरी प्राप्त झाल्यानंतर डिटेल अंदाजपत्रक तयार करण्यात येईल व बिल्डींग प्लॅन मान्यता प्राप्त वास्तुशास्त्रज्ञाकडून मागविण्यात येतील.

सदर कामाचा खर्च वर्ष १९९२-९३ च्या इतर इमारती उर्वरीत कामेसाठी असलेल्या एकूण तरतूदी अंतर्गत करणे प्रस्तावीत आहे.

तरी सदर अंदाजपत्रक मंजूरीचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रभाग क्र. ५३ येथे मंगल कार्यालय, सार्वजनिक वाचनालय व प्रा. आरोग्य केंद्र बांधण्याच्या कामासाठी लाईन इस्टीमेंट पिलीन्थ एरिया बेसिसवर ढोबळ मानाने तयार करण्यात आलेल्या रक्कम रुपये १० लाखाचे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

सदर कामास त्याच सभेत सर्वानुमते स्विकृती देण्यात येते.

**विषय क्र. २६८/८ :**

मा. शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो. उस्मानपुरा मनपाच्या जागेत कुंपर भिंती बांधुन झाल्यानंतर मनपा वर्ग २ अधिकाऱ्यांसाठी निवासस्थान बांधण्याच्या कामासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याचे सन १९९१-९२ चे डी. एस. आर. दराने रक्कम रुपये २,८१,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे व त्यास मा. आयुक्तांनी मंजूरी दिलेली आहे.

सदरचा खर्च भांडवली इमारती या शिर्षकामधुन करण्यात येईल.

तरी अंदाजपत्रक रक्कम रुपये २,८१,०००/- मंजूरीसाठी प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मो. उस्मानपुरा मनपाच्या जागेत वर्ग-२ अधिकाऱ्यांसाठी निवास्थानक बांधण्याच्या कामाकरीता रक्कम रुपये २,८१,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

सदर कामास याच सभेत सर्वानुमते स्विकृती देण्यात येते.

**विषय क्र. २६९/९ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर जायमुख पाणी पुरवठा केंद्रासाठी संरक्षित भिंत बांधणे या कामाचे अंदाजपत्रक हे रक्कम रुपये ३,२१,२००/- चे परिसर अभियांत्रिकी विभागाची दरसुची सन १९९०-९१ नुसार तयार करण्यात आले आहे. सदरील कामाचा खर्च हा शासकीय अनूदान सन १९९०-९१ मधुन प्राप्त होणाऱ्या अनूदानातून करावयाचा आहे.

सदर कामासाठी या कार्यालयाची निविदा सुचना क्र. ५/९२-९३ जी. की. दैनिक तरुण भारत लोकधर्म, लोकमत, इंडियन एक्सप्रेस या वर्तमानपत्रात प्रसिध्दीस देण्यात येऊन बी-१ निविदा मागविण्यात आल्या. कोऱ्या निविदा विक्रीच्या अंतीम तारखेपर्यंत एकूण अकरा (११) निविदा विक्री झाल्या. सिलबंद निविदा स्विकारण्याच्या नियोजीत तारखेस एकूण चार (४) सिलबंद निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त निविदा दिनांक ०९-०६-९२ रोजी उघडण्यात आल्या. ठेकेदारांनी दिलेल्या दरांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. एम. एस. बुंधले | २% कमी |
| २. | श्री. अलीउद्दीन एम वसीर | २३.९% कमी |
| ३. | श्री. कैसरखान | २०.७८६% कमी |
| ४. | मे. एस. एच. असोशिएटस | ११.११% कमी |

वरील प्रमाणेच्या तुलनात्मकदृष्टया श्री. अलीउद्दीन एम. वझीर यांचा दर सर्वात कमी आहे. म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा २३.९% कमी असा दर दिलेली आहे. त्यास मान्यता देतांना आयुक्त यांनी खाली प्रमाणेच्या अटी दिलेल्या आहे.

१) कामाचा दर्जा कमी झाला २) काम आदेशानुसार सुरु केले नाही ३) काम अपुर्ण ठेवले तर संबंधित ठेकेदारास ३ वर्षासाठी काळया यादीत समाविष्ट करण्याच्या अटीवर मान्यता दिलेली आहे.

करीता श्री. अली उद्दीन एम. वझीर यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा २३.९% कमी दराची निविदा स्विकारण्याच्या प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावित कामासाठी पुन्हा दरपत्रके मागविण्यात यावे असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. २७०/१० :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, फिल्टर बेड हर्सुल येथे टेटी १ लाख लिटर्स क्षमतेची सम्पवेला बांधणे पंप हाऊस बांधणे व सबमर्शीबल पंपसेट उभारणे तसेच पाईप लाईन टाकणे या कामाचे अंदाजपत्रक रक्कम रुपये ११,९१,६४०/- एवढयाचे बनविण्यात येवून त्यास प्रशासकीय मान्यता घेण्यात आलेली आहे. सदर कामाचा खर्च हा विशेष शासकीय अनूदान सन १९९०-९१ मधून करण्यात येणार आहे.

सदर कामासाठी या कार्यालयाची निविदा सुचना क्र. ५/९२-९३ जी की दैनिक देवगीरी तरुण भारत, लोकधर्म, लोकमत, इंडियन एक्सप्रेस या वर्तमानपत्रात प्रसिध्दीस देण्यात येऊन बी-१ निविदा मागविण्यात आल्या. कोऱ्या निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण चार निविदा विक्री झाल्या. सिलबंद निविदा स्विकारण्याच्या नियोजीत तारखेस फक्त दोन सिलबंद निविदा प्राप्त झाल्या.

प्राप्त निविदा दिनांक १९-०६-९२ रोजी उघडण्यात आल्या. ठेकेदारांनी दिलेल दर खालील प्रमाणेच आहेत.

| | | |
|---|---|---|
| १. | ई. एम. सजनानी | ४.९०% जास्त |
| २. | अमरसी जेठा राठोड | ६.९६% जास्त |

वरील प्रमाणेच्या तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दर हा श्री. ई. एम सजनानी यांचा आहे. म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.९०% जास्त असा आहे. मा. आयुक्त यांच्या अभिप्रायानुसार ठेकेदार श्री. ई. एम. सजनानी यांना त्यांनी दिलेल्या दराबाबत वाटाघाटी करण्यासाठी या कार्यालयाचे पत्र क्र. १२८२/ दिनांक ०४-०७-९२ नुसार कळविण्यात आले होते. त्याप्रमाणे मा. आयुक्त यांच्या दालनात दि. १३-०८-९२ रोजी दराबाबत ठेकेदार श्री. ई. एम. सजनानी यांच्या बरोबर वाटाघाटी करण्यात आली असता त्यांची सदरचे काम ४.९०% ऐवजी ४.००% जास्त या दराने करण्यास तयार असल्याची समंती दिली आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, फिल्टरबेड हर्सूल येथे व लाख लिटर क्षमतेची संपवेल बांधणे पंप हाऊस बांधणे व सबमर्शीबल पंपसेट उभारणे तसेच पाईप लाईन टाकण्याच्या कामासाठी दिनांक १३-०८-९२ रोजी गुत्तेदार श्री. ई. एम. सजनानी यांचे बरोबर झालेल्या वाटाघाटी नुसार उक्त काम अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ४.००% जास्त दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

सदर कामास याच सभेत सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

**विषय क्र. २७१/११ :**

कार्यकारी अभियंता यांनी (मनपा) प्रस्ताव सादर केला आहे की, लक्ष्मी कॉलनी येथे १५० व १०० मी. मी. व्यासाची ए. सी. जलवाहिनी टाकणे, सदर कामाचे अंदाजपत्रक रक्कम रुपये ९९,५००/- चे तयार करण्यात आले आहे. त्यास प्रशासकीय मान्यता घेण्यात

आलेली आहे. अंदाजपत्रक हे परीसर अभियांत्रिकी विभागाची दरसुची सन १९९१-९२ नुसार तयार करण्यात आलेले आहे.

सदरील कामासाठी या कार्यालयाची निविदा सुचना क्र. १७/९२-९३ जी. की. दैनिक लोकमत टाईम्स, सिटीजन्स/रहेबर या वर्तमानपत्रात प्रसिध्दीस देण्यात येऊन बी-१ निविदा मागविण्यात आल्या, कोऱ्या निविदा विक्रीच्या अंतीम तारखेपर्यंत एकूण तीन निविदा विक्री झाल्या. सिलबंद निविदा स्विकारण्याच्या नियोजीत तारखेस एकूण दोन सिलबंद निविदा प्राप्त झाल्या त्या निविदा दि. २७-०७-९२ रोजी उघडण्यात आल्या.

ठेकेदारांनी दिलेले दर खालील प्रमाणेच आहेत.

| | | |
|---|---|---|
| १. | ई. एम. सजनानी | ४.९०% जास्त |
| २. | पी. एच. पंजनानी | १०.००% जास्त |

वरील प्रमाणेच्या तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दर हा श्री. ई. एम. सजनानी यांचा आहे. म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.९०% जास्त असा आहे. मा. आयुक्त यांच्या अभिप्रायानुसार या कार्यालयाचे पत्र देण्यात आले होते. त्याप्रमाणे दिनांक १३-०८-९२ ला मा. आयुक्त यांचे दालनात दराबाबत श्री. ई. एम. सजनानी ठेकेदार यांची सदरचे काम हे ३.००% जास्त या दराने करण्यास संमती दिली आहे. त्यास मा. आयुक्त यांनी मान्यता दिलेली आहे.

ती श्री. ई. एम. सजनानी यांची वाटाघाटी नंतरचा दर ३.००% जास्त दराची निविदा स्विकारण्याचा प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, लक्ष्मी कॉलनी १५० व १०० मी. मी. व्यासाची ए. सी. जलवाहिनी टाकण्याच्या कामासाठी दिनांक १३-०८-९२ रोजी गुत्तेदार सी. ई. एम. सजनानी यांचे बरोबर झालेल्या वाटाघाटी नुसार उक्त काम अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ३.००% जास्त दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी. सदर कमास याच सभेत सर्वानुमते स्विकृती देण्यात येते.

**विषय क्र. २७२/१२ :**

वार्ड क्र. २६ मो. जोहरीवाडा येथील अस्तित्वात असलेल्या गटारी बांधणे बाबत अंदाजपत्रक रक्कम रुपये ४३,५००/- चे सन १९९१-९२ च्या दरसुचीनुसार तयार करण्यात आले असून, प्राप्त सरकारी अनूदानातून काम करणेस्तव मा. आयुक्त साहेबांनी मंजूरी दिलेली आहे.

आदेशावरुन सदरील कामाकरीता कार्यालयीन निविदा सुचना क्र. ५/७६१/९२ दिनांक २०-०५-९२ नुसार दैनिक लोकमत टाईम्स व सिटीजन्स दैनिकात जाहिरात देवून बी-१ नमुन्यात निविदा मागविले असता एकूण पाच निविदा विकण्यात आल्या होत्या त्यापैकी चार निविदा पत्रके प्राप्त असून, त्याचा तुलनात्मक तक्ता दर खालील प्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. स. रफिकोद्दीन | १६% कमी |
| २. | श्री. एस. एच. मिनाजोद्दीन | ५% जास्त |
| ३. | श्री. अब्दुल खलील | ०.०१% कमी |
| ४. | श्री. स. सिराजोद्दीन | ८% जास्त |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १६% कमी दराचे श्री. स. रफिकोउद्दीन यांचे दरपत्रक आहे. करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र. २६ मो. जोहरीवाडा येथील अस्तीत्वात असलेल्या गटारी बांधणेच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकाच्या दरापेक्षा १६% कमी दराच्या श्री. सय्यद रफिकोद्दीन यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २७३/१३ :**

वार्ड क्र. ४७ मो. कोकणवाडी येथील १५० मी. मी. व्यासाची चिनी मातीची ड्रेनेज लाईन काढून २५० मी. मी. व्यासाची आर. सी. सी. ड्रेनेज लाईन टाकणे बाबत अंदाजपत्रक रक्कम रुपये २७,५००/- चे तयार करण्यात आले असून, प्राप्त सरकारी अनूदानातून सदर काम करण्यास मा. आयुक्त महोदयांनी मंजूरी दिलेली आहे.

आदेशावरुन सदरील कामाकरीता कार्यालयीन निविदा सुचना क्र. ७८३/९२ दि. २२-०७-९२ नुसार दैनिक लोकविजय, औ. बाद टाईम्स, मुफत्तसर दैनिकात जाहिरात देवून बी-१ नमुन्यात निविदा पत्रके मागविले असता एकूण दहा निविदा पत्रके विकण्यात आल्या होत्या त्यापैकी फक्त सहा निविदा पत्रके प्राप्त झाली असून, त्याचा तुलनात्मक दर खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. अजितसिंग | ५% कमी |
| २. | श्री. एम. जी. महेबबुअली | १२.२५% कमी |
| ३. | श्री. स. सिराजोउद्दीन | १०.१०% कमी |
| ४. | श्री. राजकुमार झरे | १५.६६% कमी |
| ५. | श्री. राजेंद्र शिंदे | ११.५०% कमी |
| ६. | श्री. शेख सलीम अहेमद | ११% कमी |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १५.६६% कमी दराचे श्री. राजकुमार झरे यांचे दरपत्रक आहे. करीता प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र. ४७ मो. कोकणवाडी येथे १५० मी. मी. व्यासाची चिनी मातीची ड्रेनेज लाईन काढुन २५० मी. मी. व्यासाची आर. सी. सी. ड्रेनेज लाईन टाकण्याच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकाच्या दरापेक्षा १५.६६% कमी दराच्या श्री. राजकुमार झरे यांच्या दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी. सदर कामात याच सभेत सर्वानुमते स्विकृती देण्यात येते.

**विषय क्र. २७४/१४ :**

मा. शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो. काचीवाडा येथील धोबीघटा करीता हौद व एक खोली बांधण्याच्या कामासाठी स्थायी समिती बैठक ठराव क्र. ९१/६० दि. ०६-०६-९२ अन्वये रुपये १,२१,२५०/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी प्राप्त झालेली आहे. सदरचे काम हाती घेण्यासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र. ९२-९३ जा. क्र. मनपा/शअ/४७०/९२ दिनांक ०८-०७-९२ अन्वये निविदा मागविल्या असता कोऱ्या निविदा विक्रीच्या तारखेपर्यंत एकूण ५ निविदा विक्री झाल्यापैकी निविदा स्विकारण्याच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण (२) निविदा दर भरलेल्या प्राप्त झाल्या. त्या दिनांक ०१-०८-९२ ला उघडण्यात आल्या त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

१. श्री. अब्दुल खालेफ ४.९९% जास्त दराने
२. श्री. सय्यद सिराजोउद्दीन १०% जास्त दराने

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.९९% जास्त दराची श्री. अब्दुल खालेफ यांची निविदा दर आहेत. सदरचे दर जास्त असल्यामुळे मा. आयुक्तांच्या दालनात दिनांक ०८-०९-९२ ला मा. आयुक्तासमक्ष दराचे वाटाघाटी होऊन सदरचे काम ४.९९% ऐवजी ३% जास्त दराने करण्यास गुत्तेदाराने समती दिलेली आहे.

तरी अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ३% जास्त दराची श्री. अब्दुल खालेफ यांची निविदा दर मंजूरीसाठी प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, काचीवाडा येथे धोबीघाटा करीता व हौद व एक खोली बांधण्याच्या कामाकरीता दि. ०८-०९-९२ रोजी गुत्तेदार श्री. अब्दुल खालेफ यांचेशी झालेल्या वाटाघाटीनुसार उक्त काम संबंधिताकडून अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ३% जास्त दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी. सदर कामास यास सभेत स्विकृती देण्यात येते.

**विषय क्र. २७५/१५ :**

शहर अभियंता मनपा यांनी प्रस्ताव सादर केला की, रहेमानिया कॉलनी किराडपूरा येथे दगडी गटार बनविण्याचे कामासाठी स्थायी समितीचा ठराव क्र. ४०/९२ दि. ०८-०६-९२ द्वारे अंदाजपत्रक रुपये २,१९,२००/- ला मंजूरी मिळाल्यानुसार सदरील कामासाठी कार्यालयाची निविदा सुचना दि. ०८-०७-९२ स्थानिक वृत्तपत्र दैनिक लोकविजय, दै. मुफ्फसीर, दै. लोकमत टाईम्स व दै. रहेबर मध्ये विस्तृत प्रसिध्दी देवून प्रगट निविदा मागविल्या असता कोऱ्या निविदा विकण्याचे अंतीम तारखेपर्यंत एकूण (१८) निविदा विकण्यात आल्या व मोहरबंद स्विकारण्याचे नियोजीत तारखेस फक्त (३) निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त झालेल्या निविदा उघडल्या असता ठेकेदारांनी दिलेले दर खालील प्रमाणे आहेत.

१. श्री. अे. अेम. फारुकी अंदाजपत्रकीय दराने
२. श्री. मौला अली यार खान अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४% जास्त
३. श्री. कुलवंतसिंग अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४% जास्त

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, रहेमानिया कॉलनी येथे दगडी गटार बसविण्याच्या कामाकरीता तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दराच्या श्री. फारुकी ए. एम. यांच्या दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी. सदर कामास याच सभेत स्विकृती देण्यात येते.

**विषय क्र. २७६/१६ :**

मा. शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो. हर्षनगर येथील नाल्यावर पादचाऱ्यांसाठी लोंखडी पुल तयार करण्याचे कामासाठी स्थायी समिती ठराव क्र. ४७/१६ दि. ०८-०६-९२ अन्वये र. रुपये २,१०,७६०/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मान्यता प्राप्त झालेली आहे. सदरचे काम हाती घेण्यासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र. मनपा/शअ/४७०/९२ दि. ०८-०७-९२ अन्वये बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता कोऱ्या

निविदा विक्रीच्या तारखेपर्यंत एकूण " ५ " निविदा फार्म विक्री झाल्यापैकी निविदा स्विकारण्याच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण (३) निविदा दर भरलेल्या प्राप्त झाल्या. त्या दिनांक ०१-०८-९२ ला उघडण्यात आल्या त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. कुलवंतसिंग | १०.१३% जास्त दराने |
| २. | श्री. सय्यद रफिकोउद्दीन | १२% जास्त दराने |
| ३. | श्री. कैसरखान | ८% जास्त दराने |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ८% जास्त दराची श्री. कैसरखान यांचे निविदा दर आहेत. दर जास्त वाटत असल्यामुळे गुत्तेदारास दराच्या वाटाघाटी बाबत पत्र दिले असता दि. ०९-०९-९२ ला मा. आयुक्तांसमोर वाटाघाटी होवून गुत्तेदाराने अंदाजपत्रक दरापेक्षा ८% जास्त ऐवजी ५% जास्त दराने काम करण्यास संमती दर्शविली व त्यास मा. आयुक्तांनी मान्यता दिलेली आहे.

तरी श्री. कैसरखान यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५% जास्त दराची निविदा मंजुरीसाठी प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मो. हर्षनगर येथील नाल्यावर पादचाऱ्यासाठी लोखडी पूल तयार करण्याच्या कामाकरीता दि. ०९-०९-९२ रोजी गुत्तेदार श्री. कैसरखान यांचेशी झालेल्या वाटाघाटीनुसार उक्त काम अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ५% जास्त दराने संबंधिताकडून करुन घेण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी. सदर कामास याच सभेत स्विकृती सर्वानुंमते देण्यात येते.

**विषय क्र. २७७/१७ :**

मा. शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो. हर्सूल येथे समाजमंदिर बांधण्याच्या कामासाठी स्थायी समिती बैठक दि. ०१-०६-९२ ठराव क्र. ३०/२७ अन्वये अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी प्राप्त झालेली आहे. सदरचे काम हाती घेण्यासाठी कार्यलयीन निविदा सुचना क्र. मनपा/शअ/४७०/९२ दि. ०८-०७-९२ अन्वये निविदा मागविल्या असता एकूण ६ कोऱ्या निविदा विक्री झाल्या पैकी एकूण दोन दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या. त्या खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. व्ही. आर. पाटील | ५% जास्त दराने |
| २. | श्री. सय्यद गयासोद्यीन | ८% जास्त दराने |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५% जास्त दराची श्री. व्ही. आर. पाटील यांची निविदा आहे. सदरचे दर कमी करण्यासाठी गुत्तेदारास पत्र दिले असता दि. ०४-०९-९२ ला मा. आयुक्तांचे दालनात दराचे वाटाघाटी होवून सदरचे काम अंदाजपत्रकीय दराने करण्यास गुत्तेदाराने समंती दर्शविलेली आहे. तरी सदरच्या कामासाठी अंदाजपत्रकीय दराची श्री. व्ही. आर. पाटील यांची निविदा मंजूरीसाठी विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मो. हर्सूल येथे समाजमंदिर बांधण्याच्या कामासाठी दि. ०४-०९-९२ रोजी गुत्तेदार श्री. व्ही. आर. पाटी यांचेशी झालेल्या वाटाघाटी नुसार उक्त काम संबंधिताकडून अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी. सदर कामास याच सभेत सर्वानुमते स्विकृती देण्यात येते.

**विषय क्र. २७८/१८ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, कोटला कॉलनी पाण्याची टाकी येथील मनपा निवासस्थनास प्रत्येकी एक रुमची वाढ करणेच्या कामासाठी अंदाजपत्रक रक्कम रु. २,४६,५००/- ला स्थायी समिती बैठक दि. ०८-०६-९२ अन्वये मंजूरी प्राप्त झालेली आहे. सदरचे काम हाती घेण्यासाठी कार्यलयीन निविदा सुचना क्र. मनपा/शअ/४४७/ दि. ०१-०७-९२ अन्वये बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता गुत्तेदार श्री. सलीम अहेमद यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा १५% जास्त दराची फक्त एकच निविदा प्राप्त झाली. सदरचे दर जास्त वाटत असल्याने दि. १५-०९-९२ ला मा. आयुक्तांचे दालनात दराचे वाटाघाटी होऊन गुत्तेदाराने सदर काम १५% जास्त दराऐवजी ८.९% जास्त दराने काम करण्यास समंती दिली आहे. त्यास मा. आयुक्तांनी मंजूरी दिली आहे. तरी अंदाजपत्रकीय दरापेक्षा ८.९% जास्त दराची श्री. सलीम अहेमद यांची निविदा मंजूरीसाठी प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, कोटला कॉलनी पाण्याची टाकी येथील मनपा निवासस्थानास प्रत्येकी एक रुमची वाढ करणेच्या कामाकरीता दि. १५-०९-९२ रोजी गुत्तेदार श्री. सलीम अहेमद यांचेशी झालेल्या वाटाघाटीनुसार उक्त काम संबंधिताकडून अंदाजपत्रकीय दरापेक्षा ८.९% कमी दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी. सदर कामास याच सभेत स्विकृती देण्यात येते.

**विषय क्र. २७९/१९ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, रेल्वेस्टेशन येथे मनपा गेस्ट हाऊसच्या आवारात मनपा कर्मचारी मा. महापौर, उपमहापौर, यांचे वाहन चालक यांच्या अस्तित्वात असलेल्या क्वार्टरला संरक्षित भिंत बांधणे व मा. स्थायी समिती अध्यक्ष यांचे वाहन चालकासाठी क्वार्टर बांधण्याच्या कामासाठी स्थायी समिती बैठक दि. २३-०६-९२ अन्वये अंदाजपत्रकास मंजूरी प्राप्त झालेली आहे. सदरचे काम हाती घेण्यासाठी कार्यलयीन निविदा सुचना क्र. ९२-९३ जा. क्र. मनपा/शअ/४७०/९२ दिनांक ०८-०७-९२ अन्वये निविदा मागविल्या असता एकूण (७) निविदा विक्री झाल्या पैकी दोन दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या. त्या खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. आर. एल. बारवाल | ७.७% जास्त दराने |
| २. | श्री. कुलवंतसिंग | १२% जास्त दराने |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ७.७% जास्त दराची श्री. आर. एल. बारवाल यांची निविदा होती. सदरचे दर जास्त वाटत असल्यामुळे दि. १५-०९-९२ ला मा. आयुक्तांसमोर गुत्तेदारासमवेत दरांचे वाटाघाटी होऊन अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५% जास्त दराने काम करण्यास गुत्तेदाराने समंती दर्शविलेली आहे. त्यास मा. आयुक्तांनी मान्यता दिलेली आहे. तरी अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५% जास्त दराची श्री. आर. एल. बारवाल यांची निविदा.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, रेल्वेस्टेशन मनपा गेस्ट हाऊसच्या आवारातील निवास्थानास संरक्षित भिंत बांधणे व स्थायी समितीचे अध्यक्ष यांचे वाहन चालकासाठी क्वार्टर बांधण्याच्या कामाकरीता दि. १५-०९-९२ रोजी गुत्तेदार श्री. आर. एल. बारवाल

यांचेशी आलेल्या वाटाघाटीनुसार उक्त काम संबंधिताकडून अंदाजपत्रकाच्या दरापेक्षा ५% जास्त दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी. सदर कामास याच सभेत स्विकृती देण्यात येते.

**विषय क्र. २८०/१९ :**

वार्ड क्र. ६० चिकलठाणा येथे मनपा प्राथमिक आरोग्य केंद्राकरीता वॉचमन क्वॅार्टर बांधण्याच्या कामासाठी स्थायी समिती ठराव क्र. ४८/१७ दि. ०८-०६-९२ अन्वये र. रु. १,१७,०००/- ला सर्वानुमते मंजूरी प्राप्त झालेली आहे. सदर काम हाती घेण्यासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र. ९२-९३ जा. क्र. मनपा/शअ/४७०/९२ दिनांक ०८-०७-९२ अन्वये बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता एकूण चार कोऱ्या निविदा विक्री झाल्या पैकी दोन दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या त्या खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १. | मे. आनंद बिल्डर्स | १०% जास्त दराने |
| २. | श्री. वनवे एस. जी. | ०.२५% कमी दरानं |

तुलनात्मकदृष्टया कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.२५% कमी दराची श्री. वनवे एस. जी. यांची निविदा मंजूरीसाठी प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र. ६० चिकलठाणा येथे मनपा प्राथमिक आरोग्य केंद्राकरीता वॉचमन क्वार्टर बांधण्याच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.२५% कमी दराच्या श्री. वनवे एस. जी. याच्या दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी. सदर कामास याच सभेत सर्वानुमते स्विकृती देण्यात येते.

**विषय क्र. २८१/२१ :**

अतिरिक्त शहर अीीयंता यांनी प्रस्ताव दिला आहे की, कोहीनूर कॉलनी तसेच एम. एस. ई. बी. ऑफीस समोरच्या रस्त्याचे डांबरीकरण ९१-९२ च्या डी. एस. आर. दराप्रमाणे अंदाजपत्रक र. रु. १३,२८००/- चे बनविण्यात आले असून, मा. आयुक्तांनी दि. ०५-०४-९२ अन्वये मान्यता दिलेली आहे. सदरील काम शासकीय अनूदानातून करण्यात येईल.

सदरील कामासाठी कार्यालयीन निविदा नोटीस क्र. ६/मनपा/अशअ/३०७/९२ दि. १५-०६-९२ रोजी निविदा मागविल्या असता एकूण पाच निविदा विक्री झाल्यापैकी एकूण तीन दर निर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या.

त्यांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. खाज मोईनुउद्दीन | १.००% कमी |
| २. | श्री. डी. एस. जग्गी | २% कमी |
| ३. | श्री. पी. एम. चोरडीया | ११.४७% कमी |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ११.४७% कमी दराची श्री. पी. एम. चोरडीया यांची निविदा आहे. प्रस्ताव विचारार्थ मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, कोहीनुर कॉलनी तसेच एम. एस. ई. बी. ऑफीस समोरच्या रस्त्याचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ११.४७% कमी दराच्या श्री. पी. एम. चोरडीया यांच्या दरपत्रकात सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी. सदर कामास याच सभेत सर्वानुमते स्विकृती देण्यात येते.

**विषय क्र. २८२/२२ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, दिल्ली गेटच्या पुर्वेकडील रोडचे डांबरीकरण करण्याच्या कामासाठी सन ९१-९२ चे सा. बा. खात्याचे डी. एस. आर. दराने र. रु. २,४२,१००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून, त्यास दि. ११-०४-९२ रोजी प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे. सदरचा खर्च सन ९१-९२ च्या शासकीय अनूदानातून करण्यात येईल.

सदरील कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र. मनपा/अशअ/३०७/९२ दि. १५-०६-९२ चे निविदा सुचनेद्वारे स्थानिक वर्तमानपत्र दै. औरंगाबाद टाईम्स मध्ये प्रसिध्द करुन प्रगट निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या नियोजीत दि. ०२-०७-९२ पर्यंत एकूण तीन निविदा विक्री झाल्या पैकी दोन दर निर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या त्या खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. पी. एम. चोरडीया | ११.४७% कमी दराने |
| २. | श्री. डी. एस. जग्गी | ७% कमी दराने |

तुलनात्मकदृष्टया कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ११.४७% कमी दराची श्री. पी. एम. चोरडीया यांची निविदा आहे. प्रस्ताव मंजूरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, दिल्लीगेटच्या पुर्वेकडील रोडचे डांबरीकरण करण्याच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ११.४७% कमी दराच्या श्री. पी. एम. चोरडीया यांच्या दरपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी. सदर कामास याच सभेत सर्वानुमते स्विकृती देण्यात येते.

**विषय क्र. २८३/२३ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, भिमपूरा येथील ८० फुट डी. पी. रोडचे डांबरीकरण करण्याच्या कामासाठी सन ९१-९२ चे सां. बा. खात्याचे डी. एस. आर. दराने र. रु. ९८,०००/- चे तयार करण्यात आले असून, त्यास दि. १८-०६-९२ रोजी प्रशासकीय मान्यता मिळालेली असून, सदरचा खर्च सन ९१-९२ चे शासकीय अनूदानातून करण्यात येईल.

सदरील कामासाठी कार्यलयीन निविदा सूचना क्र. मनपा/अशअ/३०७/९२ दि. १५-०६-९२ द्वारे प्रगट निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या नियोजीत दिनांक ०२-०७-९२ पर्यंत एकूण पाच कोऱ्या निविदा विक्री झाल्या पैकी एकूण चार दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या त्या खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. पी. एम. चोरडीया | ११.४७% कमी |
| २. | श्री. डी. एस. जग्गी | ५% कमी दराने |
| ३. | श्री. खाजा मोईनोद्दीन | १% कमी दराने |
| ४. | श्री. गुरुनानक इंडस्ट्रीज | २% कमी दराने |

तुलनात्मकदृष्टया कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ११.४७% कमी दराची श्री. पी. एम. चोरडीया यांची निविदा असून, प्रस्ताव मंजूरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, भिमपूरा येथील ८० फुट डी. पी. रोडचे डांबरीकरण करण्याच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ११.४७% कमी दराच्या श्री. पी. एम. चोरडीया यांच्या दरपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी. सदर कामास याच सभेत सर्वानुमते स्विकृती देण्यात येते.

**विषय क्र. २८४/२४ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, चिकलठाणा येथील लहान पुलासाटी दगडी पिचींग करण्याच्या कामासाठी सन ९१-९२ च्या सा. बांध खात्याचे डी. एस. आर. दराने र. रु. ९९,१७७/- चे तयार करण्यात आले असून, त्यास दि. ०८-०८-९२ रोजी प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे. सदरचा खर्च सन ९२-९३ च्या " भांडवली रस्ते " या शिर्षकातून करण्यात येईल.

सदरील कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र मनपा/अशअ/९२ दि. १५-०६-९२ चे निविदा सुचनेद्वारे दै. औरंगाबाद टाईम्स, या वर्तमानपत्रात जाहिरात देऊन प्रगट निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या नियोजीत दि. ०२-०७-९२ पर्यंत एकूण १७ कोऱ्या निविदा विक्री झाल्या. पैकी तीन दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या त्या खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. सय्यद सिराजउद्दीन | अंदाजपत्रकीय दराने |
| २. | श्री. कुलवंतसिंग | २% जास्त दराने |
| ३. | मे. मे. एस. एच. असोसिएटस | ५% जास्त दराने |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दराने अ. सय्यद सिरजउद्दीन यांची निविदा आहे. प्रस्ताव मंजूरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, चिकलठाणा येथील लहान पुलासाठी दगडी पीचींग करणेच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दराच्या श्री. सय्यद सिराजउद्दीन यांच्या दरपत्रकास मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी. सदर कामास याच सभेत सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

**विषय क्र. २८५/२५ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, शहनुरमियॉ दर्गाजवळील सन ३१ व ३२ मधील विरसिंग पॅकेस मधील खडी रस्त्याचे काम करण्यासाठी सन ९१-९२ चे सा. बा. खात्याचे डी. एस. आर. दराने र. रु. २,७२,२००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून, त्यास दि. ०९-०४-९२ रोजी प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे. सदरचा खर्च सन ९१-९२ च्या शासकीय अनूदानातून करण्यात येईल.

सदरील कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र. मनपा/अशअ/३०७/९२ दि. १५-०६-९२ चे निविदा सुचनेद्वारे दैनिक औरंगाबाद टाईम्स या स्थानिक वर्तमानपत्रात जाहिरात प्रसिध्द करुन प्रगट निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या नियोजीत दिनांकापर्यंत एकूण तेरा निविदा विक्री झाल्या पैकी एकूण चार दर निर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या त्या खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. कुलवंतसिंग | ०.१०% कमी दराने |
| २. | श्री. कैसरखान | ३% जास्त दराने |
| ३. | श्री. मौला अलीयारखान | ४% जास्त दराने |
| ४. | मे. आनंद बिल्डर्स | ४% जास्त दराने |

तुलात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ०.१०% कमी दराची श्री. कुलवंतसिंग याची निविदा आहे. प्रस्ताव मंजूरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शहनुरमियॉ दर्गा जवळली स. नं. ३१ व ३२ मधील विरसिंग पॅलेस मधील खडी रस्त्याचे काम करण्यासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा श्री. कुलवंतसिंग यांच्या ०.१०% कमी दराच्या दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी. सदर कामास याच सभेत सर्वानुमते स्विकृती देण्यात येते.

**विषय क्र. २८६/२६ :**

अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, बन्सीलाल नगर ते झोन नं. ९ कार्यालयापर्यंत आर. टी. ओ. ऑफीस जवळील रोडचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी सन ९१-९२ च्या सां. बा. खात्याचे डी. एस. आर. दराने रक्कम रु. २,४३,५००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून, त्यास दि. ०९-०५-९२ रोडची प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे. सदरचा खर्च सन ९१-९२ च्या शासकीय अनूदानातून करण्यात येईल.

सदरील कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र. मनपा/अशअ/३०७/९२ दि. १५-०६-९२ चे निविदा सुचनेद्वारे स्थानिक वर्तमानपत्र दै. औरंगाबाद टाईम्समध्ये प्रसिध्द करुन प्रगट निविदा मागविल्या असता एकूण चार कोऱ्या निविदा विक्री झाल्या पैकी तीन दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या त्या खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. पी. एम. चोरडीया | ११.४७% कमी दराने |
| २. | श्री. डी. एस. जग्गी | ५% कमी दराने |
| ३. | मे. गुरुनानक इंडस्ट्रीज | ५% कमी दराने |

तुलात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ११.४७% कमी दराची श्री. पी. एम. चोरडीया यांची निविदा आहे. प्रस्ताव मंजुरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, बन्सीलालनगर ते झोन नं. ६ कार्यालयापर्यंत आर. टी. ओ. ऑफीस जवळील रोडचे डांबरीकरण करणेच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ११.४७% कमी दराच्या श्री. पी. एम. चोरडीया याचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी. सदर कामास याच सभेत सर्वानुमते स्विकृती देण्यात येते.

**विषय क्र. २८७/२७ :**

उप आयुक्त महानगरपालिका औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला की, चिफ वाईल्ड लाईफ वॉर्डन, कर्नाटक याचे प्रपत्र क्र. सी-१ सी. डब्ल्यु एल-जी-१-६४७८/९१-९२ दिनांक २२-०८-९२ (इंग्रजित) नुसार कर्नाटक शासनाचे पत्र क्रमांक एएचएफएफ-१ एफ डब्ल्यु एल-९२ बंगलोर दिनांक १२-०८-९२ नुसार (इंग्रजीत) प्राणी संग्राहालय महानगरपालिका यांना दोन हत्तीचे पिल्लु आणणे करीता रु. १,१०,०००/- अधिक २१% कर डिमांड ड्रफ्ट द्वारे पाठविणेस कळविले आहे. करीता रु. १,१०,०००/- व अधिक २१/कर एवढी एकूण रु. १,३३,१००/- निर्देशित कार्यालयात पाठविणेस व मोबदल्यात हत्तीचे दोन पिल्लू आणणे करीता. प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महापालिका प्राणी संग्राहालाया करीता हत्तीचे दोन पिल्लू आणणे करीता चिफ वाईल्ड लाईफ वॉर्डन कर्नाटक यांचेकडे रक्कम रु. १,१०,०००/- अधिक २१% कर एवढी एकूण रक्कम रु. १,३३,१००/- ची मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी. सदर कामास याच सभेत सर्वानुमते स्विकृती देण्यात येते.

**विषय क्र. २८८/२८:**

उप आयुक्त यांनी सादर केला की, स्थायी समिती ठराव क्र. ९१०/९१ दि. २९-०४-९२ अन्वये खालील चार सुरक्षा रक्षकांना इतर सुरक्षा रक्षकासमान वेतन श्रेणी रु. ८२५/१२०० लागू करण्यास मंजूरी देण्यात आली आहे. परंत ठरावामध्ये वेतन श्रेणी अमंलबजावणीची तारीख दिलेली नाही. तरी ही वेतन श्रेणी केव्हापासून लागू करायची हे निश्चित करणे.

१. श्री. आर. के. भारसाखळे
२. श्री. जनार्धन वाघुळे
३. श्री. रुपचंद वाघमारे
४. श्री. बाबु दशरथ

वरील कर्मचारी दिनांक ०२-०१-८६ पासून सुरक्षा रक्षक म्हणुन काम करीत आहेत.`

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, चार सुरक्षा रक्षकांना रुपये ८२५-१२०० ही वेतनश्रेणी दिनांक ०२-०१-१९८६ पासून लागू करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी. सदर ठरावास याच सभेत सर्वानुमते स्विकृती देण्यात येते.

## *ऐनवेळचे विषय*

**विषय क्र. २८९/२९ :**

उप आयुक्त महानगरपालिक औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला की, महानगपालिका कोईमतूर (तामिळनाडू) यांचे (इंग्रजीत) पत्र क्रमांक ८३५७८/९२ ई-४ दिनांक १०-०८-९२ नुसार त्यांनी १ नर व १ मादी चित्यांची मागणी केलेली आहे. प्रत्येक चित्याचे "स्वामीत्व शुल्क " (रॉयल्टी) " रक्कम रु. ५,०००/- (रुपये दहा हजार फक्त) प्रत्येकी प्रमाणे एकूण रक्कम रु. १०,०००/- (रुपये दहा हजार फक्त) मध्ये देण्याबद्दल विचार व्हावा. कारण प्राणी संग्राहालयात संध्या एकूण १६ (सोळा चीत्ते (६ नर व १० मादया) आहेत मान्य झाल्यास तसेच उपरोक्त महानगरपालिकेस पत्र देण्याबाबतची कार्यवाही करण्यात येईल. प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगाबाद महानगरपालिका प्राणी संग्राहालयातील दोन चित्यांकरीता (एक नर व एक मादी) प्रत्येकी रुपये ५००० (पाच हजार रुपये " स्वामीत्व शुल्क याप्रमाणे १०,०००/- मध्ये दोन चित्ते महानगरपालिका काईमतूर (तामिळनाडू) यांना देण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी. सदर ठरावास याच सभेत सर्वानुमत स्विकृती देण्यात येते.

**विषय क्र. २९०/३० :**

मोहल्ला दिवान देवडी येथील पावन गणपती गणेश मंडळाने दिवान देवडी येथील महानगरपालिकेच्या जागेवर गणपती बसविलेला आहे. सदर भागामध्ये कोठेही गणपतीचे

मंदिर नसल्या कारणानाने या भागातील नागरिकांनी या ठिकाणी गाणपती मंदिर होण्यासाठी विनंती केली आहे. करीता महानगरपालिकेने दिवान देवडी येथे पावन गणपती गणेश मंडळाने बसविलेल्या गणपती च्या ठिकाणी १८' x २०' ची जागा ९९ वर्षाच्या करारावर १० ते २० या नॉमिनल भाडे तत्वावर मंडळास उपलब्ध करुन द्यावी. करीता स्थायी समितीच्या मंजूरीस्तव सादर.

**सुचक :** श्री. मधुकर शिंदे
**अनुमोदक :** श्री. बंडु ओक
**दिनांक :** १७-०९-९२

**संवाद :**

**श्री. अजिजुल्ला बेग, श्री. जावेद हसनखान :** प्रस्तावात मागणी केलली मोहल्ला दिवान देवडी येथील जागा ही सालारजंग मालकीची आहे. तेव्हा ती जागा मंदिरासाठी देता येणार नाही.

**ठराव :**

सर्वानुमते असे ठरले की, प्रस्तावात मागणी केल्याप्रमाणे मोहल्ला दिवान देवडी येथील जागा महानगरपालिकेच्या मालकीचे असेल तर मोहल्ला दिवानदेवडी येथे पावन गणपती गणेश मंडळाने बसविलेल्या गणपतीच्या ठिकाणी १८' x २०' फुटची जागा ९९ वर्षाचे करारावर रुपये १० ते २० या नॉमिनल भाडे तत्वावर मंडळास देण्यास हरकत नाही.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

यांनतर सभेचे कामकाज संपल्याचे मा. सभापती यांनी जाहिर केले.

| | |
|---|---|
| स्वाक्षरित/- | स्वाक्षरित/- |
| सचिव, | सभापती, स्थायी समिती |
| महानगरपालिका, औरंगाबाद. | महानगरपालिका, औरंगाबाद. |

# *औरंगाबाद महानगरपालिका औरंगाबाद*

**दिनांक १७-१०-९२ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचा इतिवृत्तांत. शनिवार दिनांक १७-१०-९२ रोजी दुपारी ३.०० वाजता समिती सभागृहात मा. सभापती श्री. अँड इकबालसिंग गिल यांच्या अध्यक्षतेखाली स्थायी समिती सभेस सुरुवात झाली. या सभेस कार्यलयीन अधिकाऱ्यासह निम्ननिर्दिष्ट सभासद खालील प्रमाणे उपस्थित होते.**

१) श्री. नारायण मोहन फत्तेलष्कर
२) श्री. भगुरे तुळशीराम छगन
३) श्री. गिरजाराम नानाराव हाळनोर
४) श्री. विजय गोविंदलाल पालीवाल
५) श्री. जावेद हसनखान कासिमहसन खान
६) श्री. अजिजुल्ला बेग वाहेद बेग
७) श्री. पेरकर विठ्ठल कोडांजी
८) श्री. शिंदे मधुकरराव माणिकरराव
९) श्री. ओक जयवंत केशवराव

**विषय क्र. २९१/१ :**

दिनांक २१-०९-९२ रोजीची स्थायी समिती सभा काही अपरिहार्य कारणामुळे पुढे ढकलण्यात आली. दिनांक ३०-०९-९२ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समिती सभेचे इतिवृत्तात कायम करणे.

**ठराव :**

दिनांक ३०-०९-९२ रोजी संपन्न झालेल्या स्थायी समितीचे इतिवृत्त कायम करण्यास सर्वानमते मंजूरी देण्यात येते.

**विषय क्र. २९२/२ :**

पाणी पुरवठा विभाग-२ मधील (सिडको) झोन क्र. ७ अंतर्गत येणाऱ्या जलवाहिन्या दुरुस्ती व देखाभाल करण्याचे कामासाठी परिसर अभियांत्रिकी यांचे ९१-९२ च्या दरसुची प्रमाणे रुपये ४,९०,३००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे.

सदर कामाचा खर्च पाणी पुरवठा (एम ॲण्ड आर) या शिर्षकामधुन करण्यात येईल तरी रुपये ४,९०,३००/- चे अंदाजपत्रक मंजूरीसाठी प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, पाणी पुरवठा विभाग-२ (सिडको) झोन क्र. ८२ अंतर्गत येणाऱ्या जलवाहिनी दुरुस्ती व देखभाल करण्याच्या कामाकरीता रक्कम रुपये ४,९०,३००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २९३/३ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, वार्ड क्र. ९२ मो. नेहरु नगर येथे १५० मी. मी. व्यासाची आर. सी. सी. ड्रेनेज लाईन टाकणे बाबत अंदाजपत्रक रक्कम रुपये ६,८०,५५०/- चे सन १९९०-९१ या दरसुची प्रमाणे तयार करण्यात आलेले असून, सदरचा खर्च सन १९९२-९३ च्या भांडवली तरतूदतून करण्यात येईल. करीता प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे वार्ड क्र. १२ नेहरु नगर येथे १५० मी. मी. व्यासाची आर. सी. सी. ड्रेनेज लाईन टाकण्याच्या कामाकरीता रक्क्म रुपये ६,८०,५५०/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २९४/४ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, झोन क्र. ४ मधील दैनंदिन पाणी पूरवठा वितरण व्यवस्थेची दुरुसती करणे. सदरील कामाचे अंदाजपत्रक हे परिसर अभियांत्रिकी विभागाची दरसुची सन १९९१-९२ नुसार रक्कम रुपये २,६२,०००/- एवढयाचे तयार करण्यात आले आहे. त्यास प्रशासकीय मान्यता घेण्यात आलेली आहे. तरी सदर अंदाजपत्रक र. रु. २६२०००/- या स मंजुरीस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, झोन क्र. ४ मधील दैनंदिन पाणी पुरवठा वितरण व्यवस्थेची दुरुस्ती करण्याच्या कामाकरीता रक्कम रुपये २,६२,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २९५/५ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, झो. क्र. ३ मधील दैनंदिन पाणी पुरवठा व्यवस्थेची दुरुस्ती करणे. सदर कामाचे अंदाजपत्रक हे परिसर अभियांत्रिकी विभागाची दरसुची सन १९९१-९२ नुसार रक्कम रुपये २,७५,९००/- एवढयाचे तयार करण्यात आले आहे. त्यास प्रशासकीय मान्यता घेण्यात आलेली आहे.

तरी सदर कामाचे अंदाजपत्रक रक्कम रुपये २,७५,९००/- यास मंजूरीस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, झोन क्र. ३ मधील दैनंदिन पाणी पुरवठा वितरण व्यवस्थेची दुरुस्ती करण्याच्या कामाकरीता रुपये २,७५,९००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २९६/६ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, झोन क्र. १ मधील पाणी पुरवठा वितरण व्यवस्थेची दुरुस्ती वर्ष सन १९९२-९३ मध्ये करणे सादर कामाचे अंदाजपत्रक परिसर अभियांत्रिकी विभागाची सन १९९२-९२ च्या दरसुचीनुसार रक्कम रुपये २,१९,०००/- चे तयार करण्यात आलेले आहे. त्यात प्रशासकीय मान्यता घेण्यात आलेली आहे.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, झोन क्र. १ मधील दैनंदिन पाणी पुरवठा वितरण व्यवस्थेची दुरुस्ती करण्याच्या कामाकरीता रुपये २,१९,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २९७/७ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, झोन क्र. २ अंतर्गत पाणी पुरवठा व्यवस्थेची दुरुस्ती वर्षे १९९२-९३ मध्ये करणे. सदर कामाचे अंदाजपत्रक परिसर

अभियांत्रिकी विभागची सन १९९१-९२ च्या दरसुचीनुसार रक्कम रुपये २,५६,०००/- चे तयार करण्यात आले असून, त्यास प्रशासकीय मान्यता घेण्यात आलेली आहे.

तरी सदर कामाचे अंदाजपत्रक रक्कम रुपये २,५६,०००/- यास मान्यतेस्तव प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, झोन क्र. २ मधील दैनंदिन पाणी पुरवठा वितरण व्यवस्थेची दुरुस्ती करण्याच्या कामाकरीता रुपये २,५६,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २९८/८ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो. किराडपूरा येथील साईट क्रमांक २०५ मनपाच्या खुल्या जागेवर संरक्षित भिंत बांधणे बाबतचे कामासाठी सा. बा. खात्याचे सन १९९१-९२ दरसुचीनुसार रक्कम रुपये ४,५२,८००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले. सदरचा खर्च विकास योजना अंतर्गत भुखंडाचे संरक्षण या शिर्षकामधुन करण्यात येईल. प्रस्ताव मंजूरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, किराडपूरा येथील साईट क्र. २०५ या मनपाच्या खुल्या जागेवर संरक्षित भिंत बांधण्याच्या कामाकरीता रक्कम रुपये ४,५२,८००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. २९९/९ :**

मा. शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो. भिमपूरा उस्मानपूरा येथे वाचनालय बांधणेच्या कामासाठी सन १९९१-९२ चे सां. बा. खात्याचे डी. एस. आर. दराने रक्कम रुपये २,१३,८६१/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. सदरचा खर्च स. माजी महापौर यांचे स्वच्छा निधीतून उर्वरीत खर्च इतर इमारती व उर्वरीत कामे या मनपा शिर्षकामधून करण्यात येईल तरी अंदाजपत्रक रक्कम रुपये २,१३,८६१/- मजूरीसाठी प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, भिमपूरा, उस्मानपूरा येथे वाचनालय बांधण्याच्या कामाकरीता रक्कम रुपये २,१३,८६१/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते. सदर कामाचा खर्च सन्माननीय माजी महापौर श्री. ओबेरॉय यांच्या स्वेच्छा निधीतून व उर्वरीत खर्च इतर इमारती आणि उर्वरीत कामे या शिर्षकातून करण्यात यावी.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३००/१० :**

मा. शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, औरंगपुरा भाजी मार्केटच्या रोड वरील न्यायालयात दुकानाचे (३१) बांधकाम करण्याचे कामाचे सन ९१-९२ चे सा. बा. खात्याचे डी. एस. आर. दराने रक्कम रुपये ७,२०,०००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे.

रंगारगल्ली येथील दुकाने डी. पी. रोडमध्ये तूटत असल्याने माजी महापौर श्री. जैस्वाल व स. आमदार श्री. चंद्रकांत खैरे यांनी मागणी केल्यानुसार औरंगपूरा भाजी बाजार लगत एकूण एकतिस दुकाने बांधणे अत्यंत आवश्यक आहे. सदरचा खर्च इतर इमारती व उर्वरित कामे या शिर्षकामधून करण्यात येईल. तरी अंदाजपत्रक रक्कम रुपये ७,२०,०००/- मंजूरीसाठी प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, औरंगपुरा भाजी मार्केटच्या रोडवरील नाल्या लगत ३१ (एकतिस) दुकांनाचे बांधकामासाठी रक्कम रुपये ७,२०,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३०१/११ :**

मा. शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो. महात्मा फुले नगर येथे असलेल्या सार्वजनिक शौचालयास एकंदरीत तीस बैठकी शौच्छाल्याची वाढ करण्याच्या कामासाठी सन १९९१-९२ चे सार्वजनिक बांधकाम खात्याचे डी. एस. आर. दराने रक्कम रुपये २,७७,५००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे. सदरची मागणी ही स. सदस्य श्री. गंगाधार गाडे यांची आहे. तरी अंदाजपत्रक रक्कम रुपये २,७७,५००/- मंजूरीसाठी प्रस्ताव विचारार्थ सादर. सदरचा खर्च इतर इमारती व उर्वरित कामे या शिर्षकामधुन करण्यात येईल.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महात्मा फुलेनगर येथे अस्तित्वात असलेल्या सार्वजनिक शौचालयास एकंदरीत ३० बैठकीत शौचाल्याची वाढ करण्याकरीता रक्कम रुपये २,७७,५००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३०२/१२ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, आरेफ हौसिंग सो. मधील मनपाच्या खुल्या जागेस रिटेनींग वॉलसह तारकुंपण करणे बाबत कामासाठी सां. बा. खात्याचे सन १९९१-९२ च्या दरसुची नुसार रक्कम रुपये ३,७८,३२५/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले. सदरचा खर्च विकास योजना अंतर्गत संरक्षण या शिर्षकामधुन करण्यात येईल. प्रस्ताव मंजूरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, आरेफ हौसिंग सोसायटी मधील मनपाच्या खुल्या जागेस रिटेंनीग वालसह तार कुंपण करण्याच्या कामाकरीता रक्कम रुपये ३,७८,३२५/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३०३/१३ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, वार्ड क्र. ४ आरेफ कॉलनी येथे ३०० मी. मी. व्यासाची आर. सी. सी. ड्रेनेज लाईन टाकणे बाबत अंदाजपत्रक रक्कम रुपये २,६७,०००/- ला स्थायी समितीचा ठराव क्र. २३/२० दिनांक ०१/०६/९२ नुसार मंजूरी

मिळालेली आहे. तसेच सदर कामाचा समावेश प्राप्त शासकीय अनूदान १९९१-९२ मध्ये करण्यात आलेले आहे.

आदेशानुसार सदर कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र. ९/९२०/९२ दिनांक २६-०६-९२ ला दैनिक तरुण भारत व लोकधर्म या स्थानिक वर्तमानपत्रात जाहिरात देवून बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता एकूण सहा निविदा विकण्यात आलेल्या होत्या त्यापैकी केवळ तीन निविदा प्राप्त झालेल्या असून त्यांचा तुलनात्मक दर खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | मे. जाधव कंस्ट्रक्शन | ४.९९% जास्त |
| २. | श्री. आनंद बिल्डर्स | ७.५% जास्त |
| ३. | श्री. बी. आर. आनंद | १६% जास्त |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.९९% जास्त दराचे मे. जाधव कंस्ट्रक्शन यांचे आहे. परंतू सदर दर योग्य वाटत नसल्यामुळे संबंधित गुत्तेदार यांना दर वाटाघाटी करीता.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र. ४ आरिफ कॉलनी येथे ३०० मी. मी. व्यासाची आर. सी. सी. ड्रेनेज लाईन टाकण्याच्या कामाकरीता दिनांक १५-०९-९२ रोजी मे. जाधव कंस्ट्रक्शन यांचेशी झालेल्या वाटाघाटीनुसार फक्त काम संबंधित एजन्सीकडून अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ३% जास्त दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३०४/१४ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो. अशोकनगर मजनूहील वार्ड क्र. १४ येथे १०० मी. मी. व्यासाची सांडपाणी व ड्रेनेज कनेक्शन मुख्य जलवाहिनीला जोडणे बाबत अंदाजपत्रक रक्कम रुपये ८५,४००/- चे सन ९१-९२ च्या दरसुचीप्रमाणे तयार करण्यात आलेले असून, सदरचा खर्च ९२-९३ चा स्लम विभागाचा तरतूदीतून करण्यात येईल. तसेच मा. आयुक्त यांनी सदरील अंदाजपत्रकास मंजूरी दिलेली आहे.

आदेशानुसार सदर कामासाठी कार्यलयीन निविदा सुचना क्र. १०/९३२/९२ दिनांक ३०/०६/९२ दैनिक मुक्कदस, स्वरगंगा, रहेबर या स्थानिक वर्तमानपत्रात जाहिरात देवून बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता एकूण आठ निविदा विकण्यात आलेल्या होत्या. त्यापैकी केवळ तीन निविदा प्राप्त झालेल्या असून, त्यांचा तुलनात्मक दर खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. सईदखान | ४.९९% जास्त |
| २. | श्री. मिर्झा आर. बी. | ७% जास्त |
| ३. | श्री. आनंद बिल्डर्स | ६.३% जास्त |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.९९% जास्त दराचे श्री. सईदखान यांचे दरपत्रक आहे. परंतू दर योग्य वाटत नसल्यामुळे संबंधित गुत्तेदार यांना मा. आयुक्त यांनी दर वाटाघाटीसाठी बोलाविण्यात आले होते. दिनांक १५-०९-९२ ला मा. आयुक्त मा. मुख्यलेखापरीक्षक व मा. कार्यवाही अभियंता यांचा समक्ष वाटाघाटी झाली.

संबंधित गुत्तेदार श्री. सईदखान यांनी ४.९९% जास्त दराऐवजी ३.०% जास्त दराने काम करण्यास संमती दिलेली आहे. करीता प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, अशोकनगर, मजनूहील वार्ड क्र. १४ येथे १०० मी. मी. व्यासाची सांडपाणी व ड्रेनेज कनेक्शन मुख्य जलनि:सारण वाहिनीला जोडण्याच्या कामाकरीता दिनांक २५-०९-९२ रोजी गुत्तेदार, श्री. सईदखान यांचेशी झालेल्य वाटाघाटीनुसार उक्त काम संबंधित गुत्तेदाराकडून अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ३% जास्त दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवावही व्हावी.

**विषय क्र. ३०५/१५ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, वार्ड क्र. ३२ त्रिमुर्ती हाऊसिंग सोसायटी कटकट गेट येथे १५० मी. मी. व्यासाची आर. सी. सी. ड्रेनेज लाईन टकाणे बाबत अंदाजपत्रक रक्कम रुपये १,५५,२००/- ला स्थायी समितीचा ठराव क्र. ५३२/१८ दिनांक २०-०४-९२ नुसार मंजूरी मिळालेली आहे. तसेच सदर कामाचा समावेश प्राप्त शासकीय अनूदान सन १९९१-९२ च्या यादीत करण्यात आलेला आहे.

आदेशानुसार सदर कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र. ८/८९४/९२ दिनांक २०-०६-९२ ला दैनिक अंजिठा, आलमगीर टाईम्स, देवगीरी तरुण भारत, औरंगाबाद टाईम्स, या वर्तमानपत्रात जाहिरात देवून बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता एकूण पंधरा निविदा विकण्यात आलेल्या होत्या त्यापैकी केवळ आठ निविदा प्राप्त झालेल्या असून, त्यांचा तुलनात्मक दर खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. कैसरखान | ७% जास्त |
| २. | श्री. स. रफीकउद्दीन | १०% जास्त |
| ३. | स. सिराजउद्दीन | ११.५% जास्त |
| ४. | श्री. एस. ए. बहोद्दीन | ९% जास्त |
| ५. | श्री. मिर्झा आर. बी. | ५% जास्त |
| ६. | श्री. जे. जे. भारुका | ११% जास्त |
| ७. | श्री. एच. एल. मोईनोउद्दीन | १०.१०% जास्त |
| ८. | श्री. बी. आर. आनंद | १५% जास्त |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५% जास्त दराचे श्री. आर. बी. मिर्झा यांचे दरपत्रक आहे. परंतू संबंधित गुत्तेदार यांचा दर योग्य वाटत नसल्यामुळे संबंधित गुत्तेदार श्री. मिर्झा आर. बी. यांना दर वाटाघाटी करीता बोलाविण्यात आले. मा. आयुक्त, मुख्य लेखा परीक्षक, मा. कार्यकारी अभियंता यांच्या समक्ष दिनांक १५-०९-९२ ला दर वाटाघाटी करण्यात आली. संबंधिताने ५% जास्त दराऐवजी ४% जास्त दराने काम करण्यास संमती दर्शविलेली आहे. करीता प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, त्रिमुर्ती हाऊसिंग सोसायटी कटकट गेट येथे १५० मी. मी. व्यासाची आर. सी. सी. ड्रेनेज लाईन टाकण्याच्या कामाकरीता दिनांक १५-०९-९२ रोजी गुत्तेदार श्री. मिर्झा आर. बी. यांच्याशी झालेल्या वाटाघाटी नुसार उक्त काम संबंधित

गुत्तेदाराकडून अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ४% जास्त दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३०६/१६ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, वार्ड क्र. विद्यानिकेतन कॉलनी येथे १५० मी. मी. व्यासाची आर. सी. सी. ड्रेनेज लाईन टाकणे बाबत अंदाजपत्रक रक्कम रुपये ५०,७००/- चे तयार करण्यात आलेले असून, सदरचा खर्च सन ९२-९३ च्या भांडवली तरतूदीतून करण्यात येईल. तसेच सदरील अंदाजपत्रकास मा. आयुक्त यांनी मंजूरी दिलेली आहे.

आदेशानुसार सदर कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र. ५/७६१/९२ दिनांक २०-०५-९२ ला दैनिकात जाहिरात देवून बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता एकूण सात निविदा प्राप्त झालेल्या होत्या त्यापैकी सर्वात कमी दराची म्हणजे २२% कमी दराची निविदा होती. सदरचा दर फारच कमी असल्यामुळे स्थायी समितीचा ठराव क्र. १३०/३ दिनांक ०४-०७-९२ नुसार सदर काम करीता पून्हा निविदा पत्रके मागवित असे ठरले. तद्नंतर आदेश प्रमाणे सदर कामासाठी कार्यलयीन निविदा सुचना क्र. ११/११३३/९२ दिनांक १९-०८९२ ला दुसऱ्यांदा दैनिक अंजिठा, आलमगीर टाईम्स, लोकमत व रहेबर या वर्तमानपत्रात जाहिरात देवून बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता एकूण १२ निविदा विकण्यात आलेल्या असता एकूण बारा निविदा विकण्यत आलेल्या होत्या त्यापैकी केवळ एकच निविदा अंदाजपत्रकीय दरापेक्षा १६% कमी दराची निविदा श्री. मिर्झा आर. बी. यांची प्राप्त झालेली आहे. करीता प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, विद्यानिकेतन कॉलनी यांचे १५० मी. मी. व्यासाची आर. सी. सी. ड्रेनेज लाईन टाकण्याच्या कामाकरीता अंदाजपत्रकीय दरापेक्षा १६% कमी दराया श्री. मिर्झा आर. बी. यांच्या दरपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३०७/१७ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मरिमाता सेहलिंग टॅकसाठी संरक्षित भिंत बांधावयाची आहे. सदरील कामाचा खर्च हा शासकीय अनूदान सन १९९०-९१ मधुन करण्यात येणार आहे. सदरील कामाचे अंदाजपत्रक हे परिसर अभियांत्रिकी विभागाची दरसुची सन १९९०-९१ नुसार रक्कम रुपये २,९३,५००/- चे तयार करण्यात येवून त्यास प्रशासकीय मान्यता घेण्यात आलेली आहे या कार्यालयाची निविदा सुचना क्र. २४/९२-९३ दिनांक ०६-०८-९२ जी की दैनिक लोकमत टाईम्स सिटीजन्स रहेबर या वर्तमानपत्रा प्रसिध्दीस देवून बी-१ निविदा मागविण्यात आल्या कोऱ्या निविदा विक्रीच्या अंतिम तारखे पर्यंत एकूण ११ (अकरा) निविदा विक्री झाल्या व सिलबंद निविदा स्विकारण्याच्या नियोजीत तारखेस एकच निविदा प्राप्त झाली ती खालील प्रमाणेच आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. सय्यद सिरजउद्दीन | ३.१३% कमी |
| २. | श्री. बी. आर. आनंद | १३.१९% जास्त |
| ३. | श्री. आनंद बिल्डर्स | ४.९९% जास्त |
| ४. | श्री. मौला अली यार खान | ५% जास्त |
| ५. | श्री. एम. ए. अजिम | ५.५०% कमी |
| ६. | श्री. सुखबीरसिंग | २५.००% जास्त |
| ७. | श्री. कैसरखान | १.००% कमी |

वरील प्रमाणेच्या तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दर हा श्री. एम. ए. अजिज यांचा आहे. म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५.५०% कमी असा दर दिला आहे.

**ठराव :**

प्रस्तावित कामासाठी पुन्हा दरपत्रके मागविण्यात यावे असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. ३०८/१८ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, कोरला जलकुंभ ते महावीर चौक पर्यंत २०० मी. मी. व्यासाची सी. आय. जलवाहिनी टाकावयाची आहे. सदर कामाचा खर्च हा शासकीय अनूदानातून सन ९१-९२ मधुन करण्यात येणार आहे. सदरील कामाचे अंदाजपत्रक हे परिसर अभियांत्रिकी विभागाची दरसुची सन ९१-९२ नुसार रक्कम रुपये ७,४३,८००/- चे तयार करण्यात येऊन त्यास प्रशासकीय मान्यता घेण्यात आली आहे.

या कार्यालयाची निविदा सुचना क्र. ९४९/९२ दि. १३-०५-९२ जी की, दैनिक लोकवजिय, मुफस्सीर, मराठवाडा, औरंगाबाद टाईम्स या वर्तमानपत्रात प्रसिध्दीस देण्यात येऊन बी-१ निविदा मागविण्यात आल्या कोऱ्या निविदा विक्रीच्या अंतिम तारखेस पर्यंत फक्त एकच निविदा विक्री झाली व सिलबंद निविदा स्विकारण्याच्या नियोजीत तारखेस एकच निविदा प्राप्त झाली ती खालील प्रमाणेची आहे.

१. श्री. ई. एम. सजनानी २४% जास्त

गुत्तेदारांनी दिलेला दर हा कार्यालयात जास्त वाटत असल्यामुळे मा. आयुक्त दालनात दिनांक १५-०९-९२ रोजी गुत्तेदारा बरोब दराबाबत वाटाघाटी करण्यात आली असता दराचे काम हे १७% जास्त या दराने करण्यास संमती दिली आहे.

तरी श्री. ई. एम. सजनानी यांच्या वाटाघाटी अंतीचा दर म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा १७% जास्त दराची निविदा मंजुरीस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, कोठला जलकुंभ ते महवीर चौकापर्यात २०० मी. मी. व्यासाची सी. आय. जलवाहिनी टाकण्याच्या कामाकरीता दिनांक १५-०९-९२ रोजी गुत्तेदार श्री. ई. एम. सजनानी याचे बरोबर झालेल्या वाटाघाटीनुसार उक्त काम संबंधित गुत्तेदारांकडून अंदाजपत्रकाच्या दरापेक्षा १७% जास्त दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३०९/१९ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मा. प. विधी महाविदयालय ते वरद गणेश मंदिरापर्यंत १०० मी. मी. व्यासाची सी. आय. जलवाहिनी टाकण्याच्या कामासाठी रक्कम रुपये ३,९२,०५०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील अंदाजपत्रक परिसर अभियांत्रिकी बांधकाम हयांच्या सन १९९१-९२ च्या दरसुचीप्रमाणे तयार करण्यात त्यास मा. आयुक्त यांनी दिनांक १५-०३-९२ रोजी मंजूरी दिलेली आहे. सदरील काम हे शासकीय अनूदान १९९१-९२ मधुन करावयाचे आहे. त्यानुसार कार्यालयामार्फत बी-१ नमुन्यात जाहीर निविदा क्र. मनपा/पापु/९४९/९२ दिनांक १३-०५-९२ अन्वये निविदा मागविण्यात आल्या सदरील निविदा प्रसिध्दीसाठी खालील वर्तमानपत्रात देण्यात आल्या. १)दैनिक लोकविजय, २) दै. मुफस्सीर, ३) दै. मराठवाडा, ४) दै. औरंगाबाद टाईम्स

विक्रीच्या अंतिम तारखेस म्हणजेच म्हणजे दिनांक २१-०५-९२ रोजी तिच निविदा दर भरुन प्राप्त झाली. सदरील निविदा श्री. ई. एम. सजनानी हयांची असून, त्यांनी निविवेत दिलेला दर हा अंदाजपत्रकीय दरापेक्षा २४% जास्त दराच्या आहे.

कार्यालयीन पत्र क्र. १२८५/९२ दिनांक ०४-०७-९२ अन्वये गुत्तेदार श्री. इ. एम. सजनानी त्यांनी दर कमी करण्याबाबत वाटाघाटीसाठी मा. आयुक्त यांचे दालनात दिनांक ०६-०७-९२ रोजी बोलाविले असता त्यांनी सदरील काम हे अंदाजपत्रकीय दरापेक्षा १७% जास्त दराने करावयास तयार असल्या बाबत समंती दिली आहे.

तरी गुत्तेदार श्री. इ. एम. सजनानी हयांनी समंती दिलेल्या दरास म्हणजे अंदाजपत्रकीय दरापेक्षा १७% जास्त दराच्या निविदेस मंजूरी मिळणेस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मा. प. विधी विद्यालय ते वरद गणेश मंदिरापर्यंत १०० मी. मी. व्यासाची सी. आय. जलवाहिनी टाकण्याच्या कामाकरीता दि. ०६-०७-९२ रोजी गुत्तेदार श्री. इ. एम. सजवानी यांचे सोबत झालेल्या वाटाघाटी नुसार उक्त काम संबंधित गुत्तेदाराकडून अंदाजपत्रकाचे दरापेक्षा १७% जास्त दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३१०/२० :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, समर्थनगर चौक ते टेलीफोन एक्सेचेंज पर्यंत १०० मी. मी. व्यासाची सी. आय. जलवाहिनी टाकण्याच्या कामासाठी रक्कम रुपये २,२९,४१०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. त्यास मा. आयुक्त यांची निविदा १७-०३-९२ रोजी मंजूरी मिळालेली आहे. त्यानुसार कार्यालयामार्फत निविदा क्र. मनपा/पापु/२४३/९२ दिनांक १३-०५-९२ अन्वये बी-१ नमुन्यात निविदा मागविण्यात आल्या सदरील निविदा प्रसिध्दीसाठी खालील वर्तमानपत्रात देण्यात आल्या.

१) दैनिक लोकविजय २) दै. मुफस्सीर, ३) दै. मराठवाडा, ४) दै. औरंगाबाद टाईम्स निविदा विक्रीच्या नियोजीत दिनांकास म्हणजे दिनांक २९-०५-९२ रोजी फक्त एक निविदा विक्री झाली व स्विकारणेच्या दिनांक २८-०५-९२ रोजी तीच निविदा दर भरुन प्राप्त झाली सदरील निविदा श्री. इ. एम. सजनानी हयांची असून त्यांनी दिलेला दर हा अंदाजपत्रकीय दरापेक्षा २४% जास्त दराचा आहे.

कार्यालयीन पत्र क्र. १२८८/९२ दिनांक ०४-०७-९२ अन्वये गुत्तेदार श्री. इ. एम. सजनानी यांना दर करण्याबाबत वाटाघाटीसाठी मा. आयुक्त यांच्या दालनात बोलविले असता त्यांनी सदरील काम करण्याबाबत वाटाघाटीसाठी मा. आयुक्त यांच्या दालनात बोलाविले असता त्यांनी सदरील काम हे अंदाजपत्रकीय दरापेक्षा १७% जास्त दराने करावयास तयार असल्याबाबत समंती दिली आहे.

तरी गुत्तेदार श्री. ई. एम. सजनानी यांनी संमती दिलेल्या दरास म्हणजे अंदाजपत्रकीय दरापेक्षा १७% जास्त दराच्या निविदेस मंजूरी मिळणेस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, समर्थनगर चौक ते टेलीफोन एक्सचेंजपर्यंत १०० मी. मी. व्यासाची सी. आय. जलवाहिनी टाकण्याच्या कामाकरीता दिनांक ०४-०७-९२ च्या पत्रका अन्वये गुत्तेदार श्री. इ. एम. सजनानी यांचे सोबत झालेल्या वाटाघाटीनुसार उक्त काम संबंधित गुत्तेदाराकडून अंदाजपत्रकाचे दरापेक्षा १७% जास्त दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३११/२१ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, एस. एस. सी. बोर्ड ते पद्मपुरा चौका पर्यंत ३०० मी. मी व्यासाची सी. आय. जलवाहिनी टाकण्याच्या कामासाठी रक्कम रुपये ६,९४,०५०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. सदरील अंदाजपत्रक परिसर अभियांत्रिकी बांधकाम हयांच्या सन ९१-९२ च्या दरसुची प्रमाणे तयार करण्यात आले त्यास मा. आयुक्त यांनी दिनांक ०६-०३-९२ रोजी मंजूरी दिलेली आहे. त्यानुसार कार्यालयामार्फत निविदा क्र. मनपा/पापू/१/९४९/९२ दिनांक १३-०५-९२ अन्वये बी-१ नमुन्यात जाहिर निविदा मागविण्यात आल्या सदरील निविदा प्रसिध्दीसाठी खालील वर्तमानपत्रात देण्यात आल्या १) दै. लोकविजय, २) दै. मुफ्फसीर, ३) दै. मराठवाडा, ४) दै. औरंगाबाद टाईम्स निविदा विक्रीच्या अंतिम तारखेस म्हणजे दिनांक २१-०५-९२ रोजी एक निविदा विक्री झाली व निविदा स्विकारण्याच्या तारखेस म्हणजे दिनांक २८-०५-९२ रोजी तिच निविदा दर प्राप्त झाली. सदरील निविदा ही श्री. ई. एम. सजनानी यांची असून, त्यांनी दिलेला दर हा अंदाजपत्रकीय दरापेक्षा २४% जास्त दराची आहे.

कार्यालयीन पत्रक रु. १२८७/९२ दिनांक ०४-०७-९२ अन्वये गुत्तेदार श्री. ई. एम. सजनानी हयांना दर कमी करण्याबाबत वाटाघाटीसाठी मा. आयुक्त यांच्या दालनात दिनांक ०६-०७-९२ रोजी बोलाविले असता त्यांची सदरील काम हे अंदाजपत्रकीय दरापेक्षा १७% जास्त दराने करावयास तयार असल्याबाबत समंती दिली आहे.

तरी गुत्तेदार श्री. इ. एम. सजनानी त्यांनी समंती दिलेल्या दरास म्हणजे अंदाजपत्रकीय दरापेक्षा १७% जास्त दराच्या निविदेस मंजूरी मिळणेस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, एस. एस. बोर्ड ते पद्मपुरा चौकापर्यंत ३०० मी. मी. व्यासाची सी. आय. जलवाहिनी टाकण्याच्या कामाकरीता दिनांक ०६-०७-९२ रोजी गुततेदार श्री. इ. एम. सजनानी यांचे सोबत झालेल्या वाटाघाटीनुसार उक्त काम संबंधित गुत्तेदाराकडून अंदाजपत्रकाचे दरापेक्षा १७% जास्त दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३१२/२२ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मिलकॉर्नर ते कामगार कल्याण केंद्रा पर्यंत १९० मी. मी. व्यासाची सी. आय. जलवाहिनी टाकावयाची आहे. सदरील कामाचे अंदाजपत्रक हे परिसर अभियांत्रिकी विभागाची दरसुची सन १९९१-९२ नुसार रक्कम रुपये २,९२,७५०/- चे तयार करण्यात आलेले आहे सदरील कामाचा खर्च हा शासकीय अनूदान सन १९९०-९२ मधुन करण्यात येणार आहे सदरील कामासाठी या कार्यालयाची निविदा सुचना क्र. ६७७/९२ दि. २०-०३-९२ ही दैनिक देवगीरी तरुण भारत, रहेबर, आलमगीर टाईम्स, अजिंठा या वर्तमानपत्रात प्रसिध्दीस देण्यात येवून बी-१ निविदा मागविण्यात आल्या. कोऱ्या निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण दोन निविदा विक्री झाल्या सिलबंद निविदा स्विकारणेच्या नियोजीत तारखेपर्यंत फक्त एकच सिलबंद निविदा प्राप्त झाली ती खालील प्रमाणे आहे.

१. श्री. संजय खर्डीकर २४% जास्त

ठेकेदारांनी दिलेला दर हा कार्यालयास जास्त वाटत असल्याने मा. आयुक्त यांच्या दालनात दिनांक १५-०९-९२ रोजी दरबाबात वाटाघाटी करण्यात आली असता ठेकेदार श्री. संजय खर्डीकर यांची सदरचे काम हे अंदाजपत्रकाचे दरापेक्षा १७% जास्त या दराने

करण्यास समंती दिली आहे. तरी वाटाघाटी अंतीची श्री. संजीव खर्डीकर यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा १७% जास्त दराची निविदा मंजूरीचा प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मिल कॉर्नर ते कामगार कल्याण केंद्रा पर्यंत १५० मी. मी. व्यासाची सी. आय. जलवाहिनी टाकण्याच्या कामाकरीता दिनांक १५-०९-९२ रोजी गुत्तेदार श्री. संजीव खर्डीकर यांच्याशी झालेल्या वाटाघाटीनुसार उक्त काम संबंधित गुत्तेदाराकडून अंदाजपत्रकाचे दरापेक्षा १७% जास्त दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३१३/२३ :**

१९९१-९२ च्या प्रशासकीय अनूदान अंतर्गत चिकलठाणा, जलकुंभापासून १५० मी. मी. व्यासाची ए. सी. पाईप लाईन टाकण्याचे कामाचे अंदाजपत्रक रुपये ८,१२,३५५/- तयार करण्यात आले असून, त्यास प्रशासकीय मंजूरी दिनांक ०८-०८-९२ रोजी मिळालेली आहे.

सदरील कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र. मनपा/पापू-२/६८९/९२ अन्वये स्थानिक वर्तमान पत्रामध्ये प्रसिध्द करुन निविदा मागविल्या असता विक्रीच्या नियोजीत दिनांक २०-०८-९२ पवितो एकूण आठ निविदा विक्री झाल्या असून, निविदा स्विकारण्याच्या नियोजीत दिनांक २५-०८-९२ ला एकूण तीन दरपत्रिका (निविदा) प्राप्त झाल्या असून, त्यांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. इ. एम. सजनानी | ४.९७% कमी |
| २. | श्री. कैसरखान बद्रोद्दीन | २२.७८६% जास्त |
| ३. | श्री. आर. एल. बारवाल | अंदाजपत्रकीय दराने |

तुलनात्मकदृष्टया व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.९७% कमी दराच्या श्री. इ. एम. सजनानी यांची निविदा असून, प्रस्ताव विचारार्थ व मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, चिकलठाणा जलकुंभापासून १५० मी. मी. व्यासाची जलवाहिनी टाकण्याच्या कामाकरीता तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकाच्या दरापेक्षा ४.९७% कमी दराच्या श्री. इ. एम. सजनानी यांच्या दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३१४/२४ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मिलकॉर्नर ते खडकेश्वर पर्यंत १०० मी. मी. व्यासाची सी. आय. जलवाहिनी टाकावयाची आहे. सदरील कामाचा खर्च हा शासकीय अनूदानातून सन १९९१-९२ मधुन करण्यात येणार आहे. सदर कामाचे अंदाजपत्रक हे परिसर अभियांत्रिकी विभागाची दरसुची सन १९९१-९२ नुसार रक्कम रुपये ४,३६,४००/- चे तयार करण्यात आले आहे. या कार्यालयाची निविदा सुचना क्र. १४९/९२ दि. १३-०५-९२ जी की, दैनिक लोकविजय, मुफ्फस्सीर, मराठवाडा, औरंगाबाद टाईम्स या वर्तमानपत्रात प्रसिध्दीस देण्यात येवून बी-१ निविदा मागविण्यात आल्या कोऱ्या निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकच निविदा विक्री झाली व सिलबंद निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकच निविदा विक्री झाली ती खालील प्रमाणेची आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. इ. एम. सजनानी | २४% जास्त |

गुत्तेदारांनी दिलेला दर हा कार्यालयास जास्त वाटत असल्या कारणामुळे मा. आयुक्त यांच्या दालनात दिनांक १५-०९-९२ रोजी दराबाबत गुत्तेदाराशी वाटाघाटी करण्यात आली असता त्यांनी सदरचे काम हे अंदाजपत्रकीय दरापेक्षा १७% जास्त या दराने करण्यास गुत्तेदारांनी समंती दिली आहे.

तरी वाटाघाटी अंतीच्या दराची म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा १७% जास्त दराची श्री. इ. एम. सजनानी यांची निविदा मंजूरीस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मिलकॉर्नर, खडकेश्वर पर्यंत १०० मी. मी. व्यासाची सी. आय. जलवाहिनी टकणेच्या कामाकरीता दिनांक १५-०२-९२ रोजी गुत्तेदार श्री. इ. ए. सजनानी याचे सोबत झालेल्या वाटाघाटीनुसार उक्त संबंधित गुत्तेदाराकडून अंदाजपत्रकाचे दरापेक्षा १७% जास्त दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३१५/२५ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, तापडीया टेरेस हायकोर्ट ते समर्थनगर पर्यंत १५० मी. मी. व्यासाची सी. आय. जलवाहिनी टाकावयाची आहे. सदरील कामाचे अंदाजपत्रक हे परिसर अभियांत्रिकी विभागाची दरसुची सन १९९१-९२ नुसार रक्कम रुपये ३,५१,५८०/- चे तयार करण्यात आले आहे. या कार्यालयाची निविदा सुचना क्र. ९४९/९२ दिनांक १३-०५-९२ जी की दैनिक लोकविजय, मुफ्फसीर, मराठवाडा, औरंगाबाद टाईम्स, या वर्तमानपत्रात प्रसिध्दीस देण्यात येवून बी-१ निविदा मागविण्यात आल्या. कोऱ्या निविदा विक्रीच्या अंतीम तारखेपर्यंत एकूण एकच निविदा विक्री झाली व सिलबंद निविदा स्विकारण्याच्या नियोजीत तारखेस एकच निविदा प्राप्त झाली ती खालील प्रमाणे आहे.

१. श्री. इ. एम. सजनानी २४% जास्त

ठेकेदारांनी दिलेला दर हा कार्यालयास जास्त वाटत असल्यामुळे मा. आयुक्त यांच्या दालनात दिनांक १५-०९-९२ रोजी गुत्तेदारा बरोबर दराबाबत वाटाघाटी झाली असता सदरचे काम हे १७% जास्त या दराने करण्यास समंती दिली आहे. तरी श्री. ई. एम. सजनानी यांच्या वाटाघाटी अंतीचा दर म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा १७% जास्त दराची निविदा मंजूरीस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, तापडीया तेरेस ते हायकोर्ट ते समर्थनगर पर्यंत १५० मी. मी. व्यासाची सी. आय. जलवाहिनी टाकण्याच्या कामाकरीता दिनांक १५-०९-९२ रोजी गुत्तेदार श्री. इ. एम. सजनानी यांच्याशी झालेल्या वाटाघाटी नुसार उक्त काम संबंधित गुत्तेदार श्री. इ. एम. सजनानी यांच्याशी झालेल्या वाटाघाटी नुसार उक्त काम संबंधित गुत्तेदाराकडून अंदाजपत्रकाचे दरापक्षा १७% जास्त दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३१६/२६ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मा. प. विधी महाविद्यालय ते समर्थनगर पर्यंत ४०० मी. मी. व्यासाची ए. सी. जलवाहिनी टाकावयाची आहे. सदर कामाचा खर्च हा शासकीय अनूदान सन ९१-९२ मधुन करण्यात येणार आहे. सदर कामाचे

अंदाजपत्रक हे परिसर अभियांत्रिकी विभागाची दरसुची सन १९९१-९२ नुसार रक्कम रुपये ३,६३,१००/- चे तयार करण्यात आले असून, त्यास प्रशासकीय मान्यता घेण्यात आलेली आहे. सदर कामाची निविदा सुचना क्र. ९४९/९२ दिनांक १३-०५-९२ जी की दैनिक लोकविजय, मुफ्फसीर, मराठवाडा, औ. बाद. टाईम्स यावर्तमानपत्रात प्रसिध्दीस देण्यात येवून बी-१ निविदा मागविण्यात आल्या. कोऱ्या निविदा विक्रीच्या नियोजीत तारखेस एकच निविदा विक्री झाली. सिलबंद निविदा स्विकारण्याच्या नियोजीत तारखेस फक्त एकच निविदा प्राप्त झाली ती खालील प्रमाणेची आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. इ. एम. सजनानी | २४% जास्त |

गुत्तेदाराने सदरील कामासाठी दिलेला दर हा जास्त वाटत असल्यामुळे मा. आयुक्त यांचे दालनात दिनांक १५-०९-९२ रोजी गुत्तेदाराबरोबर दर बाबत वाटाघटी करण्यात आली असता सदरचे काम हे १७% जास्त दराने करण्यास गुत्तेदार श्री. ई. एम. सजनानी यांनी समंती दिली आहे.

तरी श्री. इ. एम. सजनानी यांची दराबाबत वाटाघाटीच्या अंतीच्या दराची म्हणजे १७% जास्त दराची निविदा मंजूरीस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मा. प. विधी महाविद्यालय ते समर्थनगर पर्यंत ४०० मी. मी. व्यासाची ए.सी. जलवाहिनी टाकण्याच्या कामाकरीता दिनांक १५-०९-९२ रोजी गुत्तेदार श्री. इ. एम.सजनानी यांचे सोबत झालेल्या वाटाघाटीनुसार उक्त काम संबंधित गुत्तेदाराऊन अंदाजपत्रकाचे दरापेक्षा १७% जास्त दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३१७/२७ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, गारखेडा येथील विहिरीजवळ टी. सी. एल. डोझर पॅनल बोर्ड करीता एक. रुम बांधावयाची आहे. त्यासाठी परिसर अभियांत्रिकी विभागाची दर सुची सन १९९१-९२ नुसार रक्कम रुपये ३९,७७०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात येवून त्यास प्रशासकीय मान्यता घेण्यात आलेली आहे. सदर कामासाठी या कार्यालयाची निविदा सुचना क्रमांक २४/९२-९३ ही दैनिक लोकमत टाईम्स, सिटीजन्स, रहेबर या वर्तमानपत्रास प्रसिध्दीस देण्यात येवून बी-१ निविदा मागविण्यात आल्या कोऱ्या निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण आठ निविदा विक्री झाल्या व सिलबंद निविदा स्विकारण्याच्या नियोजीत तारखेस एकूण चार सिलबंद निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त निविदा दिनांक ०१-०९-९२ रोजी उघडण्यात आल्या. ठेकेदारांनी दिल्या दराचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणेचा आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. सय्यद अयरअली जफर अली | ५.५६% कमी |
| २. | श्री. सय्यद सिरजउद्दीन | १.००% कमी |
| ३. | श्री. जाफरखान | ८.२५% कमी |
| ४. | श्री. बी. एम. काथार | ७.०१% कमी |

वरील प्रमाणेच्या तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दर हा श्री. जफरखान यांचा आहे. म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा ८.२५% कमी असा दर दिलेला आहे.

तरी श्री. जफरखान यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ८.२५% कमी दराची निविदा स्विकारण्यास प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, गारखेडा येथील विहिरजवळ टी. सी. एल. गेझर पॅनल बोर्ड करीता एक रुम बांधणेच्या कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकाच्या दरापेक्षा ८.२५% कमी दराच्या श्री. जफरखान यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३१८/२८ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, प्रियदर्शनी इंदिरानगर येथे १०० मी. मी. व्यासाची ए. सी. जलवाहिनी टाकवयाची आहे. सदर कामाचे अंदाजपत्रक हे परिसर अभियांत्रिकी विभागाची दरसुची सन १९९१-९२ नुसार रक्कम रुपये २,०५,५४५/- चे तयार करण्यात आले असून, त्यास स्थायी समितीचा ठराव क्र. १४/११ दि. ०१-०६-९२ अन्वये मान्यता घेण्यात आलेली आहे. सदर कामासाठी या कार्यालयाची निविदा सुचना क्रमांक १७/९२-९३ जी की दैनिक रहेबर, लोकमत टाईम्स, सिटीजन्स या वर्तमानपत्रात प्रसिध्दीस देण्यात येवून बी-१ निविदा मागविण्यात आल्या. कोऱ्या निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण चार निविदा विक्री झाल्या. सिलबंद निविदा स्विकारण्याच्या नियोजीत तारखेस एकूण दोन सिलबंद निविदा प्राप्त झाल्या. त्या खालील प्रमाणेचा आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. इ. एम. सजनानी | ७.७५% जास्त |
| २. | श्री. सुरेश बी. सादवानी | ४.९% जास्त |

वरील प्रमाणेच्या तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दर हा श्री. सुरेश बी. सादवानी यांचा आहे. परंतू ठेकेदारांनी दिलेला दर हा कार्यालयास जास्त वाटत असल्या कारणाने दिनांक १५-०९-९२ रोजी मा. आयुक्त यांच्या दालनात दराबाबत वाटाघाटी झाली असता सदरचे काम हे अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३% जास्त या दराने करण्यास समंती दिली आहे.

तरी वाटाघाटी अंतीचा श्री. सुरेश बी. सदवानी यांनी मान्य केलेला दर ३% जास्त या दराची निविदा मंजूरीचा प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, प्रियदर्शनी इंदिरानगर येथे १०० मी. मी. व्यासाची ए. सी. जलवाहिनी टाकणेच्या कामाकरीता दि. १५-०९-९२ रोजी गुत्तेदार श्री. सुरेश बी. सादवानी यांच्याशी झालेल्या वाटाघाटीनुसार उक्त काम संबंधित गुत्तेदाराकडून अंदाजपत्रकाच्या दरापेक्षा ३% जास्त दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३१९/२९ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, सुराणानगर येथे १५० व १०० मी. मी. व्यासाची आर. सी. सी. जलवाहिनी टाकावयाची आहे. सदरचे कामाचे अंदाजपत्रक हे परिसर अभियांत्रिकी विभागाची सन १९९१-९२ च्या दरसुचीनुसार रक्कम रु. १,७३,५००/- चे तयार करण्यात आले आहे. त्यास स्थायी समितीचा ठराव क्र. ३५/४ दिनांक ०८-०६-९२ अन्वये मंजूरी घेण्यात आलेली आहे. सदर कामासाठी या कार्यालयाची निविदा

सुचना क्रमांक १७/९२-९३ जी डी दैनिक रहेबर, लोकमत टाईम्स, सिटीजन्स, या वर्तमानपत्रात प्रसिध्दीस देण्यास येवून बी-१ निविदा मागविण्यात आल्या कोऱ्या निविदा विक्रीच्या अंतिम तारखे पर्यंत एकूण चार निविदा विक्री झाल्या. सिलबंद निविदा स्विकारण्याच्या नियोजीत तारखेस एकूण तीन निविदा प्राप्त झाल्या. त्या खालील प्रमाणेच आहेत.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. संजय खर्डीकर | १०% जास्त |
| २. | श्री. ई. एम. पंजनानी | ९.८% जास्त |
| ३. | श्री. पी. एच. पंजनानी | ४.२१% जास्त |

वरील प्रमाणेच्या तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दर हा श्री. पी. एच. पंजनानी यांचा आहे. परंतू त्यांनी दिलेला दर हा कार्यालयास जास्त वाटत असल्या कारणाने मा. आयुक्त यांच्या दालनात दि. १५-०९-९२ रोजी सदर कामाच्या दराबाबत श्री. पी. एच. पंजनानी यांच्या बरोबर वाटाघाटी झाली असता सदरील काम हे गुत्तेदार श्री. पी. एच. पंजनानी यांनी २% जास्त या दराने करण्यास समंती दिली आहे. तरी श्री. पी. एच. पंजनानी यांचा वाटाघाटी अंतीचा अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३% जास्त दराची निविदा स्विकारण्याचा प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सुराणानगर येथे १५० व १०० मी. मी. व्यासाची ए. सी. जलवाहिनी टाकणेच्या कामाकरीता गुत्तेदार श्री. पी. एच. पंजनानी यांचेशी दिनांक १५-०९-९२ रोजी झालेल्या वाटाघाटीनुसार उक्त काम संबंधित गुत्तेदाराकडून अंदाजपत्रकाचे दरापेक्षा २% जास्त दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३२०/३० :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, रोषणगेट ते चंपा मस्जीद पर्यत १५० मी. मी. व्यासाची सी. आय. जलवाहिनी टाकावयाची आहे. सदर कामासाठीचे अंदाजपत्रक परिसर अभियांत्रिकी विभागाची दरसुची सन १९९१-९२ नुसार रक्कम रु. ४,७४,४८०/- चे तयार करण्यात आले आहे. त्यास प्रशासकीय मान्यता घेण्यात आलेली आहे. सदर कामाचा खर्च हा शासकीय अनूदान सन १९९१-९२ मधुन करण्यात येणार आहे. या कार्यालयाची निविदा सुचना क्रमांक १७/९२-९३ जी की दैनिक लोकमत टाईम्स, सिटीजन्स, रहेबर या वर्तमानपत्रात प्रसिध्द देण्यात येवून बी-१ निविदा मागविण्यात आल्या. कोऱ्या निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण तीन निविदा विक्री झाल्या. सिलबंद निविदा स्विकारण्याच्या नियोजीत तारखेस एकूण दोन सिलबंद निविदा प्राप्त झाल्या त्या खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. ई. एम. सजनानी | २८% जास्त |
| २. | श्री. संजिव खर्डीकर | २४% जास्त |

वरील प्रमाणेच्या तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दर हा श्री. संजिव खर्डीकर यांचा आहे. परंतू त्यांनी दिलेला दर कार्यालयास जास्त वाटत असल्यामुळे मा. आयुक्त यांच्यादालनात दि. १५-०९-९२ रोजी दराबाबत वाटाघाटी करण्यास आली असता ठेकेदार श्री. संजीव खर्डीकर यांनी सदरचे काम हे १७% जास्त दराने करण्यास समंती दिली आहे. तरी वाटाघाटी अंतीच्या दराची म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा १७% जास्त दराची श्री. संजीव खर्डीकर यांची निविदा स्विकृतीचा प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, रोषणगेट ते चम्पा मस्जीद पर्यंत १५० मी. मी. व्यासाची सी. आय. जलवाहिनी टाकणेच्या कामाकरीता गुत्तेदार श्री. संजिव खर्डीकर याचेंशी दि. १५-०९-९२ रोजी झालेल्या वाटाघाटीनुसार उक्त काम संबंधित गुत्तेदाराकडून अंदाजपत्रकाच्या दरापेक्षा १७% जास्त दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.`

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३२१/३१ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, ज्युब्ली पार्क ते पोलीस क्वार्टर कोतवालपूरा पर्यत १०० मी. मी. व्यासाची सी. आय. जलवाहिनी टाकणे सदर कामाचे अंदजपत्रक हे परिसर अभियांत्रिकी विभागाची दरसुची सन १९९१-९२ नुसार रक्कम रु. २,५१,६००/- चे तयार करण्यात येऊन त्यास प्रशासकीय मान्यता घेण्यात आलेली आहे. सदर कामाचा खर्च हा पाणी पुरवठयाच्या भांडवली खर्चातून करण्यात येणार आहे. सदरचे काम हे तातडीचे असल्या कारणाने मा. आयुक्त यांच्या मान्यतेनुसार अल्पावधीची निविदा सुचना क्र. १०५७/९२ दि. ०२-०६-९२ जी की दैनिक तरुण भारत, लोकधर्म, या वर्तमानपत्रात प्रसिध्दीस देण्यात येऊन बी-१ निविदा मागविण्यात आली. कोऱ्या निविदा विक्रीच्या अंतिम तारखेपर्यंत फक्त एकच कोरी निविदा विक्री झाली व सिलबंद निविदा स्विकारण्याच्या नियोजीत तारखेस एकच सिलबंद निविदा प्राप्त झाली ती खालील प्रमाणे.

१. श्री. ई. एम. सजनानी २४% जास्त

ठेकेदारांनी दिलेला दर हा कार्यालयास जास्त वाटत असल्यामुळे दिनांक १५-०९-९२ रोजी मा. आयुक्त यांच्या दालानात ठेकेदारासोबत त्यांनी निविदेत दिलेल्या दराबाबत वाटाघाटी करण्यात आली असता सदरचे काम हे अंदाजपत्रकीय दरापेक्षा १७% जास्त दराने करण्यास ठेकेदारांनी समंती दिली आहे. तरी सदर कामाचे अंदाजपत्रक रक्क्म रुपये २,५१,६००/- ला मंजूरी व वाटाघाटी अंतीची अंदाजपत्रकीय दरापेक्षा १७% जास्त दराची श्री. ई. एम. सजनानी यांची निविदा मंजूरीचा प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, ज्युबलीपार्क ते जलकुंभ ते पोलीस क्वार्टस कोतवालपूरा पर्यंत १०० मी. मी. व्यासाची सी. आय. पाईप लाईन टाकणेच्या कामाकरीता रक्कम रुपये २,५१,६००/- च्या अंदाजपत्रकास आणि दि. १५-०९-९२ रोजी गुत्तेदार श्री. ई. एम. सजनानी यांच्याशी झालेल्या वाटाघाटी नुसार उक्त काम संबंधित गुत्तेदाराकडून अंदाजपत्रकाच्या दरापेक्षा १७% जास्त दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३२२/३२ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, सिध्दार्थ उद्यान येथील नियोजीत जलकुभांस पाणी पूरवठा करण्याकरीता २०० मी. मी. व्यासाची सी. आय. जलवाहिनी टाकावयाची आहे. सदर कामाचा खर्च हा शासकीय अनूदान सन १९९०-९१ मधुन करण्यात येणार आहे. सदर कामाचे अंदाजपत्रक हे परिसर आभियांत्रिकी विभागाची दरसुची सन १९९१-९२ नुसार रक्कम रुपये ३,८०,८१०/- एवढयाचे तयार करण्यात आले आहे. त्यास प्रशासकीय मान्यता घेण्यात आलेली आहे. या कार्यालयाची निविदा सुचना क्रमांक ६७७/९२ दि. २०-०३-९२ जी की दैनिक आणि आलमगीर टाईम्स, देवगीरी तरुण

भारत रहेबर या वर्तमानपत्रात प्रसिध्दीस देण्यात येवून बी-१ निविदा मागविण्यत आल्या कोऱ्या निविदा विक्रीच्या अंतीम तारखेपर्यंत एकूण तीन निविदा विक्री झाल्या व सिलबंद निविदा स्विकारण्याच्या नियोजीत तारखेस एकूण दोन सिलबंद निविदा प्राप्त झाल्या त्या खालील प्रमाणेचा आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. कुलवंतसिंग | ३५% जास्त |
| २. | श्री. संजिव खर्डीकर | २५% जास्त |

वरील प्रमाणेच्या तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दर हा श्री. संजिव खर्डीकर यांचा आहे. त्यांनी दिलेला दर हा कार्यालयास जास्त वाटत असला कारणाने मा. आयुक्त यांच्या दालनात दिनांक १५-०९-९२ रोजी दराबाबत वाटाघाटी करण्यात आली असता ठेकेदार श्री. संजिव खर्डीकर यांनी सदरचे काम हे अंदाजपत्रकीय दरापेक्षा १७% जास्त दराने करण्यास समंती दिली आहे. तरी वाटाघाटी अंतीची अंदाजपत्रकीय दरापेक्षा १७% जास्त दराची निविदा स्विकृतीचा प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सिध्दार्थ उद्यान येथील नियोजीत जलकुंभास पाणी पुरवठा करण्याकरीता २०० मी. मी. व्यासाची सी. आय. जलवाहिनी टाकणेच्या कामाकरीता दि. १५-०९-९२ रोजी गुत्तेदार श्री. संजिव खर्डीकर यांचेशी झालेल्या वाटाघाटीनुसार उक्त काम संबंधित गुत्तेदाराकडून अंदाजपत्रकाच्या दरापेक्षा १७% जास्त दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३२३/२३ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, फॉरेस्ट ऑफीस कॉर्नर ते कोकणवाडी कॉर्नर पर्यंत १०० मी. मी. व्यासाची सि. आय जलवाहिनी टाकावयाची आहे. सदर कामाचे अंदाजपत्रक हे परिसर अभियांत्रिकी विभागाची दरसुची सन १९९१-९२ नुसार रक्कम रु. २,३८,९०/- चे तयार करण्यात आले असून, त्यास प्रशासकीय मान्यता घेण्यात आलेली आहे. सदर कामासाठी या कार्यालयाची निविदा सुचना क्र. ६७७/९२ दिनांक २०-०३-९२ रोजी जी की, दैनिक अंजिठा तरुण भारत रहेबर, आलमगीर टाईम्स या वर्तमानपत्रात दिनांक २०-०३-९२ रोजी प्रसिध्दीस देण्यात येवून बी-१ निविदा मागविण्यात आल्या. कोऱ्या निविदा विक्रीच्या अंतिमतारखेपर्यंत एकूण तीन निविदा विक्री झाल्या व सिलबंद निविदा स्विकारण्याच्या नियोजीत तारखेस दोन सिलबंद निविदा प्राप्त झाल्या त्या खालील प्रमाणेच्या आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. संजिव खर्डीकर | २५% जास्त |
| २. | श्री. कुलवंतसिंग | ३५% जास्त |

वरील प्रमाणेच्या तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दर हा श्री. संजिव खर्डीकर यांच्या आहे. परंतु त्यांनी दिलेला दर हा कार्यालयास जास्त वाटत असल्या कारणाने दि. १५-०९-९२ रोजी मा. आयुक्त यांच्या दालनात सदर कामाच्या दराबाबत वाटाघाटी झाली असता गुत्तेदार श्री. संजिव खर्डीकर यांनी सदरचे काम १७% जास्त दराने करण्यास समंती दिली आहे. सदर कामाचा खर्च हा पाणी पूरवठा भांडवली करण्याच्या तरतुदीतून करण्यात येणार आहे. तरी सदर कामाचे अंदाजपत्रक हे रक्कम रु. २,३८,६९०/- यास मान्यता हा वाटाघाटी

अंतीच्या अंदाजपत्रकीय दरापेक्षा १७% जास्त दराची श्री. संजिव खर्डीकर यांची निविदा मंजूरीचा प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, फॉरेस्ट ऑफिस कॉर्नर ते कोकणवाडी कॉर्नर पर्यत १०० मी. मी. व्यासाची सी. आय. जलवाहिनी टाकणेच्या कामाकरीता दिनांक १५-०९-९२ रोजी गुत्तेदार श्री. संजिव खर्डीकर यांचेशी झालेल्या वाटाघाटी नुसार उक्त संबंधित गुत्तेदाराकडून अंदाजपत्रकाच्या दरापेक्षा १७% जास्त दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३२४/३४ :**

कार्यकारी अभियंता यांना प्रस्ताव सादर केला आहे की, " सादांत नगर " स्लम येथे १०० मी. मी. व्यासाची ए. सी. जलवाहिनी टाकावयाची आहे. सदर कामाचे अंदाजपत्रक हे सन १९९१-९२ च्या परिसर अभियांत्रिकी विभागाच्या दरसुची नुसार रक्क्म रुपये ४३,५९६/- चे तयार करण्यात आलेले असून, त्यास प्रशासकीय मान्यता घेण्यात आलेली आहे. सदर कामासाठी या कार्यालयाची निविदा सुचना क्रमांक २४/९२-९३ जी की दैनिक लोकमत टाईम्स, सिटीजन्स रहेबर या वर्तमानपत्रात प्रसिध्दीस देण्यात येवून बी-१ निविदा मागविण्यात आल्या. कोऱ्या निविदा विक्री झाल्या. सिलबंद निविदा स्विकारण्याच्या नियोजीत तारखेस एकूण तीन सिलबंद निविदा प्राप्त झाल्या प्राप्त निविदा दि. ०१-०९-९२ रोजी उघडण्यात आल्या. ठेकेदारांनी दिलेले दर खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | जाफरखान | ८.६५% कमी |
| २. | एच. एस. मिनाजउद्दीन | १.०९६% कमी |
| ३. | बी. ए. काल्डा | १८.२% जास्त |

वरील प्रमाणेच्या तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दर हा श्री. जाफरखान यांचा आहे. म्हणजेच अंदाजपत्रकीय दरापेक्षा ८.६५% कमी असा दर आहे.

करीता श्री. जाफरखान यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ८.६५% कमी दराची निवदिा स्विकारण्याचा प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सादातनगर स्लम येथे १०० मी. मी. व्यासाची ए. सी. जलवाहिनी टाकणेच्या कामाकरीता तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकाच्या दरापेक्षा ८.६५% कमी दराच्या श्री. जाफरखान याचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३२५/३५ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, कोतवालपुरा येथील सी. टी. एस. मु. २९३० येथील मंजूर रेखांकन अंतर्गत मनपा च्या खुल्या जागेला संरक्षित भिंत बांधण्याकरीता कामाचे अंदाजपत्रक रक्कम रुपये १,७५,५०५/- ला स्थायी समिती विषय क्र. १९२/६ दि. १२-०८-९२ च्या मंजूरी अन्वये बी-१ नमुन्यात निविदा पत्रके मागविल्या करीता शहरातील दै. तरुण भारत, दै. लोकधर्म, औरंगाबाद टाईम्स, इ. वर्तमानपत्रात प्रसिध्द करण्यात आले त्या अनुषंगाने विक्रीच्या तारखेपर्यंत एकूण ११ (अकरा) द्वारे निविदा फार्म विकण्यात आले व

स्विकारण्याच्या तारखेस एकूण ३ (तीन) निविदा पत्रके दर भरुन प्राप्त झाली. सदरील दरपत्रक उपस्थित गुत्तेदारासमक्ष उघडण्यात आले दराचे तपशील खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १. | राजासिंग | ४.९९% अ. प. दरापेक्षा जास्त |
| २. | एस. एच. असोसिएटस | ७.५% अ. प. दरापेक्षा जास्त |
| ३. | बी. आर. आनंद | ९.९०% अ. प. दरापेक्षा जास्त |

सदरील दरपत्रकास सर्वात कमी तुलनात्मकदृष्टया श्री. राजासिंग गुत्तेदार याचे ४.९९% अ. प. दरापेक्षा जास्तीचे दर आहे. मा. आयुक्त यांच्याकडे सदरील कामाच्या दराबाबत वाटाघाटीसाठी संबंधित गुत्तेदार यांना बोलाविण्यात आले. चर्चे अन्वये गुत्तेदार यांनी दिलेले दर ४.९९% जास्त ऐवजी ३.५% जास्त दराने करण्याची समंती दर्शविलेली आहे. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावीत कामाची पाहणी करण्यात यावी. असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. ३२६/३६ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, साईट क्र. २ आमखास मैदान पश्चिम सागर तलावाच्या (उत्तरेला) वरच्या बाजूला मोकळया मनपा च्या जागेवर (शासकीय अनूदान) कपाऊंड वॉल बांधणे बाबतचे कामासाठी अंदाजपत्रकीय रक्कम रु. ४,५१,३९५/- ला मा. आयुक्तांची मंजूरी अन्वये सदरील कामाचे बी-१ नमुन्यात निविदा पत्रके मागविण्यास्तव शहरातील दै. नवा मराठा, दै. औरंगाबाद डॉन दै. औरंगाबाद टाईम्स ई. वर्तमानपत्रात प्रसिध्द करण्यात आले. त्या अनुषंगाने विक्रीच्या तारखेपर्यंत एकूण चार कोरे निविदा फार्म विकण्यात आले व स्विकारण्याच्या तारखेस एकूण चार निविदा फॉर्म दर भरुन प्राप्त झाले. त्यात विविध एजन्सी यांनी दिलेले दर खालील प्रमाणे

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. सय्यद रफियोकोउद्दीन | ४.९६% अ. प. दरापेक्षा जास्त |
| २. | श्री. कैसरखान | ८% जास्त दराने |
| ३. | श्री. सुखबीर | १०% जास्त दराने |
| ४. | श्री. कुलवंतसिंग | १२% जास्त दराने |

सदरील दरपत्रकात सर्वात कमी तुलनात्मकदृष्टया श्री. सय्यद रफियोउद्दीन गुत्तेदार यांचे अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.९६% जास्त दराचे दर आहे.

मा. आयुक्त यांच्या तजविजनुसार ३% जास्तीचे दरापेक्षा अधिक दराने मंजूर करता येत नाही. ३% जास्तीचा दर मान्य हा दर गुत्तेदारास मान्य नसल्यास फेर निविदा काढावी या बाबत एजन्सी यास कळविण्यात आले एजन्सी श्री. रफियोकोउद्दीन यांना लेखी पत्राद्वारे (दि. ०३-०९-९२ रोजी) विनंती केली की मी सदरील काम ४.९६ जास्त ऐवजी ३% जास्त दराने (अंदाजपत्रकाच्या दरापेक्षा) करण्यास तयार आहे.

सदरील खर्च शासकीय अनूदानातून करण्यात येणार आहे. प्रस्ताव विचारार्थ मंजूरीस्तव व सादर.

**विषय क्र. ३२७/३७ :**

मा. शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मो. गाडगेनगर येथील समाज मंदिराचे उर्वरीत काम पूर्ण करण्यासाठी अंदाजपत्रक र. रु. ६५,०००/- ला मा. आयुक्तांनी मंजूरी दलिली आहे. सदरचे काम हाती घेण्यासाठी कार्यालयीन निविदा सुचना

क्र. मनपा/शअ/४७०/७२ दि. ०८-०५-९२ अन्वये निविदा मागविल्या असता कोऱ्या निविदा विक्रीच्या तारखेपर्यंत एकूण (२) निविदा विक्री झाल्या पैकी निविदा स्विकारण्याचया अंतीम तारखेपर्यंत एकूण (२) निविदा दर भरलेल्या प्राप्त झाल्या त्या दिनांक ०१-०८-९२ ला उघडण्यात आल्या त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. शेख समद | ४.९०% जास्त दराने |
| २. | श्री. शैलश कंन्स्ट्रक्शन | ६% जास्त दराने |

तुलनात्मकदृष्ट्या सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.९०% जास्त दराची श्री. शेख समद यांची निविदा आहे. सदरचे दर कमी करण्यासाठी गुत्तेदारास वाटाघाटीसाठी बोलाविण्यात आले असता. गुत्तेदाराने सदरचे काम ४.९०% जास्त दराऐवजी ३% जास्त दराने करण्यास लेखी संमती दर्शविली आहे व त्यास मा. आयुक्तांनी मान्यता दिलेली आहे. तरी अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३% जास्त दराची श्री. शेख समद यांची निविदा दर मंजूरीसाठी प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावित कामाची पाहणी करण्यात यावी असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. ३२८/३८ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, शिवाजी मैदान (हमखास) येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्र बांधणे बाबत (उर्वरीत काम) कामासाठी सन १९९१-९२ च्या सार्वजनिक बांधकाम खात्याच्या दरसुचीनुसार रक्कम रुपये २१,८३,७०७/- चे अंदाजत्रक तयार करण्यात आले. सदरील रक्कमेस मा. आयुक्तांनी मंजुरी दिलेली आहे. त्या अनुषंगाने सदर कामाचे बी-१ नमुन्यात निविदा पत्रके मागविण्यास्तव शहरातील दै. अजिंठा, आलमगीर टाईम्स, दै. लोकमत, दै. इंडियन एक्सप्रेस ई. वर्तमानपत्रास प्रसिध्द करण्यात आले त्याद्वारे विक्रीच्या तारखेपर्यंत एकूण तीन कोरे फार्म विकण्यात आले व स्विकारण्याच्या तारखेर्यंत एकूण तीन निविदा दर भरुन प्राप्त झाले. सदरील दरपत्रके ३ परचीत गुत्तेदारासमक्ष उघडण्यात आले तपशील खालील प्रमाणे

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. एस. एम. मंडोरे | ३४% अ. प. दरापेक्षा जास्त दराने |
| २. | श्री. एस. ए. नवाब | ३५% अ. प. दरापेक्षा जास्त दराने |
| ३. | श्री. कुलवंतसिंग | ४०% अ. प. दरापेक्षा जास्त दराने |

सदरील दरपत्रकात सर्वात कमी तुलनात्मकदृष्टया श्री. एस. एम. मंडोरे गुत्तेदार यांचे अंदाजपत्रकीय दरपेक्षा ३४% जास्त दराचे दर आहे. मा. आयुक्त यांनी सदरील कामा अंतर्गत दराच्या वाटाघाटीसाठी गुत्तेदारास बोलवावे असे ठरले. त्यानुसार श्री. एस. एम. मंडोरे यांना बोलाविण्यात आले. मा. आयुक्तांच्या दालनात श. अ. उप अभियंता, उद्दयान व संबंधित गुत्तेदार त्यांचे उपस्थित चर्चा झाली. चर्चेत असे ठरले की, गुत्तेदाराने नेहमीच्या करारनामा व्यतिरिक्त रु. १०/- च्या सॅम्पवर काम चांगल्या दर्जाचे निविदेमध्ये दिलेल्या वेळेच्या आत करुन देईल तसेच कामाची प्रगती दर्शक आलेख सादर करावा. तसेच दराबाबत वाटाघाटीत ३४% जास्त ऐवजी २५% जास्त दराने करुन देईन असे लिहून पत्र दिले आहे. सध्या बाजारात लाकडाचे दर वाढलेल आहेत. तसेच काम कलाकुसरीचे जास्त उंचीचे व कुशल कारागिरामार्फत करावे लागेल म्हणून २५% जास्त दर विचारार्थ सादर.

सदरील खर्च शासकीय अनूदानातून करण्यात येईल. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, शिवाजी मैदान (आमखास) येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन केंद्र बांधण्याच्या कामाकरीता गुत्तेदार श्री. एस. एम. भंडोरे यांचेशी झालेल्या वाटाघाटीनुसार उक्त काम संबंधित गुत्तेदारामार्फ अंदाजपत्रकाचे दरापेक्षा २५% जास्त दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३२९/३९ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, ज्युब्ली पार्क येथील मनपा चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांच्या निवासस्थानामध्ये प्रत्येकी एक संडासची व बाथरुम (आठ क्वार्टर मध्ये) बांधणेच्या कामासाठी स्थायी समिती बैठक दिनांक ०८-०६-९२ ठराव क्र. ४/१४ अन्वये रक्कम रु. २,६३,३००/- चे अंदाजपत्रकास मान्यता मिळालेली आहे.

सदरचे काम हाती घेण्यासाठी कार्यलयीन निविदा सुचना क्र मनपा/शअ/४७०/९२ दि. ०८-०७-९२ अन्वये बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता कोऱ्या निविदा विक्रीच्या तारखेपर्यंत एकूण (४) निविदा विक्री झाल्या पैकी निविदा स्विकारणेच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण (२) निविदा दर भरलेल्य प्राप्त झाल्या त्या दिनांक ०१-०८-९२ ला उघडण्यात आल्या त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १. | आर. एल. बारवाल | ४.९९% जास्त दराने |
| २. | श्री. आनंद बिल्डर्स | ११% जास्त दराने |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.९९% जास्त दराची श्री. आर. एल. बारवाल यांचे निविदा दर आहेत. सदरचे दर कमी करण्यासाठी गुत्तेदारास पत्र दिले असता गुत्तेदाराने दि. १४-०९-९२ अन्वये सदरचे काम हे अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.९९% जास्त ऐवजी ३% जास्त दराने करण्यास तयार आहे व त्यास मा. आयुक्तांनी मान्यता दिलेली आहे.

तरी अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३% जास्त दराची श्री. आर. एल. बारवाल यांची निविदा दर मंजूरीसाठी प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, ज्युब्लीपार्क येथील मनपाच्या चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांचे निवास्थनामध्ये प्रत्येकी एक संडास व बांथरुम (आठ क्वार्टर्समध्ये) बांधणेच्या कामासाठी गुत्तेदार श्री. आर. एल. बारवाल यांनी दि. १४-०९-९२ रोजी दिलेल्या लेखी संमतीनुसार उक्त काम संबंधित गुत्तेदाराकडून अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ३% जास्त दराने करुन घेण्यात सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३३०/४० :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, प्राणी संग्राहालय येथे जनावरांचा चारा ठेवण्यासाठी शेड बांधणे बाबत स्थायी समिती विषय क्र. ९९/२ दि. २३-०६-९२ मंजुरी अन्वेय श्री. ए. सी. भालेराव गुत्तेदार यास (०.१०%) अंदाजपत्रकीय दरापेक्षा कमी दराच्या कार्यालयीन कामाचे आदेश देण्यात आले. त्या अनुषंगाने काम सुरु करण्याकरीता उप अभियंता (उद्यान बांधकाम) स्थळावर गेले असता प्राणी संग्राहालय यांनी सदरील कामात विटकाम अंशतः होते. शेड चारी बाजूने उघडे राहणार होते. त्या ऐवजी ४.० मी. उंचीचे बांधकाम सिमेंट पत्राऐवजी लोखंडी पत्रे रोंलीग शटर्स बसविणे या सर्व बाबीचे काम पूर्ण

करावयाचे असल्यामुळे मंजूरी रक्कमेत तफावत (वाढ) होत आहे. त्या अनुषगांने मा. आयुक्त यांनी स्थळ पाहणी केली. त्यास मान्यता दिली. त्यामुळे पुर्वीचे अंदाजपत्रक रक्कम रुपये ९०,२२५/- मंजूरीपेक्षा रक्कम जास्त होत आहे. करीता रक्क्म रु. १,५५,०००/- च्या रिव्हाईज अंदाजपत्रकास मंजूरीस्तव व प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावित कामाची पाहणी करण्यात यावी असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. ३३१/४१ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, परिमल हाऊसिंग सोसायटी गारखेडा येथील मनपा च्या खुल्या जागेवर कंपाऊंड वॉल बांधणे बाबत कामाचे अंदाजपत्रक रक्कम रु. २,००,५००/- ला स्थायी समिती विषय क्र. ५४/२६ दि. ०८-०६-९२ च्या मंजूरी अन्वये दि. ११-०८-९२ रोजी शहरातील तरुण भारत, लोकधर्म औरंगाबाद टाईम्स इ. वर्तमानपत्रात प्रसिध्द करुन निविदा पत्रके मागविण्यात आली. विक्रीच्या तारखेपर्यंत एकूण २० (वीसी कोरे निविदा फार्म विकण्यात आले व स्विकारण्याच्या तारखेस एकूण ३ (तीन) निविदापत्रके दर भरुन प्राप्त झाले. सदरील निविदा पत्रके उपथित गुत्तेदारासमक्ष उघडण्यात आले. दर्शविलेले दर खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. बदरसीन सलाम | ४% अ. पं. दरापेक्षा जास्त |
| २. | श्री. कुलवंतसिंग | ७% जास्त दराने |
| ३. | श्री. एस. एच. असोसिएटस | ९% जास्त दराने |

सदरील दर पत्रकात दर्शविलेल्या दरास सर्वात कमी दर श्री. बदरसीन सलाम गुत्तेदार यांचे ४% अंदाजपत्रकीय दरापेक्षा जास्तीचे आहे. मा. आयुक्त यांच्याकडे सदरील कामाच्या दराबाबत वाटाघाटीसाठी संबंधित गुत्तेदार यांना बोलाविण्यात आले. त्यात गुत्तेदार यांनी दिलेले दर ४% अंदाजपत्रकीय दरापेक्षा जास्त ऐवजी ३% जास्त दराने करण्यास समंती दिली आहे. करीता प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, परिमल हाऊसिंग सोसायटी गारखेडा येथील मनपा च्या खुल्या जागेस कंपाऊंड वॉल बांधणेच्या कामाकरीता गुत्तेदार श्री. बदरसिन सलाम यांचेशी झालेलया वाटाघाटीनुसार उक्त काम संबंधिताकडून अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ३% जास्त दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३३२/४२ :**

मा. शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो. नागसेन नगर, उस्मानपुरा येथील समाज मंदिराच्या मोकळया जागेस संरक्षित भिंत बांधणेच्या कामासाठी अंदाजपत्रक रक्कम रुपये ६२,६०५/- ला मा. आयुक्तांनी मंजूरी दिलेली आहे. सदर कामाच्या निविदा मागविण्यासाठी कार्यालयीन बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता कोऱ्या निविदा स्विकारणेच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण (३) निविदा दर भरलेल्या प्राप्त झाल्या. त्या दि. ०३-०८-९२ ला उघडण्यात आल्या त्यांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. सुखबीरसिंग | १०% जास्त दराने |
| २. | श्री. सय्यद सिरजोउद्दीन | १४.७५% जास्त दराने |
| ३. | श्री. मोहमंद रऊफ | ५% जास्त दराने |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५% जास्त दराची श्री. मोहमंद रऊफ यांची निविदा आहे. सदरचे दर जास्त वाटत असल्यामुळे दि. ३१-०८-९२ चे मा. आयुक्तांचे आदेशान्वये गुत्तेदाराने सदरचे काम ५% दराऐवजी ३% जास्त दराने दि. ०४-०९-९२ अन्वये लेखी कळविले आहे.

तरी अंदाजपत्रक रक्कम रुपये ६२,६०५/- व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३% जास्त दराची श्री. मोहमंद रऊफ () यांची निविदा मंजूरीसाठी प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावित कामाची पाहणी करण्यात यावी असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. ३३३/४३ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, सिध्दार्थ उद्यान येथे रोड तयार करणे बाबत कामासाठी सां. बा. खात्याचे सन १९९१-९२ च्या दरसुची नुसार रक्कम रु. ३९,६००/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले होते. त्यास मा. आयुक्तांची मंजूरी दि. १२-०९-९२ रोजी मिळालेली आहे. मा. शहर अभियंता यांनी बी-१ नमुन्यात निविदा पत्रके मागविण्याकरीता शहरातील दै. तरुण भारत, दै. लोकधर्म, औरंगाबाद टाईम्स, इ. वर्तमानपत्रात प्रसिध्द करण्यात आले व त्या अनुषंगाने विक्रीच्या तारखेपर्यंत एकूण कोरे निविदा फॉर्म १४ विकण्यात आले व स्विकारण्याच्या तारखेस एकूण दोन, निविदा फॉर्म दर भरुन प्राप्त झाले. सदरील निविदा फॉर्म उपस्थित गुत्तेदारासमक्ष उघडण्यत आले. त्यांचे तपशील खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. आर. एल. शिंदे | ११.३% अ. प. दरापेक्षा कमी दराचे |
| २. | श्री. आर. सी. बोथेरा | ७.४५% कमी दराने |

सदरील दर पत्रकात तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दर श्री. आर. एल. शिंदे गुत्तेदार यांचे अंदाजपत्रकीय दरापेक्षा ११.३% कमी दराचे दर आहे.

सदरील खर्च नवीन उदयाने या शिर्षकामधुन करण्यात येणार आहे. प्रस्ताव मंजूरीस्तव व विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सिध्दार्थ उदयान येथे रोड तयार करण्याच्या कामाकरीता तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकाच्या दरापेक्षा ११.३% कमी दराच्या श्री. आर. एल. शिंदे यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३३४/४४ :**

मा शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, रोहीला गल्ली येथील धन आईम फॅक्टरी जवळील कब्रस्थानास संरक्षित भिंत बांधणेच्या कामासाठी सन १९९१-९२ चे डी. एस. आर. दराने केलेले अंदाजपत्रक रक्कम रुपये ४५,०००/- ला मा. आयुक्तांनी मान्यता प्राप्त झालेली आहे. सदरच्या कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र. ९२-९३ जा. क्र.

मनपा/शअ/४७०/९२ दि. ०८-०७-९२ अन्वये बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता कोऱ्या निविदा विक्रीच्या तारखेपर्यंत एकूण (५) निविदा फॉर्म विक्री झाल्या पैकी निविदा स्विकारणेच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण (२) निविदा कर भरलेल्या प्राप्त झाल्या. त्या दिनांक ०१-०८-९२ ला उघडण्यात आल्या त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. सय्यद रफिकोउद्दीन | ८% जास्त |
| २. | श्री. मिर्झा अझर बेग | ५% जास्त |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ५% जास्त दराची श्री. मिर्झा अझर बेग यांची निविदा आहे. सदरचे दर जास्त वाटत असल्यामुळे मा. आयुक्तांचे दालनात १८-०९-९२ ला वाटाघाटी होऊन सदरचे काम अंदाजपत्रकीय दराने करण्यास संमती दर्शविली व त्यास मा. आयुक्तांनी मंजूरी दिली आहे.

तरी अंदाजपत्रक र. रु. ४५,०००/- ला व अंदाजपत्रकीय दराची श्री. मिर्झा अझर बेग याची निविदा दर मंजूरीचा प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, रोहीलागल्ली येथील धन आईस फॅक्टरीच्या जवळील कब्रस्तानास संरक्षित भिंत बांधणेच्या कामाकरीता दि. १८-०९-९२ रोजी गुत्तेदार श्री. मिर्झा अझर बेग यांचेशी झालेल्या वाटाघाटीनुसार उक्त काम संबंधित गुत्तेदाराकडून अंदाजपत्रकीय दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३३५/४५ :**

मा. शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, सिल्लेखाना येथील मनपा शाळेला दोन खोल्या बांधणेच्या कामासाठी स्थायी समिती बैठक दि. २३-०६-९२ अन्वये रक्कम रुपये १,६५,०००/- चे अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी प्राप्त झालेली आहे. सदरचे काम हाती घेण्यासाठी कार्यलयीन निविदा सुचना क्र. मनपा/शअ/५३०/९२ दि. ११-०२-९२ अन्वये दैनिक तरुण भारत लोकधर्म आणि औरंगाबाद टाईम्स ३ वृत्तपत्राद्वारे जाहिरात देवून बी-१ निविदा मागविल्या असता कोऱ्या निविदा विक्रीच्या तारखेपर्यंत एकूण (१०) निविदा विक्री झाल्या पैकी निविदा स्विकारणेच्या अंतिम तारखेपर्यंत एकूण (४) निविदा दर भरलेल्या प्राप्त झाल्या. त्या दिनांक ०८-०९-९२ ला उघडण्यात आल्या त्यांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. मौला अलीयारखान | अंदाजपत्रकीय दराने |
| २. | श्री. बी. आर. आनंद | ५.०१% जास्त दराने |
| ३. | श्री. सय्यद गयासोद्दीन | ६.०१% जास्त दराने |
| ४. | श्री. आर. एव. बारवाण | ७.८६% जास्त |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दराची श्री. मौला अलीयारखान यांची निविदा मंजूरीसाठी प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावित कामाची पाहणी करण्यात यावी असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. ३३६/४६ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मो. कैलासनगर येथील मनपा प्रा. शाळेला एका रुमची वाढ करण्यासाठी व इमारतीस संरक्षित भिंत बांधणेच्या कामासाठी सन १९९१-९२ च्या सार्वजनिक बांधकाम खात्याचे डी. एस. आर. दराने रक्कम रु. २,३९,६७०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आलेले आहे.

सदर कामासाठी स्थायी समिती ठराव क्र. ११४/२१ दि. २३-०६-९२ अन्वये मंजुरी मिळालेली आहे.

सदर काम हाती घेण्यासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र. मनपा/शअ/५३०/९२ दि. ११-०८-९२ अन्वये बी-१ नमुन्यात दै. लोकधर्म, औरंगाबाद टाईम्स स्वरगंगा या वर्तमानपत्राद्वारे निविदा मागविल्या असता कोऱ्या निविदा विक्रीच्या तारखेपर्यंत एकूण (११) निविदा स्विकारण्याच्या अंतीम तारखेपर्यंत एकूण (५) निविदा दर भरलेलया प्राप्त झाल्या त्या दिनांक ०८-०९-९२ ला उघडण्यात आल्या त्यांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. कुलवंतसिंग | ९% जास्त |
| २. | श्री आर. एल. बारवाल | १२% जास्त |
| ३. | श्री. कैसरखान | १५% जास्त |
| ४. | श्री. सय्यद सिराजउद्दीन | ११% जास्त |
| ५. | श्री. एस. ए. नवाब | ४.९८% जास्त |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.९८% जास्त दराची श्री. एस. ए. नवाब यांची निविदा दर आहेत. दर जास्त वाटत असल्यामुळे गुत्तेदारास सदर दराच्या १% दर कमी करुन काम करण्याबाबत तयार करण्यात आले अहो व त्यास मा. आयुक्तांनी मान्यता दिली आहे. तरी श्री. एस. ए. नवाब यांची अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३.९८% जास्त दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, कैलासनगर येथील मनपा प्रा. शाळेस एक रुमची वाढ करणे व इमारतीस संरक्षित भिंत बांधणेचे काम गुत्तेदार श्री. एस. ए. नवाब यांचेकडून अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ३.९८% जास्त दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३३७/४७ :**

शहर अभियंता, महानगरपालिका यांनी प्रस्ताव सादर केला की, अभिनय सिनेमा ते मोतीकारंजा ५० रुंद डी. पी. रोडवरील नाल्यावर आर. सी. सी. पुल बांधणेसाठी शासकीय अनूदान १९९१-९२ अंतर्गत अंदाजपत्रक रक्कम रुपये ६,१०,८५०/- ला मंजूरी दिली असून, त्यानुसार सदरील कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना दि. ०१-०७-९२ द्वारे स्थानिक वृत्तपत्र दैनिक नवा मराठा, दैनिक डॉन व दैनिक औरंगाबाद टाईम्स मध्ये विस्तृत व प्रसिध्दी देवून प्रगट निविदा मागविल्या असता कोऱ्या निविदा विकण्याचे अंतिम तारखेपर्यंत एकूण (५) निविदा विकण्यात आल्या व मोहरबंद निविदा स्विकारण्याचे नियोजीत तारखेस फक्त तीन तीन निविदा प्राप्त झाल्या. प्राप्त झालेल्या निविदा उघडल्या असता ठेकेदारांनी दिलेले दर खालील प्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| १. | मे. पाल कंस्ट्रक्शन | अ. प. चे दरापेक्षा २९.८९५% जास्त |
| २. | श्री. कुलवंतसिंग | अ. प. चे दरापेक्षा ३२% जास्त |
| ३. | श्री. मौला अली यार खान | अ. प. चे दरापेक्षा ३७% जास्त |

तुलनात्मकदृष्टया मे. पाल कंन्स्ट्रक्शन यांची निविदा कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा २९.८९५% जास्त आहे. तुलनात्मकदृष्टया कमी दर असलेल्या निविदेचे दर अतिशय जास्त असल्यामुळे मे. पाल कंन्स्ट्रक्शन यांना मा. आयुक्त साहेबां समक्ष वाटाघाटीसाठी बोलाविले असता ठेकेदारासोबत चर्चा झाल्या नंतर मा. आयुक्त साहेबांनी मे.पाल कंन्स्ट्रक्शन यांची निविदा ठेकेदारांनी दिलेल्या दर अंदाजपत्रकाचे दरापेक्षा २९.८९५% अधिक ऐवजी अंदाजपत्रकाचे दरापेक्षा २५% जास्त दराने निविदा मंजूर केली आहे. करीता मे. पाल कंन्ट्रक्शन यांची निविदा अंदाजपत्रकाचे दरापेक्षा २५% जास्त दराने मंजूर करणेसाठी विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, अभिनय सिनेमा ते मोतीकारंजा या ५० फुट डी. पी. रोड वरील नाल्या आर. सी. सी. पुल बांधण्याचे काम अंदाजपत्रकाचे दरापेक्षा २५% जास्त दराने मे पाल कंस्ट्रक्शन यांचेकडून करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३३८/४८ :**

मा. शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, नाथ मार्केट (सुपर मार्केट) औरंगपुरा बैठक दिनांक ०४-०७-९२ ठराव क्र. १६०/९ अन्वये एक लिप्ट बसविण्याचे कामासाठी सर्वानुमते मंजुरी देण्यात आलेली आहे. सदरचे काम हाती घेण्यासाठी कार्यालयीन कोटेशन नोटीस क्र. जा. क्र. मनपा/शअ/५२३/९२ दिनांक ०४-०८-९२ अन्वये दैनिक लोकमत, दैनिक लोकसत्ता आणि इंडियन एक्सप्रेस इ. वृत्तपत्राद्वारे कोटेशन दरपत्रके मागविले असता एकूण दोन कोटेशन दरपत्रके प्राप्त झाली. ती दिनांक १८-०८-९२ ला उघडण्यात आले. त्यांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे

दर एक लिफ्ट करीता

| | | |
|---|---|---|
| १. | मे. काझी इलेव्हेटर्स मुंबई | ४,२८,५००/- |
| २ | मे. पॅरामाऊंड इलेक्ट्रीकल ॲन्ड कॅकनिक वर्क्स मुंबई | ४,४४,५००/- |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व ४,२८,५००/- रुपयाचे एका लिफ्टचे दर मे. काझी इलेव्हेटर्स, मुंबई यांचे कोटेशन दर मंजूरीसाठी प्रस्ताव विचारार्थ सादर.

**विषय क्र. ३३९/४९ :**

अतिरक्त शहर अभियंता यांनी अभिप्राय दिला की, सन १९९२-९३ या वर्षासाठी शहरातील डांबरी रस्त्याचे पॅचवर्क करण्यच्या कामाकरीता तयार करण्यात आलेल्या र. रु. ३,३२,०८०/- च्या अंदाजपत्रकास स्थायी समिती विषय क्र. ४८५/५ दिनांक १३-०४-९२ अन्वये मंजूरी मिळाली आहे. सदर कामाकरीता निविदा सुचना क्र. मनपा/अशअ/३०७/९२ दिनांक १५-०६-९२ अन्वये दै. औरंगाबाद टाईम्स व दै. रहेबर या स्थानिक वृत्तपत्रात निविदा सुचना प्रसिध्द करुन निविदा पत्रके अंतिम तारखेपर्यंत सदर एक निविदा पत्रक प्राप्त झाले प्राप्त निविदापत्रक दि. १७-०७-९२ रोजी उघडण्यात आले श्री. खाजा मोईनोद्दीन यांचे अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३.२५% जास्त दराचे एकच निविदापत्रक आहे. सदरचे दर जास्त वाटत असल्याने त्यांना पत्रक क्र. मनपा/अशअ/४०७/९२ दिनांक १९-०८-९२ अन्वये सदर कामाच्या दराबाबत वाटाघाटी करण्यासाठी बोलाविले असता वाटाघाटी अंती

ठरल्याप्रमाणे खाजा मोईनोद्दीन यांनी सदर काम अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३.२५% जास्त ऐवजी २.७५% जास्त या दराने करण्याची तयारी दर्शविली आहे.

तरी श्री. खाजा मोईनोद्दीन यांचे अंदाजपत्रकीय दरापेक्षा २.७५% जास्त दर स्विकारणे बाबतचा प्रस्ताव विचारार्थ मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सन १९९२-९३ वर्षासाठी शहरातील डांबरी रस्त्याचे पॅचवर्क करण्याचे गुत्तेदार श्री. खाजा मोईनोद्दीन यांचेकडून अंदाजपत्रकाचे दरापेक्षा २.७५% जास्त दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३४०/५० :**

मा. अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला आहे की, चेलीपुरा ते रोषणगेट य ५० डी. पी. रस्त्याचे करण्याच्या कामासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याच्या डी. एस. आर. नुसार रक्कम रु. ८,०५,३५०/- अंदाजपत्रकास मंजूरी मिळाली आहे. सदरील काम हे शासकीय अनूदानातून करावयाचे आहे.

सदर कामासाठी निविदा क्र. २ जा. क्र. मनपा/बां-१/१८९०/९१ दिनांक १०-०५-९१ नुसार निविदा मागविल्या असता शेवटच्या तारखेपर्यंत दोन निविदा विकल्या गेल्या. त्यापैकी दोन्ही दर भरुन प्राप्त झाल्या त्या दिनांक १६-०६-९१ रोजी उपस्थित असलेल्या गुत्तेदारसमक्ष उघडण्यात आल्या त्यांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १. | मे. गुरुनानक इंडस्ट्रीज | १८% जास्त |
| २. | मे. रे. कन्स्ट्रक्शन | ११% जास्त |

वरील पैकी मे. रे. कन्स्ट्रक्शन यांची निविदा तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजे अंदाजपत्रकाच्या दरापेक्षा ११% जास्त दराची आहे. सदरील कामाची रस्ता संपादनाची कार्यवाही पूर्ण करण्याकरीता बराच कालावधी लोटला गेला. त्यामुळे गुत्तेदाराने पत्रक देवून कळविले की, सध्या मटेरियलचे भाव वाढल्यामुळे जुन्या दराने काम करणे परवडत नाही करीता कामाचे सुधारीत दर देणे बाबत विनंती केली आहे. नविन दर सुचीनुसार अंदाजपत्रक रक्कम रु. १०,२४,५२०/- चे होत आहे.

नविन दरानुसार मे. रे. कन्स्ट्रक्शन सदरील काम अंदाजपत्रकीय दराने करण्यास तयार आहेत. तरी प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, चेलीपूरा ते रोषणगेट या ५० फुट डी. पी. रस्ता संपादनाची कार्यवाही पूर्ण करण्याकरीता बराच कालावधी लोटल्यामुळे आणि बांधकाम साहित्याचे भाव वाढल्यामुळे उक्त काम नविन दरानुसार मे. रे. कंस्ट्रक्शन यांचे कडून अंदाजपत्रकीय दराने करुन येण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३४१/५१ :**

मा. अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला आहे की, नागेश्वरवाडी येथील ५० डी. पी. रस्त्याच्या नाल्यावर पुलाची उभारणी करणेच्या कामासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन ९१-९२ च्या डी. एस. आर. नुसार अंदाजपत्रक रक्कम रु. ६,४६,०००/- बनविण्यात आले असून, मा. आयुक्त यांना दि. २८-०६-९२ रोजी मान्यता दिलेली आहे. सदरील कामाचा खर्च सन ९०-९१ मधील शासकीय अनूदानातून करण्यात येईल. सदर

कामासाठी कार्यालयीन निविदा क्र. ७ जा. क्र. मनपा/अशअ/२७०/९२ दि. २३-०७-९२ नुसार निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या एकूण सात (७) निविदा विक्री झाल्या त्यापैकी निविदा स्विकारणाच्या वेळे पर्यंत एकूण चार (४) निविदा दर भरुन प्राप्त झाल्या त्या २९-०८-९२ रोजी उपस्थित असलेल्या ठेकेदारा समक्ष उघडण्यात आल्या त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १. | आर. एल. बारवाल | ९.९९% जास्त |
| २. | कुलवंतसिंग | २०% जास्त |
| ३. | एस. ए. नवाब | १५% जास्त |
| ४. | मौला अली यार खान | १०.०३% जास्त |

वरील पैकी श्री. आर. एल. बारवाल यांच्या निविदाचे दर सर्वात कमी म्हणजे अंदाजपत्रकाच्या दरापेक्षा ९.९९% जास्त दराची निविदा होती दर जास्त असल्या कारणाने संबंधित गुत्तेदारास मा. आयुक्त यांचे समक्ष वाटाघाटी करण्याकरीता कार्यालयाचे पत्रक क्र. मनपा/बा.१/४०५/९२ दिनांक १५-०९-९२ अन्वये बोलविले असता असता श्री. आर. एल. बारवाल यांनी सदरील काय ९.९९% ऐवजी ८% जास्त दराने करण्यास समंती दर्शविली आहे. करीता सदरील निविदा विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, नागेश्वरवाडी येथील ५० फुट डी. पी. रस्त्याच्या नाल्यावर पुलाची उभारणी करण्याच्या कामा करीता गुत्तेदार श्री. आर. एल. बारवाल यांचेशी झालेल्या वाटाघाटीनुसार उक्त काम संबंधित गुत्तेदाराकडून अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ८% जास्त दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३४२/५२ :**

मा. अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला आहे की, रोषणगेट मकसूद कॉलनी अंतर्गत श्री. रोख यांचे घराजवळ रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याच्या सन ९२-९३ च्या डी. एस. आर. दराने अंदाजपत्रक रक्क्म रु. ६,०६५०.०० या रक्कमेस मा. आयुक्त यांनी दि. १०-०६-९२ रोजी मान्यता दिलेली आहे. सदरील कामाचा खर्च भांडवली रस्ते या सदराखाली करण्यात येईल.

सदरील कामासाठी कार्यलयीन निविदा नोटीस क्र. ६ जा. क्र. मनपा/अशअ/३०७/९२ दिनांक १५-०६-९२ अन्वये निविदा मागविल्या असता शेवटच्या तारखेच्या वेळेपर्यंत एकूण दोन निविदा विकल्या गेल्या त्यापैकी एक निविदा दर भरुन प्राप्त झाली ती दिनांक १७-०७-९२ रोजी उपस्थित असलेल्या गुत्तेदारासमक्ष उघडण्यात आली त्याचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. पी. एम. चोरडीया | अंदाजपत्रकाच्या दराने |

वरील पैकी श्री. पी. एम. चोरडीया यांच्या निविदाचे दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजे अंदाजपत्रकाच्या दराची आहे. विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, रोषणगेट मकसूद कॉलनी येथील श्री. शेख यांचे घराजवळ डांबरीकरण करण्याच्या कामाकरीता श्री. पी. एम. चोरडीया यांचे अंदाजपत्रकीय दराच्या दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३४३/५३ :**

मा. अतिरिक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव दिला आहे की, रशिदपुरा भागातील रस्त्याचे डांबरीकरण करण्याच्या कामासाठी सार्वजनिक बांधकाम खात्याच्या ९१-९२ च्या रक्कमेस मा. आयुक्त यांनी दि. ०५-०४-९२ अन्वये मान्यता दिलेली आहे. सदरील कामाचा खर्च सन ९१-९२ च्या शासकीय अनूदानातून करण्यात येईल.

सदरील कामासाठी कार्यलयीन निविदा नोटीस क्र. ६ जा. क्र. मनपा/अशअ/३०६/९२ दिनांक १५-०६-९२ अन्वये निविदा मागविल्या असता शेवटच्या तारखेच्या वेळेपर्यंत एकुण चार निविदा विकल्या गेल्या त्यापैकी तीन निविदा दर भरुन प्राप्त झाल्या त्या दि. १७-०७-९२ रोजी उपस्थित असलेल्या गुत्तेदारासमक्ष उघडण्यात आल्या त्यांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. खाजा मो. ईनुउद्दीन | ०३.००% कमी |
| २. | श्री. डी. एस. जग्गी | ५% कमी |
| ३. | श्री. पी. एम. चोरडीया | ९.९७% कमी |

वरील पैकी श्री. पी. एम. चोरडीया यांच्या निविदेचे दर तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजे अंदाजपत्रकाच्या दरापेक्षा ९.९७% कमी दराची निविदा आहे विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, रशिदपूरा भागातील डांबरीकरण करण्याच्या कामाकरीता तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकाच्या दरापेक्षा ९.९७% कमी दराच्या श्री. पी. एल. चोरडीया यांच्या दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३४४/५४ :**

अतिरक्त शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, संजय नगर उस्मानपूरा या सोसायटी अंतर्गत खडी रस्त्याचे काम करण्यासाठी सन १९९१-९२ च्या सार्वजनिक बांधकाम खात्याच्या डी. एस. आर. दराने रक्कम रुपये १,६५,८९०/- चे अंदाजपत्रक तयार करण्यात आले असून, कामास दि. ०६-०४-९२ रोजी प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे. सदरचा खर्च सन १९९१-९२ च्या शासकीय अनूदानातून करण्यात येईल.

सदरील कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र. मनपा/अशअ/३७०/९२ दिनांक २३-०७-९२ च्या निविदा सुचनेद्वारे प्रगट निविदा मागविल्या असता निविदा विक्रीच्या नियोजीत वेळेपर्यंत एकूण तीन निविदा विक्री झाल्या असून निविदा स्विकारणेच्या नियोजीत दिनांकाला एकूण तीन निविदा दर भरलेल्या प्राप्त झाल्या असून, त्यांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. वसंत नरवडे पाटील | अंदाजपत्रकीय दराने |
| २. | श्री. एस. एम. मंडोरे | ०५% जास्त दराने |
| ३. | श्री. एस. एच. असोसिएटस | ०६% जास्त दराने |

तुलनात्मकदृष्टया कमी व अंदाजपत्रकीय दराने श्री. वसंत नरवडे पाटील यांची निविदा असून मंजूरीस्तव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, संजयनगर उस्मानपुरा सोसायटी अंतर्गत खडी रस्त्याचे कामासाठी तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दराच्या श्री. वसंत नरवडे पाटील यांचे दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३४५/५५ :**

वार्ड क्र. २७ मो. पानदरीबा व नासगल्ली येथे २५० मी. मी. व्यासाची आर. सी.सी. लाईन टाकणे बाबत अंदाजपत्रक र. रु. १,११,५००/- चे सन ९१-९२ च्या दरसुची नुसार तयार करण्यात आले असून, सदर अंदाजपत्रकास मा. आयुक्तांची मंजूरी दिलेली असून, स्थायी समिती ठराव क्र. २०/१७ दि. ०१-०६-९२ नुसार मंजूरी मिळालेली आहे.

आदेशावरुन सदरील कामाकरीता कार्यालयीन निविदा सुचना क्र. ११/९८२/९३ दिनांक ०९-०७-९२ नुसार दै. लोकमत टाईम्स व औरंगाबाद टाईम्स या वृत्तपत्रात जाहीरातदेवून बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता एकूण दोन कोऱ्या निविदा विक्री झाल्या. पैकी दोन दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या त्या खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. शे. समद शे. निजामोद्दीन | १४% जास्त |
| २. | श्री. कैसरखान | १५% जास्त |

तुलनात्मकदृष्टया कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा १४% जास्त दराचे श्री. शे. समद शे. निजामोद्दीन यांचे दरपत्रक आहे दर्शविलेल्या दर जास्त असल्याने मा. आयुक्तांनी दर कमी करणेस्तव संबंधितास वाटाघाटीस बोलाविले असता वाटाघाटी होवून १४% जास्त ऐवजी अंदाजपत्रकीय दरापेक्षा १२% जास्त दराने काम करण्यास समंती दर्शविलेली त्यास मा. आयुक्तांनी मान्यता दिली करीता १२% जास्त दराचे श्री. शे. समद शे. निजामोद्दीन यांचे दरपत्रक मंजुरीस्तव सादर सदरील दरांची ९१-९२ च्या डी. एस. आर. शी तुलना केली असता ३.६०% कमी आहेत. प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, वार्ड क्र. २७ पानदरीबा व नासगल्ली येथे २५० मी. मी. व्यासाची आर. सी. सी. ड्रेनेज लाईन टाकणे करीता श्री. शेख समद यांचेशी झालेल्या वाटाघाटी नुसार उक्त काम संबंधिताकडून अंदाजपत्रकाचे दरापेक्षा १२% जास्त दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३४६/५६ :**

मो. व्यकंटेश्वर कॉलनी ते पॉलिटेक्नल वस्तीगृहापर्यत १५० मी. मी. व्यासाची चिनी मातीची ड्रेनेज लाईन काढुन २५० मी. मी. व्यासाची आर. सी. सी. लाईन टाकणे बाबत

अंदाजपत्रक रक्कम रु. ३,१०,०००/- ला स्थायी समिती ठराव टाकणे बाबत अंदाजपत्रक रक्कम रु. ३,१०,०००/- ला स्थायी समिती ठराव क्र. ४१/१०/ दि. ०८-०६-९२ नुसार मंजूरी मिळालेली आहे.

अदेशावरुन सदरील कामाकरीता कार्यालयीन निविदा सुचना क्र. ११/ दिनांक ०९-०७-९२ नुसार दै. लोकमत टाईम्स व औरंगाबाद टाईम्स या दैनिकात जाहिरात देवून बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता एकूण तीन कोऱ्या निविदा विक्री झाल्या. पैकी दोन दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या त्या खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. स. रफिकोउद्दीन | ४.७०% जास्त |
| २. | श्री. एस. अे. नवाब | १८% जास्त |

तुलनात्मकदृष्टया कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.७०% जास्त दराचे श्री. स. रफिकोउद्दनी यांचे दरपत्रक आहे. दरपत्रक जास्तीचे असल्याने मा. आयुक्तांच्या आदेशावरुन दर कमी करणेस्तव वाटाघाटीसाठी बोलाविले असता वाटाघाटी अंती ४.७०% जास्त ऐवजी २.७०% जास्त दराने संबंधितास काम देण्यास मंजूरी देण्यात येवून संबंधिताने स्विकृती दिलेली आहे. करीता २.७०% जास्त दराची निविदा मंजूरीस्तव प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, व्यकंटेश कॉलनी ते पॉलीटेक्नीक वसतीगृहा पर्यंत १५० मी. मी. व्यासाची चिनी मातीची ड्रेनेज लाईन काढुन २५० मी. मी. व्यासाची आर. सी. सी. ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामाकरीता गुत्तेदार श्री. सय्यद रफिकोउद्दीन यांचेशी झालेल्या वाटाघाटी नुसार उक्त काम संबंधित गुत्तेदाराकडून अंदाजपत्रकाच्या दरापेक्षा २.७०% जास्त दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३४७/५७ :**

मो. मोती महल हॉटेल ते विष्णुनगर पर्यंत ३०० मी. मी. व्यासाची आर. सी. सी. ड्रेनेज लाईन टाकणे बाबत अंदाजपत्रक र. रु. २,५५,७१४/- ला स्थायी समिती ठराव क्र. ८७/५६ दि. ०८-०६-९२ नुसार मंजुरी मिळालेली आहे.

आदेशावरुन सदरील कामाकरीता कार्यालयीन निविदा सुचना क्र. ११ दिनांक ०९-०७-९२ नुसार दै. लोकमत टाईम्स व औरंगाबाद टाईम्स व वृत्तपत्रात जाहिरात देवून निविदा मागविल्या असता एकूण चार निविदा विक्री झाल्या पैकी तीन दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या त्या खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १. | मे. रामेश्वर कन्स्ट्रक्शन | ४.६७% जास्त |
| २. | श्री. आर. एस. भाटीया | ४.९९% जास्त |
| ३. | श्री. संतोष बाजाराव बोबडे | ४.६७% जास्त |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.६७% जास्त दराचे मे. रामेश्वर कंन्स्ट्रक्शन यांचे दरपत्रक आहे. दर जास्तीचे असल्याने मा. आयुक्तांच्या आदेशावरुन दर कमी करण्याच्या अनुषंगाने वाटाघाटीस्तव संबंधितास कार्यालयात बोलाविले असता वाटाघाटीअंती अंदाजपत्रकीय दरापेक्षा २.६७% जास्त दराने संबंधितास काम देण्यात

मंजूरी देण्यात आली व या दरास संबंधिताने संमती दिलेली आहे. करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मोतीमहल हॉटेल ते विष्णुनगर पर्यंत ३०० मी. मी. व्यासाची आर. सी. सी. ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामाकरीता मे. रामेश्वर कन्स्ट्रक्शन यांच्याशी झालेल्या वाटाघाटी नुसार उक्त काम संबंधिताकडून अंदाजपत्रकाच्या दरापेक्षा २.६७% जास्त दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३४८/५८ :**

मो. सहकार नगर येथील १५० मी. मी. व्यासाची चिनी माती ड्रेनेज लाईन काढुन २५० मी. मी. व्यासाची आर. सी. सी. ड्रेनेज लाईन टाकणे बाबतच्या अंदाजपत्रक र. रु. १,३४,६६०/- ला स्थायी समिती ठराव क्र. २१/१८ दिनांक ०१-०६-९२ नुसार मंजूरी मिळालेली आहे. आदेशावरुन सदरील कामा करीता कार्यालयीन निविदा क्र. ११/९८२/९२ दि. ०९-०७-९२ नुसार दै. लोकमत व औरंगाबाद टाईम्स या दैनिकात जाहिरात देवून बी-१ नमुन्यात निविदा पत्रके मागविली असता एकूण तीन निविदा पत्रके विक्री झाली व त्या तिनही दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या त्या खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. के. बी. काल्डा | ४.८५% जास्त |
| २. | श्री. एस. एस. सिद्दीकी | ७.७०% जास्त |
| ३. | श्री. एस. बी. सदवानी | ८.२५% जास्त |

तुलनात्मक सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा रु. ४.८५% जास्त दराचे श्री. के. बी. काल्डा यांचे दरपत्रक आहे. संबंधितास दर कमी करण्याच्या अनुषंगाने वाटाघाटीसाठी कार्यालयात बोलाविले असता मा. आयुक्त मा. लेखा परिक्षक व कार्यकारी अभियंता यांच्या समवेत वाटाघाटी होवून संबंधितास ४.८५% जास्त ऐवजी २.८५% जास्त दराने काम देण्यात येऊन संबंधिताने त्यास समंती दिलेली आहे.

करीता २.८५% जास्त दराचे श्री. के. बी. काल्डा यांच्या निविदेस मंजूरी मिळणेस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सहकार नगर येथील १५० मी. मी. व्यासाची चिनी मातीची ड्रेनेज लाईन काढुन २५० मी. मी. व्यासाची आर. सी. सी. ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामाकरीता गुत्तेदार श्री. के. बी. काल्डा यांचेशी झालेल्या वाटाघाटी नूसार उक्त काम संबंधिताकडून अंदाजपत्रकाचे दरापेक्षा २.८५% जास्त दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३४९/५९ :**

मो. रचनाकार कॉलनी येथे १५० मी. मी. व्यासाची चिनी मातीची ड्रेनेज लाईन काढून २५० मी. मी. व्यासाची आर. सी. सी. ड्रेनेज लाईन टाकणे बाबत अंदाजपत्रक र. रु. १,७७,०००/- चे सन ९१-९२ च्या दरसुचीनुसार अंदाजपत्रकास स्थायी समिती ठराव क्र. २२/१९ दि. ०१-०६-९२ नुसार मंजूरी मिळालेली आहे.

आदेशावरुन सदरील कामाकरीता कार्यालयीन निविदा सुचना क्र. ११ दिनांक ०१-०७-९२ नुसार दै. लोकमत टाईम्स व औरंगाबाद टाईम्स या वृत्तपत्रात जाहिरात देवून बी-१

नमुन्या निविदा मागविल्या असता एकूण पाच निविदा पत्रके विक्री झाली. पैकी तीन दरनिर्दिष्ट निविदा प्राप्त झाल्या त्या खालील प्रमाणे.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. एस. एम. मंडोरे | ८% जास्त |
| २. | श्री. के. बी. काल्डा | ९.२५% जास्त |
| ३. | मे. विशाल कन्स्ट्रक्शन | ४.९८% जास्त |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४.९८% जास्त दराचे मे. विशाल कन्स्ट्रक्शन यांचे दरपत्रक आहे. मा. आयुक्तांच्या आदेशावरुन दर कमी करण्याच्या अनुषंगाने वाटाघाटीसाठी संबंधितास बोलाविले असता वाटाघाटी अंती अंदाजपत्रकीय दरापेक्षा २.९८% जास्त दराने काम करण्यास अनुमती दिली करीता मे. विशाल कन्स्ट्रक्शन यांना २.९८% जास्त दराने काम देण्याच्या मंजूरीस्तव प्रस्ताव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, रचनाकार कॉलनी येथे १५० मी. मी. व्यासाची चिनी मातीची ड्रेनेज लाईन काढुन २५ मी. मी. व्यासाची आर. सी. सी. ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामाकरीता मे. विशाल कंस्ट्रक्शन यांचेशी झालेल्या वाटाघाटी नुसार उक्त काम संबंधित ऐजन्सी कडून अंदाजपत्रकाचे दरापेक्षा २.९८% जास्त दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३५०/६० :**

महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना (दुरुस्ती) अधिनियम १९९२ प्रमाणे दुरुस्ती झाल्या नुसार दि. १०-०८-९२ पासून संस्था अथवा निवास वापरा करीता बांधकाम उभारणी वगळता जमिनीच्या विकासासाठी किमान रु. २० प्रति ची मिटर भुखंड क्षेत्रावर " विकास शुल्क " आकारणी करण्याचा महाराष्ट्र शासनाने कायदा केला असल्याने हा आकारणी औरंगाबाद महानगरपालिका देखील दि. १०-०८-९२ पासून अंमलात आणण्याची कार्यवाही करीता आहे. तसेच हे दर औद्योगिक वापरांसाठी दिडपट व व्यापार / वाणिज्य वापरांसाठी दुप्पट आहेत.

स्थायी समितीचा ठराव क्र. ४१६ दि. २१-०१-९० प्रमाणे दि. ०१-०४-८९ नंतर संमत झालेलया व पुढे संमत होणाऱ्या रेखाकंनावर रु. १४ प्रति चौ. मी. प्रमाणे भुखंड क्षेत्रावर, जलनिःसारण विकास व जोडणी खर्च आकारणी करण्यात येत आहे.

आता वरील प्रमाणे महराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना (दुरुस्ती) अधिनियम १९९२ ला दुरुस्ती झाल्याप्रमाणे भुखंडा क्षेत्रावर निवास वापरांस रुपये २०% प्रति चौ. मी. प्रमाणे व औद्योगिक आणि वाणिज्य वापरांस दिडपट व दूप्पट रक्कम आकारणी करावी लागणार असल्याने आता जलनिःसारण विकास व जोडणी खर्चाची रु. १४/- प्रति चौ. मी. भुखंड क्षेत्रावर आकारणी कमी करण्यात यावी असे वाटते. तरी आता वरील दुरुस्ती अधिनियमाप्रमाणे आकारणी करण्यात येणारे विकास शुल्क जमा केल्यानंतर पुन्हा रु. १४/- प्रति चौ. मी. प्रमाणे जलनिःसारण विकास व जोडणी खर्चाची रक्कम रेखाकंनास अंतिम मंजूरी पुर्वी घ्यावी किंवा कसे. स्थायी समितीच्या निर्णयास्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महाराष्ट्र शासनाने केलेल्या कायदयानुसार महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना (दुरुस्ती) अधिनियम १९९२ प्रमाणे दुरुस्ती आल्यानुसार दिनांक १०-०८-९२ पासून संस्था अथवा निवास वापरा करीता बांधकाम उभारणी वगळता जमिनीच्या विकासासाठी किमान रुपये २०/- प्रति चौरस मीटर आणि औद्योगीक वापरासाठी दिडपट व

व्यापार/वाणिज्य वापरासाठी दुप्पट या दराने भुखंड क्षेत्रावर " विकास शुल्क " आकारणी करण्यात येत असल्यामुळे दि. ०१-०४-८९ नंतर आणि त्यापुढे समंत होणाऱ्या रेखाकंनाच्या भुखंड क्षेत्रावर प्रति चौरस मिटर रुपये १४/- या प्रमाणे आकारण्यात येणार जलनि:सारण विकास व जोडणी खर्च यापुढे आकारण्यात येऊ नये असे सर्वानुमते ठरले.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३५१/६१ :**

साहाय्यक आयुक्त-२ यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, ९२-९३ सालात फर्नीचर साहित्य खरेदी करण्याकरीता स्थानिक वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द करण्यात आली होती. त्यानुसार प्राप्त निविदा धारकांनी दाखल केलेले फर्नीचर साहित्य मा. शहर अभियंता यांनी फर्नीचर तपासून केलेल्या शिफारसी नुसार खालील प्रमाणे दर्शविण्यात आलेल्या साहित्याचे दरास होणे बाबत प्रस्ताव मान्यतेस्तव सादर.

| अ. क्र. | साहित्य | दर | निविदा धारकाचे नांव |
|---|---|---|---|
| १. | स्टील आलमारी मोठी | ३,१९०.०० | एस. एन. प्रॉडक्टस |
| २. | ऑफीसर टेबल मोठा | ३,५९०.०० | एस. एन. प्रॉडक्टस |
| ३. | रिव्हॉल्वींग चेअर | १,१५०.०० | एस. एन. प्रॉडक्टस |
| ४. | " एस " टाईम चेअर | ४५०.०० | महाराजा को. ऑप कन्झुं. फेड लि. |
| ५. | स्टील आलमारी लहान | १,६७५.०० | संतोष सेल्स कार्पोरेशन |
| ६. | ऑफीस टेबल | १,२५०.०० | संतोष सेल्स कार्पोरेशन |
| ७. | लोखंडी स्टुल | ९५.०० | संतोष सेल्स कार्पोरेशन |
| ८. | स्टील रॅक्स | १,१४५.०० | वर्षा मेटल वर्क्स |
| ९. | लोखंडी बेंच | ६१०.०० | वर्षा मेटल वर्क्स |

वरल प्रमाणे दर्शविण्यात आलेल्या दरास मान्यतेबाबत प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सन १९९२-९३ या वर्षा करीता आवश्यक ते फर्नीचर खरेदी करीता निम्ननिदिर्दष्ट तक्त्यात दर्शविलेल्यासुची प्रमाणे फर्नीचर साहित्य खरेदी करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

| अ. क्र. | साहित्य | दर | निविदा धारकाचे नांव |
|---|---|---|---|
| १. | स्टील आलमारी मोठी | ३,१९०.०० | एस. एन. प्रॉडक्टस |
| २. | ऑफीसर टेबल मोठा | ३,५९०.०० | एस. एन. प्रॉडक्टस |
| ३. | रिव्हॉल्वींग चेअर | १,१५०.०० | एस. एन. प्रॉडक्टस |
| ४. | " एस " टाईम चेअर | ४५०.०० | महाराजा को. ऑप कन्झुं. फेड लि. |
| ५. | स्टील आलमारी लहान | १,६७५.०० | संतोष सेल्स कार्पोरेशन |
| ६. | ऑफीस टेबल | १,२५०.०० | संतोष सेल्स कार्पोरेशन |
| ७. | लोखंडी स्टुल | ९५.०० | संतोष सेल्स कार्पोरेशन |
| ८. | स्टील रॅक्स | १,१४५.०० | वर्षा मेटल वर्क्स |
| ९. | लोखंडी बेंच | ६१०.०० | वर्षा मेटल वर्क्स |

वैधानिक कार्यवाही व्हावी.

## *" ऐनवेळेचे विषय "*

**विषय क्र. ३५२/६२ :**

आरोग्य वैद्यकीय अधिकारी यांनी प्रस्तावित केले आहे की, शासनाने वेळोवेही महापालिकेस उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल दिलेले पारितोषक व अनूदानातून आरोग्य वैद्यकीय

अधिकारी या स्थायी वर्ग-१ पदासाठी आरोग्य कुटूंब कल्याण लसीकरण व स्वच्छेतेच्या देखरेखांसाठी वाहनाची गरज आहे. वरील कार्यालयासाठी वाहन ॲबेंसेंडर कार (  ) खरेदी करण्यात यावी. याचा खर्च अंदाजे २.२५ लाख रुपये अंदाज पत्रकातील कुंटूंब कल्याण कार्यक्रमाअंतगर्त अंदाजित केलेल्या रक्कमेमधून खरेदी करण्यास मान्यता दयावी वरील वाहन ॲबेंसेडर कंपनीच्या वितरकाकडून कंपनीच्या किंमतीमध्ये खरेदी करण्यास मान्यता दयावी मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महापालिकेने केलेल्या वेळोवेळी उत्कृष्ट कार्याबद्दल शासनाने दिलेल्या पारितोषक व अनूदानातून आरोग्य वैदयकीय अधिकारी या स्थायी वर्ग-१ पदाकरीता आरोग्य कुटूंब कल्याण, लसीकरण व स्वच्छतेची देखरेख यासाठी ॲबेंसेंडर कंपनीच्या वितरकाकडून कंपनीच्या दरामध्ये एक ॲबेंसेंडर काम खरेदी करण्याकरीता अंदाज रक्कम रु. २,२५,०००/- च्या खर्चास मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३५३/६३ :**

ठराव क्रमांक १९४/दिनांक १२-०८-९२ मंजुरी नुसार रस्टन कंपनीचे २५ के. व्ही. ए. चे डिझेल जनरेटर सेट मागविण्यासाठी आलेल्या निविदा खालील प्रमाणे आहेत. तातडीची गरज लक्षात घेता सदरील निविदा वृत्त पत्रात देण्यात आलेली नाही. चौकशी अंती कोटेशन मागविण्यात आले आहेत. ज्याचे दर खालील प्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| १. | अशोक इंजिनिअरींग - २० केव्हीए | २,७५,०००/- |
| २. | सत्यम वायर - २० केव्हीए | २,७०,५३१/- |
| ३. | गजानन इलेक्ट्रीकल्स - केव्हीए | २,७६,९००/- |

वरील सर्व दर संपुर्ण फिटींग व विदयुतीकरणासह आहेत. तरी सर्वात कमी दराचे दरपत्रक मे. सत्यम वायर यांचे दर सर्वात कमी म्हणजे २,७०,५३१/- आहेत. तरी प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, ठराव क्र. १९४ दि. १२-०८-९२ च्या मंजुरीनुसार रस्टन कंपनीचे २५ के. व्ही. ए. चे डिझेल जनरेटेसेट खरेदी करीता मे. सत्यम वायर यांचे तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजेच रुपये २,७०,५३१/- ( सर्व दर संपूर्ण फिटींग व विदयुतीकारणासह ) च्या दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३५४/६४ :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, मजनूहील येथील मनपाच्या उदयानामध्ये वॉटरपौंड, समान रस्ते, स्वच्छतागृह, चौकीदार निवासस्थान क्रॉकीटयुल, आणि ग्रीन हाऊस इ. कामे करणे बाबत कामासाठी अंदाजपत्रकास रक्कम रु. ५,३६,७४७/- ला. मा. आयुक्तांची मंजूरी अन्वये सदर कामाचे बी-१ नमुन्यात निविदा सुचना दिनांक ०१-०७-९२ रोजी दैनिक नवा मराठा दै. औरंगाबाद, दै. औरंगाबाद टाईम्स इ. वर्तमानपत्रात प्रसिध्द करुन निविदा मागविण्यात आले. त्या अनुषंगाने विक्रीच्या तारखेपर्यंत एकूण ७ (७) दरपत्रके विकण्यात आली व स्विकारणेच्या तारखेस एकूण ४ (चार) दरपत्रके दर भरुन प्राप्त झाले. सदरील निविदा उपस्थित गुत्तेदारासमक्ष उघडण्यात आले. दराचे तपशील खालील प्रमाणे.

| अ. क्र. | एजन्सीचे नांव | दिलेले दर |
|---|---|---|
| १. | श्री. बी. आर. आनंद | २४.८९% अंदाजपत्रकीय दरापेक्षा जास्त |
| २. | श्री. कुलवंतसिंग | २६.५०% अंदाजपत्रकीय दरापेक्षा जास्त |
| ३. | श्री. एस. एच. असोसिएटस | २९% अंदाजपत्रकीय दरापेक्षा जास्त |
| ४. | श्री. कैसरखान | २९% अंदाजपत्रकीय दरापेक्षा जास्त |

सदरील दर पत्रकात तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दर श्री. बी. आर. आनंद गुत्तेदार यांचे अंदाजपत्रकीय दरापेक्षा २४.८९% जास्त दराने आहे.

मा. आयुक्त साहेब यांच्या तजविज अन्वये सदरील गुत्तेदार यास दराबाबत वाटाघाटी अंतर्गत चर्चा करण्यात आली त्यास गुत्तेदार यास आपण दिलेले दर फारच जास्त आहे ते गुत्तेदार यांनी मान्य केले व २४,८९% ऐवजी १५% जास्त दराने काम करण्याचे मान्य केले प्रस्ताव तसेच सदरील खर्च शासकीय अनूदान सन १९९१-९२ यातून करण्यात येणार आहे. करीता प्रस्ताव विचारार्थ व मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, मजनुहील येथील मनपा उदयानामध्ये वॉटरपौंड, कमानी रस्ते स्वच्छतागृह, चौकीदार निवास कॉक्रींट पूल आणि ग्रीन हाऊस इत्यादी कामे करण्याकरीता गुत्तेदार श्री. बी. आर. आनंद यांचेशी झालेल्या वाटाघाटी नुसार उक्त काम संबंधित गुत्तेदाराकडून अंदाजपत्रकाचे दरापेक्षा १५% जास्त दराने करुन घेण्यास मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३५५/६५ :**

शहर अभियंता महानगरपालिका यांनी प्रस्ताव सादर केला की, हमालवाडी स्लम भागातील खांडकी पेव्हींगची दुरुस्ती करुन गटारीचे बांधकाम करण्यासाठी स्थायी समितीचा ठराव क्रमांक ३४/३ दिनांक ०८-०६-९२ द्वारे रु. २,४१,१०५/- ला प्रशासकीय मंजूरी दिल्यानुसार सदरील कामासाठी कार्यालयाची निविदा सुचना दिनांक १४-०८-९२ द्वारे स्थानिक वृत्तपत्र दै. तरुण भारत, दै. लोकधर्म, व दै. औरंगाबाद टाईम्स मध्ये विस्तृत प्रसिध्दी देवून प्रगट निविदा मागविल्या असता कोऱ्या निविदा विकण्याचे अंतिम तारखे पर्यंत एकूण (१३) निविदा विकण्यात आल्या व मोहरबंद निविदा स्विकारण्याचे नियोजीत तारखेस फक्त (३) निविदा प्राप्त झाल्या व प्राप्त झालेल्या निविदा उघडल्या असता ठेकेदारांनी दिलेले दर खालील प्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. कैसरखान | ८% अंदाजपत्रकापेक्षा जास्त |
| २. | श्री. कुलवंतसिंग | १०% अंदाजपत्रकापेक्षा जास्त |
| ३. | श्री. एल. एम. पडघन | ५% अंदाजपत्रकापेक्षा जास्त |

तुलनात्मकदृष्टया श्री. एल. एम. पडघन यांची निविदा कमी व अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ५% जास्त आहे. करीता श्री. एल. एम. पडघन यांची अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ५% अधिक दराची निविदा मंजुरीसाठी सादर केली असता मा. आयुक्त साहेबांनी दिनांक १९-०९-९२ रोजी श्री. एल. एम. पडघन यांची निविदा अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ४% अधिक दराने मंजूर करणेसाठी शिफारस केली आहे. करीता श्री. एल. एम. पडघन यांची निविदा अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ४% अधिक दराने मंजूर करणेसाठी विचारार्थ सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, हमालवाडी स्लम भागातील खांडकी पेव्हींगची दुरुस्ती करुन गटारीचे बांधकाम गुत्तेदार श्री. एल. एम. पडघन यांचे कडून अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ४% जास्त दराने करुन घेण्यास मंजूरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३५६/६६ :**

पाणीपूरवठा विभाग सिडको विभागातील जलवाहिनी दुरुस्ती करण्याच्या कामासाठी जिफी जॉईन्टस खरेदीसाठी अंदाजपत्रक र. रु. ४,९९,६००/- च्या दि. १२-०८-९२ स्थायी समितीच्या मंजूरी नुसार कार्यालयीन निविदा सुचना दि. २५-०८-९२ अन्वये दैनिक देवगीरी तरण भारत, मुकद्स रहेबर, स्वरगंगा मध्ये प्रसिध्द करुन निविदा मागविण्यात आल्या असता एकूण तीन निविदा विक्री झाल्या असून, स्विकारण्याच्या अंतिम दिनांक पर्यंत दोन निविदा प्राप्त झाल्या त्याचा तपशील खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | ओरियन्ट रबर प्रॉडक्टस, नागपूर | ३.५९% जास्त |
| २. | आर. के. घोष ॲन्ड सन्स | ६.७१% जास्त |

वरील प्राप्त झालेल्या निविदेत तुलनात्मकदृष्टया कमी दराची ओरीएन्ट रबर प्रॉडक्टस, नागपूर यांची निविदा अंदाजपत्रकापेक्षा ३.५९% जास्त दराची होती. परंतू त्यांना दर कमी करण्याबाबत पत्रक दिल्यानुसार त्यात त्यांनी २% दर कमी केले आहेत. त्याप्रमाणे म्हणजे अंदाज पत्रकापेक्षा १.५९% जास्त दराची होते.

तरी निविदा मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, सिडको विभागातील पाणी पुरवठा जलवाहिनीची दुरुस्ती करण्याच्या कामासाठी आवश्यक असलेले जी. की. जॉईन्ट खरेदी करीता मेसर्स ऑरिएन्ट रबर प्रॉडक्टस नागपूर यांचे अंदाजपत्रकाचे दरापेक्षा १.५९% जास्त दराच्या दरपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३५७/६७ :**

सहाय्यक आयुक्त-२ यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, मा. महापौर निवासासाठी फर्नीचर व इतर साहित्य खरेदी करण्याकरीता मा. आयुक्तांनी मंजुरी दिल्यानुसार सदरील साहित्य खरेदी करण्याकरीता स्थानिक वर्तमानपत्रात निविदा सुचना प्रसिध्दीस देणे बाबत प्रस्ताव मंजूरीस्तव सादर. सदरील फर्नीचर साहित्याची खरेदी अंदाजित चार लाख पर्यंत आहे व सदर खर्च इमारती व उर्वरीत खर्च मा. लेखा शिर्षा अंतर्गत करण्यात येईल. तरी प्रकरण मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महापौर निवासासाठी लागणारे फर्नीचर व इतर साहित्य खरेदी करीता रक्कम रुपये ४,००,०००/- च्या अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३५८/६८ :**

वार्ड क्र. मोहल्ला नुतन कॉलनी ते जिजामाता कॉलनी मार्गे रॉक्सी सिनेमा येथे २५० मी. मी. व ३०० मी. मी. व्यासाची आर. सी. सी. लाईन टाकणे बाबत अंदाजपत्रक रक्कम रु. ७०६२३०.०० चे अंदाजपत्रक सन १९९०-९१ च्या दरसुची नुसार तयार करण्यात आले

असून, प्राप्त सरकारी अनुदानातून सदर काम करणेस्तव मा. आयुक्त महोदयाने मंजूरी दिलेली आहे.

आदेशावरुन सदरील कामाकरीता कार्यालयीन निविदा सुचना क्र. ६/-, ७८२/-९२ दिनांक २२-०५-९२ नुसार बी-१ निविदेत निविदा पत्रके मागविले असता ३५% जास्त दराचे अंदाजपत्रकीय दरापेक्षा जास्त दराचे मे. उदय इंजिनिअरींग यांचे दरपत्रक होते. दरपत्रक जास्त असल्याने फेर निविदा मागविण्यास मा. आयुक्त महोदयाने आदेश दिले.

आदेशावरुन सदरील कामाकरीता कार्यालयीन निविदा सूचना क्र. १२/११३७/९२ दिनांक २०-०८-९२ नुसार दैनिक लोकमत व औरंगाबाद टाईम्स या दैनिकात जाहिरात देवून दुसरी वेळ बी-१ नमुन्यात निविदा मागविले असता, एकूण सहा निविदा पत्रके विकण्यात आल्या होत्या त्यापैकी फक्त तिनच निविदा पत्रके प्राप्त झाली असून, त्यांचा तुलनात्मक तक्ता दर खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. कैसरखान | ३०% जास्त |
| २. | श्री. एस. ए. नवाब | ३५% जास्त |
| ३. | श्री. पी. जे. तमखाने | ४०% जास्त |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी व अंदाजपत्रकीय दरापेक्षा ३०% जास्त दराचे श्री. कैसरखान यांचे दरपत्रक आहे. दरपत्रक हे सन १९९०-९१ नुसार असून, बनविण्यात आले असून, सन १९९१-९२ च्या दरपत्रकास तुलनेने दिलेले दर हे २.३६% जास्त आहे.

मा. आयुक्त महोदयाच्या आदेशावरुन दर कमी करण्याच्या अनुषंगाने संबंधित गुत्तेदार श्री. कैसरखान यास दर कमी करण्यासाठी वाटाघाटीसाठी बोलाविण्यात आले असता मा. आयुक्त महोदय, मा. लेखापरीक्षक, व मा. कार्यकारी अभियंता यांच्या उपस्थितीत वाटाघाटी होऊन दिलेल्या दरापेक्षा १% कमी दरात संबंधितास काय देण्याची मंजूरी देऊन संबंधिताने स्विकृती दिलेली आहे. करीता प्रस्ताव मंजूरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, नुतन कॉलनी ते जिजामाता कॉलनी मार्गे रॉक्सी सिनेमागृह येथे २५० व ३०० मी. मी. व्यासाची आर. सी. सी. ड्रेनेज लाईन टाकणेच्या कामाकरीता दुसऱ्यांदा मागविण्यात आलेल्या दरपत्रकाचे दरही जास्त असल्यामुळे तुलनात्मकदृष्टया कमी दराचे दरपत्रक धारक श्री. कैसरखान यांचेशी झालेल्या वाटाघाटी नुसार उक्त काम संबंधिताकडून दिलेल्या दरापेक्षा १% कमी दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजुरी देण्यात येते. वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३५९/६९ :**

कार्यकारी अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, झोन क्र. - १ मधील विविध ठिकाणची दुरुस्तीचे कामे करणे बाबत अंदाजपत्रक रक्कम रु. ३,५०,०००.०० ला स्थायी समितीचा ठराव क्र. ६०७/८८ दि. २९-०४-९२ नुसार मंजुरी मिळालेली आहे.

आदेशानुसार सदर कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र. ५/७६१/९२ दि. २०-०५-९२ नुसार वर्तमानपत्रात जाहीरात देऊन बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता एकूण चार निविदा विकण्यात आलेल्या होत्या त्यापैकी केवळ तीन निविदा प्राप्त झालेल्या असून, अंदाजपत्रकीय दरापेक्षा सर्वात कमी म्हणजे ०.१% कमी दराची श्री. एस. ए. बाहोद्दीन यांचे दरपत्रक होते व सदरील निविदेस स्थायी समितीचा ठराव क्रमांक १४५/१८ दिनांक ०४-०७-९२ नुसार मंजुरी मिळालेली होती व संबंधितास २% अनामत व १० रुपायांचा मुद्रांक दाखल

करणेस्तव पत्रके दिले असता संबंधित गुत्तेदार यांनी किडनीचा आजार असल्यामुळे संबंधित काम करु शकत नव्हता. तसेच त्यांनी लेखी सुध्दा दिले होते. या आधारे मा. आयुक्त यांनी फेर निविदा करण्याचा आदेशा दिला.

आदेशानुसार सदरील कामासाठी कार्यालयीन निविदा सुचना क्र. ११/११३३ दिनांक १९-०९-९२ ला दुसऱ्यांदा दैनिक अंजिठा आलमगीर टाईम्स लोकमत व रहेबर या वर्तमानपत्रात जाहिरात देवून बी-१ नमुन्यात निविदा मागविल्या असता एकूण चार निविदा विकण्यात आलेल्या होत्या. त्यापैकी केवळ तीन निविदा प्राप्त झालेल्या असून, त्यांचा तुलनात्मक तक्ता खालील प्रमाणे आहे.

| | | |
|---|---|---|
| १. | श्री. अ. सलाम | ४% जास्त |
| २. | श्री. कैसरखान | ७% जास्त |
| ३. | श्री. बी. आर. आनंद | ८% जास्त |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी म्हणजे ४% जास्त दराचे श्री. अब्दुल सलाम याचे दरपत्रक आहे. परंतू दर योग्य वाटत नसल्यामुळे मा. आयुक्त यांनी संबंधित गुत्तेदार यांना दर वाटाघाटी करीता बोलाविण्यास्तव आदेश दिला तद्नंतर संबंधित गुत्तेदार यांना दर वाटाघाटी करीता पाचारण देण्यात आले १ दिनांक ०९-१०-९२ ला मा. आयुक्त मा. मुख्यलेखा परीक्षक व मा. कार्यकारी अभियंता यांच्या समक्ष दर वाटाघाटी करण्यात आली. संबंधित गुत्तेदार श्री. अब्दुल सलाम यांनी अंदाजपत्रकीय दरापेक्षा ४% जास्त दराऐवजी ३% जास्त दराने काम करण्यास समंती दर्शविलेली आहे. करीता प्रस्ताव मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, झोन क्र. १ मधील विविध ठिकाणची दुरुस्तीचे काम करण्याकरीता मागविण्यात आलेल्या फेर निविदा नुसार गुत्तेदार श्री. अब्दुल सलाम यांचेशी दिनांक ०९-१०-९२ रोजी झालेल्या वाटाघाटी नुसार उक्त काम संबंधित गुत्तेदाराकडून अंदाजपत्रकाचे दरापेक्षा ३% जास्त दराने करुन घेंण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३६०/७० :**

शहर अभियंता यांनी प्रस्ताव सादर केला की, महानगरपालिकेच्या शासकीय अनूदानाचे व इतर कामे प्रगती पथावर असून, तसेच विभागाच्या मागणी नुसार तिसऱ्या तिमाहीसाठी एकूण मागणी ५०,००० गोणी असून, त्यापैकी तुर्त २०,००० सिमेंट गोणी खरेदी करणे आवश्यक आहे.

यापुर्वी स्थायी समिती ठराव क्र. १०७ दिनांक २६-०६-९२ द्वारे सी. सी. आय. कंपनीचे सिमेंट व्ही. ए. ट्रेडींग पुरवठा दाराकडून प्रति टन रक्कम रुपये २०३०.०० (दोन हजार तीस) प्रमाणे खरेदी करण्यात आले होते.

त्या आधारे पून्हा कार्यालयीन पत्रक मनपा/शअ/भांडार/५९३ दिनांक ०३-०९-९२ द्वारे व्ही. ए. ट्रेडींग कंपनी सिमेंट पूरवठा धारक यांना जून्या दराने म्हणजे प्रतिटन रु. २०३०.०० प्रमाणे सिमेंट पूरवठा करण्यास तयार आहे काय? याबाबत विचारणा केली असता त्यांनी दिनांक ०७-०८-९२ रोजी पत्रक देवून कळविले आहे की, वरील दराने सिमेंट पूरवठा करण्यास तयार असून, सर्व अटी दरपत्रकाप्रमाणे राहतील.

तसेच सिमेंट पुरवठा होताच देयकांची अदाई त्वरीत करण्यात यावी या बाबत लेखी कळविले आहे.

तुर्त २०,००० गोणी सिमेंट खरेदी करणे आवश्यक असुन जुन्या दराने म्हणजे प्रति टन रु. २०३०.०० (दोन हजार तिस) प्रमाणे एकूण १००० टनचे रक्कम रुपये २०,३००,०००/- (विस लाख तिस हजार) यास तसेच व्ही. ए. ट्रेडींग कंपनी कडून खरेदी करण्याच्या मान्यतेस्तव सादर.

**संवाद :**

**मा. सभापती** : महापालिकेने ठरवून दिलेल्या कालामर्यादेत कार्यालयात लागणारे सिमेंट वेळोवेळी पुरवूनही या बाबतची देयके कार्यालयाकडे प्रलंबित असल्यामुळे प्रस्तावित सिमेंट पुरवठा करतांना सिमेंटच्या किंमती पैकी कमीत कमी ९०% रक्कम अप्रतिम धन म्हणुन देण्याची विनंती मेर्सस व्ही. ए. ट्रेडर्स यांनी दि. १८-१०-९२ च्या पत्रकाद्वारे केली आहे. तेव्हा संबंधित संस्थेच्या विनंती नुसार प्रस्तावित सिमेंटच्या पुरवठा करण्याकरीता मे. व्ही. ए. ट्रेडींग कंपनी यांना सिमेंटच्या किंमती पैकी ९०% रक्कम अग्रीम धन म्हणुन देण्यात यावी.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, महापालिकेतर्फे चालु असलेल्या कामासाठी आवश्यक असलेल्या तिसऱ्या तिमाहीच्या एकूण सिमेंटच्या मागणीपैकी प्रति टन रुपये २,०३०/- या दराने मे. व्ही. ए. ट्रेडींग कंपनी यांचे कडून एक हजार टन सिमेंट खरेदी करण्यास आणि रक्कम रुपये २०,३०,०००/- च्या खर्चास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

**विषय क्र. ३६१/७१ :**

पाणी पुरवठा विभाग-२ मधील एन - २ जे सेक्टर येथील घरांना पाणी पट्टीची बिले १ मार्च १९८७ ते ३० जून १९९२ पावेतो प्रत्येकी रु. १,८७७/- नुसार देण्यात आलेले आहे. त्याचे उत्तरी सर्व नागरिकांनी दि. २९-०८-९२ रोजी अर्ज देवून सन १९९१ पावेतो पाणी पट्टी माफ करावी असे म्हटले आहे. कारण पुर्वी आम्हास पाणी मिळत नव्हते. सदरील घर धारकांना मार्च १९८७ पासून मार्च १९८९ पावतो सिडकोने टाकलेल्या पाईप लाईन द्वारे पाणी पुरवठा होत होता नंतर महानगरपालिकेतर्फे सन १९८९ मध्ये मोठया व्यासाची पाईप लाईन टाकण्यात येवून पाणी पुरवठा सुरळीत झाला. संबंधित नागरीक मार्च ८७ ते ३१-०३-९१ पावेतो नळ पट्टी भरण्यास तयार नाहीत या भागातील नागरिकांकडे एकूण थकबाकी रु. ९,०६,५९१/- आहे. सदरील थकबाकी मार्च १९८७ ते १९९२ पर्यंतची असून, सदर गाळेधारकांची पाणीपट्टी माफ करण्याबाबतची संचिका पाणी पुरवठा २ येथे चालु असून, सदरील नागरिकांची मा. आयुक्त, उप आयुक्त व कार्यकारी अभियंता यांचेशी झालेल्या चर्चेनुसार व विधी सल्लागार यांचे अहवाला नुसार काम झालेली जुनी संचिका प्रमाणे दि. ०१-०३-८७ ते ३१-०३-८७ पावेतो पाणी पट्टी, पाणी सुरळीत न मिळाल्यामुळे माफ करावयाची असल्यास स्थायी समितीची मंजूरी घ्यावी असे सुचविले आहे.

वरील प्रमाणे एकूण गाळेधारक ४८३ यांचेकडे प्रत्येकी रु. ५७७/- प्रमाणे (मार्च १९८७ ते मे ८९ पावेतो) २,७८,६९१/- इतकी होते, दिनांक ०१-०४-८९ ते ३०-०६-१९९२ पर्यंत प्रत्येकी रु. १,३००/- प्रमाणे एकूण थकबाकी रु. ६,२७,९००/- इतकी होते. सदर गाळेधारकांना पाणी पट्टी वरील काळाची माफ केल्यास महानगरपालिकेचे रु. २,७८,६९१/- आर्थिक नुकसान होते. तरी याबाबत प्रस्ताव विचारार्थ सादर.

**ठराव :**

सदर प्रस्तावावर पुढील सभेत चर्चा करण्यात यावी. असे सर्वानुमते ठरले.

**विषय क्र. ३६२/७२ :**

कार्यकारी अभियंता जलनि:सारणा व पाणी पुरवठा मनपा औरंगाबाद यांनी प्रस्ताव सादर केला आहे की, सिडकोची ब्रँच गोवर लाईन मनपा हद्दीत किराडपूरा येथे येवून मिळत आहे. कार्याकरी अभियंता, सिडकोत नविन औरंगाबाद यांनी त्यांचे कार्यालयात दि. १८-०५-९२ रोजी झालेल्या बैठकी मध्ये अशी विनंती केली आहे की, पंचायत समिती कार्यालय ते सिध्दार्थ गार्डन पर्यंत टाकण्यात येणारी मुख्य जलनि:सारण वाहिनी ही किराडपूरा पर्यंत जेथे त्यांची ब्रॅचझोवर येवून मिळते तिथ पर्यंत टाकावी या कामासाठी लागणार सर्व खर्च सिडको कार्यालय आपल्या कार्यालयाकडे जमा करणार आहे. त्यानुसार किराडपुरा ते पंचायत समिती कार्यालयापर्यंत ४५० मी. मी. व्यासाची आर. सी. सी. एन पी.-२ क्लासची ब्रँचसिवर लाईन टाकण्याचे अंदाजपत्रक सन १९९१-९२ च्या दरसुची नुसार रु. १७,४३०००/- बनविण्यात आले असून, सदर अंदाजपत्रकास मा. आयुक्त यांनी दि. १८-०८-९२ रोजी मान्यता दिली व निविदा सुचना काढण्याची परवानगी दिली मात्र सदरील कामास प्रत्यक्ष सुरुवात सिडको कार्यालयाकडून संपुर्ण रक्कम प्राप्त झाल्यानंतरच करावयाचे ठरले. दरम्यान सिडको कार्यालयाचे कार्यकारी अभियंता यांनी दि. ११-०८-९२ रोजी समक्ष भेटीत खुलासा केला की, त्यांचे कार्यालयाने त्यांचे मुख्य कार्यालयाकडे जलनि:सारण वाहिनीसाठी मागणी केलेले रु. १०४.५७ लाखाची रक्कम मंजूर होवून त्यांना प्राप्त होताच ही रक्क्म महानगरपालिकेकडे वर्ग करण्यात येईल.

त्यानुसार उपरोक्त कामासाठी रु. १६,६०,०००/- रक्कमेची निविदा सुचना क्र. ३/९२-९३ ही प्रसिध्दीस देण्यासाठी जा. क्र. मनपा/विका/२९२/९२ दि. ०४-०९-९२ नुसार जनसंपर्क अधिकारी यांचेकडे पाठविण्यात आली असता दै. लोकमत व दै. इंडियन एक्सप्रेस मध्ये प्रसिध्दीस देण्यात आली. त्यानुसार निविदा विक्रीची अंतिम तारीख दि. १६-०९-९२ रोजी दुपारी १.०० वाजेपर्यंत नऊ कोऱ्या निविदा विक्री झाल्या व निविदा स्विकृतीच्या नियोजीत तारखेस २४-०९-९२ रोजी चार मोहरबंद निविदा प्राप्त झाल्या असल्याचे दि. २४-०९-९२ रोजी निविदा पेटी उघडल्यानंतर दिसुन आले प्राप्त चार मोहरबंद निविदा फोडण्यात आल्या असता ठेकेदारांनी पुढील प्रमाणे दर नमुद केलेले आहेत.

| | | |
|---|---|---|
| १. | उदय इंजि. कंपनी | अंदाजपत्रकापेक्षा ११% जास्त |
| २. | श्री. आर. एल. बारवाल | अंदाजपत्रकापेक्षा १५% जास्त |
| ३. | श्री. एस. ए. नवाब | अंदाजपत्रकापेक्षा २१.६०% जास्त |
| ४. | श्री. एम. एस. एस. आय. डी. सी. | (फक्त पाईप पुरविण्यासाठी) |

तुलनात्मकदृष्टया सर्वात कमी दराची निविदा उदय इंजिनियरिंग कंपनी यांची अंदाजपत्रक दरापेक्षा ११% जास्त दराची होती जी की, सध्याची दरसुची व सिमेंट दराचा फरक लक्षात घेता १.०१% अधिक येते यावर मा. आयुक्त यांचे दि. ०४-१०-९२ चे तजविज नुसार ठेकेदारास वाटाघाटीस बोलाविण्यात आले व मा. आयुक्तांशी दि. ०४-१०-९२ रोजी झालेल्या दर वाटाघाटीनुसार ठेकेदार सध्याचे दरानुसार १% अधिकने काम करण्यास तयार आहेत. सध्याच्या दरसुचीने १% % जास्त म्हणजेच निविदेतील जर सुची नुसार १०.९९% अधिक दराने ठेकेदार काम करण्यास तयार आहेत. याबाबत ठेकेदारांनी दिनांक ०७-१०-९२ रोजी लेखी पत्र सुध्दा सादर केले आहे

त्यानुसार किराडपुरा ते पंचायत समिती कार्यालयापर्यंत ४५० मी. मी. व्यासाची आर. सी. सी. एन. पी.-२ क्लासची ब्रँच लाईन टाकण्याच्या कामासाठी उदय इंजिनियरिंग कंपनी यांची मा. आयुक्त यांचेकडे झालेल्या दर वाटाघाटीत ठरल्यानुसार व त्यांनी दि. ०७-१०-९२ रोजी लेखी पत्र दिल्यानुसार अंदाजपत्रकीय दरापेक्षा १०.९९% जास्त दराची निविदा मंजुरीस्तव सादर.

**ठराव :**

प्रस्तावात दर्शविल्याप्रमाणे, किराडपूरा ते पंचायत समिती कार्यालयापर्यंत ४५० मी. मी. व्यासाची आर. सी. सी. एन. पी.-२ क्लासची ब्रॅच लाईन टाकण्याच्या कामासाठी दिनांक ०७-१०-९२ च्या लेखी पत्रकानुसार मेसर्स उदय इंजिनियरिंग कंपनी यांनी दिलेल्या लेखी संमती नुसार उक्त काम संबंधित एजन्सीकडून अंदाजपत्रकाच्या दरापेक्षा १०.९९% जास्त दराने करुन घेण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात येते.

वैधानिक कार्यवाही व्हावी.

यानंतर सभेचे कामकाज संपल्याचे मा. सभापती यांनी जाहीर केले.

स्वाक्षरित/-
सचिव,
महानगरपालिका, औरंगाबाद.

स्वाक्षरित/-
सभापती, स्थायी समिती
महानगरपालिका, औरंगाबाद.